# भारतीय मुसलमानांचा राजकीय इतिहास

## १८५८ ते १९४७

"THE INDIAN MUSLIMS" "या पुस्तकाचा अनुवाद"

लेखक: राम गोपाल

अनुवाद: कमल पाध्ये

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

# भारतीय मुसलमानांचा राजकीय इतिहास

( प्रा. राम गोपाळ लिखित " The Indian Muslims"
या पुस्तकाचा अनुवाद )

: अनुवाद :

कमल पाध्ये

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

प्रथमावृत्ती : १९८८

व्दितीय आवृत्ती : २००२

प्रकाशन : सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई-४०० ०१४

© : प्रकाशकाधीन

मुद्रक : व्यवस्थापक,
येरवडा कारागृह मुद्रणालय,
पुणे-४११ ००६.

किंमत : रुपये २४२.००

## प्रास्ताविक

१८५७ च्या बंडानंतर, हिंदुस्तानच्या इतिहासात इतिहासकारांच्या नि:पक्षपातीपणाची कसोटी पणास लावणारा भाग म्हणजे मुस्लीम राजकारणाची वाढ. जो इतिहासकार अर्धीच बनवलेल्या आपल्या कल्पनांवर आपल्या विषयाची सुरूवात करतो त्याची अनुमती निश्चितच चुकीची असतात. अशाच एका चुकीच्या कल्पनेने इतिहास लिहिणाऱ्यांना अनेकदा चकवले आहे. ही कल्पना म्हणजे मुस्लीम धर्माचे अनुयायी हे हिंदू धर्माच्या अनुयायांपेक्षा निराळे आहेत आणि म्हणून त्याचे राजकारण ब्रिटीश राजवटीत निराळे झाले. हिंदुधर्मापेक्षा मुसलमान धर्म निश्चितच निराळा आहे. राजकीयदृष्ट्या हिंदू व मुसलमानांना एकमेकांपासून अलग केले ते धर्माने नव्हे. परंतु इतिहासाचा बळी ठरलेल्या लोकांनी इस्लाम धर्माचे कारण करून ते सबब म्हणून वापरले. मी पहिल्या काही प्रकरणांत दिलेल्या पुराव्यावरून असे दिसून येईल की, हिंदुस्तानची राजकीय विभागणी धर्माने केली असे ठाम विधान करता येणार नाही. ते एक अनुमान आहे असेच म्हणावे लागेल. प्रत्यक्ष घडलेल्या घटनांच्या आधारावर मी माझे सिध्दांत मांडले आहेत. आणि केवळ गृहित गोष्टी कटाक्षाने टाळल्या आहेत.

उदाहरणार्थ, बंडानंतरच्या काळात हिंदू-मुसलमान सूक्ष्म भेदभाव करणारी पहिली गोष्ट म्हणजे सरकारी नोकऱ्या. अशा प्रकारच्या अप्रत्यक्ष अनुमानांवर कुणी विसंबून रहाण्याची गरज नाही. नोकऱ्या म्हणजे विभक्ततावादी चळवळीची नांदीच म्हणावी लागेल. ही चळवळ एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात हिंदुस्तानच्या ईशान्य भागात सर सैयद अहमद यांच्या छत्राखाली आणि पूर्व भागातील प्रांतात अमीर अली यांच्या सेंट्रल नॅशनल महॉमेडन असोसिएशनच्या आश्रयाखाली वाढली. नंतरच्या काळात दक्षिणेकडील आणि ईशान्येकडील अनेक प्रांतात तिचे कार्य पसरले. दिल्ली ते कलकत्ता अशा फेऱ्यातून जे साहित्य माझ्या हाती लागले त्यावरून असे नि:संदिग्धपणे दिसून येते की, बड्या आणि मध्यमवर्गीय मुसलमानांचा असा समज होता की, इंग्रजी शिक्षणात पुढे असलेले हिंदू लोक मुस्लिम राजवटीत आपली मक्तेदारी असलेल्या सरकारी नोकऱ्यांपासून आपल्याला वंचित करीत आहेत. या समजामुळेच निराळ्या मुसलमान संघटनांची निकड निर्माण केली. हिंदूंना सोयीस्कर असणाऱ्या स्पर्धा परीक्षा घेऊन सरकारी जागा न भरता त्या मुसलमानांना सोयीस्कर असलेल्या नेमणुका पध्दतीने भराव्या असे सरकारी अधिकाऱ्यांना सांगण्याचे एकमेव कार्य सेंट्रल महॉमेडन असोसिएशन आणि तिच्या शाखा अनेक वर्षे करीत होत्या.

नोकऱ्यांवरून हिंदू मुसलमान तेढ निर्माण होणे आणि राष्ट्रीय राजकारणाला आकार येणे या गोष्टींची सुरुवात एकदमच झाली. राजकारणाचे प्रमुख प्रणेते प्रामुख्याने हिंदूच होते. मुसलमानांच्या पुढाऱ्यांनी मुसलमानांना शिक्षणाकडे लक्ष पुरवा असा आदेश दिला असल्याने या नव्या घडामोडींबद्दल ते उदासीनच राहिले. आणि जेव्हा, केंद्रीय व प्रांतीय विधीमंडळात निवडून आलेल्या सदस्यांचा समावेश असावा या काँग्रेसच्या मागणीमुळे ब्रिटीश पार्लमेंटात १८९२ चा इंडियन काऊन्सिल ॲक्ट सम्मत झाला आणि त्यामुळे दोन्ही विधिमंडळातील सभासद संख्येत वाढ केली गेली तेव्हा हिंदू मुसलमानांतील तेढ आणखी वाढण्यास हे एक दुसरे कारण योगायोगाने मिळाले. हा कायदा आणि त्याचे नियम हे हिंदी प्रतिनिधित्याच्या दृष्टीपेक्षा ब्रिटीश सत्तेच्या हिताच्या दृष्टीने बनवले गेले होते. त्यात जमिनदार, अमीर-उमराव व व्यापारी जगातील हितसंबंधीयांना फार मोठे प्रतिनिधित्व आपमतलबीपणाने दिले गेले होते. हे लोक पमुख्याने हिंदू होते. या कायद्यातून निर्माण झालेल्या विधिमंडळात मुसलमानांची संख्या त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात फार कमी असल्याने ब्रिटीश राजवट व मुसलमान पुढारी या दोघांनाही आढळून आले. या कायद्यात आणि त्याच्या नियमात तरतूद नसल्यामुळे जी कधीच प्रत्यक्षात उतरणार नव्हती त्या गोष्टीचा शोध ते घेत होते हे मोठे गमतीचे होते. मुसलमानांनी नोकऱ्यात निराळ्या राखीव जागांची आपली मागणी विधिमंडळात निराळ्या राखीव जागा असाव्या इथपर्यंत वाढवली आणि ते निराळ्या धर्माचे असल्यामुळे त्यांना दुजाभावाची वागणूक दिली जाते अशी समजूत पसरली.

नदी ज्याप्रमाणे आपल्या उगमस्थानी लहान असते आणि मुक्कामाला पोचेपर्यंत तिला मळिणाऱ्या उपनद्यांसह मोठी पसरते, त्याचप्रमाणे, मुस्लिम जातीय राजकारणाची सुरुवात लहान प्रमाणावर झाली आणि तिचे रूपांतर घोंघावणाऱ्या मोठ्या प्रवाहात झाले. मुसलमानांच्या जातीय राजकारणाच्या नदीला मिळणाऱ्या उपनद्या म्हणजे वाढत्या राष्ट्रवादाच्या आणि हिंदूंच्या प्रति जातीयवादाच्या विरूध्द ब्रिटीश राजकर्त्यांनी ढाल म्हणून उपयोगात आणलेले मुस्लिम जातीयवाद होय ! ह्या माझ्या निष्कर्षाचे पुरावे मी जोगोजागी सप्रमाण दिलेले आहेत. लोकशाही देशांच्या राज्यकारणाहून निराळे असे हिंदू समकालीन राजकारणाचे सहज दिसून येणारे वैशिष्ठ्य असे होते की, येथे स्वत:च राजकीय पुढारी बनलेले लोक वर्षानुवर्षे निरनिराळ्या हिंदी जमातींचे प्रतिनिधी म्हणून समजले जात असत. १९३५ च्या हिंदुस्तान सरकारच्या कायद्याने झालेल्या पहिल्या निवडणुकीच्या निकालाच्या स्पष्ट पुराव्यावरून हा निष्कर्ष निघतो. या पुढाऱ्यांना मतदारांनी नाकारण्यापूर्वी त्यांनी काय प्रलय मांडला होता हे १९३५ पूर्वीच्या काळाशी संबंधित असलेल्या प्रकरणात नमूद केलेले आहे.

१९४७ च्या पूर्वीचा हिंदुस्तान म्हणजे राष्ट्रवाद विरूध्द जातीयवाद अशी लढाई होती. आणि त्यात राष्ट्रवादाचा सर्वत्र पराभव होत होता. १९४६ च्या सर्वसाधारण निवडणुकीचे निकाल येईपर्यंत बहुतेक सर्व मुसलमान राष्ट्रवादाच्याही बाजूने उभे राहिले नाहीत की जातीयवादाच्याही बाजूने उभे राहिले नाहीत. स्वत:च पुढारी किंवा संस्था बनलेले लोक, आपल्या जमातीला विधिमंडळात आणि नोकऱ्यात प्रतिनिधित्वाचा अधिक हक्क मिळवून देण्यासाठी आपले स्वत:चे प्रतिनिधीत्व असावे म्हणून कृत्रिम मागण्या करण्याची स्पर्धा लावत होते. राष्ट्रवाद अयशस्वी झाला होता कारण त्याला स्वत:च्या काही मर्यादा ओलांडणे शक्य झाले नाही. इस्लामच्या नावाखाली जे प्रबोधन केले जात होते त्याने राष्ट्रवादाला हिंदुत्ववाद असा अर्थ प्राप्त झाला. काँग्रेस अगदी सच्ची राष्ट्रवादी आणि धर्मनिरपेक्षतावादी असूनसुध्दा १९३६ आणि १९४६ च्या निवडणूक निकालाने तिला एक हिंदू संघटना असे ठरवले. राजकीय प्रश्नाबाबत तडजोडी करताना काँग्रेसनेही तपशीलात चुका केल्या. पण जगातल्या फारच थोड्या संघटनांना काँग्रेससारखे कठीण मार्गावरून जावे लागले असेल. तिने नमते घेऊन जातीयवादाशी तडजोडी केल्या आणि परत निधर्मी बनण्यासाठी उलट फिरण्याचा प्रयत्न केला. अशाच एका प्रयत्नाने त्यांनी मुस्लिम जातीयवादाचे कायमचे शत्रुत्व ओढवून घेतले आणि पर्यायाने हिंदुस्तानच्या फाळणीच्या मागणीला कारण मिळवून दिले.

१९४७ पर्यंतचा हा काळ म्हणजे अगदी नजिकचा काळ असल्याने त्याने मला मी शिरावर घेतलेल्या कार्याच्या नाजूकतेची जाणीव करून दिली. अजूनही जिवंत असलेल्या या नाटकातील पात्रांनी जर मी, दिलेल्या स्पष्टीकरणांची छाननी केली तर ती टिकली पाहिजे, या जाणिवेने मी, माझ्या जवळचे सर्व साहित्य पुढे ठेवताना आणि त्याबद्दल खुलासे करताना शक्य तेवढी सर्व काळजी घेतली आहे. सेंट्रल महॉमेडन असोसिएशन या संस्थेबद्दल माहिती मिळविण्यासाठी दुर्मिळ असलेल्या काही अहवालांचा अभ्यास करण्यासाठी मला कलकत्याच्या नॅशनल लायब्ररीत जावे लागले, आणि अलिगड संप्रदायाच्या भूमिकेबद्दल स्वत:चेच समाधान करून घेण्यासाठी अलिगड मुस्लिम विद्यापीठाच्या लिटन लायब्ररीमध्ये असलेल्या मूळ ग्रंथांचा अभ्यास करावा लागला. लोकमान्य टिळकांचे चरित्र लिहिण्यासाठी मी, नॅशनल अर्काइव्हज्मध्ये जाऊन जे साहित्य गोळा केले होते त्या माहितीचा आणि हिंदुस्तान सरकारचा जो स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासाचा प्रकल्प आहे त्याच्याशी निगडित असल्याने त्याचाही फायदा मला मिळाला आहे.

मुसलमानांचा प्रवेश या पहिल्या प्रकरणासाठी मी, टी. डब्ल्यू. अरनॉल्ड यांच्या प्रिचिंग ऑफ इस्लाम या ग्रंथाचा, आणि हिंदुस्तान सरकारने १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात प्रसिध्द केलेल्या खानेसुमारीच्या अहवालाचा मी केलेल्या अभ्यासाचा आधार घेतलेला आहे. श्री. अरनॉल्ड हे

अलिगडच्या अँग्लो ओरिएन्टल महाविद्यालयात तत्वज्ञानाचे प्राध्यापक होते. आणि त्यांनी १८९६ साली आपले पुस्तक प्रसिध्द केले होते. नोकऱ्या, भाषिक भेद, मुसलमानांची शिक्षणातील प्रगती वगैरे संबंधीच्या प्रकरणांतील लेखनसाहित्य मी, १८८२ चा शिक्षण कमिशनचा वृत्तांत, सरकारचे शिक्षण वृत्तांत, प्रांतिक गॅझेटस्, वर्तमानपत्रांच्या फायली, आणि गेल्या शतकातील शेवटच्या चाळीस वर्षात झालेली शैक्षणिक अधिवेशने यातून घेतलेले आहे. शिवाय ज्या पुस्तकांच्या अस्सलतेबद्दल संशय घेण्याचे काहीच कारण नाही अशा प्रचलीत पुस्तकातूनही ते घेतलेले आहे. गांधींच्या खिलाफत आणि असहकाराच्या चळवळीपासून सुरू होणाऱ्या कालखंडासाठी लेखन साहित्याची वाण नव्हतीच. पण या प्रमाणाबाहेर मिळालेल्या साहित्यात बरेचसे साहित्य प्रचारकी असल्याने माझी खरी पंचाईत झाली होती. माझ्या शक्तीची पराकाष्ठा करून मी त्यातून सत्य तपासले आहे. जो राजकीय पक्षांचा वृत्तांत हेतूपुरस्सर आला आहे असे वाटले तो वृत्तांत त्या वेळच्या वर्तमानपत्रातील वृत्तांताशी मी पडताळून पाहिले आहे. विसाव्या शतकापासून घडलेल्या राजकीय घटनांचा सुसूत्र अभ्यास करण्यासाठी इंडियन क्वॉर्टर्ली रजिस्टर आणि इंडियन अॅन्युअल रजिस्टर यांचा आधार घेतला आहे आणि यातील सत्य जेव्हा जेव्हा ताडून पाहण्याची किंवा अधिक खोलात जाण्याची गरज भासली तेव्हा तेव्हा परत वर्तमानपत्रांचा संदर्भ पाहिला आहे.

या पुस्तकात हिंदुस्तानच्या फाळणीपर्यंत मुसलमानी राजकारणाचा विचार आहे. आणि मला वाटते, अशा तऱ्हेचा संपूर्ण अभ्यास सादर करणारे हे पहिलेच पुस्तक आहे.

अलिगड येथील काही मूळचे साहित्य मला सुलभतेने मिळवून दिल्याबद्दल आमदार नेक राम शर्मा यांचा मी ऋणी आहे.

शांतीसदन
मोतीनगर
लखनौ

राम गोपाल

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| प्रकरण १ | : मुसलमानांचा प्रवेश | .. १ |
| प्रकरण २ | : मुसलमान अमीर उमरावांपुढील पेच | .. १३ |
| प्रकरण ३ | : वहाबी चळवळ, नोकऱ्या आणि राजकारण | .. २१ |
| प्रकरण ४ | : भाषिक भेद | .. २९ |
| प्रकरण ५ | : सर सय्यद अहमद आणि न्यायमूर्ती अमीर अली | .. ४२ |
| प्रकरण ६ | : नोकऱ्याबाबत निराशा आणि बदललेले दृष्टीकोन | .. ५१ |
| प्रकरण ७ | : मुसलमान आणि राष्ट्रवाद-दोन संप्रदाय-१ | .. ५८ |
| प्रकरण ८ | : मुसलमान आणि राष्ट्रवाद-दोन संप्रदाय-२ | .. ७२ |
| प्रकरण ९ | : रूंदावत जाणारी दरी | .. ७८ |
| प्रकरण १० | : मुस्लिम बंगाल | .. ८५ |
| प्रकरण ११ | : मुस्लिम लीग | .. ९१ |
| प्रकरण १२ | : विभक्त मतदार संघ-पार्श्वभूमी | .. ९९ |
| प्रकरण १३ | : धर्माचा प्रभाव | .. १०९ |
| प्रकरण १४ | : हिंदुस्थानवर तुर्की छाया | .. ११५ |
| प्रकरण १५ | : हिंदू मुस्लिम ऐक्य | .. १२३ |
| प्रकरण १६ | : खिलाफत चळवळ | .. १३० |
| प्रकरण १७ | : पुनश्च मतभेद | .. १४५ |
| प्रकरण १८ | : लखनौ कराराला नकार | .. १६३ |
| प्रकरण १९ | : मुसलमानी प्रांतात भर | .. १६९ |
| प्रकरण २० | : जीनांना वाऱ्यावर सोडले | .. १७७ |
| प्रकरण २१ | : हिंदू मुसलमानांच्या ओढाताणीत सापडलेले अस्पृश्य | .. १८३ |
| प्रकरण २२ | : नेहरू रिपोर्ट आणि त्यातून काय निसटले | .. १८८ |
| प्रकरण २३ | : नेहरू रिपोर्टवरील मुस्लिम प्रतिक्रिया-१ | .. १९४ |
| प्रकरण २४ | : नेहरू रिपोर्टवरील मुस्लिम प्रतिक्रिया-२ | .. २०० |

# अनुक्रमणिका-चालू


| | | | |
|---|---|---|---|
| | | | पृष्ठ क्र. |
| प्रकरण २५ : | मुसलमान आणि कायदेभंगाची चळवळ | .. | २१० |
| प्रकरण २६ : | गोलमेज परिषदेतील मुसलमानांचा प्रतिसाद | .. | २१६ |
| प्रकरण २७ : | ब्रिटीश पंतप्रधानांचा जातीय निवाडा | .. | २२४ |
| प्रकरण २८ : | मुसलमानांचे प्रतिनिधी कोण ? काँग्रेस ? | .. | २३० |
| प्रकरण २९ : | काँग्रेस राज्य हे हिंदू राज्य होते काय ? | .. | २४२ |
| प्रकरण ३० : | फाळणी-हिंदू वर्चस्वापासून सुटका | .. | २५४ |
| प्रकरण ३१ : | पराभूत लीगचा विधी मंडळातील विजय | .. | २५९ |
| प्रकरण ३२ : | काँग्रेसची स्वातंत्र्य चळवळ-मुस्लिम विरोध ! | .. | २७७ |
| प्रकरण ३३ : | लीग भूमिकेचा विजय | .. | २८४ |
| प्रकरण ३४ : | कॅबिनेट मिशन : लीगचा स्वीकार व धिकार | .. | २९० |
| प्रकरण ३५ : | अखेर | .. | ३०१ |
| | परिशिष्टे | .. | ३११ |

## प्रकरण पहिले

# मुसलमानांचा प्रवेश

हिंदुस्तानातील बहुसंख्य मुसलमान हे बाटलेले किंवा बाटलेल्या मुसलमानांचे वंशज आहेत. यांची धर्मांतरे मुसलमान सत्ताधाऱ्यांनी सक्तीने किंवा धर्मप्रचारकांनी धार्मिक शिकवणुकीने किंवा मतपरिवर्तनाने घडवून आणली. १९ व्या शतकात जमा झालेला जो काही पुरावा आढळतो त्यावरून यात सक्तीपेक्षा मतपरिवर्तनाचाच भाग अधिक दिसतो. मुसलमानी राज्यात अनेक उच्च जातीच्या हिंदूंना, उच्च अधिकाराच्या जागांचे किंवा सरंजामी फायद्याचे आमिष इस्लाम धर्मात आणण्यास कारणीभूत झाले असले तरी, धर्मप्रचारकांनी केलेल्या मतपरिवर्तनामुळे बाटलेल्यातील बहुसंख्य बाटगे हे हिंदूंच्या खालच्या जातीतून आले होते. त्यांना फार पुरातन काळापासून हिंदू धर्माने नाकारलेली सामाजिक समता या इस्लामी धर्माने मिळवून दिली होती हेच याचे कारण होते.

भारतात मुसलमान धर्माचा प्रवेश सक्तीने होण्याआधी, कितीतरी पूर्वी मतपरिवर्तनाने झाला. भारताशी या धर्माचा पहिला संबंध ८ व्या शतकात जेव्हा अरब लोक व्यापारी म्हणून दक्षिण भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर उतरले तेव्हा आला. ते धर्मप्रसारक म्हणून आले नव्हते हे खरे, परंतु व्यापारी पेशातील हा मुसलमान आपल्या इस्लामी धर्माच्या उत्साहावर मात करू शकला नाही. प्रत्येक मुसलमान स्वतःला धर्मप्रचारक समजू लागला. व्यापार व धर्म या दोन्ही गोष्टींसाठी पश्चिम किनारा अनुकुल व आकर्षक आहे असे त्यांना आढळून आले. इतर वस्तूंच्या व्यापाराबरोबरच त्यांनी मसाल्याचे पदार्थ, हस्तीदंत आणि हिरे यांचा व्यापार सुरू केला आणि हळूहळू हिंदुस्तानच्या परदेशी व्यापाराची मक्तेदारीच मिळविली. दक्षिण भारताच्या राजांनी प्रत्येक निर्यात मालाच्या विक्रीवर कर बसवला असल्यामुळे त्यांचा निर्यात व्यापार करणाऱ्या वर्गाकडे जास्त ओढा होता. सहाजिकच हिंदी व्यापाऱ्यांपेक्षा अरब व्यापाऱ्यांबद्दल त्यांना जास्त आपुलकी वाटत होती. आणि त्यांच्यावर त्यांचे वजनही अधिक होते. सर्व हिंदू राजे मुसलमानांच्या चालिरीती आणि त्यांचे पूर्वग्रह यांची कदर करीत होते, आणि काही विशेष प्रक्षोभ निर्माण करणारे अपवाद सोडल्यास त्यांच्याविरुद्ध आक्रमक पाऊल उचलण्याचे टाळत होते. एत्तद्देशीय राजांच्या या धोरणामुळे अरब व्यापारी श्रीमंत बनले व ऐषआरामात राहू लागले.

हिंदू मुसलमान शेजारी शेजारी गुण्यागोविंदाने राहू लागले; एकमेकांच्या रुढी व

चालिरितींचा आदर करू लागले, आणि परस्परांच्या वेगवेगळ्या धर्मामुळे आणि रीतीरिवाजांमुळे कुठलेही मतभेद वाढणार नाहीत याबद्दल दक्ष राहिले. दोनही धर्मांचे आचार जवळून पाहण्याची संधी एकमेकांना लाभली. पूर्वीच्या दोनशे वर्षात मुसलमानांनी सारासार विचार न करता दक्षिण भारताच्या रीतिरिवाजांकडे मोठ्या विस्मयाने पाहिले होते. परंतु जेव्हा महंमदाच्या अनुयायांनी मक्केच्या मूर्ति फोडल्या आणि तरीही त्यांच्यावर देवाचा कोप झाला नाही, तेव्हा लोकांची विवेक शक्ती जागृत झाली आणि गूढ अतिमानवी शक्तीबद्दलची त्यांची भीति नाहीशी झाली. ज्या ज्या देशात इस्लाम धर्म सक्तीने किंवा मतपरिवर्तनाने वाढला त्या सर्व देशात अशीच प्रतिक्रिया झाली. इस्लाम धर्माची स्थापना झालेल्या देशात जे घडले त्याचीच पुनरावृत्ती येथेही झाली. अनेक मूर्तिपूजक इस्लामच्या झेंड्याभोवती गोळा झाले. स्वतःबद्दलची आणि स्वतःच्या धर्माबद्दलची निष्ठा घेऊन आलेला मुसलमान स्थानिक लोकात वावरू लागला आणि त्याने जाती धर्माच्या असहिष्णुतेचा अत्यंत दुःसह जुलूम पाहिला. त्रावणकोरमध्ये काही हलक्या समजल्या जाणाऱ्या जातींच्या लोकांना ब्राम्हणांच्या चौऱ्याहत्तर पावलांपेक्षा जवळ जाण्यास सक्त मनाई होती, शिवाय आपल्या जाण्यायेण्याची सूचना म्हणून रस्त्यावरून जाताना त्यांना डुकरासारखा आवाज करीत जावे लागे. अशाप्रकारे खालच्या वर्गात गणल्या गेलेल्या हिंदूंना अनेक सामाजिक बाबतीत अपात्र म्हणून जगावे लागत होते. अशा या जातींमध्ये इस्लाम धर्माचा प्रसार करण्यास फार जोराचा मतप्रचार करावा लागला नाही. कलींगडात सुरी घुसावी इतक्या सहजासहजी तो त्यांच्यात घुसून बसला. दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या जुलमापासून मुक्तता करून घेण्यासाठी पुष्कळजण पुढे सरसावले. आणि त्यांनी स्वतःचा व आपल्या वंशजांचा सामाजिक दर्जा वाढविला. इस्लाम धर्माची समानता व जोडीला मुसलमान व्यापाऱ्यांचे जबरदस्त वजन यामुळे धर्मांतर ही एक नित्याचीच बाब होऊन बसली. अशा शांततापूर्ण होणाऱ्या धर्मांतराचा प्रभाव शेकडो वर्षे मलबार किनाऱ्यावर होता. सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला मोपळांची (जे आपण इराकी आणि अरब व्यापाऱ्यांचे वंशज आहोत म्हणून सांगतात) लोकसंख्या एकंदर मलबारच्या लोकसंख्येच्या एक पंचमांश असल्याचा अंदाज होता. ते व हिंदू यांची भाषा एकच होती आणि तरीही हिंदू धर्मातच गुरफटून राहिलेले त्यांचे बांधव त्यांचा तिरस्कार करीत नव्हते किंवा त्यांना छळतही नव्हते.

या धर्मांतरास, हिंदू राज्यकर्त्यांची सहिष्णुता, त्यांचे निर्यातीचा व्यापार करणाऱ्या मुसलमानांवर असलेले अवलंबित्व आणि मुसलमानांचा एकंदर प्रभाव आणि ऐश्वर्य या गोष्टींचा किती वाटा होता हे सांगणे कठीण आहे. इस्लामच्या प्रसारावरचे अधिकारी भाष्यकार टी. डब्ल्यू. अरनॉल्ड यांना असे वाटते की, वरील गोष्टीमुळे यापैकी काही धर्मांतरांची मीमांसा लागू शकते. ओडोर्डो बार्बोसा (Odoardo Barbosa) या दुसऱ्या अधिकारी व्यक्तीचा हवाला देऊन ते म्हणतात 'वारंवार होणाऱ्या धर्मांतरांची

आणि गुजराथ व दख्खनमधून आणि अरबस्तान व इराणमधून आलेल्या मुसलमान व्यापाऱ्यांची या लोकांवर इतकी जबरदस्त छाप बसली होती की, जर पोर्तुगीजांचे आगमन झाले नसते तर हा सर्व किनारा मुसलमान बनला असता.[१]

बाहेरून आलेले मुसलमान आणि त्यांचे वंशज यांचा नुसता व्यापारच होता असे नव्हे तर त्यांच्याजवळ आरमारी शक्तीहि होती. त्यांनी स्वतःसाठी असे प्रबळ स्थान पटकाविले होते की, ते स्थान त्यांच्याहून वरचढ अशी आरमारी शक्तीच हिरावून घेऊ शकली असती. आणि १५ व्या शतकाच्या शेवटी शेवटी पोर्तुगीज ही एक वरचढ आरमारी शक्ती, खरोखरच पश्चिम किनाऱ्यावर उतरली, तिने अरब जहाजांचा नाश केला आणि मोठ्या नाट्यपूर्ण अवचितपणाने त्यांची निर्यात व्यापाराच्या अबाधित मक्तेदारीची सहाशे वर्षे पुसून टाकली. मुसलमानाप्रमाणे पोर्तुगीजहि आपल्या व्यापारासाठीच येथे आले होते. पण जे मुसलमानांच्याबाबतीत घडले तेच यांच्याहि बाबतीत घडले. पोर्तुगीजांचा धर्महि त्यांच्याबरोबर आला आणि त्यांनी ख्रिश्चन धर्मांतरे करण्याचा आपला हक्काचा वाटा उचलला. लोकांच्या आर्थिक जीवनावरचा मुसलमानांचा पगडा कमी झाल्याबरोबर, इस्लाम धर्मप्रचारकांची मतपरिवर्तनाची पद्धती व हिंदूंची सदोष समाजपद्धती ही दोनच फक्त धर्मांतराची निकडीची कारणे उरली. धर्मांतराचे हे स्वरुप दक्षिणेत युरोपियन सत्तेच्या झगड्याच्या काळात आणि ब्रिटीश राजवटीच्या अखेरपर्यंत कायम राहिले. बहामनी (१३४७ ते १४९०) आणि विजापूर (१४८९ ते १६८६) घराण्यांच्या मुसलमान राजांच्या कारकिर्दीत धर्मप्रचारकांना नवी चालना मिळाली नसती तर इस्लाम धर्माच्या प्रसाराला आळा बसला असता असे समजणे सर्वस्वी बरोबर ठरणार नाही. ब्रिटिश सत्ता पूर्णपणे स्थापन झाल्यानंतर या धर्मांतराला जास्त जोर चढला. दशवार्षिक धर्मप्रसारक कॉन्फरन्सच्या (कलकत्ता १८८३) अहवालाप्रमाणे भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर, हिंदूंच्या खालच्या वर्गातून आलेल्या मुसलमानांची संख्या इतक्या प्रमाणात वाढत होती की, थोड्याच वर्षात या सर्व जाती मुसलमान होतील की काय अशी भीति वाटू लागली होती.[२] दक्षिणेत मुसलमान राज्यकर्ते नव्हते आणि लोकांच्या आर्थिक जीवनावर मुसलमानी पगडाहि नव्हता. १५ व्या शतकाच्या शेवटी, युरोपियन लोकांच्या भारतातील प्रथम प्रवेशापासून चार शतके, मुसलमान धर्मप्रचारकांनी ख्रिश्चन धर्मप्रचारकांशी नुसती स्पर्धा केली एवढेच नव्हे तर धर्मांतरे करण्यात त्यांना फारच मागे टाकले. त्यांच्याजवळ ख्रिश्चन धर्मप्रचारकांची साधनेहि नव्हती आणि संघटनाहि नव्हती. पण या दोनहि गोष्टी अनिश्चित स्वरुपाच्या असून पैशाच्या पाठबळाशिवाय केलेले व्यक्तिगत मतपरिवर्तन जास्त प्रभावी ठरते असे त्यांनी सिद्ध केले. ख्रिश्चन धर्मप्रचारकांनी आपले काम मोठा गाजावाजा करून केले तर मुसलमानांनी ते अबोलपणे केले. ख्रिश्चन प्रचारकाने

१. टी. डब्ल्यू. अर्नॉल्ड कृत दि प्रीचींग ऑफ इस्लाम (१८९६) पृष्ठ २१९.

२. कित्ता, पृष्ठ २२०.

ते आपले जीवन ध्येय बनवले होते तर मुसलमान सर्वसामान्य माणूस म्हणूनच जगत होता. आपल्या धर्माची शिकवण देण्यासाठी मुसलमानाने जाहीर व्यासपीठ क्वचितच वापरले होते.

मध्य पूर्वेकडील देशाप्रमाणे सिंधमध्येसुद्धा मुसलमानांचा प्रवेश विजेत्याच्या तलवारीच्या जोरावर झाला. इस्लामी धर्मप्रचारकांनी पश्चिम किनाऱ्यावर जे मतपरिवर्तनाने मिळविले ते महंमद बीन कासिमने सैन्याच्या बळावर मिळविण्याचा प्रयत्न केला. त्याच्या नंतरच्या अनेक आक्रमकांनी सैन्याच्या बळावर व धाकावर ज्याप्रमाणे प्रदेश काबीज केले त्याप्रमाणे धर्मांतरेहि घडविली. पण जे राज्यकर्ते राजे बनले त्यांनी सरळसरळ सैन्यापेक्षा मन वळविण्याचा मार्ग जास्त पसंत केला. हा मार्ग कधी कधी जुलमी अत्याचारांनी भरलेला होता. फिरोझखान तघलखने आपल्या आत्मचरित्रात लिहून ठेवले आहे की, "मी माझ्या नास्तिक प्रजेला पैगंबराचा धर्म स्वीकारण्यास उत्तेजन दिले. आणि जो कोणी मुसलमान धर्म स्वीकारील त्याला जिझिया कर माफ होईल असे जाहीर केले. या जाहीरनाम्याची खबर मिळाल्याबरोबर हजारो हिंदू पुढे आले आणि त्यांना इस्लाम धर्माचा मान दिला गेला. अशारितीने मुसलमान धर्म स्वीकारण्यास देशाच्या निरनिराळ्या भागातून असंख्य लोक येऊ लागले. त्यांचा जिझिया कर मी माफ केला आणि त्यांचा मोठा मानसन्मान केला व त्यांना नजराणे दिले."[३] खिलजी, तघलख व लोदी घराणी जरी प्रामुख्याने लढाया करण्यात व विजय मिळविण्यात गुंतली होती तरी त्यांचा धर्माभिमान काही कमी नव्हता. निरनिराळ्या प्रकारची आमिषे दाखवून पद्धतशीर बाटवण्याला त्यांनी उत्तेजन दिले. पूर्वीच्या राजांप्रमाणे लुटालूट आणि अत्याचार करून न परतता ही घराणी मोंगलाप्रमाणे हिंदुस्तानातच राज्ये आणि साम्राज्ये स्थापून राहिली. सक्तीचा वापर हा राजनीतिला अनुसरून बाद ठरविला. अप्रियतेच्या भीतिने आणि लोकांची मर्जी संपादन करण्याच्या उत्कंठेने त्यांनी अंतर्गत व्यवहारात ढवळाढवळ न करण्याचा मार्ग पसंत केला. अशाप्रकारचा संयम करणे ज्यांना शक्य झाले नाही, त्यांनी ही मर्यादा ओलांडली आणि आपल्या अधिकाराचे प्रदर्शन केले. भारतात इस्लाम धर्माचा प्रसार करण्याचे साधन म्हणून सक्तीपेक्षा मतपरिवर्तनाचा वापर झाला असा सर्वसाधारण निष्कर्ष काढणारे अरनॉल्डहि म्हणतात, 'आता हे निःसंशयपणे सिद्ध झाले आहे की, मुसलमान राज्यकर्त्यांनी सक्तीची धर्मांतरे केली. औरंगझेबाचा धर्मवेडेपणा इतका जबरदस्त होता की, (ज्यांच्या धर्मांतरांचा इतिहास विसरला गेला आहे अशा) अनेक उत्तर भारतीय कुटुंबांना आपल्या धर्मांतरांचे हे अगदी सोपे कारण म्हणून पुढे करता आले आहे. त्याचप्रमाणे दख्खनमध्ये ज्यांचे धर्मांतर खरोखर कितीतरी आधीच झाले होते त्यांचे धर्मांतर हैदरअल्ली व टिपू सुलतान यांच्याप्रमाणे औरंगझेबामुळेहि झाले

३. सर एच. एम. इलियट कृत दि हिस्टरी ऑफ इंडिया ॲज टोल्ड बाय इटस ओन हिस्टोरियनस, भाग ३, पृष्ठ ३८६.

अशी कीर्ति त्याच्या पदरात पडली आहे.' [४]

परंतु, औरंगजेब हा मुत्सद्दी राजकारणी असल्यामुळे आपण इतर धर्माच्याबाबतीत फार सहिष्णू आहोत असा समज त्यांनी लोकांमध्ये पसरविला. एकदा काही मुसलमानांनी, 'अहो धर्मनिष्ठ, माझ्या शत्रूंना आणि तुमच्या शत्रूंना मित्र मानू नका (lxi) या कुराणातील शिकवणुकीचा आधार घेऊन, दोन पार्शी अधिकाऱ्यांच्या जागेवर मुसलमान नेमावे असे सुचविले. तेव्हा बादशहाने उत्तर दिले. 'लौकिक व्यवहारात धर्माचा काही संबंध नसतो. म्हणून अशाप्रकारच्या गोष्टीत धर्मवेडेपणाला स्थान असता कामा नये.' त्यानेही कुराणाचा दाखला घेऊन सांगितले की, 'तुम्हाला तुमचा धर्म आणि मला माझा धर्म' (cix 6) तो पुढे म्हणाला की, कुराणातील वर सांगितलेली पहिली शिकवण जर आचरणात आणावयाची असेल तर 'आपण सर्व हिंदू राजांचा आणि त्यांच्या प्रजेचा नाश करावयास पाहिजे होता.' हे सर्व खरे असले तरी औरंगझेब स्वतः नेहमीच अशा सहिष्णू तत्त्वाने वागत होता असे नव्हते.' आपल्या इस्लाम धर्मविषयक उत्साहाला काबूत ठेवू न शकणाऱ्या राज्यकर्त्यांपैकी तो एक होता. त्याने, अकबराने रद्द केलेला पक्षपाती जिझिया कर पुन्हा बसविला आणि जुलूमामुळे सत्तेविरुद्ध बंड करण्याची प्रवृत्ति चालवण्यास कारणीभूत ठरला. 'शहरातल्या आणि देशातल्या काफीर मूळ रहिवाश्यांनी जिझिया कर देण्यास मोठा विरोध केला. असा एकहि जिल्हा नव्हता की, तेथील लोकांनी फौजदार व मुकादम यांच्या मदतीने दंगधोपे किंवा प्रतिकार केला नाही.' असे खफीखानाने नमूद करून ठेवले आहे. काही अधिकाऱ्यांनी या बंडखोर चळवळीकडे जाणून बुजून दुर्लक्ष केले आणि गुन्ह्याला मदत केली. अकबराच्या इतर धर्मांकडे सहानुभूतिने पाहण्याच्या वृत्तीमुळे मोंगल साम्राज्याची पाळेमुळे घट्ट झाली तर ती औरंगझेबाच्या इस्लाम पक्षपातीपणामुळे हादरली.

जुलूम जबरदस्तीने झालेला परिणाम व मतपरिवर्तनाने झालेला परिणाम यात मतपरिवर्तनाचा प्रभाव अधिक दिसून येतो. काही मुसलमान राज्यकर्त्यांनी हिंदू प्रजेवर इस्लाम धर्माची सक्ती करून आपल्या अधिकाराची पूर्ति केली असली तरी महत्वाचा सूचक मुद्दा असा दिसतो की, जेव्हा आणि जेथे मुसलमानी राजसत्ता प्रबळ होती तेव्हा आणि तेथे इस्लाम धर्माचा जो विजय झाला त्यापेक्षा जेव्हा आणि जेथे मुसलमानी सत्ता कमकुवत होती तेव्हा आणि तेथे इस्लाम धर्माला मिळालेले विजय नेत्रदीपक होते. उत्तर व मध्य हिंदुस्तानचे राजकारण मुसलमान सत्तेने गाजविले होते. पण या प्रदेशातील धर्मांतराशी बंगालमधील धर्मांतराची तुलना केली तर बंगालमधील धर्मांतरे त्याच्या चौपट होती. धर्मप्रचारकांना बंगालची भूमि व वातावरण जास्त अनुकूल आढळले. मुसलमानी सत्तेच्या महत्वाच्या केंद्रातसुद्धा त्यांची

४. मागे उद्धृत केलेल्या अरनॉल्डच्या पुस्तकातील पृष्ठ २१४

५. कित्ता, पृष्ठ २१५.

संख्या १० टक्के लोकांपेक्षा कधीच जास्त वाढली नाही. पण बंगालमध्ये मात्र मुसलमानांनी हिंदुंना संख्याबळात कितीतरी मागे टाकले.

दक्षिणेप्रमाणेच बंगालमध्येसुद्धा इस्लाम धर्माने लोकांना सामाजिक जुलूमापासून मुक्त करण्याचा आव आणला. तेथे वरच्या जातींच्या लोकांचे खालच्या जातींच्या लोकांशी होत असलेल्या जुलमी वर्तनामुळे धर्मप्रचारकांना यशाची संधी मिळाली. हिंदू समाजातील सामाजिक विषमता फार पुरातन काळापासून पिढयान्‌पिढया चालत आलेली होती. सुरुवातीला आर्य लोकामध्ये ही जातीभेदाची पद्धति रूढ नव्हती. ऋग्वेदाला याचा काही संपर्क नव्हता; असलाच तर फार थोडा होता. निदान त्यात उघड स्पष्टपणे जातीभेदाचा पुरस्कार केला नव्हता. मनू प्रणित चातुर्वण्य व्यवस्थेतून जातीपद्धतीचा उदय झाला. आणि कालांतराने ती मोठे सामाजिक भेद निर्माण करीत, आणि माणसा माणसात निष्ठूर फरक करीत वाढू लागली. हे भेद ब्राम्हण धर्माच्या गुंतागुंतीच्या पद्धतीचा भाग बनले. बऱ्याच काळापर्यंत जाती व्यवस्था ही आर्य व आर्येतर यांच्या दरम्यान असलेल्या 'मधल्या प्रदेशा' पुरतीच मर्यादित राहिली; नंतर ती उत्तर प्रदेश आणि पंजाबमध्ये पसरली. फक्त बंगालच्या खालच्या भागात वस्ती करून राहिलेले आर्य लोक मात्र तिच्यापासून अलिप्त राहिले. ते त्या भागातील अमीर उमराव होते. आणि त्यांनी स्वतःच अनार्यांवर सामाजिक प्रभुत्व प्रस्थापित केले होते. जेव्हा जाती व्यवस्था बंगालपर्यंत पोहचली तेव्हा आर्य आक्रमकांनी स्वतःच ब्राम्हणत्व धारण करून आदिवासी लोकांना दास्यत्व पत्करावयास लावले. हे जित आणि जेते यात निर्माण झालेले जमीन अस्मानाचे अंतर कधीच तुटले नाही. आर्य लोकांनी आदिवासींचा तिरस्कार केला आणि आदिवासींनी नोकरांचाकरांसारखी त्यांची सर्व प्रकारची सेवा केली. आर्यांनी आपली स्वतःची धर्मपद्धति त्यांना लागू करण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. या लोकांना ब्राम्हणत्वाचा मार्ग मोकळा करण्याची साधी कल्पनाहि त्यांना तिरस्कारार्ह वाटत होती. आर्य आर्येतरांच्या या दीर्घ संबंधाच्या काळात काही आर्य लोकांनी आर्येतरांच्या काही वेडगळ धार्मिक श्रद्धा उचलल्या तर आर्येतरांनी आपल्या रानटीपणात थोडी सुधारणा केली. तरीपण त्यांच्यातील सामाजिक भेदाभेद पूर्वी इतकेच तीव्र राहिले. पुढे आर्य आणि आर्येतर यांच्यामधील वांशिक भेद कालांतराने जरी पुसले गेले आणि ढोबळपणे सर्वजण हिंदू म्हणून ओळखले जाऊ लागले तरी आर्य लोकांनी या आदिवासींना दैनंदिन व्यवहारात हिंदू धर्माच्या गाभ्यापासून कटाक्षाने दूर ठेवले. हे आदिवासी स्वतःला हिंदू म्हणवत असले तरी आपल्या वर्तनाने आर्य लोक त्यांचा हा हक्क हिरावून घेत होते. इस्लाम धर्माच्या स्फूर्तिदायक आगमनाच्यावेळी, सर्वसाधारणपणे, आर्य लोकांची गणना 'उच्च जातीत' आणि आदिवासींची गणना 'शुद्र जातीत' केली जात होती.

यात जातीवादी हिंदूंना दोष देण्यात काही फारसा अर्थ नाही. त्यांचे धर्मग्रंथ हे त्यांच्या सामाजिक आचार विचारांचे गुरु होते. त्यांना असे सांगण्यात आले होते

की, 'होम हवन करीत असताना शुद्राचा शब्द ऐकण्याची मनाई आहे. आणि ते चालू असताना शुद्राने हजर असता कामा नये' (शतपथ ब्राम्हण ।।। १.१.१०, मैत्रेय संहिता ७, १.१.१६ आणि पंचविंश ब्राम्हण ६.१.११) त्याचप्रमाणे असेहि सांगितले आहे की, 'नीच शूद्र जमात म्हणजे जणू काय प्रेते पुरण्याची जागा असे निःसंशय समजावे' (वशिष्ठ धर्मसूत्र, प्रकरण १८ श्लोक ११.१५) याशिवाय असेहि नमूद केले आहे की, जर शुद्राने बसण्याउठण्यात, आडवे होण्यात किंवा रस्त्यावर वावरण्यात द्विजाची बरोबरी केली तर त्याला देहदंडाची शिक्षा भोगावी लागेल.' खालच्या जातीविरूद्ध अशाप्रकारच्या दंडकांनी सर्व धर्मग्रंथ भरलेले आहेत.

उच्च जातींमध्येसुद्धा विधवांना अत्यंत तिरस्करणीय आयुष्य कंठावे लागे. पतीबरोबर सती जाणे हे त्यांचे अंतीम धार्मिक कर्तव्य समजले जाई. त्या म्हणजे ईश्वराचा शाप अशी समजूत असल्यामुळे त्यांना धार्मिक व सामाजिक समारंभात मज्जाव होता; लग्न समारंभात त्यांची उपस्थिती अशुभ समजली जात होती, तर उलट दुर्व्यसनांच्या गर्तेत लोळणाऱ्या पुरोहित वर्गाने मात्र आपल्या स्वतःच्या वर्गाला अनेक बायका करण्याची मुभा दिली होती. वरच्या जातीच्या मुलींना रूढीप्रमाणे फक्त त्यांच्याहून वरच्या जातीतच लग्ने करता येत असत. आपल्याला हव्या तेवढ्या बायका करता याव्यात यासाठीच या वरच्या वर्गांनी ही प्रथा काढली असावी असे वाटते. कधी कधी तरुण कोवळ्या मुलींची लग्ने जख्खड म्हाताऱ्यांबरोबरहि केली जात असत.

जेव्हा जेव्हा मुसलमान धर्मप्रचारकांना या तरुण विधवा भेटत तेव्हा तेव्हा त्यांना सांगत की, ऐहिक सुखाला पारखे होण्यासारखे कुठचेहि पाप त्यांनी केलेले नाही. आणि वर असे आश्वासन देत की, संकटात सापडलेल्यांना इस्लाम धर्म उदार आश्रय देतो. विधवा स्त्रियांना पुन्हा एकदा वधू बनण्याची आणि 'महारा'ला हिंदू असताना मना केल्या गेलेल्या सार्वजनिक विहिरीतून पाणी काढण्याची संधी इस्लाम धर्म त्यांना मिळवून देत असे. बंगाल व दक्षिणेत अस्पृश्यत्व हे नुसतेच तऱ्हेवाईक नव्हते तर ते इतर भागांपेक्षा जास्त कडक, जास्त निष्ठूर व जास्त तापदायक होते. यामुळे बंगालमध्ये मुस्लिम धर्माचा प्रचार जास्त यशस्वी का झाला याचा उलगडा होतो.

१२ व्या शतकाच्या शेवटी महमद बख्तीयार खिलजीने बिहार व बंगाल जिंकून एक मुसलमानी राज्य स्थापिले. आणि साडपाच शतके हे राज्य चालू राहिल्यामुळे सहाजिकच इस्लामच्या प्रचाराला त्याची मदत झाली. हा एवढा मोठा काळ फक्त दहा वर्षांच्या हिंदू राजवटीने विभागला गेला होता. मुसलमान राजवटीत जितके लोक इस्लामी धर्माला मिळाले त्यापेक्षा कितीतरी अधिक लोक या मधल्या लहानशा हिंदू कारकिर्दीत मिळाले. या काळात 'ज्याची कारकिर्द त्याच्या मुसलमान प्रजाजनांना प्रिय होती म्हणतात' त्या पहिल्या हिंदू राजाचे नाव राजा कंस असे होते. परंतु त्याच्यामागून येणाऱ्या जटमल राजाने आपल्या वाडवडिलांचा धर्म सोडला व जलालुद्दिन

महंमदशहा हे नाव धारण करून इस्लाम धर्माचा स्वीकार केला. 'त्याच्या राज्यात जी अनंत धर्मांतरे झाली त्यापैकी बरीचशी सक्तीने केली गेली '.[६]

परंतु मुसलमानी राजाश्रयापेक्षा हिंदू समाजाच्या दुष्कृत्यांनीच इस्लामी धर्मप्रचारकांना पुष्टी मिळाली. मुसलमान सत्तेची केंद्रे देशाच्या ज्या भागात होती त्या भागातील बाटलेल्या लोकांपेक्षा देशाच्या ज्या भागात खालच्या जातीचे व अस्पृश्य हिंदू अधिक होते त्या भागातून ही धर्मांतरे फार मोठ्या प्रमाणावर झालेली दिसतात. हिंदू धर्म हा प्रचारकी धर्म नाही. आणि कुठल्याहि हिंदू संघटनेने धर्मप्रचारकांच्या जोराच्या हल्ल्याला किंवा बंगालमध्ये वास्तव्य करून राहिलेल्या साहसी अफगाणी लोकांना आव्हान दिलेले नाही. कुठल्याहि हिंदूने आपल्या लोकांनी दुसऱ्या धर्मात जाऊ नये म्हणून हिंदू समाजाची सुधारणा करण्याची पर्वा केली नाही. मुसलमानी धर्माची (वाढ खुंटवेल अशी एकादी बांधून ठेवणारी धर्मपद्धति आदिवासी आणि शुद्रातीशुद्र जातीत होती किंवा काय याची शंकाच आहे. वस्तुत: असे दिसते की, तसे काहीही नव्हते. मुसलमान आक्रमकांनी जेथे साम्राज्ये स्थापिली त्या भारताच्या वायव्य भागातील परिस्थिती वेगळी होती. बुद्ध धर्माबरोबर फार मोटा झगडा देऊन ब्राम्हण धर्म विजेता म्हणून उदयाला आला होता. आणि इस्लाम धर्माला सुरुवातीलाच विरोध करण्याच्या परिस्थितीत होता. बंगालमध्ये तशी परिस्थिती नसल्यामुळे मुस्लिम धर्मप्रचारकांचे तेथे 'अगदी खुल्या दिलाने स्वागत झाले'

बंगालमध्ये, ब्रिटीश आमदानीत जी जोराची धर्मांतरे झाली त्यावरून हे निःसंशय सिद्ध झाले की, राजसत्तेचा आधार असो अगर नसो बंगालमध्ये इस्लाम धर्म वाढणे अपरिहार्य होते. १८९१ चा खानेसुमारीचा वृत्तांत हे स्पष्ट करतो '१८७२ पासून असे समाधानकारक रीतिने सिद्ध झाले आहे की, प्रत्येकी १०,००० लोकांतून इस्लामने उत्तर बंगालमध्ये १००, पूर्व बंगालमध्ये २६२ आणि पश्चिम बंगालमध्ये ११०, म्हणजे सर्व बंगालमध्ये मिळून सरासरी १५७ लोक मिळविले. हे प्रमाण सदोदीत असेच राहिले असते तर महंमदाचा धर्म सर्व बंगालभर साडेसहाशे वर्षात पसरला असता आणि पूर्व बंगालमध्ये तर तो चारशे वर्षातच फैलावला असता······ एकोणीस वर्षापूर्वी सर्व बंगालमध्ये मिळून हिंदूंची संख्या मुसलमानांपेक्षा सुमारे पाच लाखांनी अधिक होती. आणि वीस वर्षाच्या आतच ती हिंदूंच्या संख्येला मागे टाकून पंधरा लाखांनी पुढे गेली.[७]

ब्रिटीशांची मुसलमानी पक्षपाती वृत्ती या धर्मप्रचारकांच्या कामाला उत्तेजन देण्यास कारणीभूत झाली ही समजूत चुकीची आहे. १९ व्या शतकात झालेले धर्मांतराचे

६. फिरिश्ता; पृष्ठ २२८; आणि जे. एच्. रावेन्शॉ कृत गौर : इटस् रुइन्स ॲन्ड इन्स्क्रिप्शन्स् १८७८ पृष्ठ ९९.

७. सेन्सस ऑफ इंडिया, १८९१ भाग ३; आणि सी. जे. ओ. डोनेल कृत दि लोअर प्रॉव्हिन्सेस् ऑफ बेंगॉल ॲन्ड देअर फ्युडेटरीज, पृष्ठे १४६, १४७.

जोरदार पुनरुज्जिवन हे फार मोठ्या प्रमाणावर वहाबीच्या प्रभावामुळे झाले. आणि ब्रिटिशांच्याविरुद्ध त्यांनी अनेक दशके बंडखोरीची चळवळ चालविली होती हे सर्वांना माहितच आहे. शेवटी या शतकातील सातव्या दशकाच्या सुरुवातीला वहाबींनी तिचा त्याग केल्यामुळे इस्लाम धर्मप्रचाराकडे ते आपले सर्व लक्ष पुरवू शकले आणि त्यामुळे धर्मांतराची पावले जलद पडू लागली.

हिंदुधर्माबद्दलची, आणि इतर कुठल्याहि धर्मापेक्षा तो श्रेष्ठ असल्याची तीव्र जाणीव उच्चवर्णीय हिंदूंमध्ये आणि खालच्या वर्गामध्ये तिचा अभाव, हे लक्षात घेतले म्हणजे उच्चवर्णीयांनी मोह व सक्ती यांना केलेला विरोध आणि खालच्या जातींनी पत्करलेली शरणागती या चमत्काराचा उलगडा होतो. पूर्व बंगालप्रमाणेच सिंध आणि पंजाबमध्येसुद्धा वरच्या जाती म्हणजे जणू पॅसिफिक महासागरातील बेटे व खालच्या जाती म्हणजे जणू महासागरच होते. हिंदू राजांपैकी बऱ्याचशा राज्यकर्त्यांची धर्माकडे पहाण्याची दृष्टी खालच्या वर्गातल्या हिंदू सारखीच होती आणि ती उच्च वर्गियातल्या मध्यम श्रेणीच्या दृष्टीपेक्षा निराळी होती. हे मध्यम श्रेणीचे लोक देवळात जाणारे होते. या कर्मठ हिंदू धर्मात बुडालेल्या लोकांनी हालअपेष्टा सोसल्या पण इस्लाम धर्म स्वीकारण्यास नकार दिला. हे वर्ग म्हणजे व्यापारी, दुकानदार, शिक्षक, कारकून आणि भिक्षूक हे होत. पंजाब व इतर अनेक प्रांतांचा खानेसुमारीचा अहवाल पुन्हा पुन्हा हाच निर्णय देतो. मुसलमानांचे प्रभुत्व असलेल्या पंजाबच्या जिल्ह्यात ज्यांची नोंद हिंदू म्हणून झाली होती ते उच्च जातीचे होते किंवा त्यांच्या वर्चस्वाखाली असलेल्या खालच्या जातीचे होते. आसाममध्ये तद्देशिय धर्माबद्दलचे अज्ञान इतके ठळकपणे स्पष्ट दिसत होते की, त्यामुळे बाटवणाऱ्यांचे काम फारच सोपे झाले. शेतकऱ्याकडे फक्त जावयाचे आणि त्यांची मुसलमान म्हणून नोंद करावयाची! पण हे बाटलेले जितके हिंदू धर्माबद्दल अज्ञानी राहिले तितकेच इस्लामबद्दलहि राहिले. The Imperial Gazetteer of India, Vol. I (१८८५) यात नमूद करून ठेवले आहे की, 'त्यापैकी काही जणांनी महंमदाचे नावहि ऐकले नव्हते, तर काही त्याला हिंदू धर्मातील राम लक्ष्मणाप्रमाणे समजत होते. कुराण, मूळ अरेबिकमध्ये तर सोडाच, पण बंगालीमध्येहि क्वचितच वाचले जात असे. आणि त्यांच्यापैकी ज्यांनी कुणी त्याचे नाव ऐकले होते त्यांना ते कुणी लिहिले आहे हे सांगता येत नसे. तरीसुद्धा कुठलाहि मुसलमान शेतकरी अरेबिक प्रार्थनेचे काही तुकडे तोंडपाठ म्हणून दाखवू शकत असे.'[८] या प्रार्थनेने त्याला धर्माची जाणीव दिली आणि स्वतःला तो या सामाजिक-धार्मिक पद्धतीचा एक घटक समजू लागला. ही जाणीव तो तथाकथित हिंदू असताना त्याला नव्हती. विद्वान मुसलमानांपासून अलिप्त असलेल्या त्या काळात त्याने इस्लामी तत्त्वांना अपमानास्पद वाटतील अशा सभोवतालच्या अनेक हिंदू चालीरीति उचलल्या. उदाहरणार्थ, त्याने डुकराचे मांस खाण्यास आणि मादक

८. दि इंपिरियल गॅझेटियर ऑफ इंडिया, (१८८५) ग्रंथ १, पृष्ठ ३५८.

पेये पिण्यास सुरुवात केली. सुंता करण्याची चालहि मागे पडली. आणि नंतर मौलवी जेव्हा परत आले तेव्हा तो पुन्हा एकदा इस्लाम धर्माची कर्मठ तत्त्वे आचरणात आणू लागला.

पंजाब आणि सिंधमध्येसुद्धा जे लोक इस्लामच्या झेंड्याखाली आले त्यात शेतकऱ्यांचा भरणाच जास्त होता. परंतु या भागातील धर्मांतरे फार मोठ्या उत्क्रांतीशी आणि उलाढाल्यांशी संबंधित होती. सुरुवातीला येथे सक्तीने धर्मांतरे करवण्यात यश मिळाले. पण नंतरची मोठ्या प्रमाणावरची धर्मांतरे म्हणजे राजधानी पडल्यानंतरच्या देशाच्या शरणागतीसारखी होती. प्रमुख पुरुषाने धर्मांतर केल्याबरोबर त्याच्या टोळीतील व राज्यातील असंख्य पुरुष, स्त्रिया व मुले त्याचे अनुकरण करीत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे, पश्चिम पंजाबची घाखर व सिंधच्या सामा व सुमरा जमाती मुसलमान आक्रमकांशी बरेच सामने दिल्यानंतर शेरशहा आणि त्याचा पुत्र सलीमशहा यांच्या कारकिर्दीत घाखर जमातीचा पूर्ण पाडाव झाला. घाखरांच्या एका प्रमुखाने स्वतः इस्लाम धर्माचा स्वीकार केला आणि स्वतःच्या व दुसऱ्या जमातीतील लोकांना बाटवून इस्लाम धर्मात नेले, आणि त्यांना सलीमशाही किंवा इस्लामशाही असे नाव देऊन आपला दुसरा धनी जो सलीमशहा याचे नाव अजरामर केले[९]. महंमद कासीमच्या स्वारीनंतर शेकडो वर्षांनी सामा व सुमरा या जमातीहि मुसलमान झाल्या. पंजाबमध्ये कोणी हाजी महंमद नावाच्या माणसानी २ लक्ष हिंदूंना बाटवण्याचे श्रेय मिळविले.[१०] ज्यांच्या वैयक्तिक प्रयत्नामुळे या धर्माला फार मोठे यश मिळाले अशा धर्मोपदेशकाच्या नावाने, भारतातील इस्लाम धर्माच्या वाढीचा इतिहास परिपूर्ण भरलेला आहे. पंजाबमधले त्यांचे यश तर त्यांना फारच अभिमानास्पद आहे, कारण तेथे त्यांना शूर रजपूत, काटक जाट व हटवादी गुजर यांच्याशी सामना द्यावा लागला. अर्थात प्रथम तलवारीच्या जोरावर निष्कंटक केल्या गेलेल्या मार्गाने त्यांना जावे लागल्यामुळे या अभिमानाला थोडे गालबोट लागले. पंजाबमधील, विशेषतः पश्चिम पंजाबमधील जिल्ह्यातले रजपूत, जाट आणि गुजर शेतकरी हे राजस्थान, पूर्व पंजाब आणि पश्चिम संयुक्त प्रांत या भागातील त्यांच्या सुशिक्षित बांधवापेक्षा फार निराळे होते. त्यांच्यापैकी पुष्कळ जण हे भटके जीवन जगत होते, आणि त्यांना हिंदू धर्माबद्दल फारसे प्रेम नव्हते. याबाबतीत ते देशातील इतर अशिक्षित बांधवापेक्षाहि निराळे होते. ज्या हिंदू रीतिरिवाजांनी हिंदू आणि इतर धर्माचे अनुयायी यांच्यात भेद निर्माण केले आणि ज्या रीतिरिवाजामुळे प्रसंगानुसार धर्मोप-देशकांच्या मतपरिवर्तनाचा किंवा राजकीय मोहाचा तिरस्कार केला गेला, ते रीतिरिवाज

९. गुजरात (पंजाब) डिस्ट्रिक्ट गॅझेटियर, १९२१, पृष्ठ ११५. झेलम डिस्ट्रिक्ट गॅझेटियर, १९०४ पृष्ठ ६३.

१०. मागे उद्धृत केलेला अर्नॉल्ड कृत, पृष्ठ २३२ वर उद्धृत केलेला गार्सिन डी तासे कृत ल लॅन्गे एद् ला लिटरेचर हिंदुस्तानीज्, १८५० ते १८६९, पृष्ठ ३४३ वरील उतारा.

या भटक्या लोकांनी अजून आत्मसात केले नव्हते. औपचारिकपणे इस्लाम धर्म स्वीकारण्यापूर्वीच पश्चिम पंजाबचे भटके जाट लोक आपल्या मुलींची लग्ने स्वखुशीने मुसलमानांशी लावून देत असत. अशाप्रकारची अनेक कुटुंबे फार कालपर्यंन्त स्वतःच्या धर्माबद्दल अनिश्चित होती. शेवटी खानेसुमारीच्यावेळी त्यांचा (किंवा त्यांच्याकरिता) निर्णय होईपर्यंत ते हिंदूहि नव्हते व मुसलमानहि नव्हते. या खानेसुमारीमुळे त्यांना जबरदस्तीने काहीतरी निर्णय घ्यावा लागला असला तरी त्यानंतरहि ते अर्धवट हिंदू आणि अर्धवट मुसलमानच राहिले. ते जातीनियम पाळत होते, हिंदू समारंभात सामील होत होते आणि मूर्तिपूजकांच्या उत्सवात भाग घेत होते. शेवटी १९ व्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकात कट्टर मुसलमानांनी इस्लाम धर्माच्या नियमाप्रमाणे आदर्श जीवन घडवण्याची चळवळ सुरू करीपर्यंत हे असेच चालले होते. पण या चळवळीला मात्र भरघोस यश आले आणि वेळोवेळी बाटवलेल्या खेडयापाडयातील हिंदू जमाती, अधिक धर्मवेडया आणि धर्मपालनात अधिक काटेकोर बनल्या. आणि आपल्या हिंदू शेजाऱ्यांच्या बरोबरीने पाळलेल्या जुन्या रीतिरिवाजांचा त्यांनी हां हां म्हणता त्याग केला.

१९ व्या शतकात खानेसुमारीच्या संख्या वाचून इस्लाम धर्माच्या उत्साहकांना जास्तच जोर चढला. त्याचबरोबर त्यांनी ख्रिश्चन धर्मोपदेशकांची आधुनिक पद्धतहि उचलली. भारतातील मुसलमानी संस्कृतीच्या महत्वाच्या केंद्रात लाहोरची अंजुमान-इ-हिमायत-इ-इस्लाम आणि अजमिरची अंजुमान हमी इस्लाम अशा अनेक अंजुमान (संस्था) उदयास आल्या; पगारी प्रतिनिधी नेमले गेले, याशिवाय व्यापारात किंवा धंद्यात गुंतलेले लोकहि आपला संध्याकाळचा फुरसतीचा वेळ इस्लामच्या सेवेत घालवू लागले.[११] हिंदू धर्माने याचा प्रतिकार केला नाही. याच्या उलट मुसलमानी मुल्लांनी मात्र महत्वाच्या मुसलमानी स्मृती दिनासाठी नेमून दिलेल्या दिवशी जमलेल्या हिंदूंच्या मोठया जमावाला भारून टाकले. अगदी अलिकडच्या काळापर्यंत, मुसलमानी मुल्लांची पूजा काही खालच्या हिंदूंच्या जातीमध्ये जशी प्रचलित होती तशीच ती हिंदूंच्या काही उच्च जातीमध्येहि होती.[१२] अशी परिस्थिती असल्यामुळे धर्मांतरासाठी पुन्हा निर्माण झालेली आस्था यशस्वी होणे अपरिहार्यच होते. आणि तिने उत्तेजक यश मिळवून दिलेहि. इस्लामी धर्मगुरुंना शेकडो वर्षे मोकळे रान मिळाले कारण हिंदू धर्माजवळ त्यांच्या तोडीचे धर्मगुरू नव्हते.

सिंध आणि पश्चिम पंजाब या दोनहि प्रांतांना मुसलमानांच्या सुरुवातीच्या स्वाऱ्यांचा तडाखा सोसावा लागल्यामुळे तेथे मुसलमान लोकसंख्येची विलक्षण वाढ, आणि त्याचबरोबर हिंदूंच्या लोकसंख्येत विलक्षण घट झाली. या स्वाऱ्यांचा उद्देश राजकीय विजयाबरोबर धर्मांतर हाही होता. पहिला उत्साहाचा भर ओसरल्यावर आणि

११. मागे उद्धृत केलेल्या अर्नॉल्ड कृत पृष्ठ २३५.

१२. सेन्सस् ऑफ इंडया १८९१, ग्रंथ १६, भाग १, पृष्ठे २१७–४४, अलाहाबाद, १८९४.

सहिष्णू राज्यकर्ते म्हणून मोंगलांनी स्वतःची स्थापना भारतात केल्यावर, धर्मांतराला उघड राजाश्रय किंवा उत्तेजन हे सर्वसाधारणपणे बंद झाले आणि त्यामुळे इस्लाम धर्माची मजल सिंध व पंजाबमधल्या घोडदौडी इतकी प्रगत राहिली नाही. या सुरुवातीच्या मुसलमान स्वाऱ्यांच्या काळात आणि नंतर सिंध-पंजाबने जे अनुभवले त्याची तुलना औरंगझेबाच्या कडव्या कारकिर्दीबरोबर करणेसुद्धा शक्य नाही. शिवाय दुसऱ्या एका मुद्याकडेहि दुर्लक्ष करून चालणार नाही. या गंगा-यमुनेच्या भूमीत, आणि या दोनहि नद्यांच्या धार्मिक पगड्याखाली वसलेल्या प्रदेशात हिंदू धर्म जास्त प्रबळ आणि आग्रही होता. शिवाय पंजाब आणि बंगालमधील लोकांएवढी घरभेद्यांची मोठी संख्याहि येथे नव्हती.

हे बाटलेले लोक म्हणजे एक गंभीर राजकीय समस्या कशी झाली हे आपण पुढील प्रकरणात पाहूंच. ही समस्या त्यांनी स्वतः निर्माण केलेली नव्हती, त्यांना त्याची माहिती नव्हती आणि ते ती समजूहि शकले नव्हते. हाच हिंदी राजकारणातील जवळजवळ पाऊणशे वर्षांचा विचित्र विरोधाभास होता.

---

## प्रकरण दुसरे

# मुसलमान अमीर उमरावांपुढील पेंच*

भारतातील मुसलमानांची दोन वर्गात विभागणी करता येईल. व्यापारी आणि हल्लेखोर; हल्ले करणारे म्हणून आलेल्यांचा एक वर्ग आणि बाटलेले व त्यांचे वंशज यांचा दुसरा वर्ग. या दोनहि वर्गांचे निश्चित प्रमाण समजण्यास खानेसुमारीच्या अहवालांचा काही उपयोग होत नाही. १९१५ च्या अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या अधिवेशनात पहिल्या वर्गाच्या संख्येची कल्पना दिली गेली होती. त्यावेळचे अध्यक्ष मझहर-उल्-हक् यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात एकंदर मुसलमानांची संख्या ७ कोटी असल्याचे सांगितले. ते पुढे म्हणाले, 'त्यापैकी जे आपल्याला फार पूर्वीच्या अहिंदू पूर्वजांचे वंशज मानतात त्यांची संख्या फक्त ८० लक्षच आहे'. ज्या बाटग्यांच्या मूळ वंशजांचा पत्ता काळाने पुसून टाकला होता ते आपल्याला परदेशीय मुसलमानांचे वंशज म्हणवण्यातच धन्यता मानीत. ही बतावणी क्षम्य होती कारण परदेशीय मुसलमान व त्यांचे वंशज यांना फार मानाने वागवले जात असे. त्यापैकी पुष्कळजण तर मुसलमानी राजवटीतले सरदार दरकदार बनले होते. पश्चिम पंजाबमधील जाट, गुजर आणि रजपूत मुसलमानांची संख्या आणि त्याबरोबरच तेथल्या व बंगाल, दक्षिण हिंदुस्तान आणि इतर प्रदेशातील खालच्या वर्गाच्या मुसलमानांची संख्या इतकी मोठी होती की मझहर-उल्-हक् यांनी वर मांडलेले आकडे संपूर्णपणे मान्य करणे कठीण होईल.

परदेशीय मुसलमान व बाटलेले हिंदी मुसलमान यांच्यामध्ये फरक करणे आवश्यक आहे. परदेशीय मुसलमान हे मुलकी व लष्करी खात्यात भरती होत असत; तर बाटलेले हिंदी मुसलमान बहुतकरून शेतकरी आणि कनिष्ठ नोकर वर्गात समाविष्ट असत. मुसलमानी राज्याच्या सहाशे किंवा सातशे वर्षांच्या काळात परदेशीय मुसलमानांनी सरकारी नोकरीत वास्तवात मक्तेदारी उपभोगिली. ते राज्यकर्त्यांचीच भाषा लिहित व बोलत असल्यामुळे मुसलमानी आमदानीत, स्थानिक हिंदूंपेक्षा त्यांना किफायतशीर सरकारी नोकऱ्या मिळवणे अधिक सोपे जाई. हिंदूंना उच्च अधिकाराच्या जागा नाकारल्या होत्या असे नव्हे, पण तशा जागा मिळालेले क्वचितच. अकबराच्या उदार कारकिर्दीतसुद्धा हा पक्षपात चालूच राहिला. याचे उत्तम उदाहरण म्हणजे

* १८ व्या आणि १९ व्या शतकांतील शिक्षणाच्या प्रगतीचा वृत्तांत युनिव्हर्सिटी एज्युकेशन कमिशनच्या अहवालावर (हिंदुस्तान सरकार) आधारलेला आहे.

"पाच हजाराहून अधिक स्वारांची मन्सुबी" असणाऱ्या बारा उच्च अधिकारांच्या जागेपैकी एकाहि जागेवर हिंदूची नेमणूक झाली नव्हती. याच्या खालोखाल "पंच हजारी स्वारांच्या मन्सबदारीपासून पाचशे स्वारांच्या मन्सबदारीपर्यंत", २५२ अधिकाऱ्यांपैकी फक्त ३१ हिंदू होते. अकबरानंतरच्या आमदानीत याच श्रेणीच्या ६०९ मन्सबदारांपैकी ११० हिंदू होते. आणि याहून कमी श्रेणीच्या, म्हणजे "पाचशे ते दोनशे स्वारांची मन्सबदारी" असलेल्या १६३ जागांपैकी फक्त २६ हिंदू होते. याचप्रकारचा पक्षपातीपणा उच्च मुलकी अधिकारी नेमतानाहि अंमलात आणला जात होता. आणि हिंदूंनी पर्शियन आणि अरेबिक भाषा आत्मसात केल्यानंतरहि तो तसाच चालू राहिला. काही अपवादात्मक कारकिर्दीत मात्र, मुसलमान राजे, आपल्या दरबारातील कपट-कारस्थानात गुंतलेल्या मुसलमान अधिकाऱ्यांविरुद्ध बिनतोड उपाय म्हणून हिंदूच अधिक पसंत करीत. १७४० मध्ये बंगालची गादी बळकावणाऱ्या अलीवर्दीखानाने जुन्या राज्यकर्त्यांशी एकनिष्ठ असलेल्या कुठल्याहि मुसलमानाला चुकूनसुद्धा जबाबदारीची जागा मिळू नये म्हणून उच्च अधिकाराच्या जागेवर हिंदूच नेमण्याचे धोरण ठेवले होते. त्याच्या मागून गादीवर येणाऱ्या सिराजउद्दौलानेहि हेच धोरण पुढे चालू ठेवले.

तथापि, असे राजे अपवादात्मकच होते. बहुतेक मुसलमानी राज्यात उलेमांचा प्रभाव फार मोठा होता. आणि स्थानिक लोकांशी असलेला राज्यकर्त्यांचा संबंध जरी पुष्कळ अंशी धर्मापेक्षा राजकीय गरज म्हणून नियमित करावा लागला तरी उलेमांच्या प्रभावाकडे दुर्लक्ष करणे कठीण होते. एखाद्या उदार राज्यकर्त्याने आपल्या कारकिर्दीत, मुसलमानांची मक्तेदारी असलेल्या सरकारात जर कधीकाळी एखाद्या हिंदूला घुसवलेच तर हे मुसलमान उलेमा अतिशय अस्वस्थ होत आणि अशांतता निर्माण करीत. अकबराने या उलेमांना पिछाडीला ढकलले होते तरीहि हिंदू प्रमुख, राजा तोडरमल व राजा मानसिंग यांची अनुक्रमे अर्थमंत्री व सैन्याधिपती म्हणून नेमणूक* केली तेव्हा त्यांच्याविरुद्ध त्यांनी चळवळ उभी केली. तक्रारींचे अर्ज घेऊन दरबारात शिष्टमंडळे पाठविली. परंतु त्या हजरजबाबी बादशहाने त्यांचे समाधान करून त्यांना परत पाठविले. त्याने विचारले, 'तुमच्या जमिनीची किंवा तुमच्या इस्टेटीची व्यवस्था कोण पहातो?' 'आमचे हिंदू मुनीम' असे त्यांनी उत्तर दिल्याबरोबर अकबर म्हणाला 'फार छान! मग माझ्या इस्टेटीची व्यवस्था पाहण्यासाठीहि मला त्यांनाच नेमू द्या'. राज्याचा वसूल आणि अर्थ या जागांवर हिंदूना नेमण्याची मुसलमान राजेरजवाड्यांची सर्रास पद्धत होती. वसुलाचा तपशील व हिशोबाची डोकेफोडी करण्याची मुसलमान उमरावांची तयारी नसल्यामुळे त्यांनी या जागा हिंदूंना मोकळ्या सोडल्या आणि व्यवहारकुशल हिंदूंनी आपली ही जबाबदारी अधिक कार्यक्षमतेने पार पाडली. शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष व्यवहार हासुद्धा हिंदू बेलीफवरच सोपवण्यात आला. त्यामुळे दुय्यम दर्जाच्या जमीन महसुलाच्या

बहुतेक जागा हिंदूंनीच व्यापिल्या होत्या. आपल्या वरच्या मुसलमान अधिकाऱ्यांकडे वसूल पोचता करण्यापूर्वी ते आपला नफ्याचा हिस्सा कापून घेत असत. हे मुसलमान अधिकारी वसुलाबाबत अधिकृत जबाबदार होते. आणि बादशहा व हिंदू महसूल अधिकारी यामधील महत्वाचा दुवा होते. अशा रीतीने मुसलमान अमीर उमरावांना आपल्या खजिन्यात अमाप पैसा भरण्याचे तीन मार्ग होते. एक सैन्याधिकारी म्हणून, दुसरा जमीन महसूल गोळा करून व तिसरा न्यायालयीन आणि राजकीय नोकऱ्या मिळवून.

ब्रिटीशांनी निरनिराळे प्रदेश जिंकल्यावर मुसलमान अमीर उमरावांचा इमला फार जोरात हादरला. हा हादरा बंगालच्या सरंजामी मुसलमानांना प्रथम जाणवला. हे मुसलमान म्हणजे प्रत्यक्ष वसूल गोळा करणारा व सरकार यांच्यामधील एक अनावश्यक दुवा होते. मुसलमान राजांच्या दृष्टीने जरी हा दुवा महत्वाचा होता तरी ईस्ट इंडिया कंपनीला त्याची गरज नव्हती. जसजशी कंपनी आपल्या स्थानाबद्दल निश्चित होऊ लागली तसतशी या दुव्याची हकालपट्टी किंवा अवहेलना होऊ लागली. स्थावर व्यवस्थेच्या पद्धतीत कंपनीने अंमलात आणलेले अनेक प्रकारचे बदल आणि त्यातून उदयास आलेली १७९३ ची 'कायम धारापद्धती' (Permanent Settlement) यामुळे अनावश्यक असलेले हे मुसलमान अमीर उमराव नाहीसे झाले. या बदलाचा परिणाम जेम्स ओकिनली यांनी असा वर्णन केला आहे की, 'त्यामुळे आजपर्यंत क्षुल्लक समजल्या जाणाऱ्या जागांवर असलेले हिंदू कलेक्टर हे जमीन मालक म्हणून एकदम अधिकाराच्या जागांवर चढवले गेले, त्यांना जमिनीचा मालकी हक्क मिळाला आणि मुस्लीम राजवटीत जी संपत्ती स्वतः मुसलमानांच्या पदरी पडली असती ती साठवण्याची मुभा हिंदूंना मिळाली' जमीन महसुलाच्या कचेऱ्या हातातून जाणे म्हणजे त्याकाळी प्रचलीत असलेले जुलूम जबरदस्तीने वसूल मिळवण्याचे मार्गहि बंद होणे, हे पर्यायाने आलेच.

ईस्ट इंडिया कंपनीने ब्रिटीश राजवटीच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक म्हणून मुसलमान अमीर उमरावांचे हळूहळू सैन्यातूनहि उच्चाटन केले. परंतु मुलकी खात्यांची मक्तेदारी, कंपनी बंगालची खरीखुरी सत्ताधारी बनल्यानंतरहि सुमारे पन्नास वर्षाहून अधिक काळ मुसलमानांकडेच राहिली. न्यायालयीन अधिकारीहि मुसलमानच राहिले आणि पूर्वीप्रमाणेच इस्लाम धर्माचे कायदे हे देशाचे कायदे राहिले. राज्यभाषा पर्शियन राहिली आणि सरकारी नोकऱ्यांसाठी लायक माणसे म्हणून परंपरेनुसार फक्त अमीर उमराव कुटुंबेच स्वीकारली गेली.

मुसलमानी शिक्षणपद्धती चालू ठेवली गेली आणि पहिला गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टींग्ज याने कलकत्ता मदरसा स्थापन केली. तिचा उद्देश 'मुसलमान गृहस्थांच्या मुलांना राज्यातील किफायतशीर व जबाबदारीची खाती पेलण्यास तयार करणे' हा होता अभ्यासक्रमात धर्मशास्त्र, तर्कशास्त्र, अलंकारशास्त्र, व्याकरण,

कायदा, पदार्थविज्ञानशास्त्र, ज्योतिर्विज्ञानशास्त्र, भूमिती आणि अंकगणित या पारंपारिक विषयांचा समावेश होता.

बंगालच्या राज्यकारभाराची भाषा पर्शियन होती. कारण मुसलमान राज्यकर्ते व त्यांचा अधिकारी वर्ग, हे उत्तर हिंदुस्तानातून कारभार व सैन्य या खात्यातील जागांसाठी पाठवलेल्या परदेशीय मुसलमानांचे वंशज होते. त्यामुळे त्यांची बोलीभाषाहि पर्शियन होती. नवीन राज्य रचनेतील कारभाराची भाषा, हिंदू व मुसलमान या दोनहि धर्माच्या सामान्य जनतेची भाषा बंगाली असल्यामुळे बंगाली तरी किंवा राज्यकर्त्यांची भाषा म्हणून इंग्रजी तरी करणे आवश्यक होते. पण ईस्ट इंडिया कंपनीने तारतम्याने पूर्वीचीच पद्धत काही काळ चालू ठेवण्याचे धोरण स्वीकारले. ब्रिटिश राजवटीची सुमारे ५० वर्षे उलटल्यानंतरसुद्धा, दुय्यम दर्जाच्या सरकारी नोकऱ्या करण्यासाठी इंग्रजी जाणणारे पुरेसे हिंदी लोक मिळत नसल्यामुळे, पर्शियन भाषेची जागा इंग्रजीला देणे अव्यवहार्य ठरले असते. अर्थातच पर्शियन जरी मुसलमान राज्यसत्तेची वारसदार होती आणि राजा व प्रजा या दोघांनाहि ती परकीय होती तरी तिचा राज्यकारभाराची भाषा म्हणून बराच काळ स्वीकार करावा लागला.

हळूहळू पर्शियनची जागा बंगालीने घेतली. सहाजिकच हा बदल मुसलमान उमरावांना अगदी अप्रिय होता. कारण यामुळे सरकारी नोकऱ्यांचे दरवाजे हिंदूंनाहि खुले झाले. अमर्याद आनंदाने असंख्य हिंदूंनी सरकारी जीवनात पदार्पण केले. ते ब्रिटिशांना आपले उपकारकर्ते समजू लागले. पण खानदानी अलिप्तपणाला रूळलेले मुसलमान उमराव यामुळे फार दुखावले गेले आणि पर्शियनकडून बंगालीकडे झालेल हा बदल आपल्या धर्माविरुद्ध आणि दर्जाला कमीपणा आणणारा आहे असे मानू लागले. उच्च सरकारी अधिकार हा त्यांचा पूर्वापार चालत आलेला वारसा होता आणि नव्या सुधारणा आपला हा हक्क हिरावून घेत आहेत असा त्यांनी आपला समज करून घेतला. मुसलमानी कायद्याचे तज्ज्ञ असल्यामुळे न्यायदानाचा अधिकार हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे असे त्यांना वाटत होते पण तोहि हक्क त्यांना नाकारण्यात आला होता. आणि आता, ब्रिटीश राजवट सुरू होऊन बराच कालावधी लोटल्यानंतर, नव्या राजसत्तेने आपल्याला दूर फेकले आहे याची जाणीव त्यांना अतिशय तीव्रतेने बोचू लागली.

मुसलमान अमीर उमराव अधिक कटू व विरोधी बनण्याचे आणखी कारण म्हणजे, राज्यकारभाराची भाषा बंगालीऐवजी इंग्रजी केली गेली आणि त्या अनुषंगाने इंग्रजी शिक्षणाचा प्रसार वाढला हे होय. त्यांची प्रतिक्रिया नीट समजण्यासाठी, भारतात इंग्रजी शिक्षणपद्धतीचा प्रसार कसकसा होत गेला याची कल्पना येणे आवश्यक आहे.

बंगाल मुसलमानांकडून जिंकला गेला होता. त्यामुळे त्या भागात मुसलमानांचे प्रभुत्व आहे असे समजून कलकत्ता मदरसा हे मुस्लीम विद्यालय स्थापन केले गेले. याच धोरणानुसार हिंदूकरिता, 'देशाचा धर्म, साहित्य आणि कायदा टिकून राहण्याकरिता

व त्यांची वाढ होण्याकरिता आणि विशेषतः युरोपीय न्यायाधिशांना सहाय्य करण्यासाठी लायक हिंदू तयार करण्याकरिता' बनारसला संस्कृत विद्यालय स्थापन केले गेले. कालांतराने, भारतातील काही ब्रिटिश अधिकाऱ्यांना व नगरवासियांना असे वाटू लागले की, या दोन विद्यालयात दिले जाणारे शिक्षण त्याच्या आधुनिक गरजा भागवण्यास फारच अपुरे पडत आहे. तेव्हा त्यांनी हिंदी लोकांना इंग्रजी शिकवण्याची जोरदार मागणी केली. सुमारे पन्नास वर्षे ही सूचना पुन्हा पुन्हा करण्यात येत होती पण तिकडे दुर्लक्ष केले गेले.

१८१३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीची सनद पुन्हा वाढवली गेली आणि त्यावेळी 'भारतातील ब्रिटीश अंमलाखाली असलेल्या प्रदेशातील स्थानिक लोकात शास्त्रीय ज्ञानाची सुरुवात व वाढ करण्याकरिता आणि साहित्याचे पुनरुज्जीवन व सुधारणा करण्याकरिता प्रत्येक वर्षी कमीतकमी एक लाख रुपये बाजूला काढून ठेवण्यात यावेत' अशा अटीचे कलम घालण्यात आले. त्यावेळचे हिंदी राजकारणातील अत्यंत धोरणी पुरुष राजा राममोहन रॉय यांना या कलमात हिंदूंना युरोपीय भाषेत आणि शास्त्रात शिक्षण मिळू शकेल अशी संस्था स्थापन होण्याची सुवर्णसंधी दिसली. एक मंडळ स्थापन केले गेले आणि त्याने १८१७ मध्ये हिंदू कॉलेज काढले. कलकत्याच्या बिशपला जणू काय हे एक निराळ्याप्रकारचे आवाहन आहे असे वाटले आणि त्याने १८१८ मध्ये तरुण ख्रिश्चन प्रचारक तयार करण्यासाठी व हिंदू-मुसलमानांना इंग्रजी भाषेचे ज्ञान देण्यासाठी कलकत्त्याला एक संस्था स्थापन केली.

या प्रयत्नांना कंपनीच्या बोर्ड ऑफ डिरेक्टर्सची संमती होती. याचे मुख्य कारण म्हणजे यामुळे हिंदुस्तानच्या मुलकी कारभाराच्या जागांसाठी लायक लोकांचा वर्ग तयार होऊ शकला असता. त्यांनी असे नमूद करून ठेवले होते की, 'हा अतिशय इष्ट असा हेतू साध्य होण्यासाठी साधन म्हणून आम्ही मुख्यत्वेकरून, युरोपीय साहित्य व शास्त्र यांच्या दाट परिचयातून झालेल्या, सुधारलेल्या युरोपच्या कल्पनेने आणि भावनेने ते भारावून जाण्यावर, सर्वसाधारणपणे त्यांची आकलन शक्ती वाढण्यावर आणि विशेषतः त्यांच्या न्यायशास्त्र आणि नीतिशास्त्र यांच्या ज्ञानावर भरवसा ठेवून आहोत'.

आता, बहुतेक सुशिक्षित लोकांचे लक्ष इंग्रजीने वेधून घेतले होते. इंग्रजीतून शिक्षणाची मागणी जास्त जास्त तीव्र होत चालली होती. बनारस संस्कृत विद्यालय व कलकत्ता मदरसा यांना इंग्रजीचे वर्ग जोडण्यात आले आणि याचवेळी शिक्षणाचे माध्यम पर्शियन, अरेबिक, संस्कृत की इंग्रजी हा वाद सुरू झाला. १८३५ मध्ये 'पब्लिक इन्स्ट्रक्शन कमिटीने हा विषय सरकारकडे सोपवला. कंपनी सरकारचे त्यावेळचे विधीमंत्री मेकॉले यांनी एक खलिता तयार केला. तो आज एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून प्रसिद्ध आहे. पण मेकॉलेसाहेबांची ठाम मते यापूर्वीच बनलेली होती. एकदा 'हाऊस ऑफ कॉमन्स' मध्ये त्यांनी असे मत प्रदर्शन केले होते की,

'हिंदुस्तानातील लोकांनी नेहमी आमच्या कलाने वागावे म्हणून आम्ही त्यांना अज्ञानी ठेवणार आहोत काय? की त्यांची महत्वाकांक्षा जागृत केल्याशिवाय आम्ही त्यांना ज्ञान देऊ शकतो असे आपण समजतो? किंवा त्यांची महत्वाकांक्षा जागृत करून तिच्या आविष्काराचा मार्ग मात्र खुला न ठेवण्याचा आपला इरादा आहे?······ असे होण्याचा संभव आहे की, भारतीय मन आपल्या शिक्षणपद्धतीमुळे एवढे प्रगल्भ होईल की, शेवटी ते त्या पद्धतीवर मात करील, चांगल्या राज्यकारभाराने आपण आपल्या प्रजेला शिक्षण देऊन कदाचित अधिक चांगल्या राज्यकारभारासाठी लायक बनवू, असाही संभव आहे की, युरोपीय ज्ञानाचे शिक्षण मिळाल्यामुळे, कालांतराने केव्हातरी ते युरोपीय संस्थांची मागणी करतील असा दिवस कधी उगवेल की नाही हे मला माहित नाही. पण जर कधी तो उगवला तर तो इंग्रजी इतिहासातील फार अभिमानास्पद दिवस ठरेल.······ राजदंड कदाचित आपल्या हातून जाईल अशा परिस्थितीत जो विजय मिळेल त्याचा आपल्या लष्करी सामर्थ्याशी काही संबंध नसेल! पण काही विजय असे असतात की, त्यांना माघार नसतेच'.

म्हणून मेकॉलेने इंग्रजीच्या बाजूने आपला कौल दिला. त्याचा खलिता गव्हर्नर जनरल वुईल्यम बेंटींक याने मान्य केला आणि ७ मार्च १८३५ रोजी एक ठराव पास केला. या ठरावात, 'सरकारजवळ असलेला सर्व पैसा यापुढे भारतीय लोकांन इंग्रजी साहित्याचे व शास्त्राचे ज्ञान देण्यात खर्च करण्यात यावा' या मुद्यावर विशेष भर दिला होता. या ठरावात असेही म्हटले होते की; 'प्राचीन शिक्षणाची केंद्र जरी बंद करावयाची नसली, तरी त्या केंद्रातील विद्यार्थ्यांना, शिक्षणाच्या काळात देण्यात येत असलेल्या मदतीची प्रथा बंद करण्यात येणार आहे'. या कलमामुळे अरेबिक व पर्शियन भाषेच्या पुरस्कर्त्यांना तक्रार करण्यास कारण मिळाले.

जे हिंदू पुढारी संस्कृतऐवजी इंग्रजीची मागणी करत होते त्यांनी या ठरावाचे मनःपूर्वक स्वागत केले. पण मुसलमानांच्या भावना मात्र यामुळे दुखावल्या गेल्या संस्कृत विद्वान पंडित एच. एच. विल्सन यांनी म्हटल्याप्रमाणे, 'सर्व पैसा इंग्रजी शिक्षणासाठी वापरावा या सूचनेवर कलकत्त्यातील मुसलमानांनी, स्थानिक नागरिक क आदरणीय मौलवी यांच्यासकट शहरातील सुमारे ८००० लोकांनी सह्या केलेला एव अर्ज तयार केला. त्यात या ठरावातील सर्वसाधारण तत्त्वांना विरोध करून असे म्हटले होते की, स्थानिक लोकांचे धर्मांतर हा सरकारचा उद्देश, यात उघड दिसून येतो; ख्रिश्चन होण्यासाठी लोकांचे मन तयार व्हावे या इच्छेने, त्यांनी मुसलमान व हिंदू धर्माच्या अभ्यासाबद्दलची उमेद खचवली व केवळ इंग्रजीला उचलून धरले.' सरकारने ही प्रतिक्रिया अपेक्षिली नव्हती. म्हणन वुईल्यम बेंटींकने तावडतोब पूर्ण धार्मिक तटस्थतेचे धोरण जाहीर केले: 'सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये······ शिक्षणाच्या पद्धतीबरोबर ख्रिश्चन धर्माच्या शिकवणुकीची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष ढवळा-ढवळी किंवा अविवेकी भेसळ ही निश्चितपणे निषिद्धच मानली पाहिजे.'

मुसलमानांची ही भीती पूर्णपणे निराधार नव्हती. सरकारी संस्थांची पूर्वचिन्हेच असलेल्या ख्रिश्चन मिशनरी शाळांना आपल्या शाळांतून इंग्रजीच्या अभ्यासात ख्रिश्चन धर्माची शिकवण आधीच मिसळत होत्या. आणि त्यांनी धार्मिक तटस्थतेचे धोरण कधीच मान्य केले नव्हते. मद्रास इलाख्यात १८ व्या शतकाच्या सुरूवातीपासूनच डेनिश मिशनरी काम करत होते. १७९३ मध्ये बंगालमधील सेरामपूर येथील डेनिश वसाहतीत, कॅरे, मार्शमन आणि वॉर्ड यांनी या कामाचा पाया घातला. यानंतर वीस वर्षांनी दिनाजपूर व जेसोर येथे बॅप्टिस मिशनऱ्यांचे आगमन झाले, लंडन मिशनरी सोसायटी विझगापट्टम आणि डच चिन्सुरामध्ये आली, अमेरिकन बोर्ड मुंबईला आणि काही कार्यकर्ते बेल्लारीला आले. या सर्वांनी इंग्रजीपेक्षा ख्रिश्चन धर्माच्या शिकवणुकीला जास्त प्राधान्य दिले. इतकेच नव्हे, तर इंग्रजीपेक्षा आधुनिक भारतीय भाषांच्या अभ्यासाकडेहि अधिक लक्ष दिले.

१८४० च्या जरा आधी जेव्हा खुद्द इंग्रजी शिक्षणामुळे धर्मप्रसार होईल असे आपले नवे धोरण त्यांनी आखले तेव्हा त्यांच्याकडे जास्त संशयाने पाहिले जाऊ लागले. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या वृत्तीची ही चुणूक व पौर्वात्य शिक्षणापेक्षा इंग्रजीवर भर देण्याचा सरकारचा जाहीरनामा ही दोनहि साधारण एकाच वेळी आली. त्यामुळे सरकारसुद्धा धर्मप्रसाराच्याच उद्देशाने काम करीत आहे असा निष्कर्ष एका विशिष्ट प्रकारच्या शिक्षणपद्धतीवर निष्ठा ठेवणाऱ्या लोकांनीहि काढला. नंतरच्या काही वर्षांत फार मोठ्या प्रमाणावर सरकारी संस्था व मिशनरी संस्था एकदमच उदयास आल्या. त्यात मिशनरी संस्थांचे प्रमाण जास्त असल्यामुळे हा संशय अधिकच दृढ झाला. (डॉ. डफ म्हणतात त्याप्रमाणे) 'आमचा महत्वाचा उद्देश, तरूणांना आमच्या सर्वसामान्य सुधारलेल्या साहित्याचे व शास्त्राचे जास्तीत जास्त ज्ञान करून देणे हा होता. पण त्यांना ख्रिश्चन धर्माची तत्त्वे व पुरावे यांचे ज्ञान करून देणे हा याहूनहि जास्त महत्वाचा उद्देश होता.' हे मिशनऱ्यांनी जाहीर केलेले धोरण ऐकून मुसलमानांना इतका भयंकर धक्का बसला की, त्यांनी सरकारच्या प्रांजळ जाहीरनाम्याचा अर्थही, त्यांना धर्मच्यूत करण्याच्या सरकारी उद्देशातील एक कुशल भाग असा लावला. म्हणून ते बहुतेक सर्व नव्या शिक्षणपद्धतीपासून दूर राहिले. जे हिंदू दैनंदिन व्यवहारात कर्मठ नव्हते; त्यांनी मिशनरी शाळेत ख्रिश्चन धर्म वगळून इंग्रजी व शास्त्र या विषयांचे पाठ घेतले. मुसलमानांना पर्शियन व अरेबिकबद्दल जितका जिव्हाळा वाटत होता तितका हिंदूंना संस्कृतबद्दल वाटत नव्हता. खरे म्हणजे, इंग्रजी भाषा आपल्याला आधुनिक ज्ञानाच्या जगात नेण्यास व सरकारी नोकऱ्यांची द्वारे खुली करण्यास जास्त उपयुक्त ठरेल हे त्यांनी ओळखले आणि त्यामुळे संस्कृतच्या बदली इंग्रजीची मागणी करणाऱ्या राजा राममोहन रॉय व इतर हिंदू पुढाऱ्यांना त्यांनी मोठ्या आनंदाने पाठिंबा दिला.

हिंदू जरी इंग्रजी शाळेत गेले तरी त्यांचा धर्म त्यांना पारखा झाला नाही यावरून

मुसलमानांची भीति किती निराधार होती हे आपोआपच सिद्ध झाले. मुसलमानांनी इंग्रजी शिक्षणाची सुसंधी स्वतःच्या हाताने घालवली आणि सरकारी नोकऱ्यांना मुकण्याची आपत्ती ओढवून घेतली. १८४४ मध्ये सार्वजनिक नोकऱ्यांसाठी, इंग्रजी भाषा जाणणारे व पाश्चिमात्य शास्त्राचे शिक्षण घेतलेले लोक नोकरीवर घेण्याचा सरकारने निर्णय घेतला. या नोकऱ्यांसाठी पुष्कळ हिंदू लोक लायक बनले होते. त्यामुळे हळूहळू त्यांनी सर्व सरकारी नोकऱ्यांची मक्तेदारी मिळवली. ही घटना मुसलमानांना अस्वस्थ करण्यास व त्यांच्यात द्वेष निर्माण करण्यास कारणीभूत झाली.

वरील सर्व घटना देशाच्या पुढच्या राजकारणावर कायमचा ठसा उमटवून गेल्या. सरकारच्या बाजूला हिंदू व विरुद्ध बाजूला मुसलमान असे उभे राहिले. १९ व्या शतकाच्या पहिल्या ५० वर्षाच्या काळात, बंगालच्या प्रमुख हिंदू पुढाऱ्यांची जाहीर भाषणे व मासिके मुसलमान कारकिर्दीच्या तीव्र निषेधाने आणि ब्रिटीश राज्यव्यवस्थे-बद्दलच्या उत्साहाने, अगदी सहर्ष स्वागताने भरलेली असत. देशाला भोगाव्या लागलेल्या जवळ जवळ सर्वच वाईट गोष्टी मुसलमान सत्तेच्या माथी मारण्यात आल्या होत्या.

कायमधारा पद्धतीतील (Permanent Settlement) वसूल पद्धतीचा फायदा ज्याप्रमाणे हिंदूंना मिळाला त्याचप्रमाणे शिक्षण पद्धतीचा फायदा उपभोगणारेही हिंदूच होते. वरच्या वर्गाच्या मुसलमानांना हिंदू आणि हिंदूंना मुसलमान डोळ्यासमोर नकोसे वाटू लागले. परंतु या नवीन घडामोडीचा हिंदू-मुसलमान जनतेवर काही परिणाम झाला नाही. त्या दोघांची एकच तक्रार होती; ती अशी की, जरी कायमधारा पद्धतीने जमिनीचा महसूल सर्व काळासाठी कायम ठरवला होता, तरी वसूल जमा करणारे वाढत्या किमतीप्रमाणे वसूलात वाढ करीत होते. जर वाढलेली किमत म्हणजे वसुलात वाढ असा अर्थ नव्हता तर वसूल जमा करणा-यांनी वसुलात वाढ का करावी? कुठल्याहि चळवळखोराला उपयोगी पडेल असा हा मुद्दा होता निराशेच्या भरात पदच्युत झालेल्या अमीर उमरावांची आणि सुशिक्षित मुसलमानांची बंडाची प्रवृत्ती बळावली, आणि त्यांनी आपले पुढारीपण टिकवण्यासाठी, एतद्देशिय सत्ता परत स्थापन होण्यासाठी आणि नवीन जमीनदारांच्या पिळवणूकीपासून मुक्त होण्यासाठी आपल्याशी एकजूट करण्याची मुसलमान शेतकऱ्यांना हाक घातली.

## प्रकरण तिसरे

# वहाबी चळवळ, नोकऱ्या आणि राजकारण*

१९ व्या शतकाच्या प्रारंभी, उत्तर प्रदेशातील रायबरेली जिल्ह्यातून आलेल्या आणि इस्लामबद्दलच्या आस्थेने प्रज्वलित झालेल्या एका मुसलमान साहसी पुरुषाने, भारताच्या प्रत्येक जिल्ह्यात मुसलमान धर्माची खूण असलेली चंद्रकोर स्थापन करण्याचे डोक्यात घेतले. त्याचे नाव सय्यद अहम्मद असे होते. तो स्वप्नाळू होता. आणि भारतातून अस्तंगत होत चाललेल्या इस्लामी साम्राज्याला, इस्लाम धर्माच्या खऱ्या स्वरुपाचे पुनरुज्जीवन करून आपण परत स्थापू शकू असा त्याचा विश्वास होता. प्रथम त्याने अमीरखान पिंडारी यांच्याकडे घोडदळातील शिपाई म्हणून आपला जीवनक्रम सुरू केला. नंतर तो टोकच्या नबाबाकडे राहिला. डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर यांच्या मते, 'बरेच वर्षे त्याने माळव्यातील अफू तयार होणाऱ्या समृद्ध खेडयांना लुटले'. परंतु इस्लामच्या पवित्र कायद्याचा अभ्यास करण्याच्या त्याच्या महत्वाकांक्षेने त्याला दिल्लीतील महनीय मौलवीकडे ओढून नेले. भारतातील इस्लामच्या अधोगतीचे कारण त्याने इस्लाम धर्मात शिरलेल्या अनुचित प्रथा हे मानले. आणि स्वत: धर्मप्रचारक बनून त्याने त्यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. त्याला शिरजोर

---

* वहाबी चळवळीसंबंधीचा वृत्तांत खालील पुस्तकावर आधारित आहे :—

डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर कृत इंडियन मुसलमानस्.

सर् आल्फ्रेड सी लॅल कृत एशियाटीक स्टडीज् (रिलिजस अँन्ड सोशल).

सर सय्यद अहम्मद खान कृत दि कॉझेस् ऑफ दि इंडियन रिव्होल्ट ऑफ १८५७ (मूळ उर्दू असबाब–ए–बगावत).

ग्रॅहॅम यांचे लाइफ् अँन्ड वर्क ऑफ सर् सय्यद अहम्मद.

राजेन्द्र प्रसाद यांचे इंडिया डिव्हायडेड्.

तुफेल अहम्मद : मुसलमानोंका रोशन मुस्ताक्बाल (उर्दू).

दि अलिगड इन्स्टिटयूट गॅझेट दिनांक ८ सप्टेंबर १८७१.

महम्मद जाफर : सावनत अहमदिया (उर्दू).

हेन्री डॉड्वेल : ए स्केच ऑफ दि हिस्ट्री ऑफ इंडिया १८५८ ते १९१८.

बी. डी. बसू : इंडिया अन्डर द ब्रिटिश क्राउन.

नॅशनल अरकाइव्हज्च्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास या विभागातील वहाबी चळवळीसंबंधी कागदपत्रे.

अनुयायी मिळाले. हे १९ व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात घडले. तो स्वतःला ईश्वराचा प्रेषित म्हणवू लागला आणि खरोखरीच लोक त्याला तसे मानू लागले. त्याची धर्मनिष्ठा आणि स्वतःच्या ध्येयाचा दृढनिश्चय त्याच्यापूर्वीच दूरवर पसरला आणि तो जेथे जेथे गेला तेथे तेथे त्याचे अनुयायी बनण्यासाठी असंख्य लोक पुढे आले. मोठमोठे सूज्ञ आणि अधिकारी लोक एकाद्या सामान्य नोकराप्रमाणे त्याच्या पालखीबरोबर अनवाणी धावू लागले. त्याने फक्त शब्द टाकण्याचाच अवकाश की, खडे सैन्य तयार होईल हे आता अगदी स्पष्ट दिसू लागले होते. 'कलकत्त्यामध्ये त्याच्याभोंवती इतके लोक जमले की, दिक्षा देण्याच्या विधीत प्रत्येकाला निरनिराळा हात देणे त्याला कठीण झाले. म्हणून स्वतःचे पागोटे लांब पसरून त्याला असे जाहीर करावे लागले की, जे कोणी या पागोटयाला स्पर्श करतील ते सर्व त्याचे शिष्य.' त्याच्या पुढील मोहिमेसाठी त्याला पैशाची गरज होती तेव्हा त्याने आपल्या एकंदर प्रवासाच्या मार्गावर असलेल्या मोठमोठया शहरातील व्यापाराच्या नफ्यावर कर वसूल करण्यासाठी प्रतिनिधी नेमले. आपल्या धर्मबांधवावर आपले ऐहिक व पारलौकिक वर्चस्व आहे असे त्याने गृहित धरले आणि मोंगल बादशहाप्रमाणे फर्माने काढली १८२२ मध्ये मक्केची यात्रा केली. आणि त्यावेळी वहाबी पंथाची त्याच्यावर छाप पडली. या पंथाला मुस्लीम देशात यश मिळाल्यामुळे तर त्याला जास्तच हुरूप व विश्वास वाटू लागला. सहासात वर्षांच्या अल्पावधीतच त्याचा प्रभाव पेशावर ते बंगालमधील सुंदरबनापर्यंतच्या अतिशय विपूल लोकवस्तीच्या दोन हजार मैलांवरील टापूत सर्वत्र पसरला.

अशा प्रकारे भरपूर पैसा आणि मनुष्यबळ पाठिशी घेऊन सय्यद अहमद आता लढाईस सज्ज झाला होता. हिंदुस्तानात पुन्हा पाय रोवण्यासाठी अफगाणिस्तानच्या मदतीने उत्तर हिंदुस्तानातच चळवळ सुरू केली पाहिजे हे ओळखून त्याने पंजाबवर आपले लक्ष प्रथम केंद्रित केले. त्यावेळी तेथे रणजितसिंगाचा अंमल चालू होता. शीख लोक मुसलमानांना वाईट वागवतात अशी कल्पित कुरापत काढून त्याने जिहादसाठी कारण निर्माण केले. अगणित अनुयायांसह सय्यद अहमद सिंधमार्गे काबूलकडे निघाला तेव्हा कंदहारच्या वेशीवर कंदहारमधील सरदार लोक व जनतेने त्याचे प्रचंड उत्साहाने स्वागत केले. कंदाहार व काबूल या दोनही ठिकाणी त्याला फार जोराची साद मिळाली. आपखुशीने मिळालेल्या त्याच्या सैन्याची संख्या एकावेळी दहा लाखाच्याही वर गेली होती. अफगाणिस्तानच्या राजाने सय्यद अहमदशी संबंध असल्याचे जरी नाकारले होते तरी स्वतःच्या देशात पंजाबविरूद्ध लढण्यासाठी चाललेल्या तयारीबद्दल तो उदासीन होता, यावर विश्वास ठेवणे कठीण होते. हे धाडस फसले व सय्यद अहमद मारला गेला. पण त्याची चळवळ ब्रिटिश अंमल सुरू झाला तरी पंजाबमध्ये चालूच राहिली.

हिंदुस्तानातील ब्रिटिश टापूत वहाबी कार्याचे मध्यवर्ती केंद्र पाटणा हे होते.

तेथील संघटकांनी आपल्या भूमिगत हालचाली इतक्या सफाईने चालविल्या होत्या की, बऱ्याच काळपर्यंत चळवळीतील पाटण्याचे स्थान अधिकारी वर्गाला माहित नव्हते. पोलीसांनीसुद्धा बंडखोरांशी संगनमत केले होते. बंडखोर नेत्यांची ब्रिटिश अधिकाऱ्यांबद्दलची भीति केव्हाच नष्ट झाली होती. त्यांच्यापैकी एकाने ज्याने आपल्या घरात सातशे लोक जमा केले होते त्याने असा निश्चय जाहीर केला होता की, मॅजिस्ट्रेटच्या जबरदस्तीला आपण कसलीही भीक घालणार नाही, साऱ्या शक्तिनिशी आपण त्याचा प्रतिकार करू. १८५३ मध्ये बंडखोरांशी पत्रव्यवहार असल्याच्या संशयावरून ब्रिटिशांच्या नोकरीत असलेल्या अनेक शिपायांना दोषी ठरवण्यात आले. सरहद्दीवरील ब्रिटिश सैन्यातील हिंदी फलटणीबरोबर बंडखोरांनी १८५२ मध्ये संबंध प्रस्थापित केले होते. त्यांच्यामधील पत्रव्यवहार पंजाब अधिकाऱ्यांनी पकडला होता.

ब्रिटिश राज्याबद्दल अप्रिती निर्माण करण्याकरिता वहाबींनी सर्व जिल्ह्यातून एक कायमची संघटना उभारली होती. प्रत्येक जिल्हाकेंद्राचा पाटण्याच्या प्रचार केंद्राशी नियमित पत्रव्यवहार होता. पैसे उभे करण्यासाठी व नवीन सभासद मिळवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याची स्वतःची निराळी व्यवस्था होती. या नवीन सभासदांना कसलेल्या मिशनऱ्याप्रमाणे आदर्श नैतिकपद्धतीचे शिक्षण दिले जात असे. भारतीय मुसलमानांना जर नरकापासून आपले रक्षण करावयाचे असेल तर काफिराविरूद्ध युद्ध पुकारण्याचा म्हणजे जेहाद करण्याचा किंवा या शापीत भूमितून पळून जाण्याचा म्हणजे हिजरा करण्याचा एवढाच मार्ग मोकळा आहे असा जोराचा प्रचार अहोरात्र केला जात होता. खरा धर्मनिष्ठ आपल्या आत्म्याला नरकात ढकलल्याशिवाय काफीर सरकारशी एकनिष्ठ राहूच शकणार नाही असे त्यांना पुन्हा पुन्हा सांगण्यात येत होते. 'या पवित्र युद्धापासून किंवा जिहादपासून जे कोणी दुसऱ्यांना परावृत्त करतील ते मनातूना दांभिक आहेत हे सर्वांना कळू द्या. ज्या देशात मुसलमान धर्माव्यतिरिक्त दुसऱ्या धर्माची सत्ता आहे त्या देशात महंमदाच्या धार्मिक शिकवणी अमलात आणता येणे शक्य नाही म्हणून सर्व मुसलमानांनी एकत्र येऊन या काफिरांविरूद्ध युद्ध पुकारण्याची आवश्यकता आहे. जे कोणी या युद्धात भाग घेऊ शकत नसतील त्यांनी आपल्या पाक धर्मीय देशात जाऊन वसाहत करावी. आणि हे ज्यांना मान्य नसेल त्यांनी आपण इंद्रिय सुखाचे गुलाम असल्याचे जाहीर करावे. थोडक्यात म्हणजे भाई हो ! आपण आपल्या दुःस्थितीबद्दल शोक केला पाहिजे कारण आपण काफिरांच्या प्रदेशात रहात असल्यामुळे अल्लाच्या दूताचा आपल्यावर कोप झाला आहे.'

वहाबींनी भारताच्या सरहद्दीवर ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना अनेक खर्चिक लढायात गुंतवले. प्रांताप्रांतातही कटांचे जाळे पसरले होते. तिकडे सरहद्दीवर चालू असलेल्या प्रत्येक लढाईबरोबर इकडे प्रत्यक्ष युद्धात भाग न घेतलेल्या कटवाल्यांवर राज्य राज्यात खटले चालू होते. प्रत्येक खटल्यामुळे दुसऱ्या अनेकांना सूचना मिळून हे जाळे वाढत होते. १८६४ ते १८७१ च्या दरम्यान एकंदर पाच मोठे खटले झाले

त्याचा परिणाम म्हणून डझनावारी मुसलमानांना फाशी, जन्मठेप आणि तुरुंगवासाच्या मोठमोठ्या शिक्षा ठोठावल्या गेल्या. नंतर धोरण म्हणून प्रत्येक फाशीच्या शिक्षेचा बदल जन्मठेपीच्या शिक्षेत करण्यात आला. १८७१ च्या खटल्याच्यावेळी मुसलमानांचा ब्रिटिशांविरूद्ध असंतोष इतक्या कळसास पोचला की, बंगालचा मुख्य न्यायाधीश, जॉन पॅक्स्टन नॉर्मन याला एका मुसलमानाने कोर्टाच्या पायऱ्यावर भोसकून ठार केले. या न्यायाधिशाने काही वहाबी मुसलमानांना कठोर शिक्षा ठोठावल्या होत्या. याचवर्षी अंदमानात व्हाईसरॉय मेयो याचा शेरअल्ली नावाच्या एका वहाबी कैद्याकडून खून केला गेला.

मेयो, वहाबीच्या हल्ल्याला बळी पडला असला तरी त्याची चळवळ मोडून काढण्याचा एक धूर्त डाव त्याने आधीच रचला होता. पन्नास वर्षे मुसलमान बंडखोरांनी ब्रिटिश सत्तेखाली असलेल्या भारताला दारूल-हर्ब (काफीरांच्या ताब्यातील प्रदेश) पासून दारूल-इस्लाम- (मुसलमानांनी काबिज केलेला प्रदेश) करण्याचा प्रयत्न केला होता. त्यात ते अयशस्वी झाले होते तरी त्यांच्या वृत्ती निमाल्या नव्हत्या की त्यांचे अनुयायी नाउमेद झाले नव्हते. सरहद्दीवर ब्रिटिश सैन्याला जोरदार विजय, मिळाला पण तो विजय बहुसंख्य मुसलमानांची निष्ठाही मिळवू शकला नाही किंवा त्यांचा असंतोषही नाहीसा करू शकला नाही, असे आढळून आले. मुस्लिम धर्म पंडितांनी हिंदुस्तान हा दारुल-हर्ब आहे असे जाहीर करण्याचे चालू ठेवले तर काफिरांविरूद्ध बंडखोरांना मदत करणे हे मुसलमान आपले धार्मिक कर्तव्य मानीत राहणार होते. मेयोने असा कयास बांधला की, धर्म पंडितांच्या एका गटाने ब्रिटिश प्रदेश हा दारुल-हर्ब असल्याचे जाहीर केले होते. तेव्हा त्याला दारुल-इस्लाम म्हणणारा त्यांचा दुसरा गट मिळवणे जर शक्य झाले तर या धर्मप्रदेशाविरूद्ध जेहाद करणे—युद्ध पुकारणे—हे पाप होईल असे मुसलमानांना वाटेल. त्यानुसार भारत हा दारुल-हर्ब आहे की, दारुल-इस्लाम आहे याबद्दल सर्व देशभर चर्चा सुरू केली गेली. सहाजिकच हिंदुस्तान हा दारुल-हर्ब आहे असे उघडपणे सुचवण्यास कोणीही पुढे येण्यास धजेना कारण अशी सूचना करणारा स्वतःच तुरुंगात पडला असता किंवा अधिकाऱ्यांच्या दृष्टीने संशयीत ठरला असता. त्यामुळे ही चर्चा एकांगी झाली. इस्लामचे कर्मठ व निमकर्मठ शास्त्रज्ञ त्याचा नवीन अर्थ लावण्यास पुढे सरसावले आणि वहाबींनी लावलेला अर्थ चुकीचा आणि गैरसमज पसरवणारा आहे असे जोरजोराने प्रतिपादू लागले. मक्केच्या काही मुफ्तींकडून मते मागवण्यात आली. आणि त्यांनी असे सांगितले की, 'जोपर्यंत देशात इस्लाम धर्माचे काही विशिष्ट नियम आचरणात आणले जात आहेत तोपर्यंत तो देश दारुल-इस्लाम आहे.' भागलपूर विभागाच्या कमिशनरचा वैयक्तिक मदतनीस उत्तर हिंदुस्तानातील मुसलमान कायदे-शास्त्रज्ञांना भेटला तेव्हा ते म्हणाले, 'येथल्या मुसलमानांना ख्रिश्चन लोकांचे संरक्षण आहे, आणि ज्या देशात संरक्षण दिले जाते तेथे जेहाद असणारच नाही.' १८६३ च्या

सुमारास अब्दुल लतीफ यांनी कलकत्त्यात स्थापन केलेली महॉमेडन लिटररी सोसायटी वहाबी चळवळीला विरोध करीत होती. ती ब्रिटिशांच्या बाजूची संस्था असल्यामुळे तिने स्वतःला अनुकूल असलेल्या अर्थाला पाठिंबा दिला. सर सय्यद अहमदखानांनीही चर्चेत भाग घेतला. आणि १४ एप्रिल १८७१ च्या 'पायोनियर' मध्ये लिहिलेल्या पत्रात असे म्हटले आहे की, 'इस्लाम धर्माच्या पूजा स्वातंत्र्यात जे सरकार कुठल्याही प्रकारची ढवळाढवळ करीत नाही त्याच्याविरुद्ध बंड करण्यास मुसलमानांना बंदी आहे. मग ते दारुल-हर्ब मध्ये रहात असोत की, दारुल-इस्लाम मध्ये रहात असोत.'

मेयोने आपले धोरण अंमलात आणण्यापूर्वीच सर सय्यदसारखे, ब्रिटिशांशी एकनिष्ठ असलेले लोक मुसलमानांना वहाबी प्रभावापासून दूर करण्याचा सतत प्रयत्न करीत होते. १८५७ च्या बंडांच्यावेळी, इस्लामच्या धर्मपंडितांनी दिलेल्या दोषाला न जुमानता ज्या मुसलमानांनी फार मोठा वैयक्तिक धोका पत्करुन ब्रिटिशांना मोलाची मदत केली त्यापैकी सर सय्यद हे एक होते. त्यांनी सबंध वहावी चळवळीच्या काळात सरकारला पाठिंबा देण्याचे चालू ठेवले होते. उत्तरेकडील वहाबी विरोधी लढाया चालू असतानाच अनेक मुसलमान खुषीने ब्रिटिश सैन्यात दाखल झाले होते एवढेच नव्हे तर त्यांनी सैन्याबरोबर काबूल कंदहारपर्यंत कूच केले होते. आणि ते अफगाणिस्तान व हिंदुस्तान यांच्या विवाद्य सरहद्दीवर असलेल्या रानटी जमातींविरुद्ध ब्रिटिशांच्या बाजूने लढले होते. १८५७ च्या बंडात कंपनी सरकारच्या सैन्यात हिंदूप्रमाणे मुसलमानही बरेच होते आणि जासूसही बरेच होते. पण ब्रिटिश पत्रकार आणि अधिकारी मुसलमानावरच बिथरले आणि त्यांनी बंडाबद्दल मुसलमानांनाच मुख्यतः जबाबदार धरले. कारण त्यांना असे वाटत होते की, जर हे बंड यशस्वी झाले तर मराठे किंवा शीख यांच्यापेक्षा मुसलमानांचीच सत्ता परत स्थापन होईल. बंडाचा बिमोड झाल्यानंतर ब्रिटिश सरकारच्या सामोपचाराच्या धोरणाने आणि हिंदी लोक 'खुषीने आणि निःपक्षपातीपणाने सरकारी नोकऱ्यात घेतले जातील' या व्हिक्टोरिया राणीच्या जाहिरनाम्याने, तिच्या हिंदुस्तानातील सरकारच्या वृत्तीत बदल झाला असेल पण वहाबींच्या चळवळीची पुन्हा सुरुवात झाल्यामुळे, मुसलमानांकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन उलट जास्तच कठोर बनला. ह्या तर्काला सबळ पुरावा म्हणून बंगालमध्ये ज्या ठिकाणी वहाबींनी आपला पाया बळकट रोवला होता तेथील मुसलमानां-विरुद्ध तीव्र पक्षपात केला गेला हे उदाहरण दाखवता येईल. हल्ली ज्याला उत्तर प्रदेश म्हणतात ती बंडाची मुख्य समरभूमी होती. तेथे वहावी वाढू शकले नव्हते. त्यामुळे या प्रदेशात मुसलमानांना सरकारी नोकऱ्या मिळाल्या पण ईशान्येकडील प्रांतात बहुतेक प्रत्येक मुसलमान हा संशयीत किंवा बंडखोर ठरला.

वहाबींच्या बढायांकडे कौतुकाने किंवा तटस्थतेने पहाणाऱ्या बंगालच्या उमरावांना या दीर्घकाळ चाललेल्या चळवळीने आपला पूर्ण घात केला आहे याची आता जाणीव होऊ लागली होती. त्यांनी परकीय राज्यकर्त्यांचा विश्वास पूर्णपणे गमावला होती

परिस्थितीच्या या उलटया क्रमाने ते भांबावून गेले. प्रत्येक सरकारी खात्यातील सरकारी नोकऱ्यांची मक्तेदारी हिंदूंकडे गेली. बंगाल व संयुक्त प्रांत यात खूप अंतर होते त्यामुळे संयुक्त प्रांतात, राजघराण्यातील पर्शियन व उर्दू जाणणाऱ्या मुसलमान गृहस्थांच्या नेमणूका इंग्रजी ज्ञानाची सक्ती न करताच न्यायालयीन अधिकारी म्हणून करण्यात आल्या होत्या हे बंगाली मुसलमानांना कळले नाही मुख्यतः राज्यकारभाराची भाषा पर्शियन न राहिल्यामुळे आणि मुसलमान समाजाने ब्रिटिशांचे शत्रुत्व ओढवून घेतल्यामुळे बंगालमध्ये त्यांच्याबाबतीत पक्षपात केला गेला, त्यामुळे त्यांच्या दुखावलेल्या भावनांचा आणि तक्रारींचा उगम झाला आणि मुसलमानी मालकीच्या वर्तमानपत्रांनी त्यांना वाचा फोडली.

कलकत्त्याच्या दुर्बिन (१४ जुलै १८६९) या पर्शियन पत्राने मुसलमानांच्या भावना पुढील शब्दात व्यक्त केल्या 'लहान मोठ्या सर्व प्रकारच्या नोकऱ्या मुसलमानांकडून हळूहळू हिसकावून घेतल्या जात आहेत आणि त्या इतर जमातींना, विशेषतः हिंदूंना दिल्या जात आहेत. सरकारने आपल्या प्रजेच्या सर्व वर्गांकडे समानतेने पाहिले पाहिजे पण आता अशी वेळ आली आहे की, ते जाहीरपणे आपल्या गॅझेटमध्ये, मुसलमानांना हुद्याच्या जागांपासून वगळत आहेत. अलिकडेच जेव्हा सुंदरबनच्या कमिशनरच्या कचेरीत अनेक जागा रिकाम्या झाल्या होत्या तेव्हा या जागा हिंदू व्यतिरिक्त कोणालाच देण्यात येणार नाहीत अशी सरकारी गॅझेटमध्ये जाहिरात केली होती. थोडक्यात म्हणजे मुसलमान आता राज्यकर्त्यांच्या मनातून इतके उतरले आहेत की, जरी ते सरकारी नोकऱ्यांना लायक असले तरी सरकारी जाहिरनाम्यातून त्यांना अगदी वेचून दूर ठेवले जात आहे. त्यांच्या असहाय्य परिस्थितीकडे काडीमात्र लक्ष दिले जात नाही. एवढेच नव्हे तर वरिष्ठ सत्ताधारी त्यांच्या नुसत्या अस्तित्वाची दखल घेण्यासही राजी नाहीत.

काही दशकांच्या काळातच सर्व राज्य सरकारातून मुसलमान अधिकारी कसे वगळले गेले. याच्या आठवणी जुने आणि जाणिते मुसलमान सांगू लागले. १८३८ पर्यंत सरकारी नोकरीत असलेल्या मुसलमानांचे प्रमाण, हिंदू आणि इंग्रज मिळून असलेल्या सात जागांबरोबर मुसलमानांच्या सहा जागा असे, म्हणजे जवळ जवळ हिंदू व इंग्रज या दोघांच्या जागांच्या बरोबरीने होते. अगदी १८५१ पर्यंत, म्हणजे इंग्रजी ही राज्यभाषा झाल्यानंतरही मुसलमानांनी मोठ्या खंबीरपणे आपले स्थान कायम ठेवले आणि वकिलीच्या क्षेत्रात हिंदू व इंग्रज यांच्या संयुक्त संख्येची बरोबरी केली. याचे कारण म्हणजे त्यावेळी इंग्लीश किंवा पर्शियन जाणणारे पुरेसे हिंदू व इंग्रजी वकील मिळत नव्हते. पण १८५१ पासून जमाना बदलला. १८५२ ते १८६८ पर्यंत घेतलेल्या २४० हिंदी लोकांपैकी २३९ हिंदू होते व फक्त एकच मुसलमान होता. सरकारी कचेऱ्यात तर मुसलमान क्वचितच आढळत होता.

पाश्चात्य शिक्षणपद्धतीबद्दलच्या तिटकाऱ्यामुळे मुसलमान इतर नवीन व्यवसायांपासून

अलिप्त राहिले. इंग्रजी वैद्यकशास्त्राचा त्यांनी तिरस्कार केला आणि स्वतः महाविद्यालयात जाऊन त्या शास्त्राचे शिक्षण घेण्याचीहि तयारी दर्शविली नाही. मुसलमानांच्या या 'शोचनीय अवस्थे'कडे विशेषेकरून ज्यावर्षी लोकांचे लक्ष वेधले त्या १८६९ साली वैद्यकीय प्रमाणपत्रे धारण करणाऱ्या १०४ डॉक्टरात ९८ हिंदू, ५ इंग्रज आणि फक्त एकच मुसलमान होता. कलकत्ता विद्यापीठातून पदवी परीक्षा पास झालेल्या ४ डॉक्टरात ३ हिंदू व १ इंग्लिश होता. मुसलमान विरोधी पक्षपात दूर करण्याचे धोरण मेयोने स्वीकारले तरीही पुढे पुष्कळ वर्षे ते शिक्षणाच्या सर्व शाखात हिंदूंच्या मागे पडले. आणि त्यामुळे सरकारी नोकऱ्या मिळवण्यातही मागे राहिले. वहाबी चळवळीचा बिमोड झाल्यानंतर आणि जरी, ब्रिटिश शिक्षण मान्य असलेल्या मुसलमान पुढाऱ्यांनी, आपल्या धर्मबांधवानी इंग्रजी व युरोपीय कला आणि शास्त्राचे शिक्षण घ्यावे असा सतत धोषा चालू ठेवला होता तरी, मुसलमानी मनावर कर्मठ मुल्लांचा जबरदस्त प्रभाव पडतच राहिला; इस्लामी कायदा व काझी न्याय पद्धती विरूद्ध ब्रिटिश न्यायशास्त्र; पूर्वापार मान्यता पावलेले मुसलमानी वैद्यकशास्त्राचे तबीब, हकीम आणि जराह विरूद्ध इंग्रजी वैद्यकशास्त्र; पाठ्यपुस्तकातून केलेले कुराणाचे उच्चाटन आणि ईश्वर सत्तेविरूद्ध धर्मातीतपणावर दिलेला भर; पर्शियन ऐवजी इंग्रजी भाषेचा स्वीकार; मुसलमान पंडितांनी कमी लेखलेले पाश्चात्य पद्धतीचे कला व शास्त्राचे शिक्षण; या सर्वांनी शतकानुशतके चालत आलेल्या इस्लामी परंपरेला दुखावले होते. याबाबतीत हिंदू मुसलमानापेक्षा उघड उघड निराळे होते. मुसलमानी सत्तेच्या ६०० वर्षांच्या काळात त्यांनी मोठ्या विलक्षणपणे त्यांच्याशी जुळवून घेतले होते. या काळात ते मुसलमानांच्या बरोबरीने पर्शियन आणि उर्दू शिकले एवढेच फक्त नव्हे तर त्यांनी या भाषातले मोठे पंडित व कवी निर्माण केले. मुसलमानी सत्तेच्या या काळात, त्यांना जमीन महसुलाच्या दुय्यम दर्जाच्या जागा व कारकुनी पेशाच्या नोकऱ्या मिळू शकत असल्यामुळे ते राज्यकारभाराची अधिकृत भाषा शिकत असत. यात आपण आपल्या धर्माचा अपमान करीत आहोत असा विचारसुद्धा त्यांच्या मनाला शिवत नसे. हिंदू पुरोहितांनी हिंदूंना पर्शियन शाळेत जाण्यास किंवा मुसलमान राज्यकर्त्यांची नोकरी करण्यास कधी मनाई केली नव्हती, पण मुसलमानांची गोष्ट निराळी होती. पर्शियात काय किंवा हिंदुस्तानात आक्रमक म्हणून आलेले राज्यकर्ते किंवा राज्यकारभार हाकणारे म्हणून काय, त्यांना आपल्या पारंपारिक जीवनाला मुकावे लागेल अशा प्रसंगाला कधीच तोंड द्यावे लागले नव्हते. आणि म्हणून, जेव्हा असा प्रसंग निर्माण झाला तेव्हा मौलवींच्या प्रभावामुळे ते त्याला तोंड देण्यास असमर्थ ठरले.

या अर्ध शतकात इतिहासाला असे वळण लागले की, मुसलमान हिंदुंचे द्वेष्टे बनले व हिंदू मुसलमानांकडे दुजाभावाने पाहू लागले. या ठिकाणी हे लक्षात घेतले पाहिजे की, हा द्वेष किंवा दुजाभाव सर्व हिंदू किंवा मुसलमान जनतेत पसरला

नव्हता, तर दोनही जमातींच्या ज्या वर्गाचे जीवित सरकारी नोकऱ्या आणि सरकारी मेहेरनजर यावर अवलंबून होते त्या अमीर उमराव व मध्यम वर्गापुरताच फक्त मर्यादित होता. तरीसुद्धा सहाजिकच या अल्पमताने देशाच्या सर्व राजकारणावर आपला प्रभाव पाडला आणि त्याला विशिष्ट वळण दिले. आणि मग मुसलमानी राजकारणाची सुरवात, हिंदी राजकारणाप्रमाणे (प्रत्यक्ष परिणामी हिंदू राजकारण) पुढील मोक्याच्या प्रश्नाने झाली. नोकऱ्यात मुसलमानांचे प्रमाण काय राहणार? नोकरीतील मुसलमानांचा वाटा त्यांना मिळेल असा दिवस कधी उगवेल काय? अशा परिस्थितीत मुस्लीम पुढाऱ्यांनी आपल्या धर्मबांधवांना एकच समर्पक प्रश्न विचारला. सार्वजनिक जीवनात तुम्हाला तात्कालिक हिताचे काय वाटते? शिक्षण की राजकारण?

---

## प्रकरण चौथे

# भाषिक भेद

१८७०–८० च्या काळात हिंदू मुसलमानांच्या उच्च आणि मध्यम वर्गामध्ये सरकारी नोकऱ्यांवरून द्वेष व मत्सर बळावत असतानाच, उत्तर हिंदुस्तानामध्ये सुरू झालेल्या वादाने दुसऱ्या एका मतभेदास चालना मिळाली. तो वाद म्हणजे न्यायालयाची भाषा हिंदी असावी की, उर्दू असावी. बंगालमध्ये या वादविवादाने निराळेच स्वरूप धारण केले. मुसलमान पुढाऱ्यांनी अशी मागणी केली की, मुसलमान विद्यार्थ्यांना बंगाली भाषा योग्य तऱ्हेने यावी यासाठी त्यात संस्कृतपेक्षा पर्शियन शब्दांचे मिश्रण केले जावे. हे वाद नीट समजण्यासाठी, त्यावेळी हिंदुस्तानात प्रचलित असलेल्या देशी शिक्षणपद्धतीची ओळख करून घेणे आवश्यक आहे. आणि तिची जागा ब्रिटिश शिक्षणपद्धती कशी घेत होती हेही समजून घेतले पाहिजे.

देशातील अनेक ठिकाणी हिंदूंच्या देशी शाळा मुसलमानांच्या शाळांपेक्षा निराळ्या होत्या. हिंदूच्या शाळा त्यांच्या देवळांशी संलग्न होत्या तर मुसलमानांच्या त्यांच्या मशिदीशी संलग्न होत्या. त्या काळात शाळेचे वर्ग नियमितपणे भरत नसत. प्रत्येक मुलगा शिक्षकांकडून आपले पाठ स्वतंत्रपणे घेत असे. विद्यार्थी शिक्षकांच्या किंवा शिक्षकांना सोयीच्या घरी जमत असत. अनेकवेळा मुलांना शिकवण्यासाठी त्या त्या परिसरातील देवळे किंवा मशिदींची आवारे उपयोगात आणली जात असत. हिंदू शाळेतील अभ्यासक्रमात रामायण आणि भगवद्गीता या धार्मिक ग्रंथांचा समावेश असे तर मुसलमान शाळेत कुराण हा विषय सक्तीचा होता. संस्कृत किंवा हिंदी हे हिंदू शाळेत शिक्षणाचे माध्यम होते. तर पर्शियन, अरेबिक किंवा उर्दू हे माध्यम मुसलमान शाळेत होते. दोनही धर्मांच्या निधर्मी शाळा होत्या पण मुस्लिम निधर्मी शाळांतून कुराणाला संपूर्णपणे वगळण्याचा विचारसुद्धा अशक्य होता. फरक फक्त कुराणावर कमी अधिक भर देण्यापुरताच होता. या शाळांनी धार्मिक शिक्षणापेक्षा इतर विषयांच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष पुरवले होते. अरेबिक शाळा फक्त शहरातच अस्तित्वात असायच्या आणि त्यातील बहुतेक शिक्षक हे अरेबिक भाषेच्या त्यांच्या ज्ञानाबद्दल प्रसिद्ध असलेले मौलवी होते. कुराणाच्या शाळा या बहुतेक हाफीजांनी (कुराण तोंडपाठ म्हणणारे) चालवलेल्या होत्या आणि ते कुराण बिनचूक. वाचू व म्हणू शकत होते. संस्कृत शाळा मान्यवर संस्कृत पंडित चालवत होते. हिंदी शाळा समाधानकारक नव्हत्या; त्यांना हिंदीचे व गणिताचे तुटपुंजे ज्ञान

असलेल्या शिक्षकांवर समाधान मानून घ्यावे लागले.

या शाळांबद्दल सहज लक्षात येण्यासारखी गोष्ट म्हणजे अरेबिक, पर्शियन आणि उर्दू शाळेत अनेक हिंदू विद्यार्थी आढळून येत असत, पण संस्कृत आणि हिंदी शाळात जवळजवळ मुळीच मुसलमान विद्यार्थी नसत. याचे कारण उघडच होते. पर्शियन भाषा अनेक शतके राज्यभाषा होती. आणि सबंध उत्तर हिंदुस्तानात तिची जागा, न्यायदानाची भाषा म्हणून उर्दूने घेतली होती. रत्नाने जसे आंगठीचे सौंदर्य खुलावे त्याप्रमाणे अरेबिक भाषेने या दोन भाषांना समृद्ध केले होते. कालांतराने हिंदू जरी पर्शियन आणि उर्दू काव्य आस्वादू आणि लिहू लागले होते तरी मुसलमान संस्कृत व हिंदी वाङमयाकडे क्वचित्‌च आकर्षित झाले. काही मुसलमानांनी उत्कृष्ट संस्कृत आणि हिंदी काव्य लिहिले पण त्यांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकी थोडी होती. उलट शेकडो हिंदू कवी उर्दूमध्ये लिहीत होते [1]

आधुनिक इंग्रजी शिक्षणाच्या शाळा अस्तित्वात आल्यावरसुद्धा १९ व्या शतकाच्या प्रथमार्धात, शिक्षणाची देशीपद्धती सर्रास सर्वत्र चालू होती. ह्या नवीन शिक्षणाच्या शाळा फार थोड्या होत्या त्यामुळे बहुतेक मुलांनी जुन्या पद्धतीचे शिक्षण चालू ठेवले होते. लोकांच्या नाजूक धर्मभावनांबद्दल ब्रिटिश राज्यकर्ते जाणीवपूर्वक दक्ष असल्यामुळे त्यांनी या देशी शाळात ढवळाढवळ केली नाही, पण त्यांच्या जोडीला आपल्या स्वतःच्या नवीन सरकारी शाळा उघडल्या. ९ फेब्रुवारी १८५० चा ठराव अंमलात आणण्यासाठी सरकारी ग्रामीण शाळा तहसील केंद्रांच्या ठिकाणी उघडल्या. त्यांचा उद्देश 'जमिनदार व शेतकरी यांना लिहिण्या-वाचण्यास शिकवून, पटवारी आपल्या वह्यात ज्या पद्धतीनुसार त्यांचे हक्क, त्यांचे पगार आणि थकबाकी यांची नोंद करून ठेवीत होते ती त्यांना समजावी व पटवारीच्या लबाडीपासून स्वतःचे रक्षण करण्यास ते समर्थ व्हावे' हा होता. सहाजिकच या शाळांनी हिंदू व मुसलमान विद्यार्थ्यांना एकत्र येण्याची संधी दिली. या शाळांच्या अभ्यासक्रमांत हिंदी, उर्दू, जमाखर्च, हिंदीपद्धतीप्रमाणे जमिनीचे मापन, भूगोल, इतिहास, भूमिती आणि इतर विषय यांचा समावेश होता. त्यांनी इंग्रजी ठेवले नव्हते. फक्त शहरातील शाळेत इंग्रजी शिकवले जात असे.

सरकारने चालवलेल्या या शाळांमध्ये मुसलमान विद्यार्थ्यांनी मोकळेपणाने प्रवेश केला. आणि त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ते हिंदूंच्या मागे पडले नाहीत; कधी कधी त्यांच्या संख्येचे प्रमाण हिंदूंपेक्षा अधिक होते. त्यावेळच्या वायव्य प्रांताच्या (सध्याचा उत्तर प्रदेश) १८८०–८१ च्या शैक्षणिक तक्त्याप्रमाणे महाविद्यालयात ७६९ हिंदू व ११२ मुसलमान होते; 'अॅग्लोवनीक्युलर' माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांचे आकडे अनुक्रमे १, ७०, ४७८ आणि ३२, ६१९ असे होते.

१. १८८२ च्या एज्युकेशन कमिशनपुढे प्रमुख हिंदू मुसलमानांनी सादर केलेल्या पुराव्यावर वरील परिच्छेद आधारलेले आहेत.

तरीसुद्धा बहुतेक मुसलमान जमिनदार आणि अमीर उमराव आपल्या मुलांनी शिक्षण संस्थेत सर्वसामान्य लोकांच्या मुलांशी मिसळणे कमीपणाचे मानत असल्यामुळे सामान्यतः मुसलमान लोक इंग्रजी शिक्षणाचा फायदा घेत नाहीत असा दृढ समज उत्तर हिंदुस्तानातील प्रमुख मुसलमानांमध्येही होता. हिंदू जमिनदारांनीही त्याच मनोवृत्तीचे प्रदर्शन केल्यामुळे त्यांच्या मुलांनाही आधुनिक शिक्षणाला मुकावे लागले पण शहरातल्या श्रीमंत हिंदूंनी मात्र अमीर उमरावांच्या या बहिष्कारात भाग घेतला नव्हता.

तेव्हा, सर सय्यद अहमदखान यांच्या, आठव्या दशकाच्या सुरुवातीच्या, मन वळवण्याच्या प्रयत्नामुळे मुस्लीम जनता इंग्रजी शिक्षणाकडे वळली हे विधान बरोबर नाही. १८४३ मध्ये वायव्य प्रांतात म्हणजे सध्याच्या उत्तर प्रदेशात ३ महाविद्यालये व ९ अँग्लोव्हर्नाक्युलर शाळा होत्या व त्यात जवळजवळ २००० विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यापैकी १,५९८ हिंदू व ३८५ मुसलमान होते, व उरलेले युरोपीय किंवा युरेशीय होते.[3] हिंदूंबरोबर निधर्मी शिक्षण घेण्याचा मुस्लिम जनतेला तिटकाराही नव्हता. सरकारी शाळेत ते मोकळेपणाने मिसळले आणि हिंदू धर्मार्थ संस्थांनी काढलेल्या शाळेतही गेले. फार पूर्वी, १८१८ मध्ये जयनारायण घोषाल नावाच्या एका भूतदयावादी हिंदूने बनारस येथे एक धर्मार्थ शाळा सुरू केली होती. त्यात इंग्रजी, पर्शियन, हिंदी व बंगाली शिकवले जात असे. या शाळेत मुसलमान निःसंकोच आले.[3] कालांतराने धार्मिक शाळा मागे पडल्या आणि निधर्मी शाळा मुसलमान व हिंदू या दोघांतही अधिक लोकप्रिय झाल्या.

आश्चर्य असे की, मुसलमान उमराव या घडामोडीबद्दल अज्ञानी राहिले. आणि अनेक मुसलमानांनी १८८२ च्या एज्युकेशन कमिशनपुढे दिलेल्या साक्षिपुराव्यात मोठ्या खेदाने असे प्रतिपादिले की, हिंदू बांधवांच्या तुलनेने मुसलमान शिक्षणात मागासलेले आणि शाळा कॉलेजात त्यांच्यापेक्षा कमी संख्येने होते. कमिशनच्या एका सभासदाने जेव्हा त्यांना असे सांगितले की, '१८८१ च्या खानेसुमारीच्या तक्त्याप्रमाणे, एकंदर लोकसंख्येच्या दृष्टीने शिक्षण घेणाऱ्या मुलांच्या प्रमाणात हिंदूपेक्षा मुसलमान विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक आहे.' तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले.[४] रेव्ह. बी. एच. बॅडले यांच्या साक्षीनें नेमकी ही गोष्ट अधिक स्पष्ट झाली. ते म्हणाले की, वायव्य प्रांतात एकंदर लोकसंख्येच्या फक्त दहा टक्केच मुसलमान होते तरी शाळा कॉलेजामध्ये त्यांचे प्रमाण एक चतुर्थांश होते.[५]

---

२. एज्युकेशन कमिशनचा वृत्तांत, १८८२ (वायव्य प्रांत) पृष्ठ ८.

३. कित्ता. पृष्ठ ७.

४. एज्युकेशन कमिशन वृत्तांत परिशिष्ट (वायव्य प्रांत प्रांतिक कमिटी १८८४). सय्यद अलीहमद डेप्युटी कलेक्टर, बरेली, यांनी सादर केलेला पुरावा.

५. एज्युकेशन कमिशनचा वृत्तांत, १८८२ (वायव्य प्रांत), पृष्ठ १५१.

कित्येक दशके, मुसलमान उमरावांची नवीन शिक्षणपद्धतीबद्दलची प्रतिकूलत म्हणजे सर्व मुस्लिम जमातीची प्रतिकूलता असे समजले जात होते. त्यात काही बनाव नव्हता. मुस्लिम पुढाऱ्यांचे फक्त मुस्लिम अमीर वर्गाशीच जवळचे संबंध होते. आणि उनाडपणे इकडे तिकडे हिंडणारी त्यांची तरूण मुले पाहून त्यांच्य विचारांना चालना मिळाली. उपेक्षेची कारणे शोधली जाऊ लागली. मुस्लिम प्रतिकूलतेची कारणमीमांसा, सर सय्यद अहमदखान यांनी अशी केली की, 'बगदादच्या खलिफाच्या कारकिर्दीत, जेव्हा ग्रीक तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान, खगोलशास्त्र आणि भूगोल ही शास्त्रे अरेबिकमध्ये अनुवादीत केली गेली तेव्हा सर्व मुसलमान जगाने ती निःसंकोचपणे मान्य केली. आणि हळूहळू कमी अधिक फेरफार होऊन ती मुस्लिम धर्मग्रंथात शिरली. त्यामुळे कालांतराने ही शास्त्रे त्यांच्या खुद्द धर्माशी संलग्न बनली, आणि त्यांना धर्माच्या पवित्र परंपरेइतके महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले.'[६] तसेच सर सय्यद यांच्यामते पाश्चात्य शिक्षण तत्वतः या ग्रीक शाच्याहून भिन्न अशा आधुनिक संशोधनांच्या परिणामावर आधारलेले असल्यामुळे मुसलमानांची अशी खात्री होती की, इंग्रजी भाषेत शिकवले जाणारे तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र हे विषय इस्लामी तत्वांशी विरोधी आहेत, याशिवाय भूगोल व खगोलशास्त्र ही आधुनिक शास्त्रे मुसलमान धर्माशी पूर्णपणे विसंगत आहेत असा सर्वत्र समज होता, आणि आजही बऱ्याच जणांचा हा समज कायम आहे. वाङमयाबद्दल बोलायचे झाले तर हे कबूल करावे लागेल की, ज्या राष्ट्रात ते निर्माण होते त्या राष्ट्राच्या धर्माशी ते कमी अधिक प्रमाणात निगडित असते. आणि यानुसार, ज्ञानाच्या या शाखेकडेसुद्धा मुसलमानांनी साहजिकच प्रतिकूल दृष्टीने पाहिले. त्यांचा हा विरोध खरोखर इतक्या कोटीला पोहचला की, मुसलमानांनी इंग्रजीचा अभ्यास करणे म्हणजे जवळ जवळ ख्रिश्चन धर्मच स्वीकारणे होय असे ते मानू लागले. याचा परिणाम असा झाला की, सरकारी शिक्षण संस्थांपासून मिळणाऱ्या फायद्यांपासून बहुतेक मुसलमान अलिप्त राहिले.'[७]

१८७१ मध्ये हिंदुस्तान सरकारने एक ठराव करून स्थानिक सरकारचे लक्ष या प्रश्नाकडे वेधले आणि 'मुसलमान जमातीच्या' शिक्षणाची 'व्यवहार्य वाटचाल' सुरू झाली. हिंदुस्तान सरकारचे कलकत्ता हे मुख्य ठाणे होते आणि तेथील मुसलमान शिक्षणात खरोखरच मागासलेले होते. बंगालच्या मुसलमानांवर वहाबीचा पगडा बरेच वर्षे होता. त्यांच्या भावनांचे समाधान करणे हे हिंदुस्तान सरकारच्या ठरावाचे धोरण होते. बंगालच्या निराश मुसलमान जमातीला हिंदूंची बरोबरी करण्यासाठी मदतीची फार मोठी गरज होती, आणि या ठरावात व्यक्त झालेली जाणीव अगदी योग्यवेळी आली. १८८०–८१ मध्ये इंग्रजी उच्च शिक्षणाच्या शाळात ३६,६८६

६. कित्ता, पृष्ठ २९२. (सर सय्यद अहमदखान यांनी सादर केलेला पुरावा).

७. कित्ता, पृष्ठ २९२.

हिंदूबरोबर फक्त ३६३ मुसलमान विद्यार्थी होते; इंग्रजी माध्यमिक शिक्षणाच्या शाळांत हा आकडा अनुक्रमे २९,४६९ आणि ४,३४६ असा होता.[८] हे आकडे सहाजिकच मुसलमानांना धक्का देणारे होते. कारण बंगालमध्ये ते हिंदूपेक्षा संख्येने अधिक होते.

परंतु सरकारी ठरावाचे स्वागत उत्तरप्रदेशात जास्त जिव्हाळयाने झाले. सर सय्यदसारख्या पुढाऱ्यांनी आपले तन मन मुसलमान शिक्षणाच्या कामाला वाहिले सर सय्यद आपल्या धर्मबांधवाची मने अनेक वर्षे इंग्रजी शिक्षण घेण्याकडे वळवीत होते. आणि १८७१ मध्ये इंग्रजी शिक्षणाबद्दल मुसलमानांचा विरोध का याची कारणे शोधण्यासाठी आणि ही त्यांची वृत्ती बदलेल असे मार्ग सुचवण्यासाठी त्यांनी एक कमिटी नेमली व या कार्याचे विधायक पाऊल टाकले. कमिटीचा अहवाल त्यांनी आपल्या मनात रंगवलेल्या चित्रांशी मिळता जुळताच होता.

त्यांनी आपल्या भोंवती वजनदार मुस्लिम मंडळी जमविली आणि १८७५ मध्ये अलिगड येथे मुसलमान मुलांसाठी एक उच्च शिक्षणाची शाळा उघडली. तीन वर्षातच या शाळेचे द्वितीय श्रेणीच्या महाविद्यालयात रुपांतर झाले. खुद्द सर सय्यद यांच्या म्हणण्याप्रमाणे, हे महाविद्यालय फक्त मुसलमानांपुरतेच मर्यादित रहावे असा त्यांच्या काही सहाय्यकांचा मूळ उद्देश होता. परंतु 'हिंदू सरदार दरक्दारांनी याबद्दल इतकी सदिच्छा, सहानुभूती व उदारता दाखविली' की, या महाविद्यालयात हिंदूंनासुद्धा प्रवेश दिला गेला.[९] या अलिगड महाविद्यालयातील व इतर महाविद्यालयातील शिक्षणक्रमात फक्त एकच फरक होता. यात इस्लाम धर्माचे शिक्षण दिले जात होते, आणि शिया व सुन्नी पंथीय मुस्लिम विद्यार्थ्यांना प्रार्थना करण्यासाठी वेगवेगळया मशिदीत जाण्यासाठी उत्तेजन दिले जात होते. सर सय्यद यांच्या या प्रयत्नांना भरघोस यश लाभले आणि अनेक प्रांतांच्या दूरदूरच्या भागातून मुसलमान उमरावांची मुले अलिगड महाविद्यालयात प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न करू लागली. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी चालविलेल्या शिक्षण संस्थांव्यतिरिक्त कुठल्याही महाविद्यालयाने इतर विषयांच्या अभ्यासक्रमाबरोबर सक्तीचे धार्मिक शिक्षण ठेवले नव्हते. अलिगड महाविद्यालयाने या दोनही गोष्टींची सांगड घातल्यामुळे इंग्रजी शिक्षणाबद्दलचा मुसलमानांचा विरोध बराचसा थंडावला. (येथे मुसलमान म्हणजे मुसलमान अमीर उमराव).

परंतु, जरी मुसलमान उमराव शिक्षणापासून दूर राहिले होते तरी, जर सामान्य मुसलमान जनता शिक्षणात हिंदूंपेक्षा पुढे होती तर कला व शास्त्राचे मुसलमान पदवीधर हिंदू पदवीधरांपेक्षा डोळयात भरण्याइतके कमी का? १८७८ मध्ये सर

८. एज्युकेशन कमिशन, १८८२ (बंगाल प्रांतिक कमिटीचा रिपोर्ट), पृष्ठे १०६–१०७.

९. एज्युकेशन कमिशनच्या अहवालात उद्धृत केलेले, (पृष्ठ ५१) जून १८८१ चे सर सय्यद अहमदखान यांचे वायव्य प्रांतांच्या डिरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनला लिहिलेले पत्र.

सय्यद यांनी मागील वीस वर्षांचे एक तुलनात्मक निवेदन तयार केले होते. कायदा, मुलकी इंजिनियर, कला व वैद्यशास्त्र या स्नातक पदव्या धारण करणारे किंवा स्नातकोत्तर पदव्या धारण करणारे हिंदू ३,१५५ व मुसलमान ५७ होते.[१०] कायद्याची डॉक्टरेट ही उच्च किंवा माननीय पदवी मिळवणाऱ्यात, मुलकी इंजिनियरामध्ये किंवा वैद्यकीय उच्च किंवा सन्मानदर्शक पदवी मिळवणाऱ्यात तर मुसलमान अजिबात नव्हते. १,३७३ बी. ए. पदवीधरांपैकी फक्त ३० मुसलमान होते; आणि एम. ए. चे प्रमाण ३२६ ला ५ असे होते. या विरोधाभासाचे स्पष्टीकरण होण्यासाठी आपल्याला पुन्हा उच्च व मध्यम वर्गाच्या हिंदू मुसलमानांच्या निरनिराळ्या व्यवसायांच्या ऐतिहासिक अवस्थेकडे वळले पाहिजे. या वर्गांचे बहुतेक मुसलमान जमिनदार होते आणि बहुतेक हिंदू धंदेवाले, व्यापारी, कंत्राटदार वगैरे होते. जेव्हा मुसलमान आपल्या अमीर उमरावीपणाला कवटाळून बसले होते तेव्हा सामाजिक किंवा धार्मिक पूर्वग्रह नसल्यामुळे हिंदूंनी आपल्या मुलांना निःसंकोचपणे उच्च शिक्षणासाठी पाठवले होते. ज्या गरीब मुसलमानांनी आपल्या मुलांना शाळेत पाठवले ते त्यांना फक्त माध्यमिक शाळा व इंटरपर्यंतच शिक्षण देऊ शकले. उच्च शिक्षणाचा खर्च त्यांना झेपणे शक्य नव्हते. शहरातील श्रीमंत हिंदूंची बरोबरी करण्याची त्यांची ऐपत नव्हती, ती फक्त मुसलमान उमरावी जमिनदारांची होती. आपल्या परंपरेचा मान टिकवण्याच्या कल्पनेने मुसलमान उमराव इंग्रजी शिक्षणापासून जितके दूर राहिले त्यापेक्षा अधिक काळापर्यंत हिंदू जमिनदार राहिले. उत्तर प्रदेशातील हिंदू व मुसलमान दोघेही, उच्च शिक्षणात, बंगालमधील हिंदूंपेक्षा फार मागे होते. म्हणून तुलनात्मक विधान करताना, बंगालच्या श्रीमंत घराण्यातील मुसलमानांच्या तक्रारीला जरी कारण होते तरी उत्तर प्रदेशच्या मुसलमानांना तक्रार करण्यास फारसा वाव नव्हता. तेथे १९ व्या शतकाच्या शेवटच्या पंचवीस वर्षांतसुद्धा पर्शियन व उर्दू जाणणारे मुसलमान दुय्यम दर्जाचे न्यायाधीश होते, पण बंगालमध्ये असे नव्हते. जेव्हा उत्तर प्रांतीय मुसलमानांनी इंग्रजी शिक्षणाचा उपहास केला तेव्हा इंग्रजी शिक्षणाकडे दुर्लक्ष केल्याने आपले फारसे नुकसान होत नाही या गोष्टींची त्यांना जाणीव होती. आठव्या दशकाच्या सुरवातीला एका हिंदू शाळा तपासनिसानी उत्तर प्रदेशातील इंग्रजी न येणाऱ्या दोन उपन्यायाधिशांना, त्यांनी त्यांच्या मुलांना इंग्रजी शाळेत घालावे अशी सूचना केली तेव्हा 'ते बिघडतील' असा मुद्दा न्यायाधिशांनी पुढे मांडला; त्यांचे म्हणणे असे होते की, त्यांच्या कानावरून जे काय थोडेसे इंग्रजी गेले होते त्यावरून त्यांचे असे मत झाले होते की, पर्शियन व उर्दू भाषेच्या गोडव्याचा इंग्रजी भाषेत आभाव आहे. 'कलेक्टर, 'अॅडमिनिस्ट्रेटर, डेटर, वेटर' वगैरे शब्दात एकसारखे येणारे 'टर् टर' कानाला किती कर्कश लागते असे ते म्हणाले.

यामुळे मुसलमानांमध्ये उच्च शिक्षणाचा प्रसार होण्याकरिता प्रथम त्यांच्यातील

१०. एज्युकेशन कमिशनचा अहवाल, १८८२, पृष्ठ २९१

फाजील धर्माभिमान, जुनाटपणा व दूषित पूर्वग्रह नाहीसे केले पाहिजेत याची मुस्लिम सुधारकांना पूर्ण जाणीव होती. इंग्रजी ही हळूहळू सर्व देशभर राज्यभाषा बनत चालली होती, आणि याची जाणीव मुसलमानांना जितकी लवकर होईल तितके चांगले. सर सय्यद व त्यांचे सहकारी यांनी मासिकामधून व जाहीर भाषणामधून प्रचार चालविला होता. सर सय्यदनी तर बायबलचा अभ्यास म्हणजे इस्लामचा अपमान नव्हे तर उलट, 'इंग्रजी वाङ्मयाचे ज्ञान मिळवण्यात त्याची मोलाची मदत होते.'[११] असे सांगून मुसलमानांना मिशनरी संस्थात प्रवेश करण्यासही उत्तेजना दिले.

हा कट्टर सुधारक उत्तर हिंदुस्तानला जसा सर सय्यद यांच्यारुपाने मिळाला तसा त्याची जास्त गरज असलेल्या बंगालला कधीच मिळाला नाही. बंगालच्या मुस्लिम पुढाऱ्यांनी मुसलमानांच्या वृत्तीत बदल घडवून आणला हे निश्चित, पण हा बदल ब्रिटिशविरोधी वृत्ती हिंदूविरोधी बनण्यात झाला. हंटरच्या 'इंडियन मुसलमानस' या पुस्तकातील निष्कर्ष त्यांची संहिता बनले. हंटरने म्हटले होते की, 'खरी गोष्ट अशी आहे की, आमची लोकशिक्षणपद्धती मुसलमानी मनाच्या तीन मोठ्या प्रभावी भावनांकडे दुर्लक्ष करीत आहे. प्रथम म्हणजे ही पद्धती, सुशिक्षित मुसलमान ज्या भाषेच्या तिरस्कार करतो त्या बंगाली मातृभाषेतून शिक्षण देते इतकेच नव्हे तर सर्व मुसलमान जमात ज्याचा द्वेष करते अशा हिंदू शिक्षकांच्या द्वारे देते. बंगाली शाळामास्तर आपली स्वतःची मातृभाषा आणि हलक्या प्रकारची उर्दू बोलतो. ही त्याची उर्दू त्याला आपल्याप्रमाणेच परकी व बाहेरून कमावलेली आहे आणि यावर ताण म्हणजे त्याच्या सौम्य व भीरू स्वभावामुळे तो मुसलमान मुलांमध्ये शिस्त राखण्यास नालायक ठरतो.'[१२]

वरील विधान, हंटर ज्या मुसलमानांबद्दल करीत होता ते मुसलमान खुद्द बंगालचे नसून पर्शिया किंवा उत्तर हिंदुस्तानातून आलेले होते व त्यांची मातृभाषा पर्शियन किंवा उर्दू होती. या मुसलमानांनी बंगालच्या बाटलेल्या मुसलमान जनतेचे पुढारीपण आपल्याकडे घेतले हे खरे, पण हे बाटलेले मुसलमान खुद्द बंगालच्याच भूमीचे पुत्र असल्यामुळे त्यांची व बंगाली हिंदूंची मातृभाषा एक होती. हे लक्षात घेऊनच बंगाल सरकारने आपल्या १९ नोव्हेंबर १८८१ च्या ठरावात पुढील गोष्टी नमूद केल्या होत्या : 'देशातील सामान्य प्राथमिक शाळा या सर्वसाधारणपणे हिंदू व मुसलमान विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्णपणे पुरवणाऱ्या आहेत असे वाटते. कारण बहुतेक सर्व ठिकाणी मुसलमानांची नेहमीची भाषा ते ज्या लोकात रहातात त्या लोकांचीच आहे. तरीसुद्धा मुसलमानी मकतावांनी कुराणाच्या जोडीला मातृभाषा व थोडेसे अंकगणित शिकवावे या अटींवर त्यांना द्रव्यसहाय्य देण्याच्या पद्धतीला यश

११. किता., पृष्ठ २९५.

१२. मागे उद्धृत केलेल्या हंटरचा ग्रंथ, पृष्ठ १७८.

लाभल्यामुळे त्या पद्धतीत वाढ होत आहे हे नमूद करण्यास लेफ्टनंट गव्हर्नरला आनंद होत आहे.' त्यावेळी न्यायदानाची भाषा बंगाली होती, हे बंगालीवर भर देण्याचे कारण होय. आणि वहाबीच्या प्रभावाखाली मुसलमानांचे धर्मवेड फारच वाढले असल्यामुळे धार्मिक शिक्षणाकडे संपूर्णपणे दुर्लक्ष होणे हे अनुचित समजले जात होते.

पर्शियन पूर्वजांचा वारसा घेऊन आलेले बंगालचे प्रमुख पुढारी अमीर अली यांनी एज्युकेशन कमिशन पुढील आपल्या साक्षीत अशी मागणी केली होती की, 'बंगालच्या हिंदूंना जशी बंगाली तशीच मुसलमानांसाठी उर्दू असावी. आणि संस्कृतची जागा अरेबिक व पर्शियन यांना मिळाली पाहिजे.'[१३]

वर उद्धृत केलेल्या हंटर यांच्या उताऱ्यांवरून स्फुर्ती घेऊन नबाब अब्दुल लतिफ खान बहादूर या दुसऱ्या एका पुढाऱ्याने सांगितले की, नेहमीच्या प्राथमिक शाळा मुसलमान शेतकऱ्यांच्या गरजा पुरवण्यास योग्य नव्हत्या. 'त्यात हिंदूंचे प्राबल्य अधिक आहे. बहुतेक सर्व शिक्षक हिंदू आहेत; तसेच बहुतेक विद्यार्थीही हिंदू आहेत. त्यांच्यात आणि मुसलमान विद्यार्थ्यांच्यात जिव्हाळ्याचे संबंध नाहीत.'[१४] त्यांची अशी सूचना होती की, शाळेच्या शिक्षणाचे माध्यम, हिंदू शाळेची उच्च संस्कृतनिष्ठ बंगाली आणि पर्शियन व अरेबिक शब्दांनी ओतप्रोत भरलेली सर्वसामान्य मुसलमान बोलत असलेली धेडगुजरी बंगाली, यांच्यामधली भाषा असल्यास त्यात कदाचित् मुसलमान मुले शिक्षण घेऊ शकतील. पर्शियन आणि अरेबिक शब्दांनी भरलेली बंगाली भाषा ही खरोखर पहाता येथल्या परदेशीय मुसलमानांची भाषा होती. पण ते बंगालच्या मुस्लिम लोकांचे धर्मगुरु असल्यामुळे त्यांच्यावतीने बोलण्याचा त्यांना अधिकार मिळाला होता. तरीसुद्धा अब्दुल लतीफ यांना मुसलमानी उच्च व मध्यमवर्गीय लोकांकरिता निराळी शिक्षणपद्धती हवी होती. 'आपल्या स्वतःच्या समाजात सुशिक्षित लोक म्हणून मान' मिळवण्यासाठी उर्दूचे संपूर्ण, पर्शियनचे सर्वसाधारण आणि शक्य झाल्यास थोडे अरेबिकचेही ज्ञान मिळवलेच पाहिजे. उर्दू भाषा हे शिक्षणाचे माध्यम असावे अशी त्यांची इच्छा होती, व त्याचे कारणही त्यांनी लपवलेले नव्हते. 'उच्च व मध्यम वर्गाचे मुसलमान हे बंगालच्या मूळ विजेत्यांचे वंशज, किंवा अरेबिया, पर्शिया आणि मध्य आशियामधून बंगालच्या राज्यकर्त्यांकडे नोकरीसाठी आलेल्या धर्मनिष्ठ, ज्ञानी आणि शूर लोकांचे वंशज, किंवा दिल्ली साम्राज्यात प्रांत खालसा केला गेल्यानंतर दिल्लीच्या बादशहाने नेमणूक करून पाठवलेल्या सरकारी प्रमुख अधिकाऱ्यांपैकी जे या भागात कायम राहिले त्यांचे वंशज आहेत.'

बंगाली शाळेतील हिंदू शिक्षक हे हिंदू धर्माने भारलेले होते की, मुसलमान

---

१३. एज्युकेशन कमिशनर, १८८२ पृष्ठ २२२.

१४. कित्ता, पृष्ठ २१३

पुढाऱ्यांचा हा अकारण पूर्वग्रह होता हे आज इतका काळ उलटल्यानंतर सांगणे कठीण आहे. यापैकी कुठल्याही बाजूने विधान करण्यास सबळ पुरावा नाही. हिंदूंच्या बाजूने असे म्हणता येईल की, बाटलेल्या मुसलमानांच्या पूर्वजांची भाषा ही त्यांची नैसर्गिक भाषा असली पाहिजे आणि मुसलमान असा युक्तिवाद करू शकतील की, आपल्या धर्माशी प्रातारणा होऊ नये म्हणून मुसलमानाला अरेबिक, पर्शियन आणि उर्दू पार्श्वभूमीची गरज आहे. कारण काहीही असो पण मुसलमानांना कुठची शिक्षण पद्धती योग्य होईल याच्या जाहीर चर्चेमुळे नोकऱ्यांवरून निर्माण झालेल्या मत्सरातून व द्वेषातून अंकुरलेल्या फुटीर प्रवृत्तींना पुष्टी मिळाली. मुसलमान मुलांकरिता निराळ्या शिक्षकांची मागणी केली गेली. अमीर अलींचा मुद्दा असा होता की, 'बंगालमधील हिंदू शिक्षकांना उर्दू येत नसल्यामुळे' मुसलमान विद्यार्थ्यांना ज्या अडचणींना तोंड द्यावे लागले त्या अडचणी इंग्रजी शिकवणारे मुसलमान शिक्षक टाळू शकतील.' जिल्ह्याच्या शाळातून पर्शियन व अरेबिक शिकवण्याकरिता मुसलमान मौलवींची गरज होती. या प्रवृत्ती, मग त्या जातीय असोत अगर धार्मिक असोत, त्यांच्यामुळे विभक्त शाळा अस्तित्वात आल्या. आणि त्या आपल्या राजकीय आणि सामाजिक जीवनाच्या प्रस्थापित अंग बनल्या. त्यावेळचे प्रमुख हिंदू राजकारणी व सुधारक राय राजेन्द्रलाला मित्र (LL. D. CIE) हे स्थानिक स्वराज्याच्या योजनेवर आपले विचार मांडीत असताना त्यांनी या गोष्टीची अप्रत्यक्ष कबुली दिली. ते म्हणाले, शाळा असलेल्या प्रत्येक खेड्याला किंवा खेड्यांच्या समूहाला पंचायत असली पाहिजे; आणि ज्या खेड्यात दोनही जमातींसाठी वेगवेगळ्या शाळा असतील त्या खेड्यात काही वेळेला (नेहमी नव्हे) हिंदू आणि मुसलमान दोघांच्याही स्वतंत्र पंचायती असणे आवश्यक होईल.' [१५]

याच सुमारास, म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या आठव्या आणि नवव्या दशकात हिंदी आणि उर्दूच्या कैवाऱ्यांमध्ये संघर्ष निर्माण झाला. त्यामुळे या दोन जमातींच्या विद्वानांमध्ये व सामाजिक संस्थांमध्ये दोन तट पडले. पर्शियन धाटणीची हिंदी किंवा हिंदुस्थानी ही उर्दू म्हणन ओळखली जाते. खिलजी राजवटीत, उर्दू-इ-मुअल्ला म्हणजे दिल्ली राजवाड्याबाहेरील बादशाही लष्करी बाजारात तिचा उगम झाला म्हणून तिचे नांव उर्दू असे पडले. दिल्लीत आणि दिल्लीच्या सभोवती वस्ती करून राहिलेल्या परदेशीय मुस्लिम सैन्याला स्थानिक लोकांशी दळणवळण ठेवण्यासाठी स्थानिक लोकांची बोली शिकावीच लागली. अल्लाउद्दीन खिलजीने व्यवहारातील हिंदी शब्दांचे पर्शियन व अरेबिक समानअर्थी शब्द देऊन एक खलिकबारी नावाचे पुस्तकच तयार करवून घेतले होते. त्याच्या असंख्य प्रती त्याने मुसलमानी सैन्यात व इतरांना वाटल्या होत्या. या परदेशीयांकडून शंभर टक्के शुद्ध हिंदी बोलण्याची अपेक्षा करणे शक्यच नव्हते. ते जी बोली बोलत होते, आणि जी पुढे उर्दू म्हणून ओळखली

१५. कित्ता, ३२९

जाऊ लागली ती बहुतेक वेळी अनेक पर्शियन आणि अरेबिक शब्दांनी भरलेली होती. सुमारे पाचशे वर्षे उर्दू ही फक्त बोली भाषाच राहिली. नंतर पर्शियन शब्द विखुरलेली ही उर्दू वाङ्मयीन भाषा बनली आणि तिच्यात अनेक प्रतिभावंत कवी निर्माण झाले. उर्दू सुंदर शैलीदार बनल्यानंतर सुद्धा काही मुसलमान साहित्यिकांनी संस्कृतनिष्ठ हिंदीतच आपले वाङ्मय लिहिले. बोलीभाषेत पर्शियन शब्द सर्रास सढळपणे वापरले जात असल्यामुळे ते चलती नाणी बनले, आणि आज हिंदी साहित्यक्षेत्रात उच्च स्थान पटकावलेल्या हिंदी कवींच्या संस्कृतनिष्ठ हिंदी वाङ्मयातही आपला हक्क असल्यासारखे शिरून राहिले. उर्दूने पर्शियन लिपी स्वीकारली आणि मुख्यत्वेकरून यामुळेच ती देवनागरी लिपीतील हिंदीपासून निराळी झाली. उर्दूने आपली स्वतःची डौलदार काव्यशैली विकसित केली.

परंतु, मोंगल साम्राज्याचा ऱ्हास होऊन जाईपर्यंत सरकारी कचेऱ्या आणि न्यायालयात उर्दूला प्रवेश नव्हता. एकोणीसाव्या शतकातच पर्शियनची जागा उर्दू घेऊ लागली आणि जेव्हा बहादूरशहाने स्वतःचे उर्दू काव्य दरबारातील कवींपुढे वाचून दाखवले तेव्हा ती कळसास पोंचली. सरकारी आश्रयामुळे उर्दूला हिंदीपेक्षा जास्त महत्त्व आले. आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या अनेक हिंदू वंशजांनी, सरकारी जागा मिळवण्यास मदत होते म्हणूनच केवळ उर्दूत प्राविण्य मिळवण्याचे पसंत केले. जेव्हा ब्रिटिश सत्तारूढ झाले तेव्हा सर्व उत्तर हिंदुस्तानभर उर्दू ही सरकारी भाषा होती. आणि सरकारी कारभाराच्या सातत्यासाठी ब्रिटिशांनी मुद्दाम तीच चालू ठेवली.

उर्दूचे हे सरकारी स्थान हिंदीला नाउमेद करणारे होते. तरीसुद्धा हिंदूंनी तिचा कधी त्याग केला नाही. खरे म्हणजे उर्दूला मिळालेल्या या वर्चस्वामुळे हिंदीचा पुरस्कार करणाऱ्यांना भाषावृद्धीसाठी झटून काम करण्यास आव्हान मिळाले. पर्शियन-मध्ये लिहिलेली उर्दू नव्हे तर देवनागरी लिपीची हिंदी ही कारभाराची भाषा असली पाहिजे असे ते कुजबुजू लागले. आठव्या दशकात या कुजबुजीचे मोठ्या विरोधात रुपांतर झाले. १८७३ मध्ये बंगाल सरकारने बंगालचाच भाग असलेल्या बिहारमध्ये हिंदीचा वापर आणि 'पाटणा, भागलपूर आणि छोटा नागपूर भागातील न्यायालयात व कचेऱ्यात नागरी लिपीचा वापर करावा अशी फर्माने काढली; सर्व खटले, सूचनापत्रके आणि जाहीरनामे हिंदीत असावेत असा हुकूम काढला; सरकारी दप्तरे हिंदीत ठेवली जावी; अर्जदाराच्या मर्जीप्रमाणे हिंदी किंवा उर्दू या कुठल्याही लिपीत अर्ज दाखल करून घेतले जावेत; पोलीस व सरकारी अधिकाऱ्यांना हिंदी लिपीचे ज्ञान सक्तीचे केले जावे; असे हुकूम काढले. या हुकूमाकडे प्रत्यक्षात कानाडोळा केला गेल्यामुळे एप्रिल १८७४ मध्ये आणि जुलै १८७५ मध्ये परत स्मरणपत्रे पाठवण्यात आली. तरीही कोणी सहकार्य दाखवले नाही; अर्ज पोलीस हुकम, रोजनिशा, तपशील आणि नोंदी, त्याचप्रमाणे कलेक्टर कचेरीची व इतर सरकारी कागदपत्रे बहुतेक पर्शियन लिपीतच चालू राहिली, आणि हिंदीमध्ये छापलेल्या सरकारी नोटिसा

पर्शियन लिपीतच भरण्याचे- चालू राहिले. सरकारची इच्छा अंमलात आणण्याच्या दृष्टीने खरोखरी काहीच प्रगती केली जात नाही असे जेव्हा १८८० च्या एप्रिलमध्ये बंगालचे लेफ्टनंट गव्हर्नर सर अॅशले यांना आढळून आले तेव्हा त्यांनी असा निष्कर्ष काढला की, सरकारी कायदा करून केलेले बदल पूर्णपणे अंमलात येण्यासाठी सरकारी कागदपत्रात केवळ देवनागरी लिपीचाच वापर केला पाहिजे. त्याप्रमाणे त्यांनी जानेवारी १८८१ पासून फक्त देवनागरी लिपीच उपयोगात आणली पाहिजे, आणि न्यायालयातील पुराव्याचे कागदपत्र सोडून, न्यायालयाकडे किंवा न्यायालयाकडून होणाऱ्या इतर सर्व देवघेवीत पर्शियन लिपीला संपूर्ण मनाई झाली पाहिजे असा हुकूम काढला. पोलीस अधिकाऱ्यांनाही असा इशारा दिला गेला की, जर ते जानेवारी १८८१ पर्यंत देवनागरी लिपी लिहू वाचू शकले नाहीत तर त्यांच्या जागी दुसरे देवनागरी जाणणारे अधिकारी आणण्यात येतील. सरकारी हुकूमांकडे दुर्लक्ष करण्यात कोण होते याची जेव्हा चौकशी झाली तेव्हा असे आढळून आले की, स्वतःच्या हातात सर्व सत्तेची सूत्रे ठेवणारे आणि आपली अधिकारपदे वंश परंपरागत करून बसलेले सरकारी अधिकारी, वकील, मुक्त्यार आणि दलाल याला जबाबदार होते. आणि त्यात हिंदू व मुसलमान दोघेही होते.[१६]

ह्या हुकूमामुळे आणि ज्या निग्रहाने त्यांचा पिच्छा पुरवला गेला त्यामुळे, उर्दू पदच्युत करण्यास कारणीभूत झालेल्या हिंदूंचे मुसलमान विरोधक बनले. सरकारला संतापयुक्त निवेदने पाठवण्यात आली. आणि संधी सापडेल तेव्हा त्यांनी आपले गाऱ्हाणे पुढे मांडले.

उत्तर प्रदेशातसुद्धा हिंदीवाद्यांची सरशी झाली नाही. यामुळे पुष्कळ हिंदूंना तक्रारींना कारण मिळाले. आणि अनेक दशके ते त्या तक्रारींना कुरवाळीत राहिले. शेवटी दोनही जमातींतील मतभेद बिहारसारखेच तीव्र झाले. आणि १८८३ मध्ये न्यायालयीन भाषेची लिपी पर्शियन ऐवजी देवनागरी करावी अशा अगदी निरुपद्रवी दिसणाऱ्या सूचनेवरून हिंदी-उर्दू वाद निर्माण झाला; उर्दूच्या जागी हिंदी आणावी असे अगदी स्पष्टपणे सुचवलेले नव्हते. पण हेतू उघड होता. आणि सर्व मुसलमान अधिकारी वर्ग या सूचनेच्याविरुद्ध एकजुटीने उभा राहिला. दोन्ही भाषेच्या पुरस्कर्त्यांनी जाहीर सभा व वर्तमानपत्रे यांचा अवलंब केला. आणि ह्या प्रक्षोभाने सुशिक्षित हिंदू व सुशिक्षित मुसलमान यांच्यामध्ये भेदरेषा निर्माण केली. हिंदीला पाठिंबा देण्यासाठी मुद्दे व आकडे गोळा केले गेले, १८७३–७४ च्या वायव्य प्रांत शिक्षण रिपोर्टात म्हटल्याप्रमाणे शाळेतील ७१ टक्के मुलांनी 'उर्दूपेक्षा हिंदीमध्ये शिक्षण घेण्याचे स्वयंस्फूर्त पसंत केले होते.' उर्दू ही शहरातील अल्पसंख्य लोकांची लिहिण्या-बोलण्याची भाषा असल्यामुळे ती हिंदी जाणणाऱ्या सुशिक्षित हिंदूंनाही अगम्य होती;

१६. एज्युकेशन कमिशन, १८८२ पुढे राधिका प्रसन्न मुकर्जी यांनी सादर केलेल्या टिपणीवर आधारित पृष्ठ ३९९.

उर्दू न जाणणाऱ्या लोकांना न्यायालयीन समन्सचा आशय समजून घेण्यासाठी काही आणे, आणि लहानसा अर्ज लिहून घेण्यासाठी आठ आणे, रुपया खर्च करावे लागत होते; जगांतील सर्व देशात, त्या त्या देशाची जी भाषा व लिपी असेल तीच न्यायालय व कचेऱ्यांची भाषा व लिपी होती; हिंदी भाषा व देवनागरी लिपी शिकण्यास सोप्या होत्या आणि हा बदल मुसलमानांस काही फारसा त्रासदायक होणार नव्हता; उर्दू ही सरकारी भाषा म्हणून सरकारी जागांचे मुसलमान मक्तेदार बनले होते; वायव्य प्रांतातील डिरेक्टर पब्लिक इन्स्ट्रक्शन यांनीसुद्धा (हे ग्रिफिथ नावाचे इंग्रजी ग्रहस्थ होते) आपल्या १८७७–७८ च्या अहवालात म्हटले आहे की, 'सामान्यत: हिंदी ही प्रांताची खरी स्थानिक भाषा आहे आणि मोंगल सत्तेच्या आणि वसाहतींच्या कमी जास्त प्रभावाप्रमाणे, कमी अधिक स्वरुपात तिचा वापर ग्रामीण लोक करीत आहेत.'

१८७८ मध्ये स्थानिक सरकारने काढलेल्या दोन हुकूमनाम्यामुळे हिंदीच्या चळवळीला धार चढली. एका हुकूमाने नोकरी मिळवण्यास मध्यमवर्गीय असल्याबद्दलचा दाखला ही आवश्यक गोष्ट ठरवली आणि दुसऱ्या हुकूमान्वये असा नियम केला गेला की, जरी उमेदवार उत्तम रीतीने परिक्षा उत्तीर्ण झाला तरी त्याची दुसरी भाषा जर उर्दू नसेल तर त्याला दाखला देण्यात येणार नाही. या हुकूमांचा अर्थ, हिंदीच्या अभ्यासाला मोडता घालण्याच्या हेतूने हिंदीविरूद्ध कट रचण्यात आला आहे, असा लावण्यात आला. सबंध खेडयात हिंदू वस्ती असताना तेथे उर्दू का शिकवली जावी याबद्दल आश्चर्य व्यक्त होऊ लागले, आणि साठ टक्के हिंदू मुले असतील तेथे हिंदी-मधूनच शिक्षण दिले गेले पाहिजे अशी मागणी पुढे आली.

अलिगड, बुलंदशहर, रुडकी आणि मिरत अशा अनेक शहरातील मुसलमानांनी एक संयुक्त निवेदन काढले. त्यात म्हटले होते की, 'हिंदुस्तानातील लोकांनी सर्व सामान्यपणे पर्शियन लिपी शेकडो वर्षे वापरली आहे. अडीचशे वर्षे उर्दू ही या प्रांतातील देशी बोली होती. देवनागरी लिपी लिहिण्यास अधिक वेळ खर्ची पडेल.'[१७] याविरूद्ध हिंदी चळवळीच्या हिंदू पुढाऱ्यांनी असा युक्तिवाद केला की, मुसलमान राज्यकर्त्यांनी आपल्या कारकिर्दीत पर्शियन लिपी स्वीकारणे स्वाभाविक असले तरी या परकीय लिपीचा हिंदूंनी त्याकाळी स्वीकार केला कारण ते असहाय्य होते.

मुसलमान आपल्या शाळातून कुराण व पर्शियन शिकले, आणि जेव्हा ते निधर्मी शाळेत आले तेव्हा त्यांनी उर्दू ही शिक्षणाच्या माध्यमाची भाषा म्हणन निवडली; काही थोडया हिंदूंनीही ती निवडली. पण हिंदी उर्दू वादाने या दोन जमाती एकमेकांना जितक्या दुरावल्या तितक्या दुसऱ्या कशानेच दुरावल्या नव्हत्या. (मागील प्रमाणेच जमाती हा शब्द मुसलमान उमराव व मध्यमवर्ग आणि हिंदू उच्च मध्यमवर्ग या वर्गांपुरताच मर्यादित अर्थाने वापरला आहे.)

१७. एज्युकेशन कमिशन, पृष्ठ ४२१.

बंगालमध्ये, शिक्षण व्यवसायात ज्याप्रमाणे मुसलमान हिंदूंच्या मागे होते त्याप्रमाणे पंजाबमध्ये हिंदू मुसलमानांच्या मागे होते. हिंदूंना या गोष्टीची जाणीव होऊन ते जेव्हा या व्यवसायात गर्दी करू लागले तेव्हा आजपर्यंत उपभोगिले ते गमावणार या भितीने मुसलमान अस्वस्थ झाले. या गोष्टीकडे कॅप्टन फुलर, पंजाबचे डायरेक्टर ऑफ इन्स्ट्रक्शन, यांनी जेव्हा नेमके लक्ष वेधले, तेव्हा हिंदूंची याबाबतची जाणीव प्रकर्षाने वाढली. अहवालात म्हटले आहे की, 'या संस्थात शिक्षण घेणाऱ्या शिक्षकात मुसलमानांचे प्राबल्य स्पष्ट आहे; ३३४ मुसलमानांबरोबर १११ हिंदू व इतर जमातीचे ६ शिक्षक आहेत. हे प्रमाण फार लवकर समसमान होईल असा मार्ग दिसत नाही. फक्त अंबाला विभाग सोडून इतरत्र देशी भाषेचे शिक्षण मुसलमानांच्या हातात आहे, आणि जोपर्यंत ते आपली लोकप्रियता कायम ठेवीत आहेत तोपर्यंत आम्ही त्यांना काढू शकत नाही. परंतु जिल्हाधिकारी मात्र, हिंदूंना शिक्षक व्यवसायात लायक बनण्यास उत्तेजन देऊन, आणि ज्या ठिकाणचे रहिवाशी मुसलमान शिक्षकांना जोरदारपणे अनुकूल नसतील त्या ठिकाणी त्यांची नेमणूक करून हळूहळू बदल घडवून आणण्याचा मार्ग तयार करू शकतील.'

फुलर यांचा हा अहवाल आणि पंजाबमधील वहाबी प्रभावाची वाढ या गोष्टी एकाचवेळी घडल्या; १८६० ते १८७० च्या काळात इतर भागांप्रमाणेच पंजाबातसुद्धा बहुतेक सुशिक्षित मुसलमानांवर वहाबींचे सहकारी असावेत असा वहीम होता.[१८] तसा प्रत्यक्ष पुरावा नाही. पण त्या विशिष्टवेळी हिंदू हे जास्त सुरक्षित शिक्षक म्हणून समजले जात असावेत असे फक्त अनुमानाने म्हणता येईल. या वार्षिक अहवालाचा जर जास्त सहानुभूतीपूर्वक अर्थ लावावयाचा असेल तर असेही मानता येईल की, हिंदूंना नोकऱ्या मिळण्याची संधी देण्याची त्यांची मनापासून इच्छा होती. हे काहीही असले तरी शिक्षक व्यवसायात हिंदूंची वाढती संख्या आणि त्या प्रमाणात मुसलमानांच्या नोकऱ्यात झालेली घट यामुळे सुशिक्षितात कटुता निर्माण होणे अपरिहार्य होते. पंजाबमध्ये दोन जमातीत निर्माण झालेले भेद सांस्कृतिक किंवा भावनात्मक नसून आर्थिक होते, कारण जरी शिक्षण क्षेत्रात हिंदू वर येत होते तरी, शिक्षण उर्दू माध्यमातूनच चालू होते. आणि आर्यसमाजाचा प्रभाव सुरू होईपर्यंत शिक्षण संस्थात हिंदी भाषा बहुतेक अज्ञातच राहिली.

अंतिमदृष्टया विचार केला तर भाषा आणि लिपी यापेक्षा नोकऱ्या हेच मतभेदाचे खरे कारण होते.

---

१८. एक भूतपूर्व पंजाबी (पंजाबमधील एका जिल्ह्यातील इंग्रज अधिकारी) कृत, दि पंजाब ॲन्ड नॉर्थ वेस्ट फ्रॉन्टियर ऑफ इंडिया, (प्रकाशन सुमारे १८७८ ?), पृष्ठे १४३–१४६.

प्रकरण पाचवे

# सर सय्यद अहमद आणि न्यायमूर्ति अमीर अली*

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अनेक मुसलमान पुढाऱ्यांनी आपले जीवित ध्येय, मुसलमानात शिक्षणाची वाढ करणे आणि सरकारी नोकऱ्यात मुसलमानांच्या वाट्यासाठी चळवळ करणे, हे ठरवले होते. पहिल्या चळवळीचे पुढारी सर सय्यद अहमदखान होते व दुसऱ्याचे अमीर अली होते. सर सय्यद यांच्या कीर्तिने अमीर अलींना झाकून टाकले होते पण त्यांची मुसलमानी राजकारणातही कामगिरी ही जास्त महत्त्वाची आणि जास्त प्रभावी आहे. सर सय्यद स्वतःच एक संस्था होते तर अमीर अलींनी निर्माण केलेल्या संस्थेच्या कार्याचा व्याप पश्चिमेला कराचीपर्यंत व दक्षिणेला बंगलोरपर्यंत पसरला होता.

सर सय्यद यांचे चरित्रकार कर्नल ग्रॅहॅम यांच्या मताप्रमाणे, सर सय्यद हे प्रेषित महंमदाचे नातू हजरत हुसेन यांचे छत्तिसावे वंशज होते. उमय्यादांच्या छळामुळे त्यांच्या पूर्वजांनी दमघानमध्ये आश्रय घेतला आणि शेवटी ते हमदान आणि हेरातमध्ये वस्ती करून राहिले. शहाजहानच्या कारकिर्दीत त्यांच्या कुटुंबातील मंडळी हिंदुस्तानात आली आणि बादशहाने त्यांची विश्वासू व जबाबदारीच्या जागांवर नेमणूक केली.

सर सय्यद यांचे बालपण आणि तारूण्य मोगल दरबारात गेले. तेथे त्यांनी 'बादशहाच्या सत्तेचे नकलीपण, त्याच्या भ्रामक अधिकाराचा खोटेपणा आणि ब्रिटिशांची शक्ती हे सर्व पाहिले आणि १८३७ मध्ये, अवघे वीस वर्षाचे तरूण असतानाच आपल्या नातेवाईकांचा रोष पत्करूनही त्यांनी बादशहाबरोबर रहाण्याचे नाकारले, ब्रिटिश अधिकाऱ्यांची नोकरी पत्करली'. प्रथम ते साधे कारकून होते; नंतर ते मुन्सफ (खालच्या दर्जाचा न्यायालयीन अधिकारी) झाले. त्यांना इंग्रजी येत नव्हते पण इतर दृष्टींनी ते विद्वान होते आणि त्यांनी अनेक मूल्यवान ग्रंथ लिहिले होते. 'दिल्लीच्या भग्नावशेषांचा पुरातत्त्वात्मक इतिहास' (आर्किऑलॉजिकल हिस्ट्री ऑफ दि रुइन्स ऑफ दिल्ली) या त्यांच्या ग्रंथाने त्यांना रॉयल एशियाटिक सोसायटीची फेलोशिप मिळवून दिली. ब्रिटिशांमुळे ते इतके दिपून गेले होते की, इंग्रज माणसाच्या तुलनेने भारतीय त्यांना 'पशू' वाटत होते. १८५७-५८ च्या

* सर सय्यद अहमदखान यांची चरित्रात्मक संक्षिप्त माहिती ग्रॅहॅमच्या 'लाइफ अँन्ड वर्क्स ऑफ सर सय्यद अहमद', यावरुन घेतलेली आहे. अमीर अलींची चरित्रात्मक संक्षिप्त माहिती विल्फ्रेड सी. स्मिथच्या 'मॉडर्न इस्लाम इन इंडिया' वरुन घेतली आहे.

बंडांत त्यांनी इंग्रजांना पाठिंबा दिला. आणि आपल्या धर्म बांधवांचा राग ओढवून घेतला. त्यांच्या या सेवेमुळे सरकारने त्यांची भरपूर स्तुती केली आणि भरघोस मोबदलाही दिला. वायव्य प्रांताच्या लेफ्टनंट गव्हर्नराने त्यांच्याबद्दल असे उद्गार काढले; 'त्यांनी १८५७ मध्ये ब्रिटिश सरकारबद्दल जी निष्ठा आणि डोळ्यात भरण्यासारखे धैर्य दाखवले त्याहून अधिक मोठ्या कसोटीला कोणीही उतरले नाही. त्यांनी दाखवलेल्या निष्ठेचे पुरेसे वर्णन करण्यास माझ्या जवळ शब्द नाहीत.'[१] त्यांच्या मोठ्या मुलाच्या हयातीभर चालू राहील असे मासिक दोनशे रुपयांचे खास पेन्शन त्यांना देण्यात आले. त्यांच्या सेवेचे चिन्ह म्हणून पारितोषिकेही दिली गेली. १८६९ मध्ये त्यांना 'हिंदुस्तानचा तिसऱ्या वर्गाचा तारा' हा किताब देण्यात आला. त्याचवर्षी 'बंडाच्या काळातील सेवेची कदर' म्हणून दरवर्षी अडीचशे पौंड याप्रमाणे दोन वर्षे मोबदला देण्यात आला.

सर सय्यद यांची ही ब्रिटिश निष्ठा इतक्या थराला पोचली होती की, हिंदी सैन्याची निष्ठा पक्की करून घेण्यासाठी सरकार हिंदू मुसलमान मतभेदांचा उपयोग करून घेत नाही याबद्दल टीका करण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती. त्यांच्या '५७ च्या बंडाची कारणे' (कॉझिस ऑफ द म्युटिनी) या पुस्तकात ते म्हणतात: 'इंग्रजांची हिंदुस्तानातील सैन्य पद्धती सतत सदोष राहिली. त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे इंग्लिश पलटणीचा तुटवडा हे होते. जेव्हा नादीरशहाने खोरासन जिंकले आणि पर्शिया व अफगाणिस्तान या दोनही राज्याचा तो सत्ताधारी बनला तेव्हा त्याने न चुकता दोनही सैन्यांचे सामर्थ्य सारखे ठेवले होते. एक पर्शियन आणि कुझुलबशी शिपायांचे होते, नव्हे बनवले होते, आणि दुसरे अफगाण सैनिकांचे होते. जेव्हा पर्शियाच्या सैन्याने बंड करण्याचा प्रयत्न केला तेव्हा बंडाचा मोड करण्यासाठी अफगाण सैन्य हाताशी खडे होते तर उलट अफगाण सैन्याच्या बंडाच्यावेळी पर्शियाचे होते. हा पायंडा इंग्रजांनी हिंदुस्तानात अनुसरला नाही. शिपायाचे सैन्य सरकारशी एकनिष्ठ होते आणि त्याने सरकारची उत्तम सेवा केली हे जरी निःसंशय खरे असले तरी ते सरकारचे हुकूम कधीच मोडणार नाहीत याची सरकारला खात्री कशी देता येईल? सरकारने परस्पर विरोधी जमाती एकाच पलटणीत ठेवल्या. पण त्यांच्या सततच्या घनिष्ट संबंधानी आपले काम केले आणि या दोन जमाती जवळ जवळ एकरुप बनल्या. एकाच पलटणीत असणाऱ्या लोकांमध्ये सतत सहवासाने मैत्रीची आणि बंधुत्वाची भावना उद्भवणार हे सहाजिकच अपेक्षित होते. ते आपल्याला एकच मानत आहेत; आणि यामुळे हिंदू मुसलमानांमध्ये वसत असलेले भेद या पलटणीतून जवळ जवळ नाहीसे झाले आहेत. पलटणीचा एकादा भाग जर कशात गुंतला असेल तर बाकीचेही त्यात सामील होतात. पण हिंदू आणि मुसलमान यांच्या निरनिराळ्या पलटणी तयार केल्या असत्या तर ही बंधुत्वाची भावना कधीच

१. मागे उद्धृत केलेले ग्रॅहॅम कृत, पृष्ठ १९

निर्माण झाली नसती.'[२]

सर जॉन (नंतर लॉर्ड) लॉरेन्स यांनी बंडाचा बिमोड करण्यात क्रियाशील भाग घेतला होता. त्याला नंतर हिंदुस्तानचा व्हाईसरॉय नेमण्यात आले होते. सर सय्यद यांच्याप्रमाणे त्यानेही जवळजवळ असेच मत व्यक्त केले : 'बंडपूर्व सैन्याच्या दोषांपैकी निर्विवादपणे सर्वात मोठा आणि आपल्याला सर्वात घातक जर कोणता दोष असेल तर तो बंगालच्या सैन्याची एकात्मता आणि बंधुभाव हा होता. आणि यावर उपाय म्हणजे तुल्यबळ. प्रथम महत्वाचे तुल्यबळ युरोपियनांचे आणि दुसरे स्थानिक जमातींचे'. हे धोरण प्रत्यक्षात कसे आणावे याबद्दल सूचना करण्यासाठी पील कमिशन म्हणून ओळखले जाणारे रॉयल कमिशन नेमण्यात आले आणि १८६१ मध्ये सैन्याची पुनर्रचना केली गेली. निरनिराळ्या जातीय गटांची रचना अशी करण्यात आली की, त्यांची जातीय किंवा जमातीय निष्ठा अबाधीत राहू शकेल, आणि त्याचवेळी एकमेकांची वैशिष्ठ्ये व प्रभाव यांची बरोबरी होईल.[३]

प्रमुख ब्रिटिश राज्यकर्त्यांनी पूर्वीच मांडलेल्या अशा अनेक सूचनांमध्ये सर सय्यद यांची सूचना चपखल बसली. मौंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन या मुंबईच्या गव्हर्नरने आपल्या १४ मे १८५९ च्या खलित्यात अशी सूचना केली होती की, 'जुन्या रोमचे असे ब्रीद वाक्य होते की, फोडा आणि राज्य करा (Divide et Impera) आणि आपलेही तेच असले पाहिजे'[४] यापूर्वी १८४३ मध्ये लॉर्ड एलनबरो या गव्हर्नर जनरलने, (ड्युक ऑफ वेलिंग्टनला १८ जून रोजी धाडलेल्या खलित्यात) साम्राज्यवादी सत्ता टिकवण्याकरिता जातीयवादाचा अवलंब करावा असा इशारा लंडनला दिला होता. त्याने म्हटले होते : 'ती जमात (मुसलमान) आपल्याला मूलतः प्रतिकूल आहे या समजाकडे मी डोळेझाक करू शकत नाही. म्हणून हिंदूंशी अनुकूलतेने वागणे हे आपले खरे धोरण होय.'[५]

नंतर झालेल्या राजकीय घडामोडींमुळे ही अनुकूलता हिंदूंकडून मुसलमानांकडे वळवण्याची गरज कशी निर्माण झाली ते पहाणे मनोरंजक होईल. हिंदुस्तानचा सेक्रेटरी ऑफ स्टेट, लॉर्ड ऑलिव्हियर यांनी टाईम्सला (लंडन) १० जुलै १९२६ मध्ये लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे : 'हिंदुस्तानातील ब्रिटिश अधिकाऱ्यांचा मुख्य कल मुसलमान जमातीच्या बाजूला आहे हे नाकारण्यास, हिंदुस्तानशी घनिष्ट संबंध असलेला कोणीही तयार होणार नाही, याचे अंशतः कारण त्यांच्याबद्दल जास्त

२. कित्ता., पृष्ठ ५४–५५.

३. अशोक मेहता आणि अच्युत पटवर्धन यांनी 'कम्युनल् ट्राइएंगल् इन् इंडिया' पृष्ठ ५४ यात उद्धृत केलेले निराद सी. चौधरींचे 'डिफेन्स ऑफ इंडिया'.

४. आर. पी. दत्त यांच्या इंडिया टुडे, पृष्ठ ३८९ वर उदधृत केलेल्या १४ मे १८५९ ची मॅन्स्टुअर्ट एल्फिन्सटन् यांची टिपणे.

५. दि फ्युचर ऑफ इस्लाम इन इंडिया, एशिया, ग्रंथ २८, नं. ११ (नोव्हेंबर १९२८), पृष्ठ ८७४.

आपुलकी हे असले तरी जास्त मोठे कारण हिंदुराष्ट्रवादाविरूद्ध पासंग निर्माण करणे हे होते.'

हिंदी एकजूट, ब्रिटिश राजवटीला घातक होईल असा इशारा दूर दृष्टिच्या इंग्लिश लोकांनी अनेक वर्षे इंग्रज राज्यकर्त्यांना दिला होता. सर जॉन सीली यांनी 'इंग्लंडची वाढ' (एक्स्पॅन्शन ऑफ इंग्लंड) मध्ये लिहिताना म्हटले होते की, 'जोपर्यंत कुठल्याही प्रकारची टीका करण्याची, आणि सरकारविरूद्ध बंड करण्याची सर्व लोकांना संवय झालेली नाही तोपर्यंत इंग्लडहून हिंदुस्तानचे राज्य चालवणे शक्य आहे. आणि यात अद्भूत असे काहीच नाही. पण जर ही परिस्थिती बदलली आणि सर्व लोक एकाद्या निमित्ताने एकाच राष्ट्रीयत्वाने जोडले गेले तर आपल्या वसाहतीबद्दल काळजी सुरू झाली असे मी म्हणत नाही; तर त्याबद्दलची आशाच आपण सोडून दिली पाहिजे असे मी म्हणतो.'[६]

यामुळे अर्थातच, ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सर सय्यद यांची सूचना मोठया कृतज्ञतेने स्वीकारली. परंतु सर सय्यद हे जुन्या पठडीतल्या मुसलमानांत लोकप्रिय नव्हते. त्यांची ब्रिटिश धार्जिणी वृत्ती आणि ब्रिटिश शिक्षणपद्धतीला पाठिंबा यामुळे इस्लाम धर्माचे विद्वान त्यांच्याविरूद्ध झाले. कुराणावर हात ठेवून आम्ही तुम्हाला ठार मारण्याची प्रतिज्ञा केली आहे अशा अर्थाची अनेक निनावी पत्रे त्यांना आली. पण या धमक्यांनी त्यांचा जीवनक्रम बदलला नाही. ते कट्टर धर्म सुधारक होते. सहाजिकच त्यांच्या सुधारणांचा आणि मुसलमानांच्या प्रचलित रूढी प्रियतेचा गंभीर संघर्ष झाला. त्यांनी इस्लामवर केलेले भाष्य प्रगतीशी, म्हणजे हिंदुस्तानशी ब्रिटिश संबंध वाढण्यात होणाऱ्या प्रगतीशी तंतोतंत जुळणारे होते. आपल्या तहझीब-अल्-अखलाक् या नियतकालिकाद्वारे त्यांनी प्रगती किंवा बदल अमान्य करणाऱ्या सामाजिक रूढींवादावर आणि त्याला उचलून धरणाऱ्या धर्मप्रकारावर जोराचा हल्ला चढविला.

त्यांनी १८६४ मध्ये भाषांतर संस्थेची (ट्रान्स्लेशन सोसायटी) संघटना केली. ह्या संस्थेलाच नंतर अलिगड सायंटिफिक सोसायटी असे नाव दिले गेले. या संस्थेचे सभासद मुख्यत्वे करून मुसलमान सरकारी नोकर आणि काही इंग्रज अधिकारी होते. सर सय्यद यांनी मुसलमान उमरावांचे ब्रिटिशांशी सहकार्य आणि इंग्रजी शिक्षणाबद्दल आवड ही अगदी कणाकणांनी मिळविली व त्याची मोठी इमारत उभी केली. जेव्हा अलिगड येथील त्यांच्या माध्यमिक शाळेचे दुय्यम दर्जाच्या महाविद्यालयात रुपांतर झाले त्यावेळी व्हाइसरॉय लॉर्ड लिटन हे मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेच्या आद्य संस्थापकांनी त्यांना अर्पण केलेल्या मानपत्रात प्रकट केलेल्या भावना अशा होत्या : 'महाविद्यालयाचे उद्देश, आमच्या देश बांधवांनी ब्रिटिशांची सदिच्छा ओळखण्यास समर्थ व्हावे म्हणून त्यांना शिक्षण देणे; हिंदुस्तानातील मुसलमानांना ब्रिटिश महाराज्ञीचे लायक आणि उपयुक्त प्रजाजन बनवणे; परकीय सत्तेपुढे

---

६. पृष्ठ २७० पहा.

गुलामी वृत्तीच्या शरणागतीमधून नव्हे तर सुराज्यामुळे होणाऱ्या फायद्याच्या गुणग्राहकतेमधून उत्पन्न होणारी निष्ठा निर्माण करणे हे आहेत. ही विद्यालयाच्या संस्थापकांची ध्येये आहेत.'

अलिगड मुस्लिम महाविद्यालय सुरू होण्याच्या सुमारासच, मुख्यतः महाराष्ट्र व बंगालमध्ये हिंदी राष्ट्रवादाचा सौम्यसा आविष्कार होण्यास सुरुवात झाली होती. सर सय्यद यांच्या उद्‌गारांनी या राष्ट्रवादाला पोषक असे उच्चप्रतीचे पुढारीपण व शहाणपणा त्यांच्यात दिसेल अशा आशा मनात बाळगल्या गेल्या. एकदा त्यांनी असे म्हटले होते की, 'हिंदू आणि मुसलमान हे धर्मवाचक शब्द आहेत हे लक्षात ठेवा; या अर्थाव्यतिरिक्त या देशात रहाणारे हिंदू मुसलमान आणि ख्रिश्चनसुद्धा मिळून एक राष्ट्र आहे. फक्त भिन्न धर्मांच्या सबबीवर देश दोन निराळ्या राष्ट्रांचा आहे असे मानण्याचे दिवस आता राहिलेले नाहीत.'[७] आणखी एका प्रसंगी पंजाबमधील हिंदूंच्या मेळाव्यापुढे भाषण करताना ते म्हणाले : 'तुमच्या स्वतःसाठी तुम्ही 'हिंदू' हा शब्द वापरता तो माझ्या मते चुकीचा आहे, कारण तो धर्म निदर्शक शब्द नाही• हिंदुस्तानचा कुठचाही रहिवाशी स्वतःला हिंदू म्हणवू शकेल. म्हणून मी हिंदुस्तानचा रहिवाशी असूनसुद्धा तुम्ही मला हिंदू समजत नाही याबद्दल मला खेद होत आहे.'[८] हिंदूंनीसुद्धा आपला राष्ट्रीय पुढारी म्हणून त्यांच्याकडे पाहिले आणि त्यांना स्वागताची मानपत्रे अर्पण केली.

जेव्हा पाश्चिमात्य व हिंदी लोकांमध्ये पक्षपात केले गेले तेव्हा त्यांचा स्वाभिमान तीव्रतेने दुखावला गेला. आग्र्याच्या दरबार प्रसंगी, बसण्यासाठी केलेल्या व्यवस्थेत, पाश्चिमात्य लोकांना व्यासपीठावर व हिंदी लोकांना खाली अशा खुर्च्या मांडलेल्या पाहून ते दरबार सोडून गेले. आपल्या 'तहझीब-अल्-अखलाक्' मध्ये त्यांनी असे लिहिले की, 'जोपर्यंत एकाद्या राष्ट्राचे लोक आपल्या राज्यकर्त्या जमातीशी बरोबरीचा दर्जा मिळवीत नाहीत आणि स्वतःच्या देशाच्या राज्यकारभारात भागिदार होत नाहीत तोपर्यंत अशा कुठल्याही राष्ट्राला आदर किंवा मान मिळणार नाही. कारकुनी किंवा तसल्याच प्रकारच्या हलक्या नोकऱ्या करणाऱ्या हिंदू आणि मुसलमानांबद्दल दुसऱ्या राष्ट्रांना आदर वाटणार नाही. खरे बोलायचे तर जे सरकार आपल्या प्रजेला योग्य आदराने वागवीत नाही त्या सरकारकडेही आदराने पाहिले जाणार नाही. हा आदर तेव्हाच दाखवला जाईल की, जेव्हा माझ्या देश बांधवांना राज्यकर्त्या जमाती बरोबरीने स्थान मिळेल.'[९]

---

७. सर सय्यद अहमद खान यांच्या मजमुआ-ए-लेक्चरस् (उर्दू), पृष्ठ १६७ वरील वर उद्‌धृत केलेल्या तुफैल अहमद यांच्या पुस्तकातील पृष्ठ २८३ वरील उतारा.

८. कित्ता, पृ. २८३ वरील सर सय्यद अहमद यांच्या 'सफरनामा पंजाब' (उर्दू), पृ. १३८, उतारा.

९. राजेंद्रप्रसाद यांच्या 'इंडिया डिव्हायडेड्', पृ. ५३ वरून उद्‌धृत.

१८७७ मध्ये, सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या इंडियन असोसिएशनने सुरू केलेल्या चळवळीला त्यांनी सहकार्य दिले. हिंदी मुलकी खात्यात शिरण्यासाठी हिंदी लोकांना समान संधी व साधने मिळावीत अशी सुरेंद्रनाथ बानर्जींची मागणी होती. (बानर्जी हे उत्तर हिंदुस्तानच्या दौऱ्यावर असताना त्यांच्या विनंतीला मान देऊन अलिगडमधील एका जाहीर सभेचे अध्यक्षस्थान सर सय्यद यांनी स्वीकारले व भाषण केले एवढ्या-पुरतेच त्यांचे सहकार्य मर्यादित होते.)

परंतु सर सय्यद हे क्रियाशील राजकारणापासून अलिप्त राहिले. हे आपण पुढील प्रकरणात पाहूच; खरोखरी, हिंदी राष्ट्रीय काँग्रेसचा जन्म झाल्यानंतर, ते हिंदी राष्ट्रवादाला सामान्यपणे प्रतिकूल बनले आणि त्यांनी मुसलमानांना राजकीय चळवळी-पासून दूर रहाण्याचा सल्ला दिला.

सर सय्यद यांच्या उलट अमीर अली हे प्रथम राष्ट्रीय राजकारणाकडे झुकत होते असे जरी दिसत असले तरी नंतर त्यांनी आपल्याला केवळ मुसलमानांच्या हिताच्या वाढीसाठी पूर्णपणे वाहून घेतले. त्यांचे वाडवडील हे पर्शियाच्या राजांच्या पदरी होते. त्यांच्यापैकी महंमद सादीक खान, दुसऱ्या शहा आब्बासच्या कारकिर्दीत फार उच्च अधिकाराच्या जागेवर होते. सादीक खानचे एक वंशज, अहमद फझील, हे व्यवसायाने लष्करी शिपायी होते, आणि जेव्हा नादिरशहाने १७३९ मध्ये हिंदुस्तानवर स्वारी केली तेव्हा ते नादिरशहाच्या सैन्यात दाखल होते. पर्शियाच्या बादशहाच्या परत जाण्यानंतर अहमद फझीलनी हिंदुस्तानातच रहाण्याचे ठरवले आणि दिल्लीच्या बादशहाच्या पदरी नोकरी धरली. जेव्हा मराठ्यांनी (दिल्ली) राजधानी लुटली तेव्हा अहमद फजीलचा मुलगा पळून गेला आणि त्याने औधमध्ये आश्रय घेतला. तेथे नबाब वझीर याच्या अधिपत्याखाली त्याचे मुलगे नावरुपाला चढले. त्यांच्यापैकी सादतअली नावाचा मुलगा औध खालसा होण्यापूर्वी थोडे दिवस बंगालमध्ये जाऊन स्थिरस्थावर झाला होता. त्याचा मुलगा अमीर अली. सादत अली उदारमतवादी गृहस्थ होता. त्याने आपल्या मुलांना इंग्रजी शिक्षण दिले होते. अमीर अली इतिहास व अर्थशास्त्र घेऊन एम. ए. झाले. नंतर त्यांनी इनर टेम्पलमध्ये प्रवेश केला आणि १८७३ मध्ये त्यांना बॅरिस्टरची सनद मिळाली. १८७७ मध्ये त्यांनी सेंट्रल नॅशनल महॉमेडन असोसिएशन स्थापिली आणि स्वतः पंचवीस वर्षे तिचे चिटणीस राहिले. १८९० मध्ये ते हायकोर्ट जज्ज या पदाला चढले. हा मान मिळवणारे हे दुसरे मुसलमान होते. १९०४ मध्ये ते निवृत्त झाले आणि आपल्या इंग्लिश पत्नीबरोबर ते इंग्लंडमध्ये स्थायिक झाले. १९०९ मध्ये ते प्रिव्ही कौन्सिलचे सभासद झाले. हा मान मिळवणारे हे पहिलेच हिंदी गृहस्थ होते.

अमीर अलीची नॅशनल महॉमेडन असोसिएशन प्रारंभी काही वर्षे लहानसहान सामाजिक प्रश्न हाती घेत होती. पण हळूहळू १८८२ पर्यंत जास्त विस्तृत क्षेत्रात मुस्लिम हितसंबंधांची पुरस्कर्ती संस्था बनण्याइतकी तिची महत्वाकांक्षा वाढली.

त्यावर्षी तिने खालील उद्देश स्वीकारले : ‘हिंदी मुसलमानांची सध्याची मागासलेली स्थिती ही काही अंशी अंतर्गत व काही अंशी बहिर्गत कारणांमुळे आहे. मुसलमान समाजाचा विस्कळीतपणा, त्यांच्यातील महत्वाच्या कुटुंबांना लागलेली उतरती कळा आणि मुस्लिम जमातीच्या सर्व वर्गाचा सर्वसाधारण ऱ्हास या बरोबरच हिंदुस्तानातील मुसलमानांची मते सरकारपुढे प्रामाणिकपणे आणि विश्वासाने मांडली जातील अशा साधनांचा अभाव, या सर्व गोष्टींनी त्यांना राजकीय वर्चस्वाच्या व सत्तेच्यादृष्टीने, इतर हिंदी जमातींच्या तुलनेने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत टाकले आहे. सेंट्रल नॅशनल महॉमेडन असोसिएशन स्थापन होण्यापूर्वी, अतिशय मोठ्या संख्येने आणि एकजिनसीपणाने हिंदुस्तानच्या महत्वाच्या प्रश्नांशी निगडीत असणाऱ्या मुसलमानांच्या हिंदुस्तानच्या एका मोठ्या भागाच्या, योग्य गरजा आणि उणीवा, आशा आणि आकांक्षा सरकारकडे निष्ठेने पण स्वतंत्रदृष्टीने मांडेल अशी एकही राजकीय संस्था हिंदी मुसलमानात अस्तित्वात नव्हती असे अगदी बिनधोक म्हणता येईल. जी काही थोडीबहूत मुसलमान मंडळे स्थापिली गेली होती ती मुख्यत: वाङ्मयीन आणि शास्त्रीय होती, आणि त्यांचा उद्देश मुसलमानात पाश्चिमात्य ज्ञानाच्या इच्छेची वाढ करणे हा होता. खऱ्या राजकीय प्रातिनिधिक संस्थेचा अभाव असल्यामुळे, विशिष्ट भागातील मुसलमान जमातीच्या प्रश्नावर सरकारला याच मंडळाशी अधून मधून विचार विनिमय करणे भाग पडे. अशा तऱ्हेने दिली गेलेली मते, कितीही झाले तरी, त्यावेळच्या परिस्थितीविषयी जागृत असलेल्या त्यांच्यातील विचारी पुढाऱ्यांच्या दृष्टीकोनाशी क्वचितच मिळतीजुळती असत. मुसलमान जमात ही निरनिराळे तट आणि गट यात विभागली गेली असल्यामुळे तिने सामान्यत: सार्वजनिक धोरणाच्या प्रश्नावर आपल्या हिंदू आणि ख्रिश्चन देशबंधुंच्या सुरात सूर मिळवला नाही, एवढेच नव्हे तर सामाजिक प्रगती व सुधारणेच्या मार्गात सांघिक हालचाल अशक्य केली. मुसलमानांनी आतापर्यंत सोसलेल्या अडचणी दूर करण्यासाठी आणि त्यांच्या सर्वसाधारण हिताचे संरक्षण आणि जपणूक करण्यासाठी, चार वर्षापूर्वी नॅशनल महॉमेडन असोसिएशन ही संस्था स्थापन झाली.

हिंदुस्तानातील मुसलमानांच्या हिताचा पुरस्कार कायदेशीर आणि सनदशीर मार्गांनी करण्याच्या हेतूने ही असोसिएशन स्थापन झाली आहे. ब्रिटिश महाराणीशी अंत:करणपूर्वक निष्ठा हा तिचा मूलाधार आहे. जुन्या सुसंस्कृत परंपरांपासून स्फुर्ती घेऊन, पाश्चिमात्य संस्कृति आणि आजच्या काळाची प्रगत अशी प्रवृत्ती यांच्याशी संवादित्व राखून काम करण्याची तिची योजना आहे. नैतिक पुनरुज्जीवनाने आणि सरकारकडून आपले न्याय आणि योग्य हक्क मिळवण्याच्या सतत प्रयत्नाने हिंदी मुसलमानांचा राजकीय पुनर्जन्म करणे हे तिचे ध्येय आहे.

परंतु, मुसलमानांचे हित हे हिंदुस्तानातील इतर जमातींच्या हिताशी घनिष्टपणे निगडित आहे हे असोसिएशन नजरेआड करीत नाही. म्हणून एकंदर देशाच्या

लोकांच्या सार्वजनिक हितसंबंधांचे समर्थन आणि विकास आपल्या कार्यक्षेत्रांतून तिला वगळता येणार नाही.

मुसलमानांच्या कल्याणाकरिता कार्य करीत असताना मुसलमानांव्यतिरिक्त इतर देशबांधवांच्या हितसंबंधाचा पुरस्कार आणि जपणूक करण्यास ही असोसिएशन समर्थ होईल अशी आशा आहे. तसेच महाराणीच्या भारतीय प्रजेच्या एका मोठ्या भागाच्या भावना, गरजा व मते सरकारकडे व्यक्त करून आणि त्यांचे स्पष्टीकरण करून ती हिंदुस्तानच्या हितकर्त्या सत्तेला भक्कम पायावर कायमचे स्थैर्य मिळवून देण्यात फार मोठी सहाय्यक ठरेल अशी आम्हास आशा वाटते.[१०]

अमीर अलींच्या वरील उद्‌गारात जातीय भावना व्यक्त झालेल्या दिसत नाहीत. आणि म्हणून बानर्जींच्या इंडियन असोसिएशनचा त्यांनी आपल्या कार्यासाठी उपयोग का करून घेतला नाही याचे आश्चर्य वाटते. याची कारणमीमांसा लागत नसली तरी तर्कदृष्टचा असा निष्कर्ष काढता येईल की, इंडियन असोसिएशनच्या चळवळीतून अपेक्षित असलेल्या उच्च श्रेणीच्या नोकऱ्यांचा फायदा मुसलमानांना न मिळता बहुतेक संपूर्णपणे हिंदुनाच मिळणार होता. त्यामुळे अमीर अलींना असे वाटले असावे की, शिक्षणात मुसलमान मागे असल्यामुळे, त्यांच्याकरिता निरनिराळ्या शिक्षण संस्था स्थापण्याच्या कामाकडे लक्ष देईल आणि त्यांच्या सरकारी नेमणुकींच्या हक्कांसाठी चळवळ करील अशा एका वेगळ्या संस्थेची आवश्यकता आहे.

सर सय्यद यांच्या उलट, अमीर अलींनी 'आपल्या असोसिएशनच्या उद्देशांचा प्रसार करीत, तिच्या शाखा उघडित आणि मुसलमानांना एकजूट करण्याचा आग्रहाने उपदेश करीत दूरदूरचा प्रवास केला. 'आधुनिक निधर्मी शिक्षणाबरोबर मुसलमान तरुणांना नैतिक आणि धार्मिक शिक्षण मिळेल'[११] असे स्वतःचे महाविद्यालय स्थापन करण्याची गरज कराचीच्या मुसलमानांत ठसवण्याकरिता त्यांनी कलकत्ता ते कराचीपर्यंत मजल मारली. त्यांच्या प्रयत्नाला यश आले आणि हसन अली यांच्या उत्कट कार्यामुळे कराची येथे मुस्लिम महाविद्यालय निघाले. त्यांच्या भेटी आणि पत्रव्यवहार यामुळे त्यांनी आपल्या असोसिएशनच्या एकंदर ५३ शाखा बंगाल, मुंबई, मद्रास, पंजाब, संयुक्तप्रांत आणि बिहार याठिकाणी उघडल्या होत्या. त्यांची मने वळवण्याची हातोटी इतकी प्रभावी होती की, हिंदुनीही त्यांच्या कार्याला सहकार्य दिले. दक्षिणेतील टुमकूर असोसिएशनचे अध्यक्ष (पी. एन. कृष्णमूर्ती) हे एक हिंदू गृहस्थ होते. सेंट्रल महॉमेडन असोसिएशनच्या वार्षिक अहवालात त्यांचे वर्णन 'उच्च अधिकारावरचा आणि उदार मते असलेला हिंदू' असे केलेले आहे. सेंट्रल असोसिएशन

१०. कलकत्त्याच्या नॅशनल लायब्ररीमध्ये मिळणारे नॅशनल महॉमेडन असोसिएशनचे उद्देश व नियम आणि सभासद यादी (१८८२).

११. कलकत्त्याच्या नॅशनल लायब्ररीमध्ये मिळणारा १८८५ ते १८८८ या तीन वर्षांचा नॅशनल महॉमेडन असोसिएशनचा अहवाल, पृ. ३.

सन्माननीय सभासदात काही हिंदू आणि युरोपियन सभासदही होते. असोसिएशनचे अध्यक्षपद सतत स्वतःपेक्षा अधिक उच्चस्थानी असलेल्या लोकांना देऊन अमीर अलींनी आपल्या भोवती बंगालच्या विद्वान मुसलमानांचा जथा जमवला होता. खान बहाद्दूर नबाब अमीर अली हे या असोसिएशनचे पहिले अध्यक्ष. ते फार पुरातन काळापासून हिंदुस्तानात स्थायिक झालेल्या जुन्या पर्शियन कुटुंबाचे वंशज होते. त्यांची पिढी म्हणजे बगदादचे काझी म्हणून काम केल्यानंतर नशीब काढण्याकरता जन्मभूमी सोडून हिंदुस्तानात आलेल्या काझी सय्यद नोआ यांची नववी पिढी होय. ते अरेबिक, पर्शियन व उर्दू या भाषात निष्णात होते. १८७५ मध्ये ब्रिटिश सरकारने त्यांना नबाब ही पदवी बहाल केली होती.

प्रकरण सहावे

# नोकऱ्याबाबत निराशा आणि बदललेले दृष्टीकोन

मुसलमानांचा मागासलेपणा आणि वरच्या दर्जाच्या नोकऱ्या मिळवण्यातील त्यांचे अपयश चालूच राहिले. त्यामुळे सर सय्यद व अमीर अली यांना पुन्हा पुन्हा आपले धोरण बदलण्यास, जातीयवादापेक्षा एकंदर परिस्थितीच कारणीभूत झाली. आणि शेवटी केवळ स्वतःच्या जातीच्या दृष्टीनेच त्यांना विचार करावा लागला. ते जातीयवादी बनले. पण असा निर्णय घेताना कुणालाही त्यांच्याकडे सहानुभूतीनेच पहावे लागेल.

१८६८ मध्ये, सर सय्यद यांना असे वाटले की, हिंदी लोकांना इंडियन सिव्हिल सर्व्हिस (आय. सी. एस.) यात नोकऱ्यांचा वाटा मिळाला पाहिजे, आणि म्हणून त्यांना इंग्लंडला जाणे आणि स्पर्धेच्या परिक्षेस बसणे सुलभ केले गेले पाहिजे. त्या काळात हिंदी मुलकी खात्यातील नोकऱ्या ही युरोपियन लोकांची मक्तेदारी होती. यासंबंधात केलेल्या त्यांच्या सूचनेचे पुढे काय झाले, आणि नंतर ती फक्त मुसलमानां-पुरतीच संकुचित का केली गेली, हे त्यांच्या स्वतःच्याच शब्दात उदधृत करणे बरे : 'फार पूर्वी १८६८ मध्ये, हिंदी लोकांनी युरोपचा प्रवास करण्यास तयार व्हावे यासाठी आम्ही एक मंडळ स्थापन करण्याचा प्रयत्न केला. मंडळाच्या सभासदाची वर्गणी दोन रुपये ठेवली होती. आणि या वर्गणीतून फंड जमल्यानंतर योग्य हिंदी लोकांना, हिंदू व मुसलमान दोघांनाही, युरोपच्या प्रवासास तयार करण्यात येणार होते. पण दुर्दैवाने ही योजना अयशस्वी झाली. याचे उघड कारण म्हणजे आमच्या देशातल्या हिंदुनी या प्रवासाकडे, आपल्या धर्माला व जातीला धक्का लावणारा म्हणून पाहिले, आणि मुसलमानही फाजील धर्माभिमानाला बळी पडले. पण खरे महत्वाचे कारण असे होते की, युरोपचा प्रवास फार कठीण आहे असा हिंदी लोकांचा समज होता.······ काही काळानंतर इतर जातींनी प्रयत्न केला आणि ते सनदी परिक्षा उत्तीर्ण झाले.······ पण आजतागायत असा एकही मुसलमान झाला नाही की, त्याने सनदी खात्यात अधिकाराची जागा मिळवली आहे. म्हणून लंडनमध्ये होणाऱ्या या परिक्षेस निवडक मुसलमान उमेदवारांना पाठवता यावे यासाठी आम्ही एक फंड उभारण्याचे ठरवले आहे.······ अलिकडे मुलकी खात्याची परिक्षा फार कठीण झाली आहे यात शंका नाही; आणि त्याची वयोमर्यादा २१ वरून १९ वर आल्यापासून तर ती उत्तीर्ण होणे फारच कठीण झाले आहे. माझी स्मरणशक्ती

बरोबर काम देत असेल तर, ही वयोमर्यादा कमी केल्यापासून फक्त एकाच हिंदी माणसाला या खात्यात प्रवेश मिळाला आहे. त्यापूर्वी मात्र १०-१२ हिंदी लोकांनी यात यश मिळवले होते आणि त्यातील बहुतेक बंगाली होते.'[१]

महॉमेडन सिव्हिल सर्व्हिस असोसिएशन १८८३ मध्ये स्थापन झाली पण ती परिणामकारक ठरू शकली नाही. ज्यावेळी ही असोसिएशन स्थापन झाली त्यावेळची परिस्थिती अशी होती की, लोकांना निराशेने ग्रासले होते आणि तिला वाचा फुटली होती. अमीर अलीसारख्या माणसांचा स्पर्धा पद्धतीवरचा विश्वास आधीच उडाला होता. १८८२ मध्ये अमीर अलींनी 'मुसलमानांच्या तक्रारी व हक्क' याविषयी एक 'व्यापक निवेदन' तयार केले होते, आणि ते मुसलमानांच्या सरकारी नोकऱ्यांच्या हक्काला मान्यता मिळावी या विनंतीसह, सेंट्रल असोसिएशनच्यावतीने व्हाइसरॉय लॉर्ड रीपन याला सादर केले होते. महॉमेडन असोसिएशन व हिंदी असोसिएशन मधला फरक हाच होता. स्पर्धा परिक्षा इंग्लंडबरोबर हिंदुस्तानातही घ्यावी व उमेदवारांची वयोमर्यादा वाढवावी अशी हिंदी असोसिएशनची मागणी होती तर स्पर्धापद्धतीऐवजी निवडपद्धतीमधून मुसलमानांकरिता सरकारी नोकऱ्यांची मागणी महॉमेडन असोसिएशन करीत होती. अमीर अलींची अशी तक्रार होती की, '१८६५ पर्यंत सरकारने मुसलमान व ब्राम्हणी लोकात योग्य समतोल राखला. पण त्यानंतर धोरणात फार मोठा बदल झाला आणि मुसलमानांना असे आढळून आले की, आपल्यापेक्षा परिस्थितीशी अधिक जुळवून घेणाऱ्या आपल्या देशबांधवाकडून सार्वजनिक नोकऱ्यांतून आपण हळूहळू हाकलले गेलो आहोत.'[२]

अमीर अलींच्या निवेदनाची संबंधित अधिकाऱ्यांनी कसून तपासणी केली पण त्याला अनुकूल असा ठराव मंजूर करण्यासाठी हिंदुस्तान सरकारला, १७ जुलै १८८५ उजाडले. गव्हर्नर जनरल इन् काउन्सिलनी त्या तारखेच्या आपल्या ठरावात असे म्हटले आहे की : 'बऱ्याचशा नेमणूका बहाल करणे हे स्थानिक सरकार, वरिष्ठ न्यायालय किंवा स्थानिक अधिकारी यांच्या हातात असते. गव्हर्नर जनरल इन् काउन्सिलची अशी इच्छा आहे की, ज्या प्रांतात मुसलमानांना सरकारी नोकऱ्यातील त्यांचा वाटा संपूर्णपणे मिळत नाही, त्या प्रांतातील स्थानिक सरकार आणि वरिष्ठ न्यायालय संधी मिळेल तशी ही विषमता कमी करण्याचा प्रयत्न करतील आणि आपल्या दुय्यम अधिकाऱ्यांवरही या धोरणाचे महत्व ठसवतील. सरकारी कचेऱ्यातून नोकरीस लागलेल्या मुसलमानांच्या आकड्याकडे प्रांतिक राज्यकारभाराच्या वार्षिक अहवालातून लक्ष वेधल्यास ते उपयुक्त ठरेल.'

बंगाल सरकारच्या नोकरीत असलेल्या मुसलमानांच्या अत्यंत प्रतिकूल आकड्यामुळे मुख्यतः अमीर अलीना तक्रारीला कारण मिळाले. म्हणून त्या प्रांतातील खरी

१. महॉमेडन एज्युकेशन कॉन्फरन्सचा अहवाल, १८८७, (परिशिष्ट पृ. ३८).

२. हिंदी मध्यवर्ती कमिटी अहवाल—१९२८–२९, डॉ. अबदुल्ला-अल्-मॉमन सुऱ्हावर्दी यांची पुरवणी.

परिस्थिती आणि त्याची कारणे तपासून पहाणे योग्य होईल. हिंदुस्तान सरकारची इच्छा अंमलात आणण्याच्यादृष्टीने नोकऱ्यांसाठी मुसलमानांचा कितपत उपयोग करून घेतला जात आहे याबद्दल बंगाल सरकारने खाते प्रमुखाकडे विचारणा केली. त्यांच्या अहवालावरून असे दिसून आले की, चोवीस परगण्यात सरकारी कचेऱ्यातील एकंदर २१५ अधिकाऱ्यांपैकी फक्त ६ मुसलमान होते. कमी अधिक फरकाने हेच प्रमाण बंगालच्या इतर जिल्ह्यात होते. कलकत्त्यातील कित्येक कचेऱ्यात तर एकही मुसलमान नोकरीस नव्हता.

बंगाल सरकारच्या ८ ऑक्टोबर १८८६ च्या ठरावात नमूद केल्याप्रमाणे 'या विषमतेचे कारण मुख्यत: मुसलमानी मनाच्या धारणेतच शोधले पाहिजे. ते आपल्या मुलांना हिंदुप्रमाणे इंग्रजी शिक्षण न देता हल्ली व्यवहारात कमी उपयुक्त असलेले पर्शियन आणि अरेबिक शिक्षण देण्याचे पसंत करतात. एवढेच नव्हे तर जे मुसलमान आधुनिक काळात वापरात नसणाऱ्या जुन्या भाषा शिकतात त्यांनाही या प्रत्यक्ष फायद्याच्या अभ्यासात लक्ष घालण्यास कमी वेळ मिळतो.' [३]

यापूर्वी काही वर्षे, अँग्लो ओरिएन्टल कॉलेज फंड कमिटीच्या चालक मंडळानी शिक्षण कमिशनचे अध्यक्ष म्हणून दिलेल्या मानपत्राला उत्तर देताना डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर यांनी जवळजवळ हाच अभिप्राय व्यक्त केला होता. ते म्हणाले होते : 'मुसलमानांच्या उच्च शिक्षणाला बाधणाऱ्या खास अडचणीबद्दल प्रत्येक प्रांतात कमिशनला बरेच ऐकावे लागले आहे. जवळजवळ सर्वच प्रांतात असे दिसून येत आहे की, आपल्या प्राथमिक शाळेत हुशार आणि उत्सुक अशी पुष्कळ मुसलमान मुले असतात. पण माध्यमिक शाळेत त्यांचा आकडा कमी होत जातो. हा आकडा पुढे इतका कमी होतो की, हिंदुस्तानच्या काही भागातील कॉलेजात मुसलमान क्वचितच आढळून येतात. या वस्तुस्थितीची अनेक कारणे निवेदनांच्या आणि प्रत्यक्ष साक्षीपुराव्याच्याद्वारे पुढे मांडली गेली आहेत. पण या स्पष्टीकरणात बहुतेक सर्व ठिकाणी मुसलमान जनतेच्या दारिद्र्याच्या आणि त्यांच्या धार्मिक गरजेच्या सबबी पुढे केलेल्या आढळून येतात······ "निधर्मी शिक्षण सुरू करण्यापूर्वी मुसलमान मुलाला मशिदीत किंवा कुठल्यातरी मुसलमानी संस्थेत जाऊन त्याच्या धर्माच्या मूलतत्त्वांचे शिक्षण घ्यावे लागते. हे जबरदस्त ओझे शिरावर घेऊनच तो आपल्या प्राथमिक शाळेत येतो. आणि मग या मुसलमान तरुणांना, माध्यमिक शिक्षणाच्या शाळेत, निधर्मी शिक्षणाच्या राजरस्त्यावर चमकण्याऐवजी धार्मिक शिक्षणाच्या गल्ल्याकुचातून जाण्याचा मोह होतो. खरे बोलायचे तर हिंदू तरूण मुलगा जेव्हा निधर्मी पातळीवर एकाच प्रकारचे शिक्षण मिळवण्यात आपली सर्व शक्ती वेंचत असतो तेव्हा मुसलमान तरूण धार्मिक आणि निधर्मी या दोनही पातळीवर भिन्न प्रकारचे शिक्षण मिळवण्यास धडपडत असतो.' [४]

---

३. अलिगड इन्स्टिट्यूट गॅझेट—ऑक्टोबर १९, १८८६.

४. अलिगड इन्स्टिट्यूट गॅझेट—ऑगस्ट ८, १८८२.

पण सेंट्रल महॉमेडन असोसिएशनच्या शाखांनी आपल्या कलकत्त्याच्या मुख्य कचेरीकडे वेळोवेळी पाठवलेल्या अहवालात, मुसलमानांकडे नेमणूक अधिकारी मुद्दाम दुर्लक्ष करीत आहेत अशी तक्रार केली होती. सेंट्रल असोसिएशननेसुद्धा आपल्या १८८५ ते १८८८ च्या अहवालात असे म्हटले होते की, : मुसलमानांचे नेहमीचे हक्क लायक उमेदवाराचे म्हणून त्यांचे रास्त असलेले हक्क, यांच्याकडे खात्याच्या अधिकाऱ्यांनी काहीतरी गडबडगुंडा करून केलेल्या संपूर्ण दुर्लक्षाची आणि पायमल्लीची उदाहरणे असोसिएशनला माहित आहेत.'[५] ही उदाहरणे अहवालात उद्‌धृत केलेली नसल्यामुळे ही तक्रार मान्य किंवा अमान्य करणे कठीण आहे.

पण १८८८ च्या मार्चमध्ये असोसिएशनने, बंगालच्या लेफ्टनंट गव्हर्नरला (यात बिहार आणि ओरिसाचाही समावेश आहे.) सादर केलेल्या निवेदनावरून असे दिसते की, बंगाल व्यतिरिक्त इतर प्रांतातल्या मुसलमानांना तक्रार करण्यास काही कारण नव्हते. निवेदनात असे म्हटले आहे की, : 'मुंबई आणि मद्रास इलाख्यात सनदी मुलकी नोकऱ्यात (Statutory Civil Services) हिंदु मुसलमानांचे प्रमाण अतिशय योग्य आहे. आणि वायव्य प्रांतात हा आकडा समसमान आहे. फक्त बंगालमध्येच तेवढे, या खात्यातील हिंदू मुसलमानांचे प्रमाण नवास दोन इतके विषम आहे. आणि हे इतके विषम प्रमाण माननीय लेफ्टनंट गव्हर्नरसाहेबांच्या लक्षातून सुटणे शक्य नाही. मुंबई, मद्रास इलाख्यातील आणि वायव्य प्रांतातील सनदी मुलकी खात्यातील मुसलमानांचे प्रमाण व बंगालमधील प्रमाण यात इतका फरक पडण्याचे कारण म्हणजे या प्रांतांच्या सरकारांनी उमेदवारांची निवड त्यांना अनिश्चित अशा स्पर्धेच्या परिक्षेला बसवून करण्याऐवजी त्यांच्या लायकीप्रमाणे व गुणांप्रमाणे करण्याचे चालू ठेवले हे होय. स्पर्धेच्या परिक्षा घेऊन लायकी अगर गुण ठरवणे ही कसोटी अत्यंत फसवी आहे या गोष्टीकडे नामदारांचे लक्ष वेधण्याचे औचित्य केले पाहिजे असे नाही मुसलमानांच्यादृष्टीने तर ती अतिशयच अनिश्चित आणि दुर्दैवी कसोटी आहे.'[६]

हिंदुस्तान सरकारचा हा ठराव 'सनदी मुलकी नोकरांच्या नेमणुका कोणत्या पद्धतीने केल्या जातील हे सांगण्याच्या हेतूने केला नसून तात्कालिक प्रसंगाला तोंड देण्यासाठी केला आहे'[७] असे सांगून लेफ्टनंट गव्हर्नरने हे निवेदन फेटाळून लावले. या उत्तरामुळे अमीर अली आणि त्यांची असोसिएशन आपल्या ध्येयाबद्दल अधिक जागरूक बनली आणि त्यांनी आपल्या शाखांना याच एका ध्येयासाठी एकजूट करण्याचा आदेश दिला.

वर नमूद केलेल्या घटनांवरून हे स्पष्ट दिसते की, बंगालच्या मुसलमानांच्या

---

५. सेंट्रल नॅशनल महॉमेडन असोसिएशन कमिटीचा वृत्तांत १८८५–१८८८, पृ. १५, नॅशनल लायब्ररी, कलकत्ता येथे मिळते.

६. कित्ता, पृ. १७.

७. कित्ता, पृ. १८.

तक्रारी, सर सय्यद यांचे प्रभुत्व असलेल्या उत्तर हिंदुस्तानच्या मुसलमानांपेक्षा निराळ्या होत्या. उत्तर हिंदुस्तानातील प्रदेशात हिंदी मुलकी खात्यातील नोकऱ्यांपेक्षा कनिष्ठ दर्जाच्या नोकऱ्यात मुसलमानांचे प्रमाण कितीतरी अधिक होते. त्यामुळे पुढे सर सय्यद आणि त्यांच्या अलिगड गटाने हिंदी मुलकी खात्यातील नोकऱ्यांसाठी, स्पर्धा परिक्षा पद्धतीला विरोध करणाऱ्या अमीर अलींच्या डावपेचांना मान्यता का दिली असावी याचे कारण ध्यानात येते. पण प्रत्यक्षात मात्र या दोनही प्रकारच्या तक्रारींचे स्वरुप एकच होते : मुसलमानांचा हिस्सा हिंदू बळकावून घेत होते. ही भावना हिंदुधर्म व इस्लाम यांच्यातील शत्रुत्वाने निर्माण झाली नव्हती; तर लहानपणी अगदी सुरुवातीलाच धार्मिक शिक्षणावर भर दिला जात असल्यामुळे वरिष्ठ दर्जाच्या नोकऱ्यांकरिता मुसलमानांची तयारीच होत नव्हती.

खुद्द मुसलमानांच्याही हे लक्षात आले होते आणि मोठमोठ्या अधिकाऱ्यांना मानपत्रे देताना, त्यांनी ते वारंवार उघडपणे कबूलही केले होते. अलिगड येथे महॉमेडन अँग्लो ओरिएन्टल महाविद्यालयाची आणि देशात इतर ठिकाणी मुसलमानी माध्यमिक शाळांची स्थापना, याच्या जोडीला अलिगड महाविद्यालयाचे विद्यापीठात रुपांतर यावरून निधर्मी शिक्षणासाठीसुद्धा मुसलमानांना वेगळ्या संस्था पाहिजे होत्या असे सिद्ध होत नाही हे पुढे लक्षात येईल. ज्या थोड्या नवीन वेगळ्या संस्था स्थापन झाल्या होत्या त्या मुसलमानांच्या धार्मिक गरजेतून नव्हे तर मुसलमानांना शिक्षणाच्या सवलती कशा मिळतील या काळजीतून निर्माण झाल्या होत्या. या संस्थांमध्ये धार्मिक शिक्षणाचे वर्चस्व नव्हते. १८८७ च्या मुस्लिम शिक्षण कॉंग्रेसने अलाहाबाद विद्यापिठाच्या स्थापनेचे मोठ्या उत्साहाने स्वागत केले, आणि तिने वायव्य प्रांताच्या लेफ्टनंट गव्हर्नरला एक आणि विद्यापिठाच्या व्हाइस चान्सेलरला एक अशी दोन निवेदने पाठवण्याचा निर्णय घेतला. या निवेदनात 'उच्च इंग्रजी शिक्षण' देण्याकडे जास्त लक्ष दिले जावे अशी विनंती केली होती. या उत्साहात सामील होताना सर सय्यद म्हणाले की, देशाला विशेषतः मुसलमान समाजाला 'उच्च इंग्रजी शिक्षणाची' गरज आहे.'[८] कुठल्याही शाळेची महाविद्यालयात परिणत होण्याची महत्वाकांक्षा जितकी नैसर्गिक होती तितकीच ती अलिगड महाविद्यालयाची विद्यापिठात परिणती होण्यात होती. अलिगड मुस्लिम विद्यापीठ अस्तित्वात येण्यापूर्वीच बनारसच्या सेंट्रल हिंदू महाविद्यालयाचे रुपांतर बनारस विद्यापिठात होऊन त्याचे ध्येय परिपूर्तीस आले होते.

पदवी परीक्षेसाठी अलिगड महाविद्यालयाने बरेच मुसलमान आपल्याकडे ओढून घेतले हा सर्वसामान्य समज खरा नाही. १८९८ ते १९०२ या काळातील एकत्र केल्या गेलेल्या आकड्याप्रमाणे हिंदुस्तानात एकंदर १,१८४ मुसलमान पदवीधर होते. त्यापैकी अलिगडचे २२०, अलाहाबादचे ४१०, कलकत्त्याचे ३९८ आणि पंजाबचे

८. महमिडन एज्युकेशन कॉन्फरन्सचा वार्षिक अहवाल—१८८७.

२५५ होते. १८९०–९१ मध्ये अलिगडने आपला पहिला विद्यार्थी एम्. ए. परीक्षेसाठी पाठवला. १८९१–९२ ला दोन, नंतरच्या दोन वर्षात कुणीच नाही, आणि परत १८९४–९५ ला दोन पाठवले. १९०१–०२ पर्यंत हा आकडा १ पर्यंत खाली आला, आणि १९०२–०३ ला तर तो शून्यावर येऊन ठेपला. १८८२ ते १८८७ च्या दरम्यान ज्यावेळी सरकारी खात्यात मुसलमानांना नोकऱ्यात घेण्यासाठीचा प्रचार तीव्र होता त्यावेळी अलिगड विद्यालयाने फक्त १० च पदवीधर निर्माण केले.[९] म्हणून, मुसलमानांना शिक्षण देण्यातील अलिगडचा वाटा सर सय्यद यांच्या हयातीत खरोखरी उपेक्षणीय होता. आणि अलिगड चळवळीशिवाय मुसलमानांना उच्च शिक्षण मिळालेच नसते असे समजण्याला काही आधार नाही.

ही समजूत दृढ व्हावी असे वाटणाऱ्यात अलिगड महाविद्यालयाचे इंग्रज प्राचार्य प्रमुख आणि लक्षणीय होते. थिओडोर मॉरीसन या दुसऱ्या प्राचार्यांनी सांप्रदायिक संस्थांचा प्रचार केला : 'माझे असे मत आहे की, फार मोठ्या प्रमाणावर ज्याची अंमलबजावणी करता येईल असा एक सर्वसाधारण सिद्धांत हा होय की, विद्यापीठ हे जमातीचे विद्यापीठ असावे; प्रादेशिक विभागांचे नसावे; उदाहरणार्थ, मुसलमानांकरिता, पारश्यांकरिता, पूर्व भारताच्या हिंदूंकरिता अशी विद्यापीठे असावीत; पण पंजाब किंवा मद्रास किंवा मुंबईकरिता असे प्रादेशिक विद्यापीठ नसावे.'[१०] अनुकरण करण्यास योग्य म्हणून त्यांनी बनारसचे सेंट्रल हिंदू महाविद्यालय आणि अलिगडचे महॉमेडन महाविद्यालय या दोन महाविद्यालयांची उदाहरणे दिली. आणि म्हटले 'इंग्रजी शिक्षण घेतलेल्या अनेक मुसलमानांचे इतर क्षेत्रातील गुण निर्विवाद असले, तरी ते धर्माची उपेक्षा करीत आहेत आणि त्यातील बऱ्याच जणांचा धर्मावरचा विश्वास उडाला आहे, याची जाणीव मला अपरिहार्यपणे होत आहे. निःसंशय ही गोष्ट अनिष्ट होय आणि ती इंग्रजी शिक्षणाच्या प्रसाराबरोबर वाढत आहे.'[११]

अलिगड गोंधळाच्या भोवऱ्यात सापडले होते. धार्मिक शिक्षणावर वाजवीपेक्षा अधिक भर, हे मुसलमानात असलेल्या उच्च इंग्रजी शिक्षणाच्या अभावाचे कारण होते, परंतु त्याचवेळी एम्. ए. ओ. महाविद्यालयाचे इंग्रजी प्राचार्य, वाढत चाललेल्या राजकीय जाणीवेच्या लाटेपासून मुसलमान विद्यार्थ्यांना थोपवून धरण्यासाठी त्यांना केवळ धार्मिक वेगळेपणाची शिकवण देत होते. महाविद्यालयाचा उद्देश जरी इंग्रजी शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्याचा होता तरी राजकारण व देशभक्ती याविरूद्ध वातावरण निर्माण करण्यावर भर दिला जात होता. अलिगड इन्स्टिटयूट गॅझेट

९. थिओडोर मॉरिसन कृत द हिस्ट्री ऑफ द महॉमिडन अँग्लो ओरिएन्टल कॉलेज, अलिगड, फ्रॉम इटस् फाऊन्डेशन टू द ईयर १९०३, पृ. ६३. लिटन लायब्ररी, अलिगड युनिव्हर्सिटी, येथे मिळेल.

१०. कित्ता, पृ. ३०.

११. कित्ता, पृ. ३१.

स्वतःला शैक्षणिक विषयात वाहून घेण्याऐवजी राजकीय कार्याची विटंबना करण्यात व त्याला शिव्या देण्यात गुंग झाले होते. या कार्याचा निषेध करणारे लेख गॅझेट छापत असे व पुर्नमुद्रित करत असे गॅझेटच्या कुठल्याही अंकात आणि त्याच सुमारास कॉलिजच्या आवारात दिल्या गेलेल्या भाषणात, स्पर्धेच्या जगातील जीवनासाठी मुसलमानाला तयार करण्याचा प्रयत्न क्वचितच आढळून येतो. याच्या उलट, त्यांना असे सांगितले जात असे की, त्यांनी सरकारशी मनापासून सहकार्य आणि ब्रिटिशांशी एकनिष्ठता दाखवल्यास त्यांना सरकारी नोकऱ्या आपोआप मिळतील. महाविद्यालयीन अधिकाऱ्यांच्या उत्तेजनाखाली स्पर्धेच्या परिक्षांविरुद्ध आणि राजकीयदृष्टचा जागरूक असलेल्या संस्थांनी केलेल्या सनदी खात्याच्या परिक्षा इंग्लंड व हिंदुस्तानात एकदम घ्याव्या या मागणीविरुद्ध मोहिमा सुरू केल्या गेल्या. अशाच एका मोहिमेचा १ सप्टेंबर १८९३ च्या अलिगड इन्स्टिटयूट गॅझेटमध्ये आलेल्या वृत्तांताचा मासला पहा : 'इंग्लंड आणि हिंदुस्तान या दोन्ही देशात एकदम परिक्षा घेण्याच्याविरुद्ध पार्लमेंटला निवेदन करण्यासाठी स्थानिक मुसलमान जमातीची एक प्रचंड जाहीर सभा काल संध्याकाळी झाली. कला आणि कायद्याचे पदवीधर सय्यद निझामुद्दीन हे अध्यक्षस्थानी होते. सभेला सहानुभूतीदर्शक अशा अनेक तारा व पत्रे वाचून दाखवण्यात आली. श्री. महम्मद यासीन यांनी ठराव मांडला की, "देशाच्या आजच्या परिस्थितीत एकदम परिक्षा अयोग्य होतील हे विचारात घेऊन ही सभा अशी विनंती करीत आहे की, हाऊस ऑफ कॉमन्सने तिच्या इष्टतेला मान्यता देणारा ठराव अंमलात आणू नये.' आपल्या जोरदार व लांबलचक भाषणात त्यांनी, भारतीय सुशिक्षितात दोन गट पडले असल्याचे सांगितले. एक देशाची प्रगती राज्यकर्त्यांच्या हातात विश्वासाने सोपवून देणारा नेमस्त मुसलमानांचा व दुसरा स्वतःला देशाचे भवितव्य ताब्यात ठेवण्याची हिंमत आहे अशी आढयता बाळगणाऱ्या, संपूर्ण शरणागतीची मागणी करणाऱ्या, भडक जहालवादी बाबू लोकांचा आणि ब्राम्हण लोकांचा.

हे दोन मुसलमान पुढारी आता ओळखू न येण्याइतके बदलून गेले होते. प्रथम हिंदी विद्यार्थ्यांना आणि नंतर केवळ मुसलमान विद्यार्थ्यांना आय. सी. एस. च्या परीक्षांना तयार करण्यासाठी फंड उभारणारे सर सय्यद यांनी आता आपली भूमिका पूर्ण उलट केली आणि मुसलमानांकरिता नोकऱ्यांच्या वाटणीची मागणी करणाऱ्या अमीर अलींनी मुसलमानांना कायदेमंडळात निराळे प्रतिनिधीत्व असावे या मागणीपर्यंत मजल मारली.

---

प्रकरण सातवे

# मुसलमान आणि राष्ट्रवाद

## दोन संप्रदाय–१

हिंदुस्तानात राजकीय जागृतीची सुरवात प्रथम राजा राममोहन रॉय आणि त्यांचा ब्रम्हो समाज यांच्यापासून झाली असे मानले जाते. त्यांनी धार्मिक सुधारणांबरोबर स्वातंत्र्य आणि समता या राजकीय कल्पनांचा प्रसार केला. त्यांचे कार्यक्षेत्र बंगाल होते. तो प्रांत ब्रिटीश राजवटीखाली प्रथम आला असल्यामुळे राजकीय जाणिवेत इतर प्रांतांच्या पुढे होता.

बंगालमध्ये १८३७ मध्ये सनदशीर राजकारणाची सुरवात जमिनदारी असोसिएशनच्या स्थापनेपासून झाली, असे मानण्यास हरकत नाही. कालांतराने आणखी संस्था उदयास आल्या. १८४३ च्या एप्रिलमध्ये बंगाल ब्रिटिश इंडिया सोसायटी व १८५१ ऑक्टोबरमध्ये ब्रिटिश इंडियन असोसिएशन स्थापन झाली. या संस्थांचे पुढारीपण ब्रम्होसमाजाच्या प्रमुख सभासदांकडे होते. ब्रम्होसमाज मुस्लिमविरोधी नव्हता व मुसलमानांना आपल्यात घेण्यास तो आनंदाने तयार होता. परंतु ब्रम्ह-समाजी संप्रदाय हा सुधारलेला हिंदुधर्मच मानला जात असल्यामुळे मुसलमानांना त्याचे आकर्षण नव्हते. सर्व राजकीय संघटना निधर्मी होत्या, आणि मुसलमानांसकट सर्व जमातींना त्यात प्रवेश होता. परंतु राजकीय जागृतीच्या वाढीची ती दशके आणि वहाबी चळवळीचा उगम व मुसलमानांचा इंग्रजी शिक्षणावरचा बहिष्कार ही एकदमच आली. वरच्या वर्गाचे हिंदू शिक्षणदृष्टया, आर्थिकदृष्टया व राजकीयदृष्टया वरचढ होते. त्यांनी ब्रिटिश राजवटीबद्दलच्या मुसलमानांच्या अप्रितीबद्दल खंत व्यक्त केली.

तरीसुद्धा, ज्या वातावरणात राजकीय जाणीव वाढत होती ती हिंदू वळणापासून संपूर्णतः अलिप्त नव्हती. राम मोहन रॉय यांनी आपल्या आद्य इंग्रजी संस्थेला 'हिंदू कॉलेज'[१] असे नाव का दिले याबद्दल फक्त तर्कच करावा लागेल. इंग्रजी-पद्धतीच्या शिक्षणाकडे मुसलमान विरोधीवृत्तीने पाहतात हे माहित होते म्हणून? की, सरकारी नोकऱ्या आणि जमिनदारीचे हक्क यांच्यावरून हिंदू आणि मुसलमान वरिष्ठ वर्गात वैशिष्टयपूर्ण फरक पडला म्हणून? राजकीय संस्थांचे सभासद केवळ हिंदूंनीच व्हावयाचे ही एक जणू काय नैसर्गिक गोष्टच समजून मुसलमानांनी त्यात प्रवेश केला नाही. आणि त्याची त्यांनी कधी फिकीरही केली नाही. राष्ट्राभिमान

---

१ पहा पृ. २

आणि देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी त्यावेळच्या काही कट्टर देशभक्तांनी वार्षिक उत्सव सुरू केला. त्याला त्यांनी हिंदू मेळा (हिंदू जत्रा) असे नाव दिले सुरेंद्रनाथ बानर्जी यांचा हिंदी राजकीय क्षेत्रात उदय होईपर्यंत मुसलमानांना कोणी बोलावलेच नव्हते. बानर्जींनी आपल्या इंडियन असोसिएशन या नवीन संस्थेच्या उद्देशात 'हिंदू आणि मुसलमानात स्नेहसंवर्धन वाढावे'[२] याचा समावेश केला, आणि समान ध्येयासाठी हिंदूबरोबर हातमिळवणी करण्यास आवाहन केले. पण त्यांना प्रतिसाद मिळाला नाही.

हिंदी लोकांना विधी मंडळात प्रतिनिधित्व मिळावे ही कल्पना १८८३ च्या सुमारास धाडीला लागली होती. त्यावर्षी अलिगडच्या महॅमेडन अँग्लो ओरिएन्टल कॉलेजचे प्राचार्यपद थिओडोर बेक या इंग्रज गृहस्थाकडे आले आणि हिंदुस्तानात येण्यास निघण्यापूर्वी त्यांनी इंग्लंडमध्ये एक भाषण केले. त्यात त्यांनी हिंदी आकांक्षाबद्दल असे उद्‌गार काढले होते की : 'संसदीयपद्धति हिंदुस्तानला मुळीच मानवणारी नाही आणि प्रातिनिधीक संस्था दाखल केल्या तर तो प्रयोग फसेल. मुसलमानांना हिंदूंच्या बहुमताखाली रहावे लागेल आणि ही गोष्ट मुसलमानांना मुळीच आवडणार नाही, इतकेच काय पण माझी खात्री आहे की, ते ती शांतपणे कधीच मान्य करणार नाहीत.'[३]

नंतर त्याचवर्षी अशीच मते सर सय्यद यांनी व्यक्त केली. ते म्हणाले : 'माझी अशी खात्री आहे की, अगदी स्थानिक कारभारातसुद्धा प्रातिनिधिकपद्धती संपूर्णपणे अवलंबिता येईल इतकी प्रगती अजून हिंदुस्तानच्या कुठल्याही भागाची झालेली नाही. निरनिराळ्या जातींच्या आणि पंथांच्या फार मोठ्या लोकसंख्येने हिंदुस्तान जणू काय एक खंड म्हणूनच बसलेला आहे; धार्मिक संस्थांच्या कडक सोवळेपणाने शेजाऱ्या-पाजाऱ्यांनासुद्धा एकमेकापासून दूर ठेवले आहे. जाती व्यवस्था अजूनही प्रबळ आणि वरचढ आहे ...... जनतेचा एक विभाग दुसऱ्यापेक्षा संख्येने अधिक मोठा असू शकेल आणि इतरांच्या मानाने तो ज्ञानाने पुढारलेला असेल. स्थानिक संस्था आणि जिल्हा मंडळे यात प्रतिनिधित्व मिळवण्याच्या महत्वाबद्दल एक जमात संपूर्ण जागरूक असेल आणि दुसरी असल्या गोष्टींबद्दल कदाचित पूर्णपणे उदासीन असेल ....... निवडणुकीवर अधिष्ठित असलेली प्रातिनिधिकपद्धति म्हणजे बहुसंख्य असलेल्या लोकांच्या हितसंबंधांचे आणि मतांचे प्रतिनिधित्व करणे होय.'[४]

दोन वर्षानंतर १८८५ मध्ये, त्यावेळचे व्हाइसरॉय लॉर्ड डफरीन यांच्या सक्रीय उत्तेजनाने हिंदी राष्ट्रसभा ही राष्ट्रीय राजकीय संस्था उदयास आली. हे व्हाइसरॉय

२. आर. सी. पालीत यांचे Speeches of Surendranath Banerjea (प्रस्तावना).

३. मोहंमद नोमन, 'मुस्लिम इंडिया' यात उद्‌धृत केलेले, पृ. ५२.

४. सेंट्रल प्रॉव्हिन्स लोकल सेल्फ–गव्हर्नमेंट बिलावर केंद्रिय कायदेमंडळात केलेले भाषण. नोमनमध्ये उद्‌धृत केलेले, पृष्ठ ३४.

सरकारला होणाऱ्या हिंसक विरोधाला घटनात्मक मार्गाचे वळण लावण्यास उत्सुक होते. परंतु, खरोखरी ए. ओ. ह्युम या पूर्वाश्रमी सनदी नोकर असलेल्या गृहस्थांनी ही कल्पना काढली आणि आपल्या अविरत कार्याने तिला मूर्त स्वरुप दिले. राष्ट्र-सभेच्या अधिवेशनाला हजर असणाऱ्या सत्तर प्रतिनिधीत आर. एम. सयानी व ए. एम. धरमसी हे फक्त दोनच मुसलमान होते. दोघेही मुंबई विद्यापिठाचे पदवीधर होते, हायकोर्टाचे नामवंत वकील होते आणि नगरपालिकेचे सभासद होते.

काँग्रेसच्या (राष्ट्रसभा) स्थापनेच्या बातमीकडे ब्रिटनमधील कॉन्झर्व्हेटीव्ह मताच्या लोकांनी मोठ्या सचिंत वृत्तीने आणि विरोध भावनेने पाहिले. 'द टाइम्स' हे त्यांचे अतिशय स्पष्टवक्ते मुखपत्र. पहिल्या काँग्रेसवर टीका करताना इच्छापूर्तीच्या भावनेने त्याने असे म्हटले होते की, सभेच्या कामकाजात एकाही मुसलमानाने भाग घेतला नव्हता······ सर्व मुसलमान लोकांनी तिच्याशी कुठलाही संबंध ठेवण्याचे नाकारले ही गोष्ट पुरेशी अपशकूनकारक आहे.'[५] खरं म्हणजे एकही सभा घेतली गेली नव्हती आणि एकही ठराव संमत केला गेला नव्हता. तरीही मुसलमान जमातीने काँग्रेसशी 'कुठलाही संबंध ठेवण्याचे नाकारले' असे टाईम्सने आपल्या वाचकास सांगितले!

टाइम्सने अशी शत्रुत्वाची भूमिका का घेतली हे त्यांच्या अग्रलेखाने बाहेर आले. काँग्रेसने आपल्या प्रमुख ठरावात अशी मागणी केली होती की, 'वरिष्ठ आणि अस्तित्वात असलेल्या विधी मंडळात योग्य प्रमाणात लोक प्रतिनिधीचा समावेश करून ती वाढवावी व सुधारावी' आणि 'सर्व अंदाजपत्रके या विधी मंडळाकडे विचारासाठी पाठवली जावी.' या मागणीवरची टाइम्सची प्रतिक्रिया अशी होती : 'हे सुचवलेले बदल जरी काँग्रेसच्या उघड उघड असलेल्या ध्येयापर्यंत पोचत नाही तरीसुद्धा ते कार्यकारिणीचा जोम कमी करतील आणि सरकारचा कारभार पूर्वी कधी नव्हता इतका कठीण करण्याचे कार्य खचित करतील. व्हाइसरॉयच्या मंडळात काही देशी सभासदांचा आधीच समावेश आहे. हे मंडळ निवडून आलेल्या सभासदांना खुले करणे आणि अल्पसंख्यांकांना आपले म्हणणे संसदीय कमिटीला ऐकवण्याचा सनदशीर अधिकार देणे म्हणजे जास्तीत जास्त उपद्रवकारकपद्धतीने हिंदुस्तानात होमरुलला आमंत्रण देणे होईल······ पण हिंदुस्तान सैन्याच्या बळावर जिंकला गेला होता, आणि त्याचा कारभार कुठच्याही सरकारच्या हाती सोपवला तरी तो सैन्याच्याच बळावर चालला पाहिजे. आपणाला जर निघून जावे लागले तर ती माघार वाचिवीर किंवा लेखणी बहाद्दरापुढे घेण्यापेक्षा तीक्ष्ण तरवारी धारण करणाऱ्या शक्तीशाली शूरवीरापुढे घ्यावी. म्हणून नुकत्याच झालेल्या काँग्रेसच्या सभासदांनी, व्यावहारिक दृष्टीने आपल्या कल्पनांचा फेरविचार केल्यास बरे.'

या परिच्छेदातील शेवटच्या दोन वाक्यात असे सूचित केले गेले आहे की, जर

५. १८८५ च्या अधिकृत काँग्रेस रिपोर्टात पुरवणी 'क' मध्ये पुनर्मुद्रित.

ब्रिटिशांना हिंदुस्तानातून निघून जावे लागलेच तर, कॉन्झरव्हेटीव्ह मताप्रमाणे तेथील सत्ता मुसलमानांच्या हातात जावी, कारण ज्या मुसलमानांकडून ती हिसकावली गेली होती त्यांनाच ती परत मिळण्याचा हक्क होता. कॉंग्रेसच्या दुसऱ्या अधिवेशनावर (१८८६) टीका करताना 'टाईम्सने' हे अधिक स्पष्ट केले आहे. 'हिंदुस्तानातील देशी लोकांच्या कल्याणासाठी सरकार आपले सर्वस्व पणाला लावत आहे. अशावेळी सरकारला अडथळा नको म्हणून मुसलमान जमात या गोष्टीपासून दूर राहिलेली दिसते. यावरून पर्यायाने, "राष्ट्रीय हिंदी कॉंग्रेसच्या" खऱ्या हेतूंबद्दल आणि परिणामाबद्दल खुद्द हिंदुस्तानातील देशी लोकांना काय वाटत आहे हे दिसून येते. तेव्हा इतर अनेक पुराव्यात आणखी हा एक पुरावा मिळवून आपण आपल्या धोरणाचे संयुक्तीक आणि माफक आकलन होण्यासाठी मुसलमान प्रजाजनांकडे पाहिले पाहिजे." याच अग्रलेखात पुढे असे म्हटले आहे की : 'आपण बोलुकाकांचा फार मोठा वर्ग निर्माण केला आहे आणि त्यांना इंग्रजी इतिहास व इंग्रजी वाङ्मय यांचे बरेचसे ज्ञान अप्रत्यक्षपणे दिले आहे. गेल्यावर्षी मुंबईत भरलेली आणि यंदा जिचे अधिवेशन आता कलकत्त्यात चालू आहे अशी कॉंग्रेस, बोलण्याचे कार्य अव्याहत करणाऱ्या या बोलुकाकांच्या क्लबामधून येणाऱ्या प्रतिनिधींची बनलेली आहे [६].

लंडन टाईम्स हे हिंदी घडामोडींबद्दल जास्तीत जास्त माहिती देणारे पत्र असे ब्रिटिश राजकीय वर्तुळात समजले जाई, पण हिंदुस्तानात मात्र त्याची संपादकीय भाष्ये आणि वातमीपत्रे भयंकर पक्षपाती आणि हेतूदुष्ट असतात असा समज होता. १८८७ च्या कॉंग्रेस अधिवेशनाच्या अधिकृत अहवालात असे नमूद करून ठेवले आहे की, या वर्तमानपत्राचा कलकत्त्याचा बातमीदार 'आपल्या इंग्लंडला पाठवलेल्या बातमीपत्रात सत्य गोष्टींबद्दल फारच थोडी कदर दाखवतो.' 'दि स्टेटस्मन' या पत्राने (कलकत्ता) १८८६ च्या कॉंग्रेस अधिवेशनावर मतप्रदर्शन करताना लंडन टाइम्सचा खोटेपणा सरळ त्याच्या तोंडावर फेकला आणि कॉंग्रेसच्या दृष्टीकोनाला पुष्टी दिली. स्टेटस्मनने म्हटले होते : 'मद्रासच्या मुसलमान जमातीने त्याचप्रमाणे मुंबई, वायव्य प्रांत, औध आणि बंगालच्या प्रमुख शहरांनी आपले प्रतिनिधी कॉंग्रेसी अधिवेशनाला पाठवले आहेत.'

कॉंग्रेसच्या अधिकृत अहवालातील उतारा द्यावयाचा झाला तर, खुद्द कॉंग्रेसच्या व्यासपिठावरून (१८८६), 'लखनौचे नबाब राजा अलीखान बहाद्दूर यांनी उर्दूतून भाषण करताना, मुसलमान कॉंग्रेसपासून दूर रहातात, किंवा त्यांच्यात सहानुभूतीचा अभाव आहे हे नाकारण्यासाठी मोठ्या रागाने आणि वक्तृत्वपूर्णतेने पुढाकार घेतला. त्यांनी आपले भाषण अनेक आनंदाच्या आणि उत्साहाच्या चित्कारातून पुढील शब्दात

६. बॉम्बे गव्हर्नमेंट रेकॉर्डस् भाग २, १८८५ ते १९२० या १९५८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तकातून मिळवलेल्या Source material for a History of the Freedom Movement in India या पूर्वीच्या पुस्तकावरून पृष्ठ ३७–३८.

संपवले." ज्या असोसिएशनने आम्हाला सन्मान्य प्रतिनिधी नेमले ती बहुतांशी प्रमुख असे मुसलमान, नबाब व सिकेदार, राजकीय सेवानिवृत्त व एका काळच्या औंधच्या राजघराण्याच्या वारसदारांची बनलेली आहे. आणि मी तुम्हाला असे आश्वासन देतो की, चालू चळवळीबद्दल आम्हाला सहानुभूती नाही असे गृहीत धरून जे कोणी निराधार विधाने करून आमच्या सामान्य कार्यकर्त्यांत फाटाफूट पाडण्याचा अनुचित प्रयत्न करतील, त्यांना आमची असोसिएशन आणि माझे मुसलमान बांधव, सर्व सामान्यपणे औंधचे मुसलमान बांधव, मुळीच जुमानणार नाहीत आणि त्यांचा निषेध करतील. आमचे पूर्वज सहाशे किंवा आठशे वर्षापूर्वी कसेही असोत पण आज हिंदू आणि मुसलमान काय, किंवा पार्शी आणि शीख काय, आम्ही सर्व एकत्र आहोत आणि आमचे सार्वजनिक हितसंबंध अविभाज्य आणि अभिन्न आहेत."

लॉर्ड डफरीन यांनी काँग्रेसचा विचार 'संरक्षक पटल' (सेफ्टी वाल्व्ह) म्हणून केला होता परंतु आता ती राष्ट्रीय संघटना म्हणून वाढत होती. आणि ज्या मुसलमानांना राजकीय संघटनापासून परिस्थितीने दूर ठेवले होते ते मुसलमान तिला मिळाल्यामुळे ती सत्ता समतोलपणाला धोका निर्माण करीत होती. कॉन्झर्व्हेटिव्ह मताच्या बेक नावाच्या एका अति उत्साही प्रवक्त्याने मुसलमानी कार्याचे केंद्र असलेल्या अलिगडला आधीच मोक्याचे स्थान पटकावले होते. आणि सर सय्यद यांनीही, मुसलमानांनी काँग्रेसशीच काय पण कुठल्याच राजकीय कार्याशी काही संबंध ठेवू नये असे ठरवून टाकले होते. सर सय्यद आणि त्यांच्या अनुयायांनी काँग्रेसकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आणि जणू काय काहीच झाले नाही असे आचरण ठेवले.

१८८६ मध्ये महॉमेडन एज्युकेशनल काँग्रेसच्या स्थापनेबरोबर (१८९० मध्ये तिच्या नावाचे रुपांतर मुस्लिम एज्युकेशनल कॉन्फरन्स असे झाले) अलिगडच्या तटस्थतेचे रुपांतर काँग्रेसला क्रियाशील विरोध करण्यात झाले. सर सय्यद यांनी पहिल्या एज्युकेशनल कॉन्फरन्समध्ये असे सांगितले : 'आपल्या राष्ट्रीय प्रगतीला राजकीय चर्चा उपयोगी होतील यावर ज्यांचा विश्वास आहे त्यांच्याशी मी सहमत नाही. शिक्षणाची प्रगती हेच केवळ आपल्या राष्ट्रीय प्रगतीचे साधन आहे असे मी मानतो.'' जर मुसलमानांनी ब्रिटिशांना विरोध केला नसता तर 'आमचे तरुण आज मुलकी आणि सैन्यातील नोकरीत महत्वाच्या अधिकारावर' असते ते तसे दिसत नाहीत याबद्दल त्यांना खेद होत होता असे ते म्हणाले. पुढीलवर्षी, लखनौ येथे भरलेल्या शैक्षणिक काँग्रेसमध्ये बोलताना सर सय्यद यांनी हिंदी राष्ट्रीय काँग्रेसने सुचवलेल्या सुधारणांवर हल्ला चढवला. ते म्हणाले, 'माझी अशी खात्री आहे की, सर्व सामान्य माणसांनी, मग ती एम. ए. असोत की, बी. ए. असोत, त्यांनी कायदे मंडळात जाऊन बसणे आणि तुमच्यावर राज्य कारभार करण्याचा अधिकार गाजवणे' हे तुम्हाला कधीच आवडणार नाही. कल्पना करा की, या माणसांना "माझे सहकारी' किंवा "माझे सन्मान्य सहकारी" असे व्हाइसरॉय म्हणत आहेत. ही गोष्ट सरकार

कधी मान्य करणार नाही. ड्युक आणि अर्लसारखे खिताबधारी लोक हजर असलेल्या राज्य समारंभांना आणि खान्यांना व्हाइसरॉय या लोकांना निमंत्रण देऊ शकणार नाही.'

हिंदी लोकांना सनदी नोकऱ्यात प्रवेश देण्याच्या काँग्रेसच्या मागणीकडे पहाण्याची त्यांची दृष्टीही अशीच होती : 'सरदार दरकदार लोक, ज्यांचे मूळ त्यांना चांगले माहीत आहे अशा यःकश्चित सामान्य लोकांना आपले राज्याधिकारी म्हणून कसे मान्य करतील? इंग्रजांची गोष्ट निराळी आहे, कारण ते कुठल्या वर्गातून आले आहेत हे इतक्या लांबून आपल्याला कळत नाही. शिवाय हिंदुस्तानात अनेक जमाती असल्यामुळे, आणि इंग्लंडातील लोक एक जातीय असल्यामुळे, स्पर्धेच्या परीक्षा घेण्यास इंग्लंड हे ठिकाणच योग्य आहे. या स्पर्धेच्या परीक्षा घेण्यास आपला देश योग्य नाही याचे दुसरे एक कारण म्हणजे : वेगवेगळ्या लोकांनी संपादन केलेल्या शिक्षणात लक्षात येण्यासारखी मोठी विषमता आहे—मुसलमान शिक्षणदृष्ट्या मागसलेले आहेत; या संयुक्त प्रांताचे हिंदू बंगाल्यांच्या तुलनेने मागासलेले आहेत.'

त्यांनी असेही म्हटले की, काँग्रेस ही बंगाल्यांची संघटना आहे. त्यांची ही चूक १८८७ च्या काँग्रेसचे अध्यक्ष बद्रुद्दिन तय्यबजी यांनी एका पत्राद्वारे (१८ फेब्रुवारी १८८८) त्यांना दाखवून दिली. ते लिहितात : 'ज्यावेळी मी आपल्याला (मागचे) पत्र लिहिले त्यावेळी मी आपले लखनौचे भाषण वाचले नव्हते. परंतु त्यानंतर ते वाचण्याची संधी मला मिळाली आणि असे दिसून आले की, ज्यावेळी आपण ते भाषण केलेत त्यावेळी काँग्रेस ही फक्त बंगाली बाबूंची बनलेली आहे अशी आपली समजूत होती. आपली अशी कल्पना का झाली हे माझ्या आकलना पलिकडे आहे; कारण जरी मुंबई आणि मद्रास इलाख्यातील सुशिक्षित मुसलमानांच्या काँग्रेसबद्दलच्या वृत्तीविषयी आपण काही जाणत नसलात तरी, त्या इलाख्यातील हिंदूंनी त्यात सक्रीय भाग घेतला नव्हता अशी कल्पना आपण खात्रीनेच करू शकणार नाही. ते काहीही असले तरी वस्तुस्थिती अशी आहे की, हिंदूंच्यापुरते बोलायचे झाले तर ते कुठल्याही प्रांताचे असोत काँग्रेसला एकमताने आणि एकजुटीने पाठिंबा देतात आणि मुसलमानांपुरते बोलायचे तर, मुंबई आणि मद्रास इलाख्याचा तिला जोरदार पाठिंबा आहे, आणि आपल्या भाषणावरून असे दिसते की, बंगाल आणि वायव्य प्रांतात (पूर्वीचा संयुक्त प्रांत) तिला त्यांचा फारच विरोध आहे.'[७]

वायव्य प्रांतात (ज्यात औधचाही समावेश होतो) सुद्धा सर सय्यद यांचा विरोध सफल झाला नाही, आणि १८८८ मध्ये सरकारी विरोधाला न जुमानता अलाहाबाद येथे भरलेल्या काँग्रेसला दुसऱ्या अनेक प्रांतातून आलेल्या मुसलमानांच्या एकंदर संख्येपेक्षा या प्रांतांनी अधिक मुसलमान पाठवले. चार वर्षातच काँग्रेसला येणाऱ्या मुसलमान प्रतिनिधींचा आकडा २२१ वर गेला. (१८८८ च्या काँग्रेसला आलेल्या

७. कित्ता, पृ. ७२–७३.

हिंदूंचा आकडा ९६५ होता.) महम्मद हिदायत रसूल या मुसलमान प्रतिनिधीने काँग्रेसला सांगितले : 'आता औधमधून विशेषत: लखनौमधून इतके कर्तबगार आणि नामांकित प्रतिनिधी कसे आले हे तुम्ही सांगू शकाल ? सद्गृहस्थहो, याचे गुपित मीच तुमच्या कानात सांगतो. यातले सत्य असे आहे की, आमच्या अलिगड गटातील काँग्रेस विरोधी गटातील—बांधवांच्या कृपाळूपणाचा हा चांगला परिणाम आहे. त्या आमच्या विरोधी बांधवांनी जर विरोधाचा असा मोठा देखावा केला नसता तर मी तुम्हाला खात्रीपूर्वक असे सांगतो की, आज काँग्रेसला जे यश मिळाले आहे ते खचितच मिळाले नसते.'

पण सर सय्यद यांचे व्यक्तिमत्व जबरदस्त होते. त्यांना काँग्रेसला अनुकूल करण्याचा प्रयत्न १८८८ च्या काळीत तय्यबजी आणि ह्यूम यांनी सतत चालू ठेवला सर सय्यदनी तय्यबजींना स्तिमित करणारे उत्तर दिले. (याच सुमारास इंग्लंडच्या राणीने सर सय्यद यांना आणखी एक किताब देऊन त्यांचा गौरव केला होता.) ते म्हणाले : "राष्ट्रीय" काँग्रेस या शब्दाचा अर्थ काय हेच मला समजत नाही. हिंदुस्तानात रहाणाऱ्या निरनिराळ्या जमाती आणि धर्म यांचे एक राष्ट्रियत्व आहे किंवा ते एक राष्ट्र बनू शकतील आणि त्यांचे आदर्श व आकांक्षा एकच व सारखीच असू शकतील असे समजावयाचे काय ? मला वाटते हे अगदी अशक्य आहे. आणि जर हे अशक्य आहे तर राष्ट्रीय काँग्रेस अशी काही चीजच असू शकणार नाही. चुकीचे नाव धारण केलेल्या राष्ट्रीय काँग्रेसची कृत्ये हिंदुस्तानला तारक होतील असे आपण मानता पण मला सांगायला खेद वाटतो की, ती केवळ आमच्याच जमातीला नव्हे तर सबंध हिंदुस्तानला मारक होतील असे मी मानतो. हिंदुस्तानला एक राष्ट्र मानणाऱ्या काँग्रेसला, तिच्या कुठच्याही स्वरुपात किंवा आकारात माझा विरोध सहील.'[८] तय्यबजींनी पुन्हा त्यांना त्यांचे मन वळवणारे पत्र लिहिले आणि पुन्हा ते अयशस्वी ठरले.

ऑगस्ट १८८८ मध्ये, सर सय्यद यांनी एम. ए. ओ. कॉलेजचे प्राचार्य थिओडोर बेक यांच्या मदतीने युनायटेड इंडियन पेट्रिऑटिक ॲसोसिएशन नावाची दुसरी एक संस्था स्थापन केली. तिचे सभासदत्व सर्व जमातींना खुले होते. मुसलमान नबाब, हिंदू राजे, किताबदार आणि काही इंग्रज लोक यांनी या ॲसोसिएशनमध्ये प्रवेश केला. सर सय्यद या यशाने फुलून गेले आणि त्यांनी त्यावेळचे एक उच्च पोलीस अधिकारी आणि नंतरचे त्यांचे चरित्रकार, कर्नल ग्रॅहॅम यांना लिहिले : 'मी तथाकथित राष्ट्रीय काँग्रेसविरुद्ध फार कठीण कार्य अंगीकारले आहे आणि एक संघटना बनवली आहे.'[९]

२८ ऑगस्ट १८८८ च्या अलिगड इन्स्टिटयूट गॅझेटप्रमाणे पेट्रिऑटिक ॲसोसिएशनचे

---

८. कित्ता, पृ. ७१.

९. पुर्वोक्त पुस्तक ग्रॅहॅम, पृ. २७३.

उद्देश असे होते : ' (अ) राष्ट्रीय कॉंग्रेसच्या पुरस्कर्त्यांनी राष्ट्रीय कॉंग्रेसच्या ध्येयाशी व कार्याशी हिंदुस्तानातील सर्व राष्ट्रीयत्वाचे लोक, हिंदी अधिकारी आणि सत्ताधिकारी सहमत आहेत असे इंग्रज लोकांना पटवून देण्याचा जो चुकीचा प्रयत्न चालवला आहे त्यातील असत्य विधानांवर बोट ठेवून त्यांची माहिती, पार्लमेंटचे सभासद, इंग्रजी नियतकालिके व ग्रेट ब्रिटनचे लोक यांना देण्यासाठी पत्रके आणि इतर कागदपत्रे छापणे व प्रसिद्ध करणे. (ब) याच साधनांनी पार्लमेंटच्या सभासदांना आणि ग्रेट ब्रिटनचे लोक व वर्तमानपत्रे यांना सर्वसाधारण मुसलमानांची, इस्लामिय अनुकानांची आणि जे हिंदू आणि त्यांच्या सोसायट्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या उद्देशांच्या विरुद्ध आहेत त्यांच्या मतांची माहिती देणे. (क) हिंदुस्तानात ब्रिटिश सत्ता बळकट करण्यासाठी आणि शांतता राखण्यासाठी झटणे आणि कॉंग्रेस पुरस्कर्ते, सर्व देशभर, ब्रिटिश सरकारविरुद्ध हिंदी लोकांच्या मनात मोठ्या असंतोषाच्या ज्या वाईट भावना चेतवीत आहेत त्या त्यांच्या मनातून दूर करणे.

बेक हे पॅट्रिऑटिक ॲसोसिएशनचे सन्मान्य संपादक होते. त्या अधिकारात त्यांनी ब्रिटनमध्ये व हिंदुस्तानात वाटण्याकरिता लेख व उतारे तयार केले. एका लेखात त्यांनी अगदी डोक्यावर येऊन ठेपलेल्या बंडाची भीति बाळगून मुसलमानांना सक्त इशारा दिला होता : 'या बंडाचे दुष्परिणाम मुसलमानांना सर्वात अधिक भोवतील. क्रूरपणात उभयपक्ष सारखीच करामत दाखवतील. अशावेळी सर्व माणसे पशुवत् वागतात आणि निष्पाप व गुन्हेगार, प्रबळ व दुर्बळ हे सर्व एकाच नशिबाचे वाटेकरी होतात. ज्या राष्ट्राच्या स्वदेशातील औदार्यावर कॉंग्रेसवाले इतका भर देतात ते इंग्रज लोक घटना व निवडलेली मंडळे वगैरे सर्व काही विसरतील आणि फक्त सूडाचाच आक्रोश करतील, परंतु आपले राष्ट्रीय अस्तित्व घालवणार नाहीत. आणि मुसलमान मात्र निर्णायक नाश पावतील. मुसलमान पुढारी आपल्या लोकांना राजकीय चळवळीच्या भोवऱ्यापासून दूर ठेवण्याची इच्छा करतात त्याचे हे कारण आहे. राजकीय गोष्टीत ज्यांचा मी नम्र शिष्य आहे असा अभिमान बाळगतो, त्या माझ्या परमपूज्य सर सय्यद अहमद यांनी हे स्वच्छ दाखवून दिले आहे. त्यांच्या मुद्यांशी अजून कोणी साधी टक्करही घेतली नाही उलट युक्तिवाद करण्याऐवजी त्यांच्यावर चिखलफेक आणि शिव्यांचा भडिमार मात्र करण्यात आला आहे. बंगाल्यांनी ब्रिटिश राजवटीखाली प्रचंड प्रगती केली आहे. त्यांचे राजकीय ग्रह उच्चित आहेत. ज्यांचा मोठेपणा भूतकाळात जमा झालेला आहे आणि ज्यांचा विनाश त्यांच्यासमोर खडा आहे अशी दशा झालेल्या मुसलमानांच्या भावना ते कसे समजू शकतील ? अशा परिस्थितीतसुद्धा जर ते आपल्या विषारी वाङ्मयाचा प्रसार, मुसलमानांत करू लागले तर मुसलमान देशभक्ताला रागावण्याचा अधिकार नाही काय ? ........ उदाहरणच घ्यावयाचे झाले तर या म्युनिसिपालटीच्या तथाकथित स्वराज्यात, मुसलमानांवर राज्य करण्याकरिता त्यांना त्यांचे हात पाय बांधून त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांच्या

स्वाधीन केले गेले आहे. आणि दुसरे उदाहरण म्हणजे, सर्व दुय्यम नेमणुका स्पर्धेच्या परीक्षेनुसार केल्या जातील हा बंगाल सरकारचा नुकताच काढलेला हुकूम—हा हुकूम, दुसऱ्यांशी स्पर्धा करण्यास पुरेसे इंग्रजी शिक्षण संपादन न केलेल्या निदान एका पिढीच्या मध्यमवर्गीय मुसलमानांचे तरी बहुतेक नुकसान करील.'[१०]

लंडन टाइम्सप्रमाणेच बेक यांनी आपले म्हणणे मांडण्यासाठी युक्तिवादाचा आधार क्वचितच घेतला. काँग्रेस चळवळीतून बंड कसे होईल? मुसलमानांचे हातपाय कसे बांधले जातील? स्पर्धेच्या परिक्षांना विरोध करून मुसलमानांना आपली शैक्षणिक पातळी वाढवण्याची स्फूर्ति कशी मिळणार होती? सुशिक्षित बंगाल्यां-बरोबर सहकार्य केल्यास मुसलमानांना ते मारक का होणार होते; हे त्यांनी कधीच स्पष्ट केले नाही. धडधडीत असत्य गोष्टींचा आधार घेण्यास ते कधीही कचरले नाहीत. याच लेखात ते म्हणतात: 'सय्यद अहमद नावाच्या दुसऱ्या एका मोठ्या वहाबी पुढाऱ्याने आणि मौलवी इस्माइल नावाच्या त्याच्या साथीदाराने लोकांचा मोठा उठाव केला, पण त्यांनी आपल्या अनुयायांना ब्रिटिशांवर हल्ला करू नका असे सांगितले. त्यांनी शिखांशी सामना दिला, पण त्यानंतर काय घडले? दुसऱ्या बंडाची कल्पना जितकी इंग्रज स्त्री-पुरुषांना भयानक वाटते, त्याहूनही अधिक भयानक ती प्रत्येक विचारी मुसलमानाला वाटते ······ लोकांचे राजकीय विकार भडकवले तर बंड हे होणारच. ह्या भावना सैनिकात ताबडतोब फैलावतील, आणि मग सर्वत्र डोंब उसळेल.' सातव्या व आठव्या दशकात वहाबींनी ब्रिटिश सत्तेवर हल्ले चढवले होते आणि असंख्य मुसलमानांना ब्रिटिशांचे शत्रू बनवले होते ही गोष्ट बेकनी मोठ्या चलाखीने गुप्त ठेवली.

अलिगड चळवळीसंबंधी तोंडी आणि लेखी असे बरेचसे ज्ञान आपल्या पूर्वजांकडून मिळवणारे आणि 'मुसलमानोंका रोशन मुस्ताक् बिल' या पुस्तकाचे कर्ते मौलवी टुफाइल अहमद मलबारी यांच्या मताप्रमाणे, सर सय्यद यांना काँग्रेसबद्दल, राजकारणा-बद्दल आणि स्पर्धेच्या परिक्षांकडे पहाण्याची मुसलमानांची वृत्ती काय असावी याबद्दल मते बनवण्यास ह्या बेकनीच मदत केली. ज्या इतर काही लोकांनी अलिगडचे नाटच पाहिले होते त्यांचेही असेच मत होते. त्यापैकी एक विलायत हुसेन हे होते. त्यांनी कॉन्फरन्स गॅझेटच्या (अलिगड) ८ नोव्हेंबर १९३५ च्या अंकामध्ये एक लेख लिहिला. त्यात असे म्हटले होते की, हिंदी लोकांना सनदी नोकऱ्यात प्रवेश देण्याच्या मागणीवर सुरेंद्रनाथ बानर्जी यांचे अलिगड येथे झालेले भाषण ऐकल्यानंतर बेकने आपल्या मुसलमान विद्यार्थ्यांना आपली जी प्रतिक्रिया सांगितली ती अशी की, जर सनदी नोकऱ्यांच्या स्पर्धेची परीक्षा इंग्लंड व हिंदुस्तानात एकदमच घेण्याचे मान्य केले तर त्याचा फायदा फक्त बंगाली लोकच उठवतील आणि हे भित्रे बंगाली उत्तर हिंदुस्तानच्या दणकट लोकांवर अधिकार गाजवतील. रजपूत व पठाण हे

१०. मागे उद्धृत केलेल्या Source Material मधील पृ. ४१–४२.

सहन करतील का ? असा सवाल त्यांनी टाकला. अतिशय भयभीत होऊन त्यांनी विचारले की, बंगालमधून उठलेले हे वादळ जर उत्तर हिंदुस्तानात पोचले तर काय होईल ? विलायत हुसेन पुढे म्हणतात की, सर सय्यद यांच्याकडून अलिगड इन्स्टिटयूट गॅझेटचे संपादकत्व आपल्याकडे घेतल्यानंतर बेक यांनी आपल्या संपादकीय रकान्यामधून बंगाली आणि त्यांची चळवळ यांना शिव्या देण्याचे चालू केले नसते तर अलिगड आणि राष्ट्रवादी चळवळ यांचे संबंध इतके कटू झाले नसते. त्यांचे असेही मत होते की, हिंदुस्तानात लोकसत्ताक पद्धतीचा आरंभ करावा अशी विनंती करणारे, चार्लस् ब्रॅडलॉचे बिल १८८९ मध्ये पार्लमेंटपुढे आल्यावर, त्याला मुसलमानांचा विरोध निर्माण करण्यात बेकने नुसता पुढाकारच घेतला असे नव्हे तर त्याने पार्लमेंट पुढे सादर करण्यासाठी एक निवेदन तयार करून त्यावर मुसलमानांच्या सह्या कपटाने मिळवल्या. त्याने अलिगड विद्यार्थ्यांच्या तुकडया गावागावातून सह्यांच्या मोहिमेवर पाठवल्या; आणि जी तुकडी दिल्लीला निघाली होती तिच्याबरोबर तो स्वतः गेला होता. आपल्या आज्ञा विद्यार्थ्यांनी अंमलात आणाव्या म्हणून तो, विद्यार्थ्यांबरोबर सुप्रसिद्ध जुम्मा मशिदीच्या दरवाजाजवळ उभा ठाकला. तो दिवस शुक्रवारचा होता, आणि नमाज पढून परत जाणाऱ्या मुसलमानांना त्या इंग्रजीत लिहिलेल्या निवेदनावर सह्या करण्यास सांगण्यात येत होते. ते विद्यार्थी सह्या घेण्यासाठी काय सांगत होते ? ब्रॅडलॉचे बील समजण्याची आणि त्याचा मुसलमानांवर काय परिणाम होईल हे जाणण्याची पात्रता त्यातील फारच थोडया मुसलमानांत होती. काही हिंदूंनी गोहत्या प्रतिबंधक चळवळ नुकतीच सुरू केली होती आणि मुसलमानांना त्यांची चीड होती. त्याचा फायदा विद्यार्थ्यांनी सह्या घेताना घेतला, आणि बेकच्या सल्ल्यानुसार ते मुसलमानांचा गाईचा वध करण्याचा हक्क मान्य करण्यासाठी सरकारला अर्ज करीत आहेत असे त्यांनी मुसलमानांना सांगितले. ह्या युक्तीने त्यांनी २०७३५ सह्या मिळवल्या आणि ते निवेदन ब्रिटिश सरकारला सादर केले.

युनायटेड पेट्रिऑटिक अॅसोसिएशनला पुढे आणण्यात बेकने आपली बरीचशी शक्ती खर्च केली. इतर प्रांतातल्या मुसलमान संघटनांनी अॅसोसिएशनच्या शाखा उघडाव्या म्हणून त्यांचे मन वळवण्यासाठी त्यांनी स्वतःच सर सय्यद यांच्यावतीने त्यांच्याशी पत्रव्यवहार सुरू ठेवला आणि देशातील मोठमोठ्या शहरातील जहागीरदारांना आणि किताबदारांना पुढे करून जाहीर सभा घेतल्या आणि अॅसोसिएशनच्या शाखा उघडल्या. या शाखांचे स्वागत करणाऱ्या आणि कॉंग्रेसचा निषेध करणाऱ्या ठरावांच्या प्रती सर सय्यद यांच्याकडे धाडण्यात आल्या. अलिगड इन्स्टिटयूट गॅझेटने या सभांचे आणि त्यांच्या ठरावांचे वृत्तांत अतिशय निष्ठेने छापले. त्यातून घेतलेला हा ८ डिसेंबर १८८८ च्या गॅझेटमधील हा ठराव पहा; तो नागपूर येथे अंजुमान नसर-उल-इस्लाम यांनी भरवलेल्या 'एका मोठ्या जाहीर सभेने' संमत केला होता : या सभेचे असे मत आहे की, स्वतःला राष्ट्रीय म्हणवणाऱ्या कॉंग्रेसचे उद्देश आणि

परिणाम बेइमानी निर्माण करण्याकडे आणि असंतोष फैलावण्याकडे झुकत आहेत, आणि त्यामुळे ते (१) सर्वसाधारणपणे हिंदुस्तानला आणि (२) विशेषेकरून मुसलमानांच्या भरभराटीला आणि कल्याणाला अपायकारक होण्याचा संभव आहे; काँग्रेसच्या मागण्या म्हणजे वीस कोटी ब्रिटिश प्रजेच्या मागण्या नव्हेत; बहुसंख्य भारतीयांच्या नावाने बोलण्याचा तिचा सततचा दावा खोटा आहे आणि ती ज्या तक्रारींबद्दल आक्रोश करीत आहे त्या काल्पनिक आहेत. नागपूरमधील एकाद्या मुसलमानाने नागपूरमध्ये भरलेल्या काँग्रेसच्या सभेत भाग घेतला, किंवा तिच्याशी कुठल्याही प्रकारचा संबंध ठेवला, किंवा त्याने अलाहाबाद काँग्रेसचा प्रतिनिधी म्हणून स्वतःची निवड करण्यास कबूली दिली तर तो केवळ स्वतःचेच प्रतिनिधीत्व करत आहे आणि मुसलमान जमातीचा विश्वासघात करीत आहे असे समजण्यात येईल.' या ठरावाची प्रत 'युनायटेड पेट्रिऑटिक अँसोसिएशनचे सन्माननीय चिटणीस' सर सय्यद यांना पाठवली जावी असेही या ठरावात म्हटले होते.

हिंदू जमिनदारांना आणि अमीर उमरावांनासुद्धा एकत्र जमण्याचे अँसोसिएशन हे एक ठिकाण झाले. याचे उदाहरण म्हणजे जौनपूरच्या (उ. प्रां.) जाहीर सभेचे अध्यक्षस्थान तेथील हिंदू राजाने स्वीकारले होते आणि त्यात भाग घेणाऱ्यात मुसलमान सेवानिवृत्त लोक आणि इतर प्रमुख होते.[११]

पेट्रिऑटिक असोसिएशन ही जरी एक निरुपद्रवी संस्था होती तरी ती सभा भरवत होती आणि राजकीय चर्चा घडवून आणत होती आणि त्यामुळे काँग्रेसची एक मवाळ किंवा हुजूरपक्षीय प्रतिकृती म्हणन वाटण्याचा तिचा कल आहे असा बेकचा ग्रह झाला. म्हणून डिसेंबर १८९३ मध्ये सर सय्यद यांच्या मदतीने त्याने एक दुसरी संस्था स्थापन केली आणि तिला 'महॉमेडन अँग्लो ओरिएन्टल डिफेन्स असोसिएशन ऑफ अपर इंडिया' असे नाव देऊन आपण स्वतः त्याचा चिटणीस बनला. तिच्या उद्घाटनाच्या भाषणात त्याने सांगितले की, पेट्रिऑटिक अँसोसिएशन-मध्ये चळवळी संस्था बनण्याचा दोष निर्माण झाला होता, शिवाय ती निर्जातीय संस्था होती, आणि मुसलमानांना फक्त मुस्लिम संस्थेची गरज होती. या नव्या संस्थेने कुठलीही शाखा जोडता कामा नये, जाहीर सभा घेता कामा नयेत आणि कुठल्याही चळवळीत पडता कामा नये; तिला संपूर्ण अधिकार असलेले एक कार्यकारी मंडळ असावे[१२] असे ते म्हणाले. त्यांनी आपल्या श्रोत्यांना आणखी असे सांगितले की, गेल्या काही वर्षात हिंदुस्तानात दोन चळवळी उदयास आल्या आहेत : एक हिंदी राष्ट्रीय काँग्रेसची व दुसरी गोवध बंदीची. पहिलीचा रोख इंग्रजांविरुद्ध आहे आणि दुसरीचा मुसलमानांविरुद्ध आहे. ब्रिटिशांकडून देशाचा ताबा घेऊन तो हिंदूच्या काही विशिष्ट वर्गाकडे सुपूर्द करणे हा काँग्रेसचा हेतू आहे. लोकांना

११. अलिगड इन्स्टिटयूट गॅझेट, ऑक्टोबर ९, १८८८.

१२. तुफैल अहमद, पुर्वोक्त पुस्तक, पृ. २६.

हत्यारे वापरण्याची सरसकट मुभा, सैन्यावरच्या खर्चात कपात म्हणजे पर्यायाने सरहद्दीवरच्या संरक्षणाची कमजोरी, या तिच्या मागण्या आहेत. या मागण्यांबद्दल मुसलमानांना सहानुभूती वाटणे शक्य नाही. गाईला संरक्षण या हिंदूंच्या चळवळीचा उद्देश, इंग्रज व मुसलमान यांना कमजोर बनवणे व मग त्यांना सहज जिंकणे हा आहे. मुंबई आणि अझमगड येथील जातीय दंगे हे याचे द्योतक आहेत. तेव्हा हिंदू चळवळयांना तोंड देणे शक्य व्हावे म्हणून, आणि देशाच्या गरजा आणि राष्ट्रीय प्रकृतीला न मानवणाऱ्या लोकसत्ताक सरकारच्या प्रस्तावाला प्रतिबंध व्हावा म्हणून मुसलमान आणि ब्रिटिश यांची युती होणे अतिशय आवश्यक आहे.[१३]

या डिफेन्स असोसिएशनचे उद्देश असे होते : (१) सामान्यपणे ब्रिटिश लोकांना आणि विशेषत: सरकारला हिंदुस्तानातील मुसलमानांच्या मतांची ओळख करून देणे आणि त्यांच्या राजकीय हक्कांचे संरक्षण करणे. (२) हिंदुस्तानात ब्रिटिश सत्ता बळकट करण्यासाठी योजलेल्या साधनांना पाठिंबा देणे. (३) राजकीय चळवळ मुसलमानात पसरण्यास प्रतिबंध करणे. (४) सरकार विषयी निष्ठेची भावना बाळगणे आणि त्यांना शांतता राखण्यास मदत करणे.

बेकनी आता सर सय्यद यांच्या सामोपचाराच्या धोरणावर ताण केली होती. उदाहरणार्थ, अलिगड इन्स्टिटयूट गॅझेटच्या म्हणण्याप्रमाणे सर सय्यद यांनी आपल्या धर्म बांधवांना गोवधापासून अलिप्त रहाण्याचा सल्ला दिला होता. त्यांचे म्हणणे असे होते की, हिंदूंचे शत्रुत्व ओढवणे मूर्खपणाचे ठरेल. आणि गोवधापेक्षा हिंदूंची मैत्री अधिक मूल्यवान होती.

बेक याने पार्लमेंटला सादर करण्यासाठी एक अर्ज तयार केला व त्यावर हजारो मुसलमानांच्या सह्या मिळवल्या. सनदी नोकऱ्यांच्या परिक्षा हिंदुस्तान व इंग्लंडमध्ये एकदमच घ्याव्या ही काँग्रेसची मागणी झिडकारावी अशी विनंती त्या अर्जाने केली होती. काँग्रेसची मागणी मान्य करण्याचा सरकारचा हेतू नव्हताच, तेव्हा त्याने मुसलमानांची सूचना आभारपूर्वक सुधारली. डिफेन्स असोसिएशन मंडळाच्या सभेत या निर्णयांची चर्चा झाली आणि त्याची मोठया कृतज्ञतेने पोंच देण्यात आली.

१८९५ मध्ये बेक इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी ॲसोसिएशनच्या लंडन शाखेच्या वार्षिक सभेत जे भाषण केले त्याचा सारांश अलिगड कॉलेज मॅगेझिनच्या मार्च, एप्रिल आणि जून १८९५ च्या अंकात प्रसिद्ध झाला. त्या सारांशाप्रमाणे बेक असे म्हणाले होते की, (१) ब्रिटिश आणि मुसलमान यांची मैत्री शक्य आहे पण मुसलमान आणि इतर धर्माचे अनुयायी यांच्यात ती शक्य नाही कारण शिवाजीचे आणि गुरु गोविंद सिंगचे अनुयायी औरंगजेबाला आपला नेता म्हणून मान्य करण्यात मुसलमानांशी कधीच सहमत होणार नाहीत; (२) ज्या सरकारपद्धतीत बहुसंख्य हिंदू मुसलमानांवर राज्य करतील ती पद्धती मुसलमान कधीच मान्य करणार नाहीत.

१३. कित्ता, ५९.

काश्मिरच्या पंडित अधिकाऱ्यांच्या दास्यात रहात असलेले मुसलमान ब्रिटिश राजवटीत सुखाने रहात असलेल्या मुसलमानांचा हेवा करत होते; (३) खुद्द हिंदी लोकांना लोकसत्ताक राज्य पसंत नाही. त्यांना राजसत्ताकपद्धति अधिक पसंत आहे; (४) (१८५७ च्या) बंडाच्या वेळच्या आणि नंतरच्या मुसलमानांच्या वागणुकीने सर्व जमात हिंदूंच्या चळवळीचा राजकारणाविरुद्ध सावध झाली आहे आणि आता ती सर सय्यद यांच्या सल्ल्यानुसार शहाणपणाने वागत आहे. हा सल्ला म्हणजे ब्रिटिशांशी निष्ठा; (५) स्पर्धेच्या परिक्षा हिंदुस्तानात घेण्याच्या मुसलमान विरुद्ध आहेत कारण याचा अर्थ, निःपक्षपाती ब्रिटिश अधिकाऱ्यांच्याऐवजी मुसलमानविरोधी हिंदू येणे हे ते जाणतात.

सर सय्यद आणि बेक हे एकमेकांना पूरक होते. पण काही मुसलमान लेखकांनी म्हटल्याप्रमाणे, सर सय्यद हे आपल्या आयुष्याच्या उत्तर काळात बेकच्या मोहिनीखाली आले असे म्हणणे, म्हणजे त्यांच्या बुद्धिमत्तेला कमी लेखणे ठरेल. सर सय्यद यांच्या ब्रिटिशांबद्दलच्या अतिशय खोल रुजलेल्या निष्ठेतच त्यांच्या काँग्रेस विरोधाचे समर्थन सापडते. काँग्रेसने सैन्यावरील खर्चात कपातीची मागणी केली, तर उलट सर सय्यद यांनी तो वाढवला पाहिजे असे सांगितले. डिफेन्स असोसिएशनच्या बैठकीत, सैन्यात ब्रिटिश वर्ग अपुरा आहे म्हणून त्यांनी नापसंती व्यक्त करून त्यांची संख्या वाढवली पाहिजे या अर्थाचा ठराव मंजूर करून घेतला. त्या ठरावाने, (१८९७ फेब्रुवारीच्या अलिगड कॉलेज मॅगेझिनमध्ये प्रसिद्ध झाल्याप्रमाणे) वास्तविक, खर्चात वाढ करून राष्ट्रीय सैन्य उभारण्याची विनंती केली होती. परंतु तो ठराव मांडताना सर सय्यद यांनी आपल्या भाषणात असे रडगाणे गायिले की, आपण भारतीय सैन्यातील ब्रिटिश अंशाबद्दल लॉर्ड डफरीन यांच्याशी प्रदीर्घ चर्चा केली असूनसुद्धा हिंदुस्तानच्या सैन्यात तो अंश अद्याप कमीच आहे.

अलिगड विचारसरणीचे लोक मुख्यतः मुसलमानांच्या अमीर उमराव व मध्यमवर्गाचे प्रतिनिधीत्व करत होते. आणि जेव्हा काँग्रेस, शेतकरीवर्गाचे दारिद्र्य आणि अधोगती: त्यांची पिळवणूक करणारे जंगल कायदे आणि मीठावरील कर आणि नोकरशाही-कडून होत असलेला गरीबांचा छळ, याबद्दल बोलू लागली तेव्हा त्यांना तिच्यात काही रस वाटला नाही. हिंदुस्तानचे ब्रिटिश राज्यकर्ते करीत असलेल्या आर्थिक पिळवणुकीबद्दल जेव्हा काँग्रेसने खेद व्यक्त केला, तेव्हा तिच्या मनात मुख्यतः ब्रिटिशांना अनुकूल अशा कराच्या साहाय्याने, हिंदुस्तानात स्वस्त ब्रिटिश कापड भरल्यामुळे, स्वतःच्या धंद्यातून हुसकले गेलेले उपाशी विणकर होते. यांच्या दुःखात हिंदूंप्रमाणे, मुसलमान विणकरही सहभागी होते; अनेक ठिकाणी तर मुसलमान विणकरच संख्येने अधिक होते.

खरे म्हणजे, काँग्रेसकडून जे कार्य ब्रिटिशांनी अपेक्षिले होते त्याच्या पलिकडे ती गेली होती. त्यामुळे ज्या व्हाइसरॉय लॉर्ड डफरीननी तिच्या स्थापनेला उत्तेजन दिले

होते त्यांचेसुद्धा मन आता बदलले. डफरीन यांचा हा काँग्रेसविरोध तिचे नेते ह्यूम यांनी सर्वात आधी ओळखला. २२ जानेवारी १८८८ च्या तय्यबजी यांना पाठवलेल्या वैयक्तिक पत्रात त्यांनी तो व्यक्त केला. 'लॉर्ड डफरीन आता आपल्याविरुद्ध आहेत. जोपर्यंत आपण फक्त सल्ला मसलत करणारी शुद्ध देशी संस्था होतो आणि जिचे विचार त्यांना सोयीस्कर असतील तेव्हा ते स्वीकारीत असत आणि नको तेव्हा त्यांच्याकडे दुर्लक्ष करू शकत असत तेव्हा ते तिच्या बाजूचे होते.'[१४] त्याच पत्रात ह्यूमनी जाता जाता, सर सय्यद राष्ट्रवादाबद्दल इतके विकृत का बनले असावेत याबद्दल मीमांसा केली आहे; 'त्यांचे सहकारी खेळत असलेला डाव त्यांनी ओळखला आहे किंवा काय याबद्दल मला खात्री नाही. परंतु ते गर्वाने फार फुगले आहेत, आणि ते आता पूर्वीचे राहिले नाहीत.······ थोड्याच वर्षांपूर्वी ते ज्या गोष्टींचे समर्थन करीत होते त्याच गोष्टींना ते आता जोराचा विरोध करतात······ त्यांच्या भाषणा-लिखाणात ते जेवढे वाटतात तेवढे ते बुद्धिपुरस्पर निर्लज्ज असत्यवादी आणि पगडी फिरवणारे आहेत असे मला वाटत नाही. मला असे वाटते की, युरोपियन अधिकाऱ्यातील त्यांची लोकप्रियता व्हाइसरॉयने त्यांच्यावर दाखवलेली मेहेर नजर, त्यांना मिळालेली के. सी. एस. आय. ही पदवी तिचा झालेला उदोउदो आणि त्यांना विळखा घालून बसलेले त्यांचे सहकारी यामुळे त्यांचे डोके पूर्णपणे फिरून गेले आहे. त्यांच्या अनुयायांपैकी निदान काहींचे तरी मत असेच आहे.' जेव्हा अलाहाबादच्या मुख्य न्यायाधिशाशी त्यांच्या स्वतःच्या न्यायाधीश मुलाचे मतभेद झाले, तेव्हा ते ब्रिटिशविरोधी बनत आहेत असा प्रवाद उठला. तेव्हा त्यांनी इनकाराचे पत्र पायोनियरमध्ये (हे पत्र अलिगड इन्स्टिटयूट गॅझेटच्या २३ ऑक्टोबर १८९३ च्या अंकात उधृत केले आहे.) प्रसिद्ध केले : 'या अफवा······ माझ्या वैयक्तिक चारित्र्याला आणि कीर्तिला कलंक लावणाऱ्या आहेत······ ब्रिटिशांबद्दल असलेली माझी भक्ती आणि निष्ठा यांच्या जाहीर भावनांची ह्या अफवांनी गल्लत झालेली आहे.'

सर सय्यद १८९८ मध्ये आणि बेक त्याच्या पुढच्याच वर्षी मृत्यू पावले.

बेक यांचे कार्य काही ब्रिटिश वर्तुळात कौतुकाने लक्षपूर्वक पाहिले जात होते. सर आर्थर स्ट्रेची या सनदी अधिकाऱ्याने बेकवरच्या आपल्या मृत्युलेखात लिहिले : 'साम्राज्य मजबूत करण्यात गढून गेलेला एक इंग्रज मनुष्य जगातून नाहीसा झाला.'

---

१४ पूर्वी उद्‌धृत केलेल्या Source Material वरून पृ. ८५–८८.

प्रकरण आठवे

# मुसलमान आणि राष्ट्रवाद

## दोन संप्रदाय–२*

दुसऱ्या बाजूला निराळ्या प्रकारचे मुसलमान पुढारी होते; त्यापैकी काही अलिगडच्या वादळी वातावरणातसुद्धा काँग्रेसबरोबरच राहिले; आणि काही काँग्रेसमधून बाहेर पडले, पण ते तिचे आत्यंतिक शत्रू बनले नाहीत. अमीर अली आणि त्यांचे सेंट्रल महॉमेडन अँसोसिएशनमधील सहकारी हे या दुसऱ्या वर्गातील मुसलमानात मोडतात. खरे म्हणजे ही अँसोसिएशन पहिली काँग्रेस भरवणाऱ्या संघटनांपैकी एक होती त्यावेळी तिला उद्देशून अमीर अली म्हणाले होते : 'आमची अशी खात्री आहे की आगामी काँग्रेसचा उद्देश, हिंदुस्थानच्या लोकांची परिस्थिती सुधारण्याला उपकारक ठरतील अशा सुधारणा करण्याचा आहे. अशा चांगल्या उद्देशाला आमच्या सहकार्याने मिळणारी कुठलीही मदत थांबेल असे आमच्या हातून काही घडल्याचे नुसते वाटले तरी आम्हाला खेद होईल.'

परंतु अँसोसिएशनने दुसऱ्या काँग्रेसच्यावेळी तिला असलेला आपला पाठिंबा काढून घेतला आणि पुढे तो कधीच परत दिला नाही. याचे स्पष्टीकरण अँसोसिएशनच्या कार्यकारी मंडळाने १८८८ च्या आपल्या अहवालात खालीलप्रमाणे केले आहे.

१८८६ मध्ये 'राष्ट्रीय काँग्रेस' पासून लांब राहिल्याने अँसोसिएशनवर काही हिंदू पत्रातून बरीच टीका झाली. म्हणून तिने आजवर पाळलेले लांब राहण्याचे धोरण का स्वीकारले याची कारणे स्पष्ट करणे जरूर आहे. काँग्रेसने आपल्यासमोर ठेवलेल्या काही उद्देशांबद्दल असोसिएशनला बरीच सहानुभूती वाटते आणि तिच्या प्रमुख पुढाऱ्यांबद्दल आदर वाटतो. पण काँग्रेसच्या कार्यक्रमाचा संपूर्ण स्वीकार केल्याने मुसलमानांचे राजकीय उच्चाटन होईल अशी त्याची पक्की खात्री झाली आहे. सरकारची कौन्सिले ज्या नेमणूक पद्धतीने भरली जातात ती परिणामी समाधानकारक होतेच असे नाही हे अँसोसिएशनला मान्य आहे. परंतु या देशातील मुसलमानांची परिस्थिती कशी आहे आणि राष्ट्रीय घटक व धर्म यानुसार मतदान होणे किती अपरिहार्य आहे हे लक्षात घेता, या देशात प्रातिनिधिक संस्था जशाच्या तशा दाखल करणे मुसलमानांना फायद्याचे होईल यावर अँसोसिएशनचा विश्वास नाही. प्रतिनिधित्वाचे तत्त्व, अल्पसंख्य जमातीच्या संदर्भात काळजीपूर्वक विचारात घेतले पाहिजे. राज्याच्या प्रत्येक क्षेत्रातून अल्पसंख्य जमात पूर्णपणे बाजूला फेकली

---

* काँग्रेसच्या अधिकृत अहवालातून घेतलेल्या काँग्रेस ठरावाचे व भाषणांचे घेतलेले उतारे.

जाईल अशी कुठचीही पद्धत आणण्याला अॅसोसिएशन संमती देणार नाही.

शिवाय हेही विसरता कामा नये की, दोन जमातींची विषम राजकीय प्रगती व त्याच्या जोडीला मुसलमानांत अलिकडेच झालेली अल्प अशी इंग्रजी शिक्षणाची वाढ, यामुळे या कमिटीला राणीच्या मुसलमान प्रजेचे हित धोक्यात येण्याचा संभव असेल अशा कुठल्याही चळवळीविरुद्ध दक्ष रहाणे अत्यंत जरूरीचे वाटते. आमच्या अनेक धर्मबांधवांनी काँग्रेसचा दृष्टिकोन आणि स्वतःच्या प्रातिनिधिक स्वरुपाबद्दलचा दावा यावर पूर्णपणे शिक्कामोर्तब करण्यात दूरदृष्टीचा जो अभाव दाखवला आहे त्याबद्दल कमिटी फार जोराचा आक्षेप घेऊ इच्छिते. राजकीय जागृतीत आणि शैक्षणिक प्रगतीत मुसलमान आणि हिंदू यांची बरोबरी होईपर्यंत, आणि काँग्रेसच्या कार्यक्रमात मुसलमानांच्या हिताची व रक्षणाची हमी मिळेपर्यंत, काँग्रेसवाल्यांना जी उद्दिष्टे हवी आहेत त्यांची परिणती, या देशातून मुसलमानांचा समूळ नायनाट होण्यात होईल.[1]

परंतु अलिगडचे शत्रुत्व व सेंट्रल महॉमेडन अॅसोसिएशनची सावध वृत्ती असूनसुद्धा, काँग्रेस अधिवेशनाला हजर रहाणाऱ्या मुसलमानांची संख्या दरवर्षी वाढत होती. तिसरी काँग्रेस बद्रुद्दिन तय्यबजी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. तय्यबजींचे शिक्षण लंडनमध्ये झाले होते. ते मिडिल टेम्पलमध्ये दाखल झाले होते व त्यांनी १८६७ मध्ये बॅरिस्टरची सनद घेतली होती; १८९५ मध्ये ते मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश झाले. १८८० मध्ये ते अंजुमन-इ-इस्लामचे चिटणीस झाले आणि नंतर तिचे अध्यक्ष झाले. १८८२ मध्ये त्यांची मुंबई कायदेमंडळात (लेजिस्लेटिव्ह काउन्सिल) नेमणूक झाली. ज्यावेळी अलिगड आणि सेंट्रल असोसिएशन हे दोन मतप्रवाह काँग्रेसच्याविरुद्ध उभे ठाकले होते, त्यावेळी त्यांनी काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारले. त्यामुळे साहजिकच त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणाचा बराचसा भाग मुसलमानांच्या प्रश्नावर केंद्रित केला. ते म्हणाले : 'सद्गृहस्थहो, गेली दोन वर्षे काँग्रेसच्या कार्यक्रमापासून एक मोठी जमात—मुसलमान जमात—अलिप्त राहिल्यामुळे, राष्ट्रीय प्रातिनिधिक मेळावा म्हणून असणाऱ्या आपल्या प्रतिष्ठेला बाधक असा आक्षेप घेण्यात येत आहे. आता प्रथम म्हणजे हे अर्धसत्य आहे, आणि ते हिंदुस्तानच्या विशिष्ट भागालाच लागू आहे, शिवाय त्याला काही स्थानिक आणि तात्पुरती कारणे आहेत. (ऐका, ऐका आणि टाळ्या) दुसरे म्हणजे, मला वाटते, या आजच्या काँग्रेसविरुद्ध अशा तऱ्हेचा आक्षेप घेणे हे न्यायाचे ठरणार नाही. मी हे प्रामाणिकपणे कबूल करतो की, माझी प्रकृती अशी असतानाही मी तुमच्या कामकाजात अध्यक्ष होण्याची गंभीर जबाबदारी पत्करली आहे. हे करण्याचा माझा महत्त्वाचा उद्देश असा आहे की, एक व्यक्ती म्हणून नव्हे तर मुंबईच्या अंजुमन-इ-इस्लामचा प्रतिनिधी म्हणून मी असे मानतो की, हिंदुस्तानातील निरनिराळ्या जमातींच्या मग ते हिंदू, मुसलमान, पार्शी किंवा ख्रिश्चन

१. सेंट्रल नॅशनल महॉमेडन असोसिएशनच्या कमिटीचा १८८५ ते १८८८ चा मागे उल्लेख केलेला अहवाल, पृ. २१–२२.

कोणीही असोत, त्यांच्या संबंधात असे काहीही नाही की, आपल्या सर्वांच्या सारख्याच फायद्याच्या असलेल्या महत्वाच्या सुधारणा आणि महान हक्क मिळवण्याच्या प्रयत्नापासून एकाद्या जमातीने फटकून रहावे. हे माझ्या शक्तीनुसार सिद्ध करण्याची माझी कळकळीची इच्छा आहे असे मी माझ्यावतीने जाहीर करतो. हे मिळवण्यासाठी सरकारवर एकजूटीचे आणि निर्वाणीचे दडपण आणले पाहिजे अशी माझी खात्री आहे ······ सर्वांच्या सारख्याच फायद्याच्या असलेल्या या गोष्टीसाठी, इतर जातींच्या धर्मांच्या आपल्या देशबांधवाबरोबर मुसलमानांनी खांद्याला खांदा लावून काम का करू नये, हे समजणे सर्वस्वी माझ्या आकलनापलिकडे आहे. सद्गृहस्थहो, याच तत्त्वाने आम्ही मुंबई इलाख्यात सतत वागलो आहोत. मुंबई आणि मद्रास इलाख्याप्रमाणेच वायव्य प्रांतातून आणि पंजाबमधून आलेले मुसलमान प्रतिनिधी, त्यांची संख्या, त्यांची प्रवृत्ती, स्थान आणि गुणवत्ता पहाता, हाच दृष्टीकोन सर्व हिंदुस्तानातील मुसलमान पुढाऱ्यांचा, काही थोडेफार महत्वाचे अपवाद वगळता आहे याबद्दल मला जरासुद्धा शंका नाही.'

सुशिक्षित मुसलमानांत काँग्रेसची लोकप्रियता वाढत आहे हा तथ्यबर्जीचा अंदाज बरोबर होता. पहिल्या काँग्रेसला फारच थोडे मुसलमान हजर होते; दुसऱ्याला ४३१ प्रतिनिधीपैकी ३३ मुसलमान होते; १८८९ मध्ये हा आकडा एकंदर १,८८९ पैकी २५८ मुसलमान प्रतिनिधी होण्यापर्यंत वाढला.

हिंदू हितसंबंध आणि मुसलमान राजकीय हितसंबंध यांचा संयुक्तपणे विचार करणे शक्य नाही असा आरोप नंतर काही मुसलमानांनी आणि त्यांच्यावतीने काही ब्रिटिश राज्यकर्त्यांनी काँग्रेसवर केला. परंतु १८८९ च्या काँग्रेसने सुधारणेची जी नवी योजना स्वीकारली त्यामुळे तिला हा आरोप लागू पडू शकत नव्हता. या तिच्या योजनेऐवजी हिंदुस्तान सरकारने आणि ब्रिटिश सरकारने एक दुसरी योजना तयार केली. तिच्यामुळे कायदेमंडळात मुसलमानांची कमी प्रतिनिधीत्वाची तक्रार कशी निर्माण झाली हे आपण पुढील प्रकरणात पाहूच. काँग्रेस योजनेने खालील गोष्टी सुचवल्या होत्या :—

(अ) केंद्रिय कायदेमंडळ आणि प्रांतिक कायदेमंडळ या दोहोंमधील एकंदर सभासदांपैकी निवडलेले सभासद निम्म्यापेक्षा कमी नसावेत, अधिकारपरत्वे आलेले एक-चतुर्थांशापेक्षा अधिक नसावेत आणि उरलेले सरकारने नेमलेले असावेत;

(ब) सर्वसाधारणपणे महसूल जिल्हे हे मतदानाचे प्रादेशिक विभाग बनवावेत;

(क) काही विशिष्ट पात्रता असलेले २१ वर्षांवरचे सर्व पुरुष ब्रिटिश प्रजानन मतदार असावेत;

(ड) प्रत्येक जिल्ह्यातील मतदारांनी एका किंवा अधिक मतदार संघासाठी प्रतिनिधी निवडावेत;

(इ) अशा प्रकारे, प्रत्येक निवडून आलेल्या मतदार संघाच्या मर्यादेत सामावलेल्या

सर्व जिल्ह्यातील प्रतिनिधींनी, केंद्रीय कायदेमंडळासाठी, मतदार संघातील एकंदर लोकसंख्येच्या प्रत्येक पन्नास लाखाला एक प्रतिनिधी याप्रमाणे सभासद निवडावेत आणि आपल्या स्वतःच्या प्रांतिक कायदेमंडळासाठी या एकंदर लोकसंख्येच्या प्रत्येक दहा लाखाला एक याप्रमाणे प्रतिनिधी निवडावेत. पार्शी, ख्रिश्चन, मुसलमान किंवा हिंदू हे जेव्हा जेव्हा अल्पसंख्य असतील, तेव्हा तेव्हा या प्रतिनिधीत त्यांचे प्रमाण, त्या त्या जमातींचे एकंदर लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्या त्या प्रमाणात शक्यतो-पर्यंत असावे. दोनही कायदे मंडळाच्या सभासदांना काही विशिष्ट पात्रता असावी आणि काही विशेष अपात्रता असू नये. ही पात्रता आणि अपात्रता कोणती हे नंतर ठरवले जाईल.

या ठरावाला मांडलेल्या उपसूचना जरी मान्य झाल्या नाहीत तरी त्यांची दखल घेणे आवश्यक आहे, कारण त्या काळातील भावनांच्या त्या प्रातिनिधीक आहेत. ह्यूम ह्यांना 'अल्पसंख्यांकांबद्दलचे कलम' काढून टाकण्याची इच्छा होती. त्यांचा मुद्दा असा होता की, 'हिंदी लोक म्हणजे हिंदी लोक. त्यात बहुसंख्य आणि अल्पसंख्य कसले ?' पण अनेकांनी त्यांना पाठिंबा दिला नाही. हिदायत रसूल या औंधच्या मुसलमानाने असे सुचवले की, जरी हिंदूंची संख्या अधिक होती तरी कायदेमंडळात हिंदू मुसलमानांची संख्या सारखीच असावी. लखनौचे बॅरिस्टर हमीद अल्लीखान या त्यांच्या धर्मबांधवांनी त्यांना विरोध करताना असे सांगितले की, 'हिंदू किंवा मुसलमान' असा प्रश्नच काढता कामा नये. आणखी एक मुसलमान प्रतिनिधी वझीदअल्ली बिवाजी चित्कारले, 'कायदेमंडळात मुसलमानांची संख्या हिंदूंच्या तिप्पट असली पाहिजे.' या सूचनांना विरोध करताना चवथा एक मुसलमान म्हणाला, 'आपण सर्व एकाच ध्येयाने येथे जमलो आहोत. अशा प्रसंगी, मुसलमानाने स्वतःला मुसलमान किंवा हिंदुने हिंदू न म्हणवता, धर्म जात आणि रंग हे भेद विसरून सर्वांनी आपल्याला हिंदी म्हणवून घेतले पाहिजे.' आणि जेव्हा हिदायत रसूल यांची उपसूचना मताला टाकली तेव्हा मुसलमान प्रतिनिधींनीसुद्धा तिच्याविरुद्ध मतदान केले.

काँग्रेसच्या पुढच्या अधिवेशनातही (१८९०) ह्याच प्रवृत्तीवर भर दिला गेला होता. राजकीय सुधारणेच्या ठरावावर बोलताना, एक मुसलमान सभासद, सय्यद सरफुद्दीन म्हणाले की, मुसलमान जमात ही अल्पसंख्य जमात आहे आणि सुधारणामुळे तिचे हित धोक्यात येईल हे अप्रस्तुत आहे. 'खुद्द पाटणा शहराकडे पहा, तेथे म्युनिसिपालिटीसाठी वीस जागा आहेत. आणि हिंदू बहुसंख्य असूनसुद्धा तेथे त्यांनी मुसलमानांना अधिक संख्येने निवडून दिले आहे. वीस म्युनिसिपल कमिशनरांपैकी १३ मुसलमान आहेत. मुंबईत हिंदू बहुसंख्य आहेत; तरीसुद्धा पाच पार्शी, तीन युरोपियन, २ हिंदू आणि दोन मुसलमान म्युनिसिपालटीचे सभासद आहेत.'

हे काहीही असले तरी, ब्रिटिश राज्यकर्त्यांशी ज्या मुसलमानांचा संबंध आला ते

मुसलमान काँग्रेसचे नव्हते, तर काँग्रेसला विरोध करणाऱ्यांपैकी होते. व्हाइसरॉय-पुढे मुसलमानांच्या परिस्थितीचे चित्र पुन्हा पुन्हा उभे करणारी प्रमुख संस्था, सेंट्रल महॉमेडन असोसिएशन ही होती. असोसिएशनचे शिष्टमंडळ १२ नोव्हेंबर १८८७ रोजी कराचीला व्हाइसरॉय यांच्या भेटीस गेले आणि त्यांनी त्यांचे लक्ष मुसलमानांच्या मागासलेल्या परिस्थितीकडे वेधले. त्यांना दिलेल्या उत्तरात व्हाइसरॉयनी हे मान्य केले की, 'परिस्थितीमुळे आणि त्यांचा स्वतःचा ज्या घटनांवर ताबा नाही अशा घटनांमुळे, हिंदुस्तानातील अनेक भागात मुसलमान समाजाच्या लोकांना ज्या समाधान-कारक स्थितीत असण्याची अभिलाषा बाळगण्याचा हक्क आहे त्या स्थितीत ते क्वचितच आढळतात, ही वस्तुस्थिती आहे.'[२] २४ मार्च १८८८ ला अॅसोसिएशनचे आणखी एक शिष्टमंडळ, कलकत्ता येथे गव्हर्नमेंट हाऊसवर व्हाइसरॉयला भेटले, आणि त्यांनी 'मुसलमान जमातीच्या वतीने त्याला एक निरोपाचे मानपत्र अर्पण केले' यावेळी बंगाल, बिहार आणि उत्तर प्रांतातून प्रतिनिधी हजर होते. अमीर अलींनी वाचलेल्या मानपत्रात, हिंदुस्तानातील मुसलमानांसाठी, ब्रिटिश सरकारकडे संरक्षणाची मागणी केली होती. याला सेवानिवृत्त होणाऱ्या लॉर्ड डफरीनने असे उत्तर दिले होते की, 'मुसलमानांच्या (प्रगतीच्या) कार्यातील विशिष्ट विघ्ने दूर करण्याच्या त्यांच्या प्रयत्नाकडे सरकार नेहमीच अतिशय सहानुभूतीने आणि अनुकूलतेने पाहील, याबद्दल हिंदुस्तानातील मुसलमानांनी निश्चित असावे.[३]

त्यानंतर पुन्हा १२० सभासद असलेले एक मोठे शिष्टमंडळ, नवीन व्हाइसरॉय मार्क्वीस ऑफ लॅण्डसडाऊन याला भेटले आणि त्याला त्यांनी स्वागतपर मानपत्र दिले (२२ डिसेंबर १८८८) ते अॅसोसिएशनचे अध्यक्ष, प्रिन्स फरोक शहा यांनी वाचून दाखवले. त्यात 'हिंदुस्तानातील मुसलमानांना हिंदुस्तानच्या इतर लोकांशी स्पर्धा करताना ज्या अडचणींना तोंड द्यावे लागते' त्या अडचणींची कहाणी वाचली होती. आपल्या उत्तरात व्हाइसरॉय म्हणाले : 'तुम्ही म्हटल्याप्रमाणे राष्ट्रीय संपत्तीत तुमचा हिस्सा तुमच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नाही, त्याचप्रमाणे इतर जमातींपाशी आहे अशी संघटना तुमच्याजवळ नाही यामुळे देशाच्या सार्वजनिक जीवनात तुमची इच्छा असली तरी तुम्ही योग्य प्रमाणात भाग घेऊ शकत नाही.[४] सेंट्रल असोसिएशन आणि निरनिराळ्या व्हाइसरॉयमध्ये झालेल्या विचारविनिमयात, काँग्रेसच्या अस्तित्वाकडे, तिच्या मुसलमान संबंधीच्या दृष्टीकोनाकडे, तिच्या अधि-वेशनांना वाढत्या संख्येने हजर रहात असलेल्या आणि एक राष्ट्रीयत्वाला अनकूल असलेल्या मुसलमानांकडे दुर्लक्ष केले होते. ह्या विचार विनिमयातून निराळे विश्लेषण आणि निराळा परिणाम निर्माण झाला. लॉर्ड डफरीन यांनी कायदेमंडळाची वाढ

---

२. 'Speeches Delivered in India by the Marquis of Dufferin and Ava' पृ. १७२

३. कित्ता, पृ. २०३.

४. 'Speeches by His Excellency the Marquis of Lansddowne' पृ. २८.

आणि त्यात हिंदी लोकांचा अंतर्भाव करण्याची शिफारस करताना हिंदुस्तानातील लोकांचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे. ,'हिंदुस्तानातील लोकसंख्या विविध धर्माच्या, भिन्न आचारांचे पालन करणाऱ्या, भिन्नभाषा बोलणाऱ्या फार मोठ्या संख्येला भिन्न राष्ट्रीय गटांनी भरलेली आहे. त्याचप्रमाणे बऱ्याच परस्परविरोधी सामाजिक रीतिरिवाजातून निर्माण झालेल्या पूर्वग्रहानी आणि प्रतिस्पर्धी आर्थिक हितसंबंधांनीही ते एकमेकापासून अधिकच दूर गेले आहेत' १८९२ च्या इंडियन काउन्सिल बिलावर पार्लमेंटमध्ये झालेल्या चर्चेच्यावेळीही याच विचारांचा पुनरुच्चार झाला. चर्चेत भाग घेताना लॉर्ड किंबर्ले म्हणाले की, 'जवळजवळ युरोप एवढ्या मोठ्या आणि अनेक निरनिराळ्या वंशांनी भरलेल्या देशाला प्रातिनिधीक पद्धत लादण्याची गणना, मानवांच्या मनात क्वचितच भरकटणाऱ्या एकाद्या कल्पनाविलासात करता येईल.' आणखी पुढे बोलताना त्यांनी हिंदुस्तानातील एका मोठ्या जमातीच्या—मुसलमानांच्या—भावनांची दखल घेण्यावर भर दिला. ते म्हणाले, 'तुम्ही जर सर्वस्वी हिंदू लोकमताप्रमाणे चालणार असाल तर तुम्ही मोठ्या धोक्यात याल.' *

अशा प्रकारच्या केलेल्या १०–१२ भाषणात, काँग्रेसचा उल्लेखही न करता, हिंदी प्रतिनिधित्वाची चांगली तरतूद करण्याचा सुचवलेला उपाय हा काँग्रेसने सुचवलेला आणि त्यांच्या व्यासपिठावरून मुसलमानांनी पाठिंबा दिलेला मार्ग नव्हता, तर या उपायात, निरनिराळ्या जातीय आणि व्यासायिक भिन्न हितसंबंधांना योग्य जागा देण्यावर, भर देण्यात आला होता. ते काहीही असले तरीसुद्धा, १८९२ च्या काउन्सिल ॲक्टमध्ये जमीनदार व व्यापारी यांना अधिक प्रतिनिधित्व दिले गेले. आणि मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा फारच कमी प्रतिनिधित्व देऊन त्यांना कुरकुरत ठेवण्यात आले.

---

* (६ नोव्हेंबर १९८८ च्या हिंदुस्तान सरकारच्या खलित्याला त्यांनी जोडलेल्या पुरवणीवरुन).

## प्रकरण नववे

# रुंदावत जाणारी दरी

सर सय्यद आणि बेक यांच्या मृत्यूनंतर, अलिगड कॉलेजमध्ये यापूर्वीच प्राध्यापक असलेले आणि आपले पुर्वाधिकारी बेक यांजकडून राजकीय कार्याचे धडे घेतलेले थिओडोर मॉरिसन यांनी त्यांचे धोरण व राजकारण जिवंत ठेवले. खरं म्हणजे, जेव्हा लंडनमध्ये त्यांनी पेट्रिऑटिक असोसिएशनची शाखा उघडली आणि नंतर ते बेकचे इंग्लंडमधील मुख्य प्रतिनिधी झाले, तेव्हाच त्यांचे हे शिक्षण सुरू झाले होते. मुसलमान विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळवून देण्याकरिता एम्प्लॉयमेंट ब्युरो काढून त्यांनी आपल्या प्राचार्य पदाच्या कारकिर्दीस सुरवात केली. हे अलिगड कॉलेजच्या परंपरेला धरूनच होते; विद्यार्थ्यांनी आपल्याला भावी सरकारी नोकर समजले पाहिजे आणि म्हणून चळवळीचे राजकारण वर्ज्य मानले पाहिजे अशी ती परंपरा होती. १८९७ मध्ये, उत्तर प्रदेशात, डेप्युटी कलेक्टर किंवा हिंदी मॅजिस्ट्रेटचे प्रमाण ११६ हिंदू व ९४ मुसलमान असे होते, २२ सिव्हिल जज्जांपैकी ८ मुसलमान होते. म्हणजे या दोनही ठिकाणी मुसलमानांचा आकडा त्यांच्या संख्येच्या प्रमाणापेक्षा कितीतरी अधिक होता.[१] त्यावेळी मध्य प्रांत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मध्य प्रदेशातही त्यांना जोरदार स्थान मिळाले होते परंतु मुसलमान बहुसंख्य असलेल्या बंगालमध्ये मात्र ते हिंदूंच्या फार मागे होते. कारण उघडच होते: बहुसंख्य बंगाली मुसलमान हे खालच्या वर्गाच्या हिंदुमधून बाटलेले होते. आणि खालच्या वर्गाच्या हिंदूप्रमाणेच त्यांनी शिक्षणात प्रगती केलेली नव्हती.

मॉरिसनने बेक आणि सर सय्यद यांचा मार्ग निष्ठेने अनुसरला. लोकसत्ताक राज्य, हिंदुस्तानात, अल्पसंख्यकांना लाकुडतोडे आणि पाणके बनवील असे ते म्हणत. जेव्हा मॉरिसन आपले हे पुराण सांगत होते तेव्हा हिंदी उर्दू वादाने पुन्हा डोके वर काढले. त्याची हकीकत थोडक्यात अशी :—

काही हिंदूंनी सादर केलेल्या निवेदनानुसार सरकारने १८ एप्रिल १९०० रोजी असा ठराव केला की, देवनागरी लिपीत लिहिलेल्या अर्जांचासुद्धा स्वीकार करण्याची परवानगी सरकारी कचेऱ्या व न्यायालयांना देण्यात यावी, त्यापूर्वी फक्त उर्दू भाषेलाच मान्यता होती. या हुकूमात असे म्हटले होते की, यापुढे न्यायालयीन

१ बंगालच्या सनदी नोकरीत असलेल्या आय. डब्ल्यू. ग्रुक कृत The North West Provinces of India (1897).

समन्से व सरकारी जाहीरनामे उर्दू आणि हिंदी या दोनही भाषेमध्ये काढली जातील आणि नागरी प्रशासनातील नेमणुका करताना दोनही लिप्या सक्तीच्या राहतील. या ठरावाचा अर्थ अलिगड सांप्रदायाच्या मुसलमानांनी, उर्दूचा दर्जा खाली आणला जात आहे असा लावला. मुसलमानांचा संताप व्यक्त करण्यासाठी प्रांताच्या अनेक विभागात निषेध सभा भरवल्या गेल्या. आपली सरकारबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हिंदुंनी वेगळ्या सभा घेतल्या. हा तापलेला वाद वर्तमानपत्रात अनेक दिवस चालला होता. आणि त्यामुळे हिंदू मुसलमानांमधील अंतर अधिकच वाढले.

आणखी असे की, या वादाने अलिगडचे शांत वातावरण गढूळ झाले. ऑगस्टमध्ये, सरकारी ठरावाचा निषेध करण्यासाठी आणि तो परत घ्या अशी मागणी करण्यासाठी, लखनौमध्ये एक सभा बोलावली गेली. अलिगड कॉलेजचे चिटणीस नबाब मोहशीना उल्-मुल्क हे तिच्या अध्यक्षपदी होते. त्यांनी आपल्या भाषणाने अलिगडच्या संयमी परंपरेचा भंग केला, आणि लेफ्टनंट गव्हर्नरचा रोष ओढवून घेतला. नबाबाला, महाविद्यालयाचे चिटणीसपद आणि हिंदीविरोधी चळवळीचे सूत्रधार असलेल्या अंजुमन-ए-उर्दूचे राजकारण, यापैकी एकाची निवड करण्याचे सांगण्यात आले. त्यांच्या मित्रांनी त्यांना अंजुमन-ए-उर्दूच्या राजकारणापासून दूर रहाण्याचा सल्ला दिला आणि त्यांनी तो मानला. पण अलिगडच्या बऱ्याच मुसलमानांना लेफ्टनंट गव्हर्नरच्या या हुकूमाचा संताप आला. आणि मुसलमानांची राजकीय संघटना का असू नये असे ते एकमेकात बोलू लागले. या मताला पाठिंबा देणाऱ्यात मेहदी हुसेन आणि वाकर-उल्-मुल्क हे दोघे होते. मुसलमानांनी राजकारणात भाग घेऊ नये या सर सय्यद यांच्या अधिकृत मार्गदर्शनाचा आधार घेऊन नवाब मोहसिन-उल्-मुल्क यांनी त्यांना विरोध केला. मॉरिसन यांनी असा युक्तिवाद केला की, अशी सूचना करणे म्हणजे 'कॉंग्रेसच्या मार्गाने' जाणे होय. हा मार्ग मुसलमानात भेद निर्माण करील. सरकार दुखावले जाईल या भीतिने मान्यवर लोक अशा राजकीय संस्थेला मिळणार नाहीत: गेली पंचवीस वर्षे सरकार मुसलमानांना सवलतीची वागणूक देत आले आहे. तेव्हा राजकीय मार्ग मुसलमानांच्या हिताला तारक होण्याऐवजी मारकच ठरेल. त्यांनी आपले भवितव्य सरकारच्या हाती सोपवावे आणि कॉंग्रेसची नक्कल करण्यापासून दूर रहावे. सरकारी नोकरांनी मुसलमानांना खाजगीरित्या मदत केली आहे; जर ते राजकारणाकडे वळले तर ते स्वतः होऊनच या फायद्याला मुकतील.

अशा प्रचाराने, मॉरिसनने अलिगडच्या मुसलमान पुढाऱ्यांना घाबरून सोडले आणि याचा परिणाम म्हणजे, ती संकल्पित राजकीय योजना बारगळली.

तरीसुद्धा, काही मुसलमानांना सरकारच्या हिंदीबद्दलच्या ठरावाशी जुळवून घेणे अशक्य झाले, आणि त्यांनी लखनौला पुन्हा एक सभा बोलावली. त्या सभेत मुसलमानांच्या हक्कावर गदा येत आहे असे पुन्हा पुन्हा ठासून सांगण्यात आले. वाकर-उल-मुल्क यांनी केलेली मुस्लिम राजकीय संघटना स्थापन करण्याची योजना

ग्मंत केलं गेली. या संस्थेचे उद्देश असे होते : (१) मुसलमानांचा दृष्टिकोन सरकारकडे ग्दरपूर्वक मांडणे; (२) मुसलमानांचे कल्याण ब्रिटिश राजवटीवर अवलंबून अ. ची मुसलमानांत जाणीव निर्माण करणे; (३) लोकसत्ताक संस्था आणि हिंदी रे. गोकरीच्या परिक्षा भारतात आणि इंग्लंडमध्ये एकदमच घ्याव्या या कॉंग्रेसच्या मागण्यांना पाठिंबा देण्यापासून मुसलमानांना परावृत्त करणे. या सभेने निरनिराळचा जिल्ह्यात संघटनेच्या शाखा उघडण्यासाठी एक समिती स्थापन केली. नवाब वाकर-उल्-मुल्क यांनी स्वत: काही जिल्ह्यांना भेटी दिल्या, तेथे सभा घेतल्या आणि मुसलमानांना राजकारणात रस घेण्याचा आग्रह केला. कुठल्याही जिल्ह्यात गेल्याबरोबर तेथील मॅजिस्ट्रेटला भेटणे हे त्यांचे पहिले कार्य असे. तरीसुद्धा, त्यांच्या संघटनेला कधीच सामर्थ्य प्राप्त झाले नाही आणि ती पाच वर्षात खलास झाली.

दरम्यानच्या काळात, मुसलमानांमधली कॉंग्रेसची लोकप्रियता अधिक वाढली होती १८९९ च्या लखनौच्या कॉंग्रेसला, ७८९ पैकी ३०० मुसलमान प्रतिनिधी, इतक्या मोठ्या संख्येने मुसलमान हजर राहिले. लखनौमध्ये कॉंग्रेसविरोधी दारूगोळा कमी होता असे नाही. लखनौला कॉंग्रेस अधिवेशन भरणार अशा बातम्या पसरल्याबरोबर कॉंग्रेसविरोधी निदर्शनांची तयारी सुरू झाली. काही राजनिष्ठ मुसलमानांनी, सरकारला अशी विनंती केली की, दक्षिणेतून आलेले कॉंग्रेसचे लोक या शहरात 'प्लेग' फैलावतील या सबबीवर तिच्या अधिवेशनावर सरकारने बंदी घालावी. मिर्झा महमद आब्बास या एकेकाळी सनदी नोकरीत असलेल्या एका स्थानिक धेंडाच्या नेतृत्वाखाली त्यांनी एक समिती स्थापन केली. या समितीने, कॉंग्रेसला मिळण्यापासून मुसलमानांना परावृत करण्याची शिकस्त केली आणि या आपल्या उद्दिष्टासाठी धर्माचा प्रश्न पुढे केला. हिंदू आणि मुसलमानांमधील धार्मिक भांडणापासून फक्त लखनौच अलिप्त होते. आणि याचे श्रेय या दोनही जमातींनी स्वीकारलेल्या, एकजूट आणि स्नेह भावापासून न ढळण्याच्या शहाणपणाच्या मार्गाला दिले पाहिजे.

तरीसुद्धा, सुमारे ९०० मुसलमानांनी रिफा-इ-आम मैदानात कॉंग्रेसविरोधी निदर्शने केली. भाषणे झाल्यानंतर सभेने कॉंग्रेसचा निषेध करणारे आणि सरकारी नोकऱ्यात मुसलमान उमरावांना अधिक सवलती मिळाव्या अशी विनंती करणारे काही ठराव, लखनौ जनतेच्या नावाने मंजूर केले गेले.[२]

अशा रितीने. मुसलमान दोन वैचारिक पंथांत, सर्वसाधारणपणे विभागले गेले; एका बाजूला धार्मिक शिक्षणाच्या प्रभावाखाली दबले गेलेले आणि हिंदूंपासून सामाजिक अलिप्ततेत वाढलेले मुसलमान होते, आणि आर्यसमाज, गोसंरक्षण चळवळ, टिळकांचा गणेशोत्सव आणि हिंदीवादी चळवळ यासारख्या हिंदू चळवळीबाबत त्यांची तीव्र प्रतिक्रिया होती. आणि दुसऱ्या बाजूला जे मुसलमान होते ते जातीय भावनाविवशतेपासून

२. कॉंग्रेसच्या अधिकृत रिपोर्टाची प्रस्तावना.

अलिप्त होते आणि हिंदू व मुसलमान यांच्या राजकीय एकतेवर त्यांचा विश्वास होता. पहिले, अधिक बोलके, अधिक क्रियाशील व सरकारी अनुग्रहाच्या प्रकाशाची ऊब घेणारे होते, पण आपण इस्लामचे ऋण फेडण्याचे आद्य कर्तव्य बजावत आहोत हा त्यांचा विश्वास त्यांना क्रियाशील बनवण्यास मुख्यत: कारणीभूत झाला. १९०० चा ठराव मंजूर करून घेणाऱ्या हिंदी चळवळीने ज्याप्रमाणे उर्दू बरोबर समान दर्जा असावा अशी मागणी केली होती, त्याचप्रमाणे इस्लाम धर्माला दिले होते तितकेच धर्म प्रसाराचे हक्क, आर्य समाजाला हवे होते आणि तसेच, मोहरमसाठी मुसलमानांना दिल्या होत्या तितक्याच सवलती टिळकांच्या गणपती उत्सवाच्या कार्यकर्त्यांना हव्या होत्या.

ब्रम्ह समाजाप्रमाणेच आर्यसमाज हे ख्रिश्चन प्रचाराला आव्हान होते. याचे संस्थापक दयानंद यांनी प्रतिपादले होते की, वेदात सांगितल्याप्रमाणे आपल्या विधी आणि आचरणात जर लोक सुधारणा करतील तर त्यांचा न्यूनगंड नाहीसा होईल. कालांतराने आर्यसमाज हा उत्साही सुशिक्षित हिंदुंचे व्यासपीठ बनला आणि त्यांच्यातून काही हिंदी राजकीय पुढारी उदयास आले. आर्यसमाज चळवळीचे एक अंग असे होते की, त्यामुळे तिने मुसलमानांचे शत्रुत्व ओढवून घेतले; ते अंग म्हणजे अहिंदुंचे पुन्हा हिंदुकरण. या चळवळीचा युक्तिवाद अगदी साधा होता; इस्लाम किंवा ख्रिश्चन धर्म जर इतर धर्माच्या अनुयायांना आपल्या धर्मात दाखल करून घेऊ शकतो तर हिंदुधर्म हे का करू शकत नाही? याला विरोधी असे वेदात काहीही नाही. वैदिक धर्म हा सर्वात जुना आहे आणि इतर सर्व धर्मांचा उगम याच्यानंतर हजारो वर्षांनी झाला आहे. या ऐतिहासिक सत्याने त्यांच्या ह्या मुद्याला अधिक बळकटी आली. नवीन धर्मात जे काही चांगले होते ते सर्व वैदिक धर्मापासून उसने घेतले आहे हे सिद्ध करण्यासाठी पत्रके व पुस्तके निर्माण केली गेली. मुसलमान आणि ख्रिश्चन धर्मगुरुंनी आपल्या धर्मबांधवांची संख्या वाढवण्याकरिता जो उत्साह दाखवला, त्याचे उदाहरण आर्यसमाजी लोकांपुढे होते. हिंदू धर्म अधोगतीला गेल्यामुळे, हिंदुसमाजात, बाल विधवा निर्माण करणारे बालविवाह, विधवांच्या पुनर्विवाहाला बंदी आणि अस्पृश्यता अशांसारख्या दुष्टप्रथा निर्माण झाल्या. या प्रथांचे बळी असणाऱ्या हिंदुंना, या दुष्ट प्रथांपासून मुक्त असलेला इस्लाम आश्रय देऊ शकत होता. त्यामुळे लोकसंख्येच्यादृष्टीने हिंदुंचा जो तोटा तो मुसलमानांचा फायदा बनला. दयानंदांनी याच्या मुळावरच घाव घातला. विधवांनी पुनर्विवाह केला पाहिजे, वेदात अस्पृश्यता निषिद्ध होती आणि हिंदुंच्या सर्व जातींनी एकमेकात मुक्तपणे मिसळले पाहिजे आणि एकत्र भोजनाला विरोध करता कामा नये अशी शिकवण देत त्यांचे अनुयायी फिरले. पण आर्यसमाजाच्या दिक्षेच्या कार्यक्रमाला म्हणण्यासारखे यश लाभले नाही. याचे कारण उघडच होते. आर्यसमाजाच्या विवेकवादाला, प्रचलित हिंदू कर्मठवादाकडून प्रतिसाद मिळाला नाही; हिंदुधर्माच्या

दिक्षा घेतलेल्याची गणना 'अस्पृश्य' वर्गात होऊ लागली. त्यामुळे आर्यसमाजाचा कार्यक्रम अजिबात फसला आणि त्याने हिंदू मुसलमानात विलक्षण शत्रुत्व वाढविले.

मुसलमानांनी हिंदुंवर केलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ ताबूताच्या वार्षिक मिरवणुकीतून पुण्याच्या हिंदुंनी आपले अंग काढून घेतल्यानंतर, १८९३ मध्ये हिंदूंच्या खाजगी घरगुती गणपती उत्सवाला, सार्वजनिक आणि मिरवणुकीचे स्वरुप प्राप्त झाले. परंतु या उत्सवाचा उद्देश आणि कारणे ताबुतापेक्षा आमुलाग्र निराळी होती. राजकीय प्रचाराचे माध्यम म्हणून त्याची वाढ झाली. आणि जेव्हा राष्ट्रवादाची शिकवण राजद्रोह समजली जात होती तेव्हा त्याचा प्रचार या उत्सवाच्या नावाखाली करणे सोयीचे ठरले. गणपती उत्सवाच्या राजकीय स्वरुपामुळे अनेक शहरात, एक दोन वर्षातच तो, ज्यात हिंदू आणि मुसलमान खांद्याला खांदा लाऊन भाग घेत होते असा फार मोठा राष्ट्रीय उत्सव बनला. 'रास्त गोफ्तार' या मुंबईच्या साप्ताहिकात १८९६ साली प्रसिद्ध झाल्याप्रमाणे सोलापूरचा गणपती उत्सव आजवरच्या कोणत्याही तत्सम उत्सवापेक्षा अधिक यशस्वी आणि अधिक उत्साहपूर्ण होता आणि लक्षात घेण्यासारखे वैशिष्टय म्हणजे, गणपतीचा मान राखण्यात हिंदुंबरोबर स्थानिक मुसलमानांनीही दिलखुलास भाग घेतला होता. नाशिक येथें गणपती विसर्जनाला हिंदू आणि मुसलमान या दोघानींही हातभार लावला होता इतकेच नव्हे तर, मिरवणुकीच्या अग्रभागी एक मुसलमान होता. दोन ठिकाणी पोलीसांनी काहीतरी जातीय. तेढ माजवण्याचा प्रयत्न केला, पण सुदैवाने त्यातून काही विपरीत प्रसंग उद्भवले नाहीत. पुणे जिल्ह्यातील निमगावला गणपती उत्सवाबाबत सर्वसाधारणपणे मुसलमान उदासीन होते, आणि काहींचा त्याला पाठिंबा होता. पण तेथील चौकी-दाराने मिरवणुकीतील वाद्य वाजवण्यावर बंदी घालून मुसलमानात 'हक्काची जाणीव उत्पन्न केली. तळेगावात, जिल्हा मॅजिस्ट्रेटने जादा अधिकार दिलेल्या पोलीस सुपरिंटेंडेटने अशाच प्रकारचा उत्साह दाखवला आणि दोन जातीतील' स्नेहसंबंधात बिघाड निर्माण केला. परंतु हे सर्व खरे असले तरी ताबूतांपासून झालेली फारकत आणि गणपती उत्सवाला प्राप्त झालेली प्रतिष्ठा यामुळे काही हिंदू आणि मुसलमानांच्या मनात कटुता भरुन राहिली.[३]

गणपती उत्सवाप्रमाणेच राजकीय जाणीव वाढण्याच्या उद्देशाने टिळकांनीच सुरू केलेल्या शिवाजी उत्सवाकडे काही मुसलमान आकृष्ट झाले आणि काही रागावले. या संतप्त मुसलमानांचा पक्ष, टाइम्स ऑफ इंडिया या अँग्लो इंडियन वर्तमानपत्राने उचलून धरला आणि त्याने टिळकांचा आणि अफझुलखानाला 'विश्वासघाताने' मारल्याबद्दल शिवाजीचा निषेध केला. अफझुलखान दोषी होता की, शिवाजी दोषी होता ह्याबद्दल पत्रव्यवहार करणाऱ्यांचा वाद, ह्या वर्तमानपत्रातून अनेक आठवडे चालू होता. टाइम्सने बनवलेल्या आपल्या मताला ब्रिटिश इतिहासकारांचा आधार

३. १९ सप्टेंबर १८९६ चे 'नाशिक-वृत्त'

होता. या ब्रिटिश इतिहासकारांना आर. पी. करकरे या महाराष्ट्रीय विद्वानाने, मुख्यत: मुसलमानी कागदपत्रांचा आधार घेऊन आव्हान दिले. या वादविवादाने शिवाजी हा हिंदू नेता होता आणि शिवाजी उत्सवाशी मुसलमानांना काही कर्तव्य नाही असे लोकमत बनवण्यास त्याने मदत केली. आणि जरी १८९७ मध्ये या उत्सवांचे हेतू देशप्रेमी होते असे शाबीत होऊन टिळकांना राजद्रोहाखाली दोषी ठरवण्यात आले तरीसुद्धा, यातून उद्‌भवलेले हिंदू मुसलमानातील वैषम्य नाहीसे झाले नाही. आणि रास्त गोफ्तार आणि अखबार-ए-इस्लाम सारख्या जातीयवादी पत्रांच्याच शब्दात सांगायचे झाले तर, टिळकांच्या बंदिवासाबद्दल ती 'आनंदित झाली'. शिवाजी हिंदू होता हे खरे. पण त्याविषयी टिळकांचे स्पष्टीकरण असे होते की, जर ते उत्तर हिंदुस्तानात असते तर त्यांनी हिंदू आणि मुसलमान या दोघांनाही वंदनीय असलेला वीर नेता अकबर याचा उत्सव केला असता; दक्षिणेत शिवाजी वंदनीय वीर नेता होता आणि फक्त त्याच्या नावानेच लोकात चैतन्य निर्माण करणे शक्य होते.

एकोणीसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात, ज्या एका व्यक्तीने ब्रिटिशांना घोर चिंता निर्माण केली त्या व्यक्तीचे नाव टिळक. त्यांच्या हिंदू अनुयायांनी नाही तरी निदान मुसलमानांनी तरी त्यांच्या वर्चस्वाखाली जाऊ नये असे ब्रिटिश प्रचारकांना फार तळमळीने वाटत होते. त्यांनी टिळकांवर मुसलमानांच्याविरुद्ध असलेला हिंदू पुढारी असा दोषारोप केला. हे करणारा पहिला ब्रिटिश गृहस्थ 'इंडियन अन्‌रेस्ट' चा लेखक सर. वॅलेंटाईन चिरोल. त्याने आपल्या पुस्तकात या काळाबद्दल उल्लेख करताना म्हटले आहे की, 'त्यांनी (टिळकांनी) जाहीर सभातून आपल्या आग ओकणाऱ्या वक्तृत्वाने, मुसलमान हे हिंदुचे कट्टे वैरी एवढे वर्णन करूनच ते थांबले नाहीत, तर त्यांनी मुसलमानांना उघडउघड चिडविण्याच्या हेतूने 'गोवध प्रतिबंधक मंडळ' नावाची संघटना सुरू केली. आता, हे शुद्ध कुभांड होते. खुद्द हिंदुस्तान सरकारचे कायदा सल्लागार मॉंटगोमेरी या इंग्लिश गृहस्थांनी नंतर पाठवलेल्या आपल्या गुप्त खलित्यात (जो कधी उजेडातच आला नाही), टिळकांना जातीयवादाच्या आरोपातून निर्दोषी ठरवले. त्यांनी म्हटले होते : "गोवध चळवळीच्या उगमाशी टिळकांचा काहीही संबंध नव्हता आणि १८९३ च्या हिंदू-मुसलमान दंग्यापूर्वी किंवा नंतर गोवध प्रतिबंधक मंडळाच्या व्यवस्थेत किंवा त्याचे उद्दिष्ट पसरण्यात टिळकांनी भाग घेतला होता असे दाखवणारा कुठचाच पुरावा उपलब्ध नाही······' पण जणू काय चिरोल प्रमाण समजून या काळातील राजकारणावर नंतर ब्रिटिश आणि मुसलमान लेखकांनी डझनावारी लिहिलेल्या पुस्तकात टिळकांचा उल्लेख, गोसंरक्षक आणि जातीय हिंदू पुढारी असा केला. ज्या लेखकांचा प्रचार हा उद्देश नव्हता त्यांनीसुद्धा चिरोलच्या 'आद्य' ग्रंथावर विसंबून इतिहासाची फार गंभीर प्रतारणा केली.

आता, उजेडात आलेल्या सरकारी कागदपत्रावरून हे स्पष्ट दिसते की, चिरोलच्या

दुष्ट संतत प्रचारात तात्कालीन ब्रिटिश सरकारचा हात होता. या कागदपत्रात हे मान्य केले आहे की, त्याला सरकारी प्रचार करण्याकरिता नेमला होता, सरकारी गुप्त कागदपत्रापर्यंत त्याचा शिरकाव होता आणि एका एक्झिक्युटिव्ह कौन्सिलरच्या शब्दात सांगायचे म्हणजे, मुंबई सरकारच्या प्रेरणेनेच त्याने 'इंडियन अनरेस्ट' हे पुस्तक लिहिले या सरकारच्या अनैतिक कार्यावरून सर्वांनी नसली तरी काही ब्रिटिश राज्यकर्त्यांनी हिंदू मुसलमान मतभेदांना चिथावणी दिली, असे अनुमान काढणे गैरवाजवी ठरणार नाही; काही म्हटले तरी त्यांनी या मतभेदांना उत्तेजन दिलेच. काँग्रेसविरोधी चळवळ मुसलमानात संघटित नेतृत्वाशिवाय किंवा संघटनेशिवाय, उत्तर हिंदुस्तान, मुंबई इलाखा आणि बंगालमध्ये एकदमच झाली याला काही विशेष अर्थ आहे. त्याचप्रमाणे १८८८ मध्ये, जेव्हा एका प्रमुख मुसलमानांच्या अध्यक्षतेखाली, देशाच्या निरनिराळ्या भागातील मुसलमान काँग्रेस अधिवेशनात भाग घेत होते तेव्हा त्यांनी जातीयवादी अशी कसलीच मागणी मुसलमानांकरिता केली नसताना, त्यानंतर थोड्याच महिन्यांनी, मुसलमानांकरिता जातीय प्रतिनिधित्वाच्या भाषेत डफरीन बोलतो, यालाही काही विशिष्ट अर्थ आहे आणि 'मुसलमानांतील वरिष्ठ वर्ग हे आपल्याला दुर्बलतेपेक्षा सामर्थ्य देणारे वर्ग आहेत. हे वर्ग लोकसंख्येच्यादृष्टीने लहान पण उत्साही अल्पसंख्यांकांचे बनलेले आहेत आणि त्यांचे व आपले राजकीय हितसंबंध तंतोतंत जुळणारे आहेत' या सर जॉन स्ट्रेचीच्या म्हणण्यातही काही असाच अर्थ आहे. हिंदुस्तानच्या मुख्य राजकीय प्रवाहापासून मुसलमानांना थोपवून धरण्याचा तो एक अर्थपूर्ण डाव होता. मुसलमानी हितसंबंध ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या हितसंबंधांशी तंतोतंत जुळणारे कसे होते? ब्रिटिश आणि काँग्रेस या दोन पक्षातून मुसलमानांना एक निवडावयाचा होता आणि बरेच वर्षे त्यांची निवड ब्रिटिशांच्या बाजूला झुकत होती. तरीसुद्धा काँग्रेस व्यासपिठावरून मुसलमानांचे मन वळवण्याचे कार्य, ब्रिटिश सत्ता संपुष्टात येईपर्यंत चालूच होते आणि या वेळेपर्यंत मुसलमानांनी काँग्रेसचा जवळजवळ संपूर्णपणे त्याग केला होता. काँग्रेसच्या पहिल्या दहा वर्षांच्या काळात, ब्रिटिश सरकारवर अनेक वर्षे फायदेशीर निष्ठा ठेवणारे मुसलमान पुढारी आणि आर्थिक स्वतंत्रता असणारे पुढारी, यांच्या दरम्यान मुसलमानांच्या नेतृत्वाबद्दल स्पर्धा होती. या दुसऱ्या प्रकारच्या पुढाऱ्यात आर. एम. सयानी हे एक होते. ते १८९६ च्या काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात, मुसलमान काँग्रेसच्याविरुद्ध होते ही गोष्ट साफ नाकारली. काँग्रेसचे अध्यक्ष होण्यापूर्वी तीस वर्षे ते सार्वजनिक जीवनात होते. नवल करण्यासारखी गोष्ट अशी की, सयानी आणि तय्यबजीसारखे पुढारी काँग्रेसबरोबर होते, आणि ज्यांना मुंबईच्या सार्वजनिक जीवनात फारसे स्थान नव्हते त्यांनी आपण ब्रिटिशनिष्ठ आहोत असे जाहीर केले आणि या निष्ठेला काँग्रेसच्या सभासदत्वाने तडा जाईल असा दावा मांडला.

प्रकरण दहावे

# मुस्लिम बंगाल

ब्रिटिश अंमलाखाली आलेला बंगाल प्रांत हा राज्यकारभाराच्या दृष्टीने फार मोठा विभाग होता. ब्रिटिश सत्ता पूर्णपणे प्रस्थापित झाल्यानंतर, राज्यकारभाराच्या सोयीच्यादृष्टीने त्याची फाळणी केली पाहिजे असे त्यांना वाटू लागले. १८७४ मध्ये आसाम वेगळा केला गेला आणि त्याचा कारभार स्वतंत्र झाला. १८९२ च्या सुधारणानंतर चितागाँग वेगळा करावा आणि आसामला जोडावा अशी सरकारने सूचना केली. परंतु याविरुद्ध लोकमत बरेच खवळले, आणि ही सूचना रद्द केली गेली. तरीसुद्धा, व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन याने हा प्रश्न पुन्हा पुढे आणला आणि कारभाराच्यादृष्टीशी जातीय गरजेची सांगड घालून बंगाल प्रांताची मुसलमानी बंगाल आणि हिंदू बंगाल अशी फाळणी करण्याचे त्याने ठरवले; पूर्वेकडच्या भागात मुसलमान बहुसंख्य होते आणि पश्चिमेकडच्या भागात हिंदू बहुसंख्य होते. १९०३ मध्ये फाळणीची योजना सरकारी गोटातून अनधिकृतपणे बाहेर आली. हिंदू आणि मुसलमानांनी संयुक्तपणे या योजनेविरुद्ध शेकडो निषेध सभा घेऊन तिचा धिक्कार केला आणि कर्झनची ग़ाळण उडवून दिली. या योजनेच्याविरुद्ध असलेल्या प्रसिद्ध मुसलमानात डाक्क्याचे नबाब सर सलिमुल्ला हे होते.

हिंदू मुसलमानांच्या या संयुक्त निदर्शनांचा अर्थ कर्झनने असा लावला की, मुसलमानांना या योजनेची किंमत कळली नसल्याचे हे चिन्ह आहे. म्हणून मुसलमानांशी वैयक्तिक संबंध जोडून त्यांना या योजनेला वश करून घेण्याचा त्याने विचार केला. १९०४ च्या फेब्रुवारीत त्याने पूर्वबंगालचा दौरा काढला, प्रत्येक टप्प्यावर त्याने प्रमुख स्थानिक मुसलमानांशी विचार विनिमय केला, मुसलमानांच्या मोठ्या सभा घेतल्या आणि मोठमोठी भाषणे केली. बंगालची फाळणी करण्यात बंगालच्या कारभाराचा भार हलका करणे एवढाच आपला उद्देश नाही तर, जेथे इस्लामचे प्रभुत्व आणि त्याच्या अनुयायांचे वर्चस्व राहील असा मुसलमान प्रांत निर्माण करणे हाही उद्देश आहे. आणि हे लक्षात घेऊनच आपण डाक्का विभागाचे दोन जिल्हेही या योजनेत घालण्याचे ठरवले आहे असे त्याने त्यांना सांगितले. फाळणीमुळे जुने मुसलमान राजे आणि सुभेदार यांच्या काळानंतर, पूर्व बंगालमधील मुसलमानांनी कधी उपभोगली नव्हती अशी मुसलमानांची एकता ते उपभोगतील असे प्रलोभन त्याने त्यांना दाखवले.

पण हे स्वप्न साकार होण्यापूर्वी, लवकरच आपल्याला राजीनामा द्यावा लागेल हे त्याला समजले. त्याने राजीनामा दिला. आणि केवळ सरकारी सभासद हजर असलेल्या कायदेमंडळाद्वारे फाळणीकरता आवश्यक असलेला कायदा त्याने मोठ्या घाईघाईने संमत करून घेतला. कित्येक महिन्याच्या त्याच्या उद्योगांनी त्यांनी प्रमुख मुसलमानांची मने वळवली किंवा आपल्या स्वतःच्या इच्छेशी सहमत होणे त्यांना भाग पाडले. 'पाशवी व्यवस्था' म्हणून फाळणीचा निषेध करणाऱ्या नबाब सलिमुल्लांनी नंतर आपले मत बदलले. हा बदल त्यांना फार कमी व्याजाच्या दराने दिल्या गेलेल्या एक लक्ष पौंड कर्जाशी जोडला गेला.[१] हा कदाचित योगायोग असेलही पण हा आरोप व्हाइसरॉयची एकंदर योजना आणि त्याविरुद्ध केलेले संतप्त निषेध याच्याशी चपखल जमतो.

१९०५ च्या ऑक्टोबरमध्ये कर्झनने फाळणीचा कायदा अंमलात आणला. आणि बॅम्फिल्ड फुलर या आपल्या विश्वासू माणसाला नव्या प्रांताचा लेफ्टनंट गव्हर्नर नेमून आणि आपल्या मागून येणाऱ्या लॉर्ड मिंटोच्या हाती देशाचा कारभार सोपवून त्याने हिंदुस्तान सोडले.

जेव्हा मिंटोने राज्यकारभार हाती घेतला तेव्हा सबंध देश एका अपूर्व असंतोषाने आणि अशांततेने भरून राहिला होता. काँग्रेससुद्धा जहाल मतवाद्यांच्या हातात जाईल की काय अशी भीति निर्माण झाली होती. या विपत्तीत १८८५ मध्ये निर्माण झालेल्या संघटित हिंसेच्या दबा धरून बसलेल्या आपत्तीत स्वतः काँग्रेसनेच जो वेगळा मार्ग दाखवला होता तसाच काही पर्याय खुद्द काँग्रेससाठीच निघू शकेल काय असा प्रश्न मिंटोने स्वतःलाच विचारला. हिंदुस्तानचा सेक्रेटरी ऑफ स्टेट मोर्ले यांना २८ मे १९०६ रोजी लिहिलेल्या पत्रात मिंटो म्हणतो : 'काँग्रेसबद्दल म्हटले तर…… आपण तिला मान्यता दिली पाहिजे आणि त्यांच्यातील चांगल्या लोकांशी मैत्री केली पाहिजे' तरीसुद्धा मला असा संशय वाटतो की, तिच्यात बरेच काही पूर्णपणे राजद्रोही आहे आणि भवितव्याच्यादृष्टीने तो धोका आहे…… अलिकडे मी काँग्रेसला विरोधक होईल अशा एकाद्या शक्तीचा बराचसा विचार करीत आहे. मला वाटते याचे उत्तर आपल्याला राजेरजवाड्यांच्या संघटनेत मिळेलत किंवा त्या कल्पनांचा अधिक विकास करावा लागेल. उदाहरणार्थ केवळ राजेरजवाड्यांचेच नव्हे तर इतरही काही बड्या मंडळींचा समावेश असलेले एकादे प्रिव्हि कौन्सिल. त्यांनी वर्षातून एकदा एकाद्या आठवड्यासाठी किंवा पंधरा दिवसासाठी म्हणा, दिल्लीला एकत्र यावे. या बैठकीची कार्यक्रम पत्रिका आणि कार्यपद्धति यांचा फार काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. आणि त्यातून आपल्याला निराळे विचार मिळाले पाहिजेत.'[२]

१. गुरुमुख निहाल सिंग कृत Landmarks in Indian Constitutional and National Development पृ. ३१९.

२. मेरी मिंटो कृत India Minto and Morley पृ. २८–२९.

मोर्लेच्या उत्तरात अर्थपूर्णपणे असे सुचवले होते की, तो मुसलमानांबद्दल सचिंत होता : 'हिंदुस्तानात एक नवी जाणीव वाढत आहे आणि ती सर्व हिंदुस्तानभर पसरत आहे याबद्दल प्रत्येकजण आम्हाला सावधगिरीची सूचना देत आहे······ तुम्हाला जुन्या वृत्तीनेच कारभार चालू ठेवणे शक्य होणार नाही; काँग्रेसबद्दल तुम्हाला काहीही वाटत असले तरी तुम्हाला त्या पक्षाशी आणि तत्त्वांशी देवघेव करावीच लागेल. थोड्याच दिवसात तुमच्याविरुद्ध मुसलमान स्वत: काँग्रेसला मिळतील याबद्दल खात्री बाळगा.[३]

कर्झनची फाळणीची योजना हिंदुस्तानात जितकी तीव्रतेने अमान्य झाली तितकीच ती लंडनच्या सरकारी आणि बिनसरकारी गोटात अमान्य होती. पण या योजनेमुळे निर्माण झालेल्या, राष्ट्रवादाच्या चढत्या परिमाणाने हिंदु-मुसलमान एकी, काही झाले तरी रोखली पाहिजे याची कल्पना राज्यकर्त्यांच्या डोक्यात शिरली. बंगालचा ऊतू जात असलेला उत्साह इतर प्रांतात पसरला. आणि दहा अधिवेशने घेऊन काँग्रेसला जे करता आले नसते इतकी मोठी भर फाळणीने भारतीय राष्ट्रवादात घातली. बंगालभर आणि इतर अनेक प्रांतात निषेधसभा, मिरवणुकी आणि निदर्शने यांचा पूर लोटला, ब्रिटिश मालावर बहिष्कार घातला गेला याचा ब्रिटिश आर्थिक जीवनावर विपरीत परिणाम होण्याचा धोका निर्माण झाला.

सरकारी नोकऱ्या आणि इतर अमिषे दाखवूनसुद्धा अनेक विचारवंत मुसलमानांना अनुकूल करून घेण्यास फाळणी अयशस्वी ठरली. यामुळे सरकारला जास्त काळजी वाटू लागली. १९०६ च्या काँग्रेसच्यावेळी सालिमुल्लाचा भाऊ नबाबजादा अतीकुल्लाह हे फाळणीबद्दल आपला तीव्र मतभेद व्यक्त करताना म्हणाले; मी तुम्हाला प्रथमच सांगू इच्छितो की, पूर्व बंगालचे मुसलमान फाळणीच्या बाजूचे आहेत असे समजणे बरोबर नाही. खरी गोष्ट अशी आहे की, काही प्रमुख मुसलमानांनी स्वत:च्या स्वार्थासाठी या योजनेला पाठिंबा दिला.' अमीर अल्लींच्या महॉमेडन असोसिएशनने सरकारला असे सांगितले की, 'बंगाली भाषिक लोकांचे कुठलेही विभाजन काही विशेष गरज पडल्याशिवाय बंगालपासून विभक्त केला जाता कामा नये, आणि सध्यातरी, तशी विशेष गरज निर्माण झालेली नाही.'[४] सर हेन्री कॉटन या बंगालच्या सेवानिवृत्त गृहस्थांनीही याच प्रकारचे मत व्यक्त केले : 'पूर्व बंगालच्या बहुतेक भागातील दोनही जमातींच्या पुढाऱ्यांची, फाळणीचा निषेध करण्यात एकजूट आहे, पण अज्ञानी आणि प्रक्षुब्ध मुसलमान जनतेला हिंसक कृत्ये करण्यास धर्मवेड्या गुप्तदूतांनी उत्तेजन दिले आहे.'[५]

खरोखरीच प्रक्षुब्ध मुसलमानांना 'हिंसक कृत्ये करण्यास' उत्तेजन दिले गेले होते

३. कित्ता, पृ. ३०.

४. अंबिका चरण मुझूमदार, Indian National Evolution पृ. २२३.

५. जे. डी. टी यांच्या the Real India ग्रंथात पृ. १७८ वर उद्धृत.

हे सत्य आहे. नेव्हिनसन् यांच्या म्हणण्याप्रमाणे ब्रिटिश सरकार मुसलमानांच्या बाजूचे आहे, न्यायालये तीन महिन्याकरिता मुद्दाम बंद ठेवली आहेत, हिंदूंवर हल्ला केल्यास, हिंदू दुकानांची लुटालूट केल्यास किंवा हिंदू विधवांचा अपहार केल्यास कुठल्याही प्रकारची शिक्षा भोगण्याची पाळी येणार नाही असा प्रचार खेडोपाडी करीत आणि इस्लामच्या पुनरुज्जीवनाची शिकवण देत मुल्ला मौलवी खेडोपाडी प्रांतभर हिंडले. हीच रानटी तत्त्वे मांडलेले एक लाल पत्रक सर्वत्र फिरवले गेले.'[६] हे चालू असतानाच बॉम्फिल्ड फुलर यांनी थट्टेने असे उद्‌गार काढले की, हिंदू व मुसलमान, 'या दोन बायकांपैकी मुसलमान बायको आपली आवडती आहे.' या उद्‌गारातील सूचना स्पष्ट होती. शिवाय नेव्हिनसन्‌च्या भाषेत सांगायचे म्हणजे 'ब्रिटिश अधिकारी आपल्या कुठल्याही आततायीपणाची आपल्याला क्षमा करतील अशी मुसलमानांची मनोमन खात्री होती.'[७]

ही दंगली प्रवृत्ती अनेक वर्षे चालू राहिली. एकदा १९१० मध्ये खुद्द राजधानीच मुसलमानांच्या हाती होती. आणि त्यांनी तीन दिवस आणि तीन रात्री शहरातील जडजवाहिरांची लुटालूट केली. सरकारनी जर आपला समर्थ हात काढून घेतला किंवा जरा जरी ढिला सोडला तरी हिंदूंच्यापुढे काय वाढून ठेवले जाईल याची आगाऊ चुणूक म्हणून ही उदाहरणे सरकारी गोटातून मोठ्या आनंदाने पुढे मांडण्यात आली. मुसलमान स्पेशल मॅजिस्ट्रेटने मुसलमान दंगेखोरांचे खटले चालवताना दिलेल्या निकालपत्रात म्हटले की, 'दंगा करण्यासाठी थोडीसुद्धा चिथावणी नव्हती; दंगेखोरांचा उद्देश सामान्यपणे हिंदुना उपद्रव देणे हा होता.' दुसऱ्या एका खटल्यात त्याने म्हटले की, 'फिर्यादीच्या बाजूने पुढे आलेल्या पुराव्यावरून असे दिसते की, आरोपीने (मुसलमान) दंग्याच्या दिवशी एक पत्र मुसलमानांच्या घोळक्यापुढे वाचून दाखविले आणि असे सांगितले की, हिंदूना उपद्रव देणाऱ्या आणि त्यांची लुटालूट करणाऱ्या कोणालाही शिक्षा केली जाणार नाही, असे सरकारने आणि डाक्क्याच्या नबाब बहाद्दूरने हुकूम काढले आहेत.' दुसऱ्या एका युरोपियन मॅजिस्ट्रेटने म्हटले की, 'काही मुसलमानांनी ढोलकी बडवून असे जाहीर केले की, हिंदूंची लुटालूट करण्यास सरकारने परवानगी दिली आहे.' याच मॅजिस्ट्रेटनी एका अपहाराच्या खटल्यात असा शेरा मारला की, 'मुसलमानांना हिंदू विधवांशी निका पद्धतीने विवाह करण्यास सरकारी परवानगी आहे अशा जाहीरनाम्यामुळे हा बलात्कार झाला.'

कोर्माळा दंग्याचा खटला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खटल्याच्या न्यायाधिशाने उघड उघड मुसलमानांची बाजू घेतली. हायकोर्टाने त्याची निर्भत्सना केली; आणि आपल्या निकालपत्रात असा शेरा मारला की, 'साक्षिदारांच्या जबान्या दोन जातीत— मुसलमान आणि हिंदू—विभागून आणि एका जातीचा पुरावा मान्य करून आणि दुसऱ्याचा नाकारून छाननी करण्याची या विद्वान न्यायाधिशांची पद्धत अतिशय कठोर

६. नेव्हिन्सन कृत The New Spirit in India पृ. १९२.
७. कित्ता, पृ. १९१.

टीकेला पात्र आहे. विद्वान न्यायाधीशांनी फक्त आपल्यासमोर आलेल्या पुराव्यावरच लक्ष केंद्रित करणे जरूर होते आणि पूर्वग्रहातून तयार झालेल्या कुठल्याही एका वर्गाच्या लोकांविषयीच्या सहानुभूतीस बाजूला सारावयास हवे होते.

बंगालमध्ये, अनेक वर्षे सनदी नोकरीत अधिकारी असलेले आणि नंतर पार्लमेंटचे सभासद बनलेले सर हेन्री कॉटन यांनी आपल्या 'इंडियन ॲन्ड होम मेमरीज' या पुस्तकात ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या पदरात उघड दोष टाकला आहे. त्यांनी म्हटले आहे : 'पूर्व बंगालचे बहुतेक सर्व मुसलमान हे हिंदूंच्या कनिष्ठ जातीतून किंवा आदिवासी हिंदूंमधून आलेले आहेत. त्यांनी फार पूर्वी आपली सामाजिक प्रतिष्ठा वाढवण्याच्यादृष्टीने किंवा काही निकडीची गरज म्हणून इस्लाम धर्म कवटाळला. हिंदू-मुसलमानांमध्ये भांडणाला कधीच कारण नव्हते. ······ प्रांताच्या फाळणीने प्रथमच त्यांच्यात धार्मिक कलह निर्माण झाला. अधिकारी गोटात पहिल्या प्रथमच 'तोडा आणि राज्य करा' हे तत्त्व प्रस्थापित केले गेले. शक्य तितक्या मार्गांनी मुसलमानांवर सरकारी मर्जीचा वर्षाव झाला.'

फाळणीपूर्वीच्या कर्झनच्या वक्तव्यांनी आणि नंतरच्या जातीय दंग्यामुळे हिंदू-मुसलमानांतील संबंध बऱ्याच काळपर्यंत बिघडलेलेच राहिले. परंतु बंगालच्या दंग्याचा प्रतिध्वनी इतर प्रांतात क्वचितच उमटला. ज्या ज्या ठिकाणी प्रतिगामी पुढाऱ्यांचा प्रभाव मुसलमानांवर पडला नव्हता त्या त्या ठिकाणचे मुसलमान राजकीय सभांना हजर राहिले, विलायती मालावर बहिष्कार घालण्यासाठी केला गेलेला आग्रह त्यांनी ऐकून घेतला, स्वदेशीच्या घोषणांचे महत्त्व जाणले आणि देशी मालाला उत्तेजन दिले; कारण या स्वदेशीच्या चळवळीचा फायदा हिंदू इतकाच मुसलमान कारखानदार आणि विणकर यांनाही मिळणार होता. हिंदू-मुस्लिम ऐक्याचे सर्वात अधिक प्रभावी पुरस्कर्ते टिळक यांनी महाराष्ट्रातील मुसलमानांना हिंदूंशी सहकार्याने काम करण्याची आणि स्वदेशी चळवळीला फूल ना फुलाच्या पाकळीची मदत करून आपले कर्तव्य बजावण्याकरिता आग्रहाची हांक घातली. या हाकेला अनेक ठिकाणच्या मुसलमानांनी साद दिली. नोव्हेंबरमध्ये धुळे येथे केवळ मुसलमानांचीच एक सभा भरवली गेली. तिला प्रमुख मुसलमान आणि स्थानिक व्यापारी हजर होते आणि धर्मगुरु मुल्ला शेखचंद तिचे अध्यक्ष होते. त्यावेळेपर्यंत धुळ्यामध्ये स्वदेशीच्या वीस सभा झाल्या होत्या पण मुसलमानांची ही, पहिलीच सभा होती; 'वंदेमातरम्' आणि 'अल्ला-हो-अकबर' या घोषणांनी ती संपली.

परंतु, स्वदेशी चळवळीने इकडे तिकडे थोडेसे हिंदू-मुसलमानांचे सहकार्य झाले असले तरी, फाळणीची घोषणा होण्यापूर्वी अनेक वर्षे आणि फाळणीविरोधी चळवळीला जातीय स्वरुप येण्यापूर्वी, या दोन जमातींचे सुशिक्षित लोक राजकीयदृष्ट्या एकमेकांपासून दूर जात होते. या गोष्टीकडे डोळेझांक करता येणार नाही. १८९९ च्या लखनौ कॉंग्रेसमध्ये टिळकांनी मुंबईचा गव्हर्नर, सॅन्डर्स्ट याच्या राज्यकारभाराच्या

निषेधाचा ठराव मांडण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. या कॉंग्रेसला मुसलमान प्रतिनिधी मोठ्या संख्येने हजर होते. लखनौ कॉंग्रेसनंतरच्या कॉंग्रेसच्या अधिवेशनातील मुसलमानांची संख्या कमी कमी होऊ लागली हे अर्थपूर्ण आहे. १९०५ च्या तिच्या अधिवेशनाला ७५६ प्रतिनिधींपैकी फक्त १७ मुसलमान होते.

मग मुसलमान कुठे जात होते? देशात कॉंग्रेसव्यतिरिक्त दुसरी राजकीय, सामाजिक किंवा जातीय संघटना नव्हती. अलिगडची महॉमेडन पोलिटिकल ऑर्गनायझेशन म्हणजे जन्मतःच मेलेले अर्भक होते आणि ती आपला प्रतिध्वनी अगदी शेजारच्या प्रदेशातसुद्धा उमटवू शकली नाही. हिंदीबद्दलचा वादविवाद हा संपूर्णपणे स्थानिक प्रश्न होता; देशाच्या इतर भागात त्याबद्दल मुसलमानांनी चर्चा केली नाही किंवा त्यामुळे तेथील शांतता भंग पावली नाही. बंगालच्या दंग्याला सहानुभूतीचा प्रतिसाद मिळाला नाही. मुसलमान जमातीवर आपले वजन आहे असे सांगणारा, हिंदीला उर्दूचा दर्जा दिल्याने उर्दूचे काही नुकसान झालेले नाही असे सांगणारा आणि दंगेधोपे करून मुसलमानांचा काही फायदा होणार नाही असे मुसलमानांना सांगणारा मुसलमान पुढारी किंवा संस्था अस्तित्वात नव्हती. जर मुसलमानांना फक्त मुसलमानीच नेतृत्व हवे होते तर त्यांना नेत्याविना रहाणे भाग होते आणि तरीसुद्धा ते कॉंग्रेसमधून आपले अंग हळूहळू काढून घेत होते. आश्चर्याची गोष्ट अशी की, मग ते काय करीत होते? मुसलमानांना कॉंग्रेसला मिळू देण्यास अडथळा निर्माण केला पाहिजे असे सेक्रेटरी ऑफ स्टेट मोर्ले यांनी प्रकट केल्याप्रमाणे ब्रिटिशांच्या डावाला ते बळी पडत होते काय? झपाट्याने वाढत जाणाऱ्या राजकीय जाणिवेच्या वातावरणात ते कॉंग्रेसमध्ये गेले नसते तर ते रिकामे बघे राहिले असते काय? अशी पोकळी तयार झाल्यास ते कॉंग्रेसकडे परत जाण्याचा सतत धोका होता. यावर केवळ मुसलमानांची अखिल भारतीय संघटना हा उपाय होता—आणि १९०६ मध्ये तो अंमलात आणला गेला.

प्रकरण अकरावे

# मुस्लिम लीग

१९०६ च्या उन्हाळ्यात एका देशव्यापी मुस्लिम संघटनेच्या कल्पनेला मूर्तस्वरुप देण्यात आले. त्यावेळी हिंदुस्तान सरकार सिमला येथील आपल्या उन्हाळी राजधानीत होते आणि उत्तर प्रांताचे सरकार नैनिताल या थंड हवेच्या ठिकाणी होते. या दोनही ठिकाणी मुसलमान हा सरकारी अधिकाऱ्यांच्या चर्चेचा विषय होता. वर थंड हवेच्या ठिकाणी अशी चर्चा चालू असताना खाली नेहमीच्या ठिकाणी खाजगी-रीतीने ही कल्पना चर्चिली गेली होती आणि त्यात थिओडोर मॉरिसन यांच्यामागून आलेले अलिगड महाविद्यालयाचे प्राचार्य आर्कबोल्ड यांनी प्रामुख्याने भाग घेतला होता. उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी त्यांचे महाविद्यालय बंद झाल्यानंतर ते सिमल्याला गेले आणि त्यांनी नबाब मोहसिन्-उल-मुल्क यांना पुढील पत्र पाठवले : मुसलमानांच्या शिष्टमंडळाला भेटण्याचे व्हाइसरॉय यांनी मान्य केले आहे. त्यांना सादर करण्याच्या मानपत्रावर सर्व प्रांताच्या मुसलमान पुढाऱ्यांच्या सह्या असल्या पाहिजेत. नवीन धोरणाविषयी कृतज्ञता व्यक्त करताना, निवडणूकपद्धतीचा पुरस्कार न करता नेमणूक-पद्धती अंमलात आणण्याची विनंती करावी, कारण फक्त नेमणूकपद्धतीनेच मुसलमानांचा फायदा होईल. जमीनदारांच्या मताला योग्य महत्व देण्याची आवश्यकता आहे. वेळ थोडा आहे, तेव्हा आपल्याला चळवळ बांधावयाची असेल तर आपण घाई केली पाहिजे. '

नैनितालला भेट देण्यासाठी गेलेले अलिगडचे एक उमराव, हाजी महमद इस्माइल खान यांच्याकडूनही अशाच प्रकारचे एक पत्र नबाबाला गेले. त्यांनी अशी बातमी पाठविली होती की, विधीमंडळात वाढ करण्याचा विचार चालू आहे. आणि असे सुचवले की, मुसलमानांनी आपल्या मागण्या सरकारपुढे ठेवाव्या.

पण मुख्य सूत्रधार आर्कबोल्डच ठरणार होते. आपण पडद्याआड राहू या अटीवर त्यांनी मुसलमानांच्या ध्येयाला सर्वतोपरी साहाय्य करण्याचे मान्य केले. म्हणून मोहसिन-उल्-मुल्क यांना तारेने सिमल्यास बोलावून घेण्यात आले. १९०० मध्ये उत्तर प्रांताच्या लेफ्टनंट गव्हर्नरने ज्या मोहसिन-उल्-मुल्कचे त्यांच्या 'राजकीय कार्या' बद्दल अतिशय कडक शब्दात कान पिळले होते, त्यांचाच आता जास्त व्यापक जातीय राजकारणासाठी उपयोग करून घेतला जात होता. आणि ते हिंदुस्तान सरकार बोलावेल तेव्हा जाणार येणार होते. मौलाना अबुल कलम आझाद या

राष्ट्रीय मुसलमानांनी या सिमला प्रयोगाच्या संशयास्पदपणाचे वर्णन असे केले होते : 'पुढील सर्व गोष्टी घडलेल्या मी पाहिल्या आहेत. जनतेच्या चळवळीचा परिणाम म्हणून १९०६ मध्ये काही सुधारणा मान्य होण्याच्या बेतात होत्या. त्यावेळी मरहूम नबाब मोहसिन-उल्-मुल्क हे मुंबईला आपल्या एका मित्राकडे रहात होते. तेथून त्यांना तारेने सिमल्यास बोलावले गेले. ह्या भेटीचा परिणाम म्हणजे युरोपला निघालेल्या आगाखानांना एडनहून परत फिरावे लागले. त्यावेळी दख्खन हैद्राबादच्या सय्यद बिलग्रामी यांनी हिंदुस्तानच्या मुसलमानांच्यावतीने विभक्त मतदार संघाची विनंती करणारे एक भाषण तयार केले होते. हा सर्व व्यूह सिमल्याहून रचला गेला.'[१] मौलाना महमद अल्ली या दुसऱ्या एका राष्ट्रीय मुसलमानांनी नंतर या गोष्टीचे वर्णन आपल्या १९२३ च्या काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषणात 'हुकूमी प्रयोग' असे केले होते.

मोहसिन-उल्-मुल्क हे तर संपूर्णतः अलिगड पंथाचे होते. आणि त्यांच्या स्वतःच्या राजकीय कल्पनांशी सिमला निर्णय हा विसंगत नव्हता. त्यांना त्यात मुसलमानांचे कल्याण दिसत होते. आणि थोडयाच दिवसांच्या अवधीत व्हाइसरॉयला सादर करण्याच्या मानपत्रावर त्यांनी सुमारे चार हजार सह्या मिळवल्या. त्यानंतर देशाच्या निर-निराळया भागातून त्यांनी ३५ प्रमुख मुसलमानांना एकत्र आणले. त्यांचे अग्रणी आगाखान होते. हे सर्व लोक १ ऑक्टोबर १९०६ रोजी व्हाइसरॉयच्या भेटीस गेले. व्हाइसरॉयला सादर केलेल्या लांबलचक मानपत्रात त्यांनी म्हटले होते :

बादशहाचे हिंदुस्तानच्या निरनिराळया भागातील फार मोठया मुसलमान प्रजाजनांचे प्रतिनिधी म्हणून खाली सही करणारे आम्ही सरदार, जहागिरदार, तालुकदार, वकील, जमीनदार, व्यापारी आणि इतर हुजुरांना खालील मानपत्र सादर करण्याची परवानगी घेतो आणि त्याचा अनुकूल विचार करण्याची अतिशय नम्रपणे विनंती करतो.

१९०१ च्या खानेसुमारीप्रमाणे, हिंदुस्तानच्या मुसलमानांच्या लोकसंख्येचा आकडा बादशहाच्या हिंदी वसाहतीच्या एकंदर लोकसंख्येच्या एक चतुर्थांश आणि एक पंचमांश यांच्या दरम्यान किंवा ६ कोटी २० लक्षाहून अधिक आहे. आणि रानटी आणि छोटे छोटे धर्म या वर्गात गणल्या गेलेल्या एकंदर जमाती आणि ज्या जमातींचे वर्गीकरण सर्वसामान्यपणे हिंदू म्हणून केले गेले असले तरीसुद्धा प्रत्यक्षात ज्या हिंदू नाहीत अशा जमातींची लोकसंख्या वजा जाता, मुसलमानांचे बहुसंख्य असलेल्या हिंदूंशी असलेले प्रमाण कितीतरी अधिक ठरेल. म्हणून आम्ही असे प्रतिपादू इच्छितो-की, रशिया सोडून युरोपमधील कुठल्याही पहिल्या दर्जाच्या राष्ट्राच्या एकंदर लोकसंख्येपेक्षा संख्येने अधिक असलेल्या या जमातीला, प्रतिनिधीत्वाच्या संपूर्ण किंवा मर्यादित अशा कुठल्याही पद्धतीत राज्याचा महत्वाचा घटक या हक्काने पुरेशी मान्यता मिळणे न्यायाचे होईल.

---

१. अब्दुल मझीदखान कृत The communalism in India-Its origin and Growth, पृष्ठ २३.

हुजुरांच्या परवानगीने खरोखर आम्ही आणखी एक पाऊल पुढे टाकण्याचे धाडस करीत आहोत, आणि अशी विनंती करीत आहोत की, कुठच्याही प्रकारच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रतिनिधीत्वात आणि मुसलमानांचा दर्जा व वर्चस्वावर परिणाम करणाऱ्या इतर सर्व गोष्टीत, मुस्लिम जमातीला जे स्थान दिले जाणार असेल ते फक्त त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात असू नये तर त्यांच्या राजकीय महत्त्वाशी जुळेल असे आणि त्यांनी साम्राज्याच्या संरक्षणासाठी केलेल्या मदतीच्या महत्त्वाला अनुरुप असे असावे आणि यासंदर्भात, जेमतेम शंभर वर्षापूर्वी हिंदुस्तानात मुसलमानांचे जे स्थान होते आणि ज्याच्या परंपरा सहाजिकच त्यांच्या मनातून अजून नाहिशा झाल्या नाहीत त्या त्यांच्या स्थानाला योग्य असे महत्त्व देण्यास हुजूर कृपावंत होतील अशी आम्ही आशा करतो.

युरोपियन पद्धतीच्या प्रातिनिधीक संस्था हिंदी लोकांना नवीन आहेत असे प्रारंभीच सांगण्याबद्दल हुजूर आम्हाला क्षमा करतील अशी आम्ही आशा बाळगतो; आमच्या जमातीचे अनेक विचारवंत खरोखर असे समजतात की, हिंदुस्तानात असलेल्या सामाजिक धार्मिक आणि राजकीय परिस्थितीनुरुप जर या संस्था यशस्वी करावयाच्या असतील तर फार मोठी काळजी, दूरदर्शीपणा आणि सावधगिरीची आवश्यकता आहे; आणि अशा काळजीचा आणि सावधपणाचा अभाव असताना त्यांचा स्वीकार करणे म्हणजे इतर अनेक अरिष्टांबरोबर सहानुभूतीशून्य बहुसंख्यांकांच्या मेहेरबानीवर आमचे राष्ट्रीय हित सोपवणे होय.

आज बनवल्या गेलेल्या मतदार संघातर्फे कुठल्याही मुसलमान उमेदवाराचे नाव, तो बहुसंख्यांक जमातीशी सर्व महत्त्वाच्या बाबतीत सहमत असल्याशिवाय, सरकारपुढे मांडले जाईल हे जवळ जवळ अशक्यच आहे. बिगर मुसलमान असलेल्या आपल्या हिंदू प्रजेने, आपल्या संख्याबळाचा फायदा घेऊन फक्त आपल्याच जमातीच्या लोकांना मत देण्याची इच्छा करणे याबद्दल किंवा हिंदू नसले तरी, जे लोक आपल्या भावी निवडणुकीसाठी बहुसंख्यांक हिंदूंच्या सदिच्छेवर अवलंबून आहेत ते त्यांच्याच बाजूने मत देतील याबद्दल निःपक्षपातीपणे बोलायचे झाले तर आम्ही त्यांना दोष देऊ शकत नाही.[२]

या मानपत्रात पुढील मागण्या केल्या होत्या : (१) मुसलमानांना रास्त प्रमाणात सरकारी नोकऱ्या मिळाव्या. (२) नोकऱ्यातील भरतीतून स्पर्धेचे तत्त्व काढून टाकले जावे. (३) प्रत्येक हायकोर्ट आणि चीफ कोर्टात मुसलमानांना न्यायाधिशाच्या जागा मिळाव्यात. (४) पंजाबमधील अनेक शहरात प्रचलित असलेल्या म्युनिसिपल पद्धतीप्रमाणे, प्रत्येक जमातीला आपापले प्रतिनिधी निवडण्याची मुभा असावी. (५) विधीमंडळाच्या निवडणुकीकरिता प्रमुख मुसलमान जमिनदार, वकील, व्यापारी आणि इतर महत्त्वाच्या हितसंबंधीयांचे प्रतिनिधी, जिल्हा बोर्डाचे व म्युनिसिपालटीचे

२. पुरवणी 'ब' पहा.

मुसलमान सभासद आणि पदवी मिळवल्यानंतर विशिष्ट काळ (उ. ५ वर्षे) लोटलेले मुसलमान पदवीधर या सर्वांचे मिळून मतदार संघ बनवले जावे.

या मानपत्राला व्हाइसरॉयने तितकेच लांबलचक उत्तर दिले; त्यातील बराचसा भाग मुसलमानांच्या भूतकाळाला, सर सय्यद यांच्या कार्याला अनुलक्षून होता उत्तरातील प्रस्तुत वाक्ये अशी होती : वेगवेगळ्या जमातींचे प्रतिनिधीत्व कोणच्या साधनांनी मिळवावे हे सुचवण्याचा प्रयत्न मी करीत नाही, पण माझा तुमच्याबद्दल जितका विश्वास आहे त्या विश्वासाने मला अशी खात्री वाटते की, या देशातील लोकांच्या निरनिराळ्या जमाती, त्यांच्या परंपरा आणि त्यांच्या श्रद्धा लक्षात न घेता वैयक्तिक मतदानाचा हक्क देणारी कुठलीही प्रातिनिधीक पद्धती हिंदुस्तानात नुकसान-कारक व अयशस्वी ठरेल······ मी मुसलमान जमातीला असे आश्वासन देतो की, एक जमात म्हणून त्यांचे हक्क आणि हित यांचे माझा संबंध असलेल्या राज्य-कारभारात संरक्षण केले जाईल.'[३]

देशाच्या राजकारणात ही एक मजेदार घटना होती. त्यामुळे सिमल्याच्या सरकारी जगात आनंदाची लाट उसळली. हा ऊतू चाललेला आनंद पत्रव्यवहारातून वाहू लागला. त्याचे उदाहरण म्हणजे व्हाइसरॉयच्या पत्नी मेरी मिंटो यांना त्याच संध्याकाळी एका अधिकाऱ्याने पाठवलेले पत्र. त्यात लिहिले होते : 'आज एक मोठी गोष्ट घडली आहे हे हुजुरांना सांगण्याकरिता दोन ओळी लिहिल्याच पाहिजेत. हे मुत्सद्देगिरीचे कार्य हिंदुस्तान आणि हिंदुस्तानचा इतिहास यावर दीर्घकाल परिणाम करील. हे कार्य म्हणजे सहा कोटी वीस लक्ष लोकांना राजद्रोही विरोधी पक्षाला मिळण्यापासून परावृत्त करण्यात आलेले यश हे होय.'[४]

१ ऑक्टोबर १९०६ च्या आपल्या डायरीत मेरी मिंटो स्वत: लिहितात : 'आजचा दिवस फार महत्त्वाचा आहे. कुणीतरी माझ्याजवळ म्हटल्याप्रमाणे, हे "हिंदी इतिहासात एक पर्वच आहे" सबंध हिंदुस्तानभर जी एक असंतोषाची भावना आहे आणि सर्व वर्गाच्या आणि पंथाच्या लोकांमध्ये जो प्रक्षोभ आहे त्याची आम्हाला जाणीव आहे. चळवळे लोक ही भावना जोपासण्यास फार उत्सुक आहेत आणि सहाजिकच ते या एका मोठ्या जमातीचे (मुसलमानांचे) सहकार्य मिळवण्याची पराकाष्ठा करीत होते. तरुण पिढीचे लोक दोलायमान परिस्थितीत होते पण त्यांचा कल कॉंग्रेसच्या जहाल चळवळ्यांबरोबर जाण्यास अधिक अनुकूल होता, आणि राजनिष्ठ मुसलमानांना पाठिंबा द्यावयाचा नाही आणि आपल्या मागण्या चळवळीच्याच द्वारे पदरात पाडून घ्यावयाच्या असा ओरडा झाला.'[५]

सिमल्याचे हे यश, ब्रिटनमधील वर्तमानपत्रांच्या एका विभागाने ब्रिटिशांचा फार

३. पुरवणी 'क' पहा.

४. मेरी मिंटोंचे पुर्वोक्त पुस्तक, पृ. ४७–४८.

५. कित्ता, पृ. ४५

मोठा विजय गणला. त्यांनी मुसलमानांच्या शहाणपणाची स्तुति आणि कॉंग्रेस व बंगाली चळवळ्यांची टर उडवली. ज्या दिवशी सिमल्याचे नाटक रंगले त्याच दिवशी लंडन टाइम्सने मुसलमानांच्या संदर्भात हिंदी प्रश्नाच्या विचाराला आपले काही रकाने खर्ची घातले आणि लोकसत्ताक संस्था चालू करण्यास हिंदुस्तान योग्य नाही हा बेकचा सिद्धांत पुन्हा उगाळला. दुसऱ्याच दिवशी, तारीख २ ऑक्टोबर १९०६ रोजी त्याने बंगालची चळवळ आणि मुस्लिम मुत्सद्देगिरी यांची तुलना केली. दुसऱ्या एका वर्तमानपत्राने हिंदू आणि कॉंग्रेस यांची निंदा आणि मुसलमानांची पराक्रमी लोक म्हणून स्तुती केली.

देशाच्या निरनिराळ्या भागातून मुसलमान अमीर उमराव, व्हाइसरॉयच्या आमंत्रणावरून प्रथमच सिमल्याला एकत्र जमले, आणि अलिगड राजकारण सर्व हिंदुस्तानभर फैलावण्याचा विडा उचलून, तय्यार राजकारणी म्हणून घरी परतले. डाक्क्याच्या नबाब सलिमुल्लाखान यांनी 'मुस्लिम ऑल इंडिया कॉन्फिडरसी' या नावाची एक औपचारिक राजकीय संघटना स्थापन करण्याची सूचना केली आणि ३० डिसेंबर १९०६ रोजी मुसलमान पुढाऱ्यांना डाक्क्याच्या सभेची आमंत्रणे पाठवली. डाक्का हे बंगाल फाळणीच्याविरुद्ध चळवळीचे तुफानी केंद्र होते; आणि तेथे कर्झनने निर्माण केलेल्या आणि लेफ्टनंट गव्हर्नर फुलर यांनी पोसलेल्या हिंदू-मुसलमानांच्या तीव्र मतभेदांमुळे, ते ठिकाण अखिल भारतीय मुसलमानांच्या पहिल्या मेळाव्याला आदर्श असे स्थळ होते. नबाब वाकर-उल्-मुल्क हे सभेचे अध्यक्ष निवडले होते. ठरलेल्या दिवशी उराशी बाळगलेल्या मुसलमान संघटनेचा डाक्क्यात जन्म झाला. तिच्या स्थापनेवर शिक्कामोर्तब करताना, अखिल भारतीय मुस्लिम लीग असे तिचे नामकरण पहिल्या ठरावाने केले. तिला 'मुस्लिम ऑल इंडिया कॉन्फिडरसी' असे आधी सुचविलेले नाव बहुसंख्य प्रतिनिधींना नापसंत होते.

लीगची अशी ही अगदी साधी सुरुवात होती. आणि तिच्या ध्येयांची आणि उद्दिष्टांची कल्पना, बिनसरकारी जगाला, तीन महिन्यानंतर नबाब वाकर-उल्-मुल्क यांनी अलिगड विद्यार्थ्यांच्या मेळाव्यासमोर केलेल्या भाषणाने आली. ते आपल्या भाषणात म्हणाले : 'ईश्वर न करो, पण हिंदुस्तानातून जर ब्रिटिश सत्ता नाहिशी झाली तर हिंदू सर्वाधिकारी बनतील; आणि आपल्या जीविताला, संपत्तीला व इभ्रतीला कायमचा धोका निर्माण होईल. हा धोका टाळण्याचा फक्त एकच मार्ग मुसलमानांपुढे आहे आणि तो म्हणजे ब्रिटिश सत्ता अबाधित रहाण्याला मदत करणे. जर मुसलमान मनापासून ब्रिटिशांच्या बाजूचे राहिले तर ती सत्ता टिकणारच. ब्रिटिश राजमुकुटाकरिता मुसलमानांनी स्वतःला आपले रक्त सांडण्यास आणि प्राण अर्पण करण्यास तयार असलेले ब्रिटिश सैन्य समजावे.

त्यानंतर त्यांनी कॉंग्रेसपासून लीग आणि हिंदू चळवळ्यांपासून मुसलमान कसे निराळे आहेत याचे स्पष्टीकरण केले : 'आपण चळवळीच्या राजकारणात कॉंग्रेसचा

कित्ता गिरविता कामा नये. आपल्याला जर काही मागण्या करावयाच्या असतील तर त्या योग्य त्या आदराने सरकारला सादर केल्या पाहिजेत. पण ब्रिटिश सत्तेशी एकनिष्ठ असणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे हे लक्षात ठेवा. तुम्ही फुटबॉल मैदानावर असा, टेनिस कोर्टावर असा किंवा कुठेही असा, तुम्ही स्वतःला ब्रिटिश पलटणीचे शिपाई समजले पाहिजे. ब्रिटिश साम्राज्याचे तुम्ही संरक्षण केले पाहिजे. आणि असे करीत असताना शत्रूशी लढले पाहिजे. हे लक्षात ठेऊन जर त्याप्रमाणे तुम्ही वागलात तर तुम्ही आपले कर्तव्य केलेत असे होईल, आणि ब्रिटिश हिंदच्या इतिहासात तुमचे नाव सोन्याच्या अक्षरात लिहिले जाईल. भावी पिढ्या तुम्हाला दुवा देतील.'[६]

१९०७ मध्ये लीगचे वार्षिक अधिवेशन भरले. त्या अधिवेशनात बनवलेल्या घटनेचे उद्देश पुढीलप्रमाणे होते : (१) हिंदी मुसलमानांत ब्रिटिश सरकारबद्दल निष्ठेची भावना वाढवणे आणि सरकारने योजलेल्या कुठल्याही कार्याच्या हेतूबद्दल निर्माण झालेले गैरसमज दूर करणे. (२) हिंदी मुसलमानांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांच्या आकांक्षा व गरजा माफक शब्दात सरकारपुढे मांडणे. (३) वर उल्लेखिलेल्या उद्देशांशी प्रतिकूल होणार नाहीत असे जास्तीतजास्त मैत्रीचे संबंध, मुसलमानात व हिंदुस्तानातील, इतर जमातीत निर्माण करणे. घटनेत कायम अध्यक्षाची तरतूद केली होती आणि सरकारचा संपूर्ण विश्वास असलेले खोजांचे धार्मिक प्रमुख, आगाखान यांची त्यासाठी निवड झाली होती.

सर्वसामान्यपणे आगाखान या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सर सुलतान महमद शहांनी, मुसलमानी राजकारणात, नंतरसुद्धा, लक्षात राहील अशी भूमिका वठवली. त्यांची ओळख वाचकांना करून दिलीच पाहिजे. त्यांचे आजोबा, आगा हुसेन अलिशहा, यांच्यावर पर्शियाचा राजा फतेहअली शहा याने पर्शियातील मेहलेरी आणि कूम या दोन महत्त्वाच्या जिल्ह्यांचा कारभार सोपवला होता. राजाच्या मृत्यूनंतर उद्‌भवलेल्या यादवीत आगा हुसेन अलिशहा बंडखोर सैन्याला मिळाले. त्यांना तुरुंगवास भोगावा लागला पण त्यांना माफी करून सोडून देण्यात आले. केवळ हताशपणाने त्यांनी आपल्या जन्मभूमीला रामराम ठोकला आणि सिंधचा मार्ग पत्करला. येथे त्यांच्या इस्मालिया अनुयायांनी त्यांचे मोठ्या प्रेमाने स्वागत केले. या परदेशात त्यांचे मन अस्वस्थ होते आणि परत जाऊन आपली गेलेली सत्ता परत मिळवण्याची स्वप्ने त्यांना पडत होती. त्यांच्या योजनांना त्यांच्या अनुयायांनी पैसा पुरवला, पण त्या सर्वांचा शेवट खेदकारक झाला. ते साहसी पुरुष असल्यामुळे त्यांनी खुद्द हिंदुस्तानातच आपले नशीब काढण्याचा प्रयत्न केला, आणि सिंधच्या अमीरांचा बीमोड करण्यात सर चार्लस नेपियरला सहाय्य केले. १८३९–४० च्या अफगाण लढायात त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीला मोठी मोलाची मदत केली. या

६. पुर्वोक्त पुस्तक तुफुल अहमद कृत, पृ. २६३–२६४.

सेवेचे बक्षीस म्हणून ब्रिटिश सरकारने त्यांना योग्य असे सेवानिवृत्त वेतन आणि 'हिज हायनेस' हा वंश परंपरांगत किताब बहाल केला. परंतु अजूनही मनाने ते आपल्या जन्मभूमीपासून दूर राहू शकत नव्हते, म्हणून त्यांनी बनपोर या पर्शियाच्या दूरच्या प्रांतात स्थायिक होण्याचा परत एकदा प्रयत्न केला; पण पर्शियन सरकारच्या सांगण्यावरून त्यांना कलकत्त्याला जाऊन रहावे लागले. यानंतर ते बंगलोर आणि मुंबईला गेले. १८८१ मध्ये ते मरण पावले. त्यांचा मोठा मुलगा १८८५ मध्ये मृत्यू पावला, आणि त्यावेळी दहा वर्षे वयाचा असलेला सुलतान महमद शहा एका संपन्न धार्मिक संप्रदायाचा प्रमुख म्हणून आपल्या आजोबांनी मिळवलेल्या कीर्तिचा आणि ऐश्वर्याचा वारस बनला.[७]

इतर अनेक प्रकारच्या कार्य बाहूल्यामुळे आगाखानांना लीगचे अध्यक्ष म्हणून दैनंदिन काम करण्यास फार थोडा अवधि मिळे. म्हणून लीगच्या प्रत्येक अधिवेशनाने एक कार्यकारी अध्यक्ष नेमला. १९०८ च्या अधिवेशनाचे कार्यकारी अध्यक्ष बिहारचे सर अली इमाम हे होते. त्यांनी आपल्या भाषणात, लीगच्या सावध शालीनतेची काँग्रेसच्या धोकेबाज पद्धतीशी तुलना केली. काँग्रेसला वसाहतीच्या पद्धतीचे स्वराज्य पाहिजे होते, तर लीगने सुशिक्षित भारतीयांच्या स्वाभाविक आकांक्षांचे समाधान करील अशी उदारमतवादी पद्धती आणि हिंदुस्तानात स्थिर राज्यकारभाराच्या सुधारणा यांची मागणी केली. त्यांनी विचारले, 'हे स्वराज्याचे ध्येय, मग ते कितीही उच्च असो, त्याने असहिष्णुता निर्माण केली नाही काय? आणि या असहिष्णुतेने ध्येयवादी माणसाचा तोल सुटला नाही काय? आणि या समतोलपणाच्या अभावाने जहाल मतवाद निर्माण झाला नाही का? आणि या जहाल मतवादातून अराजक, बॉम्ब, गुप्तमंडळे आणि खून यांचा उगम झाला नाही काय? काँग्रेसने काय करावे याबद्दल बोलताना ते म्हणाले, 'व्यावहारिक राजकारणात ब्रिटिश राज्यकारभाराशी निष्ठा म्हणजेच भारताशी निष्ठा होय. आणि ब्रिटिश सत्तेचे रक्षण करूनच केवळ त्यांच्या या चालू राज्यकारभारात सुधारणा करणे शक्य आहे असे काँग्रेसने जाहीर करावे. हिंदी राष्ट्रीय काँग्रेसचे पुढारी जोपर्यंत अशा प्रकारचे आटोक्यातले धोरण आमच्यापुढे ठेवत नाहीत तोपर्यंत अखिल भारतीय मुस्लिम लीगला आपले कर्तव्य करावे लागणारच. आणि हे कर्तव्य म्हणजे ती ज्या जमातीचे प्रतिनिधित्व करीत आहे त्या जमातीला, लॉर्ड मोर्ले म्हणतो त्याप्रमाणे, ज्या संघटनेचा मुख्यतः 'चंद्राकरिता हट्ट' आहे अशा संघटनेला मिळण्याच्या राजकीय चुकीपासून वाचवणे हे होय.'

त्यावर्षीच्या अधिवेशनात स्वीकारलेल्या ठरावात अशा मागण्या होत्या : (१) जातीय प्रतिनिधित्वाचे तत्त्व लोकल बोर्डांना लागू करावे; (२) प्रीव्ही कौन्सिलवर एक हिंदू आणि एक मुसलमान यांची नेमणूक करावी; (३) सर्व सरकारी नोकऱ्यात

७. पूर्वोक्त विल्फ्रेड स्मिथ यांच्या ग्रंथांतून घेतलेली आगाखानांची जीवन रेखा.

मुसलमानांना वाटा असावा. बंगालची फाळणी रद्द करण्याच्या कॉंग्रेसच्या ठरावाचा निषेध करण्यात आला.

निवडणुकीच्या जातीय पद्धतीविरूद्ध काही राष्ट्रीय मुसलमानांनी व्यक्तिशः आपली मते व्यक्त केली. त्यांच्या निषेधाचे वैशिष्टय दाखवणारा लेख बॅरिस्टर नबाब सादिक अलीखान यांनी एप्रिल १९०९ च्या 'हिंदुस्तान रिव्ह्यू'मध्ये लिहिला : 'सुधारणा विषयक योजनेचे सर्वात महत्त्वाचे खोडसाळ लक्षण म्हणजे तिची वर्गीय आणि जातीय तत्त्वे होत. मुसलमानांचे राजकीय हित हे हिंदूपेक्षा भिन्न आहे अशी शिकवण देणे मुसलमानांना हितावह नाही; त्यांच्या दृष्टीनेसुद्धा हे तत्त्व खोडसाळ आहे.' असे त्यांनी लिहिले. त्यांनी आणि इतरांनी या विचारांचा जाहीर सभेतून प्रचार केला, पण त्यांच्या पाठीशी अखिल भारतीय स्वरुपाची संघटना नसल्यामुळे त्यांना प्रातिनिधीक स्वरुप प्राप्त झाले नाही.· मुस्लिम लीगला कुणीही जन्म दिलेला असो मुसलमानांची ती एकमेव संघटना होती. कॉंग्रेसचे मुसलमान सभासद सतत घटत जात असल्यामुळे ती सर्व जमातींची प्रतिनिधी म्हणून ब्रिटिशांना मान्य नव्हती. लीग स्वतः जनतेची संघटना म्हणून वाढली नाही आणि सर्व व्यावहारिक गोष्टींसाठी मुसलमान स्वतःच्या अशा राजकीय संघटनेशिवायच राहिले. पण जेव्हा जेव्हा नवीन राजकीय सुधारणांचा प्रश्न उद्भवला तेव्हा तेव्हा प्रसिद्ध मुसलमान पुढाऱ्यांनी मुसलमानांची एकमेव प्रातिनिधीक संस्था म्हणून मुस्लिम लीगचा उपयोग करून घेतला.

प्रकरण बारावे

# विभक्त मतदार संघ–पार्श्वभूमी

१८९२ च्या इंडियन कौन्सिलच्या कायद्यापासून १९०९ पर्यंतची वर्षे राज्यकर्त्यांना अतिशय काळजीत टाकणाऱ्या राजकीय घडामोडींनी भरलेली होती. घटनात्मक पातळीवर, महाराष्ट्रातील बाळ गंगाधर टिळक यांच्या १८९६ च्या कर बंदीच्या चळवळीने सुरू झालेल्या स्थानिक चळवळी आणि त्याबरोबरच दहशतवादी पातळीवर पुण्यात झालेल्या दोन ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या खूनाने सुरू झालेली हिंसक कृत्ये हळूहळू पण ठामपणे हिंदुस्तानच्या इतर भागात पसरत होती. १९ व्या शतकाच्या शेवटी, ब्रिटिशांबद्दल जास्तीत जास्त अस्वस्थ होत चाललेले जहालवादी कॉंग्रेस पुढाऱ्यात वाढू लागले. आणि कर्झनने आपली १९०५ ची बंगालच्या फाळणीची योजना अंमलात आणण्याच्या सुमाराम, त्यांचा कॉंग्रेसमधील गट इतका वाढला की ज्या नेमस्तांना हिंदुस्तानात ब्रिटिशांची सत्ता टिकावी आणि चालू रहावी अशी इच्छा होती त्यांना ते प्रचंड आव्हान ठरले. या गटाचे पुढारी आणि अनुयायी हे दोघेही हिंदूच होते.

दहशतवादी कार्यासाठी किंवा वर्तमानपत्रातील प्रक्षोभक लिखाणासाठी अनेक लोकांना पकडले गेले होते व तुरुंगात घातले गेले होते. राजकीय अशांततेची लाट दडपून टाकण्याकरिता विशेष कायदे केले गेले होते. राजद्रोही सभांचा कायदा, स्फोटक द्रव्यांचा कायदा, वर्तमानपत्रे (प्रक्षोभाला उत्तेजक) कायदा, गुन्हेगार (दुरुस्ती) कायदा हे कायदे यापैकीच होते. बॉम्ब तयार करण्यासाठी उपयोगात आणले जाणारे साहित्य, हत्यारे आणि स्फोटक द्रव्ये जवळ बाळगणाऱ्यास चवदा वर्षे हद्दपारीची, आणि सौम्य गुन्हे करणाऱ्यास पाच वर्षे सक्त मजुरीची शिक्षा होती. बॉम्ब स्फोटाचा प्रयत्न किंवा त्याचा हेतू मनात बाळगणाऱ्यास सात वर्षे तुरुंगवास किंवा २० वर्षे हद्दपारी होती. वर्तमानपत्राविषयक कायद्याखाली 'हिंसक कृत्यांना किंवा खुनाला चेतावणी' देणाऱ्या कुठल्याही वर्तमानपत्राचा छापखाना जप्त करण्याचा सरकारला अधिकार होता. जे खटले मॅजिस्ट्रेटला आणिबाणीचे वाटत असत त्या वर्तमानपत्रांच्या खटल्यांची रितसर सुनावणी होण्यापूर्वीच त्यांचे छापखाने जप्त करण्याचा अधिकार मॅजिस्ट्रेटना देण्यात आला होता. गुन्हेगार कायदा (दुरुस्ती) कायद्याने दहशत व अराजकवादींच्या तत्काल खटल्यांची व्यवस्था केली होती. या कायद्याखाली केल्या जाणाऱ्या शिक्षा इतक्या कडक होत्या की, सेक्रेटरी ऑफ स्टेट मोर्ले यांना व्हाइसरॉयला

असे सांगावे लागले की : 'आपण शिस्त राखली पाहिजे पण कडकपणाचा अतिरेक म्हणजे शिस्तीचा मार्ग नव्हे तर उलट तो बॉम्बचा मार्ग आहे.'[१]

टिळकप्रणित जहालवादी आणि दहशतवादी चळवळींच्या वाढत्या प्रमाणाने व्हाइसरॉयचे अवसान खचले होते. त्याने १९०७ च्या उन्हाळ्यात मोर्ले यांना लिहिले : 'आम्ही या देशात तळ देत आणि कूच करीत राहिलेले चार दिवसांचे उपरे आहोत असे आम्हा सर्वांना वाटत आहे.' यावर मोर्लेची प्रतिक्रिया अशी झाली. 'तुमच्या अशा प्रकारच्या उद्‌गारावरून आपले तथाकथित बलिष्ठ राज्य किती तकलादू आणि अनैसर्गिक आहे ह्याची जाणीव होण्यास आम्हाला मदत होते आणि ते कितपत टिकेल याबद्दल शंका निर्माण होते. ते अर्थात टिकणार नाहीच. आणि जे काय संक्रमण व्हावयाचे असेल ते प्रगतीकडे नेणारे आहे हे पाहणे एवढेच आमचे कर्तव्य.'[२]

व्हाइसरॉयने लवकरच कॉंग्रेस किंवा दहशतवादी यापैकी कोणाशीतरी समझोता केला पाहिजे असा मोर्लेच्या उदगारांचा अर्थ होता. आता ब्रिटिशांनी संपूर्णपणे निघून जाण्याव्यतिरिक्त कुठल्याच गोष्टींनी संतुष्ट न होणाऱ्या दहशतवाद्यांशी वाटाघाटी करणे ब्रिटिशांच्या रक्ताविरूद्ध होते आणि त्यांना ते शक्यही नव्हते. कॉंग्रेसची मागणी फारच मामुली होती. तिला कायदेमंडळाच्या हिंदी सभासदांच्या संख्येत फक्त वाढ करून हवी होती आणि कायदेमंडळाच्या निर्णयाविरूद्ध गव्हर्नरचा किंवा व्हाइसरॉयचा वटाधिकार चालू ठेवण्यास तिची ना नव्हती. नवीन परिस्थितीत, मूलतः जुनेच धोरण कलकत्त्याला आणि लंडनला पुन्हा पसंतीस आले. ते म्हणजे कॉंग्रेसची मनधरणी, पण तिच्या ध्येयाशी एकरूप होण्यापासून मुसलमानांना रोखणे. मोर्लेने मिंटोला लिहिलेल्या पत्रावरून त्यांच्या धोरणाचे हे सूत्र स्पष्ट होते.[३]

१९०९ च्या इंडियन कौन्सिलच्या बिलाचा पाया हिंदुस्तानातील राजकीय घडामोडींनी घातला. बिलावर बोलताना ब्रिटिश पंतप्रधान ॲस्क्विथ यांना हिंदी परिस्थितीच्या बदलाची आवश्यकता जाणवली. ते म्हणाले : 'हिंदुस्तानात काही गोष्टी अटळ आहेत ही वस्तुस्थिती आहे परंतु त्या आधी जाणवल्या नाहीत. उदाहरणार्थ, शिक्षणाचा प्रसार, पूर्व आणि पश्चिमेमधील महत्त्वाचे परस्पर संबंध आणि हिंदी लोकांना ५०–६० वर्षापूर्वी पूर्णपणे परकीय वाटणारे विचार, जे कधी अस्तित्वात येतील अशी कुणी कल्पनाही केली नव्हती. अशा विचारांचा हळूहळू सुशिक्षित हिंदी लोकात फैलाव यामुळे निराळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या प्रकारच्या अनेक कारणांमुळे तुम्ही आजच्यासारखे नसते बसून भागणार नाही. या परिस्थितीत, ही कायदेमंडळे म्हणजे नोकरशाहीच्या हातात ज्यांची

---

१. मोर्ले कृत Recollections विभाग २, पृ. २६९–२७०.

२. पुर्वोक्त मेरी मिंटो ग्रंथ, पृ. १५३.

३. या पुस्तकाची पृ.  पहा.

सूत्रे आहेत अशा कळसूत्री बाहुल्या नव्हेत अशी हिंदी लोकांची भावना करून देणे इष्ट आहे. त्यादृष्टीने कायदेमंडळात बिनसरकारी सभासदांचा भाग वाढत गेला पाहिजे.

१९०९ च्या कायद्याप्रमाणे सर्व कायदेमंडळे वाढवण्यात आली, आणि त्यात लोकप्रतिनिधींच्या प्रमाणात भरपूर वाढ करून देण्यात आली. प्रांतिक कायदेमंडळात बिनसरकारी बहुमताची तरतूद करण्यात आली. सार्वजनिक महत्वाच्या प्रश्नांच्या चर्चेचाही हक्क मान्य केला गेला. तरीसुद्धा खरी सत्ता संपूर्णपणे व्हाइसरॉय आणि गव्हर्नर यांच्याच हातात राहिली. असे असले तरी, १८९२ च्या कायद्यात ही ठसठशीत सुधारणा होती. परंतु, यामुळे यापूर्वी अत्यंत कटाक्षाने टाळल्या गेलेल्या जातीय भावनांचे प्रदर्शन, फार मोठ्या प्रमाणावर कॉंग्रेसच्या व्यासपिठावरूनही केले गेले.'

१८९२ चा इंडियन कौन्सिलचा ठराव संमत होण्यास ज्या घडामोडींचे कारण झाले त्या परिस्थितीनंतरच्या काळात मुसलमान जातीयता सावकाश पण सातत्याने वाढत गेली. आणि १९०६ मध्ये तिला निश्चित संघटित स्वरूप प्राप्त झाले. आपल्या लोकसंख्येच्या प्रमाणात आपल्याला कौन्सिलवर प्रतिनिधित्व मिळू शकले नाही अशी योग्य भीति मुसलमान मनात बाळगू लागले कारण १८९२ च्या कौन्सिलनी त्यांना कमी प्रतिनिधित्व दिले होते.

हिंदुस्तान सरकारने मुसलमानांची बाजू उचलून धरली आणि प्रांतिक सरकारांना उद्देशून १९०७ च्या ऑगस्टमध्ये त्यांनी एक खलिता लिहिला. त्यात त्यांनी म्हटले होते : 'आतापर्यंत अमलात असलेल्या निवडणूक पद्धतीखाली किंवा बहुतेक सर्व निवडणूक विभागात हिंदूंचे फार मोठे वर्चस्व आहे. याचा परिणाम म्हणजे त्यांच्या तुलनेने फार कमी मुसलमान सभासद निवडले गेले आहेत. ........ आणि सरकार नियुक्तपद्धती (म्हणजे सरकारने अधिक मुसलमान सभासद नियुक्त करण्याची पद्धत) सुद्धा मुसलमानांना अभिप्रेत असलेल्या दर्जाचे मुसलमान नेमण्यात पुष्कळदा अयशस्वी झाली आहे, असे जोरात सांगितले जात आहे. म्हणून हिंदुस्तान सरकार खालील उपाय योजना स्थानिक सरकारांपुढे विचारासाठी मांडत आहे. प्रथम म्हणजे, सर्वसाधारण पद्धतीने जे काही थोडे मुसलमान निवडून येऊ शकतील, त्याच्या जोडीला प्रत्येक कौन्सिलमध्ये काही जागा फक्त मुसलमानांकरिता राखीव असाव्यात. दुसरे म्हणजे, या जागा भरण्यासाठी किंवा त्यांच्या काही प्रमाणासाठी खास मुस्लिम मतदार संघ निर्माण करावा.

सेक्रेटरी ऑफ स्टेटला पाठवलेल्या आपल्या तारीख १ ऑक्टोबर १९०८ च्या नंबर २१ च्या खलित्यात हिंदुस्तान सरकारने मुस्लिम प्रतिनिधित्वाबद्दल पुढील निवेदन केले : 'या विषयावर स्थानिक सरकारनी केलेल्या सूचनांचा आणि आमच्याकडे आलेल्या असंख्य बिनसरकारी मतांचा आम्ही काळजीपूर्वक विचार केला आहे. या

सर्व कागदपत्रावरून असा निर्णय निघतो की, हिंदी कायदेमंडळाच्या घटनेत निवडीचे तत्त्व अंतर्भूत करील अशी फक्त एकच व्यवहार्य पद्धत आहे आणि ती म्हणजे वर्गांचे आणि हितसंबंधांचे प्रतिनिधित्व.' नंतर १८९२ च्या कौन्सिल कायद्यावरील चर्चेच्या-वेळी १८९२ मध्ये हाऊस ऑफ लॉर्डस् आणि हाऊस ऑफ कॉमन्समध्ये झालेली वर्गांच्या आणि हितसंबंधांच्या प्रतिनिधित्वाचे तत्त्व मान्य करणारी भाषणे उद्धृत केली. आणि निरनिराळ्या वर्गांतून आणि हितसंबंधातून हिंदी प्रतिनिधी निवडण्या-साठी बोलताना आपल्या खलित्यात म्हटले की, 'हा मतदार संघ जरी एका वर्गाच्या बाबतीत फायदेशीर ठरला असला तरी इतर हितसंबंधांच्या बाबतीत त्यांना प्रमाणशीर प्रतिनिधित्व मिळाले आहे असे क्वचितच म्हणता येईल. १८९३ पासून वरिष्ठ कायदेमंडळासाठी निवडलेल्या बिनसरकारी सभासदांपैकी ४५ टक्के व्यावसायिक मध्यम वर्गातून आलेले आहेत. एकंदर जागांच्या २७ टक्के जागा जमिनदारांना मिळाल्या आहेत. आणि फक्त १२ टक्केच मुसलमानांना मिळाल्या आहेत. आणि ज्या एका मोठ्या वर्गाचे महत्व वाढत आहे अशा वर्गाला—हिंदी व्यापारी वर्गाला—अजिबात प्रतिनिधित्व मिळालेले नाही.' खलित्यात पुढे म्हटले होते : 'आमच्या २४ ऑगस्ट १९०७ च्या खलित्यात आम्ही मुसलमानांच्या प्रतिनिधित्वाकरिता केलेल्या सूचनांना स्थानिक सरकारांची मान्यता आहे. हिंदूंनी या सूचनाविरुद्ध सतत टीका केली आहे. ते या सूचनांकडे एका धर्माविरुद्ध दुसरा धर्म म्हणून आणि अशारितीने सुशिक्षित मध्यम वर्गाच्या वर्चस्वाला शह देणाऱ्या म्हणून पहात आहेत. काही हिंदूंनी मात्र मुसलमान जमातीला खास प्रतिनिधित्व देण्याचा फायदा ओळखला आहे.' आणि खास मुसलमान मतदार संघ बनवण्याला बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशनचा जरी सक्त विरोध असला तरी मुसलमान जमातीचे दोन सभासद निवडण्याची तरतूद त्यांनी आपल्या योजनेत केली आहे. धार्मिक प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाविरुद्ध असोसि-एशनने जरी औपचारिक विरोध दर्शवला असला तरी, मुसलमान हे केवळ धार्मिक नाहीत काहीतरी अधिक आहेत याची तिला निःसंशय जाणीव आहे.'[४]

१८९२ च्या कायद्याप्रमाणे, वेळोवेळी स्थापन झालेल्या कायदेमंडळात मुसलमानांना पुरेसे प्रतिनिधित्व देण्याची, ब्रिटिश राज्यकर्ते आणि मुसलमान पुढारी, व्यर्थ खटपट करीत होते. त्या कायद्याखाली कायदे करणाऱ्या संस्थांशी हिंदी लोकांचे सहचर्य निरनिराळ्या 'वर्गांच्या आणि हितांच्या' संख्येप्रमाणे न होता, त्या त्या वर्गाच्या आणि त्या त्या हितसंबंधांच्या महत्त्वाप्रमाणे झाले. आणि ही महत्त्वाची कसोटी ब्रिटिश सत्ता अबाधित चालू ठेवणे ही होती. १८९२ च्या कायद्याने ज्या प्रमुख हितसंबंधांचे प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न केला ते म्हणजे जमिनदार, विद्यापीठे, व्यापार वगैरे होत. उद्योग व व्यापारात मुसलमान सर्वसाधारणपणे अभावानेच तळपत होते;

४. हिंदुस्तान सरकारच्या अहवालातील, Papers Relating to Constitutions Reforms in India, 1908 पृ. ८ ते १३.

विद्यापिठात ते क्वचितच आढळत; जमिनदारीत हिंदूंच्या संख्येने त्यांना मागे टाकले होते; तेव्हा हे हितसंबंधीत त्यांच्याशी संबंध नसलेल्या लोकांना निवडून देतील अशी अपेक्षा कशी करावी; सहाजिकच या हितसंबंधांशी निगडीत नसलेल्या मुसलमानांना ते आपल्या तक्रारी आणि गरजा पुढे मांडतील असे कसे वाटावे ? स्थानिक संस्थांनी कायदेमंडळात काही सभासद निवडून देण्यासाठी निवडणूक मंडळेही स्थापन केली होती; परंतु या स्थानिक संस्था स्वतःच मालमत्तेच्या हक्कावर आधारलेल्या अतिशय मर्यादित मतदार संघातून निवडल्या गेल्या होत्या आणि सामान्यपणे मुसलमान हे हिंदूंपेक्षा गरीब होते.

हिंदुस्तानचे ब्रिटिश राज्यकर्ते हे काही अमाहितगार लोक नव्हते; ते हिंदी जीवनाचा बारीक सारीक तपशील जाणून घेत असत. ते देत असलेली निवडणूक पद्धत, आणि त्यांना हवे असलेल्या हितसंबंधांचे कायदेमंडळातील प्रतिनिधित्व, मुसलमानांना पुरेसे प्रतिनिधित्व देईल असे समजणे चुकीचे होते. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सांख्यिक प्रतिनिधित्वाची कधी तरतूदच केली नव्हती. म्हणून प्रांतिक सरकारांना लिहिलेल्या खलित्यात हिंदुस्तान सरकारने नमूद केलेली वर उल्लेखिलेली तक्रार म्हणजे ब्रिटिश सरकारने १८९२ च्या कायद्यात केलेल्या तरतुदीचा आणि त्या कायद्याखाली हिंदुस्तान सरकारने बनवलेल्या कायद्यातील तरतुदीचा परिणाम होता. परंतु काही मुस्लिम पुढाऱ्यांनी प्रत्यक्षपणे आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांनी अप्रत्यक्षपणे ही तक्रार हिंदूंच्या आधाशीपणाच्या माथी मारली. आणि हिंदू, मुसलमानांना पुरेशा संख्येने निवडून देणार नाहीत, त्यांनी विभक्त मतदार संघातून मुसलमानांना निवडले पाहिजे अशी समजूत फैलावू दिली.

स्थानिक संस्थांचा विचार केला तर मतदार संघ हे खास वर्गापुरते मर्यादित नव्हते, आणि त्यात कनिष्ठ वर्गाच्या हिंदू आणि मुसलमानांचा समावेश होता. ज्या मतदार संघात आपल्या हिंदू प्रतिस्पर्ध्यापेक्षा मुसलमान अधिक सुशिक्षित आणि अधिक लोकप्रिय होते तो मतदार संघ अगदी प्रामुख्याने हिंदू मतदारांचा असला तरी त्यातून मुसलमान निवडून दिले जात असत. हा प्रकार जेथे माध्यमिक शाळांत मुसलमानांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात, हिंदूंपेक्षा मुसलमान विद्यार्थी अधिक होते त्या संयुक्त प्रांतात होत असे आणि या माध्यमिक शिक्षणाच्या पातळीवर मुसलमान हिंदूंच्या मागे पडत नसत. धर्माच्या विचारांनी मते विभागली जात नव्हती हे सिद्ध करण्यासाठी, बिशन नारायण धर या कलकत्त्याच्या बॅरिस्टरनी, १९११ च्या काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना, आकडेवारी सादर केली. ते म्हणाले : '४५ पैकी २९ जिल्हा बोर्डामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात मुसलमान सभासदांचे प्रमाण अधिक होते.' त्यांनी सादर केलेल्या आकड्याप्रमाणे जिल्हा बोर्डाच्या ६६३ सभासदांपैकी ४४५ हिंदू होते आणि सरकारी सभासद सोडून मुसलमान सभासद १८९ होते; आणि म्युनिसिपल बोर्डात ५६२ हिंदू आणि ३१० मुसलमान होते. जेव्हा १९०९ चा कायदा तयार होत होता आणि जेव्हा विभक्त मुसलमान मतदार संघाच्या बाजूने लोकमत' झुकत आहे असे वाटत होते तेव्हा नोव्हेंबर १९०८ मध्ये हिंदुस्तानचे

सेक्रेटरी ऑफ स्टेट मोर्ले यांनी एक योजना तयार केली. यात, प्रांतातील मुसलमान लोकसंख्येच्या प्रमाणात, मुसलमान निवडून येतील अशा संमिश्र मतदार संघांची योजना होती. परंतु, ही योजना यशस्वी झाली नाही. १९०९ मध्ये, हिंदी कायदेमंडळाच्या बिलाच्या दुसऱ्या वाचनाच्यावेळी बोलताना, आपण ही योजना हिंदुस्तान सरकारच्या विचारासाठी पुढे का मांडली आणि तिचा त्याग का केला गेला याचे स्पष्टीकरण मोर्ले यांनी दिले. ते म्हणाले : 'या योजनेच्या मुळाशी राजकीय हेतू असा होता की, असे संमिश्र राजकीय व्यवहार या दोनही जमातींना जास्त जवळ आणतील, आणि त्यांच्यात मनोमिलन घडवून आणतील. ही अशा अनुभवी आणि उच्च हिंदी अधकारी व्यक्तींना वाटत होती. त्याचप्रमाणे माझ्या हिंदुस्तानातील सल्लागारांनाही, वाटत होती. या योजनेला अनेकांचा पाठिंबा होता. पण या जागांवर हिंदू आपल्याला अनुकूल असेच मुसलमान निवडतील म्हणून मुसलमानांनी तिला विरोध केला.'

ज्या मुसलमानांनी या योजनेला 'विरोध' केला त्यात अमीर अली हे अतिशय प्रमुख होते. त्यांनी सुधारणा बील पार्लमेंटपुढे असतानाच २७ जानेवारी १९०९ रोजी लंडन मुस्लिम लीगच्यावतीने आणि आपल्या भाषणात केलेल्या दाव्यांप्रमाणे हिंदी मुस्लिम लीगच्याही वतीने, सेक्रेटरी ऑफ स्टेटकडे एक शिष्टमंडळ नेण्यात पुढाकार घेतला आणि, 'हिंदुस्तानातील मुसलमानांचे विचार' त्यांच्यापुढे मांडले. त्यांनी मांडलेले मुद्दे असे होते : (१) हिंदुस्तानातील मुसलमानांवर ब्रिटिश अन्याय करीत आहेत असा नुसता संशय, कॉन्स्टॅन्टिनोपलमध्ये गंभीर आणि अपायकारक प्रतीक्रिया निर्माण करील; (२) हिंदूंच्या खानेसुमारीमध्ये, त्यांच्यात बसत नसलेल्य फार मोठ्या कनिष्ठ वर्गाची गणना करून मुसलमान जमातीवर अन्याय केला गेला आहे; (३) घटनात्मक सुधारणांना देश कितीही तयार असो, हिंदुस्तानच्या दोन मोठ्या जमातींचे हित निराळे समजले पाहिजे आणि निराळे हाताळले पाहिजे; (४) प्रांतिक मंडळाचे सभासद निवडताना केवळ मुसलमानांचेच मतदार संघ बनवले पाहिजेत आणि त्यांची संख्या व गट पाडण्याची पद्धती ही सरकारी अधिकाऱ्यांनीच ठरवली पाहिजे. थोडक्यात म्हणजे, मुसलमानांना, पुरेसे प्रामाणिक, आणि वास्तवप्रतिनिधित्व मिळावे, याला लॉर्ड मोर्ले यांनी असे उत्तर दिले की, 'तुमचे आणि आमचे हेतू एकच आहेत.[५]' आणि शिष्टमंडळ समाधानाने परतले.

अमीर अली शिष्टमंडळाची अशीही मागणी होती की, व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळावर जर हिंदू सभासद घेतला जाणार असेल तर त्या मंडळावर दोन हिंदी सभासद असले पाहिजेत आणि त्यापैकी एक मुसलमान असला पाहिजे. 'व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाच्याबाबतीत हिंदू जमातीचा किंवा मुसलमान जमातीचा उल्लेख गैरलागू आहे.' या मुद्यावर सेक्रेटरी ऑफ स्टेटने ही मागणी फेटाळून लावली. परंतु

५. मोर्ले यांची Indian Speeches

व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीचा पहिला सभासद जेव्हा हिंदू निघाला तेव्हापासून त्याच्या नेमणुकीचा मुसलमान हेवा करू लागले, आणि आपल्या देशबांधवाबरोबर मुसलमान कार्यकारी मंडळात बसेपर्यंत ते असंतुष्ट राहिले.

राज्यकर्त्यांनी कल्पिलेल्या आणि त्यानंतर १९०९ च्या कायद्याने निर्माण केलेल्या कार्यपद्धतीने, मुसलमानांना विभक्त मतदार संघ मिळाला. शिवाय सर्वसाधारण मतदार संघातील त्यांचा मतदानाचा हक्कही कायम राहिला. एका बाजूला अजातीय सर्वसाधारण मतदार संघ हा काही मोठे जमिनदार, म्युनिसिपल आणि जिल्हा बोर्डांच्या गटांचे सभासद, विद्यापीठे आणि चेंबर ऑफ कॉमर्स यांचा बनवला होता. त्यामुळे निवडणूक पूर्णपणे अप्रत्यक्ष होती. दुसऱ्या बाजूला विभक्त मतदार संघ होता आणि तो मालमत्तेच्या हक्कावर आधारलेल्या प्रत्यक्ष निवडणुकीच्या मतदानावर बनवला होता.

काँग्रेस पुढाऱ्यांनी मुसलमानांना संपूर्ण प्रतिनिधित्व मिळावे म्हणून जी खात्रीची पद्धती सुचवली होती त्याच्याबरोबर उलट ही पद्धती होती. काँग्रेसने सुचवलेली पद्धती अशी होती की, मुसलमानांना प्रथम सर्वसाधारण मतदार संघातून प्रतिनिधित्व मिळवण्याची संधी मिळेल आणि त्यांच्यासाठी ठरलेल्या संख्येइतके प्रतिनिधित्व मिळवण्यात ते अयशस्वी झाले, तर मतदारांच्या नियमात खास मुसलमान मतदार संघाची तरतूद करून ही कमतरता त्यांना भरून काढता येईल. या पद्धतीत आणि सरकारी पद्धतीत असा फरक होता की, पहिल्या पद्धतीने मुसलमानी लोकसंख्येच्या प्रमाणाइतकेच प्रतिनिधित्व मुसलमानांना दिले होते तर दुसऱ्या पद्धतीने, जातीय मतदार संघातून त्यांना त्यांच्या प्रमाणात प्रतिनिधित्व तर दिलेच होते पण शिवाय सर्वसाधारण मतदार संघातून निवडणूक लढवण्याचा हक्कही दिला होता. वर वर पहाता जरी दुसऱ्या पद्धतीमध्ये संमिश्र मतदार संघाचे साम्य कायम टिकण्याची तरतूद केलेली दिसली तरी, मुसलमानांनी आपल्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा मिळवल्यानंतर ते सर्वसाधारण मतदार संघातून हिंदूंच्या वाट्याच्या जागाही बळकावतील अशी भीति, या पद्धतीने बहुतेक हिंदू पुढाऱ्यांच्या मनात निर्माण केली.

१८९२ च्या कायद्याखाली वाटल्या गेलेल्या बिनसरकारी निवडणुकीच्या जागांमुळे मुसलमान कुरकुरत राहिले होते; आणि आता, १९०९ च्या कायद्याने हिंदूही असंतुष्ट झाले.

२५ वर्षांच्या अवधीत हळूहळू वाढत असलेल्या मुस्लिम जातीयतेला जोड म्हणून, ब्रिटिश योजनांच्या इतर विशेषांनी हिंदू जातीयता जागृत होण्याचा धोका निर्माण केला. हे विशेष असे होते : (१) विभक्त मतदार संघांच्या योजनेमुळे हिंदूंना आणि इतर जमातींना नाकारलेला प्रत्यक्ष मतदानाचा अधिकार मुसलमानांना मिळाला. ह्या अधिकाराने मुसलमानांना निश्चित वरचे स्थान प्राप्त झाले. कारण प्रत्यक्ष मतदानाचा अधिकार ही संस्थांच्या विकासाची पहिली पायरी असते. ३००० किंवा

त्याहून अधिक मिळकतीवर कर भरणारे, किंवा त्याच रकमेचा जमीन सारा भरणारे आणि पदवी परिक्षा उत्तीर्ण होऊन पाच वर्षे लोटलेले मुसलमान, हे मतदार बनवले गेले आणि मुसलमाना व्यतिरिक्त इतर जरी त्यांच्यापेक्षा शंभर पटीने अधिक मिळकत कर किंवा जमीन सारा भरत होते किंवा त्यांना पदवीधर होऊन तीस-तीस वर्षे लोटलेली होती तरी त्यांना सांपत्तिक किंवा शैक्षणिक लायकीनुसार मतदानाचा हक्क नव्हता. या गोष्टीचा मदन मोहन मालवीय यांनी आपल्या १९०९ च्या कॉंग्रेसच्या अध्यक्षीय भाषणात फार तीव्र निषेध केला होता. (२) पंजाब, पूर्व बंगाल आणि आसाम हे प्रांत खेरीज करून इतर प्रांतात मुसलमान अल्पसंख्य असल्यामुळे त्यांना संरक्षणाची जरूरी आहे असा युक्तिवाद मुसलमानांच्यावतीने केला गेला आणि या गोष्टीला सरकारी मान्यता मिळाली. 'असे संरक्षण ज्या दोन प्रांतात हिंदू अल्पसंख्य आहेत त्या दोन प्रांतातील हिंदूंना का मिळाले नाही' असे विचारताना मालवीय म्हणाले, 'या दोन प्रांतातील हिंदूंना अगदी कठोरपणे वाऱ्यावर सोडून दिले गेले आहे'. (३) जेव्हा मुसलमानांना वरच्या पायरीवर ठेवले गेले तेव्हा मुंबई आणि मद्रास येथील हिंदूंना १८९२ च्या कायद्याने जे दिले गेले होते ते काढून घेऊन एक पायरी खाली ढकलले गेले. म्युनिसिपल बोर्डे व जिल्हा बोर्डे यांचे मतदार संघ त्या कायद्यानुसार एखादा बाहेरचा इसमसुद्धा प्रांतिक कायदे मंडळावर निवडून देऊ शकत असत. परंतु, १९०९ च्या कायद्याने, कायदेमंडळासाठी, फक्त बोर्डांचे सभासदच उमेदवार म्हणून उभे राहू शकतील अशी सक्ती केली. या नवीन योजनेमुळे मुसलमान मतदारांचा झालेला फायदा कॉंग्रेसच्या हिंदू पुढाऱ्यांना विशेषच झोंबला.

१९०९ च्या कॉंग्रेसने, 'धार्मिक पायावर निर्माण केलेल्या विभक्त मतदार संघाबद्दल आपली तीव्र नापसंती' दर्शवली, आणि या कायद्याखाली बनवलेले नियम 'सर्व देशभर मोठे असमाधान पसरवण्यास कारणीभूत झाले' असा ठराव संमत केला.

मालवीयांचे अध्यक्षीय भाषण हे त्यांच्या पूर्वीच्या सर्वसाधारण अध्यक्षीय भाषणाहून सहज लक्षात येईल इतके वेगळ्या स्वरूपाचे होते. मुस्लिम लीगच्या स्थापनेत परिणीत झालेले मुस्लिम शिष्टमंडळ, १९०६ साली व्हाइसरॉयच्या भेटीस जाईपर्यंत 'मुसलमानांनी राज्यकारभाराच्या पद्धतीतील सुधारणेच्या कुठल्याही प्रश्नांची कधी काळजी केली नाही' असे सांगून मालवीयांनी त्याबद्दल मुसलमानांवर उघड उघड टीकेचा वर्षाव केला. त्यांच्या म्हणण्याचा स्पष्ट अर्थ असा होता की, नजिक येऊन ठेपलेल्या कायदेमंडळाच्या सुधारणांनी मुसलमानांना सावध केले आणि 'त्यांना राजकारणात एकदम अतिरिक्त रस निर्माण झाला.' नवीन सुधारणा केल्याशिवाय हिंदुस्तानात शांतता राखणे अशक्यच आहे हे ब्रिटिश मुत्सद्यांना पटवून देणाऱ्या, हिंसात्मक आणि घटनात्मक अशा हादरा देणाऱ्या सर्व राजकीय चळवळींची हिंदूना पुन्हा आठवण झाली. प्रमुख मुसलमान पुढारी आणि त्यांचे ब्रिटिश पाठीराखे,

मुसलमानांना राजकारणापासून अलिप्त रहाण्याची सतत शिकवण देत होते हेही त्यांना आठवले. पण मुसलमानांना राजकीय सुधारणा पाहिजे असल्या किंवा नसल्या आणि त्यांनी त्यासाठी कष्ट केले असले किंवा नसले तरीही, त्यांनी स्वतःची उपेक्षा होऊ दिली नसती कारण मनुष्य स्वभावच तसा आहे. आणि म्हणूनच १८९२ च्या कायदेमंडळात आपल्याला पुरेसे प्रतिनिधित्व न देणाऱ्या नेमणूक किंवा निवडणूक पद्धतीवर त्यांनी टीका केली. ही वस्तुस्थिती १८९२ ते १९०९ च्या काळात मुस्लिम जातीयतेची वाढ होण्यास पूर्णपणे नाही तरी अंशतः जबाबदार होती असे म्हणणे भाग आहे. १८५७ नंतरच्या काळातील ही वादळी वर्षे होती आणि त्यांनी ब्रिटिश राज्यकर्त्यांना वारंवार सचिंत केले. म्हणून, हिंदी राज्यकारभाराशी निगडीत अशा काही लोकांनी, हिंदूंनी चालवलेल्या आणि वाढवलेल्या आक्रमक राष्ट्रवादाला शह म्हणून मुसलमानांना गोंजारले, या निष्कर्षाला पुष्टी मिळते. मुसलमानांनी चळवळीच्या राजकारणापासून दूर रहावे, कारण तसे राहिल्याने योग्य त्यापेक्षाही अधिक लाभ पदरात पडतो हे दाखवून देण्यासाठी त्यांना जादा प्रतिनिधित्व देण्यात आले असाही निष्कर्ष काढण्यात आला.

१९०९ च्या कायद्यानंतर दोन वर्षांनी, रॅम्से मॅक्डोनॉल्ड यानंतर ब्रिटनचे पंतप्रधान झालेल्या गृहस्थांनी आपल्या 'दि अवेकनींग इन इंडिया' या ग्रंथात नमूद केलेल्या वृत्तांतावरून वरील विधानाला दुजोरा मिळतो. ते म्हणतात : 'काही दूरदृष्टीच्या मुसलमानांना आपण चूक केली हे जाणवू लागलेच आहे. अँग्लो-इंडियन अधिकाऱ्यांनी, त्यांच्याकरिता योजलेल्या डावात भाग घेण्याला त्यांच्या काही पुढाऱ्यांनी ज्या पद्धतीने संमती दिली होती त्याबद्दल कित्येकांनी माझ्याकडे कटू उद्गार काढले. आणि जे काही करण्यात आले त्याबद्दल अजूनही जे अनुकूल आहेत त्या इतरांना, पुढील धोक्याची जाणीव होऊ लागली आहे आणि आपण इतके जास्त मागितले नसते तर आपण अधिक सुरक्षित राहिलो असतो असे त्यांना वाटू लागले आहे.'[६] याच ग्रंथात दुसऱ्या एका ठिकाणी त्यांनी लिहिले आहे, 'काही अँग्लो-इंडियन अधिकाऱ्यांना मुसलमान पुढाऱ्यांना स्फूर्ति दिली; या अधिकाऱ्यांनी सिमला आणि लंडनमधील सूत्रे हलवली आणि मुसलमानांना खास अग्रत्व दाखवून हिंदू-मुसलमान जमातीतील बेबनावाची पेरणी केली. "फोडा आणि राज्य करा" या तत्त्वानुसार हे मुद्दाम आणि दुष्ट बुद्धीने केले गेले होते की, आपले काही जबाबदार अधिकारी हिंदुस्तानला किती थोडे ओळखतात किंवा आपल्या कृत्यांचे परिणाम किती थोडे अजमावतात हे पुन्हा एकदा दाखवणारी ती एक फक्त घोडचूक होती हे तिऱ्हाईत सांगू शकणार नाही. कारण लॉर्ड मिंटो आणि लॉर्ड मोर्ले यांच्या उलट सुलट भाषणांचा आणि विसंगत खलित्यांचा खरा अर्थ काय हे अजूनही एक गुपीत आहे.'[७]

६. रॅम्से मॅक्डोनॉल्ड कृत, The Awakening in India पृ. १२९.

७. किता, पृ. १७६–१७७.

सरकारी डोके, हिंदूंपासून मुसलमानांना फोडण्याचे कार्य करीत होते, निदान तशी इच्छा करीत होते हा प्रचलित असलेला समज, याच संदर्भात मागे उद्धृत केलेल्या लेडी मिंटोच्या डायरीतील उताऱ्यावरून दृढ होतो.

हिंदूंना चळवळ करून जे मिळेल त्यापेक्षा अधिक मुसलमानांना चळवळ न करता मिळेल हे १९०९ च्या मतदार संघाच्या योजनेने मुसलमानांना दाखवून दिले. कांग्रेस व्यासपीठावरून या योजनेच्या झालेल्या निषेधामुळे, आपले हित राजकीय चळवळचांशी संगनमत करून साध्य होणार नाही तर जातीय संघटन करून होईल अशी मुसल-मानांनी ठाम समजूत करून घेतली.

---

प्रकरण तेरावे

# धर्माचा प्रभाव

लोकसत्ताक राज्यपद्धतीत लोकसत्ताक शिक्षण गृहीतच असते. हे शिक्षण, स्वातंत्र्य, समता, नागरिकत्वाचे हक्क, मतदानपद्धती, लोकसभेची कार्ये व कार्यपद्धती आणि निधर्मी वागणूक यासाठी मनोभूमिका तयार करते. कांग्रेस आणि इतर तत्सम संस्थांच्या प्रेरणांनी, सुशिक्षित हिंदू लोकसत्ताक कल्पना पचवीत होते, पण मुसलमान पुढाऱ्यांनी मुसलमानांना ती संधी कधी मिळू दिली नाही. हे पुढारी आणि इस्लामचे धार्मिक उलेमा या दोघांच्या छत्राखाली मुसलमानांनाही सुरक्षित असल्याचे समाधान वाटले आणि त्यांनी स्वतःला राजकीय ज्ञानापासून वंचित केले. कांग्रेसने आपल्या ठरावातून किंवा भाषणातून हिंदू पक्षपाताचे पुसटसुद्धा चिन्ह कधी दाखवले नव्हते आणि स्वतःला धर्मापासून कटाक्षाने दूर ठेवले होते. परंतु कावेबाज लोकांनी मुसलमानांना तिच्यापासून थोपवून धरले आणि प्रत्यक्षात तिला हिंदू संघटनेचे स्वरूप दिले. परिणामी राजकीयदृष्टचा पुढे जात असलेले हिंदू आणि मागे रहाणारे मुसलमान हे दृश्य सर्वांना पहावयास मिळाले. या गोष्टीची काही मुसलमान पुढाऱ्यांना जाणीव होती आणि त्यांनी याबद्दल खेद व्यक्त केला. त्यापैकी एक नबाब मोहसिन-उल्-मुल्क हे एक होते. एकदा 'मुसलमानी राष्ट्राच्या ऱ्हासाची कारणे' या विषयावर बोलत असताना ते म्हणाले की, त्यांची जमात 'जो पर्यंत असे आपल्या पूर्वजांच्या पराक्रमात भूषण मानीत आहे आणि नवीन ज्ञान मिळवण्याच्या हिंदूंच्या उत्सुकतेचे अनुकरण करण्यास झटत नाही तोपर्यंत तिच्या प्रगतीची मुळीच आशा नाही.'

परंतु, मोहसिन-उल्-मुल्कसारखे विसंवादी व्याख्यान सर्वसाधारणपणे कोणाला रुचले नाही आणि त्यांना स्वतःलाच व्यावहारीक राजकारणात उतरावे लागले. नंतर केलेल्या एका भाषणात ते म्हणाले : 'सद्गृहस्थहो, हे ध्यानात धरा, पक्के ध्यानात धरा की, पूज्य आणि आदरणीय अशा जुन्या पठडीच्या उलेमांच्या मदतीशिवाय आपण आपल्या प्रयत्नात म्हणण्यासारखे यश कधीच मिळवू शकणार नाही. आपल्या जमातीतील बहुसंख्य लोक आपल्या बोलण्याकडे लक्ष देत नाहीत आणि जनतेत सुसंस्कृत कल्पनांचा प्रचार करण्याची साधने आपल्याकडे नाहीत. परंतु ज्या उलेमांचा प्रभाव सर्व जमातीच्या मनावर आहे त्या लोकांचे म्हणणे पेशावरपासून ब्रम्हदेशपर्यंत आणि काश्मिरपासून मद्रासपर्यंत प्रत्येक मुसलमान ऐकेल. सद्गृहस्थहो, मुसलमान

कितीही अज्ञानी किंवा अविचारी असले तरी त्यांचे अंत:करण इस्लामने व्यापलेले आहे आणि वृत्ती धार्मिक आहे याबद्दल संशय नाही. आणि केवळ उलेमांनी सांगितलेला इस्लाम हाच त्यांचा इस्लाम धर्म आहे.'

मात्र, टिळकांसारख्या काँग्रेस पुढाऱ्यांनी अनेक वेळेला हिरमोड होऊनही, आपले हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रयत्न सोडले नाहीत; सरकारी डावपेच, मुसलमान पुढाऱ्यांचा बेगुमान विरोध आणि उलेमांचे दुराग्रही फतवे यांनी ते डगमगले नाहीत. त्यांनी आपल्या भाषणात अनेकवेळा ब्रिटिश सत्ता आणि मुसलमानी सत्ता यांची तुलना करून मुसलमानी सत्ता जास्त उपकारक मानली होती. त्यांचे भाषण अनेक मुसलमानांनी अनुकूलतेने ऐकले होते आणि त्यांनी त्यांचा आदरही केला होता. परंतु आपल्या सबंध जमातीच्या राजकीय निर्णयांवर प्रभाव पाडण्यास ते असमर्थ असल्यामुळे वरिष्ठ वर्तुळात त्यांची मते कधीच मांडली गेली नाहीत.

ज्यावेळी सिमल्याला मुस्लिम लीगच्या स्थापनेचा पाया घातला जात होता त्यावेळी टिळक हिंदू मुसलमानांना स्वदेशीला वाहून घेण्यासाठी प्रवृत्त करीत होते. कर्मठ हिंदुंचे तुफानी केंद्र असलेल्या पुण्यामध्ये हिंदुंशी हातमिळवणी करण्याकरिता मुसलमान पुढे येत होते. टिळकांच्या प्रेरणेने हैद्राबादच्या एका अझी सैफुद्दिन या मुसलमान पुढाऱ्याने हिंदू मुसलमानांच्या मिश्र मेळाव्यापुढे भाषण केले आणि त्यांना असे सांगितले की, हिंदुस्तानच्या हितासाठी आणि देशाच्या औद्योगिक पुनरुज्जीवनासाठी स्वदेशी चळवळ चालू ठेवण्यात दोनही जमातींनी एकजुटीने कार्य केले पाहिजे. टिळकांच्या कट्टर राष्ट्रवादाने मुसलमानांना शिवाजी उत्सवात भाग घेण्यास स्फुर्ति मिळाली. काही मुसलमान टिळकांच्या जाहीर सभेत बोलले आणि त्यांनी शिवाजी हा जितका हिंदू नेता होता तितकाच तो मुसलमानांचाही नेता होता, ह्या टिळकांच्या दाव्याचे समर्थन केले. उत्सवात भाग घेणाऱ्या मुसलमानांच्या समर्थनार्थ मौलवी अब्दुल करीम या मुस्लिम इतिहासकाराचा दाखला देण्यात आला. त्यांनी म्हटले होते, शिवाजींनी जिंकलेल्या प्रदेशातील मशिदी भ्रष्ट करण्यापासून किंवा कुराणाबद्दल अनादर दाखवण्यापासून तो दूर राहिला असल्यामुळे तो आदरास पात्र होता.[१]

अफझलखानाला शिवाजीने कपटाने ठार केले हा जुनाच वादविवाद १९०६ मध्ये अँग्लो इंडियन आणि ब्रिटिश पत्रांनी पुन्हा उकरून काढला.

गणपती उत्सव, शिवाजी उत्सव किंवा इतर कुठल्याही हिंदू नाव धारण करणाऱ्या राजकीय चळवळी, यांनी मुसलमानांना राजकारणापासून दूर ठेवले किंवा काय हे जुन्या वर्तमानपत्रावरून किंवा सरकारी कागदपत्रावरून शोधणे व्यर्थ आहे. परंतु मागील प्रकरणात चर्चा केल्याप्रमाणे उलेमांच्या अज्ञानामुळे आणि इतरांच्या कारस्थानामुळे मुसलमानांची राजकीय प्रगती खुंटवली गेली असे मानण्यास खात्रीलायक पुरावा आहे.

या काळात, ज्यांच्या लिखाणांनी मुसलमान राजकीय आखाड्यात ओढले गेले

१. केसरी जून १९, १९०६.

असते असे काही प्रगत धार्मिक भाष्यकार आणि विचारवंत मुसलमान हिंदी मुसलमानांत निर्माण झाले. परंतु त्यांनी स्वतःच आपल्या विचारांना कधी कृतीत उतरवले नाही, आणि मुसलमान अंधारातच चाचपडत राहिले.

अशा प्रागतिक भाष्यकारात चिराग अली हे होते. त्यांचे बहुतेक लिखाण इंग्रजीतच आहे. त्यांच्या लेखणीला वादविवादाची धार होती. सरकारी नोकर म्हणून त्यांनी आपल्या जीवनाला सुरुवात केली आणि ते हळूहळू वर चढले. 'प्रपोज्ड रिफॉर्मस्' या आपल्या ग्रंथात त्यांनी 'महमदने शिकवलेल्या इस्लाम धर्माजवळ त्याच्या आजूबाजूला चाललेल्या सामाजिक आणि राजकीय क्रांत्यांना सामावून घेता येईल इतका लवचिकपणा आहे' असे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. राजकीय, सामाजिक किंवा नैतिक नाविन्याला कुराणाचा अडथळा होण्याचे कारण नाही असे ते म्हणाले. सय्यद मेहदी अली या दुसऱ्या एका नोकरशाहीतच असलेल्या आणि बंडाच्या काळात सरकारला एकनिष्ठ राहिल्याने बक्षीस म्हणून लहान जागेवरून मोठ्या जागेवर बढती झालेल्या लेखकाने, १९०६ मध्ये असे जाहीर केले की तुर्कस्तानच्या सुलतानाला हिंदी मुसलमानांचा खलिफा मानू नका. आपल्या 'इंडियन ॲन्ड इस्लामिक' या निबंधाच्या पुस्तकात खुदा बक्ष यांनी असे म्हणण्याचे फार मोठे धैर्य दाखवले आहे की, 'तेराशे वर्षांहून अधिक प्राचीन वंशपरंपरागत चालत आलेली धार्मिक किंवा सामाजिक पद्धती थोडासुद्धा बदल किंवा फेरफार न करता संपूर्णपणे तशीच्या तशी आजही स्विकारावी असा युक्तिवाद करणे म्हणजे केवळ स्तोम माजवणे आहे.' आपल्या या उपदेशाचा कदाचित् भलताच अर्थ केला जाईल अशी भीति वाटून त्यांनी मुसलमानांना इशारा दिला की, 'सध्या आपण आपल्या कार्यक्रमातून राजकारण वगळले पाहिजे.'

सुधारणेचा विचार करणारे बहुतेक सर्व मुसलमान लेखक साधारणपणे याच निर्णयाला आले. महमद शिबली नोमानी या प्रसिद्ध लेखकाने आपल्या धर्मबांधवांना असे सांगितले की, राजसत्तेशी इमानी रहाणे हे मुसलमानांचे धार्मिक कर्तव्य आहे. चिराग अली आणि मेहदी अलींची हीच वृत्ती होती. इस्लामच्या विचारात गढलेल्या आणि प्रामुख्याने इस्लामवर लिहिणाऱ्या या लेखकांनी मुसलमानांत राजकीय विचार पसरवण्यात कसलाच हातभार लावला नाही. युरोपियन सुधारणेत पूर्णपणे मुरलेल्या अमीर अलीसारख्यांनीसुद्धा स्वतःला इस्लामच्या अभ्यासापुरते मर्यादित ठेवले होते. अमीर अलींनी प्राचीन व उदात्त मुस्लिम अरब सुधारणेचा प्रतिभाशाली इतिहास लिहिला आणि त्याच्या पुन्हा पुन्हा आवृत्या निघाल्या. त्यांच्या ग्रंथातील हिंदू धर्मावरील भाग हिंदू धर्माला गौण लेखणारा आहे. महम्मद इक्बाल या नामांकित उर्दू कवीनेही आपल्या उत्क्रांतिवादी तत्त्वज्ञानाला गुंडाळून ठेवले आणि 'इस्लामला उल्लंघिता न येणारी अशी सामाजिक पद्धति म्हणून चिरंतन तत्त्वज्ञानाचा अखेरचा शब्द म्हणून फार महत्त्व दिले.' जेव्हा काँग्रेस पुढारी लोकसत्तावाद, धर्मनिरपेक्ष

नीतिवाद आणि राजकारण याविषयी बोलत होते तेव्हा इतरांप्रमाणेच त्याने इस्लाम धर्मावर व्याख्याने दिली. मुसलमान म्हणून या लोकांनी इस्लामबद्दल उत्साह बाळगणे ठीक होते, पण कुराणानी राजकारणावर बंदी घातली नाही हे माहित असूनसुद्धा, आणि कुराणाच्या पलिकडे जाण्यास त्यांची मने त्यांना ठामपणे प्रेरणा देत असूनसुद्धा, जणू काही एकाद्या उच्च आज्ञेचा आपण अवलंब करीत आहोत या समजुतीने त्यांनी राजकारण मोठ्या कटाक्षाने टाळले.

यांच्यापैकी सर्वात महत्त्वाचे आणि अनेक वर्षे मुस्लिम लीगचे पुढारीपण केलेले आगाखानसुद्धा राजकारण आणि धर्म यांची फारकत करू शकले नव्हते. या सर्वांच्या दृष्टीने अलिगड येथील मुस्लिम विद्यापिठाची स्थापना ही सुद्धा 'इस्लामचा ऱ्हास रोखू' शकणारी एक धार्मिक घटना होती.

धर्म आणि थोड्याशा जातीय राजकारणावर संतुष्ट असलेले आणि मुसलमानांचे नेतृत्व करीत असलेले अलिगड विद्यापीठ शांततामय अस्तित्व उपभोगीत होते. परंतु १९०९ मध्ये एका राजकियेतर घटनेने त्याला संयुक्त प्रांताच्या लेफ्टनंट गव्हर्नरबरोबर एका वादविवादात ओढले. या वादविवादात विद्यापिठाबद्दल तुच्छता बुद्धी दर्शवली गेली आणि त्याचा ताल बिघडला. लेफ्टनंट गव्हर्नर सर जॉन ह्यएट यांनी २२ फेब्रुवारीला विद्यापिठाला भेट दिली असताना विद्यापिठाच्या विश्वतांनी त्याला मानपत्र दिले. त्यावेळी केलेल्या भाषणात त्याने, प्रत्येक वर्गात साठपेक्षा अधिक विद्यार्थी नसावेत व शिक्षकांना सर्वसाधारणपणे चारपेक्षा अधिक तास नसावेत असे आपले मत प्रदर्शित केले. त्यावेळी विद्यापिठाचे सेक्रेटरी असलेल्या नबाव वाकर-उल्-मुल्क यांनी आपल्या प्राचार्यांकडे वेळापत्रकाची मागणी केली. नबाबाच्या या मागणीचा अर्थ राजकारणी प्राचार्यांनी, आपल्या कामात ढवळाढवळ असा लावला. आणि त्या मागणीप्रमाणे वेळापत्रक पाठवण्याऐवजी राजीनामा पाठवून दिला. त्याची एक प्रत विद्यापिठाचा 'पेट्रन' असलेल्या लेफ्टनंट गव्हर्नरकडे पाठवून दिली. नंतर आपले म्हणणे व्यक्तिशः त्याच्यापुढे मांडण्यासाठी तो लखनौला गेला. नबाब वाकर-उल्-मुल्क यांनाही 'पेट्रन' ने लखनौला पाचारण केले, आणि त्याने आपल्या लेफ्टनंट गव्हर्नरच्या अधिकारात त्यांना प्राचार्यांनी केलेल्या काही तक्रारींचा जाब विचारला. दोनही बाजू ऐकून घेतल्यानंतर ह्यएटने प्राचार्यांची बाजू उचलून धरली आणि दिलेल्या निर्णयावर नबाबाला आपली सही करण्यास सांगितले.

मुसलमानांचा स्वाभिमान डिवचला गेला आणि त्यांची आंदोलन वृत्ती जागृत झाली. विश्वस्तांनी सभा भरवली व त्यात विद्यापिठाच्या कारभारात 'पेट्रन' म्हणून हस्तक्षेप करण्याचा लेफ्टनंट गव्हर्नरला काही अधिकार नाही असे प्रतिपादन केले. हिंदुस्तानातील अनेक शहरातून जाहीर सभेमध्ये मुसलमानांनी निषेधाचा आवाज उठवला, आणि त्या सभांची वृत्तांते लेफ्टनंट गव्हर्नरला पाठवली. राजनिष्ठ मुसलमानांनी पुढाऱ्यांकडून कधीही न अपेक्षिलेल्या निषेधाच्या निदर्शनानी त्याच्यातला

मुत्सद्दी नमला आणि त्याने स्वतःच सुचवल्याप्रमाणे एक शिष्टमंडळ त्याला भेटण्यास गेले आणि त्याने आपला हुकूम मागे घेतला. मुसलमानांमध्ये प्रथमच उद्‌भवलेल्या या संतप्त आंदोलनाचे कारण काय असावे याबद्दल त्याला आश्चर्य वाटले. हे नवे वातावरण मुस्लिम लीगने तयार केले होते का? होय. संघटना ही एक शक्तीच असते म्हणून त्याने, मुस्लिम लीगची मुख्य कचेरी अलिगडहून लखनौला आणण्यासाठी आगाखानांचे मन वळवले. ही एक स्वागतार्ह घटना होती कारण तिने मुस्लिम राजकारणांचे एका युरोपियन प्राचार्यांनी केलेले नेतृत्व संपुष्टात आणले.

लीगच्या राजकारणालाही आता नवे तजेलदार वळण लागले होते. १९१० च्या नागपूर येथे भरलेल्या लीगच्या अधिवेशनाने राष्ट्रीय ऐक्य आणि अपूर्व अशी राजकीय जागृती यांचे नवे युग निर्माण केले. मुसलमान पुढारी ब्रिटिश पालकत्वाच्या शृंखला तोडीत आहेत आणि काँग्रेसचा बरोबरी करण्यासाठी लांब लांब पावले टाकत आहेत असे दृश्य दृष्टीस पडू लागले. या बदलाची सुरुवात नागपूरचे कार्यकारी अध्यक्ष सय्यद नबिउल्ला यांनी आपल्या भाषणाने केली. त्यांनी नोकरशाहीवर हल्ला चढवला आणि सनदी अधिकारी बखेडे निर्माण करण्यास कारणीभूत आहेत अशी ग्वाही दिली. त्यांनी असे सुचवले की, हिंदुस्तानचा संरक्षण खर्च फारच जादा आहे आणि सरहद्दीवरील खडे सैन्य कमी करावे. लीगने हिंदू मुस्लिम ऐक्यासाठी आपला हात पुढे केला आणि तिच्याच आग्रहाने जानेवारी १९११ मध्ये दोन जमातींचे पुढारी विचार विनिमयासाठी एकत्र जमले. यातून फारसे काही निघाले नाही, पण पुढील सामोपचाराच्या बोलण्यासाठी पाया घातला गेला.

अँग्लो-मुस्लिम सहकार्य तोडण्याचा दैवाने जणू विडाच उचलला होता म्हणून की काय एकामागून एक अनेक गोष्टी मुसलमानांना प्रक्षुब्ध करण्यास पुढे आल्या. तरीसुद्धा, या घडामोडीतून राष्ट्रीय ऐक्याच्या उदयाची आशा करणे किंवा सिमल्यात सुरू झालेला खोडसाळपणा आता नष्ट होईल असा त्यांचा अर्थ करणे व्यर्थ होते. निधर्मी एकजुटीची इमारत फक्त लीगच्या विलिनीकरणावरच उभारणे शक्य होते. परंतु, जातीय संस्था म्हणून लीग कायम झाली होती आणि मुसलमानांची कैवारी म्हणून तिला भविष्य काळात सामर्थ्य प्राप्त होणार होते.

बंगालच्या फाळणीने राष्ट्रीयत्वाला जितकी तीव्रता आली होती तितकीच तीव्रता तिच्या १९११ मधील विसर्जनाने मुसलमानांच्या राजकारणाला आली. पूर्व बंगाल मुसलमानांच्या कल्याणाकरिता निर्माण केला आहे असे कर्झनने त्यांना पुन्हा पुन्हा सांगितले असताना त्याच्या विसर्जनाला ते स्वतःच आता कसे तयार होतील? आणि नवीन प्रांत अस्तित्वात येण्यासाठी हिंदू आणि मुसलमानांचे रक्त सांडले होते हे ते कसे विसरतील? फाळणीचे विसर्जन मुसलमानांच्या फायद्याचे ठरेल असा उपदेश आगाखानांनी केला असतानासुद्धा बहुतेक मुसलमान पुढाऱ्यांनी तो मुसलमान उद्दिष्टांवरचा एक मोठा आघात मानला. १९१२ च्या मार्चमध्ये कलकत्ता येथे

भरलेल्या लीगच्या अधिवेशनाचे अध्यक्ष नबाब सलीमुल्ला या विसर्जनाच्या घोषणेबद्दल खेद प्रदर्शित करीत असताना म्हणाले की, नवीन प्रांताने मुसलमानांना वस्तुत: काहीच फायदा झालेला नाही, उलट त्याने हिंदू मुसलमानात दरी निर्माण केली. फाळणी हा हिंदू मुसलमानांच्या मतभेदाचा परिणाम होय असे म्हणणे बरोबर नाही; खरे मतभेद ब्रिटिशांच्याविरूद्ध हिंदूंच्या क्रांतिकारक कार्यात हातमिळवणी करण्याचे मुसलमानांनी नाकारल्यामुळे निर्माण झाले, असे ते म्हणाले. सलोख्याची स्पष्ट इच्छा त्यांच्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त होत होती.

प्रकरण चौदावे

# हिंदुस्थानवर तुर्की छाया

राजकीय संस्था म्हणून मुस्लिम लीगची सुरवात आणि मध्यपूर्वेच्या मुसलमान देशातील काही अस्वस्थ करणाऱ्या घडामोडी या एकदम एकाचवेळी झाल्या.

तुर्की साम्राज्याचा सत्ताधीश आणि खलीफाचे अनन्य स्थान उपभोगणारा मुस्लिम सुलतान, दुसरा अब्दुल हमीद हा होता. ज्या मुसलमानांची निष्ठा मुख्यत्त्वेकरून, आपल्या राष्ट्रापेक्षा खलिफाला होती अशा जगातील सर्व मुसलमानांचा तो मानबिंदू होता. परदेशीय मुसलमानांची त्याच्या ठायी असलेली राजनिष्टा वादातीत होती परंतु त्याच्या स्वतःच्याच देशातील त्याची लोकप्रियता जलदीने कमी होत होती. सैन्याने त्याचे हुकूम पाळण्याचे नाकारल्यामुळे त्याला पदच्युत होण्याची सारखी भीति वाटत होती. १९०८ च्या जुलैमध्ये, राजा म्हणून रहावयाचे असेल तर, पश्चिम युरोपच्या राजकीय तत्त्वांचा पगडा असलेल्या क्रांतिकारक पण घटनात्मक पक्षाने, सुलतानाला काही अटी घातल्या जे लोक सुलतानच्या बेबंदशाहीने तुर्कस्तानातून हाकलले गेले होते, त्या लोकांचा या पक्षात भरणा होता; पण नवीन क्रांतिकारी उदयास आले आणि त्यांनी या जुलुमी, लाचलुचपतीच्या आणि अव्यवस्थित राज्य-कारभाराला उलथून पाडण्याची आणि त्याऐवजी आधुनिक उदारमतवादी राज्यपद्धती निर्माण करण्याची इच्छा बाळगली. सैन्यावरचा ताबाही नाहीसा झाला असे पाहून सुलतानला संकटाची जाणीव झाली आणि त्याने पार्लमेंटकरिता निवडणुकीचा हुकूम दिला. या जवळ जवळ रक्तहीन क्रांतीचे स्वागत, सुलतानच्या अमलाखाली असलेल्या ग्रीक, सर्ब, बुल्गेरियन, अल्बेनियन, आर्मेनियन अशा विविध राष्ट्रीय लोकांनी मोठ्या उत्साहाने केले. सुलतानचे सिंहासन शाबूत राहिले परंतु त्याला सत्तेवर ठेवणाऱ्या खलिफापदाला आता खिंडार पडले होते, हे उघड होते.

परंतु, जरी देशातली खरी हुकमत 'यंग टर्कस्' नावाने ओळखल्या जाणाऱ्या तरूण तुर्कांच्या ताब्यात आली होती तरी असंतोष धुमसतच राहिला. याचे कारण, स्वातंत्र्याच्या पायावर निरनिराळ्या जमातींना एकत्र आणण्यात तरूण तुर्क अयशस्वी झाले होते. हा असंतोष वाढत गेला आणि मॅसेडोनियामध्ये रहात असलेल्या आपल्या लोकांना दिल्या जात असलेल्या वागणुकीने बाल्कन राज्ये संतापली. इकडे इंग्लंडने इजिप्त व्यापण्यास सुरवात केली आणि इटालीने अनेक वर्षे पोसलेल्या आपल्या

* दहशहतवादी चळवळीबद्दलची माहिती सिडिशन कमिटीच्या १९१८ च्या रिपोर्टावर आधारित.

इच्छापूर्तीसाठी १९११ च्या सप्टेंबरमध्ये त्रिपोली ताब्यात घेण्यास सुरुवात केली. तुर्कस्तानचे तुकडे होण्यास निःसंशय सुरुवात झाली होती. त्रिपोलीच्या लढाईच्या वेळी तुर्कस्तान विरूद्ध एकजुटीची हालचाल करण्याच्या दृष्टीनें बाल्कन राज्यांनी संगनमत केले. 'मॅसेडोनियातील ख्रिश्चनांच्या अनन्वित छळामुळे, किंबहुना त्यांच्या कत्तलीत अनेक ग्रीक, बुल्गेरियन आणि सर्बियन लोकांचे प्राण गमावले होते, त्यामुळे त्यांच्या संतप्त राष्ट्रातील लोक आपल्या मॅसेडोनियनमधील बांधवांना मुक्त करण्याच्या इच्छेने भडकून उठले.' त्यामुळे, मॉन्टेनेग्रो, सर्बिया, बुल्गेरिया आणि ग्रीस या चार बाल्कन राज्यांनी, ऑक्टोबर १९१२ मध्ये तुर्कस्तानशी लढाई पुकारली आणि हां हां म्हणता नेत्रदीपक विजय संपादन केला. ३० मे १९१३ रोजी लंडनचा तह होऊन ही लढाई संपली. आणि त्याचा परिणाम म्हणून सुलतानच्या साम्राज्याचा युरोपातील विस्तार कमी झाला. परंतु त्याचे ऑटोमन साम्राज्य अजूनही विस्तारलेले होते त्यात एशिया मायनर, अर्मेनिया, मेसापोटेमिया, सिरीया, पॅलेस्टाईन आणि अरबस्तान. यांचा समावेश होता आणि त्याचा विस्तार सात लाख चौरस मैलाहून अधिक होता.

जर्मनीची महायुद्धाची तयारी चालू असतानाच या घटना घडल्या. आणि सहाजिकच, अपमानीत झालेल्या तुर्कस्तानात जर्मनीला एक विश्वासू दोस्त सापडला. तुर्की सरकार जर्मनीचा पक्षपाती बनला. तुर्की युद्धमंत्री हा पूर्वी बर्लिनमध्ये तुर्की वकिलातीत लष्करी प्रमुख होता. आणि त्याने जर्मनीच्या लष्करी वर्तुळाशी घनिष्ठ संबंध जोडले होते; तुर्की सैन्यात जर्मन अधिकाऱ्यांचा मोठा भरणा होता. तुर्कस्तानने जेव्हा दोन जर्मन लढाऊ जहाजांना बॉस्फोरसच्या सामुद्रधुनीतून जाण्याची परवानगी दिली, आणि त्या जहाजांनी काळ्या समुद्रात शिरून रशियाच्या बंदरावर हल्ला चढवला, तेव्हा तुर्कस्तानचे जर्मनीशी असलेले सलोख्याचे संबंध सिद्ध झाले. या घटनेमुळे १९१४ मध्ये रशिया, ब्रिटन आणि फ्रान्स यांनी तुर्कस्तानविरूद्ध युद्ध पुकारले. त्रिपोली आणि बाल्कन लढायांप्रमाणे हे युद्ध तुर्कस्तानवर लादले गेले नव्हते; उलट आपल्या शत्रुवर सूड उगवण्याची इच्छाच त्यात होती.

या घडामोडी, फाळणीचे विसर्जन आणि इतर गोष्टींवरून हिंदुस्तानातील मुसलमानांचा ब्रिटिशांविरूद्ध वाढलेला असंतोष ही एकदमच आली. त्यांनी अधिक उत्साही मुसलमानांना तुर्की राष्ट्रीय पुढाऱ्यांशी संबंध जोडण्याला प्रेरणा दिली. ब्रिटिशांच्या परराष्ट्रीय धोरणात इस्लामलाच शत्रुत्व दाखवले जाते असे बघण्यास त्यांना तुर्कीनी शिकवले. ब्रिटिशांच्या इजिप्त काबीज करण्यात, पर्शियासंबंधीच्या अँग्लो-फ्रेंच तहनाम्यात आणि इटालीच्या त्रिपोलीवरील आक्रमणात त्यांना इस्लामची ऐहिक शक्ती खच्ची करण्याचा सर्व ख्रिस्ती देशांचा डाव दिसला, आणि कर्मठ तत्त्वांवर विश्वास असणाऱ्यांना, अपरिहार्यपणे त्यात इस्लामचा अध्यात्मिक अधिकार खतम करण्याची शक्ती दिसली. जवाहरलाल नेहरूंच्या शब्दात सांगायचे म्हणजे, 'भारतीय मुसलमानांच्या अंतःकरणात तुर्कस्तानबद्दल सहानुभूतीची प्रचंड लाट

उसळली. ही सहानुभूती आणि काळजी खरोखर सर्व हिंदुस्तानला वाटली होती, परंतु मुसलमानांच्याबाबतीत ती तीव्र होती, आणि त्यांच्या अगदी जिव्हारी भिडली होती.' हिंदुस्तानात निधी जमवून कांही मुसलमान पुढारी स्वत: कॉन्स्टॅन्टिनोपलला गेले आणि त्यांनी तुर्की राष्ट्रवाद्यांशी वैयक्तिक संपर्क साधला.

या घटनांनी लीगची लंडन शाखा इतकी भारावून गेली की, तिने हिंदुस्तानातील मुसलमानांना आपली नशिबे हिंदूंच्या नशिबाशी बांधण्याची आणि हिंदी राष्ट्रीय कॉंग्रेसच्या ध्येयाशी एकरुप होण्याची विनंती केली. परंतु, मध्यपूर्वेतील घडामोडींनी मुसलमानांचा कॉंग्रेसबद्दलचा दृष्टिकोन बदलण्याची आवश्यकता आहे, या मताशी हिंदुस्तानातील प्रमुख पुढारी सहमत नव्हते. त्यापैकी सर्वात महत्त्वाचे आणि जे पुढे दहा वर्षांनी कॉंग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष झाले ते मौलाना महमद अली हे होते. लंडन शाखेच्या सूचनेवर त्यांची स्पष्ट टीका अशी होती : 'सरकारने बंगालची फाळणी रद्द केली म्हणून किंवा पर्शिया आणि तुर्कस्तान अडचणीत आहेत म्हणून कच्च्या डोक्याचे आणि काही स्वत:ची जाहिरात करणारे लोक, मुसलमानांनी कॉंग्रेसला मिळावे असे जिकडे तिकडे जाहीर करीत आहेत. या बेजबाबदार मूर्खपणाने आमची फक्त करमणूक होत आहे. पण त्रिपोली आणि पर्शियाचे मुसलमान, युरोपियनांच्या आक्रमणाचे बळी झाले आहेत म्हणून, अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या लंडन शाखेसारखी एकादी जबाबदार संस्था हिंदू मुसलमानांच्या घनिष्ट सहकार्याची भाषा बोलते म्हणून, आमची शहाणीसूर्ती सुज्ञ माणसेसुद्धा आपल्या विचार शक्ती स्वैर सोडतात आणि प्रश्नांची गल्लत करतात असा अनुभव आम्हाला प्रथमच येत आहे. परदेशी मुसलमानांच्या परिस्थितीशी हिंदी मुसलमानांचा काय संबंध आहे ? त्यांचे हितसंबंध हिंदूंच्या हितसंबंधांशी खरोखर विरोधक तरी आहेत किंवा त्यांच्या राजकीय वर्तनात नीचपणा आणि ढोंगीपणा तरी आहे. हिंदी परिस्थितीत काही बदल झाला आहे काय ?' १

तुर्की घडामोडीतून जन्माला आलेल्या आपल्या तुर्कस्तानच्या आदरात आणि ब्रिटिशांना विरोध करण्यात महम्मद अली हे कोणाला्ही हार गेले नाहीत. त्यांनी १९१२ मध्ये 'कॉमरेड' नावाचे एक इंग्रजी साप्ताहिक काढले. पूर्व बंगालची फाळणी रद्द झाल्यामुळे त्यांचा ब्रिटिशांवरचा विश्वास आधीच उडाला होता. बाल्कन लढायांनी त्यांच्या शत्रुत्वात जास्तच भर टाकली, आणि त्यांनी तुर्कस्तान आणि त्याची इस्लाम परंपरा यांच्या बाजूने, आपल्या वर्तमानपत्रात अतिशय भावनाभराने लिहिले. हळूहळू त्यांची ब्रिटिश विरोधी वृत्ती कडक बनली, आणि तुर्कस्तानने पहिल्या महायुद्धात केलेल्या प्रवेशाने त्या प्रवृत्तीची परिपूर्ती झाली. 'कॉमरेड' मधील 'तुर्कांची निवड' या लेखामुळे सरकारने ते पत्र बंद केले आणि त्याचा शेवट झाला. यानंतर लवकरच त्यांना अटक करण्यात आली आणि त्यांना युद्धकाळात आणि त्यानंतर एक वर्ष

१. महादेव देसाई यांच्या 'मौलाना आझाद', पृ. ३२ वरून उद्धृत.

स्थानबद्ध करून ठेवण्यात आले.

इतर अनेक मुसलमान पुढाऱ्यांनीसुद्धा या काळात जवळ जवळ पूर्णपणे तुर्कस्तानच्या ध्येयाला वाहिलेली साप्ताहिके काढली. या पुढाऱ्यांपैकी अबुल कलम आझाद हे फार महत्त्वाचे पुढारी होते. यानंतर कित्येक वर्षे ते कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. ते इस्लाम परंपरेत न्हाऊन माखून निघालेले असल्यामुळे आणि इजिप्त, तुर्कस्तान, सिरिया, पॅलेस्टाइन, इराक आणि इराण या देशातील अनेक प्रमुख मुसलमान पुढाऱ्यांशी त्यांचे वैयक्तिक संबंध असल्यामुळे, या देशातील राजकीय आणि सांस्कृतिक घडामोडींनी आझादांवर खोल परिणाम केला. त्यांच्या अल-हिलाल या साप्ताहिकात प्रसिद्ध झालेला मजकूर हिंदुस्तान सरकारने आक्षेपार्ह ठरवला. वर्तमानपत्राच्या कायद्याखाली त्यांच्याकडून जामीन मागितला गेला, आणि शेवटी १९१४ मध्ये तो छापखाना जप्त करण्यात आला. नंतर आझादांनी दुसरे साप्ताहिक सुरू केले परंतु १९१६ मध्ये जेव्हा सरकारने त्यांना स्थानबद्ध केले तेव्हा हे साप्ताहिक सुद्धा बंद झाले. ते जवळजवळ चार वर्षे अटकेत होते.

हिंदुस्तानच्या दहशतवादी चळवळीतही जर्मनी आणि तुर्कस्तानला बरेच दोस्त आढळले. जर्मनीच्या हातमिळवणीचे हिंदी लोकांना—हिंदू आणि मुसलमान दोघांनाही विशिष्ट आकर्षण वाटले. हरदयाळ या प्रसिद्ध हिंदी क्रांतिकारकांनी परदेशी मदत घेऊन हिंदुस्तानात प्रजासत्ताक राज्य स्थापन करण्याच्या हेतूने भारतीय क्रांतिकारक संघ नावाची संस्था सुरू केली. त्यांचे वास्तव्य ब्रिटन आणि अमेरिकेत होते तरी त्यांचे सर्व अनुयायी आणि सहकारी हिंदू होते आणि ते हिंदुस्तानात होते. आपल्या देशाच्या मुक्ततेसाठी तो एक अधिरतेने तळमळणारा आत्मा होता; महायुद्ध संपून बराच काळ लोटल्यानंतर, टाइम्स ऑफ इंडियाच्या २५ जुलै १९२५ च्या अंकात ज्याचा काही भाग उदधृत केला होता अशा त्यांच्या लाहोरच्या प्रतापला दिलेल्या लेखावरून, त्यांच्यावर हिंदू धर्माची बरीच छाप असलेली दिसते. त्या लेखात ते म्हणतात की : मी असे जाहीर करतो की, हिंदुस्तानच्या आणि पंजाबच्या हिंदू जमातीचे भवितव्य ह्या चार खांबावर अवलंबून आहे : (१) हिंदू संघटण; (२) हिंदू राज्य; (३) मुसलमानांची शुद्धी; (४) अफगाणिस्तान आणि सरहद्दी जिंकणे व तेथील लोकांची शद्धी ······ अफगाणिस्तान आणि आजुबाजूचे डोंगराळ प्रदेश हे पूर्वी हिदुस्तानचे भाग होते पण सध्या ते इस्लामच्या वर्चस्वाखाली आहेत ······ ज्याप्रमाणे नेपाळमध्ये हिंदू धर्म आहे त्याप्रमाणे अफगाणिस्तानात आणि सरहद्द प्रांतात हिंदू संस्था असल्याच पाहिजेत; नाहीतर स्वराज्य मिळवणे फोल ठरेल.

सुशिक्षित हिंदूंना त्यावेळी जर्मनीबद्दल बराच आदर निर्माण झाला होता; हिंदू धर्मग्रंथांकडे लक्ष पुरवले असलेला आणि हिंदुस्तानापेक्षाही अधिक आवडीने संस्कृतचा अभ्यास केलेला तो देश होता. याच्या उलट तुर्कस्तानला हिंदुस्तानातील मुसलमानांकडून आदरच नव्हे तर त्याच्या ध्येयासाठी पूर्ण अनुयायीत्वही लाभले. जेव्हा

१९१४ च्या सुमारास भारतीय मुसलमानांना ब्रिटिशांविरूद्ध चिथावण्यासाठी, कॉन्स्टॅन्टिनोपलमध्ये जहान-इ-इस्लाम (मुसलमानी जग) नावाचे नियतकालीक सुरू झाले, तेव्हा त्याचा अरेबिक. उर्दू आणि हिंदी लेख असलेला विभाग तयार करण्यास अबू सय्यद नावाचे पंजाबी मुसलमान गृहस्थ स्वतःच पुढे सरसावले. या नियतकालिकाच्या प्रती लाहोर आणि कलकत्त्यामध्ये सर्रास मिळत होत्या.

महायुद्ध सुरू होण्यापूर्वी, जर्मनीप्रमाणेच तुर्कस्तानही ब्रिटिश साम्राज्यामध्ये आपल्या प्रभावाचे स्तंभ उभारीत होता. १९१३ मध्ये अहमद मौला दाऊद या रंगूनमधील एका व्यापाऱ्याला रंगूनमधील तुर्की कौन्सिलच्या अधिकाराची जागा देऊ केली. त्याने तिचा स्वीकार केला, आणि युद्ध सुरू होण्याच्या सुमारास तो त्या जागेवर रुजू झाला. १९१४ डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात कासीम मन्सूर या गुजराथी मुसलमानाने आपल्या रंगूनमधील मुलाला एक पत्र पाठवले. या पत्राबरोबर, सिंगापूरमधील दोन पलटणींपैकी मलाया स्टेटस् गाईड या पलटणीने, आपण ब्रिटिश सरकारविरूद्ध बंड करण्यास तयार आहोत अशी माहिती पुरवणारे एक पत्र, तुर्की कौन्सिलर दाऊद याला पाठवले. हे पत्र ब्रिटिश अधिकाऱ्यांनी पकडले, आणि मलाया स्टेटस् गाईडची दुसऱ्या ठिकाणी बदली केली. तरीसुद्धा, ठरल्याप्रमाणे, मलाया स्टेटस् गाईडमध्ये नसले तरी सिंगापूरच्या फिफ्थ लाईट इन्फन्ट्रीमध्ये बंड झाले. फिफ्थ लाईट इन्फन्ट्री ही पूर्णपणे मुसलमानांची पलटण होती, आणि त्यातील बरेचसे मुसलमान भारतीय होते. ती हाँगकाँगला रवाना व्हावयाची होती. गलबते तयार होती. आणि अलेक्झान्ड्रा बरॅक्समधून पलटणीचा दारुगोळा लॉरीमध्ये भरला जात होता. इतक्यात एक बार. उडवला गेला आणि ताबडतोब दंगा उसळला. ज्यांनी ब्रिटिशांशी राजनिष्ठतेचे लक्षण दाखवले ते ठार केले गेले. बंडवाले तीन गटात विभागले होते; प्रत्येक गटावर महत्त्वाची कामगिरी सोपवण्यात आली होती. अमानुष कत्तल झाली. अनेक ब्रिटिश अधिकारी आणि काही थोडे जर्मन मारले गेले. मुंबईची बलुचांची तेरावी पलटण ही बंडापासून थोडक्यात बचावलेली दुसरी पलटण. याचे दोनशे बलुची लष्करी कोर्टापुढे खेचले गेले. ऑक्टोबर १९१५ मध्ये रंगूनच्या मुस्लिम गदर पक्षाने बकरी ईदच्या सणाच्याप्रसंगी 'गाई आणि मेंढराऐवजी' इंग्रज मारण्याच्या उठावाची योजना आखली. पण हा उठाव पुढे ढकलण्यात आला. बाल्कन लढाईत तुर्की सैन्याला वैद्यकीय मदत पुरवण्यासाठी रेड क्रेसंट सोसायटीचे सभासद म्हणून गेलेल्या मुसलमानांनी हा पक्ष बनवला होता. तुर्कस्तानने युद्धात प्रवेश केल्यानंतर ते परत आले आणि रंगूनमध्ये वसाहत करून राहिले.

फेब्रुवारी १९१५ मध्ये लाहोरच्या पंधरा मुसलमान विद्यार्थ्यांनी कॉलेज सोडले आणि, ते एकेकाळी वहाबींची वसाहत असलेल्या सरहद्द वसाहतीत रहात असलेल्या मुजाहिदीन बंडखोरांना जाऊन मिळाले. देशातील निरनिराळ्या भागातील मुसलमानांनी त्यांचे अनुकरण केले. त्या सर्वात धर्मांतर केलेला शीख, ओबिदुल्ला आणि

महम्मद मैन अन्सारी हे प्रमुख होते. त्यांनी हेज्जारमधील काही मदतनिसांशी संपर्क साधला. आणि त्यावेळचा हे जारचा लष्करी गव्हर्नर गालीबपाशा याच्या हातून जेहादाचा जाहीरनामा मिळवून अन्सारी १९१६ मध्ये परत आला. या गालीबनामा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दस्तऐवजाच्या प्रती येताना त्याने हिंदुस्तान व सरहद्द टोळ्या या दोनही ठिकाणी वाटल्या.

अशा प्रकारे, महायुद्धाच्या काळात, परदेशी वास्तव्य करणाऱ्या भारतीय मुसलमानांनी, हिंदूप्रमाणेच ब्रिटिश विरोधाच्याबाबतीत क्रांतिकारक चळवळीत भाग घेतला. कारण काहीही असो, पण जेथे जेथे तुर्कस्तान कुठल्या ना कुठल्या तरी रुपाने डोळ्यासमोर होता, तेथे तेथे ते कार्यशील होते. परंतु, खुद्द हिंदुस्तानात मात्र क्रांतिकारक चळवळीत ते अभावानेच तळपत होते.

उत्साहाच्या या नव्या लाटेने मवाळ मुस्लिम पुढाऱ्यांनाही वगळले नाही, आणि जरी अनेक मुसलमान व्यक्तीइतकी मुस्लिम लीग पुढे गेली नाही तरी, आपल्या १९१३ च्या अधिवेशनाच्यावेळी तिने आपले रूपांतर राजकीय संस्थेत केले. 'हिंदी लोकांमध्ये ब्रिटिश राजाबद्दल निष्ठा वाढवणे; मुसलमानांच्या हक्कांचे संरक्षण करणे; आणि या उद्देशांना बाध येणार नाही अशी हिंदुस्तानला योग्य अशी स्वराज्याची पद्धती आणणे हे, यानंतर तिचे उद्देश बनले.' या अधिवेशनाच्या मुख्य ठरावात, राष्ट्रीय प्रगतीच्या कार्यासाठी हिंदू मुसलमानांच्या हातमिळवणीच्या आवश्यकतेवर भर दिला गेला. या हालचालीला काँग्रेसने मोठ्या आनंदाने प्रतिसाद दिला, आणि काही काँग्रेस पुढारी लीगच्या अधिवेशनाला हजर राहिले. लीगने ठरावात म्हटले होते त्यापेक्षा पुढचे पाऊल उचलले पाहिजे अशी, वाफेने झाकण उडावे प्रमाणे अनेक मुसलमान पुढाऱ्यांनी अधिवेशनाला विनंती केली. 'ब्रिटिश सत्तेशी इमानीपणा राखणे मुसलमानांचे धार्मिक कर्तव्य आहे' असे १९०८ मध्ये सांगणाऱ्या शिबली नोमानीने लीगच्या नवीन घटनेतील 'हिंदुस्तानला योग्य' या शब्दाची टिंगल करणाऱ्या कविता म्हटल्या.

लीगचा वाढता पसारा आणि तिचे काँग्रेसच्या मार्गाने जाणे यामुळे तिला आगाखानांचे कायमचे अध्यक्ष म्हणून आणि देणगीदार म्हणून सहकार्य मिळणे अशक्य झाले, आणि १९१३ नंतर त्यांनी तिच्यातून आपले अंग काढून घेतले. १९१४ मध्ये लीगचे अधिवेशन भरले नाही, पण पुढच्याच वर्षी तिने आपले कार्य परत सुरू केले आणि तिने, महम्मद अली जीनांच्या ठरावान्वये 'इतर जमातींशी विचार विनिमय करून राजकीय सुधारणेची योजना तयार करण्यासाठी' एक समिती नेमली. आता काँग्रेस आणि लीग आपली वार्षिक अधिवेशने एकदम आणि एकाच ठिकाणी भरवू लागले, आणि बरेचवेळा एका अधिवेशनाचे प्रतिनिधी दुसऱ्या अधिवेशनाला हजर राहू लागले.

सर सय्यद आणि अलिगड आता संपले. तुर्कस्तानचा सुलतान आणि त्याची

खिलाफत याविरुद्ध ब्रिटिश सत्तेशी एकनिष्ठता या त्यांच्या दृष्टिकोनाचीही समाप्ती झाली. लीगच्या १९१५ च्या अधिवेशनाचे अध्यक्ष मझहूर-उल्-हक् यांनी खेदाने असे उद्गार काढले होते की 'आमच्या खलिफा सरकारचे आमच्या सार्वभौम राज्याच्या सरकारबरोबर युद्ध सुरू असावे ही गोष्ट आम्हाला तापदायक वाटते. आपले धर्मबांधव ब्रिटिश साम्राज्याच्या शिपायांच्या खांद्याला खांदा लाऊन लढत आहेत असे दृश्य दिसले असते तर आपणा सर्वांना किती आनंद झाला असता! या युद्धात मुसलमानी राज्यांनी स्वीकारलेल्या धोरणाबद्दल कुणाचे काहीही मत असो, मुसलमानी सरकारे आणि ब्रिटिश यांचे वैर असावे अशी इच्छा हिंदी मुसलमानांनी कधीच केली नव्हती, आणि ती तशी कधी असणारही नाही. हे शत्रुत्व निर्माण व्हावे हे मुसलमानांचे सर्वात मोठे दुर्दैव आहे. इस्लामच्या अनुयायांची अंतरीची इच्छा अशी आहे की, जेव्हा शांतता प्रस्थापित होईल तेव्हा,— आणि परमेश्वर कृपेने ती लवकरच होवो— मुस्लिम देशांच्या प्रतिष्ठेला धक्का बसणार नाही अशा तऱ्हेची वर्तणूक त्यांना दिली जाईल अशा तऱ्हेचा निर्णय घेतला जावा.'

'तुर्कस्तानशी, दोस्तीहीन धोरण चालू ठेवण्याची पाळी आली' तरीसुद्धा आपण हिंदुस्तानच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांशी एकनिष्ठ राहिले पाहिजे हा सर सय्यद यांचा उपदेश आणि ह्या प्रार्थना आणि भावना यांची तुलना करावी. अलिकडेच, १९०६ मध्ये सय्यद मेहदी अली (मोहसिन्-उल्-मुल्क) यांनी असे जाहीर केले होते की तुर्कस्तानच्या सुलतानला हिंदी मुसलमानांचा खलिफा म्हणून समजू नये, आणि ब्रिटिशांबाबत त्यांची धर्मवत निष्ठा असावी असे बजावून सांगितले.

अनेक हिंदू आणि मुस्लिमेतर लोकांची तुर्कस्तानकडे पहाण्याची भावना अशीच सहानुभूतीची होती, पण मुसलमानांपेक्षा त्यांचा दृष्टिकोन निराळा होता.' पहिल्या लोकांची सहानभूती ही एका संकटात असलेल्या परदेशी सरकारबद्दलची सहानभूती होती; तर मुसलमानांना तो एक धार्मिक कर्तव्याचा भाग आणि आंतरराष्ट्रीय इस्लामी प्रेरणेचा अविष्कार वाटत होता. जवाहरलाल नेहरूंनी म्हटल्याप्रमाणे अशा मुसलमानांनी 'आपल्या राष्ट्रियत्वाची मुळे दुसरीकडे कुठेतरी शोधली.' काही अशी त्यांना ती हिंदुस्तानच्या अफगाण आणि मोंगलकालीन इतिहासात सापडली. परंतु एवढे पुरेसे नव्हते. आपल्या सांस्कृतिक मुळाच्या शोधासाठी, मध्यम वर्गापैकी काही हिंदी मुसलमानांना, मुसलमानी इतिहासाकडे आणि बगदाद, स्पेन, कॉन्स्टॅन्टिनोपल मध्य आशिया आणि इतर देशात इस्लाम जेव्हा नेता आणि निर्माता म्हणून सामर्थ्यवान होता त्या काळाकडे नेले. हिंदुस्तानातील मोंगल सम्राटांनी हिंदुस्तानच्याबाहेर कुणाला दैवी किंवा खलिफा म्हणून श्रेष्ठ मानले नव्हते. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला जेव्हा मोंगल सत्ता कोलमडली, तेव्हा हिंदी मशिदीत तुर्कस्तानच्या सुलतानचा उल्लेख सुरु झाला. ही पद्धती बंडानंतर कायम राहिली.

२. जवाहरलाल पहिली आवृत्ती, पानं ४०८–४०९ वरून.

धार्मिक पार्श्वभूमी असलेल्या वहाबींच्या चळवळीने खिलाफतीवरील निष्ठेला पुनरुज्जीवन दिले. वहाबीनंतरच्या मुसलमानी राजकारणात अलिगड पंथाची चलती असताना, पुन्हा एकदा खिलाफतीचे वर्चस्व उखडले गेले. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात, मुसलमानांच्या ब्रिटिश विरोधीवृत्तीने तिचे पुन्हा एकदा पुनरुज्जीवन केले. खिलाफत आणि राजकारण यांचे ते एक विलक्षण मिश्रण होते.

प्रकरण पंधरावे

# हिंदु मुस्लिम ऐक्य

आता कॉंग्रेस आणि मुस्लिम लीग हे बंधुभावासारखे वागत होते. आपापल्या वार्षिक अधिवेशनात दोघांनी आपली निष्ठा ब्रिटिशानाच दिली पण दोघांनीही हिंदुस्तानात लोकसत्ताक संस्थांच्या वाढीची मागणी केली. आता बहुतेक सुशिक्षित मुसलमान लीगबरोबर होते, परंतु, कॉंग्रेसने आपले स्वरूप कटाक्षाने निधर्मी राखले होते, आणि अजूनही तिच्या अधिवेशनाला काही मुसलमान प्रतिनिधी हजर रहात होते. ज्यावर्षी (१९१३ मध्ये) निश्चितपणे आपले पाय जास्त व्यापक मार्गावर रोवले त्याचवर्षी कॉंग्रेस अधिवेशनाचे अध्यक्षपद नबाब सय्यद महम्मद या मुसलमान गृहस्थांकडे होते. ते जमीनदार आणि खानबहाद्दूर होते, आणि सतरा वर्षे प्रांतिक आणि वरिष्ठ कायदेमंडळाचे सभासद होते. १८९४ पासून ते कॉंग्रेसला हजर रहात असत. कॉंग्रेसला नियमित हजर रहाणाऱ्या प्रतिनिधींपैकी पाकिस्तानचे निर्माते महम्मद अली जीना हे एक होते. त्यांना मुस्लिम लीगबद्दल स्नेहभाव होता आणि जेथे मुसलमानांचा संबंध असेल त्या कार्यात मुस्लिम लीगच यश मिळवू शकेल या तिच्या दाव्याचा त्यांनी इन्कार केला नाही

१९१६ मध्ये अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटी आणि मुस्लिम लीगचे प्रतिनिधी कलकत्याला एकत्र जमले आणि त्यांनी कायदेमंडळातील मुसलमान प्रतिनिधीत्व आणि मागावयाच्या प्रातिनिधिक सरकारचे स्वरुप या प्रश्नावर चर्चा केली. त्यांनी काही तात्पुरते निर्णय घेतले. हे निर्णय कॉंग्रेस व लीगच्या मंजुरीकरिता त्यांच्या डिसेंबरच्या वार्षिक अधिवेशनापुढे ठेवण्यात आले. दोनही अधिवेशने लखनौ येथे एकदमच भरली. त्यांच्या सभात संपूर्ण एकजूट आणि सलोख्याची वृत्ती होती. ही वृत्ती हिंदू मुसलमानांच्या एक राजकीय तत्त्वावर आधारलेली नव्हती तर दोन स्वतंत्र जमातींच्या मान्यतेवर आधारलेली होती. या पायावर घटनात्मक सुधारणांची संयुक्त मागणी ब्रिटिशांसमोर ठेवावी असा त्यांचा बेत होता. कॉंग्रेस आणि लीगने जातीय प्रतिनिधित्वाची आणि घटनात्मक सुधारणांची एक योजना आखली आणि ती आपल्या अधिवेशनात संमत करून घेतली. ही योजना १९१६ चा लखनौ करार म्हणून ओळखली जाते, आणि तिने हिंदुस्तानच्या राजकीय इतिहासात एक नवे पान उघडले.

या कराराचे दोन भाग होते. एक मुसलमान प्रश्नासंबंधी व दुसरा सुधारणेसंबंधी. पहिल्या भागात असे स्पष्ट मांडले होते की :

महत्त्वाच्या अल्पसंख्यकांना निवडणुकीने पुरेसे प्रतिनिधित्व मिळण्यासाठी तरतूद असावी. मुसलमानांना खास मतदार संघ असावेत. या मतदार संघातून प्रांतिक विधीमंडळात निवडलेल्या मुसलमान प्रतिनिधींचे प्रमाण पुढीलप्रमाणे असावे :—

पंजाब : एकंदर निवडून आलेल्या हिंदी सभासदांच्या निम्मे.
संयुक्त प्रांत : एकंदर निवडून आलेल्या हिंदी सभासदांच्या ३० टक्के.
बंगाल : एकंदर निवडून आलेल्या हिंदी सभासदांच्या ४० टक्के.
बिहार : एकंदर निवडून आलेल्या हिंदी सभासदांच्या २५ टक्के.
मध्यप्रांत : एकंदर निवडून आलेल्या हिंदी सभासदांच्या १५ टक्के.
मद्रास : एकंदर निवडून आलेल्या हिंदी सभासदांच्या १५ टक्के.
मुंबई : एकंदर निवडून आलेल्या सभासदांपैकी एक तृतियांश.

यात अशी तरतूद होती की राखीव आणि खास हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मतदार संघाखेरीज वरिष्ठ किंवा प्रांतिक कायदेमंडळाच्या दुसऱ्या कुठल्याही निवडणुकीत मुसलमानांनी भाग घेता कामा नये.

आणखी अशी एक तरतूद होती की ज्या प्रश्नाचा निर्णय, संबंधित कायदेमंडळातील त्या त्या जमातींच्या सभासदांनी घ्यावयाचा असेल त्यासंबंधी कुठल्याही एका जमातीवर परिणाम करणारा ठराव, बील किंवा त्याचे एकादे कलम एकाद्या बिनसरकारी सभासदाकडून मांडले गेल्यास संबंधित वरिष्ठ किंवा प्रांतिक कायदेमंडळातील त्या जमातीच्या तीन–चतुर्थांश सभासदांनी त्या ठरावाला, बिलाला किंवा त्याच्या एकाद्या कलमाला जर विरोध केला तर ते पुढे चालू ठेवले जाणार नाही.

दुसऱ्या भागात अशी मागणी केली होती की, साम्राज्याच्या पुनर्रचनेत, हिंदुस्तानचा परतंत्र देश म्हणून असलेला दर्जा बदलून, त्याला वसाहतीच्या स्वराज्याचा, साम्राज्यातील समान भागिदारांचा दर्जा मिळावा. प्रांतिक कायदेमंडळांच्या सभासदांची संख्या चार–पंचमांश निवडलेली आणि एक–पंचमांश नेमलेली असावी. हे सभासद शक्य तितक्या व्यापक मतदानाचे अधिकार मिळतील अशा लोकांनी प्रत्यक्षपणे निवडलेले असावेत.

याबाबतीत कॉंग्रेस आणि मुस्लिम लीग यांचे संपूर्णपणे एकमत होते. १९१६ च्या लीगच्या अधिवेशनाचे अध्यक्ष महम्मद अली जीना यांनी आपल्या भाषणात हिंदी प्रश्नाचा गोषवारा असा सांगितला : 'थोडक्यात आम्हाला फक्त ब्रिटिश पार्लमेंटला सर्वस्वी जबाबदार असलेली ब्रिटिश अधिकाऱ्यांची अत्यंत प्रबळ आणि कार्यक्षम अशी नोकरशाही लाभलेली आहे. एक प्रकारच्या सत्प्रवृत्त हुकूमशाहीवृत्तीने ही नोकरशाही आपल्या स्वातंत्र्याची पूर्ण जाणीव झालेल्या जनतेवर राज्य करीत आहे. एका शब्दात सांगायचे तर हिंदी प्रश्नाचे स्वरुप हे असे आहे. या प्रश्नावर तप्तर शांततापूर्ण आणि शाश्वत अशी उपाय योजना करण्याचे कार्य आज ब्रिटिश मुत्सद्यापुढे आहे.'

परंतु. जीनांनी याच भाषणात पंचवीस वर्षानंतर त्यांनी जो राजकीय हमला

उभारला त्याचा कोनशिला ठरतील असे अर्थपूर्ण उद्गार काढले : 'विविध जातींमधून निर्माण झालेले, अनेक संस्कृतीचे वारसदार, आणि अनेक धार्मिक पंथ सांगणारे ३१ कोटी ५० लक्ष लोक या खंडप्राय देशात रहात आहेत. एकाच भौगोलिक आणि राजकीय परिस्थितीत फेकला गेलेला हा मानवांचा विशाल समूह अजूनही बौद्धिक आणि नैतिक वाढीच्या निरनिराळ्या पातळीवर वावरत आहे. थोडक्यात म्हणजे त्यांचा दृष्टिकोन, उद्देश आणि प्रयत्न यात फार मोठी विविधता आहे.' तरीसुद्धा, स्वराज्याकरिता आपली योग्यता पटवून देण्याचा हिंदी लोकांचा निश्चय आहे यावर त्यांनी भर दिला. आजचे हिंदू मुस्लिम ऐक्य हे एकसंघ भारताच्या जन्माचे प्रतीक आहे आणि हिंदू व मुसलमानांची राजकीय उद्दिष्टें एकच आहेत असे त्यांनी मानले. आपला स्वतंत्र खलिफा निवडण्याच्या मुसलमानांच्या हक्कावर भर देण्यास ते विसरले नाहीत. खुद्द आपण आणि मुस्लिम लीगचे इतर पुढारी हिंदुस्तानच्या सात कोटी मुसलमानांचे निवडलेले पुढारी आहोत असा त्यांचा दावा होता.

लीगचे पुढच्या वर्षाचे अध्यक्ष, महम्मुदाबादचे राजे, यांनी राजकारण आणि इस्लाम धर्म यांची सर मिसळ करून जवळ जवळ याच भाषणाची री ओढली. ते म्हणाले, 'देशाचे हित हे सर्वश्रेष्ठ आहे. आपण प्रथम मुसलमान आहोत की, प्रथम हिंदी आहोत हा वादविवाद करण्यासाठी खोळंबून रहाण्याचे कारण नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, आपण दोन्हीही आहोत. आणि प्रथम कोण हा प्रश्न निरर्थक आहे. जितकी धर्माकरिता तितकीच आपल्या देशाकरिता त्यागाची वृत्ती लीगने मुसलमानांच्या मनात बिंबवली आहे.'

लखनौ करार आणि मुसलमानांची नवी प्रवृत्ती यामुळे हिंदु-मुसलमानांच्या राजकीय पुढाऱ्यात स्नेहभावना अस्तित्वात येत असताना देखील, हिंदुस्तानात एक राजकीय तत्त्वाचा समाज निर्माण होईल, अशी शक्यता असलेल्या कुठल्याही घडामोडी चालू देण्यास जातीय मुसलमान तयार नव्हते. लखनौ कराराने मुस्लिम अल्पसंख्य प्रांतात त्यांना प्रमाणापेक्षा फारच जादा प्रतिनिधित्व दिले होते. परंतु या करारानुसार बंगालच्या बहुसंख्य मुस्लिम प्रांतात त्यांना दिलेल्या जागा चवदा टक्क्यांनी कमी होत्या. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी आणि काही मुसलमानांनी दाखवून दिल्याप्रमाणे हा बंगाली मुसलमानांवर धडधडीत अन्याय होता. तेव्हा हिंदुस्तान सरकारने, लखनौ कराराचे तत्त्व मान्य करूनसुद्धा लंडनशी बातचीत केली आणि बंगाल प्रांतातील मुसलमानांच्या जागा वाढवल्या. पंजाबच्याबाबतीतही प्रातिनिधिक नऊ-दशांश जागा मुसलमानांना मिळालेल्या असूनसुद्धा, भविष्यकाळी तक्रारीला वाव मिळेल अशी शक्यता या करारात होती. दुसऱ्या बाजूने, मुसलमान अल्पसंख्य प्रांतात कराराने मुसलमानांच्या जागांचे पारडे जड केले असल्यामुळे पुष्कळ हिंदूंचा तिळपापड उडाला आणि त्यांनी आपला निषेध व्यक्त करण्यासाठी हिंदू महासभेला आपले व्यासपीठ

बनवले. परंतु मुस्लिम लीगच्या मानाने हिंदू महासभेपुढे एक फार मोठी अडचण उभी होती. मुसलमानांची एकमेव प्रातिनिधिक संस्था म्हणून काँग्रेसने लीगला तात्त्विक मान्यता दिली असल्यामुळे खुद्द काँग्रेस ही प्रत्यक्षात जातीयवादी संस्था बनली. धर्मनिरपेक्ष संस्था असा शिक्का मिळवून घेण्यासाठी काँग्रेसने विशेष काही केले होते असे नव्हे. परंतु लखनौ करारानंतर ही वस्तुस्थिती तिच्या नशिबी आली, यामुळे मुसलमानांच्या जातीयवादाला विरोधी म्हणून हिंदू महासभा वाढली नाही. आणि बहुसंख्य हिंदूंची प्रतिनिधी म्हणून काँग्रेसच त्यांचे प्रतिनिधित्व करीत राहिली

१९०९ चा हिंदी कायदेमंडळासंबंधीचा कायदा आणि १९०९ चा हिंदुस्तान सरकारचा कायदा या दरम्यानच्या दहा वर्षांच्या काळात हिंदुस्तानात इतक्या धक्का देणाऱ्या घटना घडल्या की, दिल्ली आणि लंडनला ऐन पहिल्या महायुद्धाच्या काळात-सुद्धा हिंदी प्रश्नाकडे लक्ष देणे भाग पडले.

या सुमारास, देशाच्या बऱ्याच भागात दहशतवादी पसरले होते आणि १९०९ च्या सुधारणा झाल्या तरीही प्रत्येक वर्षी कटामागून कट, अधिकाऱ्यांचे खून आणि इतर हिंसात्मक प्रकारांचे उठाव होत होते. हिंदू मुसलमानांची एकता आणि मुस्लिम लीगचा राजकारणात पडण्याचा निश्चय यामुळे, मुसलमान राजकारणापासून अलिप्त राहतील ही मिंटोची आशा नष्ट झाली होती. युरोप, अमेरिका, मध्य आशियामधील आणि अतिपूर्वेकडील हिंदी लोक क्रांतिकारी बनले होते, (यात काही मुसलमानही होते), आणि हिंदी चळवळीला आपली मदत म्हणून ब्रिटिशांच्या शत्रूशी दोस्ती करीत होते. लखनौ करारानंतर ताबडतोबच एक टिळकांची आणि एक ॲनी बेझंट यांची अशा दोन होमरूल लीग स्थापन झाल्या होत्या, आणि त्यांनी स्वराज्याचा प्रचार सुरू केला होता. या दोन संस्थांचे प्रवक्ते ब्रिटिश सत्तेचा निषेध आणि जबाबदार राज्यपद्धतीची मागणी करण्यास लोकांना प्रवृत्त करीत होते. काँग्रेस आणि मुस्लिम लीग लखनौ करारात अंतर्भूत असलेल्या मागण्यांची पुन्हा पुन्हा मागणी करीत होते तुर्कस्तानचा उतरता तारा हिंदी मुसलमानात काळजी निर्माण करीत होता, आणि मुसलमानी जगाचा बादशहा रहात असलेल्या देशाला ब्रिटिश मानहानीची वागणूक देतील यामुळे ते भयभीत झाले होते. ही भीति लीगच्या सभांमधूनही व्यक्त केली जात होती; ब्रिटिश अधिकाऱ्यांविरुद्ध तुर्कस्तानच्याबाबतीत मुसलमानांचा प्रक्षोभक आविष्कार हिंसेने झाल्याचीही काही उदाहरणे आहेत. टिळकांसारख्या प्रभावी व्यक्तीही युद्ध प्रयत्नांच्याविरुद्ध उभ्या ठाकल्या होत्या.

या घडामोडीमुळे सेक्रेटरी ऑफ स्टेट मॉन्टेग्यू यांनी २० ऑगस्ट १९१७ रोजी घोषणा केली ती अशी : 'बादशहाच्या सरकारचे धोरण असे आहे की, राज्य-कारभाराच्या प्रत्येक शाखेत हिंदी लोकांचे वाढते सहकार्य झाले पाहिजे, आणि ब्रिटिश साम्राज्याचाच एक अविभाज्य भाग म्हणून हिंदुस्तानला हळूहळू जबाबदार सरकारची प्राप्ती झाली पाहिजे यादृष्टीने हिंदुस्तानात हळूहळू स्वतंत्र राज्यकारभाराचा विकास

झाला पाहिजे, या धोरणाशी हिंदुस्तान सरकारचे संपूर्ण मतैक्य आहे.' यानंतर एक वर्षानी अतिशय मर्यादित मतदानाच्या अधिकारावर प्रत्यक्ष निवडणूक कायदेमंडळातील प्रातिनिधिक प्रमाणात अधिक वाढ, राज्यकारभाराची महत्त्वाची खाती हिंदी मंत्र्यांच्या हाती सोपवणे आणि लखनौ करारात तरतूद केल्याप्रमाणे काही फेरफार करून जातीय मतदार संघ तयार करणे, या सर्व सूचना अंतर्भूत असलेली सुधारणेची एक योजना जाहीर झाली. हिला मॉन्टफोर्ड रिपोर्ट म्हणतात. असे असले तरी सत्तेची मुख्य सूत्रे ब्रिटिशांनी आपल्या हातातच राखून ठेवली होती आणि जबाबदार सरकार हे अद्याप दूरचे स्वप्न होते.

या सुमारास काँग्रेस, टिळकांच्या पुढारीपणाखाली जहालमतवाद्यांच्या हातात जात होती; टिळकांच्या सहा वर्षांच्या हद्दपारीनंतर ज्या नेमस्तांनी जहालवाद्यांना संघटनेतून हाकलून दिले होते, त्यांनीच आता निराळा पक्ष काढण्याचे ठरवले होते. नेमस्त या सुधारणा योजना संपूर्णपणे स्वीकारण्यास तयार होते तर जहालमतवादी ती पूर्णपणे फेटाळण्याच्या बाजूचे होते. मुस्लिम लीगने आपल्या १९१८ च्या अधिवेशनात ही योजना तशीच्या तशी मान्य केली एवढेच नव्हे तर, तिच्या अध्यक्षांनी हिंदुस्तानला जबाबदार सरकार देण्याच्या ब्रिटिशांच्या दिरंगाईचे समर्थन देखील केले. त्यांनी असा युक्तिवाद केला की, 'हिंदुस्तानात निरनिराळे ऐशी वंश आहेत, ते तितक्याच निरनिराळ्या भाषा बोलतात आणि शंभराहून अधिक धर्मांचे आचरण करतात. त्याच्यात एकात्मता तर नाहीच पण एकजूटही फारशी नाही.' ही विचारसरणी, १९१६ च्या काँग्रेस व लीगच्या गंभीर निर्णयाला जरी उघड विरोधक होती तरी तिचा अर्थ, लखनौ कराराचा भंग असा न लावता, फक्त निरनिराळ्या मुसलमान पुढाऱ्यांच्या चंचल मनाचे लक्षण असा लावण्यात आला. लीगच्या वार्षिक अधिवेशनात, लीग ऑफ नेशन्सनी मान्य केलेले स्वयंनिर्णयाचे तत्त्व हिंदुस्तानला लागू करावे अशी मागणी करून तिने या विचारसरणीत सुधारणा केली. ताबडतोब जबाबदार सरकारच्या स्थापनेच्या काँग्रेसच्या ठरावाशी याची तंतोतंत सांगड जुळते.

१९१९ मध्ये एका निषेध चळवळीत बऱ्याच ठिकाणी हिंदू मुसलमान ऐक्याचे दर्शन झाले. त्या वर्षाच्या जानेवारीमध्ये, हिंदुस्तान सरकारने नवीन कायदा अंमलात आणण्याचा मनोदय जाहीर केला होता. याप्रमाणे हिंदी सरकारला, (१) कुठल्याही व्यक्तीला विशिष्ट ठिकाणी स्थानबद्ध करणे; (२) पोलीसाकडे नियमित हजेरी देण्याचा हुकूम करणे; (३) कुठलेही कारण दाखवल्याशिवाय अटक करणे; (४) चौकशी विना कोठडीत डांबून ठेवणे; हे हक्क मिळणार होते. महायुद्ध जसे संपुष्टात येऊ लागले तशी हिंदुस्तान सरकारला, वाढली हिंदी परिस्थितीशी कसा मुकाबला करावा याबद्दल चिंता वाटू लागली, आणि त्याने युद्ध समाप्तीनंतर सहा महिन्याच्या अवधीत विसर्जन पावणाऱ्या संरक्षण कायद्याखाली विशेष अधिकार आपल्या हाती घेतले. शेकडो माणसे अटकेत होती. त्यात हिंदू दहशतवादी आणि तुर्कस्तानला सहानभूती

दाखवणारे मुसलमान होते, आणि त्यांना मुक्त करणे सरकारला सुरक्षिततेचे वाटत नव्हते. म्हणून सरकारने परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी आणि नवीन कायद्याचा आराखडा सुचवण्यासाठी एक कमिटी नेमली. त्या कमिटीचे अध्यक्ष, ब्रिटिश न्यायाधीश राउलर हे होते म्हणून तिला राउलर कमिटी असे नाव देण्यात आले. या कमिटीच्या शिफारसी १९१९ च्या जानेवारीत जाहीर झाल्या. या शिफारसींचा अर्थ नागरिक स्वातंत्र्याच्या मृत्यूचा खलिता असा केला गेला. त्यांनी देशात संतापाची लाट उसळली, आणि गांधींच्या तोंडन त्या निषेधवृत्तीचा आवाज उठला. गांधींनी आपल्या आणि आपल्या विचारांशी सहमत असलेल्या इतर लोकांच्या सहीने एक प्रतिज्ञा प्रसिद्ध केली आणि तिचा स्वीकार करण्याचे आवाहन जनतेला केले. ती प्रतिज्ञा अशी

सद्सद्विवेक बुद्धीला अनुसरून आमचे असे मत आहे की, १९१९ चे इंडियन क्रिमिनल लॉ अमेंडमेंट बील नं. १ आणि १९१९ चे क्रिमिनल लॉ इमर्जन्सी बील नं. २ या नावाने प्रसिद्ध असलेली दोन बिले अन्यायी आणि सर्व हिंदुस्तानच्या सुरक्षिततेला आणि खुद्द राष्ट्राचा आधार असलेल्या स्वातंत्र्य आणि न्यायाच्या तत्त्वाला मारक, आणि व्यक्तीच्या हक्कावर गदा आणणारी आहेत. आम्ही प्रतिज्ञापूर्वक, गंभीरपणे असे जाहीर करतो की, या बिलाचे रुपांतर कायद्यात झाले तर, ते कायदे रद्द होईपर्यंत आम्ही ते कायदे पाळण्याचे नाकारू. त्याचप्रमाणे यानंतर नेमल्या जाणाऱ्या कमिटीला अशाप्रकारचे जे कायदे योग्य वाटतील तेही कायदे आम्ही पाळणार नाही. आम्ही अशी प्रतिज्ञा करतो की, यातून जो संघर्ष निर्माण होईल त्यात आम्ही प्रामाणिकपणे सत्य अनुसरू आणि व्यक्ती, संपत्ती किंवा जीविताची हिंसा करण्यापासून अलिप्त राहू.

आपल्या चळवळीची पहिली पायरी म्हणून त्यांनी ३० मार्च १९१९ हा दिवस, सर्वसाधारणपणे, सर्व देशभर दुकाने बंद ठेवण्याचा व्यापारी घडामोडी तहकूब ठेवण्याचा, उपास, प्रार्थना आणि जाहीर सभा घेण्याचा म्हणून ठरवला. (नंतर ही तारीख बदलून ६ एप्रिल करण्यात आली). गांधींच्या या आवाहनाला हिंदू आणि मुसलमान दोघांनीही साथ दिली. मशिदीत प्रार्थनेला जमलेल्या मुसलमानांपुढे भाषणे करण्यासाठी मुसलमानांनी हिंदू पुढाऱ्यांना आमंत्रणे दिली. या निषेधदिनाने अचाट शक्ती बाहेर पडली; ती ताब्यात राहिली नाही, आणि भयभीत झालेल्या सरकारने हजारो लोक ठार करणाऱ्या गोळीबाराने त्यांच्याशी मुकाबला केला. १८५७ च्या बंडानंतर हिंदू मुसलमान एकाच कार्यासाठी पूर्वी कधी असे एकत्र आले नव्हते. काही ठिकाणी कापलेल्या वासराचे किंवा डुकराचे मांस टांगण्याच्या प्रक्षोभक व परस्पराबद्दल संशय निर्माण करणाऱ्या योजलेल्या युक्त्याही फोल ठरल्या. हिंदू मुसलमान एकजूट ही एक प्रस्थापित गोष्ट आहे हे अधिकाऱ्यांनीही आता मान्य केले. आणि पोलीसांनीही,' हिंदू मुसलमानांच्या जोड्यांना एकत्र बेड्या ठोकून अधिकाऱ्यांच्या या भावनेचे जणू

काय हास्यास्पद प्रदर्शन केले.

एकाच उद्दिष्टासाठी हिंदू आणि काँग्रेसबरोबर सहकार्य करा असा सल्ला देणाऱ्या मुस्लिम लीगच्या लंडन शाखेची टर उडवणाऱ्या मौलाना महम्मद अलींनीसुद्धा आता हिंदू मुसलमान एकजुटीचा चमत्कार प्रत्यक्ष पाहिला, आणि त्यांना ते एक चालते बोलते सत्य असल्याचे प्रतीत झाले, आणि १९१९ च्या अमृतसर काँग्रेसला ते जातीने हजर राहिले.

आता, गांधी हे हिंदू मुसलमान आणि इतर जमातींचे पुढारी बनले. प्रत्यक्षात ते काँग्रेस आणि मुस्लिम लीग यांच्यापेक्षाही मोठे ठरले. त्यांची एप्रिल १९१९ ची निषेध चळवळ या दोनही संस्थांना मागे टाकून गेली होती. मुसलमानांनी त्यांच्यावर पूर्ण विश्वास टाकला आणि महायुद्धानंतर ब्रिटिशांकडून तुर्कस्तानला दिल्या गेलेल्या वागणुकीबद्दल असंतोषाचे चिन्ह म्हणून आलेल्या खिलाफत चळवळीत, त्यांचे नेतृत्व पत्करले. ही खिलाफत चळवळ आणि ब्रिटिशांशी असहकाराची आपली राजकीय चळवळ यांची सांगड घालून गांधींनी डळमळीत असलेल्या मुसलमान पुढाऱ्यांनाही राजकारणात ओढले.

---

प्रकरण सोळावे

# खिलाफत चळवळ

इस्लामची विद्वत्ता आणि त्याबद्दल निष्ठा बाळगणाऱ्या मुसलमानांचे आपल्या धर्मबांधवावर वजन होते, आणि युद्धकाळात तुर्कस्तानच्या बाजूने प्रांजळपणे मत प्रदर्शन केल्यामुळे त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला होता हे मागे सांगितलेच आहे. सुशिक्षित मुसलमानांच्या धार्मिक भावना इतक्या उफाळल्या होत्या की, ब्रिटिश राज्यकर्त्यांना चिंता वाटू लागली आणि ते आपल्या अनेक भाषणातून या भावना शमवण्याचा प्रयत्न करु लागले. ब्रिटिश पंतप्रधान, लॉईड जॉर्ज यांनीसुद्धा असे जाहीर केले की 'तुर्की जमातीचे प्राबल्य असणाऱ्या आशिया मायनर व थ्रेस या तुर्कस्तानच्या सुपीक व विख्यात भूमीला बळकावण्यासाठी आम्ही लढत नाही' पण जेव्हा युद्ध संपले आणि जेत्या राष्ट्राकडून तुर्कस्तानावर अपमानास्पद अटी लादल्या जातील असे निर्देश, अनेक विजयी राष्ट्रांच्या राजधान्यातून होऊ लागले तेव्हा हे 'गंभीर अभिवचन' हिंदी मुसलमान पुढाऱ्यांनी ब्रिटिश सरकारच्या तोंडावर फेकले, आणि मेसापोटेमिया, अरबस्तान, सिरिया आणि पॅलेस्टाईन या देशातील सर्व पवित्र स्थळांसकट ही अरब भूमी (जझरात्-उल्-अरब) सतत खलिफाच्या प्रत्यक्ष सार्वभौमत्वाखालीच रहावी अशी मागणी केली. तुर्कस्तान हे पराभूत राष्ट्र होते, आणि ते स्वत: किंवा त्याच्या बाजूने कुणीही शांततेच्या अटी लादू शकत नव्हते. शिवाय तुर्की साम्राज्याच्या अखंडतेवर भर देण्यातही काही स्वारस्य नव्हते. कारण, याचा अर्थ, ज्या जमातींना स्वयंनिर्णय हे शांतता तहाचे तत्त्व बनवण्यात येईल असे सांगण्यात आले होते, आणि ज्या जमाती जर स्वातंत्र्य दिले तर तुर्की साम्राज्यातून बाहेर पडल्या असत्या अशा जमातींनासुद्धा जखडून ठेवणे असा झाला असता आणि हा स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचा भंग होता. परंतु हिंदुस्तानातील मुसलमान पुढाऱ्यांचे म्हणणे असे होते की, पंतप्रधानांच्या अभिवचनावर आम्ही विश्वास ठेवला आहे आणि जर हे दिलेले वचन पाळले गेले नाही तर त्यांच्या ब्रिटिश सत्तेवरील निष्ठेला तडा गेल्याशिवाय रहाणार नाही. अर्थात हे अभिवचन पाळले जाणार नाही अशी त्यांना भीति वाटत होती. आणि म्हणून त्यांनी ब्रिटिश विरोधी चळवळ बांधण्यास सुरवात केली. कारण निदान त्यामुळे तरी त्यांच्या भावना आणि मागण्या याकडे विजयी राष्ट्रांचे लक्ष गेले असते.

रौलट बिलाच्याविरुद्ध पाळलेल्या निषेध दिनातून उद्‌भवलेल्या पंजाबातील अत्याचारांनी

सर्व देशभर लोकांच्या भावना प्रक्षुब्ध झाल्या होत्या. तुर्कस्तानच्या संभाव्य मनोभंगाने मुसलमानामध्ये जितकी कटुता निर्माण झाली तशीच कटुता सरकारने गन्हेगारांना शासन करण्याचे नाकारल्याने विरोधी बनलेल्या काँग्रेसमध्ये निर्माण झाली. होमरुल चळवळीच्यावेळी दिल्या गेलेल्या स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाच्या शिकवणीने, पूर्वी कधीही झाली नव्हती इतकी राजकीय जागृती जनतेत निर्माण केली गेली. लोकांना असे सांगितले गेले होते की, ज्या तत्त्वासाठी ब्रिटिश लोक पहिले महायुद्ध लढत होते तेच हे स्वयंनिर्णयाचे तत्त्व. ते हिंदुस्तानला लागू करण्यात ब्रिटिशांच्या प्रामाणिकपणाची खरी कसोटी आहे. जबाबदार सरकार लवकरच मिळणार अशा आशा जनतेत निर्माण झाल्या होत्या. आणि प्रत्यक्षात जेव्हा रौलट बील, गोळीबार आणि निराशाजनक सुधारणा पुढे येऊन या अपेक्षांना हरताळ फासला गेला तेव्हा अर्थातच देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत अशांततेची एकच लाट उसळली. ही परिस्थिती म्हणजे, काँग्रेसमध्ये उदयास आलेल्या जहालवादी पक्षापासून सुरू झालेल्या आणि बंगालच्या फाळणीनंतर ह्या पक्षाची परिणती दहशतवादी चळवळीत झालेल्या राजकीय चळवळीचा परिपाक होती. इटालीची त्रिपोळीवरील स्वारी, बाल्कनची लढाई आणि तुर्कस्तानची जर्मनीशी हात मिळवणी होईपर्यंत ही चळवळ पूर्णपणे राष्ट्रवादाने भारलेल्या बहुतेक हिंदूंनीच चालवली होती. एका बाजूला अत्याचारांनी आणि स्वातंत्र्याच्या गळचेपीच्या लक्षणांनी दुखावलेला हा राष्ट्रवाद आणि दुसऱ्या बाजूला राष्ट्रवादाच्या प्रेरणेत काही वर्षे मिसळत असलेला मुसलमानांचा तुर्कस्तानाबद्दलचा राग, अशी दृश्ये १९१९ मध्ये हिंदुस्तानच्या राजकीय पडद्यावर दिसत होती.

१९१९ च्या मध्यावर जेव्हा काही मुसलमान पुढाऱ्यांनी आपली खिलाफत परिषद बनवली तेव्हा देशातील राजकीय वातावरण असे होते. २७ ऑक्टोबर १९१९ हा दिवस खिलाफत दिन म्हणून पाळावा असे त्यांनी लोकांना सांगितले आणि खिलाफत प्रश्नावर विचार करण्याकरिता २३ नोव्हेंबरला हिंदू मुसलमानांची एक संयुक्त बैठक दिल्लीला बोलावली. युद्धकालात हिंदू मुसलमानांनी पूर्णपणे एकजूट दाखवली होती आणि युद्धानंतरच्या काळात ती जास्तच बळकट झाली असल्यामुळे खिलाफत प्रश्नावर हिंदूंनी मुसलमानांशी एकी करण्याची तयारी दाखवली यात काही आश्चर्य नव्हते. प्रमुख निमंत्रितात गांधी होते. त्यांना परिषदेचे अध्यक्ष निवडले गेले. हिंदूंना पाठवलेल्या निमंत्रण पत्रिकेत इतर गोष्टीबरोबर असेही म्हटले होते की, परिषदेत केवळ खिलाफत प्रश्नाचीच चर्चा केली जाईल असे नव्हे तर गोसंरक्षण प्रश्नाचीही होईल. कुठल्याही प्रश्नावर जसे सर्वांचे एकमत नसते तसे सर्व हिंदूंचे खिलाफत प्रश्नावर एकमत नव्हते. स्थूलमानाने हिंदू तीन वर्गात विभागले होते. मुसलमानांनी गोवध बंद केला तर त्यांच्या ब्रिटिशविरोधी मोहिमेत भाग घेण्यास तयार असणारा एक वर्ग. राष्ट्रातीत निष्ठेच्या प्रखरतेने मुसलमान हिंदुस्तानावर स्वारी करण्यास अफगाणिस्तानला आमंत्रण देतील, त्यांच्या मदतीने सत्ता बळकावतील आणि त्यामुळे

मुसलमानी अंमल पुन्हा प्रस्थापित होईल अशी भीति बाळगणारा दुसरा वर्ग. आणि मुसलमानांच्या चांगुलपणावर बिनदिक्कत आणि बिनशर्त विश्वास ठेवणारा तिसरा वर्ग. या वर्गातील बहुतेक सर्व लोक काँग्रेसवाले होते. आणि गांधींच्या जोरदार समर्थनाने काँग्रेसमधील जे लोक दोलायमान होते त्यांचे मतपरिवर्तनही बिनशर्त सहकार्यात झाले. गांधी म्हणाले, 'मी असे म्हणतो की, गोरक्षणाचा प्रश्न हिंदूंनी येथे काढू नये. संकटकाळी मदत, आणि तीसुद्धा बिनशर्त, ही मैत्रिची खरी कसोटी आहे. ज्या सहकार्याला मोबदल्याची गरज भासते ती मैत्री नसून व्यापारी करार असतो. सशर्त सहकार्य हे आपले बांधकाम पक्के न करणाऱ्या भेसळीच्या सिमेंटसारखे आहे. मुसलमानांनी मांडलेल्या दाव्यात जर हिंदूंना न्याय दिसत असेल तर त्यांना सहकार्य देणे हे हिंदूंचे कर्तव्य ठरते. हिंदूंच्या भावनांची कदर करण्यास आणि गोवध थांबवण्यास आपण प्रतिष्ठेने बांधलो गेलो आहोत असे जर मुसलमानांना वाटत असेल तर त्यांनी ते केले पाहिजे, मग हिंदू त्यांना सहकार्य देवोत अगर न देवोत बिनशर्त सहकार्य म्हणजेच गोसंरक्षण.'[१]

गांधींनी गाईचा प्रश्न ज्या उदारपणे हाताळला त्याच उदारपणाने मौलाना अब्दुल बारी यांनी त्यांना साथ दिली. गांधींचे आभार मानताना ते म्हणाले, 'गोरक्षा प्रश्नाबद्दल गांधींनी जे उद्गार काढले त्यामुळे त्यांचा आणि आमच्या हिंदू बांधवांचा गौरव होतो. हिंदूंच्या या सहकार्याचा मुसलमानांना विसर पडला तर मात्र त्यांची इभ्रतपणाला लागेल. माझ्यापुरते बोलायचे तर मी म्हणेन की, त्यांच्या सहकार्याच्या अपेक्षेशिवायच आपण गोवध बंद केला पाहिजे. कारण आपण एकाच भूमीचे पुत्र आहोत. मौलवी म्हणून मी असे सांगतो की, गोहत्या खुषीने बंद करण्यात आपण आपल्या धर्मशास्त्राविरुद्ध वागत नाही. हिंदू मुसलमान ऐक्याला, हिंदूच्या खिलाफत प्रश्नावरील सहकार्याचे जितके सहाय्य झाले आहे तितके दुसऱ्या कशानेच झाले नाही.'[२]

अफगाणिस्तानच्या स्वारीच्या भीतीबद्दलही गांधींनी तितकेच जोरदार समर्थन केले : 'हिंदूंची सावधानता समजून घेणे आणि तिचे समर्थन करणे फार सोपे आहे. मुसलमानांच्या भूमिकेला विरोध करणे कठीण आहे. माझ्या मते, इस्लाम आणि इंग्रज यांच्या शक्तीचे कुरुक्षेत्र बनण्यापासून हिंदुस्तानचे रक्षण करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे असहकार संपूर्णपणे यशस्वी करणे होय. जर मुसलमान आपल्या उद्घोषित उद्दिष्टांशी एकनिष्ठ राहिले आणि संयम राखण्यात व त्याग करण्यात यशस्वी ठरले तर हिंदूही सचोटीने वागतील. आणि त्यांच्या असहकाराच्या चळवळीत सामील होतील, याबद्दल मला शंका नाही. त्याचबरोबर मला अशीही खात्री वाटते की,

१. अखिल भारतीय खिलाफत परिषदेतील गांधींचे भाषण. १० डिसेंबर १९१९ च्या 'यंग इंडिया' वरून.

२. खिलाफत परिषदेचे कामकाज वृत्तांत.

ब्रिटिश सरकार आणि त्यांची दोस्त राष्ट्रे आणि अफगाणिस्तान यांच्यामध्ये सशस्त्र लढा घडवून आणण्याला किंवा त्याला उत्तेजन देण्याला मुसलमानांना हिंदू साथ देणार नाहीत. हिंदी सरहद्दीवर कुठलीही स्वारी यशस्वी होऊ न देण्याइतक्या ब्रिटिश फौजा समर्थ आहेत.'[३]

मुस्लिम लढ्याच्या न्याय्यतेबद्दल गांधींची खात्री पटलेली होती. आपल्याला पटलेल्या मुसलमानांच्या उद्दिष्टांचे स्पष्टीकरण गांधींनी आपल्या २ जून १९२० च्या 'यंग इंडिया' च्या अंकात मोठ्या विस्ताराने केले आहे. ते म्हणतात : 'माझ्या मते तुर्कस्तानचा दावा अनैतिक किंवा अन्यायी नाही एवढेच नव्हे तर तो अतिशय योग्य आहे. कारण तुर्कस्तानला स्वतःचे जे हक्काचे आहे तेवढेच टिकवावयाचे आहे. आणि मुसलमानी जाहीरनाम्यात असे स्पष्ट म्हटले आहे की, तुर्कस्तानच्या सार्वभौमत्वाखाली ख्रिश्चनांना व अरबांना स्वायत्तता मिळावी म्हणून मुसलमानी आणि तुर्की जमाती व्यतिरिक्त इतर जमातींच्या संरक्षणाची जरूर ती लेखी हमी घेतली गेली पाहिजे.

तुर्कस्तान दुर्बल, नालायक किंवा क्रूर आहे यावर माझा विश्वास नाही. तो असंघटीत खचितच आहे, आणि कदाचित् त्याच्यापाशी नेतृत्व नसेल. ज्यांच्याकडून सत्ता बळकवण्याचा प्रयत्न केला जातो त्यांच्याबाबतीत दुर्बलतेचे, नालायकीचे किंवा क्रूरपणाचे मुद्दे नेहमी ऐकू येतात. पुरावा म्हणून दिल्या गेलेल्या, तुर्कांनी केलेल्या हत्याकांडाच्या चौकशीबद्दल योग्य अशा कमिशनची मागणी केली गेली होती, पण ती कधीच मान्य झाली नाही. आणि जुलूम होऊ नये म्हणून खबरदारी केव्हाही घेता येते.

मला जर हिंदी मुसलमानांबद्दल आस्था वाटत नसती तर ऑस्ट्रियन किंवा पोल लोकांच्या कल्याणाबद्दल मला जितकी आस्था वाटेल त्यापेक्षा अधिक आस्था तुर्कांबद्दल वाटली नसती. पण हिंदी म्हणून माझ्या राष्ट्रीय सहबांधवांच्या दुःखाकष्टात भागिदार होण्याला मी बांधलेला आहे. मुसलमानाला जर मी माझा बंधू मानत असेन तर आणि त्याचे उद्दिष्ट मला न्याय्य वाटत असेल तर त्याच्या विनाशाच्या काळात त्याला आपल्या सर्व शक्तीनिशी मदत करणे हे माझे कर्तव्य ठरते.

माझ्या मुसलमान बांधवाच्या न्याय्य उद्दिष्टासाठी त्याच्याबरोबर जास्तीत जास्त कष्ट सोसणे हे योग्य आहे. म्हणून जोपर्यंत तो वापरत असलेली साधने त्याच्या साध्या इतकीच सन्माननीय आहेत तोपर्यंत मला त्याच्या बरोबर मार्ग कापला पाहिजे. मुसलमानांच्या भावनांचे नियमन मी करू शकत नाही. उद्दिष्टपूर्तीसाठी जरूर तर प्राण त्याग करावा लागला तरी बेहेत्तर, इतका खिलाफत प्रश्न आपल्याला धार्मिक वाटतो हे मुसलमानांचे विधान मी मान्य केले पाहिजे.

ब्रिटिश पंतप्रधानांनी मुसलमानी मागणीचा न्यायीपणा मान्य केला आहे म्हणून

३. 'यंग इंडिया' ९ जून १९२०.

त्यांनी मुसलमानांना दिलेल्या अभिवचनाची योग्य पूर्तता होईल अशी त्यांना मदत करण्यास मी बांधला गेलो आहे. हे अभिवचन इतक्या स्पष्ट शब्दात दिले गेले आहे की, मुसलमानी मागणीच्या गुणदोषांच्या तपासणीची जरूरी फक्त माझ्या स्वतःच्या सदसद्विवेक बुद्धीचे समाधान करण्यासाठीच होती.[४]

दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या चळवळीनंतर गांधींचे हिंदुस्तानात आगमन झाल्यापासून, गांधींच्याच शब्दात सांगायचे झाले तर ते 'चांगल्या मुसलमानांची मैत्री शोधण्याला आणि त्यांच्यातील अतिशय सात्विक आणि कडव्या देशप्रेमी मुसलमानांशी संबंध जोडून मुसलमानी मन समजावून घेण्यास फार उत्सुक होते. त्यांच्याशी घनिष्ट संबंध यावा म्हणून, 'त्यांनी मला जेथे जेथे नेले तेथे तेथे त्यांच्याबरोबर जाण्यास कुठल्याही तऱ्हेची बळजबरी कधीच झाली नव्हती',[५] असे ते म्हणाले. पुन्हा त्यांच्या स्वतःच्याच शब्दात सांगायचे तर त्यांना 'हिंदू मुसलमानात खरी मैत्री नव्हती याची जाणीव फार पूर्वी दक्षिण आफ्रिकेत असतानाच झाली होती.' आपल्या सत्याग्रहाच्या चळवळीकडे मुसलमानांना खेचण्यात त्यांनी काही प्रमाणात यश मिळवले होते आणि 'हिंदू मुस्लिम ऐक्याच्या प्रश्नावर माझी अहिंसा पराकाष्टेच्या कसोटीला लागेल अशी अनुभवाने त्यांची खात्री झाली होती. मौलाना महम्मद अली आणि त्यांचे बंधू शौकत अली यांच्याशी त्यांचे थोडे संबंधही होते पण ते जास्त घनिष्ट होण्यापूर्वीच, तुर्कस्तानवरील त्यांच्या दृष्टिकोनामुळे युद्धकाळात त्या दोघांना अटक झाली होती. गांधींची मते जग जाहीर होती आणि अलि बंधूंच्या अटकेनंतर त्यांना 'कलकत्त्याच्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनाला हजर रहाण्याचे आमंत्रण त्यांच्या मुसलमान मित्रांनी दिले. यावेळी केलेल्या भाषणात त्यांनी अलिबंधूंची सुटका करून घेणे हे मुसलमानांचे कर्तव्य आहे असे सांगितले.' यानंतर थोडयाच दिवसात अलिगड मुस्लिम विद्यापिठाने त्यांना निमंत्रण दिले. तेथे आपल्या भाषणात त्यांनी 'मातृभूमीच्या सेवेसाठी फकीर बना' असा आदेश युवकांना दिला. त्याकाळात त्यांना खरोखर असे वाटत होते की, आपल्याला जर मुसलमानांचे खरे मित्र बनावयाचे असेल तर आपण खिलाफतीच्या प्रश्नाच्या न्याय्य तडजोडीसाठी आणि अलीबंधूंच्या सुटकेसाठी शक्य ती मदत केली पाहिजे. या विचाराला अनुसरून त्यांनी खिलाफत कैद्यांच्या सुटकेच्या मागणीच्या समर्थनार्थ सरकारशी पत्र व्यवहार सुरू केला.[६]

गांधी हे व्यवहारी गृहस्थ होते. खिलाफत प्रश्नाने मुसलमानात पूर्वी कधीही झाली नव्हती इतकी जागृती निर्माण झाली होती, आणि तिचे रुपांतर राष्ट्रीयत्वात आणि परिणामी स्वातंत्र्य चळवळीच्या लक्षात भाग घेण्यास मुसलमान तयार होतील

४. My Experiences with Truth या गांधींच्या आत्मवृत्ताच्या दुसऱ्या आवृत्तीच्या पृष्ठ ५४०–५४१ वरून.

५. कित्ता, पृ. ५३९.

६. गांधीचे पुर्वोक्त आत्मचरित्र, पृ. ५३९–५४०.

हे ते ओळखून होते. अर्थात कुठल्याही व्यवहारी राजकारणाने १८५७ च्या बंडापासून हिंदुस्तानने कधीही न पाहिलेले हिंदू मुस्लिम ऐक्य प्रस्थापित करणे, हे ध्येय उघड उघड पुढे ठेवले असते. शिवाय, खिलाफत भावना ही एक अराजकीय धार्मिक बाब म्हणून, आणि स्वराज्याचे ध्येय असलेल्या ब्रिटिश विरोधी लढ्याशी तिचा संबंध जोडणे अयोग्य म्हणून ती नाकारणे म्हणजे, पूर्वी हिंदू मुसलमानात कधीही नव्हती इतकी फूट निर्माण करणे ठरले असते. दहा वर्षात, मुसलमानांची राजकीय जाणीव ज्या पद्धतीने वाढली होती त्यावरून असे सूचित झाले होते की, मुसलमानांच्या बाबतीत धर्म राजकारणापासून अलग करणे अशक्य तर होतेच पण प्रत्यक्षात तो राष्ट्रीय चळवळीचा पाया बनला पाहिजे. हिंदूंनी साधारणपणे राजकारणात धर्म घुसडला नाही. पण त्यांच्या धर्म प्रेमाला राजकारणाशी काही कर्तव्य नव्हते असा त्यातून निष्कर्ष काढणे चुकीचे ठरेल. या दोन धर्मातील फरक आणि ऐहिक व भौतिक गोष्टीबाबतची त्यांची भिन्नवृत्ती यांचा त्यांच्या राजकारणावर थोडा थोडका परिणाम केला नाही. त्यामुळे व्यवहारी व चतुर राजकारण्यासमोर मुसलमानांचे तुर्की साम्राज्याबद्दलचे आणि खिलाफतीबद्दलचे प्रेम आणि ते टिकवण्यासाठी त्यांनी व्यक्त केलेला भावना वेग, हे दोनही जमेस धरून त्यांना राजकारणात सामावून घेणे हाच एक सुयोग्य आणि उत्तम मार्ग होता. थोडक्यात म्हणजे, झाले होते ते असे : हिंदुस्तानातील मुसलमानी सत्ता कोलमडून पडल्यावर हिंदी मुसलमानांनी तुर्की साम्राज्य आणि त्याचा खलीफा यापासून ऐहिक व पारलौकिक स्फुर्ती घेण्यास सुरुवात केली होती. चीन व आग्नेय आशियामधील बौद्ध लोकांना आपला परमेश्वर हिंदुस्तानात जन्मला होता हे माहीत होते, पण हिंदुस्तानचा उद्धार करण्याचा किंवा गौरव करण्याचा प्रयत्न त्यांनी कधीच केला नाही. ते ज्या देशात रहात होते त्या देशाच्या केवळ राष्ट्रीय गोष्टींशीच ते संबंधीत होते. अशी वस्तुस्थिती मुसलमानांच्या बाबतीत नव्हती. त्यांनी तुर्की प्रश्नावर जी आपली वेगळी संघटना उभारली, तशी राजकीय सत्तेसाठी उभारली नव्हती. हिंदू मुस्लिम ऐक्याच्या प्रेमाने ओथंबलेल्या आणि खिलाफत प्रश्नाचे समर्थन करणाऱ्या गांधींनी, १९१९ च्या राजकीय परिस्थितीत स्वतःच्या जीविताची इतिकर्तव्यता पाहिली तिला ही पार्श्वभूमी होती. त्यांनी इतिहासात एक नवे प्रकरण उघडले. त्याची सुरुवात ब्रिटिश सत्तेवरील हिंदू-मुसलमानांच्या संयुक्त हल्ल्याने झाली. म्हणून हिंदू मुसलमानांच्या पहिल्या खिलाफत परिषदेत त्यांनी असे अर्थपूर्ण उद्‌गार काढले की : 'मुसलमानांनी फार महत्वाचा ठराव संमत केला आहे. शांतता तहाच्या अटी जर त्यांना प्रतिकूल असल्या तर,— ईश्वर कृपेने तसे न होवो—ते सरकारला आपले सहकार्य देण्याचे पूर्णपणे थांबवतील असे सहकार्य थांबवणे हा त्यांचा हक्क हिरावून घेता येणार नाही. सरकारी पदव्या आणि सन्मान किंवा सरकारी नोकऱ्या चालू ठेवण्यास आम्ही बांधलेले नाही. खिलाफती-सारख्या महत्वाच्या उद्दिष्टात सरकार जर आमचा विश्वासघात करणार असेल तर

त्यांच्याशी असहकार करण्याशिवाय आम्हाला गत्यंतर नाही.'[७]

आश्चर्यकारक गोष्ट अशी की, ब्रिटिशांशी सहकार्य करण्याची निष्ठा बाळगलेल्या, इंग्रजी शिक्षण घेतलेल्या सुशिक्षित मुसलमानांपेक्षा कुराणाच्या भक्तिभावाने आपले आचरण करणाऱ्या मुसलमानी पंडितांचे—उलेमांचे—कांग्रेसशी अधिक जवळचे संबंध आले. नवीन घडामोडींनी उलेमांचे अंतःकरण ढवळून निघाले आणि त्यांनी अखिल भारतीय जमियत-उल्-उलेमा ही संघटना स्थापन केली. सत्यासाठी आम्हाला जुलमी राजांनासुद्धा तोंड देण्याची संवय आहे असे ते म्हणाले, आणि म्हणून सरकारशी एकनिष्ठ असलेल्या मुसलमानांच्या राजकारणापासून आपण अलिप्त राहिलो. पण आता मुस्लिम राजकारणाला योग्य वळण लागत असल्यामुळे आम्ही परत राजकारणात प्रवेश करू.[८] आगामी चळवळीला त्यांनी जोराची चालना दिली, आणि कांग्रेस, मुस्लिम लीग, खिलाफत परिषद आणि जमियत-उल-उलेमा या भिन्न भिन्न संघटना असल्या तरी हिंदू आणि मुसलमान संयुक्त राष्ट्रीय मागणी करतील आणि त्याकरिता लढा उभारतील असे १९१९ मध्ये अमृतसर येथे सर्वांच्या एकाचवेळी भरणाऱ्या अधिवेशनाने स्पष्ट झाले.

चळवळीच्या निर्मात्यांनी, संघर्ष टाळण्यासाठी, चळवळ सुरू होण्यापूर्वी ब्रिटिश राज्यकर्त्यांना एक आवाहन केले. १९ जानेवारी १९२० ला एक खिलाफत शिष्टमंडळ व्हाइसरॉयला भेटले. आणि त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळे खिलाफत परिषदेने दुसरे एक शिष्टमंडळ पंतप्रधान व हिंदुस्तानच्या सेक्रेटरी ऑफ स्टेटला भेटण्यासाठी इंग्लंडला पाठवले ते ही अपेक्षेप्रमाणे अयशस्वी झाले. इतर ख्रिश्चन देशांना लावल्या गेलेल्या तत्त्वापेक्षा तुर्कस्तानला निराळे तत्त्व लावणे शक्य नाही ही आपल्या सरकारची भूमिका लॉईड जॉर्ज यांनी पुन्हा प्रतिपादन केली. त्यांनी असे ठामपणे प्रतिपादन केले की, तुर्की भूमीवर तुर्कस्तानला आपली सत्ता चालवू दिली तरी तुर्कांची नसलेली भूमी ताब्यात ठेवण्याची मुभा त्याला दिली जाणार नाही.

१४ मे १९२० ला शांतता अटी प्रसिद्ध झाल्या तेव्हा शिष्टमंडळ लंडनमध्येच होते. मुसलमानांची पूर्ण निराशा झाली होती. आणि पुढील हालचालींचा विचार करण्यासाठी खिलाफत कमिटीची बैठक मुंबईला भरली. तिने गांधींनी १० मार्चलाच सुचवलेला असहकाराचा कार्यक्रम स्वीकारला. ते म्हणाले होते, 'मुसलमानांना आपले जीवन मरण वाटणारे हक्क अन्यायीपणे बळकावू देण्यास आपण दीनपणे मान तुकवावी अशी अपेक्षा इंग्लंडने करू नये, म्हणून आपण वरपासून तळापर्यंत सुरुवात करू या. सरकारच्या सन्मान्य आणि पगारी पदाधिकाऱ्यांनी आपल्या जागांचा त्याग करावा. त्याचप्रमाणे कनिष्ठ नोकऱ्यांवर असणाऱ्यांनीही तेच करावे. खाजगी

७. गांधींचे पूर्वोक्त आत्मचरित्र, पृ. ५९०-५९१.

८. पहिल्या जमियत परिषदेच्या उर्दू अहवालावरून.

व्यक्तींच्या हाताखाली नोकरी करणाऱ्यांना असहकार लागू नाही. असहकाराच्या मार्गाचा अवलंब न करणाऱ्यांविरुद्ध बहिष्काराची धमकी देण्याला मी संमती देऊ शकणार नाही. असहकार म्हणजे खुशीचा त्याग, हीच खरी सरकारविरुद्ध असमाधानाची व लोक भावनेची कसोटी आहे. सैनिकांना शस्त्र खाली ठेवण्याचा आदेश देणे हे उतावळेपणाचे होईल. ही पहिली नव्हे शेवटची पायरी आहे. जेव्हा व्हाइसरॉय, सेक्रेटरी ऑफ स्टेट आणि ब्रिटिश पंतप्रधान आपल्याला सोडून जातील तेव्हा ते पाऊल टाकण्याचा अधिकार आपल्याला प्राप्त होईल. शिवाय सहकार्य काढून घेण्यासाठी उचलावयाचे प्रत्येक पाऊल मागचा पुढचा फार मोठा विचार करून टाकले पाहिजे. प्रखर संतापातही आपला संयम सुटणार नाही याची खात्री राहील इतक्या सावकाशपणे आपण मार्ग कापला पाहिजे.

मुख्यत: ज्या मुसलमानांचा हा प्रश्न होता त्या मुसलमानांनी असहकाराचा निर्णय मान्य केल्यामुळे २ जून रोजी अलाहाबादला सर्व पक्ष परिषद भरवण्यात आली. परिषदेने निश्चित कार्यक्रम आखण्यासाठी गांधी आणि काही मुसलमान पुढाऱ्यांची एक कमिटी नेमली. दरम्यान, मुसलमान पुढाऱ्यांनी व्हाइसरॉयला एक खलिता पाठवला आणि शांतता अटींची फेरतपासणी झाली नाही तर 'येत्या १ ऑगस्टपासून आपण सरकारला देत असलेले सहकार्य काढून घेऊ आणि आमच्या धर्मबांधवांना व हिंदू बांधवांना तसे वागण्यास सांगू' असे त्यात लिहिले. यानंतर गांधींनी व्हाइसरॉयला एक औपचारिक सूचना पाठवली. सहाजिकच तिला व्हाइसरॉयकडून साद मिळाली नाही. आणि असहकाराची कल्पना म्हणजे 'मुर्खपणाचा कळस' असे म्हणून त्याने ती फेकून दिली. गांधींच्या आणि अलीबंधूंच्या देशव्यापी दौऱ्याने चळवळीला सुरुवात झाली. त्यांनी स्थानिक लोकांशी संबंध जोडले. जाहीर सभा घेतल्या आणि आपल्या श्रोत्यांना खिलाफत लढ्यासाठी तयार रहाण्यास प्रोत्साहन दिले नवीन घोषणा तयार केल्या आणि आपल्या 'यंग इंडिया' या पत्रकातून गांधींनी त्याचा पुरस्कार केला. याची निश्चित कल्पना येण्यासाठी गांधींनी स्वत:च आपल्या ८ सप्टेंबर १९२० च्या अंकात दिलेली हकीकत येथे उद्धृत केली तर बरे : मद्रास दौऱ्याच्यावेळी बेझवाडा येथे राष्ट्रीय अरिष्टासंबंधी बोलण्याचा प्रसंग आला आणि मी असे सुचवले की, माणसांच्या नावाने घोषणा देण्यापेक्षा ध्येयांच्या नावाने देणे जास्त बरे. "महात्मा गांधी की जय" आणि "महम्मद अली शौकत अली की जय" या ऐवजी "हिंदू-मुस्लिम की जय" म्हणा असे मी श्रोत्यांना सांगितले. माझ्या मागोमाग आलेल्या भाई शौकत अलींनी तर प्रत्यक्ष नियमच केला. त्यांना असे आढळून आले की, हिंदू मुस्लिम ऐक्य असले तरी हिंदू "वंदेमातरम्" असे ओरडत होते आणि मुसलमान "अल्ला हो अकबर" च्या घोषणा देत होते. कानाला हे कर्कश लागत होते, आणि याचा अर्थ असा होता की, अजूनही लोक एकमनाने विचार करत नव्हते. त्यांचे हे म्हणणे बरोबर होते. आणि म्हणून त्यांनी फक्त

तीनच घोषणांना मान्यता असावी असे म्हटले. एक म्हणजे फक्त परमेश्वर श्रेष्ठ आहे दुसरे कुणीही नाही असे सांगणारी "'अल्ला हो अकबर" ही घोषणा. दुसरी "वंदे मातरम" किंवा "भारत माता की जय" आणि जिच्यावाचून हिंदुस्तानला खरा विजय मिळणार नाही आणि परमेश्वराच्या श्रेष्ठतेचे खरेखुरे प्रात्यक्षिक अशी "हिंदु मुसलमान की जय" ही तिसरी. मी असे इच्छितो की मौलानांची ही सूचना पत्रकार आणि कार्यकर्ते मान्य करतील आणि लोकांनी याच तीन घोषणांचा वापर करावा असे त्यांना मार्गदर्शन करतील.'

१८ हजार मुसलमानांनी अफगाणिस्तानला पारंपारिक 'हिजरात' केल्यामुळे खिलाफत चळवळीला फार जोराची मानसिक चालना मिळाली; ऑगस्टमध्ये महम्मदाच्या अनेक अनुयायांनी 'दुषित' राज्याची धूळ झाडून टाकण्याचा निश्चय केला आणि ते दारूल इस्लाम म्हणजे अफगाणिस्तानात दाखल झाले. हिजरात चळवळ सिंधमध्ये सुरू झाली आणि वायव्य सरहद्द प्रांतात पसरली. परंतु अफगाण अधिकाऱ्यांनी या देशांतर करणाऱ्या लोकांना प्रवेश नाकारला. त्यामुळे त्यांना परत जाणे भाग पडले. मार्गात बरेचसे मृत्युमुखी पडले. 'इंडिया इन १९२०' मधील वृत्तांताप्रमाणे, प्रवासातील अडचणींना बळी पडलेल्या अनेक वृद्ध, स्त्रिया व मुले यांच्या थडग्यांनी' पेशावर ते काबूल हा रस्ता भरून गेला होता.' जेव्हा हे दुःखी देशांतरीत परत आले तेव्हा आपली मालमत्ता इतरांना कवडीमोलाने विकल्यामुळे आपण आपल्या घर, दार संपत्तीला मुकलो आहोत असे त्यांना आढळून आले.

हिंदी क्रांतिकारकांनी सॅन फ्रान्सिस्कोहून चालवलेल्या 'दि इंडिपेंडन्ट हिंदुस्तान' (सप्टेंबर १९२०) पत्राच्या म्हणण्याप्रमाणे अफगाण सरकारने हिंदी लोकांना देशांतरासाठी सवलती देऊ केल्या होत्या, परंतु प्रवेशासाठी अटी घातल्यामुळे त्यांच्या प्रवेशाला मर्यादा पडली. ह्या अटी अशा होत्या : 'अफगाणिस्तानात येण्याची ज्या कुणाची इच्छा असेल त्यांनी आपले राष्ट्रियत्व अफगाणी म्हणून तरी नोंदवावे किंवा पेशावर अगर अफगाण सरहद्द ठाण्यावरून प्रवेशाचा परवाना तरी आणावा.' या अफगाण फर्मानात कुठल्या सवलती दिल्या जातील त्याचा तपशील दिला होता. असे फर्मान जर काढले गेले असले तर ते ज्यांचा इस्लामी आत्मा दुःखी होता आणि जे दारुल इस्लामचा (अफगाणिस्तान) आश्रय घेण्यास उत्सुक होते अशा हजारोंना ते निरुपयोगी ठरले.

याबेळी अफगाणिस्तान आणि ब्रिटिशांचे संबंध नाजूक झाले होते. एवढी मोठी हिंदी प्रजा परदेशात जाऊ देण्याचा धोका हिंदुस्तान सरकार पत्करू शकत नव्हते. आणि त्यांना प्रवेश देऊन अफगाणिस्तान ब्रिटिशांचे शत्रुत्व करण्याचे धाडस करू इच्छित नव्हते. अफगाण राष्ट्रवाद अगदी यौवनावस्थेत असताना, सुमारे अठराव्या शतकाच्या मध्यापासून अदमासे शंभर वर्षे देशाचा सीमा प्रदेश अफगाण सरहद्दीत समाविष्ट केला गेला होता. १९१९ मध्ये राउलट बिलावर ज्यावेळी पंजाबमध्ये

बंड चालू होते आणि याच प्रकरणावर खुद्द वायव्य सरहद्द प्रांतातच अब्दुल गफारखान यांनी मोठ्या प्रमाणावर चळवळ सुरू केली होती, त्यावेळी अमानुल्ला या अफगाणिस्तानच्या नव्या अमीराने आपले स्थान बळकट करण्यासाठी आणि लोकप्रियता मिळावी म्हणून १९१९ च्या वसंतऋतूत सरहद्दीवर लढाई पुकारली. हा हल्ला परतून लावण्यात आला आणि १९२० मध्ये, खिलाफत चळवळ सुरू होण्याच्या सुमारास अफगाण आणि ब्रिटिश दूत यांच्यामध्ये डेहराडून जिल्ह्यातील मसुरी येथे तहाची बोलणी सुरू होती. अफगाण लोकांशी हिंदी लोकांचा संबंध येऊ न देण्याबद्दल ब्रिटिश लोक एवढे जागरूक होते की, नुकतेच सार्वजनिक जीवनात प्रवेश केलेले जवाहरलाल नेहरू, आपल्या आजारी आई व पत्नीबरोबर मसुरीला गेले असताना त्यांच्याकडून आपण अफगाण शिष्टमंडळाशी काही संबंध ठेवणार नाही अशी हमी त्यांच्याकडून संयुक्त प्रांत सरकारने घेतली होती.

हिजरातची मोहीम काढणाऱ्या हजारो अज्ञानी मुसलमानांना ब्रिटिशांच्या आणि अफगाणिस्तानच्या या नाजूक संबंधांबद्दल काहीच जाणीव नव्हती. दारूल-इस्लाम कायमचा दूर राहील यावरही त्यांनी कधी विश्वास ठेवला नव्हता. आपल्या धर्मबांधवांच्या भावना जागृत करणारे मुसलमान पुढारी जनतेच्या या साहसी मार्गाबद्दल बेफिकीर राहिले आणि त्यांनी त्यांना कसलेच मार्गदर्शन केले नाही ही खरोखर दुर्दैवाची गोष्ट होती. खिलाफतच्या आणि असहकाराच्या कार्यक्रमात हिजरातच समावेश नव्हता आणि चळवळीच्या जनकांनी त्यांना थांबवावयास हवे होते. परंतु धार्मिक तीव्रताही चळवळीची पार्श्वभूमी असल्यामुळे आणि हिजरात हा धार्मिक ती वृतेचाच एक आविष्कार असल्यामुळे हिजरातविरुद्ध केलेल्या कुठल्याही सूचनेचा अर्थ अधार्मिक असा लावला गेला असता.

गांधी आणि मुसलमान पुढारी हे जेव्हा देशाचा दौरा करत होते आणि हिजरात जोरात चालू होता तेव्हा प्रांतिक काँग्रेस कमिटयांनी सभा घेऊन असहकाराच्या चळवळीबद्दल आपापली मते व्यक्त केली. काहींचा त्याला पाठिंबा होता तर काही विरुद्ध होते. (याठिकाणी हे लक्षात ठेवले पाहिजे की, रौलट बिलाचा निषेध आणि १९२० ची असहकाराची चळवळ या दोनही चळवळीत गांधींनी सर्व निर्णय स्वतःच घेतले होते. म्हणून या चळवळी काँग्रेसच्या नसून गांधीच्या स्वतःच्या होत्या.) प्रांतिक काँग्रेस कमिटयांची मते, देशातील राजकीय परिस्थिती आणि गांधींची खिलाफत आणि असहकाराची चळवळ यांचा सप्टेंबरमध्ये काँग्रेसचे खास अधिवेशन भरवून विचार करण्यात आला. संपूर्णपणे राजकीय संस्था असलेल्या काँग्रेसने एक ठराव संमत केला. त्यात या चळवळीचा संबंध मोठ्या कुशलतेने स्वराज्य स्थापनेशी जोडण्यात आला आणि तिला पाठिंबा देण्यात आला. खिलापत प्रकरणी झालेल्या अन्यायाचे आणि रौलट कायद्याच्या अत्याचारांचे थोडक्यात वर्णन करून नंतर ठरावात असे म्हटले आहे की, 'वर निर्देश केलेल्या दोन प्रकरणात झालेल्या अन्यायाचे

परिमार्जन झाल्याशिवाय हिंदुस्तानात समाधान नांदणार नाही. आणि पुन्हा अशा अन्यायाची पुनरावृत्ती होऊ न देण्याचा आणि देशाची इभ्रत प्रस्थापित करण्याचा मार्ग म्हणजे स्वराज्याची स्थापना हा होय असे या कॉंग्रेसचे मत आहे. या कॉंग्रेसचे आणखी असेही मत आहे की, वरील अत्याचारांचे परिमार्जन केल्याशिवाय आणि स्वराज्याची स्थापना झाल्याशिवाय हिंदी लोकांना महात्मा गांधींनी सुरू केलेल्या अहिंसक असहकाराच्या धोरणाला संमती देण्याशिवाय आणि त्याचा स्वीकार करण्याशिवाय गत्यंतर नाही.'

खिलाफत चळवळीत भाग घेण्याविरुद्ध कॉंग्रेसमध्ये जबरदस्त आवाज उठत होते. पण शेवटी गांधींच्या सर्वात मोठ्या आवाजाने त्यावर मात केली. १९२० मध्ये नागपूरला भरलेल्या कॉंग्रेसच्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. विजयराघवाचारी हे सुद्धा या चळवळीबद्दल साशंक होते. परंतु नागपूर अधिवेशनाने चळवळीला संमती दिली आणि तिची व्याप्ति स्पष्ट केली. नागपूर ठरावाने अगदी 'किमान त्यागाची' मागणी केली आणि सुचवले : (अ) पदव्यांचा आणि सन्माननीय अधिकाराच्या जागांचा त्याग, आणि स्थानिक संस्थातील नेमलेल्या सभासदत्वाचा राजीनामा द्यावा. (ब) सरकारी अधिकाऱ्यांनी भरवलेल्या किंवा त्यांच्या सन्मानार्थ भरवलेल्या सरकारी किंवा निमसरकारी समारंभांना किंवा दरबारांना हजर रहाण्याचे नाकारावे (क) सरकारी मालकीवर, मदतीवर किंवा नियंत्रणाखाली चालणाऱ्या शाळा व महाविद्यालयामधून मुलांना हळूहळू काढून घ्यावे आणि त्या ऐवजी निरनिराळ्या प्रांतात राष्ट्रीय शाळा व महाविद्यालये स्थापन करावी. (ड) वकील व पक्षकार यांनी ब्रिटिश न्यायालयावर हळूहळू बहिष्कार टाकावा आणि खाजगी भांडणे तोडण्याकरिता त्यांच्या मदतीने खाजगी लवादी कोर्टे स्थापन करावी. (इ) लष्करी, कारकुनी आणि कामगार वर्गांनी मेसापोटेमियामधील नोकऱ्याकरिता उमेदवार म्हणून भरती होण्याचे नाकारावे. (फ) नवीन कायद्याखालील निवडणूकीस उभे रहाण्याचे उमेदवारांनी नाकारावे आणि हा कॉंग्रेसचा सल्ला डावलून निवडणुकीस उभे रहाणाऱ्यांना मते देण्याचे मतदारांनी नाकारावे. आणि (ग) विदेशी मालावर बहिष्कार घालावा.

नवीन कायदेमंडळाच्या निवडणुकीच्या सुमारासच हा ठराव बाहेर आल्यामुळे विधीमंडळात जाण्याची महत्वाकांक्षा बाळगणाऱ्या अनेक लोकांच्या योजना विस्कटून गेल्या. ज्या राष्ट्रीय उमेदवारांनी आपली उमेदवारी जाहीर केली होती आणि जे अमृतसर येथे कॉंग्रेसने संमत केलेल्या ठरावाच्या आदेशानुसार, वर्षभर आपली निवडणूक मोहीम चालवीत होते, त्यांनी आपली उमेदवारी मागे घेतली. जवळजवळ ८० टक्के मतदारांनी मतदान केले नाही. आणि अनेक ठिकाणी मतपेट्या रिकाम्या आढळल्या.

कॉंग्रेसचा ठराव जणू काय फक्त हिंदूंनाच उद्देशून होता आणि मुसलमानांना जणू काय धार्मिक संमतीची गरज होती म्हणून, जमियत-उल्-उलेमांनी एक फतवा

काढून, निवडणुका, सरकारी शाळा व महाविद्यालये आणि न्यायालये यांच्यावर बहिष्कार घालण्याचा आणि परकीय सरकारनी बहाल केलेल्या सर्व पदव्या आणि अधिकार सोडून देण्याचा आदेश मुसलमानांना दिला ह्या फतव्यावर ४२५ प्रमुख विद्वानांच्या सह्या होत्या आणि नंतर आणखी ४७० सह्या त्याला जोडल्या होत्या.

या चळवळीच्याविरुद्ध पण काँग्रेसच्या मार्गात अडथळा निर्माण न करू इच्छिणाऱ्या काँग्रेस पुढाऱ्यांपैकी महम्मद अली जीना हे एक होते. त्यावेळी ते मुस्लिम लीगचे अध्यक्ष होते. आणि त्यांच्या अध्यक्षीय भाषणावरून असे दिसून येते की, लीगवादी मुसलमानांना असहकाराच्या लढ्यापासून दूर ठेवण्याची त्यांची वृत्ती नव्हती. त्यांनी असे उद्‌गार काढले की : 'खिलाफत परिषदेच्या प्रमुखांनी पाठिंबा दिलेला असहकाराचा कार्यक्रम श्री. गांधींनी देशापुढे ठेवला आहे. त्याची तत्त्वे तुम्हाला मान्य आहेत की नाहीत, ती मान्य केल्यास त्याचा तपशील तुम्हाला मान्य आहे की नाही हे तुमचे तुम्हीच ठरवायचे आहे. या लढ्याचा परिणाम तुम्हाला व्यक्तीशः भोगावा लागणार आहे. आणि म्हणून निर्णय घेण्यापूर्वी या प्रश्नाचा साधक बाधक विचार करणे आणि आपली शक्ती अजमावणे हे फक्त तुमच्या स्वतःवरच अवलंबून आहे. पण एकदा तुम्ही पुढे जाण्याचा निर्णय घेतलात की, कुठल्याही परिस्थितीत मागे हटू नका.' (श्रोत्यातून 'नाही नाही, कधीच नाही' असे आवाज) जीना पुढे म्हणाले : 'दरम्यान आपल्या "घराकडून" मायबाप सरकारने नुकत्याच पाठवलेल्या खलित्याने दिलेल्या अधिकाराने अधिक सामर्थ्यवान बनलेला, आम्हा दुर्दैवी मुसलमानांना आळीपाळीने सहानुभूती दाखवणारा आणि महात्मा गांधींची "मुर्खात मूर्ख योजना" (शेम शेमच्या आरोळ्या) म्हणून खेद व्यक्त करणारा व्हाइसरॉय, मोठ्या रुबाबदारपणे शिखरावरच्या सिमल्याला बसला आहे. युद्धातील गंभीर परिस्थितीच्या काळात जेव्हा हिंदुस्तानी रक्ताला आणि सुवर्णाला फार मागणी होती, आणि दुर्दैवाने ती पुरी केली जात होती, तुर्कस्तानचा कणा मोडण्यासाठी आणि रौलट बिलाच्या शृंखला विकत घेण्यासाठी पुरी केली जात होती, तेव्हा त्यावेळी आम्ही ज्याबद्दल मोठमोठ्या वल्गनांची भाषा ऐकली तो "बदललेला दृष्टिकोन" तो हाच.'

परंतु, जवाहरलाल नेहरूंनी आपल्या आत्मचरित्रात म्हटल्याप्रमाणे, 'काँग्रेसमध्ये झालेली नवी घडामोड—असहकार, आणि तिला अधिक लोकप्रियता आणि जन-संघटना सामर्थ्य देणारी तिची नवी घटना जीनांना अजिबात पसंत नव्हती. हिंदु-स्तानीत भाषणाची मागणी करणाऱ्या खादीधारी जमावात ते अगदी एकाकी पडले.'[९] त्यांनी काँग्रेस सोडली आणि ते काँग्रेसमध्ये कधीच परत आले नाहीत. १९२० च्या काँग्रेसला हजर असलेल्या १४५८२ प्रतिनिधींपैकी १०५० मुसलमान होते.

एक वर्ष लोटले, अनेक हिंदू आणि मुसलमानांना अटक करण्यात आली. पण, 'जनतेचा लढा अजून सुरू व्हावयाचा होता'; नेत्यांनी अजून हिरवा कंदील दाखवला

९. नेहरूंचे 'आत्मचरित्र', (पुनरावृत्ती १९५३), पृ. ६७–६८.

नव्हता. इतक्यात, काँग्रेस आणि इतर संघटनांनी पूर्वी संमत केलेल्या ठरावापेक्षा, चटकन ध्यानात येईल असा निराळा ठराव, ८ जुलै १९२१ च्या खिलाफत परिषदेने संमत केला. ठरावात म्हटले होते : 'मुसलमानाने यावेळी ब्रिटिशांच्या सैन्यात रहाणे, दाखल होणे किंवा सैन्य भरती होण्यास इतरांचे मन वळवणे हे सर्व प्रकारे पाखंडी आहे, आणि धर्माच्या आज्ञा सैन्यातील प्रत्येक मुसलमान पाळत आहे हे पहाणे मुसलमानांचे, विशेषत: उलेमांचे कर्तव्य आहे.' परिषदेने असाही निर्णय घेतला होता की, जर ब्रिटिश सरकारने तुर्कस्तानवर स्वारी केली तर हिंदी मुसलमान हिंदुस्तानचे स्वातंत्र्य जाहीर करतील. आणि काँग्रेसच्या येत्या अधिवेशनात हिंदी लोकसत्ताकाचा झेंडा फडकवतील. परिषदेचे अध्यक्ष महम्मद अली यांनी इतके भावनाविवश भाषण केले की, सरकारने ते देशद्रोही ठरवले आणि त्यातून त्यांच्यावर खटला उभारण्यास पुरावा मिळवला. त्यांच्याबरोबर त्यांचे बंधू शौकत अली, डॉ. सैफुद्दिन किचलू, शारदापिठाचे जगद्गुरु शंकराचार्य, मौलाना निसार अहमद, पिरगुलाम मुझादिन आणि मौलवी हुसेन अहमद यांच्यावरही खटला भरला गेला.

हे सारे सप्टेंबरमध्ये घडले आणि ५ ऑक्टोबरला काँग्रेस कार्यकारिणीने, खिलाफत परिषदेच्या ठरावाला पाठिंबा दर्शवला, आणि महमद अलींच्या त्या भाषणाचा पुनरुच्चार १६ ऑक्टोबरला करण्याचा आदेश मुसलमानांना दिला. ठरावाची अंमलबजावणी देशभर हजारो व्यासपिठावरून करण्यात आली. लढ्यात भाग घेणाऱ्या व्यक्तींनी काही अटी पाळल्या पाहिजेत या शर्तीवर, प्रांतिक काँग्रेस कमिट्यांना सविनय कायदेभंगाचा लढा सुरू करण्याची परवानगीही कार्यकारिणीने दिली. अटी अशा होत्या : (१) सत्याग्रह्याने विलायती वस्त्रे टाकून खादी वापरली पाहिजे; (२) त्याला सूत कातता आले पाहिजे; (३) हिंदू मुसलमान ऐक्यावर व अहिंसेवर त्याची निष्ठा असली पाहिजे; (४) अस्पृश्यता निवारण्यासाठी त्याने काम केले पाहिजे.

चळवळ अजून सुरू व्हावयाचीच होती. पण सावधगिरीचे उपाय म्हणून सरकारने काँग्रेस पुढाऱ्यांना आधीच पकडले, संयुक्त प्रांताच्या प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या सर्वच्या सर्व ५५ सभासदांना अटक केली आणि अनेक प्रतिबंधक कायदे जारी केले. १७ नोव्हेंबरला मुंबई रक्ताने न्हाली. प्रिन्स ऑफ वेल्सच्या आगमनाचे निमित्त झाले. त्यांच्या भेटीवर बहिष्कार घालण्याचा निर्णय झाला होता. प्रक्षुब्ध झालेले हजारो लोक रस्त्यारस्त्यातून हिंडत होते. आणि चार दिवस शहरात चकमकी, धुमाकूळ आणि रक्तपात चालू होता. त्यात ५३ माणसे दगावली व ४०० जखमी झाली. झपाट्याने वाढणाऱ्या स्वयंसेवक संघटना सरकारने बेकायदेशीर ठरवल्या आणि हजारो तरुणांना तुरुंगात डांबले. या सर्व घडामोडींनी गांधींना आपल्या भावी कार्याची दिशा मिळाली. काँग्रेसने आपले इतर सर्व कार्यक्रम स्थगित केले आणि १८ व त्याहून अधिक वयाच्या सर्व तरुणांना राष्ट्रीय स्वयंसेवक दलात सामील होण्यास

सांगावे असा एकच ठराव संमत करून घेण्यास १९२१ च्या आपल्या वार्षिक अधिवेशनाच्या प्रतिनिधींना प्रवृत्त केले.

या चार वर्षाच्या अशांततेच्या काळात, कॉंग्रेस कधी नव्हती इतकी सामर्थ्यशाली बनली आणि प्रथमच ती जनतेची संघटना झाली. प्रांतिक कॉंग्रेस कमिटयांनी आर्थिक प्रश्न हातात घेतले आणि ते लोकापुढे मांडण्यासाठी ही चळवळ निवडली. आंध्र कॉंग्रेस कमिटीने सरकारी कर वगैरे भरण्याचे थांबवण्यासाठी, डिसेंबर १९२१ मध्ये मोहीम काढण्याचा निर्णय घेतला. आणि हे योजलेले पाऊल आपल्या लढयाच्या कक्षेबाहेरचे आहे असा निर्णय देऊन गांधींनी ते थांबवले नसते तर ही मोहीम फक्त आंध्र पुरतीच मर्यादित न रहाता इतर अनेक प्रांतात फैलावली असती. चळवळीचा प्रारंभ बिंदू अर्थातच खिलाफत हा होता. पण पुढे तो प्रश्न केवळ नाममात्र राहिला आणि तिची परिणती संपूर्णपणे राजकीय लढयात झाली.

चळवळीची व्याप्ती वाढत असतानाच ५ फेब्रुवारी १९२२ रोजी चौरीचौराला एक अघोर हिंसेची खेदकारक घटना घडली. चौरीचौरा हे संयुक्त प्रांताच्या गोरखपूर जिल्ह्यातील एक खेडे आहे. या खेडयातील शेतकऱ्यांनी एक मिरवणूक काढली. त्या काळात अनेक मिरवणकींच्या जे नशिबात येत असे तसेच या मिरवणुकीच्याही आले. मिरवणुकीवर पोलीसांनी गोळीबार केला, पण ती बरखास्त झाली नाही. आणि पोलीसांचा दारूगोळा संपला. ते पोलीस स्टेशनवर जाण्याकरिता परतले; परंतु लोकांनी त्यांचा पाठलाग केला, त्यांना स्टेशनच्या आवारात कोंडले, दरवाजाला कडी घातली आणि इमारतीला आग लावून दिली. आतमध्ये २१ कॉन्स्टेबल व १ सब-इन्स्पेक्टर होता. ते सर्व जळून खाक झाले. संपूर्ण अहिंसा ही चळवळीची पहिली अट होती. त्यामुळे या घटनेने गांधींना मोठा धक्का बसला आणि त्यांच्या आग्रहामुळे कॉंग्रेस कार्यकारी कमिटीने, सविनय कायदेभंगाच्या जनता चळवळीचा त्याग केला. अनेक कॉंग्रेसजनांनी रागाने याचा निषेध केला. त्यापैकी काहींनी २४ आणि २५ फेब्रुवारीला दिल्ली येथे भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या अधिवेशनात गांधींवर निंदाव्यंजक ठराव आणावा असे सुचवले. त्यांना यात यश आले नाही, परंतु कार्यकारिणीचा ठराव दुरुस्त करून घेण्यात ते यशस्वी झाले. त्यांनी अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे मन वळवले आणि वैयक्तिक कायदेभंग व विदेशी मालाच्या आणि दारूच्या दुकानावर निरोधन करण्याची परवानगी प्रांतिक कॉंग्रेस कमिटयांना दिली गेली.

आश्चर्याची गोष्ट अशी की, अशा प्रकारे जनतेची चळवळ संपुष्टात आली होती आणि धोक्याचा संभव उरला नव्हता, तरी सरकारने यंग इंडिया मधील तीन लेखांचे निमित्त करून गांधींवर खटला भरला व १३ मार्चला त्यांना अटक केली. सी. एफ्. अँड्रयुज यांनी म्हटल्याप्रमाणे 'व्यावहारिक दृष्टीने तो एक कुशल प्रहार होता पण त्यात औदार्य बुद्धी नव्हती.' गांधींच्या अटकेनंतर चळवळ बहुतेक पूर्णपणेच थंडावली

त्रिपोलीच्या लढाईने सुरू केलेल्या आणि महायुद्धाच्या शांतता तहामुळे विनाशाची दिशा प्राप्त झालेल्या तुर्कस्तानच्या दुर्दैवामुळे, हिंदू मुस्लिम राजकीय ऐक्यासाठी एक विशिष्ट परिस्थिती निर्माण झाली यात शंका नाही, पण प्रत्यक्षात अशी परिस्थिती निर्माण होणे शक्य आहे हे गांधींनी जगाला दाखवून दिले. गांधींनी अर्थातच आपल्या कार्याला नाटयरूप दिले, त्यामुळे त्यांची कर्तबगारी उभ्या जगाने पाहिली. पण गांधींची चळवळ म्हणजे तकतकीत स्मृती मागे ठेवणारे फक्त एक नाटकच होते काय ?

प्रकरण सतरावे

# पुनश्च मतभेद

राष्ट्रीय संघटना आणि मुस्लिम संघटना या दोन विभिन्न संघटना गांधींच्या नेतृत्वाच्या दुव्याने एकत्र आल्या असल्या तरी त्यांची पार्श्वभूमी ही जुन्या जातीय राजकारणाचीच होती. मुसलमानांचा आंतरराष्ट्रीय इस्लामवाद व इतर जातीय कल्पनावरील निष्ठा, आणि हिंदूंचा त्यांना स्पष्ट विरोध, या गोष्टी पुढील मतभेदाला कारणीभूत झाल्या. हे मतभेद खुद्द खिलाफत आणि असहकार चळवळीतच सुरू झाले होते. चळवळ ऐन भरात असताना, १९२१ मध्ये, खुद्द गांधींनीच ही गोष्ट कबूल केली होती. हिंदू मुस्लिम ऐक्य नावाच्या आपल्या लेखात त्यांनी लिहिले होते : 'मला हे माहित आहे की, अजून एकमेकांबद्दल पुष्कळच अविश्वास आहे. अनेक हिंदूंचा मुसलमानांच्या प्रामाणिकपणावर विश्वास नाही. त्यांना वाटते की, मुसलमानांच्या दृष्टीने, स्वराज्य म्हणजे मुसलमानांचे राज्य. त्यांचे याबाबत असे समर्थन आहे की, ब्रिटिश नसते तर हिंदुस्तानात मुसलमानी साम्राज्य स्थापन करण्याकरिता हिंदी मुसलमान मुस्लिम राज्यांना मदत करतील. आणि दुसऱ्या बाजूला मुसलमानांना अशी भीति वाटते की, प्रचंड बहुसंख्येने असलेले हिंदू आपल्याला दडपून टाकतील..' अफगाणच्या अमीराला १९१९ मध्ये मुद्दाम आमंत्रण देऊन, मुसलमानांनी आक्रमण करण्यास बोलावले असा आक्षेप उघड उघड अनेक हिंदू घेत होते, आणि या मताला दुजोरा देणारा पुरावा पुढे मांडून काही वर्तमानपत्रांनी त्यावर लेखमाला लिहिल्या. हा पुरावा खरा होता की, बाजारी गप्पांवर आधारित होता हे सांगणे कठीण आहे.

हिंदूंच्या या भीतीला, सेशन कोर्टात मौलाना महम्मद अलींनी ज्युरीला उद्देशून केलेल्या भाषणाने एक परीने पुरावा मिळाला. अफगाण स्वारीच्या संदर्भात ते म्हणाले :

अतिशय खात्रीलायक पुरावा असल्याशिवाय एक इस्लामधर्मीय दुसऱ्या इस्लाम धर्मीयाविरुद्ध मत देणार नाही. आमच्या मुस्लिम बंधुंनी पुकारलेले युद्ध हे बेजबाबदार आक्रमण आहे की, धर्मसंरक्षण आहे याची खात्री झाल्याशिवाय अर्थातच आम्ही त्यांच्याविरुद्ध हत्यार उचलू शकत नाही, आता आमची भूमिका अशी आहे. अमीराच्या आकसाचा किंवा मूर्खपणाचा जास्त खात्रीलायक पुरावा मिळाल्याशिवाय मुसलमानांसकट सर्व हिंदी सैन्याने अफगाणिस्तानावर स्वारी करणे, तो पादाक्रांत

करणे आणि अशा प्रकारे अधिक गुंतागुंत आणि प्रक्षोभ याचा बळी होणे हे आम्हाला खचितच नको आहे.

परंतु याच्या उलट, जर शैनशहा अमीराचे हिंदुस्तान आणि त्याचे लोक यांच्याशी काही भांडण नसेल; आणि जर सेक्रेटरी ऑफ स्टेटने जाहीरपणे मान्य केल्याप्रमाणे त्याच्या प्रेरणा सबंध इस्लामिक जगात निर्माण झालेल्या आणि त्याने ज्याच्याशी आपली आत्यंतिक सहानुभूती जाहीरपणे व्यक्त केली असेल त्या असंतोषातून निर्माण झाल्या असतील; म्हणजे, कमकुवत मुसलमानाला त्याच्या मर्यादित ताकतीत असलेल्या हिजरातचा विचार करण्यास लावणाऱ्या आणि प्रबळ मुसलमानांना त्यांच्या आटोक्यात असलेल्या जेहादचा विचार करावयास लावणाऱ्या धार्मिक हेतूने जर शैनशहा प्रेरित झाला असेल; आणि जर त्याने ज्यांचा बलावर आणि अधिक बळावर विश्वास आहे अशांचे आव्हान स्वीकारावयाचे ठरवले असेल; आणि जर मुसलमानांना खिलाफतविरूद्ध युद्ध करण्यास लावणाऱ्या आणि जेहादमध्ये घडलेल्या लोकांच्याविरूद्ध, असणाऱ्या लोकांशी, त्याचप्रमाणे जझरित-उल्-अरब आणि इतर पवित्र स्थाने, यांच्यावर चुकीचा कबजा असणाऱ्या लोकाविरूद्ध, इस्लामला कमकुवत करणाऱ्या लोकांविरूद्ध, इस्लामविरूद्ध पक्षपात करणाऱ्या लोकांविरूद्ध, आपल्या इस्लामच्या ध्येयाचा प्रचार करण्यासाठी आम्हाला संपूर्ण स्वातंत्र्य नाकारणाऱ्या लोकांविरुद्ध, जर आपली ताकद पणाला लावण्याचा त्याचा विचार असेल तर, इस्लामचा कायदा स्वच्छपणे असे सांगतो की, पहिली गोष्ट म्हणजे कोणत्याही मुसलमानाने शैनशहाविरुद्ध कुणालाही कसलीही मदत करता कामा नये आणि दुसरी गोष्ट म्हणजे, जेहादचा लढा जर स्वतःच्या प्रदेशात आला तर त्यातील प्रत्येक मुसलमान स्त्री-पुरुषाने मुजाहिद्दीनमध्ये सामील झाले पाहिजे आणि त्यांना आपल्या सर्व शक्तीनिशी मदत केली पाहिजे.

परंतु, हिंदूंची अफगाणिस्तानबद्दलची भीति महम्मद अलींच्या ज्युरीपुढील प्रांजळ निवेदनाने सुरू झाली नव्हती. १९१९ च्या अफगाण स्वारीपासून आणि त्याबद्दल खाजगी संभाषणातून मुसलमानांची जी वृत्ती दिसून आली होती तेव्हापासून होतीच. हिंदूंच्या या भीतीची दखल गांधींना घ्यावीच लागली. हिंदू मुस्लिम ऐक्यासाठी जगलेला आणि अखेरीस मृत्यू पावलेला तो माणूस होता. त्यांनी महम्मद अलींच्या भाषणापूर्वी कितीतरी अगोदर आपल्या ४ मे १९२१ च्या यंग इंडियाच्या अंकात या विषयावर लिहिताना म्हटले होते : 'अफगाणिस्तानच्या अमिराने जर ब्रिटिश सरकारशी युद्ध पुकारले तर एका अर्थाने मी त्याला खात्रीने सहाय्य करीन. म्हणजे माझ्या देश बांधवांना असे उघडपणे सांगेन की, ज्या सरकारने राष्ट्राचा विश्वास गमावला आहे त्याला सत्तेवर टेवण्यास मदत करणे हा गुन्हा आहे.' ही स्वारी परतवून लावण्यात आली आणि अशाच प्रकारची स्वारी पुढे परत झाल्यास लोकांची वृत्ती काय राहील याबद्दल १९२१ मध्ये चाललेली चर्चा बरीचशी जर तरच्या स्वरुपातच राहिली. परंतु महम्मद अलींच्या आणि गांधींच्या निवेदनातील फरक कुणालाही

सहज दिसून येईल. महम्मद अलींनी इस्लामच्या नावाखाली, मुसलमान बंधुभगिनींना 'मुजाहिद्दीनमध्ये सामील व्हा आणि सर्व शक्तीनिशी त्यांना मदत करा' असा आदेश दिला, तर गांधींनी आपल्या देशबांधवांना—अर्थात हिंदू आणि मुसलमान – दोघांनाही तटस्थ रहाण्याचा आणि 'ज्या सरकारने राष्ट्राचा विश्वास गमावला आहे त्याला सत्तेवर रहाण्यास मदत' न करण्याचा आदेश दिला. लोकांना स्वराज्य देण्याऐवजी रौलट कायदा दिल्यामुळे आणि याला लोकांनी विरोध केला तेव्हा त्यांच्या भावना निर्घृणतेने दडपून टाकल्यामुळे मुख्यत: हिंदुस्तान सरकारने राष्ट्राचा विश्वास गमावला होता. तुर्कस्तानला अनुकूल अशा तहाच्या अटी संमत करून घेण्याइतका दबाव पाडण्यास ते चुकले, हे कारण दूरचे होते. म्हणून मुसलमानी देशांची सत्ता हिंदुस्तानात पसरण्याच्या शक्यतेची भीति अनेक हिंदूंना वाटत होती, आणि ते मुसलमानांप्रमाणे अफगाण स्वारीबरोबर सहकार्य करून त्यांचे स्वागत करण्यास प्रत्यक्षपणे किंवा तटस्थ राहून अप्रत्यक्षपणेसुद्धा कधीच तयार झाले नाहीत. काही सुशिक्षित मुसलमानांत अफगाणिस्तानला अनुकूल भावना खालीनेच मूळ धरू लागल्या होत्या. मुस्लिम लीगच्या १९२१ च्या वार्षिक अधिवेशनात पूर्ण स्वराज्याच्या ठरावाला विरोध करताना, सरकारी वर्तुळात मान्यता पावलेल्या रझा अलींनी विचारले की, हिंदुस्तानचा सर सेनाधिपती कोण होणार; (त्यांच्या म्हणण्याचा अर्थ असा होता की, कोणीही लायक भारतीय मिळण्यासारखा नव्हता.) प्रतिनिधींपैकी एकाने ताबडतोब उत्तर दिले, 'अन्वर पाशा', तुर्कस्तानचे परराष्ट्र मंत्री.

हिंदू मुसलमानात अशा परस्पर विरोधी भावना वाढत असतानाच मोपलांच्या बंडाची फार मोठी शोकांतिका घडली. तिने, दोनही जमातींच्या अफगाणिस्तानकडे बघण्याच्या निरनिराळ्या दृष्टिकोनामुळे उद्‌भवलेले मतभेद अधिक तीव्र केले. अगदी खाली दक्षिणेपर्यंत पसरत गेलेल्या खिलाफत घोषणांचे पडसाद मलबार किनाऱ्याच्या डोंगराळ पट्ट्यात घुसले. आणि त्यांनी मोपलांना ब्रिटिश सत्तेविरूद्ध जोरदार बंड उभारण्याची स्फूर्ती दिली. त्यांचा हल्ला इतका दृढ निश्चयी स्वरुपाचा होता की, मलबार प्रदेशाच्या एका तुकड्यावरील ब्रिटिश सत्ता काही दिवस संपुष्टात आणली गेली आणि त्यावर 'खिलाफत राजा' म्हणून महमद हाजीच्या अंमलाखाली खिलाफत राज्याची स्थापना झाली. मोपलांच्या धार्मिक कडवेपणामुळे, काही मोपलांनी विजयाच्या धुंदीत आपल्या तरवारी हिंदुंविरूद्ध उपसल्या आणि या छोट्या खिलाफत राज्याचा अंत समीप आणला. मुसलमानांच्या दृष्टीने हिंदू हे काफर होते हे ते विसरू शकले नाहीत.

मलबार किनाऱ्यावर समुद्र व पर्वत यांच्यामध्ये अनेक दऱ्या आणि डोंगरांच्या रांगाच्या रांगा आहेत. त्या बहुतेक सर्व घनदाट जंगलांनी झाकून गेल्या आहेत या ठिकाणी नवव्या शतकात काही अरब वस्ती करून राहिलेले होते. त्यांनी द्रविड व हिंदू मुलींशी लग्ने केली होती. यांनी ही मोपलांची नवी जात निर्माण केली

होती. मुसलमानी धर्म मानणाऱ्या अरबांचा व्यापारी म्हणून हिंदुस्तानशी फार जुना संबंध होता. १९ व्या शतकात, अनेकवेळा त्यांनी या हिंसेचे प्रदर्शन केले होते. खिलाफतच्या आवाहनानंतर त्यांनी शस्त्रे जमवण्यास व वाटण्यास सुरुवात केली आणि युद्धाची तयारी केली. या गोष्टीचा सुगावा तारीख २५ जुलै १९२१ रोजी सरकारला प्रथम लागला. झडतीचा हुकूम सुटला. या झडतीतून पुढे पुकोटूर येथे दंगा उद्‌भवला आणि त्यात पोलीसांवर मात केली गेली. यानंतर मोपलांच्या पाच हजार शिपायांनी परपांगडीवर हल्ला चढवला, एका ब्रिटिश अधिकाऱ्याचा व एका पोलीस अधिकाऱ्याचा खून केला, रेल्वे स्टेशन जाळले आणि रूळ उखडून टाकले.

दुसऱ्या दिवशी बंडखोर आणि ब्रिटिश सैन्याची तुकडी यांच्यामध्ये घनघोर युद्ध झाले. आपले दोन अधिकारी आणि अनेक लोक गमावल्यानंतर ब्रिटिश सैन्याधिकाऱ्याने आपली कुवत ओळखून चढाईची लढाई सोडली आणि संरक्षक लढाई पत्करली. जवळपासच्या भागातील तुकड्यांना पाचारण करण्यात आले परंतु विजयी आगेकूच करणाऱ्या बंडखोरांनी त्यांचा पाडाव करून त्यांना मागे परतवले. आता ब्रिटिशांनी ज्यांच्या हृदयात इस्लामच्या हाकेला प्रतिसाद मिळणार नाही अशा गुरखा आणि गढवाली तुकड्या आणि बरमी सैन्यातील काचीन तुकड्या युद्धासाठी पाठवल्या. यांना जंगल नीतिही पूर्णपणे अवगत होती. डोंगरी तोफांची तुकडी ही तेथे त्वरित हलवण्यात आली. परंतु अनेक ठिकाणी जंगल फारच घनिष्ट असल्यामुळे त्याचा उपयोग नव्हता. 'जागृत झालेले मोपला किती भयंकर होते याचे एक उदाहरण म्हणून पंडरीव ठाण्यावरील हल्ला पुढे करता येईल. या ठाण्यावर दोन आघाडीवरून पहाटे हल्ला चढवण्यात आला. आतल्या बाजूला ६७ व बाहेरच्या बाजूला १५० लोक ठार मारले गेले. आणि लहानशा ठाणबंद फौजेपैकी १ ब्रिटिश अधिकारी आणि ८ इतर सैनिक ठार व २ गुरखा अधिकारी व २७ इतर सैनिक जखमी झाले. ७ जानेवारी १९२२ रोजी खिलाफत राजा महमद हाजी याला त्याच्या २१ अनुयायांसह पकडण्यात आले व २० तारखेला, लष्करी कोर्टाच्या हुकूमानुसार त्याला त्याच्या ६ अनुयायांसकट, गोळ्या घालून ठार मारण्यात आले. बंडाचा हा जवळ जवळ शेवटच होता. जानेवारी अखेर बंड संपुष्टात आले आणि बऱ्याचशा बंडखोरांना पकडून खास न्यायासनासमोर उभे करण्यात आले.' [१]

पुढील आकड्यावरून मोपला बंडाच्या अत्याचारांची अजमावणी करता येईल. 'बंडवाल्यांपैकी लढाईत २२६६ ठार, १६१५ जखमी, ५६८८ कैदी झाले आणि ३८२५६ शरण आले.' मोपला कैद्यांना लष्करी कोर्टापुढे उभे करून शिरच्छेद किंवा गोळ्या घालून त्यांना ठार करण्यात आले. सूड घेण्याचे अघोरी कृत्य एका मालगाडीत केले गेले. कालीकतहून मद्रासला जाणाऱ्या एका मालगाडीच्या डब्यात सुमारे

१. लेफ्ट. जनरल सर जॉर्ज मून कृत Turmoi and Trageny in India in 1914 and after.

७० मोपला (कुणी म्हणतात १००) कोंबले गेले. दक्षिण हिंदुस्तानातील उन्हाळ्यातला सूर्य लोखंडी डब्याला होरपळून टाकत होता. आणि पोडानूर स्टेशनवर जेव्हा डब्यांची दारे उघडण्यात आली तेव्हा ६६ मोपला घुसमटून मेले असल्याचे आणि उरलेले गंभीर परिस्थितीत असल्याचे आढळून आले.

आता, मोपलांनी हिंदुंना केलेल्या शिक्षेबद्दल सांगायचे राहिले आहे. ब्रिटिशांविरूद्ध बंड करीत असताना अडाणी मोपलांनी धर्मवीराची भूमिका घेतली आणि हिंदुंवर हात उगारला. त्यांनी हिंदुंना क्रुरपणे ठार तरी मारले किंवा जबरदस्तीने सुंता करून मुसलमान तरी बनवले. खिलाफत राज्य मिळवण्याचा हाच मार्ग असे त्यांना वाटत होते. त्यांच्या दैनंदिन जीवनात हिंदू जमीनदारांशी त्यांचे शत्रुत्व आधीच निर्माण झाले होते. डब्ल्यू. सी. स्मिथ यांनी आपल्या 'मॉडर्न इस्लाम इन इंडिया' या पुस्तकात म्हटल्याप्रमाणे 'मोपला हे कटुतेने ग्रासलेले होते; तीव्रपणे हिंदू विरोधी, तीव्रपणे ब्रिटिश विरोधी, ज्या जगाने त्यांना फक्त दुःख दिले त्या जगाविरूद्ध ते तितकेच तीव्र बनले होते. त्यांचा दाह हा शत्रूविरूद्ध उफाळणाऱ्या पिडीत वर्गाचा दाह होता. हा भडका पाप नष्ट करून चांगल्याची स्थापना करणाऱ्या धर्मवेडेपणाचा होता.' मोपलांच्या उठावाबद्दल कॉंग्रेसने करवलेल्या चौकशीवरून असे आढळून आले की, या बंडाचा खिलाफत चळवळीशी काही संबंध नव्हता. या चौकशीचा निष्कर्ष असा होता की, बंडवाल्यांचे मुख्य लक्ष्य हिंदू हे होते. त्यांची घरेदारे लुटली गेली होती आणि त्यापैकी अनेकांचे धर्मांतर केले गेले होते; या बंडखोर जमावाला शांत करण्याचा प्रयत्न काही मुसलमानांनी केला, परंतु त्यांचे कोणी ऐकले नाही; कॉंग्रेसने गांधींच्या नावाने जेव्हा त्यांना शांत होण्याची विनंती केली तेव्हा गांधी हे काफर आहेत आणि त्यांचे अनुयायित्व आम्ही करणार नाही असे त्यांनी सांगितले; आणि अलीबंधूंच्या नावाने विनंती केली तेव्हा काफरला मानणाऱ्यांचे अनुयायित्व आम्ही करणार नाही असे ते म्हणाले.

मोपला बंडाने हिंदुना दहशत बसली आणि त्याबरोबरच मोपलांनी हिंदूवर केलेल्या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी किंवा त्यांना नाकारण्यासाठी मुसलमान पुढारी पुढे सरसावले नाहीत म्हणून त्यांच्या मनात या पुढाऱ्यांविरूद्ध अविश्वासही निर्माण झाला. देशाच्या इतर भागात आपण निर्माण केलेल्या ऐक्याच्या वातावरणापासून मोपला प्रकरण स्वतंत्र रहावे ही गांधींची इच्छा समजू शकते. म्हणून त्यांनी हिंदूना सांगितले : 'असे धर्मवेडे उत्पात झाले तरी आपण आपल्या धर्माचे संरक्षण करू शकू असे वाटण्याइतका विश्वास व धैर्य हिंदुंजवळ असलेच पाहिजे. मोपलांच्या मूर्खपणाबद्दल मुसलमानांची शाब्दिक नापसंती ही मुसलमान मैत्रीची कसोटी नव्हे मोपलांनी केलेल्या सक्तीच्या धर्मांतरामुळे आणि लूटमारीच्या वर्तनामुळे आपली मानखंडना झाली असे मुसलमानांना उत्स्फुर्तपणे वाटून त्यांना शरम वाटली पाहिजे, आणि इतक्या शांतपणे आणि कार्यक्षमतेने काम केले पाहिजे की त्यांच्यापैकी अगदी

धर्मांध लोकांनाही अशा गोष्टी करणे अशक्य होऊन बसेल. माझा असा विश्वास आहे की, सर्वसाधारणपणे हिंदुंनी मोपलांच्या माथेफिरूपणाबद्दल मनःसंयमन केले आहे आणि प्रेषिताच्या शिकवणुकीबद्दलच्या मोपलांच्या विकृतीबद्दल सुसंस्कृत मुसलमानांना मनापासून खेद होत आहे.'

परंतु काँग्रेसमधील अनेक हिंदू आपल्या मुसलमान साथींविषयी साशंक आणि संशयी बनले होते, हे आर्य समाजी पुढारी स्वामी श्रद्धानंद यांनी नंतर आपल्या २६ ऑगस्ट १९२६ च्या 'लिबरेटर' मध्ये नमूद केलेल्या वृत्तांतावरून दिसून येते. ते लिहितात : 'काँग्रेसच्या विषय नियामक कमिटीमध्ये मोपलांच्या अत्याचाराबद्दल त्यांचा निषेध करण्याचा प्रश्न आला तेव्हा प्रथम सूचना मिळाली. मूळ ठरावात हिंदुंना ठार मारण्याबद्दल, त्यांची घरे जाळण्याबद्दल आणि त्यांचे सक्तीने धर्मांतर करण्याबद्दल सरसकट सर्व मोपलांचा निषेध केला होता. त्याला खुद्द हिंदू सभासदांनी अशा उपसूचना सुचवल्या की, शेवटी, वरील गुन्हे करणाऱ्या काही व्यक्तींपुरताच तो मर्यादित उरला. आणि तरीसुद्धा काही मुसलमान पुढाऱ्यांना हा ठराव सहन झाला नाही. त्यात आश्चर्य काहीच नव्हते. पण मौलाना हजरत मोहनीसारख्या संपूर्ण राष्ट्रवादी गृहस्थांनी ठरावाला विरोध केला याचे मला आश्चर्य वाटले. त्यांचे म्हणणे असे होते की, मोपला प्रदेश आता दारुल-आम राहिला नसून दारुल-हर्ब झाला होता आणि मोपलांना असे वाटत होते की, आपल्या ब्रिटिश शत्रूबरोबर हिंदू संगनमत करीत आहेत. त्यामुळे ते हिंदुंना कुराण किंवा तलवार दाखवत होते आणि हे योग्य होते. मृत्युपासून सुटका करून घेण्यासाठी जर हिंदू, मुसलमान झाले असतील तर ते धर्मांतर सक्तीचे नसून खुषीचे होते. बरं! व्यक्तिशः काही मोपलांचा निषेध करणारा हा निरुपद्रवी ठराव तरी एकमताने संमत झाला का? नाही, तो बहुमताने संमत झाला. काँग्रेसही आपण सहन करतो म्हणूनच अस्तित्वात आहे आणि आपल्या लहरी लक्षात न घेण्याचा यत्किंचितही प्रयत्न झाल्यास हे वरवरचे ऐक्य तोडून टाकले जाईल असे मुसलमान समजत असल्याचे दर्शवणारी इतर लक्षणेही होती.'

हिंदू मतभेदाला पोषक असा दुसरा घटक, १९२१–२२ सालच्या मोहरमच्या उत्सवाच्यावेळी, बंगाल व पंजाबमध्ये झालेल्या जातीय दंग्यात दिसून आला. १९२३ च्या मार्च आणि एप्रिलमध्ये अमृतसर, मुलतान आणि पंजाबच्या इतर भागात गंभीर स्वरुपाचे दंगे झाले. मेमध्ये अमृतसरमध्ये परत आणखी दंगे झाले आणि सिंधमध्ये खळबळ माजली. जून आणि जुलैमध्ये मुरादाबाद आणि मिरत, त्याचप्रमाणे अलाहाबाद जिल्ह्यात जातीय उद्रेक झाले आणि अजमीर येथे गंभीर दंगा उसळला ऑगस्ट सप्टेंबरमध्ये अमृतसर, पानिपत, जबलपूर, गोंडा, आग्रा आणि रायबरेलीमध्ये अस्वस्थ करून टाकणारे आणखी दंगे उसळले. या सर्वांपेक्षा अधिक गंभीर स्वरुपाचा दंगा सहरणपूर येथे मोहरम उत्सवासंबंधी झाला. नंतर दिल्ली, नागपूर, लाहोर

लखनौ, भागलपूर, गुलबर्गा, शहाजहानपूर आणि कंकिनारा हे भागही यातून सुटले नाहीत. सप्टेंबर १९२४ मध्ये कोहट या ठिकाणी फार मोठा दंगा झाला; 'सुमारे १५५ लोक मारले किंवा जखमी झाले, अंदाजे ९ लक्ष रुपये किंमतीची घरेदारे व संपत्ती नष्ट झाली आणि बऱ्याच मोठ्या प्रमाणात मालमत्तेची लुटालूट झाली. सर्व हिंदू जनता कोहट सोडून गेली.' डॉ. पट्टाभि सितारामय्यांनी 'हिंदी राष्ट्रीय काँग्रेसच्या इतिहासात' नमूद केल्याप्रमाणे '९ आणि १० सप्टेंबरच्या गोळीबार आणि कत्तलीनंतर ४००० हिंदुंना खास गाडीतून हलवण्यात आले. त्यापैकी २६०० रावळपिंडी येथे आणि १४०० इतर ठिकाणी लोकांच्या औदार्यावर दोन महिने रहात होते.'

देशातील इतक्या मोठ्या शहरातून एकाएकी दंगे कसे उदभवले आणि ते कुणीतरी बुद्धीपुरस्सर योजले होते किंवा काय हे अधिकारवाणीने आणि निपक्षपातीपणाने अजूनपर्यंत कुणीही दाखवू शकले नाही. देवळात गोमांस किंवा मशिदीत मारलेला डुक्कर यांच्या नुसत्या दर्शनानेसुद्धा ज्यांचा प्रक्षोभ होईल, अशा दोनही जमातींच्या अडाणी आणि अर्धशिक्षित लोकांच्या धार्मिक मनोभावना जागृत करून हे दंगे, ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या उत्तेजनाने पोलीसांकडून हेतुपूर्वक करवले होते असा आरोप ब्रिटिश राजवटीत अनेकवेळा केला गेला. अधिकाऱ्यांच्या उत्तेजनाचा निश्चित पुरावा मिळत नसला तरी जेव्हा जेव्हा हिंदू मुसलमान एकमेकांच्या जवळ येण्याचे चिन्ह दाखवत होते तेव्हा तेव्हा त्यांना विभक्त ठेवण्यासाठी दंगे योजले गेले होते असा राजकीय लोकांचा दावा होता. जीनांच्या मताप्रमाणे, दंगे पोलीसांनी चेतवले. हिंदुस्तान सरकारच्या १९१९ च्या सुधारणा बिलाची चौकशी करण्यासाठी पार्लमेंटने नेमलेल्या जॉईन्ट सिलेक्ट कमिटीपुढे दिलेल्या साक्षीत जातीय दंग्यासंबंधी बोलताना ते म्हणाले होते, 'तुम्ही जर मला विचाराल तर हे दंगे अनेकदा गैरसमजुतीवर आधारलेले आहेत. आणि त्याचे कारण पोलीसांनी ही किंवा ती बाजू घेतली होती हे आहे. हिंदी संस्थानात हिंदू मुसलमान दंग्याबद्दल क्वचितच ऐकावयास येते हे मला पूर्णपणे ठाऊक आहे, आणि नामनिर्देश केल्याशिवाय कमिटीला हे सांगावयास मला काही हरकत वाटत नाही की, मी एका संस्थानिकाला सहज विचारले, "याबद्दल आपल्याला काय वाटते?" त्यावर त्यांनी मला असे सांगितले, "काहीही गडबड झाली की, त्याचा धागादोरा बहुतेक थेट पोलीसापर्यंत पोचलेला आम्हाला दिसतो. पोलीस ही किंवा ती बाजू उचलून धरत, आम्हाला यावर एकच उपाय आढळला तो म्हणजे गडबड झाल्याचे आम्हाला कळल्याबरोबर आम्ही तो पोलीस अधिकारी त्या जागेवरून हलवतो आणि सारे तेथेच संपते."

या दंग्यांचा एक खेदकारक परिणाम असा झाला की, गांधींनी इतक्या दक्षतेने उभारलेल्या हिंदू मुस्लिम ऐक्यावरचा हिंदुंचा विश्वास उडू लागला. गांधींना फार दुःख झाले. ५ फेब्रुवारी १९२४ ला प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांची मुदतीच्या आधी

सुटका झाली. (१२ जानेवारीला त्यांचे अपेंडिक्सचे ऑपरेशन झाले होते.) आपण जवळ जवळ साध्य केलेले आपले जीवित ध्येय आपल्या डोळ्यासमोर उध्वस्त होत असल्याचे त्यांना दिसून आले. दिल्ली येथील महमद अलींच्या घरात त्यांनी, २१ दिवसांचे उपोषण सुरू केले. दोनही जमातींचे पुढारी हिंसेचे थैमान बंद करण्यास उत्सुक होतेच. गांधींच्या उपोषणाने, परिस्थितीचा विचार करण्याची आणि त्यासाठी एकत्र जमण्याची तातडीची गरज अगदी दारातच येऊन ठेपली. २६ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरला सर्व भारतीयांची एक परिषद भरली. डॉ. पट्टाभि सितारामय्या यांनी या परिषदेचा वृत्तांत पुढीलप्रमाणे दिला आहे : 'स्वातंत्र्य, सद्सद्विवेकबुद्धी आणि धर्म या तत्त्वांचे पालन करण्यासाठी आपण सारी शक्ती वेचू अशी प्रतिज्ञा या परिषदेच्या सभासदांनी केली आणि अगदी प्रक्षोभक परिस्थितीतसुद्धा या तत्त्वांचा त्याग त्यांनी निषेधार्ह मानला. एक मध्यवर्ती राष्ट्रीय पंचायत बनवली गेली; निमंत्रक आणि अध्यक्ष, गांधी होते आणि हकीम अजमलखान, लजपतराय, जी. के. नरीमन, डॉ. एस्. के. दत्ता आणि मास्टर सुंदरसिंग सभासद होते. धार्मिक श्रद्धा आणि त्यांचा आविष्कार, धार्मिक आचारांचे पालन, पुजास्थानांचे पावित्र्य, गोवध आणि मशिदीसमोर वाद्यवादन यासंबंधी काही मूलभूत हक्क परिषदेने निश्चित केले, आणि त्या हक्कांच्या मर्यादा स्पष्ट करणारे निवेदन त्यांना जोडले. वर्तमानपत्रांना आपल्या लिखाणासंबंधी काळजी घेण्याची सूचना देण्यात आली आणि गांधींच्या उपासाच्या शेवटच्या आठवडयात सर्वांनी प्रार्थना करावी अशी विनंती जनतेला करण्यात आली. ८ ऑक्टोबर हा दिवस आभारदिन म्हणून मुक्रर करण्यात आला.'

गांधींचे उपोषण आणि परिषद यामुळे दंगेखोरांना काही काळ आळा बसला असेल पण तो कायमचा उपाय ठरला नाही. राष्ट्रवादाच्या उदयाबरोबर ज्या जातीय संस्था संपुष्टात आल्या होत्या त्यांना जातीय दंग्यामुळे सामर्थ्य प्राप्त होऊ लागले. काही राष्ट्रीय पुढारी आपापल्या जातीय संस्थांच्या व्यासपिठावर जमू लागले. ब्रिटिशांविरूद्ध लढयाऐवजी, हिंदुंना मुसलमानांपासून व मुसलमानांना हिंदुपासून संरक्षण या विषयाला प्राधान्य मिळू लागले. बंगाल व पंजाबमध्ये हिंदू अल्पसंख्य असल्यामुळे जातीय दंग्यांनी हिंदू पुढाऱ्यात असुरक्षिततेची भावना निर्माण केली. या भावनेचे सर्वात प्रमुख आविष्करण म्हणजे हिंदूमहासभेचा उदय. ही संस्था अनेक वर्षे अस्तित्वात असली तरी आपले आस्तित्व जाणवून देण्यास ती असमर्थ ठरली होती. तिचे पहिले महत्त्वाचे अधिवेशन १९२३ मध्ये मदन मोहन मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली बनारस येथे भरले. तिने, अस्पृश्य गणल्या जाणाऱ्या जमातींना सार्वजनिक विहिरी, शाळा आणि देवळे हिंदुंनी खुली करावी असे आवाहन करणारा ठराव संमत केला. प्रांतिक आणि स्थानिक हिंदूसभा संघटित करण्यास सुरुवात झाली. मोपलांचे अत्याचार आणि सक्तीचे धर्मांतर आणि नंतर झालेले मुलतानी दंगे, 'ज्यात पूजास्थाने भ्रष्ट करण्यात आली, अनेक हिंदू ठार मारले गेले, आणि

अनेकांची घरेदारे लुटली व जाळली गेली ' असे मुलतानी दंगे, यामुळे श्रद्धानंदासारख्या हिंदू पुढाऱ्यांना मुसलमानांचे हिंदूत धर्मांतर करण्याच्या चळवळीची आवश्यकता वाटू लागली. अशा प्रकारे शुद्धी चळवळीचा जन्म झाला.

दंग्यामध्ये मुसलमानांनी हिंदुंवर केलेल्या अन्यायाचे परिमार्जन करण्याचा एक अपरिहार्य उपाय म्हणून शुद्धी चळवळ समर्थनीय होती. डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी आपल्या "इंडिया डिव्हायडेड" या पुस्तकात म्हटले आहे : 'मुसलमान आणि राष्ट्रवादी या दोघाकडूनही स्वामी श्रद्धानंदाच्या शुद्धी चळवळीवर पुष्कळच टीका केली गेली. त्यावेळेला ती चळवळ उद्‌भवणे इष्ट होते काय याबद्दल कुणी काहीही म्हणो. पण खिश्चन आणि मुसलमान तिच्या गुणवत्तेबद्दल आक्षेप कसा घेऊ शकतात हे समजणे कठीण आहे. ते स्वतः आपल्या बाटवण्याच्या आणि हिंदुंना आपल्या धर्मात ओढण्याच्या कार्यात सतत निमग्न असतात. मग जर हिंदुंनीही अहिंदुंना आपल्या धर्मात आणण्याचे कार्य सुरू केले तर त्याला त्यांनी विशेषतः जे स्वतःच धर्मांतराच्या कामात मग्न आहेत त्यांनी विरोध करण्याचा संबंध उद्‌भवतोच कुठे? इतरांप्रमाणे धर्मप्रचाराचा हक्क हिंदुंनाही असलाच पाहिजे. परंतु माणसे नेहमीच तर्क किंवा न्यायबुद्धीचा किंवा निःपक्षपातीपणाचा मार्ग अवलंबतात असे नाही. शुद्धी चळवळीविरुद्ध विशेषतः व्यक्तिशः श्रद्धानंदाविरुद्ध मुसलमानात तीव्र द्वेष वसत होता. आणि याचाच परिणाम म्हणजे ते मुसलमान मारेकऱ्याला बळी पडले. मुसलमानांच्या बाजूने त्यांनी तबलीघ व तांझीम चळवळी सुरू केल्या.

ऐक्याच्या भाषेबद्दल हिंदू आणि मुसलमान दोघेही व्यक्तिशः उदासीन होते. त्यापैकी काही तर धर्मांतराच्या आणि आपापल्या जमाती भक्कम करण्याच्या कार्यक्रमात गंभीरपणे उतरले होते. या प्रयत्नांनी म्हणण्यासारखे यश मिळवले नव्हते खरे; पण असे प्रयत्न झाले नसते तर हिंदू मुस्लिम ऐक्याची जितकी हानी झाली होती तितकी दंगे होऊनसुद्धा झाली नसती. असे असले तरी बहुतेक हिंदू मुसलमान पुढाऱ्यांनी आपला तोल राखला आणि हिंदू मुस्लिम ऐक्याला वाहिलेल्या त्यांच्या संस्था अबाधित राहिल्या. ऐक्य परिषदेचे उद्‌घाटन करताना महमद अलींनी गांधींना आयुरारोग्य चिंतिले आणि ते म्हणाले, जातीय भांडणे ही पराकोटीची क्षुद्र असतात आणि बहुदा त्यांचा धर्माशी काही संबंध नसताना ती त्याच्या नावाखाली चालतात. मुसलमान पुढाऱ्यांनी हिंदुमहासभेच्या आणि हिंदुंनी मुस्लिम लीगच्या अधिवेशनांना हजर रहाण्याचे चालूच ठेवले. अखिल भारतीय खिलाफत परिषदेतसुद्धा हिंदुस्तानातील व बाहेरील मुसलमानांच्या हितसंबंधांना प्राधान्य मिळाले होते तरीसुद्धा राजकीयनिष्ठांचा पुनरुच्चार केला गेला. दंग्याधोप्यांनी खिलाफत पुढाऱ्यांच्या निष्ठा बारगळल्या नव्हत्या याचा हा पुरावा होता. परिषदेचे अध्यक्ष डॉ. सैफुद्दिन किचलू यांनी पूर्वीप्रमाणे मुसलमान कॉंग्रेसबद्दल आस्था दाखवत नाहीत याबद्दल खेद व्यक्त केला. त्यांनी मुसलमानांना कॉंग्रेसमध्ये सामील होण्याबद्दल आणि तिला मदत

करण्याबद्दल कळकळीचे आवाहन केले. खादी निर्माण करण्याकडे विशेष लक्ष देण्याबद्दल विनंती केली आणि हा कार्यक्रम म्हणजे संघटन किंवा स्वराज्य याची प्रतिकृती नव्हे यावर भर दिला. खिलाफतीच्या काळातील प्रवृत्ती अजूनही परिषदेला व्यापून राहिली होती. महमद अलींनी मांडलेल्या आणि एकमताने संमत झालेल्या एका ठरावात स्वराज्यप्राप्तीकरिता विदेशी कापडावर बहिष्कार टाकणे अपरिहार्य आहे यावर त्यांनी भर दिला आणि मुसलमानांना खादी वापरण्याच्या आणि तिचा सार्वत्रिक प्रसार करण्याच्या कर्तव्याचे बंधन घातले. इस्लामला तारण्याचा फक्त एकमेव मार्ग म्हणजे खादीचा स्वीकार, असा त्यांचा मुसलमान म्हणून विश्वास होता, असे ते म्हणाले. जेथे शेतकरी आपले तुटपुंजे उत्पन्न मँचेस्टर कपडे विकत घेण्यात खर्च करतो अशा खेड्यापाड्यातून हिंदुस्तान वसलेला आहे. सुशिक्षित लोकांनी चरख्याकडे वळणे जरूर आहे. अशिक्षित लोक त्यांचे नेतृत्व अनुसरण्याचा संभव निर्माण होईल आणि ते चरख्याकडे परत फिरतील.

पण खिलाफत परिषदेने जातीय प्रश्नाकडे दुर्लक्ष केले नाही आणि तिने तान्झिम संघटित करण्याच्या योजनेला मान्यता दिली. आपल्या अध्यक्षीय भाषणात किचलू म्हणाले की, एकेकाळी हिंदू आणि मुसलमानांच्या भावनावर ताण असतानाच मदन मोहन मालवीयांनी संघटन चळवळ सुरू केली. आणि म्हणून मुसलमानांनी त्याच्याविरुद्ध चळवळ सुरू केली. खरे म्हणजे पंजाबमधील अशांततेचे कारण आर्थिक होते, कारण सर्व व्यापार व बहुतेक नोकऱ्या हिंदुंच्या हातात होत्या. ते म्हणाले की, मी मशिदी ह्या ज्ञानपीठे बनवीन आणि आपल्या जमातीच्या उद्धारासाठी औद्योगिक शाळांवर कटाक्षाने भर देईन. या औद्योगिक शाळांना पैसा पुरवण्यासाठी मुसलमानांच्या बँका आणि सहकारी संघांच्या बँका बनवा असे त्यांनी सांगितले. पण अर्थपूर्ण गोष्ट अशी होती की, ते पुढे म्हणाले, हिंदू मुस्लिम ऐक्याची सनद म्हणून प्रसिद्ध असलेला लखनौ करार जाळून टाकला पाहिजे.

१९२४ च्या मुस्लिम लीगच्या वार्षिक अधिवेशनाने ही हीच विचारसरणी अनुसरली. मुसलमानांना चरखा व स्वदेशीला वाहून घ्या असे सांगितले आणि त्याचबरोबर तांझीम चळवळ बांधण्याचाही आदेश दिला. खिलाफत व असहकार चळवळीच्या काळात मुस्लिम लीगचे आस्तित्व जवळ जवळ संपुष्टात आले होते. १९२२ मध्ये जणू तिचे प्राण डोळ्यात उतरले होते. त्यावर्षी तिचे वार्षिक अधिवेशनही भरले नाही. १९२३ च्या अधिवेशनाला लोक इतके कमी होते की, तिला तिचे खुले अधिवेशन रद्द करावे लागले. पण चळवळ थांबल्यानंतर १९२४ मध्ये ती परत उदयास आली. आणि मुस्लिम राजकारणाचे वळण शेवटी लीगच ठरवेल इतका ठसा तिने उठवला. वादळी राजकारणापासून गेली तीन वर्षे दूर राहिलेले खुद्द जीनासुद्धा जातीय म्हणून नव्हे तर राष्ट्रीय मुसलमान म्हणून लीगच्या व्यासपीठावर दिसू लागले. त्यांनी जरी काँग्रेस सोडली होती तरी ती हिंदू संघटना नाही असे

त्यांचे अजूनही मत होते. आणि जेव्हा आपमतलबी लोकांनी याच्याविरुद्ध प्रकारचे विधान त्यांच्या तोंडी घातले तेव्हा ३ ऑक्टोबर १९२५ च्या 'टाइम्स ऑफ इंडियात' त्यांनी एक पत्र प्रसिद्ध केले. त्यात त्यांनी म्हटले होते की, 'काँग्रेस ही "हिंदुंची संस्था" म्हणून मी तिचा निषेध केला असे जे विधान माझ्या तोंडी घालण्यात आले आहे, ज्याचा प्रचार तुम्ही अनेकवेळा केला आहे आणि आता तुमच्या "बँन्कर" या प्रतिनिधीने १ ऑक्टोबरच्या अंकात, दुसऱ्या स्तंभात त्याचा पुनरुच्चार केला आहे, ते विधान तुम्ही दुरुस्त करावे अशी माझी पुन्हा इच्छा आहे. माझ्या भाषणाचा हा गैरसमज पसरवणारा हा वृत्तांत तुमच्या वर्तमानपत्रात आल्यानंतर थोड्याच दिवसात मी जाहीरपणे त्याची दुरुस्ती केली होती पण माझी ही दुरुस्ती तुम्ही छापली नाही. म्हणून मी आता तुम्हाला परत अशी विनंती करतो की, हे प्रसिद्ध करा आणि मला उपकृत करा.' १९१९ मध्ये त्यांनी इतर काही लोकांबरोबर रौलट बिलाच्या निषेधार्थ मध्यवर्ती विधीमंडळाचा राजीनामा दिला होता. त्यावेळेपर्यंत ते राष्ट्रवादी प्रवाहाबरोबर राहिले होते. खिलाफतसारख्या आंतरराष्ट्रीय प्रकरणाबद्दल आपल्याला आस्था नाही हेही त्यांनी स्पष्ट केले होते.

परंतु, जणू काय खिलाफत चळवळ झालीच नव्हती, हिंदू मुस्लिम ऐक्य नव्हते आणि नुकतेच झालेले दंगे हे, स्वतःच प्रमुख भाग घेऊन बनवलेल्या लखनौ करारापासून च्यूती झाल्यामुळे निर्माण झाले असे समजून त्यांनी १९२४ च्या लीगच्या अधिवेशनात एक ठराव मांडला. तो एकमताने मंजूर झाला. त्या ठरावात अशी मागणी केली होती की, प्रातिनिधिक मंडळात आणि सार्वजनिक नोकऱ्यात मुसलमानांना योग्य तो हिस्सा मिळण्यासाठी या प्रश्नाची नव्याने तपासणी व्हावी. या ठरावामुळे आपल्यावर जातीय असा शिक्का मारला जाऊ नये असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी आपल्या श्रोत्यांना असे आश्वासन दिले की, ते नेहमीप्रमाणेच राष्ट्रवादी आहेत आणि अजूनही जातीय प्रतिनिधित्वाच्याविरूद्ध आहेत. परंतु, ते पुढे म्हणाले की, दुर्दैवाने त्यांचे मुसलमान देशबांधव त्यांच्याइतके पुढे जाण्यास तयार नाहीत. त्यांनी असे अर्थपूर्ण उद्‌गार काढले की, 'कायदेमंडळात आणि सार्वजनिक नोकऱ्यात निराळे प्रतिनिधित्व हवे असलेल्या मुसलमानांची संख्या मोठी आहे ही गोष्ट खरी आहे. या त्यांच्या भावनेचे पर्यवसान जातीय संघर्षात झाले आहे. ते ऐक्याच्या गोष्टी बोलत आहेत पण ऐक्य आहे कोठे?' जीना पुढे म्हणाले, 'हिंदू जमातीशी भांडण्यासाठी नव्हे, तर आपल्या मातृभूमीकरिता ऐक्य आणि सहकार्य निर्माण करण्याच्यादृष्टीने मुसलमान जमातीची संघटना करणे' हा त्यांच्या ठरावाचा उद्देश होता. 'एकदा का मुसलमान संघटीत झाले की, ते हिंदूमहासभेशी हातमिळवणी करतील आणि हिंदू मुसलमान भाई भाई आहेत असे जगाला सांगतील' याबद्दल त्यांची खात्री होती.

जीनांची परत काँग्रेसमध्ये जाण्याची तयारी नव्हती. त्यांना आता असे वाटू

लागले होते की, स्वतःला निधर्मी म्हणवणाऱ्या काँग्रेसव्यतिरिक्त, दोनही जमाती आपापल्या जातीय संस्थांमधून वाढू शकतील. लीगच्या पुढाऱ्यांना वाटत होते की, असहकाराची चळवळ, हिंदू मुस्लिम ऐक्य आणि राष्ट्रवादाचा विकास यांचे प्रमाण कितीही असले तरी त्यामुळे शिक्षणात आणि नोकऱ्यात मुसलमान हिंदुंची बरोबरी करू शकणार नाहीत. हिंदुस्तानातील वरिष्ठ सनदी नोकऱ्यासंबंधी नेमलेल्या रॉयल कमिशनच्या (ली कमिशन म्हणून सर्वत्र ओळखले जाणारे) अहवालावर विधिमंडळात बोलताना जीनांनी मुसलमानांकरिता योग्य हिश्शाची मागणी केली. १९२४ च्या लीगचे अध्यक्ष रझा अल्ला यांनीही आपल्या भाषणात याच मुद्यावर भर दिला. ते म्हणाले, हिंदुस्तानात घेतल्या जाणाऱ्या पुरवणी परिक्षेमुळे अजून एकही मुसलमान सनदी नोकर म्हणून नेमला गेला नाही, आणि इंग्लंडमधील यशस्वी मुसलमान उमेदवारांची संख्या अगदी हातावर मोजण्याइतकी थोडी आहे. मुसलमानांना न्याय मिळण्यासाठी पाऊल उचलण्याची वेळ आता आली आहे.

१९२४ साल हे हिंदी राजकारणात अतिशय उलट सुलट प्रकृतीचे वर्ष होते : एकीकडे उत्सुकतेने डोळे लागले होते, पण हळूहळू परत वाढत होती बेकी. आपापल्या जातीय संघटनांच्या सभेत हिंदू पुढारी मुसलमानांची जातीय भाषणे व मुसलमान पुढारी हिंदुंची जातीय भाषणे शांतपणे ऐकत होत. हिंदू महासभेच्या वार्षिक अधिवेशनाला महात्मा गांधी, महमद अली आणि शौकत अली उपस्थित होते तरीही तिचे अध्यक्ष आपल्या भाषणात शुद्धी चळवळ उचलून धरीत होते. त्यांचा मुद्दा असा होता की शतकानुशतके मुसलमान हिंदुंचे धर्मांतर करीत आहेत आणि हिंदुस्तानातील बहुसंख्य मुसलमान हे धर्मांतरीत आहेत; ख्रिश्चन पाद्रयांनीही आपली धर्मांतराची मोहीम चालू ठेवली आहे. म्हणून अशा परिस्थितीत हिंदू धर्मांतराचे कार्य अतिशय जरूरीचे, अगदी आवश्यक अशी बाब आहे.

दंग्यांनी मुसलमानांपेक्षा हिंदू जीवित आणि वित्त यांची फार मोठी हानी झाली होती. या दंग्याचा अर्थ हिंदू जमातीवर मुसलमानांनी बुद्धीपुरस्सर आणि योजनापूर्वक केलेले हल्ले असा लावण्यात आला आणि अनेक प्रमुख हिंदू पुढारी अस्वस्थ झाले. पुढील दोन उदाहरणावरून त्यांची मनःस्थिती समजून येईल. एक म्हणजे, बंगाल काँग्रेसचे पुढारी सी. आर. दास यांना लजपतराय यांनी लिहिलेले पत्र. त्यात त्यांनी आपल्या मनाची कथा अशी व्यक्त केली होती : 'अलिकडे मला जो एक प्रश्न नेहमी सतावत आहे, आणि ज्याचा आपण काळजीपूर्वक विचार करावा अशी आवश्यकता मला वाटत आहे तो म्हणजे हिंदू मुस्लिम ऐक्याचा प्रश्न. गेले सहा महिने मी माझा बहुतेक वेळ मुस्लिम कायदा व मुस्लिम इतिहास याचा अभ्यास करण्यात खर्च केला आहे. आणि हे ऐक्य शक्य आणि व्यवहार्य नाही असे माझे मत बनत चालले आहे. असहकार चळवळीत सामील होणाऱ्या मुसलमान पुढाऱ्यांचा प्रामाणिकपणा जरी गृहीत धरला आणि तो मान्य केला तरी अशा प्रकारच्या

कुठल्याही गोष्टीला त्यांचा धर्म अगदी परिणामकारक अडसर घालू शकतो असे मला वाटते. हकीम अजमलखान आणि डॉ. किचलू यांच्याशी झालेले माझे संभाषण मी आपल्याला कलकत्त्याला सांगितले होते त्याची आठवण आपल्याला असेलच. हकीम साहेबाइतकाच उच्च श्रेणीचा मुसलमान पुढारी उभ्या हिंदुस्तानात सापडणार नाही. पण कुठलाही मुसलमान पुढारी कुराणाला डावलू शकेल काय? मुसलमानी कायद्यांचे माझे वाचन चुकीचे ठरावे एवढीच माझी आशा आहे. आणि तसे झाले तर मला हायसे वाटेल. पण जर ते बरोबर असेल तर असे मानावे लागेल की, जरी, ब्रिटिशांविरुद्ध आपण एकत्र आलो तरी हिंदुस्तानवर लोकसत्ताक पद्धतीने राज्य करण्यासाठी आपण एकत्र येऊ शकणार नाही. मग यावर उपाय काय? हिंदुस्तानातील सात कोटींची भीति मला वाटत नाही. पण हे सात कोटी आणि यांच्या जोडीला अफगाणिस्तान, मध्य आशिया, अरबस्तान, मेसापोटेमिया आणि तुर्कस्तान येथील सशस्त्र पाहुणे आपल्याला महाग पडतील. हिंदू मुस्लिम ऐक्याची इष्टता किंवा जरूरी मला खरोखर मनापासून पटते. मुसलमान पुढाऱ्यावर विश्वास टाकण्याचीही माझी पूर्ण तयारी आहे, पण कुराण आणि हादीसच्या आज्ञेचे काय? त्या आज्ञा पुढारी डावलू शकत नाहीत. मग आपला निकालच लागणार काय? नाही अशी आशा करतो. तुमचा व्यासंग आणि विचक्षबुद्धी या अडचणीतून काही तरी मार्ग काढील अशी आशा आहे.' २

कवी रविंद्रनाथ ठाकूर यांनी १९२४ साली एका बंगाली वृत्तपत्र प्रतिनिधीजवळ, हिंदू मुसलमान प्रश्नासंबंधी पुढील उद्गार काढले होते. त्याचे भाषांतर १८ एप्रिल १९२४ च्या 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या 'हिंदी दृष्टिकोनामधून' या सदरात असे आले होते. '······ कवींच्या मते हिंदू मुस्लिम ऐक्य प्रत्यक्षात उतरणे अशक्य करणारी दुसरी महत्वाची गोष्ट अशी होती की, मुसलमानांचा राष्ट्रवाद कुठल्याही एका राष्ट्रापुरता मर्यादित नव्हता. ······ कवी म्हणतात, आपण अनेक मुसलमानांना असा प्रश्न अतिशय स्पष्टपणे विचारला होता की, जर एकाद्या मुसलमानी राज्यांनी हिंदुस्तानवर स्वारी केली तर अशा वेळी मुसलमान आपल्या सर्वांच्या या मातृभूमीचे संरक्षण करण्यासाठी हिंदुंच्या खांद्याला खांदा लावून उभे रहातील काय? आणि याला दिल्या गेलेल्या उत्तराने त्यांचे समाधान झाले नाही. त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, मी असे निश्चितपणे म्हणू शकतो की, महमद अली सारख्या लोकांनीसुद्धा असे जाहीर केले होते की, मुसलमान, मग तो कुठल्याही देशाचा असो त्याला दुसऱ्या मुसलमानाविरुद्ध उभे रहाण्याची परवानगी नाही.'

ह्या भीतीचे पडसाद ठिकठिकाणी उठत होते आणि जणू काय पूर्व योजनेप्रमाणे मुसलमानी वक्तव्य त्यांना प्रतिसाद देत होते. त्यापैकी एक वैशिष्टयपूर्ण उदाहरण पुढे देत आहे. अगदी परवा परवापर्यंत शंभर टक्के राष्ट्रवादी असलेले डॉ. किचलू

---

२. इंद्र प्रकाश यांच्या Life of Savarkar वरून उद्धृत.

१९२५ सालच्या आरंभी लाहोर येथे एका जाहीर सभेत बोलताना रागाने म्हणाले 'खिलाफत कमिटीने लक्ष घातले नव्हते तोपर्यंत कॉंग्रेस मृतप्रायच होती. जेव्हा खिलाफत कमिटी तिला मिळाली तेव्हा हिंदू कॉंग्रेसने चाळीस वर्षात केले नव्हते ते तिने एका वर्षात केले. कॉंग्रेसने सात कोटी अस्पृश्यांचा उद्धार करण्याचे कार्यही केले. हे कार्य केवळ हिंदुंसाठी होते. तरीही कॉंग्रेसचा पैसा त्यावर खर्च केला गेला. माझे आणि माझ्या मुसलमान बांधवांचे पैसे त्यावर पाण्यासारखे खर्च केले गेले. परंतु शूरवीर मुसलमानांनी ते मनावर घेतले नाही. मग आम्ही मुसलमानांनी हिंदू किंवा कॉंग्रेस यापैकी कुणाचाही पैसा न घेता तांझिमचे कार्य हाती घेतले तर हिंदुंनी आमच्याशी का भांडावे? या देशातून जर आपण ब्रिटिश सत्ता नाहिशी केली आणि स्वराज्य स्थापन केले, आणि मग जर अफगाण किंवा इतर मुसलमानांनी आपल्यावर आक्रमण केले तर आम्ही मुसलमान त्यांना विरोध करू आणि या आक्रमणापासून देशाचे संरक्षण करण्यासाठी आमचे सर्व सुपुत्र बळी देऊ. परंतु एक गोष्ट मी स्पष्ट सांगतो. माझ्या हिंदू बांधवांनो ऐका! नीट कान देऊन ऐका! जर तुम्ही आमच्या तांझिम चळवळीत अडथळे आणलेत आणि आमचे हक्क आम्हाला दिले नाहीत तर आम्ही अफगाणिस्तान किंवा दुसऱ्या कुठल्यातरी मुसलमान सत्तेशी संगनमत करू आणि या देशात आमची सत्ता प्रस्थापित करू.'[3]

डिसेंबर १९२३ मध्ये कॉंग्रेसचे अध्यक्ष झालेल्या महमद अलींचे मतांतरही एका वर्षभरातच पूर्णपणे झाले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी गांधीं विषयी पुढील प्रशंसेचे उद्‌गार काढले होते : 'गांधींच्या आगमनापूर्वी हिंदुस्तानात असलेल्या राजकीय परिस्थितीचे पॅलेस्टाईनमधील जुडीया भागात जीझसच्या आगमनापूर्वी असलेल्या परिस्थितीशी साधर्म्य दिसते. आणि हिंदुस्तानच्या भल्यासाठी उपाय शोधणाऱ्यांना गांधींनी जो उपाय सांगितला त्याचे साधर्म्यही जीझसने पूर्वी जुडामध्ये योजलेल्या उपायाशी दिसते. क्लेषातून आत्मशुद्धी; राज्यकारभाराच्या जबाबदारी-करिता नैतिक तयारी; स्वराज्याची अट म्हणून स्वशिस्त ही महात्माजींची तत्त्वे आणि निष्टा होती; आणि अहमदाबादच्या कॉंग्रेसमध्ये परिणत होणाऱ्या त्या वैभवशाली वर्षात रहावयाचे भाग्य आपल्यापैकी ज्या कुणाला मिळाले असेल, त्यांनी जनतेच्या विचारात, भावनेत आणि कृतीत गांधींनी किती जलद बदल घडवून आणला हे प्रत्यक्षच पाहिले आहे.'

याच महमद अलींनी एका वर्षानंतर अलिगड आणि अजमीरला पुढील धक्का देणारे निवेदन केले : 'गांधींचे व्यक्तीमत्व कितीही शुद्ध असले तरी धर्माच्यादृष्टीने ते मला कुठल्याही मुसलमानापेक्षा, मग तो अगदी चारित्र्यहीन असला तरीही त्याच्यापेक्षा कमी प्रतीचे वाटले पाहिजे.'[4] जेव्हा हे निवेदन वर्तमानपत्रात आले

३. १४ मार्च १९२५ चा टाइम्स ऑफ इंडिया.

४. कित्ता, २१ मार्च १९२५.

तेव्हा अनेकजण आश्चर्यचकीत झाले; अनेकांनी वर्तमानपत्री गप्प म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष केले. आणि नंतर काही दिवसांनी महमद अली लखनौला एका जाहीर सभेत बोलत असताना जेव्हा त्यांना सरळ प्रश्न विचारण्यात आला तेव्हा, 'होय, माझ्या धर्माप्रमाणे आणि पंथाप्रमाणे व्यभिचारी आणि अधःपतीत मुसलमान **हा सुद्धा** मी गांधीपेक्षा चांगला मानतो.' असे म्हणून त्यांनी आपले ते निवेदन मोठ्या आत्मियतेने मान्य केले.

मुसलमानी व्यासपीठावरून केलेल्या सर्व जाहीर भाषणातून या 'नामधारी हिंदू मुस्लिम ऐक्या' बद्दल निषेध व खेद व्यक्त केला जात होता. २ मे १९२५ रोजी बंगालचे माजी मंत्री ए. एफ्. फजलूल हक यांच्या अध्यक्षतेखाली फरीदपूर येथे मुस्लिम अधिवेशन भरले होते. आपल्या श्रोत्यांना त्यांनी असे बजावून सांगितले की, हिंदुस्तान जसजशी स्वराज्याकडे प्रगती करील तसतशी अधिकाधिक सत्ता हिंदुंच्या हातात जाईल. म्हणून त्यांनी आपल्या धर्मबांधवांना हिंदू महासभेच्या धर्तीवर, वेळेवर संघटना उभारण्याचे आणि सर्व बंगालभर त्याच्या शाखांचे जाळे विणण्याचे आवाहन केले. मुसलमानांना शारीरिक शिक्षण घेण्याचाही त्यांनी आदेश दिला.

१९२५ च्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनाचे अध्यक्ष सर अब्दुल रहीम यांनी अगदी ठोक जातीय भाषण केले. त्या भाषणानी देशात फार खळबळ उडवून दिली. ते म्हणाले : 'हिंदुंच्या हल्ल्यामुळे मुसलमानांना कधी भासली नव्हती इतकी आता मुस्लिम लीगची गरज आहे. हिंदुंच्या आक्रमक आणि प्रक्षोभक वर्तणुकीने आता हे अधिकच स्पष्ट झाले आहे की, मुसलमान आता हिंदुंवर आपल्या नशिबाचा हवाला टाकू शकणार नाहीत, आणि त्यांनी स्वसंरक्षणाची शक्य असेल ती प्रत्येक योजना स्वीकारली पाहिजे. स्पॅनियर्डसनी मूरना हाकलून दिले त्याप्रमाणे मुसलमानांना हिंदुस्तानातून हाकलून लावण्याची भाषाही काही हिंदू पुढाऱ्यांनी केली आहे.' त्यांनी असेही दाखवून दिले की मुसलमानांच्या मदतीशिवाय हिंदू कधीच स्वराज्य स्थापू शकणार नाहीत. हिंदुस्तानातील खळबळीला चालना देणाऱ्या ज्या परकीय संस्था आहेत त्यांच्याशी सक्रीय संधान बांधण्यात काही हिंदू गुंतलेले आहेत असे निश्चित विधान त्यांनी केले. हिंदी क्रांतिकारकांना एकही मुसलमान मिळाला नाही हेही ते म्हणाले. त्यांनी असहकार चळवळीचा निषेध केला आणि म्हणाले की हिंदुस्तानच्या कल्याणासाठी इंग्रजांच्या मदतीची गरज आहे.

एका जमातीच्या पुढाऱ्यांचे दुसऱ्या जमातीवरील हल्ल्यामुळे, जणू काय जातीय संस्था जगवण्यासाठी रक्तदान करीत होते. हे हल्ले दिवसेंदिवस मोठे आणि तीव्र स्वरुपाचे होऊ लागले. ११ एप्रिल १९२५ रोजी कलकत्ता येथे भरलेल्या हिंदु महासभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष लाला लजपतराय यांनी महासभेचे उद्देश अधिवेशनात सांगितले ते असे होते : (१) सर्व देशभर हिंदू सभेची संघटना उभारणे;

(२) जातीय दंग्याचे बळी झालेल्या हिंदूंना निवारा देणे; (३) सक्तीने मुसलमान बनवलेल्या हिंदूंना परत हिंदू धर्मात घेणे; (४) तालीमखाने उघडणे; (५) सेवा समित्या म्हणजे समाज सेवेच्या संस्था स्थापणे; (६) हिंदी भाषेचा प्रसार करणे; (७) हिंदूंच्या निरनिराळ्या विभागांना एकत्र आणण्यास उपयुक्त ठरतील अशा प्रकारचे हिंदूंचे उत्सव समारंभ साजरे करणे; (८) ख्रिश्चन व मुसलमान यांच्याशी चांगले संबंध निर्माण करणे; आणि (९) सर्व राजकीय वादविवादात हिंदू जमातीच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणे.

जातीय दंग्यांनी हिंदू मुस्लिम ऐक्याला फार मोठा तडा गेला असताना खरोखरच ज्या तुर्कस्तानने एकी राखण्यांस मदत केली होती तो तुर्कस्तानच क्रांतिकारक संक्रमणातून जात होता. काही वर्षांच्या लढ्यानंतर यंग टर्कस् चळवळीला सत्ता काबीज करण्यात यश मिळाले आणि त्यांनी सुलतान अबूल हमीद याला गादी व खिलाफत सोडण्यास भाग पाडले. १९२३ मध्ये, तुर्कस्तानचा सत्ताधिकारी मुस्ताफा कमाल याने सुलतानपद नष्ट करून तुर्कस्तान रिपब्लिक झाल्याचे जाहीर केले. परंतु लोकांच्या धार्मिक मनोवृत्तीच्या मुखतीखातर त्याने खिलाफतीची कचेरी चालू ठेवली. तरीसुद्धा खिलाफतीचे कार्य शुद्ध पारमार्थिक राहील असे ठरवण्यात आले. सुलतान अब्दुल हमीद याच्या पलायनानंतर त्याचा पुतण्या अब्दुल मझीद इफेंडी याला खलिफा करण्यात आले. परंतु खलिफाला मिळत असलेल्या वागणुकीपेक्षा अधिक चांगली वागणूक मिळावी असे पत्र काही हिंदी मुसलमानांनी लिहिले होते त्याचा फायदा घेऊन खिलाफतीच्या अस्तित्वामुळे तुर्कस्तानच्या राज्यकारभारात परकीयांना ढवळाढवळ करण्यास वाव मिळतो या सबबीवर मुस्ताफा कमाल याने खिलाफत नष्ट केली.'[५]

ही बातमी १० मार्च १९२४ रोजी हिंदुस्तानात पोचली. तिने खिलाफत पुढाऱ्यांना नामोहरम केले. त्या मन स्थितीत त्यांनी तुर्कस्तानला जाण्यासाठी एक शिष्टमंडळ स्थापन केले. परंतु त्याला परवाना नाकारण्यात आला. आपल्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या पुस्तकात नेहरू लिहितात, 'कमाल मधल्या धर्म भावनेचा आभाव खिलाफत व सुलतानपद यांची रद्दता, निधर्मी राज्याची उभारणी आणि धार्मिक पिठाची उचलबांगडी यामुळे हिंदी मुसलमानात, म्युटिनीच्या काळापासून हळूहळू वाढत गेलेल्या स्वप्नाचा इमला कोलमडून पडला.'[६] त्याच्याच शब्दात परत सांगायचे तर,, खिलाफत चळवळीची 'प्रेरणा दुसरीकडेच होती आणि अतातुर्कने ते केंद्रच रद्द केल्यामुळे वरचा इमला गडगडला. मुस्लिम जनता भयभीत झाली आणि कुठल्याही राजकीय कृतीबद्दल उदासीन झाली.'[७]

५. स्टिफन किंग हॉल कृत Our Own times 1913 to 1938, पृ. १८०.

६. नेहरूंचे Discovery of India (First Edition), पृ. ४१६.

७. कित्ता, पृ. ४१७.

तुर्कस्तानच्या नावाने ज्या खिलाफत परिषदेने अमाप पैसा मिळवला होता तिने आता काय करावे ? तुर्की तक्रारींना पुढे मांडण्यासाठीच केवळ ती अस्तित्वात आली होती आणि तुर्कस्तानातील घडामोडी अजूनही तिला अस्वस्थ करीत होत्या. १९२४ आणि २५ च्या आपल्या बैठकीत तिने खिलाफतीवर अतिशय गंभीरपणे विचार केला आणि सर्व जगातील मुसलमानांनी दुसऱ्या कुठल्यातरी ठिकाणी परत खिलाफत प्रस्थापित करावी असा निर्णय घेतला. खिलाफतीच्या काही सभासदांनी जरी जातीय भावनांना वाव दिला तरी तिचा अजूनही काँग्रेस राजकारणावर विश्वास होता.

परंतु, अपयशी ठरलेली खिलाफत सोडून दिल्यानंतर अनेक मुसलमान पुढारी आणि बहुसंख्य मुसलमान जनता, हिंदी राजकारणातील खिलाफत पूर्व काळाकडे परतली. या परिवर्तनाला जातीय दंग्यांनी हातभार लागला. खिलाफत परिषद आणि जमियत-उल्-उलेमा या संस्था मुस्लिम जातीयवाद आणि राष्ट्रवाद यात घोटाळत होत्या. आणि त्यांचा कल राष्ट्रवादाकडे झुकल्यामुळे त्या बऱ्याच मुसलमानांना अमान्य झाल्या होत्या. परंतु मुसलमान जरी खिलाफत पूर्व काळाकडे वळले तरी त्यांना दहा वर्षात मिळालेले राजकीय शिक्षण पुसून गेले नाही. आणि तिसऱ्या दशकाच्या मध्यावर ते सुद्धा स्वराज्याबद्दल बोलू लागले. मात्र स्वराज्यातील फायदे हिंदू व मुसलमान या दोघातही विभागले जावे असे ते म्हणत होते. आता मुसलमानांच्या बाजूने मुस्लिम लीग उभी राहिली. आणि भावी राज्यकारभारात मुसलमानांना 'योग्य हिस्सा' मिळण्याबाबत प्रचार करण्याला तिने सुरुवात केली.

तरीसुद्धा, पुन्हा ऐक्य साधण्याची आशा गांधींनी सोडली नाही. १९२४ च्या नोव्हेंबरमध्ये त्यांनी मुंबईत एका चर्चेचा उपन्यास केला. या चर्चेतून सर्व पक्ष परिषद निर्माण झाली. त्यात काँग्रेस, मुस्लिम लीग, हिंदू महासभा, जस्टिस पार्टी, लिबरल फेडरेशन, हिंदी ख्रिश्चन आणि इतर भाग घेणाऱ्या प्रतिनिधींचा समावेश होता. परिषदेने हिंदी परिस्थितीचा अभ्यास करून ऐक्य प्रस्थापनेसाठी प्रत्यक्ष सूचना कराव्या म्हणून एक कमिटी नेमली. या कमिटीने जानेवारी १९२५ मध्ये, पुढील कामकाजासाठी ४० लोकांची एक प्रातिनिधिक स्वरुपाची पोट कमिटी नेमली. (अ) सर्व पक्षांना काँग्रेसला मिळणे शक्य होईल अशा सूचना बनवणे; (ब) कायदे-मंडळ व इतर प्रातिनिधिक संस्थावर सर्व जाती, पोट जाती आणि वंश यांच्या प्रतिनिधित्वासाठी योजना तयार करणे; आणि (क) स्वराज्याची योजना तयार करणे. ही पोट कमिटी कामकाजासाठी दोन कमिट्यात विभागली गेली. पहिल्या कमिटीने घटनेवर अहवाल तयार करावयाचा होता व दुसरीने जातीय प्रतिनिधित्वाची योजना तयार करावयाची होती. पहिल्या कमिटीचा अहवाल तयार झाला तेव्हा दुसऱ्या कमिटीची फक्त एक सभा होऊन कुठलाही निर्णय न घेता ती बेमुदत तहकूब झाली होती. याचे कारण म्हणजे लजपतराय व इतर हिंदू प्रतिनिधी कमिटीच्या

बैठकींना हजर रहाण्यास तयार नव्हते. हा प्रयत्न लजपतराय यांनी अलाहाबादच्या 'लीडर' मध्ये लिहिलेल्या लेखांनी संपुष्टात आला. हिंदू मुस्लिम ऐक्याचा एकमेव मार्ग म्हणजे काही प्रांतात हिंदू बहुमत व इतर प्रांतात मुसलमान बहुमत हा दृष्टिकोन आपल्याला मान्य नसल्याचे त्यांनी या लेखात म्हटले होते.

गांधींचे कार्य उधळले गेले. चळवळीतील त्यांचे सहकारी संकुचित जातीय हितसंबंधांचे रखवालदार बनले होते. मुसलमान झपाट्याने काँग्रेस सोडत होते, आणि हिंदू महासभा मुस्लिम लीगच्या तोडीस न आल्यामुळे, मुस्लिम लीग ही मुसलमानांची संघटना आणि काँग्रेस ही हिंदूंची संघटना असे मुसलमान मानू लागले. तरीसुद्धा, काँग्रेसमध्ये काही राष्ट्रवादी आणि निधर्मी वृत्तीचे मुसलमान अद्यापही होते. पण मुस्लिम जनता तिला हिंदू संस्थाच मानत होती.

## प्रकरण अठरावे

# लखनौ कराराला नकार

कायदेमंडळातील हिंदू मुसलमान प्रतिनिधित्वाबद्दल झालेल्या कराराची ज्याला १९१६ मध्ये लखनौ येथे भरलेल्या काँग्रेस व मुस्लिम लीगच्या वार्षिक अधिवेशनात औपचारिक मान्यता देण्यात आली होती त्या कराराची काही वर्षानंतर मुसलमान पुढारी, विशेषत: बंगालचे मुसलमान पुढारी जेव्हा जास्त काळजीपूर्वक छाननी करू लागले तेव्हा मुसलमानातील राजकीयदृष्टया जागृत असलेल्यांना असे आढळून आले की; कराराने हिंदू बहुसंख्य असलेल्या प्रांतात जरी मुसलमानांना निश्चित प्रमाणात अधिक प्रतिनिधित्व मिळाले असले तरी मुसलमान बहुसंख्य असलेले बंगाल व पंजाब प्रांतसुद्धा जागांची वाटणी करताना हिंदू बहुसंख्य प्रांत बनले होते. यामुळे ते फारच अस्वस्थ झाले. ज्यांनी हा करार तयार केला त्यांना बंगाल व पंजाबच्या लोकसंख्येचे आणि या दोन प्रांतांना दिलेल्या अल्प प्रतिनिधित्वाचे विस्मरण झाले होते असे नव्हे तर, या निर्णयातील बेफिकिरीचे कारण पंजाब व बंगालमधील मुसलमान त्यांच्या इतर भागातील धर्मबांधवांपेक्षा शैक्षणिकदृष्टिने मागासलेले होते हे होते. या 'अन्याया' वर प्रथम नेमके बोट ठेवणाऱ्या संस्था सरकारी होत्या. २३ एप्रिल १९१९ रोजी हिंदुस्तान सरकारने हिंदी घटना सुधारणा (मताधिकार) संबंधी पाठवलेल्या आपल्या ५ व्या खलित्यात म्हटले आहे की, करारामध्ये जरी मध्य प्रांतातील मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येच्या ३४९ टक्के; बिहार व ओरिसात २३८ टक्के; मद्रासमध्ये २३१ टक्के; संयुक्त प्रांतात २१४ टक्के आणि मुंबईत १६३ टक्के प्रतिनिधित्व दिले असले तरी मुसलमान बहुसंख्य असलेल्या पंजाबमध्ये त्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या ९१ टक्के आणि बंगालमध्ये ७६ टक्के इतके कमी प्रतिनिधित्व दिले आहे.

इतकेच काय, कायदेमंडळावरील जागा भरण्याचे नियम असे असले तरी प्रत्यक्षात बंगाल विधिमंडळात मुसलमानांचे प्रतिनिधित्व ३० टक्क्यांनी व पंजाबमध्ये ४० टक्क्यांनी कमी होते. अर्थात बंगालमधील सर्वसाधारण हिंदी मतदार संघातून मिळालेल्या एकंदर हिश्शाच्या ४६ टक्के जागा (मुसलमानांच्या बाबतीत जातीय मतदार संघातून) मुसलमानांना देऊन लखनौ कराराने आपला हेतू पूर्ण केला. ही टक्केवारी मुसलमान व्यतिरिक्त इतर जमातींच्या (यात युरोपियनांचा ही समावेश आहे.) व्यापारी वगैरेसारख्या खास मतदार संघातील विषम प्रमाणामुळे ४०.५

पर्यंत खाली उतरली. या निवडून आलेल्या सभासदात खास हितसंबंधांच्या नेमणुकांची आणखी भर पडली आणि ती ३० टक्क्यापर्यंत खाली आली. हे नेमलेले सभासद सरकारी आणि बिनसरकारी असे दोनही प्रकारचे होते, आणि गव्हर्नरला त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार होता. व्यापारात मुसलमान जवळ जवळ शून्यच होते. आणि मुसलमानांव्यतिरिक्त इतर व्यापारी हितसंबंधीयांनी मुसलमानांना आपले प्रतिनिधी म्हणून निवडले नाही. तसेच पंजाबमध्येही लखनौ कराराने सार्वत्रिक निवडणुकीत सर्वसाधारण निवडणुकीच्या जागांपैकी ५० टक्के जागा मुसलमानांना दिल्या. परंतु, व्यापारी आणि इतर खास जागांच्या मतदार संघातील निवडणुकीने हे प्रमाण ४८.५ टक्क्यापर्यंत खाली आले आणि कायदेमंडळाच्या एकंदर जागात ते ४० टक्क्यापर्यंत खाली घसरले. हिंदु बहुसंख्य प्रांतातही लखनौ कराराने ठरवलेल्या संख्येच्या आसपाससुद्धा मुसलमानांना जागा मिळाल्या नाहीत. तेथेसुद्धा, कराराने दिलेल्या जागांपेक्षा सर्वसाधारण निवडणुकीत मुसलमानांना अधिक जागा मिळाल्या. परंतु, प्रतिनिधित्वाच्या इतर पद्धतीमुळे ते प्रमाण खाली आले. तरीसुद्धा, हिंदू बहुसंख्य असलेल्या प्रांतात मुसलमानांचे प्रतिनिधित्व त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अधिकच राहिले.

लखनौ कराराच्या व्यवस्थेत ढवळाढवळ करण्याचा दोष हिंदूंच्या माथी मारणे चुकीचे होईल. आणि १९२४ च्या सुधारणा चौकशी कमिटीच्या अहवालावरून असे स्पष्ट दिसून येते की, जीनासारख्या प्रमुख मुसलमान पुढाऱ्यांनीही त्यांना निर्दोषी ठरवले होते. पंजाब मुस्लिम लीगच्यावतीने कमिटीपुढे साक्ष देताना, बरकत अलींनी सांगितले की, त्यांचा 'लखनौच्या कॉंग्रेस लीग करारांच्या निर्णयात हात होता पंजाबच्या मुसलमानांनी असा आक्षेप घेतला की, जरी कराराने त्यांना पंजाबमध्ये ५० टक्के प्रतिनिधित्व मान्य केले असले तरी प्रत्यक्षात त्यांना ते मिळाले नाही. कारण, खास मतदार संघाच्या जमीनदार, विद्यापीठ आणि व्यापारी हितसंबंधांच्या मतदार संघानी हिंदूंनाच परत निवडून दिले.' जीना म्हणाले, 'हा काही हिंदूंचा दोष नाही. तुमची तक्रार नियमाविरूद्ध आहे'. तेव्हा बरकत अली म्हणाले, 'ते खरे आहे'.

परंतु एकंदर घटना इतक्या पुढे गेल्या होत्या की, करारात दुरुस्ती झाली पाहिजे याबद्दल खुद्द जीनांचीच खात्री पटली होती. १९२४ च्या जातीय दंग्यातून उदयास आलेल्या सर्वपक्ष परिषदेच्या कमिटीला त्यांनी, कोणत्या विशिष्ट परिस्थितीमुळे बंगाल आणि पंजाबमधील मुसलमानांना कमी प्रतिनिधित्त्व द्यावे लागले हे सांगितले. परिस्थिती अशी होती : कराराच्या निर्मात्यांपैकी काहींनी असे सुचवले की, पंजाब आणि बंगाल मध्ये मुसलमान बहुसंख्य असल्यामुळे मुसलमानांनी या दोन प्रांतात, संयुक्त मतदार संघांना मान्यता द्यावी. परंतु, मुसलमान पुढाऱ्यांनी असा दावा मांडला की, मर्यादित मताधिकारात, त्यांच्या जमातीचे मतदान हिंदू जमातीच्या मतदानापेक्षा पुष्कळच कमी

होईल आणि असे झाले म्हणजे त्यांना १०–१५ टक्के जागा मिळण्याचीसुद्धा मारामार होईल. हा संभव असताना बंगालला ४० टक्के आणि पंजाबला ५० टक्के देण्याची कराराची तयारी त्यांना समाधानकारक वाटत होती. परंतु, कायदेमंडळातील मुसलमानांच्या प्रत्यक्ष मिळालेल्या जागांनी, मुसलमान पुढाऱ्यांमध्ये लखनौ कराराच्या औचित्याचा प्रश्न निर्माण करणारी जागृती झाली आणि त्यांनी मुसलमान बहुसंख्य प्रांतापुरता हा करार रद्द करावा अशी मागणी केली. कराराचा फक्त एवढाच भाग दुरुस्त करावा व बाकीचा तसाच ठेवावा अशी जीनांचीही इच्छा होती. परंतु, पंजाबचे हिंदू पुढारी लजपतराय यांनी हिंदूंना हानीकारक होण्याचा संभव असलेल्या या नव्या व्यवस्थेला मान्यता दिली नाही. हा करार राजकीय सुधारणांसाठी हिंदू मुसलमानांची संयुक्त मागणी निर्माण व्हावी म्हणून योजला होता, आणि ज्या क्षणी मुसलमान तो नाकारतील त्या क्षणी त्याचे महत्त्व नाहीसे होईल, हे वादविवादाच्या भरात ते विसरले. संकल्पित दुरुस्तीला हिंदू पुढाऱ्यांनी नकार दिल्यामुळे नवी योजना पुढे ढकलली गेली आणि मुसलमान पुढारी चिडले.

यानंतर मुस्लिम लीगचे पुढारी हिंदू महासभेच्या वार्षिक अधिवेशनांना आणि हिंदू पुढारी मुस्लिम लीगच्या वार्षिक अधिवेशनांना हजर राहिनासे झाले.

पंजाब विधिमंडळातील मुसलमानांच्या परिस्थितीबद्दलच्या तक्रारींना वाचा फोडणारा एक ठराव मुस्लिम लीगच्या १९२६ च्या वार्षिक अधिवेशनात मांडला गेला. डीन अहमद यांनी ठराव मांडताना सांगितले की, कराराने जरी ५० टक्के जागा मुसलमानांना दिल्या असल्या तरीसुद्धा, हिंदू आणि शीख मिळून ते बहुसंख्य बनले आहेत. दोन मंत्र्याकडे 'सुपूर्द' खाती होती परंतु त्यातील एकही मुसलमान नव्हता. (१९१९ च्या कायद्याप्रमाणे सर्व हुद्याच्या जागा 'राखीव' व 'सुपूर्द' अशा दोन प्रकारात विभागल्या होत्या; राखीव जागा एक्झिक्युटिव्ह कौन्सिलच्या सरकारी सभासदांकरिता व सुपूर्द निवडून आलेल्या हिंदी लोकांकरिता होत्या). डीन महमद यांनी तिसऱ्या जागेची मागणी केली. या सर्व प्रकरणी ब्रिटिश गव्हर्नरची चूक असूनसुद्धा आरोपांचा रोख हिंदुविरूद्ध होता. आणि सत्ता बळकावण्याचा डाव आखण्यात हिंदू किती चतूर आहेत असे मुसलमान पुढारी एकमेकांशी सभय स्वरात बोलत होते.

बंगालचे प्रमुख पुढारी नुसता लखनौ करारच नाकारत होते असे नव्हे, तर अतिशय जहाल शब्दात राजकीय सुधारणाविरूद्धही मतप्रदर्शन करीत होते. १९२४ च्या सुधारणा चौकशी कमिटीला सादर केलेल्या आपल्या निवेदनात, बंगाल प्रांताचे माजी मंत्री ए. के. फजलूल हक् म्हणतात : 'आधुनिक धर्तीच्या राज्यात कोणाच्या हातात सत्ता जावी हे शिक्षणासारख्या ज्या बाबींनी ठरते त्या बाबीत वरचढ असणाऱ्या लोकांच्या हातातच लोकप्रातिनिधीक सरकारची सत्ता जाते. म्हणून योग्य ती मर्यादा न घालता आणि सावधगिरी न घेता या देशात जबाबदार सरकार निर्माण केले गेले तर लोकांच्या हातात सत्ता देणे याचा अर्थ एका विशिष्ट जमातीचे दुसऱ्या

कमी प्रगत अशा जमातीवर वर्चस्व प्रस्थापित करणे होय..... म्हणून हिंदुस्तानातील जनतेला जबाबदार सरकार मिळण्यासाठी पहिली आवश्यक आणि अटळ अशी पहिली पायरी म्हणजे द्विदल राज्यपद्धतीची तिच्या सर्व दोषांसकट प्रस्थापना...... निरनिराळ्या जमातींच्या पुरेशा प्रतिनिधित्वासाठी खुद्द घटनेतच योग्य संरक्षण पुरवले गेले पाहिजे..... मतदार पुरेसा सुरक्षित असेल तरच केवळ जबाबदार सरकार शक्य आहे. अशा परिस्थितीचा हिंदुस्तानात आभाव आहे.'

बंगालचे दुसरे एक माजी मंत्री ए. के. गझनवी यांनी लोकसत्ताक राज्याला हिंदुस्तान कितपत पात्र आहे याबद्दल शंका व्यक्त केली. कमिटीपुढे साक्ष देताना ते म्हणाले, 'ज्या ज्या ठिकाणी धार्मिक श्रद्धेत आणि सामाजिक चालीरितीत एकसूत्रता आहे आणि कुठल्याही प्रकारचे जाती वैमनस्य आस्तित्वात नाही, त्या त्या ठिकाणी लोकशाही सरकार भरभराटीस आले आहे असा आतापर्यंतचा अनुभव आहे. हिंदुस्तानात या परिस्थितीचा आभाव आहे.'

तिसरे माजी मंत्री नबाब बहादूर सय्यद नबाब अली खान चौधरी यांनी कमिटीला असे सुचवले की, जातीय प्रतिनिधित्वाच्या योजनेची पुनर्रचना करणे जरूर आहे : 'आवश्यक म्हणून मान्य केल्या गेलेल्या जातीय प्रतिनिधित्वाने, बंगालमध्ये मुसलमानांचे बहुमत असूनसुद्धा कायदेमंडळात ते अल्पसंख्य आहेत. त्यांच्यावर हा जो घोर अन्याय केला गेला आहे, त्यावर ताबडतोब उपाय योजना केली पाहिजे.'

बंगालमधील मुसलमानांची निराशा आणि वैफल्ययुक्त मनःस्थिती आदल्या वर्षीच्या एका घटनेने जास्तच तापली. बंगाल काँग्रेसचे काही हिंदू पुढारी लखनौ करारा-बाबतच्या मुसलमानांच्या दाव्याला तसेच प्रतिसाद देत होते. त्यात सी. आर. दास प्रमुख होते. बंगालमधील मुसलमान बहुसंख्येचे दर्शन, विधिमंडळातही होत नाही किंवा जाहीर नोकऱ्यातही होत नाही ही मुसलमानांची तक्रार रास्त असल्याचे त्यांना मान्य होते. त्यांनी बंगालसाठी एक नवा हिंदू मुस्लिम करार तयार केला आणि तारीख १६-१७ डिसेंबर १९२३ च्या प्रांतिक स्वराज्य पक्षाच्या बैठकीत तो मंजूर करून घेतला. हा करार असा होता :

ही सभा असा ठराव करीत आहे की, या प्रांतात स्वराज्याचा पाया घातला जाण्यासाठी स्वराज्याची स्थापना होईल तेव्हा, बंगालच्या हिंदू आणि मुसलमान जमातींच्या हक्कांचा विचार करील असा एक करार या दोनही जमातींत घडवून आणण्याची जरुरी आहे. बंगाल कायदेमंडळातील प्रतिनिधित्व विभक्त मतदार संघावर आधारलेले आणि लोकसंख्येच्या प्रमाणात असावे आणि त्याला अर्थातच, अखिल भारतीय हिंदू मुस्लिम करार (लखनौ करार), काँग्रेस व खिलाफत यांच्या धोरणाची जोड द्यावी. प्रत्येक जिल्ह्यातील स्थानिक संस्थामध्ये हे प्रतिनिधित्व ६० : ४० या प्रमाणात—बहुसंख्य ६० व अल्पसंख्य ४० असे असावे. (याचा अर्थात अधिक विचार व्हावा . अशाप्रकारे ज्या जिल्ह्यात मुसलमान बहुसंख्य

आहेत तेथे मुसलमानांना ६० टक्के जागा मिळतील. त्याचप्रमाणे हिंदू बहुसंख्य असतील तेथे हिंदूंना ६० टक्के व मुसलमानांना ४० टक्के जागा मिळतील. मतदार संघ विभक्त असावेत की संमिश्र असावेत हा प्रश्न उभय जमातींच्या विचारासाठी पुढे ढकलला जात आहे. सरकारी नोकऱ्या ५५ टक्के मुसलमानांकडे जाव्या व त्या पुढील पद्धतीने दिल्या जाव्या : 'निरनिराळ्या जातींच्या नोकऱ्यांना निरनिराळ्या कसोट्या असाव्या. मुसलमानांचे वरील प्रमाण पूर्ण होईपर्यंत मुसलमानांची भरती किमान योग्यतेनुसार व्हावी. आणि यानंतर मुसलमान ५५ आणि मुस्लिमेतर ४५ अशी टक्केवारी असावी. मध्यंतरीच्या काळात हिंदुंना नोकऱ्यांचे एक लहानसे, समजा २० टक्के, निश्चित प्रमाण मिळावे.

बंगाल करारावर अनेक हिंदू पुढाऱ्यांनी आणि हिंदूंच्या मालकीच्या वर्तमानपत्रांनी कडाडून टीका केली. त्याला काँग्रेसचीही मान्यता मिळू शकली नाही. पण मुसलमानांनी मात्र त्याचे मोठ्या जयजयकारात स्वागत केले, आणि सरकारी नोकऱ्यांच्या प्रत्येक शाखेत मुसलमानांची टक्केवारी ५५ होईपर्यंत त्यांच्यासाठी ८० टक्के जागा राखीव करून या कराराची तावडतोब अंमलबजावणी करावी असा ठराव विधिमंडळात मांडला. बंगाल कराराचे निर्माते श्री. दास यांनी, 'स्वराज्याची स्थापना झाल्यानंतर प्रत्येक जमातीचे हक्क' हा करार सुरक्षित करील या कराराच्या सुरुवातीच्या परिच्छेदातील वाक्यावर बोट ठेऊन ठरावाला विरोध केला. या कराराची कलमे स्वराज्य प्राप्तीनंतर अमलात आणावयाची आहेत हा त्यांच्या विरोधाचा मुख्य मुद्दा होता.

लखनौ करारानंतर त्यावेळच्या अधिकच बिघडलेल्या हिंदू मुस्लिम संबंधात बंगाल करार हा मिठाचा खडा होता. कुराणावरील पंडीत भाष्यकार आणि राजकीय उलथा पालथीचे कठोर टीकाकार म्हणून आपल्या जीवनाची सुरुवात करणारे आणि खिलाफत चळवळीत पर्यवसीन झालेल्या हिंदू मुस्लिम ऐक्याच्या जागृतीने उत्साही राष्ट्रवादी बनलेले खुदाबक्षासारखे नावाजलेले लेखक आता झपाट्याने आपल्या मूळ पदावर जात होते. १९१२ पर्यंत खुदाबक्ष हे 'राजद्रोहा' बद्दल ब्रिटिश सरकारने कठोर उपाय योजना करावी अशी मागणी करीत होते; दहा वर्षानंतर ते 'राजकीय एकजूट, हरताळ आणि असहकार' याबद्दल सहानुभूतीपूर्वक बोलू लागले. 'सरंजामशाहीला वाकवण्याचा एकमेव मार्ग......' अशासारखी वाक्ये वापरू लागले; 'न्यायी मोठा आणि सद्‌गुणी आत्मा' म्हणून गांधींची स्तुती करू लागले; आणि विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, लखनौ कराराचे वर्णन 'शुद्ध मूर्खपणा' असे करू लागले; 'अवास्तवतेच्या सुरंगी स्वप्नात फिरणारे' म्हणून काँग्रेसचा निषेध करू लागले, आणि शेवटी त्यांनी आपली निराशा अशी व्यक्त केली : 'आपल्या सध्याच्या दुःस्थितीवर उपाय म्हणून स्वराज्याकडे बघणे व्यर्थ आहे..... आणि सद्‌गुणाची कारकीर्द म्हणून त्याच्याकडे बघणेही तितकेच निरर्थक आहे....... स्वराज्य आले

तर हिंदी मानवांचे दोन विषम भाग पडतील—एक स्वर्गाचा धनी होईल तर दुसरा नरकाचा."

सतत जोरात चालू असलेल्या जातीय दंग्यांनी अधिकच उदास बनलेल्या या वातावरणात देशाच्या अंतिम राजकीय भवितव्याकडे मुस्लिम लीगचे दुर्लक्ष झाले नाही. तिने प्रचलित मुसलमानी मतांच्या अनुरोधाने आपल्या मागण्या शांतपणे प्रतिपादन केल्या. १९२५ मध्ये मुस्लिम लीगने पूर्ण जबाबदार सरकारची हिंदुस्तानची मागणी कशी पुरवावी याचा विचार करण्यासाठी एक रॉयल कमिशन नेमावे अशी मागणी करणारा एक ठराव संमत केला, आणि मुसलमानांसाठी पुढील मागण्या केल्या : (१) कुठल्याही प्रांतातील बहुसंख्यकांचे प्रतिनिधित्व अल्पसंख्यकाइतके किंवा समानते इतकेही कमी होऊ न देता अल्पसंख्यकांना योग्य व परिणामकारक प्रतिनिधित्व, आणि (२) 'कुठल्याही जमातीला वाटेल त्यावेळी आपली विभक्त निवडणूक सोडून संयुक्त मतदार संघाला मिळता येईल अशी तरतूद असलेला' विभक्त मतदार संघ; 'पंजाब, बंगाल आणि उत्तर सरहद्द प्रांतातील मुसलमानी बहुमताला इजा पोचणार नाही अशा तऱ्हेने प्रांतांची फेर विभागणी.'

पंजाब आणि बंगाल प्रांतापुरता लखनौ करारात फेरफार करावा या मुस्लिम लीगच्या मागणीने, हिंदू बहुसंख्य प्रांतात लोकसंख्येच्या प्रमाणात मुसलमानांना दिल्या गेलेल्या जादा प्रतिनिधित्वाच्या कराराच्या भागाबद्दल हिंदूंचा विरोध निर्माण झाला. हे जादा प्रतिनिधित्व तसेच कायम ठेवण्याच्या मुस्लिम लीगच्या हट्टामुळे हिंदूंच्या या विरोधाला अधिकच तीव्रता आली. अल्पसंख्यकांना जादा जागा मिळणे योग्य असो वा नसो, बंगाल आणि पंजाबसंबंधीची तरतूद ही कायम व्यवस्था असे म्हणता आले नसते. मतदानाचा हक्क जसजसा अधिक सार्वत्रिक होईल जसजशी बहुसंख्य जमातीची जादा हिश्शाची मागणी वाढणारच होती. ती वाढलीच असती. हिंदू मुसलमानात जरी आपपर भाव नसता तरीही ही मागणी केली जाण्याचा संभव होता. म्हणून पंजाब आणि बंगालसंबंधीची करारात केलेली व्यवस्था तशीच रहावी हा हिंदू पुढाऱ्यांचा हट्ट असमर्थनीय होता. आपण बहुसंख्य असलेल्या प्रांतात मुसलमानांना सवलत दिल्याबद्दलचा हिंदूंचा खेद, या आग्रहाच्या रूपाने व्यक्त होत होता. याच भावनेने, सरहद्द प्रांताला राजकीय सुधारणा लावण्याच्या मुस्लिम मागणीला हिंदुंनी विरोध केला. आणि याचा प्रतिवाद म्हणून सरहद्द प्रांत परत पंजाबला जोडावा अशी मुसलमानांनी मागणी केली.

---

१. खुदाबक्ष यांचे Islamic Regeneration, पृ. २७०.

प्रकरण एकोणीसावे

# मुसलमानी प्रांतात भर

लवकरच मूर्त स्वरुपात येणाऱ्या स्वराज्यामध्ये आपण केवढी भागिदारी आणि सत्ता मिळवू शकतो याचा साक्षात्कार सुशिक्षित मुसलमानांना झाला. हा साक्षात्कार हिंदूंना सर्व प्रांतिक विधिमंडळात बहुमत मिळवून देणाऱ्या लखनौ कराराहून संपूर्ण निराळी होती. मुसलमानांचे प्रचंड बहुमत असलेल्या परंतु अजून ज्याला कायदेमंडळ नव्हते, आणि १८९२ चा हिंदी कायदेमंडळाचा कायदा हिंदुस्तानला लागू केल्यापासून ज्याला सुधारणा नाकारल्या होत्या अशा वायव्य सरहद्द प्रांताबद्दल आणि मुंबईपासून सिंध विभक्त केल्यास मुसलमानांना आणखी एक बहुमताचा प्रांत मिळेल अशा सिंधबद्दल आता मुसलमान विचार करत होते.

१८४९ मध्ये ब्रिटिशांनी पंजाब जिंकल्यापासून, वायव्य सरहद्द प्रांत हा राज्य-कारभारासाठी पंजाबचा भाग मानला जात होता, आणि १९०१ मध्ये कर्झनने तो प्रांत विभक्त करीपर्यंत तो तसाच राहिला होता. देशाचा ४०,००० मैल क्षेत्रफळाचा आणि भौगोलिक व मानवजाती शास्त्रदृष्ट्या अफगाण वंशाचा भाग असलेला हा पट्टा म्हणजे ब्रिटिशांना पुढे शंभर वर्षे एक प्रश्नचिन्ह होते. या सरहद्दीवर, विशेषत: वझिरिस्तानच्या बाजूला, गुन्हेगारी सर्रास चालू होती. उदाहरणार्थ, अगदी अलिकडे १९१९–२० पर्यंत तेथे झालेल्या ६११ हल्ल्यात, '२९३ ब्रिटिश प्रजाजन ठार, ३९२ जखमी व ४६१ पळवले गेले, आणि सुमारे २००,००० पौंड किंमतीची मालमत्ता लुटली गेली.' या टोळ्या ताब्यात ठेवण्यासाठी ब्रिटिशांना फार सावधगिरी बाळगावी लागली.

प्रामुख्याने ह्या कारणासाठी वायव्य सरहद्द प्रांत मध्यवर्ती राज्यव्यवस्थेखाली राहिला. परंतु हिंदुस्तानातील राजकीय अशांततेपासून तो अलिप्त नव्हता. गांधींच्या रौलट बील निषेध चळवळीच्या लाटा या दूरच्या सरहद्दीवर पोचल्या आणि तेथे खान अब्दुल गफारखान हे पठाण पुढारी निर्माण झाले. त्यांनी पठाणांची संघटना करून मोठ्या प्रमाणावर चळवळ सुरू केली. १९२० मध्ये त्यांना अटक झाली तेव्हा त्यांची चळवळ वेग घेत होती; त्यांना लवकरच सोडण्यात आले, परंतु त्यांचा प्रभाव फार मोठा होता आणि तो त्यांनी खिलाफत चळवळीच्यावेळी दाखवला.

वायव्य सरहद्द प्रांत पंजाबमध्ये विलीन करावा की, तो निराळा भाग म्हणून रहावा याची तपासणी करून शिफारस करण्यासाठी हिंदुस्तान सरकारने १९२३ मध्ये

एक कमिटी नेमली. ही नेमणूक हिंदू मुस्लिम वाद शिखराला पोचले असतानाच झाली. या प्रश्नावर व्यक्त केलेल्या मतावरून असा निष्कर्ष काढण्यात आला की, पंजाब आणि वायव्य सरहद्द प्रांतातील हिंदुंनी सर्वसाधारणपणे, विलिनीकरणाच्या बाजूने व बहुतेक मुसलमानांनी आहे हीच परिस्थिती चालू रहावी या बाजूने मत दिले.' हिंदुंच्यादृष्टीने भयावह असणाऱ्या मुसलमानांच्या या प्रवृत्तीला मुसलमानांचे पुढारी सरदार महम्मद गुलखान यांनी आपल्या कमिटीपुढील साक्षीत वाचा फोडली डेरा इस्माईल खान येथील इस्लामिया अन्जुमानचे ते अध्यक्ष होते. त्यांना कमिटीच्या एका सभासदाने प्रश्न विचारला : 'अंजुमानच्या तुमच्या उद्देशामागे मुस्लिम राष्ट्रांची, म्हणजे मुस्लिम राष्ट्रसंघाची कल्पना आहे. आणि म्हणून हा प्रांत पंजाबात विलीन केल्यास तुमच्या या कल्पनेला ते अपायकारक, हानीकारक ठरेल असा तुमच्यासारख्या विचार करणाऱ्या लोकांच्या मनात ही शंका प्रबळ आहे हे खरे आहे काय?" महम्मद गुलखान म्हणाले 'हो हे खरे आहे. त्यांना असे वाटत आहे की, हिंदू मुस्लिम ऐक्य कधीच प्रत्यक्षात उतरणार नाही. खरे सांगायचे तर २३ कोटी हिंदू दक्षिणेला व ८ कोटी मुसलमान उत्तरेला असे हिंदू मुसलमानांचे विभक्तीकरण पहाणे मला अधिक आवडेल. रासकुमारी ते आग्र्यापर्यंतचा सर्व भाग हिंदुंना द्या आणि आग्रा ते पेशावरचा भाग मुसलमानांना द्या. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी देशांतर याच्या मुळाशी अदलाबदलीची कल्पना आहे.'

पुढच्याच वर्षी मुंबईला भरलेल्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनात महम्मद अलींनीही याचे सूतोवाच केले. ते म्हणाले, सरहद्द प्रांत काबूलला जोडावयाचा की, हिंदुस्तानला जोडावयाचा हे ठरवण्याचा स्वयंनिर्णयाचा हक्क तेथील मुसलमानांना मिळाला पाहिजे. जर कॉन्स्टॅन्टिनोपलपासून दिल्लीपर्यंत एक सरळ रेषा काढली तर सहरणपूर पर्यंत मुसलमानी पट्टा दिसून येईल असे कुठल्यातरी इंग्रज गृहस्थाने म्हटले असल्याचेही त्यांनी उद्धृत केले.

११ एप्रिल १९२५ रोजी लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली कलकत्ता येथे भरलेल्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनात वरील उद्गारांची भयचकीत वृत्तीने आठवण करण्यात आली. लजपतराय आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, आणि तरीही भारतीय मुसलमान भारताबाहेरील मुसलमान राष्ट्रांशी संधान बांधतील या भीतिने ग्रासून जाऊ नका, असा साळसूद उपदेश मुसलमान पुढारी हिंदुंना करतातच.

पुढल्याच वर्षी १९२६ मध्ये सरहद्द प्रश्नाबाबत मध्यवर्ती कायदेमंडळात चर्चा झाली. कायदेमंडळातील स्वराज्यपक्षाचे मुस्लिम लीगवाले सभासद, सय्यद मुर्तांझा यांनी चर्चेला सुरवात केली. त्यांनी मांडलेल्या ठरावात गव्हर्नर जनरलला अशी शिफारस केली होती की, कायदेमंडळे आणि मंत्र्यांच्या नेमणुका यांच्या संदर्भात असलेली १९१९ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टमधील तरतूद, वायव्य सरहद्द

प्रांताला लागू करावी. त्या दिवशी (८ मार्च) स्वराज्य पक्षाच्या लोकांनी सभात्याग केला होता आणि त्यात सय्यद मुर्तझा हे सामील होते. परंतु आपण प्रथम मुसलमान आणि नंतर स्वराज्य पक्षाचे आहोत असे म्हणत ते विधान सभेत परत आले; आपल्यातील स्वराज्य पक्षीय जरी एकदम बाहेर गेला तरी मुस्लिम लीगवाला सभेत राहिला असे उद्‌गार काढून त्यांनी आपल्या सदसद्‌विवेक बुद्धीचे आणि आपल्या सहकार्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला.

मुर्तझांच्या ठरावाचे स्वागत संमिश्र झाले, परंतु मुसलमानांच्या आकांक्षाबाबत हिंदूंची विरोधभावना होती याबद्दल कुणाला पुसटतीही शंका उरली नाही. बंगाल काँग्रेस पुढारी बी. सी. पॉल यांनी ठरावाला निःसंदिग्ध पाठिंबा दिला. ते म्हणाले हिंदू बहुसंख्य प्रांतात ज्याप्रमाणे मुसलमानांनी आपल्याला सामावून घेतले आहे त्याचप्रमाणे, सरहद्द हिंदूंनी आपल्याला मुसलमानात सामावून घेतले पाहिजे. परंतु मदनमोहन मालवीय, सर हरिसिंग गौर आणि दिवाण बहाद्दर रंगाचारी यांच्यासारख्या इतर हिंदू पुढाऱ्यांनी हा प्रश्न लवकरच नेमण्यात येणाऱ्या रॉयल कमिशनकडे सोपवावा अशी सूचना करून ठरावाला विरोध केला.

असेंब्लीतील राष्ट्रवादी सभासद निरनिराळ्या गटात विभागले गेले असल्यामुळे काँग्रेसला गौणत्व प्राप्त झाले, आणि हिंदुमहासभेला प्रातिनिधिक दर्जा प्राप्त झाला. त्यामुळे असेंब्लीमध्ये मुसलमानांच्यावतीने बोलणारी मुस्लिम लीग आणि हिंदुंच्यावतीने बोलणारी हिंदुमहासभा, असे नंतरच्या काळात क्वचितच दिसणारे दृश्य पहावयास मिळाले. वर्षभर चाललेल्या या वादविवादाचा कळस लीगच्या व महासभेच्या अधिवेशनात झाला. लीगने वायव्य सरहद्द प्रांतासाठी निराळ्या असेंब्लीची मागणी केली. आणि हिंदुमहासभेने 'या प्रांताच्या राज्यकारभाराचे रुपांतर निराळ्या प्रांतात करावे या सुचवलेल्या योजनेला गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टनुसार जोराचा विरोध' केला आणि 'हा प्रांत मध्यवर्ती सरकारच्या प्रत्यक्ष व्यवस्थेखाली असाच चालू रहावा अशी मागणी केली'

परंतु, दोन वर्षानंतर हिंदू आणि हिंदुमहासभा यांनी आपली वायव्य सरहद्द प्रांताबद्दलची भूमिका नाट्यपूर्ण रीतीने बदलली. १९२८ च्या मार्चमध्ये स्वराज्य पक्षाच्या सर्फराज हुसेन खान या आणखी एका मुस्लिम सभासदाने अंदाजपत्रकावर बोलताना सरहद्द प्रांताला असेंब्ली मिळावी अशी बाजू औपचारिकपणे पुढे मांडली. त्याला विरोध करताना, डेनिस ब्रे या सरकारी प्रवक्त्याने पुढे केलेल्या अनेक कारणातील एक कारण, हिंदुंची हरकत हे होते. परंतु आश्चर्य असे की, प्रमुख हिंदुमहासभा पुढारी लजपतराय ताबडतोब उठले, आणि सरहद्द प्रांताचा राजकीय दर्जा वाढवण्यास आपला विरोध नसल्याचे त्यांनी जाहीर केले. लजपतराय यांनी पुढाकार घेतला आणि सरहद्द प्रांताचा दर्जा आहे असाच रहावा या म्हणण्याच्य पुरस्कारार्थ एकही हिंदू सभासद उभा राहिला नाही. हिंदू सभासदांच्या दृष्टिकोनातील

या परिवर्तनावर महिन्यानंतर झालेल्या हिंदू महासभेच्या अधिवेशनात शिक्कामोर्तब करण्यात आले. यामुळे त्यांच्या विरोधाचा जोर मुसलमानांच्या इतर मागण्यांकडे वळला. त्यापैकी मुंबईपासून सिंध प्रांत वेगळा करावा व त्याचा पूर्ण प्रांत बनवावा ही एक मागणी होती.

केवळ राज्यकारभाराच्यादृष्टिने सिंध पंजाबमध्ये घालावा असा विचार पूर्वी अनेकवेळा केला गेला होता. परंतु या विचारांनी कधीच मूर्तस्वरुप धारण केले नाही, आणि तो अरब जगाशी हिंदुस्तानचा संबंध आल्यापासून मुंबई इलाख्याचा भाग म्हणूनच राहिला. राज्यकारभाराचा स्वतंत्र भाग म्हणून तो आर्थिकदृष्ट्या आपल्या पायावर कधीच उभा राहू शकत नव्हता त्यामुळे सिंधचे विभक्तीकरण शक्यतेच्या कोटीत बसेल असे कोणी मानलेच नाही. परंतु मध्यवर्ती सरकारच्या आर्थिक मदतीवर संभाळावा लागला तरी, सिंध विभक्त व्हावा यावर मुसलमानांचा असलेला भर, आणि स्वराज्याची गती रोखून धरीत असलेला जातीय प्रश्न काहीही करुन सोडवण्याबद्दलची सर्वांची तळमळ ही योगायोगाने एकदमच आली. १९२६ च्या काँग्रेस अधिवेशनात यावर बराच उहापोह झाला. आणि त्याने कार्यकारिणीला 'हिंदू आणि मुसलमानामधील भेदकारक फरक दूर करण्यासाठी उपाय शोधून काढण्याचा' आदेश दिला. मुसलमान पुढाऱ्यांनी अशाच प्रकारची चिंता व्यक्त केली. आणि या प्रश्नावर तोडगा शोधण्याकरिता गटागटांनी एकत्र येऊन चर्चा केली. सर शंकर नायर या त्यावेळच्या प्रख्यात राजकारणी पुरुषाने, कौन्सिल ऑफ स्टेटमध्ये केवळ हताशपणाने असा ठराव मांडला की, विभक्त मतदार संघ काढून टाकण्याबद्दल हिंदू मुसलमानात तडजोड होईपर्यंत जबाबदार सरकार आणण्याबद्दलचे सर्व प्रयत्न स्थगित करावेत. ते म्हणाले की, ज्या सुधारणांनी मनामध्ये खोल अविश्वास रुजवला आणि भावना चिथळवल्या त्या सुधारणा आणणे व्यर्थ आहे. या ठरावावरील चर्चा फार रंगली. आणि जरी तो मागे घेतला गेला तरी, राजकारणी लोकांना त्याने अगदी हलवून सोडले. चार दिवसानंतर लखनौ कराराला व्यावहारीक पर्याय शोधण्याच्या निश्चयाने, निरनिराळ्या गटाच्या तीस प्रमुख मुसलमान पुढाऱ्यांनी दिल्ली येथे एक बैठक घेतली. या बैठकीत पुढील अटीवर संयुक्त मतदार संघाच्या स्थापनेला एकमताने मान्यता देण्यात आली. (१) मुंबईपासून सिंध वेगळा केला जावा आणि त्याचा निराळा प्रांत स्थापन करावा; (२) वायव्य सरहद्द प्रांत व बलुचिस्तान यात सुधारणा सुरु कराव्यात; (३) पंजाब आणि बंगालमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व असावे; (४) मध्यवर्ती कायदेमंडळात एकंदर सभासदांच्या एक तृतीयांशापेक्षा मुसलमान सभासद कमी नसावेत. बैठकीत असेही म्हटले गेले की, हिंदू बहुसंख्य प्रांतात जशी हिंदुंनी मुसलमानांना राखीव जागांच्या प्रमाणाची सवलत द्यावयाची तशीच मुसलमानांनी मुसलमान बहुसंख्य प्रांतात हिंदूंना दिली पाहिजे. या बैठकीत अध्यक्ष जीना होते.

या मागण्याबाबत पूर्णपणे विचार करण्यात आला. दोन महिन्यांनी (मे १९२७) अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने त्याच्यावर शिक्का मोर्तब केले आणि डिसेंबरच्या आपल्या खुल्या अधिवेशनात त्या मंजूर करून घेतल्या. काँग्रेसने समत केलेल्या या ठरावात, मुसलमानांनी पूर्वी वेळोवेळी केलेल्या इतर मागण्यांचाही समावेश होता. त्या अशा होत्या. (१) भावी घटनेत आपल्या सदसत्‌विवेक बुद्धीनुसार धर्म स्वीकारण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे, आणि या स्वातंत्र्यात हस्तक्षेप करणारे कुठलेही कायदे करण्याचा अधिकार मध्यवर्ती किंवा प्रांतिक कायदेमंडळाला असता कामा नये. सदसत्‌विवेक बुद्धीनुसार स्वातंत्र्य म्हणजे, पंथ व पुजेचे स्वातंत्र्य, धार्मिक आचार आणि संबंध यांचे स्वातंत्र्य, आणि दुसऱ्यांच्या भावनांचा मान राखून आणि त्यांच्या अशाच प्रकारच्या अधिकारात कसलीही ढवळाढवळ न करता धार्मिक शिक्षण आणि प्रचार चालू ठेवण्याचे स्वातंत्र्य; (२) आंतर जातीय प्रश्नासंबंधी, मध्यवर्ती किंवा प्रांतिक कायदेमंडळात कुठचेही बील, ठराव, सूचना किंवा उपसूचना मांडण्याला, ज्या जातीवर त्याचा परिणाम होणार असेल त्या जातीच्या तीन चतुर्थांश सभासदांनी विरोध केल्यास, ते बील, ठराव, सूचना किंवा उपसूचना मांडता, चर्चा करता किंवा सम्मत करता येऊ नये.

१९२७ च्या काँग्रेसचे अध्यक्षस्थान डॉ. महम्मद अली अन्सारी या मुसलमान पुढाऱ्यांनी भूषवले होते. 'हिंदू व मुसलमान एकमेकांवर विश्वास ठेऊ शकतात परंतु ब्रिटिश सरकारवर ठेऊ शकत नाहीत.' असा दावा महम्मद अलींनी काँग्रेस व्यासपिठावरून आताही केला आणि मुस्लिम व्यासपिठावरून, त्यांनी आपल्या श्रोत्यांना सायमन कमिशनवर बहिष्कार टाकण्याचा आग्रहाचा उपदेश केला. (सायमन कमिशन म्हणजे पुढील प्रकरणात चर्चिलेल्या सनदशीर सुधारणावरचे कायदेशीर मंडळ). त्यांच्या ज्या मुसलमान मित्रांनी कमिशनशी सहकार्याचा विचार केला त्यांना त्यांनी ब्रिटिश धार्जिणे म्हणून धमकावले. परंतु जातीय संस्था लोकप्रिय होत होत्या आणि डॉ. अन्सारींनी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हटल्याप्रमाणे काँग्रेस 'अनेक प्रांतात दुय्यम स्थानावर ढकलली जात' होती.

मुसलमानांच्या मागण्या मान्य करणाऱ्या या काँग्रेसच्या ठरावाला हिंदुमहासभेचा अर्थातच संपूर्ण विरोध होता. १९२८ एप्रिलच्या हिंदू महासभेच्या अधिवेशनाने— ज्या अधिवेशनाने वायव्य सरहद्द प्रांताला विधिमंडळ देण्याच्या बाजूने कौल दिला त्या अधिवेशनाने—बहुसंख्य जमातीकरिता काहीही राखीव जागा न ठेवता आणि अल्पसंख्य जमातींनी राखीव जागांचा आग्रह धरलाच तर 'मर्यादित काळा' पुरत्याच असाव्यात असे विचार संयुक्त मतदार संघाच्या बाजूने मांडले. सिंधबद्दलच्या हिंदू महासभेच्या निधर्मी वाटणाऱ्या भूमिकेने प्रश्न सोडवण्यासाठी व्यावहारीक पर्याय सुचवला नाही. तिने सिंधवरील आपल्या ठरावात असे म्हटले होते की, 'तो निराळा प्रांत म्हणून स्थापन करताना एक विशिष्ट जात 'बहुसंख्य' बनेल आणि 'देशातील

निरोगी राष्ट्रवाद वाढण्याला मारक आणि हिंदूंचा हिंदुस्तान आणि मुसलमानांचा हिंदुस्तान अशी देशाची दोन शकले पाडील' असा विचार न करता 'राज्यकारभार-विषयक आर्थिक आणि अशाच प्रकारच्या इतर गोष्टी' विचारात घेतल्या जाव्यात. महासभेचे भविष्यकाळाबद्दलचे चित्र बरोबर होते. आणि काँग्रेसने केलेल्या जातीय ठरावाचे समर्थन फक्त एका न सुटणाऱ्या व्रांगड्यावरची व्यावहारिक तोड म्हणून करणे शक्य होते. त्यावेळी देशात असलेल्या विशिष्ट वातावरणात निधर्मी दृष्टि-कोनाचा अर्थ मुसलमानांच्या आकांक्षाना हिंदूंचा विरोध असा लावण्यात आला आणि त्याबद्दल सार्वत्रिक खेद व्यक्त करण्यात आला. याच दृष्टिकोनातून महासभेच्या आणखी एका ठरावाचा असाच अर्थ करण्यात आला. त्या ठरावाने जातीय प्रति-निधित्वाला विरोध केला होता आणि 'खुल्या चढाओढीच्या परिक्षामधून गुणवत्ता आणि लायकी' यावर आधारलेली निवड व्हावी अशी विनंती केली होती. मुस्लिम जातीयतेशी सहकार्य करण्याबद्दल हिंदूमहासभेने काँग्रेसवर ठपका ठेवला. ती म्हणाली की, मुस्लिम जातीयतेचे प्रतिनिधी, काँग्रेसच्या जातीय प्रश्नाविषयीच्या ठरावांना विशिष्ट वळण लावण्यासाठीच केवळ, काँग्रेसमध्ये जमा झाले होते.

देशातील एकुलती एक निधर्मी संस्था असलेली काँग्रेस मोठ्या कठीण परिस्थितीत सापडली होती. दक्षिण विभाग सोडला तर सर्व हिंदुस्तानला ग्रासणाऱ्या अघोरी जातीय दंग्यांची ती निःशब्द साक्षिदार बनली. १९२१–२२ साली सुरु झालेले दंगे वर्षानुवर्षे, संयुक्त प्रांत, मुंबई, बंगाल, मध्यप्रांत, बिहार, ओरिसा, पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत आणि दिल्ली याठिकाणी चालू राहिले. त्यांना उतार पडण्याची लक्षणे नव्हती. आर्य समाज दहा वर्षात पूर्वी कधी नव्हता इतका कार्यप्रवण बनला. त्याचे सभासद दरवर्षी हजारोंनी वाढत होते. आणि त्याच्या ध्येयाला वाहून घेण्यासाठी अनेकजण तयार होते. सर्व देशभर आर्य समाजाच्या व्यासपिठावरून शुद्धी संघटन आणि आर्य समाजाच्या जाहीर सभा भरत होत्या. सर्व धर्मात वैदिक धर्माची श्रेष्ठता प्रस्थापित करण्याकरिता वाङ्मयीन ग्रंथ निर्माण केले जात होते. या धार्मिक उत्साहाच्या भरात काही लेखकांनी प्रेषित महम्मदावर घाणेरडे हल्ले केले. अशा हल्ल्यांपैकी 'रंगिला रसूल' आणि 'रिसाला वर्तमान' ही दोन नमुनेदार प्रकाशने होती. त्यांच्यामुळे अधिक दंगे, अधिक जाळपोळ आणि अधिक खून यांना प्रोत्साहन मिळाले. मुसलमानसुद्धा अशाच प्रकाराने आपल्या तबलीघचा प्रचार करीत होते, आणि हिंदूच्या शूद्र आणि विशेषतः अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या वर्गामध्ये आपले धर्मांतराचे कार्य तीव्र करीत होते. दरवर्षी होळी आणि दिवाळी या हिंदूंच्या सणात आणि मोहोरम आणि ईद या मुसलमानांच्या उत्सवात दंग्याचे पीक फोफावत होते आणि प्रत्येक दंगा प्रमुख हिंदू मुसलमानातही अधिकाधिक कडवेपणा निर्माण करीत होता. दंगे चालू होते, धर्मांधता होती, त्यावर पोसणाऱ्या जातीय संस्था वाढत होत्या; इस्लाम राष्ट्राची संघटना आणि त्याबद्दलची हिंदूंची भीति होती; वाद-

विवादाच्या उग्रतेत निकृष्ट जातीयवादाला वारंवार वाट देणारे राष्ट्रीय पुढारी होते; जातीय बडबड लक्षपूर्वक ऐकणारे लोक होते; काँग्रेस बांधण्यापेक्षा हिंदू महासभा बांधण्यात गढून गेलेले काँग्रेस पुढारी होते; मुसलमानांच्या जातीय संस्थांनी मांडलेल्या मागण्या मान्य न केल्यास काँग्रेसचा निषेध करणारे आणि सर्व राजकीय प्रगती रोखणारे मुसलमान होते. या सर्व गोष्टीमधून काँग्रेसला मोठ्या सावधगिरीने, शहाणपणाने आणि व्यावहारिकतेने मार्ग कापणे जरूर होते. अखिलभारतीय काँग्रेस कमिटीने धर्मांतर व मशिदीसमोर वाद्य वाजवण्यासंबंधी केलेल्या सुस्पष्ट सूचना, बरेचवेळा जातीय चकमकींना कारणीभूत झाल्या. तिने असे म्हटले होते की, प्रत्येक व्यक्तीला किंवा समूहाला मतपरिवर्तनाच्याद्वारे धर्मांतर किंवा पुनर्धर्मांतर करण्याचे स्वातंत्र्य असावे. पण सक्तीने तसे करण्यास मनाई असावी. तिने पुढे असेही म्हटले होते की, 'कुठच्याहीवेळी, कुठच्याही मशिदीवरून धार्मिक किंवा सामाजिक कारणाकरिता मिरवणूक नेण्याचे आणि वाद्ये वाजवण्याचे स्वातंत्र्य हिंदूंना आहे.' परंतु मशिदीसमोर मिरवणूक थांबवण्याचे आणि खास निदर्शन करण्याचे स्वातंत्र्य त्यांना नसावे. अली बंधूसारखे काँग्रेसमधील मुसलमान या सूचनांशी सहमत होते. परंतु हे उपाय देशाच्या जातीय वातावरणावर परिणाम करू शकले नाहीत.

जातीयतेतून जन्म झालेल्या मुसलमानी राजकारणाच्या वाढीकडे लक्षपूर्वक पाहिल्यास असे आढळून येईल की, मुसलमानांच्या मागण्या निधर्मी भूमिकेवरून डावलता येणार नाहीत. आणि म्हणून त्यांचा काँग्रेसने केलेला स्वीकार समर्थनीय आहे. खुद्द लखनौ करारानेच जातीयवादाला अवसर दिला; खिलाफत चळवळीने, हिंदू मुस्लिम ऐक्यासाठी मुस्लिम राष्ट्रसंघाची सवलत दिली. आणि याच कारणासाठी. सिंधच्या मागणी मागील प्रेरणा जरी जातीय होती तरी ती मान्य केली गेली.

बहुसंख्य जमातीला कायदेमंडळात राखीव जागा नसाव्या हा हिंदू महासभेचा ठराव जरी निधर्मी होता तरी त्यात मुसलमान पुढाऱ्यांना छुपा जातीयवाद दिसला. ते म्हणाले की, हा ठराव करताना महासभेच्या डोळ्यापुढे पंजाब व बंगाल हे प्रांत होते; आणि या प्रांतातील कायदेमंडळात राखीव जागा असूनसुद्धा मुसलमान अल्पसंख्यच राहिले होते. त्यांनी असे दाखवून दिले की, या दोन प्रांतात मुसलमानाकरिता पुरेशा राखीव जागा ठेवल्या नाहीत तर जास्त सुशिक्षित आणि संपन्न असलेले हिंदू आणि शीख, पंजाबमधील भावी कायदेमंडळात आपले बहुमत आणि मुसलमानांचे अल्पमत कायम ठेवण्याकरिता एकत्र येतील आणि अनेक प्रकारची साधने हातात असलेले बंगालचे हिंदूही हेच करतील.

स्वायत्त सिंधच्या मागणीत मुसलमानांची जर जातीयता होती तर तिला हिंदुंनी केलेल्या विरोधात कमी जातीयता होती असे नाही. १९१५ मध्ये सिंध विभक्त करण्याचा प्रश्न आला तेव्हा, सिंधच्या आर्थिक आणि व्यापारी नाड्या हातात असलेली सिंधची हिंदू अल्पसंख्य जमात, मुंबईपासून सिंध विभक्त करण्याबद्दल

उदासीन होती. ती आता हिंदू मुसलमान वितुष्टाच्या वातावरणात, स्वतंत्र सिंधमध्ये मुसलमान बहुमताची सत्ता प्रस्थापित होईल यामुळे सहाजिकच भयभीत झाली. याच भीतीने जातीय दंग्याच्यावेळी वायव्य सरहद्द प्रांतातील पाच टक्के हिंदूना आपली घरेदारे सोडून प्रांतातच किंवा प्रांताबाहेर अधिक सुरक्षित ठिकाणी जाणे भाग पडले. कोहटच्या दंग्यात मुसलमान गुंडांनी आपल्या स्त्रिया पळवल्या अशी तक्रार हिंदूंनी केली.

अशारितीने जातीय संघटनांचा संताप पूर्णपणे उतू गेल्यानंतर १९३२ मध्ये वायव्य सरहद्द प्रांताला कायदेमंडळ मिळाले, आणि १९३५ च्या हिंदुस्तान सरकार कायद्याने सिंध प्रांत वेगळा झाला.

प्रकरण विसावे

# 'जीनांना वाऱ्यावर सोडले'

१९२६ नोव्हेंबरमध्ये झालेल्या प्रांतिक आणि मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणूकावरून असे दिसून आले की, कोणतीही राजकीय किंवा जातीय संघटना बहुसंख्य मतदारांचे प्रतिनिधित्व करू शकत नव्हती. किंबहुना आम्ही बहुसंख्य हिंदूंचे किंवा बहुसंख्य मुसलमानांचे प्रतिनिधित्व करतो असा दावा त्यापैकी एकही संघटना करू शकत नव्हती. १९१९ च्या सुधारणा कायद्याने जेमतेम चार टक्के लोकांना मतदानाचा हक्क मिळाला होता. परंतु यावरून या संघटना मतदारापलिकडील जनतेत अधिक लोकप्रिय होत्या असे धरून चालणे चुकीचे होईल; खरं म्हणजे जनतेपेक्षा मतदारांना या संघटनांची जास्त चांगली कल्पना होती. स्वराज्य पक्षाने १९२३ साली मिळवलेल्या बऱ्याचशा जागा, १९२६ साली काँग्रेसच्या पाठिंब्याने लढवलेल्या निवडणूकीत गमावल्या. जातीय दंग्यांनी हिंदू मतदारांची मनोवृत्ती दूषित झाल्यामुळे खिलाफत चळवळ म्हणजे एक बोजवारा उडालेली गोष्ट असे सिद्ध झाले आणि लोकांचे लक्ष हिंदूमहासभेकडे केंद्रित होऊ लागले. काँग्रेस, मुस्लिम लीग आणि अखिल भारतीय खिलाफत परिषद अजूनही हिंदू मुस्लिम ऐक्याकरिता चाचपडत होत्या, परंतु मतदारांच्या मनावर जातीय दृष्टी किंवा स्वतंत्र उमेदवारांचा पगडा बसला होता. त्यामुळे स्वराज्य पक्षाने जातीय दंग्यापासून अलिप्त असलेल्या मद्रासमध्ये भरघोस मते. मिळवली, तर हिंदू मुसलमान रस्त्यात एकमेकांची डोकी फोडत असलेल्या पंजाब व संयुक्त प्रांतात भयंकर हार पत्करावी लागली. मुसलमानांचे प्रतिनिधीसुद्धा कायदेमंडळात वेगवेगळ्या पक्षात विभागले गेले असून विस्कळीत होते त्यामुळे कोणत्याही मुस्लिम संघटनेला आपण मुसलमानी जनतेचे प्रतिनिधित्व करतो असा दावा करता येईना.

मध्यवर्ती कायदेमंडळात हिंदू आणि मुसलमान अशी जातीय विभागणी नव्हती. काही थोडे मुसलमान चिकटून असलेला स्वराज्य पक्ष, काँग्रेसच्या निधर्मीत्वाचे प्रतिनिधित्व करीत होता. दोन हिंदू आणि काही थोडे मुसलमान मिळून जीनांचा गट होता. परंतु स्वराज्य पक्षाबाहेरील इतर बहुतेक सर्व हिंदू मदन मोहन मालवीय आणि लजपतराय या प्रमुख महासभा पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली एकत्र आले आणि त्यांनी आपला राष्ट्रीय पक्ष नावाचा स्वतंत्र पक्ष बनवला. बहुसंख्य मुसलमान सभासद असंघटीत अशा गटाने निराळे बसले. संयुक्त प्रांतातील, सरकारबरोबर प्रतियोगी सहकाराकडे कल असलेले, आणि पारंपारिक हिंदुत्वाचे प्रतिनिधित्व करणारे,

स्वतंत्र काँग्रेस पक्ष या नावाने एकत्र बसले; हा नावाचा दुरुपयोग होता कारण प्रतियोगी सहकाराविरूद्ध काँग्रेस स्पष्ट बोलली होती. पंजाबमध्ये नोव्हेंबर महिन्यातल्या निवडणूकीतले बहुसंख्य हिंदू उमेदवार लजपतराय यांच्या भोवती गोळा झाले होते आणि स्वतःला हिंदूमहासभेचे म्हणवून घेत होते. निवडून आलेले सभासद, सरकारचा पराजय करण्यासाठी आपापले मतभेद बाजूला सारून, अनेकवेळा एकत्र येत होते आणि स्वराज्याच्या मागणीवरही ते एक होत होते.

कायदेमंडळे ही बाह्य परिस्थितीची खरीखुरी प्रतिबिंबे होती. अनेक हिंदू आणि मुसलमान एक संयुक्त पक्ष म्हणून काँग्रेस चालवत होते. 'मुसलमानी हल्ल्यापासून' स्वतःचे संरक्षण करण्यासाठी हिंदू, हिंदूमहासभेद्वारे आपली संघटना करीत होते. आपल्या जातीय हितसंबंधाची संरक्षक म्हणून अनेक मुसलमान मुस्लिम लीगच्या झेंडयाखाली परत जात होते; पण काही मुसलमान लीगच्या ब्रिटिशविरोधी दृष्टिकोनामुळे तिच्याशी समरस होऊ शकत नव्हते; जरी बहुतेक मुसलमान विभक्त मतदार संघाचा त्याग करण्यास तयार नव्हते, तरी काही मुसलमान काही विशिष्ट अटींवर संयुक्त मतदार संघाला मान्यता देत होते. परंतु हिंदुस्तानातील मतांच्या या सर्व विविध छटा त्यांच्या मुख्य राजकीय मागणीत एकत्र आल्या आणि भावी सुधारणा हिंदी आणि ब्रिटिश प्रतिनिधी बसलेल्या गोलमेज परिषदेत ठरवाव्या यावर त्यांचे एकमत झाले. त्यावेळच्या राजकीय परिस्थितीचे सूक्ष्मपणे अवलोकन केल्यास कुणालाही असे दिसून आले असते की, खिलाफत चळवळ, जातीय दंगे आणि शुद्धी आणि संघटन चळवळी यामुळे हिंदू मुस्लिम ऐक्य वास्तविक भंग पावले असले, तरी कायदेमंडळातील मुसलमानांच्या प्रतिनिधित्वावर जर एकमत झाले तर, त्यातून हिंदू मुस्लिम ऐक्य निर्माण होणे क्रमप्राप्तच होते. आणखी असेही ध्यानात येईल की, जरी याबाबतीत त्यांच्यात एकमत होऊ शकले नाही, तरी ते सर्वजण ब्रिटिशांकडे जी मागणी करीत होते ती पुढे ढकलणे शक्य नव्हते.

ब्रिटिश सरकारची घोषणा तारीख ८ नोव्हेंबर १९२७ रोजी आली. या घोषणेन्वये, हिंदुस्तानच्या घटनेच्या प्रश्नांची तपासणी करण्यासाठी सर जॉन सायमन यांच्या नेतृत्वाखाली एक कायदेशीर मंडळ नेमण्यात आले. १९१९ चा कायदा दहा वर्ष अंमलात आणल्यानंतर असे कमिशन नेमण्याची तरतूद १९१९ च्या कायद्यातच केलेली होती. परंतु वाढत्या चळवळीमुळे ही नेमणूक दोन वर्ष पुढे ढकलली होती. तथापि, स्वराज्यासाठी अधिरता आणि मध्यवर्ती कायदेमंडळाचा गोलमेज परिषद भरवण्याचा ठराव, यामुळे ही घोषणा शिळीच ठरली. हिंदुस्तानात या घोषणेचे संतप्त स्वागत झाले. कमिशनमध्ये एकंदर सात सभासद होते, ते सर्व इंग्रज होते; ह्यामुळे चीड अधिकच वाढली. एका ब्रिटिश लेखकाने म्हटल्याप्रमाणे, जालीयनवाला बागेच्या शोकांतिकेनंतर ब्रिटिशांच्या कुठल्याही कृत्याबद्दल याच्या इतका सार्वत्रिक निषेध दाखवला गेला नव्हता. हिंदुस्तानच्या राष्ट्रीय स्वाभिमानाचा अपमान म्हणून

हिंदी मालकीच्या सर्व वर्तमानपत्रांनी आणि बहुतेक सर्व राजकीय पुढाऱ्यांनी तिचा निषेध केला. एम. ए अन्सारी यांच्या अध्यक्षतेखाली मद्रास येथे भरलेल्या त्यावर्षीच्या काँग्रेस अधिवेशनाने, हिंदी लोकांना कमिशनवर बहिष्कार घालण्याचा आणि तो परिणामकारक करण्यासाठी जोरदार प्रचार करण्याचा, त्याचप्रमाणे कमिशनच्या आगमनाच्या दिवशी सर्व देशभर आणि त्यांच्या भेटीच्यावेळी त्या त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर निदर्शने घडवून आणण्याचा आदेश दिला. कायदेमंडळातील लोक नियुक्त सभासदांनी कमिशनला कुठचेही सहाय्य नाकारावे आणि बहिष्कार किंवा मंत्रिमंडळे मोडण्याव्यतिरिक्त दुसऱ्या कुठच्याही कारणासाठी कायदेमंडळात हजर राहू नये असेही सांगण्यात आले.

मुस्लिम लीगमधील जीनांच्या नेतृत्वाखालील पुरोगामी गट काँग्रेस कार्यक्रमाला अनुकूल होता; परंतु इतरांनी आपल्याला त्याच्याशी काही कर्तव्य नाही असे मानले आणि सायमन कमिशनला सक्रिय सहकार्य देऊ केले. मुस्लिम लीगचे वार्षिक अधिवेशन लाहोरला भरावयाचे होते, परंतु लाहोर येथील मुस्लिम लीगमध्ये राजनिष्ठ लोकांचे वर्चस्व असल्यामुळे आपली योजना बारगळेल अशी भीति जीनांना वाटली आणि त्यांनी अधिवेशन कलकत्त्याला भरवण्यासाठी लीगच्या कार्यकारिणीला प्रवृत्त केले. कमिशनशी सहकार्य करावे या मताचे त्यावर्षीचे निवडून आलेले अध्यक्ष, सर महमद शफी यांनी कार्यकारिणीच्या या निर्णयाच्या कायदेशीरपणाबद्दल शंका व्यक्त केली आणि कलकत्त्याला जाण्याचे नाकारले. शेवटी, लाहोरला एक आणि कलकत्त्याला एक अशी लीगची दोन अधिवेशने भरली. जीनांच्या अध्यक्षतेखालील कलकत्ता अधिवेशनाने असे 'जोरदारपणे' जाहीर केली की, 'हे कायदेशीर कमिशन हिंदुस्तानच्या लोकांना अमान्य आहे. म्हणून अधिवेशन असा ठराव करीत आहे की देशातील सर्व मुसलमानांना कुठल्याही परिस्थितीत आणि कोणत्याही स्वरुपात या कमिशनशी काहीही कर्तव्य नाही.' अधिवेशनाने लीग कौन्सिलला घटनेचा आराखडा तयार करण्यासाठी आणि आवश्यक अशा खबरदारीच्या सूचना करण्यासाठी काँग्रेस व इतर राजकीय पक्षांशी संबंध ठेवणारी एक कमिटी नेमण्याचा अधिकार दिला. दुसऱ्या बाजूला लाहोर अधिवेशनाने कमिशनला सहकार्य देण्याची मुसलमानांना विनंती केली, आणि असे करणे हे मुसलमानांच्या फार हिताचे आहे असे सांगितले. विभक्त मतदार संघाच्या सर्वात जुना कैवारी अमीर अली याने लंडनहून लाहोरला असा इशारा दिला की, हा संकल्पित बहिष्कार हिंदुस्तानच्या विशेषत: अल्पसंख्यकांच्या हितसंबंधांना नुकसानकारक होईल. लंडनमध्ये शिजलेले नाटक लाहोरच्या रंगभूमीवर येत होते असे दिसते. लॉर्ड बरकेनहेड, सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया यांनी व्हाइसरॉयला 'फोडा आणि झोडा'ची उपाययोजना सुचवली ती अशी : 'बहिष्कार-वादी वृत्ती मोडून काढण्यासाठी आम्ही नेहमीच बहिष्कार न घालणाऱ्या मुसलमानांवर दलित जमातीवर व्यापारी हितसंबंधावर आणि इतर तत्सम शक्तीवर विसंबून

आहोत. कमिशनच्या आगामी भेटीच्याबाबतीतसुद्धा, विरोधाच्या तटाला भगदाड पाडण्याचा अशाच पद्धतीने प्रयत्न करणे उपयुक्त होईल की नाही याचा निर्णय तुम्ही आणि सायमन यांनी घेतला पाहिजे.'[१] व्हाइसरॉयला पाठवलेल्या दुसऱ्या एका पत्रात म्हटले होते : 'माझा सायमनना असा सल्ला आहे की, बहिष्कार न घालणाऱ्या महत्वाच्या लोकांना विशेषत: मुसलमान आणि दलित जमातीच्या लोकांना, कमिशनने आपल्या कामाच्या प्रत्येक अवस्थेत भेटले पाहिजे. प्रातिनिधिक मुसलमानांशी झालेल्या त्यांच्या मुलाखतींची जास्तीत जास्त जाहिरात झाली पाहिजे, असे मी म्हणेन. आता सर्व धोरण स्पष्ट आहे. आणि ते म्हणजे कमिशन मुसलमानांना हाताशी धरून हिंदूंना पूर्णपणे हानीकारक असा अहवाल सादर करील, आणि त्यामुळे जीनांना वाऱ्यावर सोडून देऊन मुसलमानांचा भरीव पाठिंबा मिळवील या भीतीने प्रचंड हिंदू जनतेला घाबरवून सोडणे हे होय.'[२]

आपल्या कमिशनवरील प्रतिक्रियेचा सायमन यांना अंदाज होता. त्यांनी हिंदुस्तानात पाय ठेवल्यानंतर थोड्याच दिवसात व्हाइसरॉयला अशी सूचना केली की, सात इंग्रज व मध्यवर्ती कायदेमंडळ नेमील ते सात हिंदी सभासद यांची मिळून एक मुक्त स्वरुपाची संयुक्त परिषद असे या कमिशनचे स्वरुप असावे. परंतु ही सूचना हिंदी पुढाऱ्यांनी धुडकावून लावली आणि ही सूचना नाकारण्याचे लजपतराय यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात मांडलेले विधेयकही संमत केले. तरीसुद्धा, व्हाइसरॉयने 'खुल्या आणि समानतेच्या पातळीवरून' कमिशनच्या कार्याची हिंदी दृष्टिकोनातून चिकित्सा आणि स्पष्टीकरण व्हावे म्हणून, कमिशनबरोबर 'मुक्त स्वरुपाच्या संयुक्त परिषदेत' बसण्यासाठी तीन कौन्सिल ऑफ स्टेटमधून आणि चार असेंब्लीमधून अशा सात सभासदांची एक कमिटी नेमली.

कमिटीचे तीन सभासद मुसलमान होते; त्यापैकी दोघांनी कमिटीच्या अहवालाला जोडलेल्या आपल्या मतभेदाच्या टिपणात जातीय आग पाखडली. प्लासीच्या लढाई-पासून हिंदूंनी केलेल्या आघातापासून ब्रिटिश आणि मुसलमान कसे बचावले हे दाखवण्यासाठी त्यांनी इतिहासाचा तऱ्हेवाईक अर्थ लावला. त्यांनी आपल्या टिपणात असे लिहिले होते :

> हिंदूंमध्ये निर्माण झालेल्या नव्या जागृतींनी कलकत्त्यातील ब्रिटिश वसाहत धुवून निघाली असती याबद्दल कुणालाही थोडीसुद्धा शंका वाटणार नाही परंतु इतिहासाच्या दिव्य श्वासोच्छवासाने कालाचा लय ठरवला आहे. अफगाणीस्तानचा राजा अहमद शहा अबदाली याने मुसलमानांच्या तांतडीच्या विनंतीला मान देऊन हिंदुस्तानवर स्वारी केली. त्यांनी पानिपत येथे मराठ्यांच्या चढेल उद्दामपणाला तोंड दिले. हिंदू महत्वाकांक्षा व मुसलमानांचा धार्मिक उत्साह यामधली ती

१. बर्कनहेड कृत , पृ. २५४.
२. बर्कनहेडच्या पृ. २५५ वरील पत्रातील उतारे.

घनघोर लढाई होती. हिंदू सत्ता आणि दिमाख पानिपतच्या रणक्षेत्रावर निकालात निघाला.''''''' यानंतर हिंदू संघराज्याचा निरनिराळ्या तुकड्यांचा यशस्वीपणे समाचार घेण्यास ब्रिटिशांना फार सोपे गेले.

सुमारे १०० वर्षानंतर मुसलमानांना ब्रिटिशांविरूद्ध उठवण्याचा दुसरा एक निष्फळ प्रयत्न हिंदूंनी केला. परंतु, १८५७ च्या या बंडात ब्रिटिश विजयी झाले आणि कुप्रसिद्ध नानासाहेब आणि इतरांनी पसरवलेली कट्टर द्वेषभावना जवळजवळ ६० वर्षे शांत राहिली.

१९२० मध्ये ब्रिटिशांना परत हिंदू महत्वाकांक्षेच्या उफाळलेल्या लाटांना तोंड द्यावे लागले. यावेळच्या परिस्थितीत आणि बंडाच्यावेळच्या परिस्थितीत काही फरक नव्हता. मोठ्या हुशारीचा बनाव करून हिंदूंनी काही भोळसट मुसलमानांना जिंकले आणि आपली लढाई त्यांना खेळावयास लावली. याचा परिणाम असा झाला की, बंडाच्या काळाप्रमाणेच १९२१–२२ मध्ये या फसवल्या गेलेल्या मुसलमानांना लढाईचा जोराचा तडाखा सहन करावा लागला. तुरुंगात गेलेल्या लोकांपैकी ८० टक्के मुसलमान होते.

नबाब सर झुल्फिकार अलिखान सीएसआय, आणि डॉ. अब्दुला-एल्-मामून सुराव्हर्दी हे दोघे लाहोर शाखेचे मुसलमान होते. कमिशनवर बहिष्कार घालण्यात मुसलमानांनी परत हिंदूंशी हातमिळवणी करणे किती धोक्याचे आहे हे सुचवण्याकरिता त्यांनी आपल्या मतभेदाच्या टिपणीत अगदी अप्रस्तुत गोष्टींचा समावेश केला. संयुक्त मतदार संघाच्या बाजूच्या कुठल्याही सूचनेला विरोध करताना त्यांनी अमीर अलीच्या सल्ल्याचा आणि लीगच्या लाहोर ठरावाचा पुनरुच्चार केला आणि असे प्रतिपादन केले की, 'आमच्या हिंदुस्तानभर केलेल्या दौऱ्यात एकाही मुस्लिम संस्थेने किंवा साक्षिदाराने संयुक्त मतदार संघाची मागणी केली नाही एवढेच नव्हे तर, विभक्त मतदार संघाच्या बाजूने नवल वाटण्याइतके मतैक्य आढळून आले.'

वर सांगितल्याप्रमाणे, मुस्लिम लीगचे मुसलमान दोन शाखेत विभागले गेले होते : काही अटींवर संयुक्त मतदार संघ मान्य करणारे आणि कमिशनशी असहकार पुकारणारे एका बाजूला होते; आणि कुठच्याही परिस्थितीत विभक्त मतदार संघ मागणारे आणि कमिशनशी सहकार्य करणारे दुसऱ्या बाजूला होते. शेवटी कुठली बाजू विजयी होईल हे भवितव्य वर्तवणे सोपे नव्हते; पण तरीसुद्धा, लॉर्ड ऑलिव्हियर यांनी १९२८ च्या मेमध्ये जणूकाय इच्छापूर्ती म्हणून आणि प्रचलित राजकीय अंधश्रद्धांच्या अधीन होऊन पुढील मत व्यक्त करण्याचे धाडस दाखविले. 'प्रतिनिधित्व कुठच्या तत्वावर आधारलेले असावे यासंबंधी हिंदू पक्ष आणि मुस्लिम जमात यांच्यामधील भांडण कसोटीचे आहे. श्रीयुत जीनांना स्थानिक मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात काही राखीव जागा असाव्यात या अटीवर संयुक्त मतदार संघाचे तत्व मान्य आहे. आणि या तत्वावर सर्वांचा मिळून एक सुधारणा कार्यक्रम

सादर करता यावा म्हणून हिंदूंशी तडजोड करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. बहुसंख्य मुसलमान पूर्णपणे विभक्त मतदार संघाच्या बाजूचे आहेत. त्यांना आपल्या लोकसंख्येच्या प्रमाणात आपल्या जातीचे प्रतिनिधी प्रत्यक्षपणे निवडून हवे आहेत.' ३

हिंदूस्तान सरकारशी ज्यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध होता त्यांनी थोडयाबहुत पुराव्याचे जे कडे मागे ठेवले आहेत त्यावरून असे दिसून येते की, एका ध्येयप्रणालीवर लोकांनी एकत्र येण्याचा संभव शक्य तितका कमी व्हावा म्हणून सरकारने राजकीय पक्षांच्या अनुयायात अधिकाधिक दुफळी माजवण्याचा प्रयत्न केला. लॉर्ड बरकनहेड यांनी व्हाइसरॉयला लिहिलेल्या दुसऱ्या एका पत्रात असा सल्ला दिला होता की, : 'स्वराज्य पक्षाविरूद्ध प्यादे म्हणून वापरता यावे किंवा स्वराज्य पक्षात अधिक मतभेद माजावेत म्हणून या कमिशनचा उपयोग करण्यासाठी तुम्हाला कधी संधी मिळेल किंवा काय याबद्दलचा तुमचा विचार जाणण्याची माझी इच्छा आहे.... ही संधी जर किफायतशीर होणार असेल तर तिचा भरपूर उपयोग करून घ्या. याबाबतीत तुम्हाला सरकारचा संपूर्ण पाठिंबा लाभेल.'४ एका बाजूला हिंदू जातीयवादाने व दुसऱ्या बाजूला मुस्लिम जातीयवादाने स्वराज्य पक्ष फुटला; फुटीच्या प्रवृत्तीला सरकारी अधिकाऱ्यांनी पूर्वी मदत केली असो अगर नसो, आता मात्र त्यांनी तसे करावे अशी बर्कनहेडची इच्छा होती.

---

३.

४. वर उद्धृत केलेल्या बर्कनहेडच्या पुस्तकातील पृ. २५.

प्रकरण एकविसावे

# हिंदु मुसलमानांच्या ओढाताणीत सापडलेले अस्पृश्य

मुसलमानांची संख्या वाढवण्याकरिता जेव्हा जेव्हा मुसलमानी अस्मितेला आव्हान केले जात असे, तेव्हा तेव्हा मुस्लिम मुल्ला, हिंदूंच्या सर्वसाधारणपणे 'अस्पृश्य' समजल्या जाणाऱ्या कनिष्ठ जमातींना भेटी देत असत, आणि या अभागी लोकासमोर इस्लामने आश्वासिलेल्या आणि हिंदू धर्मात त्यांना कधीही न मिळणाऱ्या समता आणि बंधुत्वाची महती गात असत. त्यांच्या या धर्मांतराच्या पारंपारिक मोहिमेला १९२० ते १९३० च्या काळातील शद्धी चळवळीने प्रथमच धोका निर्माण केला. हिंदू बाटवले जातात याबद्दल हिंदूंची कुरकूर अनेक शतके चालू होती, परंतु त्याला प्रतिबंधक उपायाची पावले त्यांनी उचलली नव्हती. परिणामी दर दशकामागे लोकसंख्येच्या टक्केवारीत हिंदू कमी होत होते आणि मुसलमान वाढत होते. बहुतेक धर्मांतरीत मुसलमान हे 'अस्पृश्य' हिंदू असल्यामुळे मुस्लिम राजकारणी लोकांपैकी इस्लामच्या उत्साही धर्मगुरूंना, हिंदू आणि मुसलमान या दोघांनाही सोयरेसुतक नसलेले, पण इस्लामला जास्त जवळ असणारे 'अस्पृश्य' म्हणजे एक चरण्याचे खुले कुरण वाटले; कारण हजारो वर्षांचा शेजार असूनसुद्धा ज्यांना हिंदू जातीभेदाने समानतेचा दर्जा नाकारला, तो त्यांना इस्लामने दिला. हिंदू हे हिंदचे—हिंदुस्तानचे मूळ रहिवाशी. पण इस्लाम आणि ख्रिश्चन धर्माच्या आगमनानंतरच त्यांना या भूमीच्या मूळ धर्माचे म्हणजे हिंदू धर्माचे अनुयायी समजण्यात आले. आपला देश सोडून आलेले आणि धर्मांतर केलेले अहिंदू सोडून इतर सर्व लोक हिंदू म्हणून गणले जात होते. परंतु जेव्हा धर्म—इस्लाम, ख्रिश्चन, शीख आणि हिंदू—हाच कायदेमंडळातील प्रतिनिधित्वाचा पाया बनला तेव्हा मुसलमान नेत्यांनी ब्रिटिशांना असे सांगितले की, 'अस्पृश्यांचे' नशीब हिंदूंच्या हाती सुपूर्त करणे हे त्यांना अन्याय करणारे आहे; हे नामधारी हिंदू 'अस्पृश्य', हिंदु धर्मापेक्षा मुसलमान धर्मात अधिक सुरक्षित आहेत, आणि त्यांची गणती हिंदू म्हणून करणे हे मुसलमानांच्या प्रतिनिधित्वाच्या प्रमाणाला मारक आहे. 'अस्पृश्यांना' वगळता, हिंदूंची संख्या मुसलमानांपेक्षा फारशी अधिक भरणार नाही.

हा प्रश्न राजकीय पातळीवर आणणारे पहिले मुसलमान पुढारी अमीर अली हे होते. जानेवारी १९०९ मध्ये सेक्रेटरी ऑफ स्टेट, मोर्ले यांना मुस्लिम लीगच्या शिष्टमंडळाची ओळख करून देताना केलेल्या भाषणात ते म्हणाले होते :—

दुसऱ्या कुठच्याही राष्ट्रीय जमाती इतकेच आमचे राष्ट्रीयत्वही महत्वाचे आहे. आणि आम्ही असे मानतो की, धोरणांचा आणि उपायांचा विचार करताना आमच्या इच्छा, भावना आणि हितसंबंध दुसऱ्या इतकेच महत्वाचे मानले गेले पाहिजेत. केवळ नाममात्र हिंदू असलेल्या कनिष्ठ जातींची फार मोठी अशी लोकसंख्या जर हिंदू जातीतून वगळली तर हिंदू मुसलमानांच्या प्रमाणात आता जी तफावत दिसत आहे ती इतकी मोठी किंवा विजोड वाटणार नाही. खऱ्या हिंदूंमध्ये आणि खानेसुमारीसाठी हिंदू समजल्या गेलेल्या टोळ्या आणि जमाती यांच्यामध्ये काहीही साधर्म्य नाही. त्यांना त्यांच्या स्पर्शाचा, आणि कधी कधी तर त्यांच्या सावलीचाही विटाळ होतो. ज्या नीच परिस्थितीत ते रहातात आणि शेकडो वर्षे रहात आले आहेत त्यातून ते कधीच बाहेर येणार नाहीत. ब्रिटिश अधिकाऱ्यांशिवाय त्यांचा कुणी प्रतिनिधी नाही. युगानुयुगे बद्ध करणाऱ्या या बेड्या तोडण्याचे काही जणांनी जिवावर उदार होऊन प्रयत्न केले परंतु, इतर अनेक गोष्टीप्रमाणे जुन्या रीतिरवाजांच्या कायदेशीर मान्यतेमुळे ते गुलामगिरीत दडपले गेले. आता आणण्यात येणाऱ्या मोठ्या सुधारणात त्यांना हिस्सा असणार नाही की, जागा मिळणार नाही. हुजुरांच्या सदिच्छाही त्यांच्या कानापर्यंत पोचण्याचा फारसा संभव नाही. आतापर्यंत हिंदुस्तानची दलित जमात म्हणून ते अनेक दशके नव्हे शतकेही असेल, राहिले आणि रहातील. पण जर सत्ता आणि अधिकार हे वरिष्ठ जमातीच्या हाती सोपवले तर त्यांची मुक्तता भावी काळातही कठीण ठरेल. ही गोष्ट भयानकच होय. काही झाले तरी या जमाती हिंदू लोकसंख्येत सामावणे आणि मग त्या लोकसंख्येची मुसलमान लोकसंख्येशी तुलना करणे हे आम्हाला न्याय वाटत नाही.[१]

१९१९ च्या मर्यादित सुधारणांनी हिंदूंची प्रत्यक्ष निवडणुकीची मागणी कबूल केली नाही आणि धार्मिक अल्पसंख्य म्हणून फक्त मुसलमानांनाच मान्यता दिली. दलित वर्गाच्या बाजूने केलेल्या अमीर अलींच्या विनंतीचा जरी तत्काळ परिणाम झाला नाही तरी, ते महत्वाचे प्रकरण म्हणून अनिर्णित प्रश्नांच्या नोंदवहीत पडून राहिले. यामुळे तरी आपण उपेक्षिलेल्या जमातींची जाणीव हिंदूंना व्हावयास हवी होती, परंतु तसे झाले नाही, खरं म्हणजे तसे होऊ शकले नाही. कारण कनिष्ठ जातीच्या हिंदूंनीसुद्धा 'अस्पृश्यांच्या' स्पर्शाचा आपल्याला विटाळ होऊ दिला नाही. मुसलमानांनी हिंदूंना याबद्दल योग्य टोमणे मारले. त्यांनी विचारले की, अस्पृश्यांची सावलीही न चालणाऱ्या ह्या संयुक्त मतदार संघाच्या आणि प्रौढ मतदानाच्या पुरस्कर्त्या जातीय हिंदूंना ते मतदान केंद्रात आलेले कसे चालतील? आपल्या हजारो बांधवांना बरोबर घेऊन हिंदू धर्म सोडणारे विसाव्या शतकातील सर्वात मोठे

१. डॉ. अब्दुला अल्-मामून सुऱ्हावर्दी यांनी इंडियन सेंट्रल कमिटीला जोडलेली सप्लिमेंटरी नोट, पुरवणी —— १९३०, पृ. ८१.

अस्पृश्यांचे राजकारणी नेते आणि लेखक, डॉ. बी. आर. आंबेडकर हे होते. १९२८ साली इंडियन सेंट्रल कमिटीपुढे संयुक्त मतदार संघाच्या बाजूने साक्ष देतानासुद्धा त्यांनी अशी भीति व्यक्त केली की, सवर्ण हिंदू 'अस्पृश्यां' ना मतदान केंद्रात जाण्याची परवानगी तरी नाकारतील किंवा 'अस्पृश्यां' च्या आगमनाने 'विटाळलेल्या' मतदान केंद्रावर बहिष्कार तरी घालतील. १९२०–३० च्या काळात ब्रिटिश लोकसभेतही, दलित जमाती हा एक चर्चेचा विषय बनला होता. मद्रासच्या एका इंग्रज सनदी अधिकाऱ्याने दलित वर्गासाठी निराळे प्रतिनिधित्व असावे यासंबंधी आपले विचार मांडत असताना सवर्ण हिंदू या लोकांना कसे वागवतात याचे केलेले हुबेहूब वर्णन The Report of the Franchise Committee (Vol. I P P. 12-46) यात पहावयास मिळते. ते लिहितात :

म्युनिसिपालिटी असलेल्या गावात सार्वजनिक रस्ते वापरण्यासही कधी कधी नोटिसा काढून या 'दूषित जमातीला' मनाई केलेली आहे. उच्चवर्णियांच्या शाळातून दलित वर्ग सरसकट वगळला जातो. शिक्षणापुरतेच हे थांबत नाही तर ते धर्मालाही लागू असते आणि त्याला मंदिरात जाण्यासही मज्जाव असतो देवळाच्या पवित्र परिसरात दलित वर्गाला मज्जाव आहे असे फलकही काही ठिकाणी मंदिराच्या दरवाज्यावर लावलेले आहेत. ब्रिटिश येण्यापूर्वी दलित वर्गाचे स्थान उघड उघड गुलामगिरीचे होते. १८ व्या शतकात जमिनीच्या खरेदीविक्री खतात, शेते, विहिरी, पाणीपुरवठा, घरे बांधणी वगैरे गोष्टींची मोजणी झाल्यानंतर मालमत्ता दुसऱ्याच्या नावावर करण्याची बाब म्हणून गुलामांचा उल्लेख केलेला असे. १८१९ मध्ये महसुलाची रक्कम वसूल करून घेण्याकरिता चार दलित गुलामांचा जाहीर लिलाव करण्यात आला. १८४३ मध्ये हिंदुस्तान सरकारला असा कायदा करावा लागला की, गुलाम म्हणून दुसऱ्याची सेवा करणे आणि व्यक्ती ही मालमत्ता म्हणून वापरणे यातून उदभवणाऱ्या कुठल्याही हक्कांची अंमलबजावणी कंपनी सरकारच्या न्यायालयाकडून केली जाणार नाही; आजसुद्धा, दलित जमातीच्या नोकराला काही जिल्ह्यातील बोलीभाषेत गुलाम म्हणून संबोधिले जाते. दलित हा आता औपचारिक नावापुरता जरी गुलाम नसला तरी उच्च-वर्णीय हिंदुंनी त्याला मोठ्या परिणामकारकपणे त्या स्थानावर अजूनही बसवलेले आहे. ते म्हणजे (अ) मजुरांच्या घरांच्या आसपासच्या जागेवर, आणि बरेचवेळा त्यांच्या राहण्याच्या झोपडीवरही आपली मालकी ठेवून आणि (ब) या लोकांना सतत कर्जे देऊन, उधारी बापापासून मुलापर्यंत सतत चालू रहाते. आणि ती फिटेपर्यंत त्याला मालकाच्या कामाला बांधून ठेवते. ह्या जणूकाय दास्यात ठेवणाऱ्या गोष्टीपासून सुटका करून घेण्याचा त्याचा उपाय म्हणजे हिंदुस्तान सोडणे.

अस्पृश्यांच्या परिस्थितीत, हिंदू म्हणून आणि मुसलमान म्हणून जमीन अस्मानांचा

फरक होता; हिंदू म्हणून त्याला सार्वजनिक विहिरीवर जाऊ देत नव्हते; तर मुसलमान म्हणून तो तीच विहिर हक्काने वापरत होता, आणि एकाद्या हिंदूने त्याच्या हक्काबद्दल हरकत किंवा शंका घेतल्यास प्रेषिताच्या अनुयायांचा गट त्याच्या मदतीला जाऊन त्याचा हक्क शाबीत करून घेत होता. म्हणून अर्थातच, हिंदूमहासभेची 'अस्पृश्याबद्दलची नवी आस्था, अस्पृश्यांना ममतेने वागवा असे त्यांनी हिंदूंना केलेले आवाहन आणि सर्वत्र पसरलेली शुद्धी चळवळ हे सर्व सुरू असूनसुद्धा हजारो हिंदू इस्लामकडे जात होते हे अगदी साधेसुधे तर्कशास्त्र होते. इंडियन सेंट्रल कमिटीचे १९२८ ) एक सभासद, डॉ. अब्दुल्ला अल-मामुन सुऱ्हावर्दी यांनी ह्या घटना आणि त्यांचे हिंदूवरील परिणाम याचा इत्यर्थ आपल्या कमिटीच्या अहवालाला जोडलेल्या पुरवणीत अचूक दाखवला आहे.

हिंदुस्तानातील मुस्लिम सत्तेच्या अस्ताबरोबरच बाटवण्याची क्रिया नवे सामर्थ्य, जोम आणि प्रेरणा घेऊन पूर्ण वेगाने सतत कार्य करीत आहे. प्रत्येक वर्षी हजारो हिंदू इस्लामचा स्वीकार करतात असा त्याचा दावा आहे. हे धर्मांतरीत हिंदू, पूर्वी धर्मांतर केलेल्यांच्या वंशजासह, इस्लामचे उत्साही अनुयायी आहेत. कारण आपल्या पूर्वीच्या हिंदुधर्माच्या जातीपासून आणि सामाजिक रूढीच्या जुलुमापासून दूर पळताना आणि इस्लामच्या बंधुत्वाच्या उदार अंतकरणात आश्रय घेताना ते हिंदूंच्या कल्पना आणि भावनांचे अधिकच शत्रुत्व करतात आणि मूळ मुसलमान आणि त्यांचे वंशज यांच्यापेक्षा हिंदूपासून अधिक दूर जातात. इस्लामची मायभूमी आणि केंद्रबिंदू असलेल्या मक्केला ज्या मक्केकडे तोंड करून आस्तिक मनुष्य जिवंत असताना दिवसातून पाचवेळा प्रार्थना करतो; आणि तो मरण पावल्यावर त्या दिशेकडे त्याचे तोंड वळवून ठेवले जाते त्या मक्केला—ते हजारोंच्या झुंडीने जमा होतात आणि दरवर्षीच्या तीर्थयात्रेच्या शिस्तीच्या भट्टीत फेकले जातात. तेथून ते शुद्ध आणि पवित्र होऊन आणि अरबस्तानचे रीतिरिवाज घेऊन परत हिंदुस्तानात येतात. चिनी आणि ज्यू लोक हिंदूपासून जितके निराळे आहेत तितकेच निराळे तेही बनतात.

वरील उताऱ्यावरून असे दिसून येईल की, १९२० ते १९३० पर्यंत मुसलमान दलित जमातीच्या बाजूच्या कैवार घेण्यात पुढाकार घेत होते आणि आपल्या मूळ धर्मात सर्व सामाजिक हक्क आणि मानवी स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या माणसाच्या, धर्मांतरांपेक्षा हे अस्पृश्यांचे धर्मांतर पूर्णपणे निराळे आहे असे जगाला दाखवून देत होते. धर्मांतर केलेला अस्पृश्य नुसता मुसलमान होते असे नव्हे तर मक्केकडे तोंड केलेला, एका निराळ्याच राष्ट्रवादाचा पायीक बनतो. मुसलमानांच्या आणि हिंदुमहासभेच्या (यात आर्यसमाज शुद्धी सभा वगैरे इतर सर्व चळवळीचा समावेश आहे असे समजावे.) या 'अस्पृश्यां' बद्दलच्या चढाओढीत, मुसलमान एकसारखे जिंकत होते; कायदेमंडळाच्या प्रतिनिधित्वाकरिता त्यांचे समर्थन करीत होते, आणि धर्मांतराने त्यांचा दर्जा उंचावत होते. कायदेमंडळात दलित जमातींना निराळ्या

प्रतिनिधित्वाची कायद्याने तरतूद व्हावी असा आस्थेने प्रयत्न करणाऱ्यात सेंट्रल कमिटीचे मुस्लिम सभासद डॉ. सुऱ्हावर्दी हे होते. अस्पृश्यांचे धर्मांतर करून मुसलमानांना मिळत असलेले धार्मिक समाधान आणि राजकीय फायदा एवढ्यामुळेच नव्हे तर त्यांना सहानुभूती दाखवण्यास मुसलमानांना आणखी एक कारण होते. त्यांना इस्लामने सामावून घेतल्यामुळे जरी त्यांचा दर्जा ऊंचावला होता तरी हिंदूंच्या सामाजिक दृष्टिकोनातून हे सर्व मुसलमान 'अस्पृश्य' ठरत होते. त्यांच्याबरोबर हिंदू भोजन करीत नसत आणि त्यांनी स्पर्श केलेले किंवा शिजवलेले अन्न खात नसत. मागे सांगितल्याप्रमाणे बहुतेक मुसलमान केव्हाना केव्हातरी हिंदू अस्पृश्य होते. शिवाय नव्या धर्मातही ते आर्थिकदृष्ट्या अगदी दरिद्रीच होते. देशाच्या आर्थिक जीवनात त्यांना हिंदू अस्पृश्याबरोबरच बसवले जात होते. शिक्षणातही ते मागासलेले होते. त्यामुळे समृद्ध आणि सुशिक्षित सवर्ण हिंदू विरूद्ध, कायदेमंडळात किंवा इतर ठिकाणी मुसलमान आणि अस्पृश्य यांना एकत्र येण्याचा मोह होणे समजू शकते. मुसलमान पुढाऱ्यांना 'अस्पृश्या' बद्दल जरी प्रामाणिक सहानुभूती नसली तरीही त्यांची ही आस्था समर्थनीय ठरली असती. हेतू काहीही असला तरी हे कबूल केले पाहिजे की, दलितांच्या दैन्यावस्थेवर प्रथम प्रकाशझोत टाकणारे ते मूळ पुरुष होते. या आस्थेचा परिणाम इतका मोठा होता की, प्रमुख हिंदू पुढाऱ्यांनी व्यक्तिशः पुढाकार घेऊन सवर्ण हिंदू आणि 'अस्पृश्य' जमात यांच्या सहभोजनांना उत्तेजन दिले; एकत्र पंक्तीची ही अदभुत घटना हिंदुस्तानने पूर्वी कधीच पाहिली नव्हती. परंतु तरीही, बहुसंख्य हिंदू होते तितकेच रूढीप्रिय आणि 'अस्पृश्यां' ना तुच्छ लेखणारे राहिले आणि अस्पृश्यांनी हिंदू मतदार संघाचा भाग रहावे म्हणून त्यांच्या पुढाऱ्यांना प्रवृत्त करण्यासाठी गांधींनी प्राण पणाला लावले नसते तर दलितांकरिता स्वतंत्र मतदार संघ प्रत्यक्षात उतरले असते. गांधींनी अस्पृश्यता निवारण हे आपल्या विधायक कार्यक्रमाचे प्रमुख अंग बनवले, आणि हळूहळू काँग्रेसही अस्पृश्यांची प्रवक्ती आणि समर्थक बनली. गांधींनी त्यांना हरिजन—'देवाची माणसे'—असे पवित्र नाव दिले. मुसलमानांच्या 'अस्पृश्या' बद्दलच्या आस्थेचा तो शेवट होता.

---

प्रकरण बाविसावे

# नेहरु रिपोर्ट आणि त्यातून काय निसटले

तीस मुसलमान पुढाऱ्यांनी लखनौ कराराला काढलेल्या पर्यायावर मे १९२७ च्या अखिल भारतीय काँग्रेसने शिक्कामोर्तब केले. त्याच अधिवेशनात तिने 'मध्यवर्ती आणि प्रांतिक कायदेमंडळातील लोकनियुक्त आणि इतर राजकीय पक्षांच्या सभासदा-बरोबर विचार विनिमय करून हिंदुस्तानच्या हक्कांवर आधारलेली स्वराज्याची घटना तयार करण्याचा आदेश आपल्या कार्यकारिणीला दिला.' डिसेंबरच्या आसपास काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन भरेतोपर्यंत ही कल्पना देशात फैलावली होती आणि तिच्यावर चर्चाही झाली होती; काँग्रेस कार्यकारिणीला अनेक संस्थांनी आणि व्यक्तींनी आपल्या सूचना पाठवल्या होत्या. त्यामुळे काँग्रेसने सर्वपक्ष परिषद बोलावण्याचे पुढचे पाऊल उचलले. या परिषदेला व्यापारी, मजूर, सामाजिक सांस्कृतिक, धार्मिक आणि आपापल्या संकुचीत हितसंबंधांचा विचार करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधीसुद्धा बोलावले होते. राजकीय संघटनांच्या प्रतिनिधीव्यतिरिक्त जातीय संघटनांचे प्रतिनिधी टाळणे अशक्य होते. त्यांच्या प्रमुख निमंत्रितात मुस्लिम लीग, हिंदूमहासभा आणि खिलाफत परिषद या संघटना होत्या. मुस्लिम लीगच्या जीना गटाने, काँग्रेसच्या या उपक्रमाचे स्वागत केले, आणि 'मुसलमानांच्या हितसंबंधांना संरक्षण दिले जाईल अशी हिंदुस्तानची घटना तयार करण्यासाठी, काँग्रेस कार्यकारी कमिटीबरोबर आणि लीग कौन्सिलला योग्य वाटतील अशा इतर संघटनाबरोबर चर्चा करण्यासाठी' एक प्रतिनिधी मंडळ नेमले.

परंतु, १२ ते २२ फेब्रुवारी १९२८ पर्यंत चाललेल्या सर्व पक्ष परिषदेच्या पहिल्याच बैठकीतील संयुक्त चर्चेवरून आपल्याला काही मिळण्यापेक्षा गमवावेच लागेल अशी भीति लीगला वाटू लागली. हिंदूमहासभा आणि शीख यांनी आपल्या जातीय हक्कांचा आग्रह धरल्यामुळे काँग्रेसने मुसलमानांना आधीच दिलेल्या सवलतींवर अतिक्रमण होणार असा रंग दिसू लागला होता. परिषद काहीच गृहित धरून चालत नव्हती, आणि अल्पसंख्यकांच्या हक्कांसकट घटनात्मक सुधारणांच्या सर्व क्षेत्रांचा नव्याने विचार करीत होती. या परिषदेच्या कल्पनेचा जन्म होण्यापूर्वी देशाच्या राजकीय परिस्थितीची चर्चा करणारे मुख्यत: तीन पक्ष होते : काँग्रेस, मुस्लिम लीग आणि हिंदूमहासभा. आता, मुस्लिम लीगच्या हक्कांना ग्रासून टाकणाऱ्या आणि आपले स्वत:चे हक्क पुढे मांडणाऱ्या सत्तराहून अधिक संघटना अस्तित्वात आल्या.

मुसलमानांप्रमाणेच, दलित जमाती ख्रिश्चन, शीख, मराठा या सर्वांनाच भावी घटनेत आपले हितसंबंध सुरक्षित करण्याची उत्सुकता होती. लीगच्या मागण्यांना हिंदु-महासभा करीत असलेल्या उघड विरोधात शीख प्रतिनिधींची कडवी भर पडली. १९०६ पासून मुसलमान पुढाऱ्यांच्या आंगवळणी पडलेला तोच चिवटपणा आणि तीच हक्कबाज भाषणे ऐकल्यानंतर परिषदेने लखनौ कराराला पर्याय म्हणून काढलेला करार हाच शेवटचा शब्द नव्हे असे सुचवणारा ठराव संमत केला. लीगचे प्रतिनिधी मंडळ घाबरले आणि त्यांनी परिषदेच्या या नव्या वळणाबद्दल लीग कौन्सिलला प्रतिवृत्त सादर केले. लीग कौन्सिलने घाईघाईने एक तातडीची सभा बोलावली आणि आपल्या प्रतिनिधी मंडळाला असे सांगितले की, 'लीगच्या सूचना मान्य करण्याबद्दल त्यांनी निरनिराळ्या संस्थांच्या प्रतिनिधीवर दबाव आणावा.' आणि घटना निर्मितीचे कार्य पुढे चालू ठेवण्याची ती अट करावी असा आदेश दिला.

लीगवाल्यांना आपल्या विचारांशी सहमत करून घेण्याबद्दल हिंदू आणि शीख काही कमी आग्रही नव्हते. त्यामुळे मार्ग तिथेच खुंटला. पहिल्या बैठकीच्या शेवटी मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. नव्या घटनेमध्ये कायदेमंडळे, मतदानाचे हक्क, मूलभूत हक्क, शेतकरी व कामगारांचे हक्क आणि संस्थाने यांच्याबद्दल काय तरतूद असावी याचा अभ्यास करुन अहवाल सादर करणे हे तिचे कार्य होते. या समितीवर मुस्लिम लीगला प्रतिनिधित्व होते परंतु तिचे प्रतिनिधी समितीच्या बैठकांना कधीच उपस्थित राहिले नाहीत. ८ मार्चला भरलेल्या परिषदेच्या बैठकीला ते हजर होते पण ११ मार्चला भरलेल्या बैठकीचा त्यांनी त्याग केला आणि ते परत कधीही आले नाहीत. त्या सोक्षमोक्ष लावणाऱ्या दिवशी हिंदू, मुसलमान आणि शीख यांच्या प्रतिनिधींनी आपापल्या भूमिकेपासून न ढळण्याची आपली इच्छा स्पष्टपणे व्यक्त केली. या अडचणीतून परिषदेच्या प्रणेत्यांनी मोठ्या कौशल्याने मार्ग काढला आणि दोन समित्या नेमल्या. एकीचे कार्य विभक्त सिंधच्या प्रश्नाची चौकशी करण्याचे होते आणि दुसरीचे लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्याच्या शक्यतेचा विचार करण्याचे होते. या समित्यावर काम करण्याचे लीगच्या प्रतिनिधींनी नाकारले आणि त्यांनी आपला अहवालही कधी दिला नाही.

ही जातीय गुंतागुंत तशीच असताना परिषदेने आपली तिसरी बैठक १९ मे रोजी भरवली. बैठकीने 'जातीय प्रश्नाचा घटनेच्या संदर्भात विचार करण्यासाठी' पुन्हा एकदा एक आठ माणसांची समिती नेमली. बैठकीला लीग प्रतिनिधी हजर नव्हते. समितीवर मुसलमानांचे प्रतिनिधीत्व, सर अली इमाम आणि शुएब क्युरेशी या दोन कॉंग्रेस मताच्या मुसलमानांनी केले. सर अली प्रकृती बरी नसल्यामुळे बाद झाले आणि क्युरेशी हे एकुलते एक मुसलमान समितीवर राहिले. मजूर पुढारी ना. म. जोशी ह्यांनी कुठल्याच बैठकीला तोंड दाखवले नाही. उरलेल्या सहा सभासदापैकी चार, मुस्लिमेतर जमातींच्या हितसंबंधांचे प्रतिनिधीत्व करीत होते. ते

म्हणजे हिंदूमहासभा, शीख लीग आणि दलित जमाती. ही समिती, लीगला मान्य होईल आणि ती परत परिषदेत येईल असा एकादा मार्ग शोधून काढील ही आशा व्यर्थ होती. या समितीने बंगाल आणि पंजाबमधील लोकसंख्येचे जिल्हावार आकडे विचारात घेतले आणि ज्या घटनेमधून निधर्मी निवडणूक पद्धत आपोआप निर्माण होईल अशी घटना तयार करण्याचा प्रयत्न केला. समितीचे हे कार्य महत्वाचे होते. परंतु, ज्या हेतूने ती स्थापन केली गेली होती तो हेतू साध्य झाला नाही.

पंजाब आणि बंगालमध्ये काहीही झाले तरी मुसलमानांना राखीव जागा न देण्याबद्दल जितका हिंदूमहासभेचा हट्ट होता तितकाच हट्ट, त्या मिळाल्या पाहिजेत म्हणून मुस्लिम संघटना करीत होत्या. या दोन प्रवृत्तीत असलेला फरक टळकपणे दिसून येतो. मुसलमानांचे म्हणणे असे होते की, आपल्या लोकसंख्येच्या प्रमाणात आपल्याला प्रांतिक कायदेमंडळात वाजवी प्रतिनिधित्व मिळेल अशी व्यवस्था असावी. ते म्हणाले की, हिंदू आणि शीख प्रतिनिधित्वावर अतिक्रमण करण्याची आपली इच्छा नाही. त्यांनी असे सुचवले की, १९१९ च्या कायद्याच्या सदोष प्रतिनिधित्व पद्धतीने हिंदूंना मिळणाऱ्या अधिक जागा टिकवण्याची त्यांची धडपड असल्यामुळे त्यांचा आमच्या मागण्यांना विरोध आहे. हिंदूमहासभेचे समर्थन असे होते. विशुद्ध लोकशाही पद्धतीचा प्रयोग करण्याच्यादृष्टीने, कुठल्याच जमातीला राखीव जागा नसलेले संयुक्त मतदार संघ स्थापन करण्यासाठी पंजाब आणि बंगाल हे दोन प्रांत फार उत्कृष्ट आहेत. हिंदूमहासभेचे म्हणणे असे होते की पंजाबमध्ये मुस्लिमेतर ४५ टक्के आणि बंगालमध्ये याहून थोडे अधिक इतकेच आहेत. म्हणून हिंदू व मुसलमान या दोनही जमातींना एकमेकाबद्दल भीति वाटण्याचे काहीच कारण नाही मुसलमानांनी मतदारांच्या यादीच्या आधारे प्रतिवाद करून हा मुद्दा खोडून काढला. मुसलमान गरीब असल्यामुळे ज्या प्रमाणात हिंदूंची नावे मतदारांच्या यादीत होती त्या प्रमाणात मुसलमानांची नव्हती. त्यामुळे हिंदू मतदारांची संख्या मुसलमानापेक्षा अधिक होती. हिंदूमहासभेने याला असे उत्तर दिले की, ते तयार करीत असलेल्या नव्या घटनेत प्रौढ मतदानाच्या अधिकाराची तरतूद केली जाईल. याबद्दल नेहरू कमिटी, सर्व पक्ष परिषद आणि तिची बैठक हे सर्वच सहमत होते. यावर मुसलमानांचे म्हणणे असे होते की, प्रौढ मतदानाचा अधिकार ब्रिटिश खरोखरच मान्य करतील यावर आपण विश्वास नव्हता. आणि म्हणून पंजाब आणि बंगालचे हिंदू, प्रांतिक कायदेमंडळात आपले बहुमत कायम राहील अशा तऱ्हेची निवडणूक पद्धती आणण्याचे डावपेच खेळत आहेत हा मुसलमानांचा संशय तसाच कायम राहिला.

यानंतर पंजाब आणि बंगालमध्ये या दोन जमाती कशा विभागल्या गेल्या आहेत आणि राखीव जागा न ठेवता प्रौढ मतदान मान्य केल्यास त्यांचे प्रतिनिधित्वाचे प्रमाण त्यांच्या लोकसंख्येनुसार राहील किंवा काय हे समजून घेण्यासाठी परिषदेच्या तज्ज्ञांनी आपला बराचसा वेळ जिल्हावार लोकसंख्येचा अभ्यास करण्यात खर्च केला.

त्यांनी काढलेला निष्कर्ष होकारात्मक होता. त्यामुळे नेहरू कमिटीने प्रतिनिधित्वाची तरतूद पुढीलप्रमाणे केली :

(१) सर्व हिंदुस्तानात संयुक्त संमिश्र मतदार संघ असावेत. (२) वायव्य सरहद्द प्रांतातील मुस्लिमेतर आणि इतर मुसलमान अल्पसंख्य असलेल्या प्रांतातील मुसलमान, ह्यांच्या व्यतिरिक्त मध्यवर्ती कायदेमंडळात राखीव जागा नसाव्यात. मुस्लिम अल्पसंख्य प्रांतात मुसलमानांच्या अशा राखीव जागा, आणि वायव्य सरहद्द प्रांतातील मुस्लिमेतरांच्या राखीव जागा त्यांच्या लोकसंख्येच्या काटेकोर प्रमाणात रहातील. ज्या ठिकाणी अशा राखीव जागा मुसलमानांना किंवा मुस्लिमेतरांना असतील तेथे त्यांना आणखी इतर जागा लढवण्याचे स्वातंत्र्य राहील. (३) (अ) कुठल्याही जमातीला पंजाब व बंगाल प्रांतात राखीव जागा असणार नाहीत; (ब) पंजाब आणि बंगाल खेरीजकरून इतर प्रांतातील मुसलमान अल्पसंख्यकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा असतील आणि त्यापेक्षा अधिक जागा लढवण्याचा त्यांना हक्क राहील. (क) अशाच प्रकारच्या राखीव जागा वायव्य सरहद्द प्रांतातील मुस्लिमेतर जमातींना रहातील आणि त्यांनाही आणखी इतर जागा लढवण्याचा अधिकार राहील; (४) ही राखीव जागांची तरतूद ज्या ठिकाणी केली असेल तेथे ती दहा वर्षे अंमलात राहील; (५) सिंधच्या आर्थिक परिस्थितीबद्दल योग्य ती चौकशी झाल्यानंतर तो प्रांत मुंबईपासून तोडण्यात येईल व त्याचा निराळा प्रांत बनवण्यात येईल; (६) वायव्य सरहद्द प्रांत आणि इतर नव्याने तयार केलेले प्रांत यांच्या राज्यकारभाराची व्यवस्था इतर प्रांताप्रमाणेच राहील.

पंजाब आणि बंगालमध्ये राखीव जागा नाकारण्याचा परिषदेचा युक्तिवाद असा होता :

पंजाब प्रांतात उत्तरेला आणि वायव्येला मुसलमानी लोकसंख्या खच्चून भरलेला एक मुसलमानी पट्टा आपल्याला दिसतो. या राखीव पट्ट्यावर इतर कुठलीच जमात अतिक्रमण करू शकणार नाही. अशाच प्रकारचा हिंदू आणि शिखांनी भरलेला एक लहानसा हिंदू पट्टा आपल्याला दक्षिणेला दिसतो. या दोन पट्ट्यामधील भागात मुसलमान प्रामुख्याने दिसत असले तरी ते खच्चून भरलेले नाहीत. तीन भागांच्या या विश्लेषणातून असे अनुमान निघते की, मुसलमानांच्या खच्चून भरलेल्या पट्ट्यातून मुसलमानांना ४७ टक्के जागा, आणि हिंदू व शीख खच्चून भरलेल्या पट्ट्यातून हिंदू आणि शिखांना ३० टक्के जागा मिळणार आहेत. उरलेल्या २३ टक्के जागा जेथे प्रामुख्याने मुसलमान जमात आहे त्या पट्ट्यात किंवा जेथे मुसलमान ही एकत्र जमात प्रचंड आहे अशा जिल्ह्याकडे जातात. सर्व प्रकारच्या अनपेक्षित गोष्टी जमेस धरून-सुद्धा मुसलमानांना या भागातून प्रांतिक कायदेमंडळात निर्विवाद बहुमत मिळवा येणार नाही अशी कल्पनासुद्धा आम्ही करू शकत नाही.

बंगालमध्ये, प्रामुख्याने मुसलमान वस्ती असलेल्या भागाचा विचारसुद्धा केला नाही

तरी, केवळ खच्चून भरलेल्या मुसलमानी वस्तीच्या पट्ट्यातूनच त्यांना कायदेमंडळाच्या ६० टक्के जागा नक्की मिळतील. हिंदूंची संख्या जरी उपेक्षणीय नसली तरी ते अल्पसंख्य असल्यामुळे राखीव जागा नसलेल्या खुल्या सर्वसाधारण निवडणुकीत त्यांच्या प्रतिनिधींच्या संख्येला मर्यादा पडेल.

मुस्लिम बहुसंख्य प्रांतातील प्रमुख जमातींच्या निवडक प्रतिनिधीकडून परिषदेने आपल्या शिफारसी तपासून घेतल्या होत्या, आणि सर्वांच्या समतीने प्रत्येक प्रांताबद्दल निराळे करार तयार केले होते. परंतु मुसलमान जमातीचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवडलेले मुसलमान हे जमातीचे खरे प्रतिनिधी नव्हते असे म्हणून मुस्लिम लीगने त्यांची टिंगल केली. मुस्लिम लीगलाही आमंत्रण गेले होते, परंतु त्यांनी बैठकीवर घातलेल्या बहिष्काराला ते चिकटून राहिले. कराराबद्दल परिषदेला समाधान वाटण्यालाही कारण होते. कारण हे करार पंजाब व बंगाल प्रांताच्या मुस्लिम लीगवाल्यांनी आणि पंजाब प्रांताच्या खिलाफत कमिटीने सहीनिशी मंजूर केले होते परंतु अखिल भारतीय पातळीवर लीगमध्ये दुफळी होती. तथाकथित शफी लीग कुठल्याच शर्तीवर परिषदेशी सहकार्य करण्यास तयार नव्हती; आणि जीना पुढारी असलेली लीग स्वतःच्या काही शर्तीवर, परिषदेला आपले सहकार्य देण्यास तयार होती. शेवटच्या मोंगल अंमलाखालील नबाबाप्रमाणे प्रांतिक लीगवाले आपापल्या मर्जीप्रमाणे वागत होते. या दुभंगलेल्या कुटुंबाच्या उच्चासनी बसून जीना हिंदुस्तानच्या सर्व मुसलमानी जमातीचे प्रतिनिधित्व करण्याचे सोंग करीत होते, आणि सर्व जमातीच्या-वतीने शर्ती घालण्याचा हक्क स्वतःला असल्याची आढ्यता मिरवीत होते. त्यांच्या स्वतःच्या महत्वाकांक्षेच्या पूर्तीपासून ते फार दूर होते. परंतु ते निश्चयाने उभे होते. परिषदेशी वाटाघाटी करण्यास मुसलमानी संघटनापैकी आपण आणि आपले अनुयायीच केवळ तयार आहोत; आणि काही अटींवर संयुक्त मतदार संघाचा विचार करण्यासही आपणच फक्त तयार आहोत; इतर मुसलमान विभक्त मतदार संघाचा आग्रह सोडण्यास तयार नाहीत, असा रास्त दावा सांगू शकत होते.'

म्हणून, मुस्लिम राजकारणी प्रमुखांनी ज्याअर्थी, परिषदेच्या शिफारसींना संमती दिली नाही, त्याअर्थी, आपल्या शिफारसी लोकशाही तत्वाच्यादृष्टीने निकोप आहेत आणि त्या मुसलमानांना जास्त फायद्याच्या होणार आहेत याबद्दलच्या त्यांच्या विश्वासाला फारशी किंमत उरली नाही. तीस मुसलमान पुढाऱ्यांचा मसुदा मान्य केलेल्या कॉंग्रेसच्या ठरावाकडे नेहरू कमिटीने दुर्लक्ष केले नव्हते. त्या ठरावाला सोडून देण्याचे स्पष्टीकरण कमिटीने असे केले : 'मुसलमान बहुसंख्य असलेल्या पंजाब आणि बंगालमध्ये आपल्याला राखीव जागा असाव्यात असा आग्रह मुसलमान धरीत होते, आणि त्याला तितकाच जोराचा विरोध हिंदू महासभा आणि शीख करीत होते.' आणि 'हिंदूमहासभा व शीख लीग यांच्या दृष्टिकोनाला मद्रास कॉंग्रेस वा मुस्लिम लीग यांचा अगदी कडवा विरोध आहे असे आम्हाला आढळून आले, तेव्हा

कुठलाही दृष्टिकोन अगदी संपूर्णपणे मान्य करण्याची आमची असमर्थता आम्हाला अगदी विनयाने स्पष्ट केलीच पाहिजे.'

पंजाब व बंगालमध्ये राखीव जागा नसलेले संयुक्त मतदार संघ आणले तरीही मुसलमानांनाच अधिक प्रतिनिधित्व मिळेल अशी जर हिंदूंना आणि शिखांना खात्री वाटत होती तर लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा देणाऱ्या विभक्त मतदार संघाला त्यांचा कडवा विरोध का होता याचे मुसलमानांना आश्चर्य वाटत होते. मुस्लिम टीकाकारांनी विचारले की, पंजाब व बंगालमध्ये ज्यामुळे मुसलमानांना थोडया कमीच जागा मिळतील त्या राखीव जागा देण्यास हिंदू व शीख पुढारी राजी का नाहीत? या मागे त्यांचा काही गुप्त हेतू आहे काय? ते म्हणाले की, परिषदेने आपल्या प्रतिनिधित्व विषयक शिफारशींवर ज्या प्रौढ मतदानाचा पुरस्कार केला आहे, ते व्यावहारिक राजकारणापलिकडचे आहे. कारण १९१९ च्या सुधारणांनी फक्त चार टक्के लोकांना मतदानाचा अधिकार दिला आहे; यापासून एकदम प्रौढ मतदानाकडे उडी मारणे म्हणजे एक दिवास्वप्न आहे. त्यांनी असे दाखवून दिले की, मतदारांकरिता ठेवलेल्या संपत्तिक अटीने पंजाब व बंगालमधील बहुसंख्य मुसलमानांना मतदारांच्या यादीत स्थान नव्हते आणि त्यामुळे ते अल्पसंख्य बनले होते बंगाल व पंजाब कायदेमंडळात हिंदंना अधिक प्रतिनिधित्व देणाऱ्या १९१९ च्या चुकीच्या कायद्याविरुद्ध सावधगिरी बाळगली पाहिजे याची आठवण त्यांनी मुसलमाना जमातीला दिली. ते म्हणाले, मोठ्या चतूर करामतीने हिंदू आणि शीख कायदे-मंडळात आपले बहुमत कायम ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. नेहरू कमिटी आणि सर्व पक्ष परिषद ही मोठ्या श्रृंगापत्तीत सापडली होती. त्यांनी, तीस मुस्लिम पुढाऱ्यांचा मसुदा ही अपरिवर्तनीय अशी प्रस्थापित गोष्ट मानली असती तर त्यांना हिंदूमहासभा व शीख लीग यांच्या बहिष्काराला तोंड द्यावे लागले असते. आणि जर ह्या बहिष्कारामुळे फक्त जीनांच्या गटाचेच सहकार्य मिळणार असेल तर हा बहिष्कार सहन करण्यापासून फायदा काय होता. खरं म्हणजे, हा मसुदा मान्य करणारे काँग्रेसचे पुढारी जर या मसुद्यालाच चिकटून राहिले असते तर परिषद मोडली असती. कारण तिचे बहुसंख्य प्रतिनिधीच त्याच्याविरुद्ध होते. ती घटना घडून गेल्यानंतर आज इतका काळ लोटल्यानंतर शहाणपणाचा आव आणणे सोपे असेल, पण असे म्हणावेसे वाटते की, मुसलमानांचे समाधान करू न शकणारा युक्तिवाद करणारा आणि हिंदू महासभेच्या विचारसरणीची छाया पडलेला पर्याय स्वीकारण्यापेक्षा परिषद मोडली असती तरी बरे झाले असते.

प्रकरण तेविसावे

# नेहरु रिपोर्टवरील मुस्लिम प्रतिक्रिया–१

नेहरू रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यानंतर लवकरच, कोणत्याही परिस्थितीत विभक्त मतदार संघावर विश्वास असलेल्या किंवा त्यावर विश्वास ठेवण्यास प्रवृत्त केल्या गेलेल्या मुस्लिम पुढाऱ्यांनी आपल्या १९०९ पूर्वीच्या विचारसरणी भोवती अनुयायी जमा करण्यास सुरुवात केली. देशाच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात मुसलमान म्हणून अगदी स्पष्ट असे आपले निराळे आस्तित्व मान्य करावे, अशी मागणी करणारी ही विचारसरणी होती. नेहरू रिपोर्टाचा विचार करण्यासाठी तारीख २३ डिसेंबर १९२८ ला सर्वपक्ष परिषदेचे अधिवेशन भरले होते. त्या अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी महमद अली आणि इतर काही जण, जे सर्व हिंदू होते, त्यांच्यात झालेल्या दुर्दैवी सवाल जबाबानी महमद अलीसुद्धा त्या विचारसरणीच्या आड्ड्याकडे फेकले गेले आणि त्यांच्या इस्लामी उत्साहाला पुन्हा चेतना मिळाली. त्यांनी सभ. त्याग केला आणि ते कधीच परत आले नाहीत; ज्या काँग्रेसच्यावतीने ते अधि-वेशनाला हजर होते त्या काँग्रेसमध्येही ते परत गेले नाहीत. नेहरू कमिटीने हिंदुस्तानसाठी केलेल्या वसाहतीच्या स्वराज्याच्या शिफारसी मंजूर करून घेणाऱ्या जे. एम. सेनगुप्ता यांच्या ठरावाला त्यांनी विरोध केला होता. आपल्या अतिशय अडथळा आणल्या गेलेल्या भाषणात त्यांनी अधिवेशनाला अशी आठवण करून दिली की, आदल्या वर्षीच काँग्रेसने मंजूर केलेल्या संपूर्ण स्वराज्याच्या मागणीविरुद्ध हा ठराव होता. काँग्रेसच्या ध्येयापासून काँग्रेस अशाप्रकारे हटल्याचे वर्णन त्यांनी हे लढवय्यांचे धोरण नसून भेकडांचे आहे असे केले. यामुळे महमद अलींवर निषेधांचा आणि 'मागे घ्या मागे घ्या' च्या आरोळ्यांचा वर्षाव झाला. आणि आपण सेनगुप्तांना भेकड म्हटले नसून, त्यांनी भेकड बनू नये व आपल्या स्वातंत्र्याच्या ध्येयाला चिकटून रहावे असे म्हटले असल्याचे केलेले स्पष्टीकरण व्यर्थ गेले.

महमद अली पुढे म्हणाले : 'ब्रिटिश किंवा हिंदू किंवा मुसलमान, तुर्कस्तान किंवा अफगाणिस्तान यांच्या आधिपत्याखालचे वसाहतीचे स्वराज्य मी मागत नाही. पण माझे आणि माझ्या देशाचे स्वातंत्र्य मला हवे आहे.' पुन्हा मद्रासचे प्रतिनिधी टी. प्रकाशम यांनी त्यांना अडवून विचारले, 'आपण व्हाइसरॉय यांना लेखी विनंती केली नाही काय?' महमद अलींनी प्रत्युत्तर दिले, 'नाही मी तुमच्याप्रमाणे एकनिष्ठतेची शपथही घेतली नाही.'

ते आणखी म्हणाले "हिंदुस्तान बंधमुक्त आणि स्वतंत्र होईल" या एका कलमाखेरीज मी कुठच्याही घटनेची मागणी करीत नाही. मी माझ्यासाठी कुठला हक्क मागत नाही, मुसलमानांकरिता कुठला मूलभूत हक्क मागत नाही, हिंदूकरिता मागत नाही की, बहुसंख्य अल्पसंख्यकांना कुठले संरक्षण मागत नाही.'

सभा शांत होते न होते तोच महमद अलींना पुन्हा संतापाच्या सरबत्तीला तोंड द्यावे लागले. उदार मतवादी पुढारी सी. आर. चिंतामणी सेनगुप्तांच्या ठरावावरील टीकेला उत्तर देत होते. तेव्हा महमद अली आपली हरकत उपस्थित करण्यास उभे राहिले परंतु त्यांचे पाच शब्दांचे वाक्य 'ऑर्डर ऑर्डर खाली बसा !' या आरडा-ओरडयात विरून गेले. महमद अली म्हणाले, 'जर हा बाजार बुणगेपणा असाच चालू राहिला तर मी निघून जाईन.' 'आपणही बाजार बुणग्यापैकीच आहा' असे अनेक आवाज उठले.

महमद अली येथून सरळ बिहार आणि ओरिसाच्या मुस्लिम सर्वपक्ष परिषदेच्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान स्वीकारण्यास गेले. नेहरू रिपोर्टवरील मुसलमानांच्या प्रतिक्रियांना वाट करून देण्यासाठी बोलावलेल्या इतर अनेक प्रांतिक सभापैकी ही एक सभा होती. महमद अली आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, थोडक्यात सांगायचे तर नेहरू रिपोर्टचा अर्थ असा आहे की, निर्मिती ईश्वराची, देश व्हाइसरॉय किंवा पार्लमेंटचा आणि सत्ता हिंदूमहासभेची आहे. स्वतःला राष्ट्रवादी म्हणवणारे अनेक हिंदू पुढारी मनातून जातीयवादी आहेत असे त्यांना वाटत होते. नंतर त्यांनी सर्वपक्ष खिलाफत परिषदेच्या अध्यक्षपदावरून एकीकरण करणारी शक्ती म्हणून इस्लाम धर्माकडे बोट दाखवले, आणि हिंदुस्तानच्या सर्व लोकांना तो स्वीकारण्याची विनंती केली. ते म्हणाले : 'इस्लाम म्हणजे शांती आणि राष्ट्रवाद म्हणजे लढाई. परमेश्वराने सर्व मानवजात एका कुटुंबात आणि एका जमातीत गुंफण्याकरिता इस्लाम धर्म बनवला आहे. हा माझा जातीयवाद आहे. सर्व मानवजात निरनिराळ्या राष्ट्रात विभागली आहे आणि ती राष्ट्रे एकमेकांचे शत्रुत्व करीत आहेत. हा तुमचा राष्ट्रवाद आहे आणि तो लढाईचा मार्ग दाखवतो. हिंदू, ख्रिश्चन, ज्यू आणि पाषाण-पूजक या सर्वांनी माझ्याबरोबर सामायिक बंधुत्वात आणि सहजीवनात सामील व्हावे, त्यांनी जुलूम, सक्ती, बळजबरी आणि पळवाटा यांचा आणि नेहरू रिपोर्टच्या बाजूने आज चालू असलेल्या खोटया प्रचाराचा त्याग करून एकमेकांना स्नेहाची मिठी मारावी. मने वळवून आणि सेवा करून इस्लामच्या पंथात सर्वांना आणणे हा माझा जातीवाद आहे. कुराण म्हणते, परमेश्वराच्या राज्याशिवाय दुसरे राज्यच नाही म्हणून हिंदुस्तानचे मुसलमान जेव्हा पूर्ण स्वातंत्र्य हे आपले ध्येय मानतात तेव्हा ते १३१० वर्षांपूर्वी त्यांना कुराणाने जे करावयास सांगितले होते तेच करतात.'

त्यांचे बंधू शौकत अली हे संयुक्त प्रांत मुस्लिम सर्वपक्ष परिषदेचे अध्यक्ष होते त्यांनी आपल्या भाषणात हिंदूंना शांतता पाहिजे की, यादवी पाहिजे याचे त्यांनी

अगदी स्पष्ट शब्दात उत्तर द्यावे असे सांगितले. त्यांना लढाई हवी असेल तर मुसलमान हे आव्हान स्वीकारण्यास कुठच्याही क्षणी तयार आहेत. नेहरू रिपोर्टाचा हेतू हिंदूमहासभेला खूष करण्याचा आहे, या मुद्यावर त्यांनी त्याचा निषेध केला. वसाहतींच्या स्वराज्याचा ठराव हिंदूंची गुलामी मनोवृत्ती व्यक्त करतो असा त्याचा यांनी अधिक्षेप केला. 'हिंदूंना गुलामगिरीची संवय आहे आणि ते गुलामच रहातील. मुसलमान हे स्वातंत्र्य प्रिय लोक आहेत आणि ते हिंदू किंवा ब्रिटिश यांच्या सत्तेपुढे नमणार नाहीत.'

मुस्लिम सर्व पक्ष परिषदेच्या प्रांतिक अधिवेशनांना सहकार्य देणाऱ्या अलीबंधूचे जबरदस्त व्यक्तिमत्व आणि त्यांचा इस्लामिक दृष्टिकोन यांचा प्रभाव अधिवेशनावर पडला आणि अधिवेशनाने नेहरू रिपोर्ट प्रतिगामी आणि मुस्लिमविरोधी आहे असे म्हणून तो झिडकारला. रिपोर्टाच्या केल्या गेलेल्या या वर्णनाला झालेल्या विरोधाची हुर्यो केली गेली. उदाहरणार्थ, संयुक्त प्रांताच्या अधिवेशनात मुर्तझा हुसेन अब्दी यांना अशा अर्थाचे विधान करावयाचे होते की, हे अधिवेशन ज्या लोकांनी भरवले आहे त्यांना स्वतःचे मत तरी नव्हते किंवा असले तर ते राष्ट्रविरोधी आणि हिंदू विरोधी होते; मुसलमानी मतांच्या सर्व छटांचे आपण प्रतिनिधी आहोत असा दावा ते सांगू शकत नव्हते. अशा एकांगी श्रोतृवृंदाला प्रांताच्या सर्व मुसलमानांच्यावतीने बोलण्याचा नैतिक अधिकार नव्हता. शौकत अलींचे अध्यक्षीय भाषण निर्भत्सनायुक्त आणि त्यांच्यासारखे बेभान होण्यास तयार नसलेल्यांची निंदा करणारे आहे असे म्हणून त्यांनी त्याला विरोध केला. नेहरू रिपोर्टाला पाठिंबा देणाऱ्या हिंदू आणि मुसलमानांच्या दुर्दैवाबद्दल शौकत अलींनी जी भाषा वापरली होती ती त्यांना फार मनस्तापाची वाटली. संयुक्त प्रांतात, संयुक्त मतदार संघ आणि नेहरू रिपोर्ट यांच्या बाजूने मुसलमानी मत अधिक प्रभावी असल्याची जाणीव अधिवेशनाला व्हावी अशी त्यांची इच्छा होती. ते म्हणाले : "इस्लाम धोक्यात आहे" असा आवाज उठवून लोकांना फसवणे कठीण आहे नव्हे तर अशक्यच आहे, हे प्रतिगाम्यांनी विसरू नये.

अब्दींच्या या निवेदनाचा धिक्कार सभेच्या सर्व कानाकोपऱ्यातून करण्यात आला. अध्यक्षानीही त्यांना भाषण बंद करण्यास सांगितले. एवढेच नव्हे तर त्यांना सभागृहातून बाहेर घालवण्यात आले.

बंगाल मुस्लिम सर्वपक्ष परिषदेचे अध्यक्षस्थान याहून सूज्ञ अशा सर अब्दुर रहीम या मुसलमान राजकारणी पुरुषाने भूषविले होते. ते म्हणाले : 'नेहरू रिपोर्ट हा एक महत्वाचा दस्तऐवज आहे. आणि त्याचा आपण गंभीरपणे विचार केला पाहिजे. त्याचा अतिशय काळजीपूर्वक अभ्यास करून मी अशा निर्णयाला आलो आहे की, या आणिबाणीच्या परिस्थितीत तो संपूर्णपणे नाकारणे ही राजकीयदृष्ट्या फार मोठी घोडचूक होईल.' परंतु बंगालमध्येसुद्धा, फक्त रिपोर्ट विरोधीच लोक प्रतिनिधी म्हणून नेमले जातील अशी दक्षता घेण्यात आली होती. त्यामुळे अधिवेशनाने रिपोर्ट

फेटाळला यात आश्चर्य नव्हते. या विधानाला इतर मुस्लिम सभासदांच्या खालील वृत्तांतावरून बळकटी येते.

पंजाब, बिहार आणि वायव्य सरहद्द प्रांतातील खिलाफत कमिटयांच्या सभासदा प्रमाणेच बंगाल खिलाफत कमिटीचे बहुसंख्य सभासद अलीबंधू आणि त्यांचे सहकारी यांनी घेतलेल्या भूमिकेपासून दूर राहिले आणि त्यांनी नेहरू रिपोर्टातील मुसलमानांना मान्य होणार नाहीत अशा ज्या तरतुदी होत्या त्या सुधारून घेण्यासाठी सामोपचाराचा दृष्टिकोन ठेवला. या कमिटीच्या बऱ्याचशा सभासदांना नेहरू रिपोर्ट संपूर्णपणे मान्य होता. परंतु खऱ्या खुऱ्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आणि त्यावर आधारलेली विरोधी भूमिका तयार करण्यासाठी त्यांना पूर्वग्रह दूषित नसलेली अशी स्वतंत्र मनमोकळी चर्चा हवी होती. त्याचा परिणाम म्हणजे अखिल भारतीय खिलाफत परिषदेचे ख्रिसमसच्यावेळी भरलेले कलकत्ता अधिवेशन. अलीबंधू हे परिषदेच्या सभासदात फार प्रमुख होते. त्यांचा प्रभाव दूर करण्याचा विचारसुद्धा शक्य नव्हता; उलट त्यांच्याविरुद्ध असलेले मत धुवून काढण्याचा आक्रमक प्रयत्न करण्यात आले. हे प्रयत्न इतक्या थराला गेले होते की, बंगाल आणि पंजाबच्या प्रतिनिधींना 'तांत्रिक नियमभंगाच्या' नावाखाली, पण खरं म्हणजे त्यांचा नेहरू रिपोर्टबद्दल सामोपचाराचा दृष्टिकोन असल्यामुळे, त्यांना अधिवेशनातून वगळण्यात आले. बंगाल खिलाफत कमिटी तर अक्षरशः गुंडगिरी करून दाबून टाकण्यात आली. तेथे घडलेल्या नाटयमय प्रसंगाचे स्थूलमानाने अवलोकन केल्यास नेहरू रिपोर्टाला पाठिंबा देणाऱ्याना कसे वगळले जात होते हे अधिक चांगले समजून येईल.

अखिल भारतीय खिलाफत परिषदेला प्रतिनिधी निवडण्यासाठी १९ डिसेंबर १९२८ ला बंगाल खिलाफत कमिटीची सभा बोलावली होती. जेव्हा प्रतिनिधींच्या तात्पुरत्या यादीची चर्चा चालू होती तेव्हा महमद अली आपल्या अनुयायासह तेथे गेले आणि त्यांनी आपल्याला सभेत घ्यावे अशी मागणी केली. तुम्ही स्वतः पाहुणे म्हणून येऊ शकता परंतु इतरांना परवानगी देता येणार नाही असे त्यांना सांगण्यात आले. शेवटी संतप्त वादावादीने महमद अली व इतर अनेकांनी परवानगी मिळवली. प्रवेश मिळवल्यानंतर ही सभा घटनात्मक नाही या मुद्यावर भर देऊन ते कामकाजात अडथळा आणू लागले. दाराबाहेर उरलेल्या त्यांच्या अनुयायांनी जबरदस्तीने आत प्रवेश केल्यामुळे या प्रसंगाला अधिकच उठाव आला. यानंतर सभेत पूर्ण गोंधळ माजला. आणि आपल्या आक्रमणाचा जणूकाय विजय जाहीर करण्यासाठी महमद अलींनी अशी घोषणा केली की, बंगालमध्ये प्रांतिक खिलाफत कमिटीच नव्हती आणि ती आता तेथल्या तेथेच स्थापन करण्यात येईल. कमिटी ताबडतोब स्थापन करण्या-साठी दरवाज्यांची मोडतोड करून घुसलेल्या जमावाला प्रत्येकी चार आणे वर्गणी देण्यास सांगण्यात आले. रद्द केलेल्या कमिटीच्या एका पुढाऱ्याने फक्त जिल्हा कमिटयाच प्रांतिक कमिटया निवडू शकतात या मुद्यावर या अजब कार्यपद्धतीला

केलेला विरोध, फक्त वेडेच या कार्यपद्धतीवर आक्षेप घेऊ शकतात असे सांगणाऱ्या महमद अलींच्या आणि इतर आरडाओरडयात बुडून गेला. ह्या सर्व प्रकार चालू असताना शौकत अली आपल्या भावाशेजारीच होते. दुसऱ्या दिवशी अलीबंधूंनी नवीन खिलाफत कमिटीची सभा बोलावली आणि स्वतःच्या प्रतिनिधींची यादी संमत करून घेतली.

अखिल भारतीय परिषदेच्या खुल्या अधिवेशनाच्या आदल्या संध्याकाळी भरलेल्या मध्यवर्ती कमिटीच्या बैठकीच्यावेळीही असेच नाटक रंगवण्यात आले. बंगाल कमिटी मिटींगच्यावेळी दंगा करणारे शफी दौदी हे मध्यवर्ती कमिटीचे अध्यक्ष होते. आणि शौकत अली चिटणीस होते. त्यांना असे आढळून आले की, बैठकीला हजर असलेल्या सत्तर सभासदांपैकी जवळ जवळ पंचेचाळीस सभासद त्यांच्याविरुद्ध होते. तेव्हा त्यांची त्रेधा उडाली. परंतु बहुसंख्य सभासदांचे मत विरुद्ध असूनसुद्धा महमद अलींची प्रतिनिधी यादी शफी दौदी यांनी आपल्या अध्यक्षीय अधिकारात कायम केली याच्या निषेधार्थ त्या पंचेचाळीस सभासदांनी सभात्याग केला, आणि एक निवेदन प्रसिद्ध केले. त्यात ते म्हणतात : 'नेहरू रिपोर्टवर योग्य असा समझोता घडून यावा म्हणून' आपण बंगाल खिलाफत कमिटीच्या दोन गटात तडजोड करण्याचा प्रयत्न केला. 'परंतु दुसऱ्या गटाच्या प्रतिनिधींनी अवलंबिलेल्या अडथळ्याच्या आणि चालढकलीच्या मार्गामुळे आमचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले.' बंगाल, पंजाब, बिहार आणि वायव्य सरहद्द प्रांताच्या कमिट्यांनी नेमलेल्या प्रतिनिधींना मनास येईल त्याप्रमाणे अपात्र ठरवून शफी दौदीने त्यांचा प्रातिनिधिक आवाज असनदशीर मार्गाने दडपून टाकल्याबद्दल त्यांनी त्याला दोष दिला. त्यांनी स्वतःची निराळी सभा भरवली. आणि सर्व पक्षीय परिषदेच्या अधिवेशनात भाग घेण्याचा आणि जातीय प्रतिनिधित्वाच्या तरतुदीत काही दुरुस्त्या करून नेहरू रिपोर्ट मान्य करण्याचा ठराव संमत केला. यानंतर महमद अली यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अधिवेशनाने एकांगी वातावरणात नेहरू रिपोर्ट डावलला आणि हिंदुस्तानच्या घटनात्मक गुंतागुंतीतून सुटण्याचा मार्ग म्हणजे राज्यांना संपूर्ण स्वायत्त अधिकार असलेल्या स्वतंत्र आणि संयुक्त राज्यांचे संघराज्य, असा ठराव संमत केला. नेहरू रिपोर्ट झिडकारण्याचा हा मार्ग अधिक मुत्सद्देगिरीचा समजला गेला.

मुसलमानांच्या अनेक अधिवेशनांची परिणती दिल्लीच्या सर्व पक्ष मुस्लिम परिषदेत झाली. तिला मध्यवर्ती आणि प्रांतिक कायदेमंडळाचे शंभराहुन अधिक मुस्लिम सभासद, आणि लाहोर गटाची मुस्लिम लीग, जमियत्-उल्-उलेमा आणि इतर मुस्लिम संघटनांचे प्रतिनिधी हजर होते. १९०६ साली व्हाइसरॉय मिंटो यांना भेटलेल्या पहिल्या शिष्टमंडळाचे नेते आगाखान ह्यांना अध्यक्ष म्हणून निमंत्रण केले होते. मुसलमानांना निराळे प्रतिनिधित्व असावे या मागणीचे 'पहिले बी पेरणारे माळी म्हणून त्यांचे स्वागत झाले. प्रांतिक अधिवेशनात संमत केले गेलेले ठराव, या

अधिवेशनाने अधिक विस्ताराने आपल्या ठरावात मांडले. आणि पुढे असे म्हटले की, 'विभक्त मतदार संघातून निरनिराळ्या कायदेमंडळात आपले प्रतिनिधी निवडण्याचा हक्क मुसलमानांना उपभोगावयास मिळत आहे तो तसाच चालू राहिला पाहिजे, आणि त्यांच्या संमतीशिवाय तो हिरावून घेता येणार नाही; हिंदुस्तानातील प्रचलित परिस्थितीत आणि जोपर्यंत ही परिस्थिती अशीच चालू राहील तोपर्यंत, निरनिराळ्या कायदेमंडळात आणि मुसलमानांच्या इतर सनदी संस्थात, विभक्त मतदार संघामधून निवडून आलेले त्यांचे प्रतिनिधित्व' तसेच चालू राहिले पाहिजे. ठरावात पुढे असे म्हटले आहे की, 'घटनेमध्ये आपल्या हितसंबंधांना पुरेसे संरक्षण आहे याबद्दल जोपर्यंत मुसलमानांचे समाधान होत नाही तोपर्यंत ते संयुक्त मतदार संघाला सशर्त किंवा बिनशर्त, मान्यता देणार नाहीत.' १९२७ मध्ये तीस मुसलमान पुढाऱ्यांनी मुसलमानाकरिता ज्या मागण्यांचा मसुदा सादर केला होता, आणि नंतर ज्या मागण्या मुस्लिम लीगने सर्व पक्ष परिषद आणि सर्व पक्षीय अधिवेशनापुढे परत परत मांडल्या त्याच मागण्या या अधिवेशनाने पुढे ठेवल्या. त्या मागण्या अशा : (१) मुसलमान बहुसंख्य असलेल्या प्रांतातील मुसलमानांचे बहुसंख्यत्व प्रांतिक कायदेमंडळात प्रतिबिंबित झाले पाहिजे. आणि त्यांचे अल्पमत असलेल्या प्रांतात सध्या आस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार ते उपभोगीत असलेले हक्क तसेच चालू राहिले पाहिजेत; (२) मध्यवर्ती विधिमंडळात मुसलमानांना ३३$\frac{1}{3}$ टक्के प्रतिनिधित्व असले पाहिजे; (३) सिंध प्रांत विभक्त झाला पाहिजे; (४) सर्व प्रकारच्या नोकऱ्यामध्ये मुसलमानांना पुरेसा हिस्सा मिळेल अशी तरतूद घटनेमध्ये असली पाहिजे. या ठरावात संपूर्ण स्वायत्तता आणि अवशिष्ट अधिकार असलेल्या घटक राज्यांच्या संघराज्य पद्धतीवर विशिष्ट भर दिला होता.

वर वर पहाता अधिवेशनाने संयुक्त मतदार संघ नाकारले नव्हते. परंतु संयुक्त मतदार संघाला अनुकूल असे मतदान होण्यासाठी एकंदर परिस्थितीची जी चर्चा व्हावयास हवी होती ती तिने कटाक्षाने टाळली.

प्रकरण चोविसावे

# नेहरु रिपोर्टावरील मुस्लिम प्रतिक्रिया–२

अखिल भारतीय मुस्लिम लीगचे अधिवेशन नाताळमध्ये कलकत्ता येथे चालू होते. त्यांनी सर्व पक्ष मुस्लिम परिषदेचे आमंत्रण नाकारले आणि ते नाकारताना, 'मुस्लिम जमातीच्या इतिहासात प्रत्येक आणिबाणीच्यावेळी जर प्रतिस्पर्धी आणि तात्पुरत्या स्वरुपाच्या संस्था स्थापन केल्या गेल्या तर ते मुसलमानी हिताला मारक होईल असे ठाम मत' प्रदर्शित केले. हा ठराव मांडणारे एम्. सी. छगला यांनी लीग हीच केवळ सर्व मुसलमानांची प्रातिनिधिक संस्था आहे असे प्रतिपादन केले. आणि असे म्हटले की, परिषदेचा उपयोग करणे म्हणजे वीस वर्षाहून अधिक काळपर्यंत मुसलमानी हिताकडे पहाणाऱ्या लीगचा अपमान करणे होय. तरीसुद्धा, लीगचे काही प्रतिनिधी मुस्लिम परिषदेत भाग घ्यावा अशा मताचे होते. परंतु त्यांचा ठराव नापास झाला दुसऱ्या एका ठरावाने लीगने, 'सर्व पक्ष परिषदेच्या कामकाजात भाग घेण्यासाठी एक २३ जणांचे शिष्टमंडळ नेमले. त्यांना नेमक्या अशा काहीच सूचना नव्हत्या परंतु लीगच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत आणि खुल्या अधिवेशनात मांडल्या गेलेल्या दृष्टिकोनांचा विचार करून योग्य त्या गोष्टींना महत्व देण्याचा आदेश, आणि 'नेहरू रिपोर्टातून निर्माण झालेल्या हिंदू, मुसलमानांच्या अनेक प्रश्नाबाबत तडजोड घडवून आणण्याचा' अधिकार त्यांना देण्यात आला. २६ डिसेंबरला जेव्हा शिष्टमंडळ नेमले गेले त्यावेळी अधिवेशन सुरू होऊन तीन दिवस झाले होते. २८ किंवा २९ तारखेपर्यंत शिष्टमंडळाने आपल्या कार्य निष्पत्तीचा अहवाल सादर करावा असे त्याला सांगण्यात आले होते. महम्मदाबादचे महाराजा, एम्. ए. जीना, डॉ. एस्. किचलू, एम. सी. छगला, मलीक बरकत अली, अब्दुल हमीद, मुजीबर रहमान, हिसामुद्दिन, अकरम खान, जाफर अलीखान, याकुब हसन, अबदुर रहमान, अब्दुल्ला ब्रेलवी, टी. ए. के. शेरवानी, खलिक-उल्-झमान, महमद झुबारी, अब्दुल करीम, नबाव लियाकत खान, डॉ. महमद, डॉ. अलम, खानबहाद्दर अझिझल हक्, नरूल एन् आणि महमद अस्लाम हे शिष्टमंडळाचे प्रतिनिधी होते.

लीग कौन्सिलचे काही विरोधी सभासद बंड करून अखिल भारतीय सर्व पक्ष मुस्लिम परिषदेकडे गेले होते, आणि आगाखानांच्या नेतृत्वाखाली प्रेरणा मिळवीत होते. अशा आणिबाणीच्या प्रसंगी हे २३ प्रतिनिधी सर्व पक्ष परिषदेत येऊन उभे राहिले. त्यावेळी, या परिषदेच्याविरुद्ध असलेल्या काही खिलाफत परिषदेच्या लोकांनी

खिलाफत परिषदेचा ताबा घेतला होता आणि सर्व पक्ष परिषदवादी लोकांना हुसकून लावले होते; मध्यवर्ती कायदेमंडळात मुसलमानांना त्यांच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळण्याऐवजी, एक तृतियांश मिळावे याबद्दल बहुतेक सर्व मुसलमान एकमताचे होते; अखिल भारतीय जमियत-उल-उलेमांनी आपण नेहरू रिपोर्टाच्या विरुद्ध असल्याचे जाहीर केले होते; २८ डिसेंबर १९२८ ला मुरादाबाद येथे भरलेल्या आपल्या कार्यकारिणीच्या मुरादाबाद येथील बैठकीत त्यांनी नेहरू कमिटीचे वर्णन 'मुसलमानांचे पुरेसे प्रतिनिधित्व नसलेली' नियमबाह्य स्थापन झालेली संस्था असे करून आपला क्रोध व्यक्त केला होता आणि ते अखिल भारतीय मुस्लिम परिषदेच्या निर्णयाची वाट पहात होते. ही परिस्थिती आणखी काही कारणासाठीही आणिबाणीची होती. सर्व पक्ष परिषदेच्या इतर प्रमुख सभासदांचे मन आपल्या बाजूला वळवण्यात लाहोर मुस्लिम लीग अयशस्वी ठरल्यामुळे तिने १९२८ च्या मार्चमध्ये परिषदेचा संबंध तोडला होता, आणि नेहरू कमिटीवरही तिचा प्रतिनिधी नव्हता. नेहरू कमिटीच्या एकंदर दहा सभासदांपैकी दोन मुसलमान होते, परंतु ते लीगवादी नव्हते: आणि कमिटीत मुसलमानांचे प्रतिनिधित्व नाही, जर असलेच तर ते पुरेसे नाही, आणि आपल्या लोकसंख्येच्याही प्रमाणात नाही याची खंत बहुतेक मुसलमानांच्या मनात घर करून बसली होती. सर अली इमाम आणि शैब क्युरेशी या दोन मुस्लिम 'प्रतिनिधी' पैंकी क्युरेशी यांनी अहवालाला महत्वाच्या मतभेदांची पुरवणी जोडली होती. त्यात, मध्यवर्ती कायदेमंडळातील मुसलमानांचा एक तृतियांश प्रतिनिधित्वाचा हक्क यावर भर होता. मुसलमानांचे म्हणणे असे होते की, सर्व पक्ष परिषदेत जमलेल्या प्रचंड मेळाव्यात हिशोबात घेण्यासारखा फक्त एकच पक्ष होता, तो म्हणजे कॉंग्रेस पक्ष या कॉंग्रेसने, स्वतःच एकदा स्वीकारलेला तीस मुसलमानांचा दिल्ली मसुदा, प्रातिनिधिक मुसलमानांशी सल्लामसलत केल्याशिवाय उडवून लावावयास आणि तो टाकून दुसऱ्याचा विचार करावयास नको होता, असे त्यांनी मोठ्या निराशग्रस्त मनाने सांगितले.

सर्व पक्ष परिषदेच्या अधिवेशनाला जरी कॉंग्रेसवाले मुसलमान हजर होते तरी, परिषदेच्या कामकाजातून मुसलमानांनी एका अर्थी, अंग काढून घेतल्यापासून २३ मुसलमानांचे हे शिष्टमंडळ प्रथमच अधिवेशनाला हजर होते. स्वतःचा सर्व निधर्मीपण पणाला लाऊनसुद्धा कॉंग्रेस मुसलमानांचे प्रतिनिधित्व करू शकत नव्हती. हिंदू, शीख, पार्शी आणि कॉंग्रेस व्यतिरिक्त इतर राजकीय विचारधारा, मुसलमानांनी आपल्या मागण्यात फेरफार केल्याशिवाय त्यावर सह्या करण्यास तयार नव्हत्या, आणि अगदी डोकेफोड करावी लागली तरी देशाची घटना तयार करण्याचा त्यांचा निश्चय होता म्हणूनच सर्वपक्ष परिषदेचे आणि अधिवेशनाचे कामकाज पुढे चालू राहिले. परंतु परिषद नेहरू रिपोर्ट आणि अधिवेशन यांनी अटळ अशा अडचणी सोसून कष्ट केले असले तरीसुद्धा नेहरू रिपोर्ट मुसलमानांचे प्रातिनिधिक मत मिळवू शकला नव्हता ह्या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. ही काही लहानसहान गोष्ट नव्हती.

कारण याच मुसलमान जमातीच्या हितसंबंधांचा संघर्ष, ५० वर्षे इतर लोकांच्या हितसंबंधांशी झाला. आणि याच मुसलमान जमातीची उद्दिष्टे खुद्द ब्रिटिश राज्यकर्त्यांनी वेळोवेळी पुन्हा पुन्हा उचलून धरली.

त्यामुळे, मुस्लिम लीग आणि खिलाफत ह्या संस्था मुसलमानांच्या काही भागाचेच नेतृत्व करीत असल्या तरी त्यांच्या प्रतिनिधींचे अधिवेशनाला हजर रहाणे अधिवेशन अधिक प्रातिनिधीक करण्यास उपकारक झाले. त्यांनी केलेल्या सूचनावर चर्चा करून सर्वांना मान्य होईल अशा निर्णयाची शक्यता निर्माण करण्यासाठी अधिवेशनाने एक ३७ सभासदांची समिती नेमली. त्यात तीन मुसलमान (अर्थात काँग्रेसवाले) होते. खिलाफतच्या मुसलमानांनी जे निवेदन आपल्या खिशातून आणले होते त्यावरून अधिवेशनाबरोबर सहज तडजोड होईल अशी आशा निर्माण झाली होती; 'सर्व पक्ष परिषदेने सुचवलेल्या तत्वानुसार' मुसलमान अल्पसंख्यकांना असलेल्या राखीव जागांना त्यांनी मान्यता दिली होती, आणि मध्यवर्ती कायदेमंडळात मुसलमानांकरिता एक तृतियांश जागा असाव्या या आपल्या नेहमीच्या मागणीचा उल्लेखसुद्धा त्यात केला नव्हता. त्यांच्यात आणि नेहरू रिपोर्टात मूलगामी मतभेदाचा एकच मुद्दा होता. तो म्हणजे अवशिष्ट हक्क प्रांताकडे सोपवावे की, केंद्राकडे. परंतु कमिटीच्या सभेत मुस्लिम लीग आणि परिषद यांच्या प्रतिनिधींची हात मिळवणी झाली. जीना हे लीग शिष्टमंडळाचे आणि टी. ए. के. शेरवानी हे खिलाफत शिष्टमंडळाच्या ४५ सभासदांचे प्रतिनिधित्व करीत होते. या दोनही शिष्टमंडळांनी नेहरू रिपोर्टाला संयुक्तपणे सुचवलेल्या सुधारणा पहिल्या वर उल्लेखिलेल्या निवेदनाहून संपूर्णपणे भिन्न होत्या. त्यातील प्रमुख मागण्या अशा : '(१) मध्यवर्ती कायदेमंडळातील लोकनियुक्त सभासदापैकी एक तृतियांश मुसलमान असावेत; (२) वयात आलेल्या सर्व स्त्रीपुरुषांना मताधिकार नसल्यामुळे, पंजाब आणि बंगालमध्ये दहा वर्षेपर्यंत आणि त्यानंतर पुन्हा फेरविचार होईल या अटीवर, मुसलमानांकरिता लोकसंख्येच्या तत्वावर राखीव जागा असाव्यात. परंतु त्यांना आणखी जागाकरिता निवडणूक लढवण्याचा हक्क नसावा; (३) अवशिष्ट अधिकार मध्यवर्ती कायदेमंडळाकडे न सोपवता प्रांताकडे सोपवावेत.' नेहरू रिपोर्टमध्ये सुचवलेल्या योजना अंमलात आल्यानंतर मुंबईपासून सिंध वेगळा करण्याचा प्रश्न विचारात घेण्यात यावा असे नेहरू रिपोर्टात म्हटले होते. हे सिंधबद्दलचे कलम गाळावे अशीही या दोन पुढाऱ्यांची इच्छा होती. अधिवेशन कमिटीने लीग व खिलाफत प्रतिनिधींशी केलेल्या चर्चेत इतर बारीकसारीक सुधारणा करण्याची आपली तयारी दाखवली परंतु त्यांच्या मुख्य चार मागण्यांचा अंतर्भाव रिपोर्टात करण्याबद्दलच्या आपल्या असमर्थतेबद्दल खेद व्यक्त केला. अधिवेशनाच्या बहुतेक सभासदांची हीच वृत्ती होती.

अधिवेशनातील आपल्या आर्जवी आणि मुद्देसूद भाषणात आपण या मागण्यांचा आग्रह का धरीत आहोत याचे स्पष्टीकरण जीनांनी केले. ते म्हणाले की, नेहरू

कमिटीने स्वतःच असे म्हटले आहे की, त्यांच्या योजनेप्रमाणे मुसलमानांना एक तृतियांश किंवा त्यापेक्षाही अधिक प्रतिनिधित्व मिळण्याचा संभव आहे. परंतु आपण हे प्रतिनिधित्व एक तृतियांश इतकेच मर्यादित ठेवू. हे प्रमाण निश्चित करण्याचे त्यांचे कारण असे होते की, मुसलमान बहुसंख्य असलेल्या पंजाब आणि बंगाल प्रांतात 'त्यांच्या लोकसंख्येपेक्षा मुसलमानांना अधिक जागा मिळतील' आणि त्याच्या मोबदल्यात मुसलमान अल्पसंख्य प्रांतातील त्यांचा योग्य हिस्सा हिरावला जाईल. नेहरू रिपोर्टमध्ये मुसलमानांचे प्रतिनिधित्व प्रांतानुसार योजले नसल्यामुळे त्यांची ही भीति निराधार नव्हती. म्हणून जीनांनी अशी सूचना केली की, मुसलमान बहुसंख्य प्रांतात त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात जागा मिळाव्या आणि हिंदुस्तानातील २४ टक्के मुसलमानांकरिता त्यांनी मागणी केलेल्या ३३$\frac{1}{3}$ टक्के जागांपैकी, उरलेल्या अधिक जागा, मुसलमान अल्पसंख्य असलेल्या प्रांतात विभागल्या जाव्या. जीनांच्याच शब्दात सांगायचे तर : 'आम्हाला याबाबतीत जी व्यवस्था हवी आहे ती अशी की, २४ टक्क्यापासून ३३$\frac{1}{3}$ टक्क्यापर्यंत ज्या जागा असतील त्या, मुसलमानांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात वाटल्या न जाता अल्पसंख्य प्रांतातील त्यांच्या महत्वानुसार वाटल्या जाव्या.' आपला हा मुद्दा ठसवण्यासाठी त्यांनी पुढील उदाहरणे घेतली. 'मद्रास आणि मुंबईचेच उदाहरण घ्या. लोकसंख्या हीच केवळ एक कसोटी नेहमी असत नाही. संयुक्त प्रांताचेही उदाहरण घ्या. मुस्लिम संस्कृती आणि मुस्लिम मन याचे ते केंद्र स्थान आहे. तेव्हा मध्यवर्ती कायदेमंडळातील त्यांचे प्रतिनिधित्व त्यांच्या लोक-संख्येवर मर्यादित करणे न्यायाचे होणार नाही. सिंध वेगळा झाला म्हणजे या तीन प्रांतांची लोकसंख्या पुढीलप्रमाणे होईल : संयुक्त प्रांत १४ टक्के, मुंबईत सुमारे ८ टक्के आणि मद्रासमध्ये ६ किंवा ७ टक्के मुसलमान रहातील. नेहरू रिपोर्टप्रमाणे प्रत्यक्ष व्यवहारात मुसलमानांना जर एक तृतियांश जागा मिळणारच आहेत तर 'त्यांचे वाटप आपण मुसलमानांच्या इच्छेप्रमाणे करू या' यावर त्यांचा भर होता.

पंजाब आणि बंगालमध्ये मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येनुसार प्रतिनिधित्व असावे, या मागणीसाठी जीनांनी मांडलेले मुद्दे बिनतोड होते. ते म्हणाले की : 'साधक बाधक विचार बाजूला ठेऊ या. पण पंजाब आणि बंगालमधील मुसलमानी लोकसंख्या जरी अधिक असली तरी त्यांची मतदानाची ताकद त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा फारच कमी आहे, ही सर्वमान्य गोष्ट आहे. त्यांच्याच लोकसंख्येतून त्यांचे प्रति-निधित्व फार कमी होईल अशी त्यांना भीति वाटत आहे. ही वस्तुस्थिती संशयातीत आहे. या परिस्थितीवर तोडगा म्हणून वयात आलेल्यांना मतदान हक्काचा उपाय आता सुचवला गेला आहे. आणि हे गृहीत धरून पंजाब व बंगालमध्ये आता राखीव जागांची गरज नाही अशी चर्चा केली जात आहे. परंतु दुर्दैवाने वयात आलेल्यांना मतदानाचा हक्क दिला गेला नाही तर आणि हेच होणे संभवनीय आणि सरळ असताना, पंजाब आणि बंगालमध्ये मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येच्या

प्रमाणात राखीव जागा असाव्यात परंतु त्यांना आणखी जागा लढवण्याचा अधिकार नसावा. म्हणून आम्ही या दुरुस्तीला फार महत्व देतो.

जीनांनी आपल्या मागण्या एका मागून एक अशा उपसूचनांच्या रुपाने अधिवेशनात मांडल्या. त्या फार मोठ्या बहुमताने फेटाळल्या गेल्या. लीग आणि खिलाफत या दोघांच्याही प्रतिनिधींनी मतदानात भाग घेतला नाही. कारण आपल्या मागण्यांना मुस्लिमेतरांचे किती पाठबळ मिळते हे त्यांना अजमावयाचे होते. अहमेदिया मुस्लिम जमातीच्या प्रतिनिधींनी आपले मत उपसूचनांच्या बाजूने दिले आणि ते नोंदवून ठेवावे असे सांगितले.

उपसूचनावरील चर्चेला उत्तर देताना जीना म्हणाले 'आपले उद्दिष्ट साध्य होईपर्यंत हिंदू आणि मुसलमान यांनी एकजुटीने मार्ग आक्रमावा हे आम्हाला हवे आहे. म्हणून तुम्हाला फक्त मुस्लिम लीग नव्हे तर सर्व मुसलमान मिळाले पाहिजेत ही गरज आहे. हे मी आता मुसलमान म्हणून बोलत नसून एक भारतीय म्हणून बोलत आहे. स्वातंत्र्याच्या लढ्यात सर्व सात कोटी मुसलमान आपल्याबरोबर आगेकूच करण्यास मिळाले आहेत हे पहाण्याची माझी इच्छा आहे. थोडेसेच असल्यास तुम्हाला बरे वाटेल काय? मी तुमच्याबरोबर आहे असे मी म्हटल्यास तेवढ्यावर तुम्ही संतुष्ट व्हाल काय? सर्व मुसलमानांनी तुमच्याबरोबर यावे हे तुम्हाला हवे आहे की नको? हिंदू आणि मुसलमान या हिंदुस्तानातील दोन महत्वाच्या जमाती आहेत हे तुम्ही लक्षात घेतले पाहिजे. शीख, ख्रिश्चन आणि पार्शी या जमातीबद्दल थोडासुद्धा अनादर न बाळगता हे मी म्हणतो, आणि म्हणून या दोन जमातींना समेट आणि एकजूट करणे भागच आहे. आपले हितसंबंध सारखेच आहेत आणि आपल्या एकाच ध्येयाच्या दिशेने आपण एकजुटीने मार्ग कापत आहोत असे त्यांना वाटायला लावले पाहिजे.' जीनांचे हे मुद्दे निष्फळ ठरले.

सलोखा घडवून आणण्याच्या प्रयत्नांचा हा शेवट होता. या अधिवेशनाला, राजकीय पक्ष, कामगार संघटना, शेतकरी संघटना, व्यापारी वर्ग, जमीनदार, संस्थानिक, स्त्रिया, जातीय संघटना, धार्मिक आणि सामाजिक संस्था, मागासलेल्या जमाती आणि अशाच काही इतर संस्था मिळून ७३ संस्थांचे सुमारे १२०० प्रतिनिधी हजर होते. यापैकी बरेच नसते आणि मुस्लिम लीग असती तर हे अधिवेशन आणि सर्वपक्ष परिषदसुद्धा अधिक प्रातिनिधिक झाली असती. महत्वाच्या राजकीय चर्चेत इतक्या संस्थांनी कधीच भाग घेतला नव्हता, आणि त्यांनी राजकारण हे आपल्या जीवनाचे अंग बनवले नसूनसुद्धा या सर्वांना आणि इतर फुटकळ संस्थांना बोलावून परिषदेने आणि अधिवेशनाने 'भरीव प्रतिनिधित्वाचे' स्तोम माजवले. यातील बऱ्याचशा संस्थांचे प्रतिनिधी हिंदू होते. आणि त्यांनी अधिवेशन हा पूर्णपणे जरी हिंदू मेळावा नसला, तरी मुसलमान विरहित मेळावा आहे असे दृश्य निर्माण केले. मुस्लिम जमात जरी जातीय कल असलेल्या निरनिराळ्या मुस्लिम संस्थांमध्ये विभागली गेली

होती, तरी तिला या जातीय संस्थांमध्ये असलेल्या अनेक मुसलमानापेक्षा उदात्त व्यक्तिमत्वाचे काँग्रेसमधील थोडेसे मुसलमान आपले प्रतिनिधि म्हणून मान्य नव्हते. बहुतेक मुस्लिम पुढाऱ्यांची अशी तक्रार होती की, परिषद आणि अधिवेशन, हिंदू महासभेच्या दबावापुढे नमली आणि त्यांनी काँग्रेस ठरावांना बाजूला सारून दिल्ली सूचनांच्याऐवजी नव्या सूचना आणल्या. दुसऱ्या बाजला संपूर्ण राष्ट्रवादी आणि निःसंशय निधर्मी अशा अधिवेशनाच्या पुढाऱ्यांनी अशीच पटेल अशी भूमिका पुढे मांडली. लीग आणि खिलाफत प्रतिनिधींना त्यांनी असे सांगितले की, सर्वपक्ष परिषदेने सिंध प्रांत वेगळा करण्याचा प्रश्न विचारात घेतला तेव्हा घातलेल्या अटी हिंदू आणि मुसलमान या दोघांच्याही पुढाऱ्यांनी मान्य केल्या होत्या. आणि करारावर सह्या करणाऱ्यात मध्यवर्ती खिलाफत परिषदेचे चिटणीस शौकत अली आणि सर्व पक्ष मुस्लिम परिषदेचे चिटणीस शफी दौदी हे होते. जो पंजाब करार नेहरू रिपोर्टात अंतर्भूत करावा हे मान्य झाले होते त्यावरील अनेक सह्यात, आज खिलाफत प्रतिनिधी असलेल्या काही मुसलमान पुढाऱ्यांच्या सह्या होत्या, आणि ते आता जीनांच्या पाठीशी उभे आहेत. परंतु अधिवेशनाच्या पुरस्कर्त्यांना, वयात आलेल्यांना मताधिकार ही पद्धत येईल आणि मर्यादित मताधिकारानुसार पंजाब व बंगालच्या राखीव जागा टळतील अशी आशा वाटत होती. लहानसहान ग्राह्य मुद्याबाबतचा अधिवेशन कमिटीचा आग्रह याचा अर्थ लीग आणि खिलाफत प्रतिनिधींनी हिंदू बहुमताच्या जोरावर केलेली दादागिरी असा लावला. आणि अधिवेशनावर मुसलमानाव्यतिरिक्त असलेले अधिवेशन असा शिक्का मारून सभात्याग केला.

परंतु ते स्वतःही त्यांना सर्वांना मान्य होईल अशी योजना तयार करण्यात अयशस्वी झाले. आणि सबंध १९२९ मध्ये, जातीय पक्षात विभागल्या गेलेल्या त्यांच्या निरनिराळ्या वादळी गटांचे भांडण, प्रत्यक्ष कुठलाच निर्णय न होता चालू राहिले. अधिवेशनाबरोबरच्या वाटाघाटींचा वृत्तांत सादर करण्यासाठी जेव्हा लीग प्रतिनिधी आपल्या कार्यकारिणीत परत आले तेव्हा त्यांना ही तडकलेली परिस्थिती आढळली विषय नियामक कमिटी २९ आणि ३० डिसेंबरच्या रात्रभर तीन ठरावावर चर्चा करीत होती, आणि त्यापैकी एकावर तरी सहमत व्हावे म्हणून धडपडत होती. परंतु सभा जितक्या तीव्र मतभेदात सुरू झाली तितक्याच तीव्र मतभेदात ती संपली. पुढे आलेल्या तीन ठरावात तीन निरनिराळे मतप्रवाह प्रतिबिंबित झाले होते; पहिला, लीग प्रतिनिधींनी सुचवलेल्या सुधारणा मान्य झाल्यास नेहरू रिपोर्ट मान्य करण्याच्या बाजूचा; दुसरा सुधारणा अतर्भूत केल्याशिवाय रिपोर्टाचा विचारच करण्यास तयार नसलेला; आणि तिसरा, मध्यवर्ती कायदेमंडळाला प्रांतात दिलेल्या आणिबाणीच्या हक्कांच्या अंमलबजावणीच्या कलमात, फक्त शाब्दिक बदल केल्यास नेहरू रिपोर्ट मान्य करण्यास तयार असलेला. निराश झालेल्या आणि कंटाळलेल्या विषय नियामक कमिटीने सात तासांनी भरणाऱ्या खुल्या अधिवेशनात आपले ठराव मांडण्याचे ठरवून

पहाटे तीन वाजता आपली बैठक बरखास्त केली. उदासिनतेच्या वातावरणाची छाया लीग गोटात पसरली; खुल्या अधिवेशनाची संख्या रोडावली, आणि अध्यक्षांनी (जीना) ते मे १९२९ पर्यंत तहकूब केले.

डिसेंबरच्या गारठ्यापाठोपाठ मुस्लिम ऐक्याची आशा परत निर्माण करणारा सुखवणारा वसंत आल्यामुळे खास अधिवेशनाची तारीख दोन महिने अलिकडे आणली गेली. जीना लीग आणि शफी लीग (१९२७ च्या वार्षिक अधिवेशनाच्या आदल्याच दिवशी लीगचे असे दोन भाग झाले होते.) यांनी परत एकत्र येण्यासाठी एकमेकाकडे स्नेहाळ नजर टाकली होती. सर्व पक्ष मुस्लिम परिषदेचे प्रमुख निर्माते शफी लीगवाले होते; त्यांनी आपले अधिवेशन भरवून, जीना लीगच्या कार्यकारी कौन्सिलमध्ये शफी लीगचे कार्यकारी कौन्सिल सामील करावे आणि जीनांच्या अध्यक्षतेखाली दोनही लीगची संयुक्त सभा घ्यावी असा निर्णय घेतला. लीगमधील निरनिराळ्या मतप्रणालीत तडजोड घडवून आणून मुस्लिम मागण्याबद्दल सर्व समत असा एक मसुदा लवकरच येणाऱ्या खुल्या अधिवेशनापुढे ठेवण्याचा अधिकार या अधिवेशनाने जीनांना दिला.

२८ मार्च १९२९ रोजी भरणाऱ्या खुल्या अधिवेशनाला आता फक्त तीनच आठवडे राहिले होते. त्या अवधीत जीनांनी मुस्लिम राजकारणातील प्रतिस्पर्धी गट एकत्र आणण्यासाठी आणि त्यांच्या संयुक्त संघटनेवर आपले नेतृत्व प्रस्थापित करण्यासाठी अतोनात परिश्रम केले. अधिवेशनाच्या आदल्या दिवशी त्यांनी सर्व अधिवेशन प्रतिनिधीमध्ये एक पत्रक फिरवले. त्यात १९२८ फेब्रुवारीमध्ये भरलेल्या सर्वपक्ष परिषदेच्या पहिल्या बैठकीपासूनच्या घटनांचा सारांश परत दिला होता. आणि 'नेहरू रिपोर्टला, मुसलमानांच्या सूचनांना प्रतिस्पर्धी हिंदू सूचना' असेच फार तर मानता येईल असा निष्कर्ष काढला होता. त्यानंतर त्यांनी तडजोडीचा मसुदा तयार केला आणि तो प्रसिद्ध केला. (समकालीन इतिहासात 'जीनांचा १४ कलमी' मसुदा म्हणून प्रसिद्ध असलेला. खरे म्हणजे तो १५ कलमी आहे परंतु १५ वे कलम हे ५ व्या कलमाचेच सविस्तर स्पष्टीकरण आहे.) ह्या मसुद्यात निरनिराळ्या मुस्लिम व्यासपीठावरून मुसलमानांनी केलेल्या प्रमुख मागण्यांचा मोठ्या कौशल्याने समावेश केला होता. ती कलमे अशी होती :—

(१) भावी राज्यघटना प्रांताला अवशिष्ट अधिकार देणारी संघराज्य पद्धतीची असावी.

(२) सर्व प्रांतांना एका पद्धतीचीच स्वायत्तता असावी.

(३) प्रत्येक प्रांतात अल्पसंख्यकांचे पुरेसे आणि परिणामकारक प्रतिनिधित्व राहील, आणि कुठल्याही प्रांतातील बहुसंख्यकांचे प्रतिनिधित्व अल्पसंख्यच काय पण समानसुद्धा होणार नाही या तत्त्वावर देशातील सर्व कायदेमंडळांची व इतर लोकनियुक्त संस्थांची पुनर्रचना व्हावी.

(४) मध्यवर्ती कायदेमंडळात मुसलमानांचे प्रतिनिधित्व एक तृतियांशाहून कमी नसावे.

(५) जातीय गटांचे प्रतिनिधित्व सध्याप्रमाणेच विभक्त मतदार संघाच्यापद्धतीने चालू रहावे. अशी तरतूद झाल्यास कुठच्याही जमातीला केव्हाही संयुक्त मतदार संघासाठी आपल्या विभक्त मतदार संघाचा त्याग करण्याची मुभा असावी.

(६) पुढे केव्हाही प्रादेशिक पुर्नरचनेची गरज वाटल्यास तिचा पंजाब, बंगाल व वायव्य सरहद्द प्रांतातील मुसलमान बहुसंख्येवर कुठलाही परिणाम होता कामा नये.

(७) सर्व जमातींना संपूर्ण धार्मिक स्वातंत्र्य, म्हणजे श्रद्धा, पूजा, आचार, प्रचार, सहकार्य आणि शिक्षण यांच्या स्वातंत्र्याची हमी असावी.

(८) कायदेमंडळातील किंवा तत्सम लोकनियुक्त संस्थातील कुठल्याही जमातीने, ३/४ संख्येने एकादे बील, ठराव किंवा त्याच्या एकाद्या भागाला, आपल्या जमातीच्या हितसंबंधांना बाधक म्हणून विरोध केला तर, ते बील किंवा ठराव किंवा तो भाग मंजूर केला जाऊ नये. किंवा अशा बाबतीत निर्णय करताना, पर्याय म्हणून शक्य आणि व्यवहार्य अशी किंवा तत्सम अशी दुसरी एकादी पद्धती योजावी.

(९) मुंबई इलाख्यापासून सिंध वेगळा करावा.

(१०) इतर प्रांतात ज्या तत्वावर सुधारणा केल्या गेल्या त्याच तत्वावर वायव्य सरहद्द प्रांत आणि बलुचिस्तानमध्ये कराव्या.

(११) राज्य सरकारच्या सर्व नोकऱ्यात आणि स्वायत्त संस्थांमध्ये लायकीप्रमाणे इतर हिंदी लोकाबरोबर मुसलमानांना त्यांचा पुरेसा हिस्सा मिळेल अशी राज्य घटनेमध्ये तरतूद असावी.

(१२) घटनेमध्ये मुस्लिम धर्म, संस्कृति आणि वैयक्तिक कायदा यांना संरक्षण असावे, आणि मुस्लिम शिक्षण, भाषा, धर्म, मुस्लिम धर्मदायी संस्था आणि राज्य सरकारनी आणि स्वायत्त संस्थांनी दिलेल्या मदतीच्या देणग्यातील त्यांचा योग्य हिस्सा यासर्व बाबींना उत्तेजन असावे.

(१३) मुस्लिम मंत्र्यांचे प्रमाण किमान एक तृतियांश असल्याशिवाय मध्यवर्ती किंवा प्रांतिक कायदेमंडळ बनवू नये.

(१४) हिंदी राष्ट्रसंघाच्या घटक राज्यांच्या एकमताशिवाय मध्यवर्ती कायदेमंडळाने घटनेत कुठलाही बदल करता कामा नये.

(१५) आजच्या परिस्थितीत निरनिराळ्या कायदेमंडळात आणि प्रातिनिधिक संस्थात, विभक्त मतदार संघाच्याद्वारे मुसलमानांचे प्रतिनिधित्व असणे हे अटळ आहे, आणि त्यांचा हा हक्क हिरावून न घेण्याला सरकार वचनबद्ध आहे. मुसलमानांच्या संमतीशिवाय आणि मागे किंवा या ठिकाणी, खुलासेवार सांगितलेल्या पद्धतीने त्यांचे हक्क व हितसंबंध यांच्या रक्षणाच्याबाबतीत जोपर्यंत मुसलमानांचे समाधान होत नाही तोपर्यंत, ते सशर्त किंवा बिनशर्त संयुक्त मतदार संघ स्थापन करण्यास मान्यता देणार नाहीत

लखनौ करार आणि १९१९ च्या घटनेनुसार, मुसलमान अल्पसंख्य प्रांतातील मुसलमानांनी उपभोगिलेल्या जादा प्रतिनिधित्वाबाबत जीनांनी या कलमांना एक 'पुरवणी पत्रक' जोडले होते : 'मुसलमान अल्पसंख्य असलेल्या प्रांतात, मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा मिळत असलेल्या जादा प्रतिनिधित्वाबाबतच्या प्रश्नाचा विचार नंतर करण्यात येईल.'

परंतु, आपण मुस्लिम मागण्यांचा संकलित आणि स्पष्ट असा करारनामा तयार केला आहे, आणि आता मुसलमानांचे निरनिराळे गट आपण आपल्या भोवती गोळा करू शकू, हा जीनांचा विश्वास आणि आशा खोटी ठरली. आपला १४ कलमी मसुदा खिशात घालून जेव्हा ते शफी लीग, जीना लीग आणि सर्व पक्ष मुस्लिम परिषद यांच्या राजकीय गोटात हिंडले, तेव्हा प्रत्येक गटात आणि आपापसात त्यांचे पूर्वी इतकेच मतभेद असल्याचे त्यांना आढळून आले. आणि त्यांचा हिरमोड झाला जीना लीगमध्ये नेहरू रिपोर्टाला उचलून धरणारा गट अजूनही कायम होता; या गटाने, जीनांच्या १४ कलमी मसुद्याला मान्यता देणाऱ्या गटाला अनधिकृत लोकांना प्रतिनिधी म्हणून नोंदवल्याबद्दल दोष दिला. तेव्हा हे गट एकमेकापासून अधिकचा दुरावले. मुस्लिम परिषदेच्या मागण्यांना अजूनही चिकटून राहिलेल्या शफी लीगने जीना लीग कौन्सिलल भेटून तडजोड शोधून काढण्यासाठी एक दहा जणांचे शिष्टमंडळ नेमले. परंतु या शिष्टमंडळाची भेट घेणे म्हणजे प्रतिस्पर्धी लीगला मान्यता देणे असा मुद्दा करून जीना लीग कौन्सिलने त्यांना भेटण्याचे नाकारले. आणि जेव्हा दोघांच्याही मित्रांनी सद्भावनेने त्यांची बैठक घडवून आणली तेव्हा, काहीही झाले तरी विभक्त मतदार संघ असावेत या शफी गटाच्या आग्रहामुळे ती बैठक फिसकटली

अशा दिलचोर आणि परस्पराबद्दलच्या तीव्र नापसंतीच्या वातावरणात दोन्ही लीगचे आणि मुस्लिम परिषदेचे लोक लीगच्या खुल्या अधिवेशनासाठी एकत्र जमले. जीनांची गैरहजेरी एकदम उठून दिसली. आणि म्हणून डॉ. अलम यांना अध्यक्षस्थानी बसवले गेले. ते अध्यक्षीय खुर्चीवर बसतात न बसतात तोच गोंधळ सुरू झाला. आम्हाला डॉ. आलम नकोत असे ओरडत, हात वर करीत आणि लाठ्या फिरवीत अनेक लोक उठले. आधी झालेल्या वाटाघाटीत काही अटींवर नेहरू रिपोर्ट मान्य करावा असे मत त्यांनी व्यक्त केले होते. जेव्हा वादळाचे रुपांतर तुफानात होण्याचा रंग दिसू लागला तेव्हा या गोंधळलेल्या बदली अध्यक्षांची सुटका करण्यासाठी जीना व्यासपीठावर अवतरले. त्यावेळी एकदम संपूर्ण शांतता झाली. परंतु अतिशय आक्रमक अशा भिन्न भिन्न विचारसरणीतून होणारी गडबड गृहीत धरून जीनांनी या शांत दिसणाऱ्या मेळाव्याचे अध्यक्षपद स्वीकारण्याऐवजी ते अधिवेशन बेमुदत तहकूब केले.

पूर्वी, डिसेंबरमध्ये भरलेल्या मागच्या अधिवेशनाप्रमाणेच याही अधिवेशनाचा शेवट झाला.

तरीसुद्धा, जीनांचा १४ कलमी मसुदा जिवंत राहिला. आणि पुढील डिसेंबरमध्ये पेशावर येथे भरलेल्या अखिल भारतीय जमियत्-उल्-उलेमा परिषदेच्या वार्षिक अधिवेशनात त्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. काँग्रेसशी मिळतीजुळती राजकीय उद्दिष्टे असलेल्या या जमियतने जातीय दंग्यापासून तिचे आपले संबंध तोडून टाकले होते.

अलिप्त निरीक्षक आता असे सुचवीत होते की सर्व पक्ष परिषद अधिवेशन आणि नेहरू रिपोर्ट हे आस्तित्वातच आले नसते तर राजकीय पातळीवरचे हिंदू मुसलमानांचे संबंध एवढे बिघडले नसते. या सर्वांचा सहज दिसून येणारा परिणाम म्हणजे काँग्रेसने नंतर मांडलेल्या राष्ट्रवादाशी मुसलमानांनी केलेली संपूर्ण फारकत. १९२९ च्या जुलैमध्ये मुसलमानांचे लक्ष पुन्हा राष्ट्रवादाकडे वेधण्याचा प्रयत्न झाला. अबुल कलम आझाद यांच्या नेतृत्वाखाली तीस मुसलमान पुढाऱ्यांनी अखिल भारतीय राष्ट्रीय मुस्लिम परिषद स्थापन केली. परंतु तिची पुढे काहीच प्रगती झाली नाही; आणि जातीयतेपेक्षा राजकीयदृष्टया वाढण्याची दुसरी संधी मुसलमानांनी गमावली.

व्यावहारिक राजकारणाच्या दृष्टीने मोजमाप करताना शेवटी नेहरू रिपोर्ट तयार करण्यासाठी घेतलेले अमाप कष्ट वाया गेल्याचे दिसून आले. आणि डिसेंबरमध्ये लाहोर येथे भरलेल्या काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात सर्व पक्षीय योजनेच्या स्वीकारासाठी आणखी एक वर्षाची मुदत वाढवली गेली असल्याचे अध्यक्ष जवाहरलाल नेहरू यांनी जाहीर केले. एक वर्ष संपले आणि नेहरू रिपोर्टाचा मामला खलास झाला. काँग्रेसने पुढील ठराव केला. 'नेहरू रिपोर्ट संपला या दृष्टिकोनातून पाहता, स्वतंत्र हिंदुस्तानात राष्ट्रीय तत्वावरच केवळ कठोरपणे जातीय प्रश्न सोडवले जातील असा विश्वास असलेल्या काँग्रेसला आपले जातीय प्रश्नासंबंधीचे धोरण जाहीर करण्याची आवश्यकता नाही. परंतु सर्वसामान्यपणे मुसलमान आणि इतर अल्पसंख्याकांनी आणि विशेषत: शिखांनी नेहरू रिपोर्टमध्ये सुचवलेल्या जातीय प्रश्नावरील उपायाबद्दल असमाधान व्यक्त केल्यामुळे ही काँग्रेस शीख मुसलमान आणि इतर अल्पसंख्य यांना असे आश्वासन देते की, भावी घटनेत संबंधित अशा सर्व जातींचे संपूर्ण समाधान न करणारी कुठलीही उपाय योजना काँग्रेस मान्य करणार नाही.'

'सर्व संबंधित जातींचे संपूर्ण समाधान' म्हणजे भ्रम होता हे दाखवून देण्यास वर्षभरातील देशात झालेल्या राजकीय उद्रेकांनी तिळमात्र जागा ठेवली नव्हती. हिंदी पुढाऱ्यांच्या तडजोड करण्याच्या नालायकीचा तो एक खणखणारा पुरावा होता.

---

## प्रकरण पंचविसावे

# मुसलमान आणि कायदेभंगाची चळवळ

नेहरू रिपोर्टला रावी नदीत (१९२९ मध्ये लाहोर येथे रावी नदीच्या तीरावर भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात खेदपूर्वक मारलेल्या शेऱ्याप्रमाणे) जलसमाधी दिल्यानंतर सत्याग्रहाच्या चळवळीला आणि दहशतवादी कृत्यांना चालना मिळाली. १९२९ च्या ऑक्टोबरमध्ये हिंदुस्तानला वसाहतीचे स्वराज्य देण्याचे आश्वासन देणारे एक निवेदन व्हाइसरॉयने काढले. त्यात निश्चित तारीख दिली नव्हती, पण भावी घटना तयार करण्यासाठी एक गोलमेज परिषद घेतली जाईल असे सूचित केले होते. संपूर्ण वसाहतीचे स्वराज्य देण्याच्या बुद्धीने ही परिषद काम करील किंवा काय याचे स्पष्टीकरण गांधींनी विचारले परंतु त्याला सरळ होकारात्मक उत्तर व्हाइसरॉयने दिले नाही. म्हणून काँग्रेसने व्हाइसरॉयच्या इच्छेला मान न देता आपली पूर्ण स्वराज्याची मागणी परत केली आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढा देण्याचा निर्णय घेतला. काँग्रेस प्रतिनिधींना कायदेमंडळातून परत बोलावले गेले, आणि त्यांना पूर्व तयारीसाठी ठिकठिकाणी पाठवण्यात आले. गांधींनी आपल्या ११ मागण्यांचा खलिता व्हाइसरॉय-कडे पाठवला आणि तो मान्य केल्यास कायदेभंगाची चळवळ होणार नाही असे सांगितले. त्या मागण्या पुढीलप्रमाणे होत्या : (१) संपूर्ण दारूबंदी; (२) रुपयाचे परिमाण १ शिलिंग ४ पेन्स बरोबर होईल इतके कमी करावे; (३) जमीन महसूल निम्मा करावा; (४) मिठावरील कर रद्द करावा; (५) सैन्यावरील अर्धा खर्च कमी करावा; (६) पगाराच्या खर्चाचे बील कमी करावे; (७) विदेशी कापडावर संरक्षण जकात बसवावी; (८) किनाऱ्यावरील वहातूक राखीव ठेवण्याचे बील मंजूर करावे; (९) खून केलेले किंवा खुनाचा प्रयत्न करणाऱ्या कैद्याव्यतिरिक्त सर्व राजकीय कैदी सोडून द्यावे, सर्व राजकीय खटले काढून घ्यावे, १८१८ चा III regulation आणि सेक्शन १२४-अ रद्द करावे आणि सर्व हद्दपार हिंदी लोकांना परत येण्याची परवानगी द्यावी; (१०) गुप्तहेर खाते रद्द करावे किंवा त्यावर लोकसत्ताक प्रतिनिधींचे नियंत्रण असावे; (११) स्वसंरक्षणार्थ बंदुकीचा परवाना सर्वांना खुला करावा.

स्वातंत्र्याची चळवळ जातीयतेच्या कुंपणावर अडखळू नये म्हणून काँग्रेसने हा लढा जातिविरहीत अशा सामाजिक आणि आर्थिक पातळीवर ठेवला आणि मुसलमानांना पाचारण केले. कायदेभंगाच्या चळवळीत पडावे लागेल अशा कुठल्याही गोष्टीबद्दल

जीनांना काही कर्तव्य नव्हते. त्यांनी आपली खिलाफत चळवळीपासूनची विचारसरणी अगदी स्वच्छ शब्दात स्पष्ट केली आणि आपल्या विचारसरणीचे लोक अगदी धार्मिक चळवळीपासूनही दूर राहिल्याचे त्यांनी दाखवून दिले. त्यामुळे जीना लीगला कायदे भंगाच्या चळवळीत काही रस नव्हता. सर्व पक्ष परिषदेच्यावेळी मुसलमानांनी केलेल्या मागण्या अमान्य करण्यात काँग्रेस हिंदूमहासभेला शरण गेली असा त्यांचा दावा असल्यामुळे त्यांची ही विचारसरणी अधिकच तीव्र बनली होती. खिलाफत परिषदेच्या बहुतेक पुढाऱ्यांनी काँग्रेसबरोबर कुठच्याच कार्यात कधी भाग न घेण्याचा निश्चय करून तिला कायमचा रामराम ठोकला होता. ज्यांची विचारसरणी याहून भिन्न होती ते काँग्रेसचे संपूर्ण सभासद होते; ते काँग्रेसमध्येच राहिले, आणि तिच्या कार्यक्रमांना उत्साहाने पाठिंबा देत होते.

शफी लीग आणि सर्व पक्ष मुस्लिम परिषदेची स्थायी समिती असलेली अखिल भारतीय मुस्लिम परिषद या दोनही संस्था केवळ जातीय प्रतिनिधित्वापुरत्याच चमकल्या. त्यांनी देशाच्या राजकीय प्रगतीला कुठलाच हातभार लावला नव्हता. इतर सर्वांच्या मागण्या डावलन फक्त यांच्याच मागण्या जरी नेहरू कमिटीने आपल्या रिपोर्टात अंतर्भूत केल्या असत्या तरी राष्ट्रवादी प्रेरणांशी ते एकरूप होतील अशी अगदी पुसटतीसुद्धा शक्यता नव्हती. या दोनही संस्थांच्या पुढाऱ्यांनी सरकार दुखावेल असे काहीच केले नसते, अशाप्रकारचे त्यांचे संबंध अधिकारी वर्गाशी होते. आपल्या सुखसोयींचा त्याग करण्याची त्यांची हिंमत होती किंवा काय, आणि आपली मालमत्ता त्यांनी पणाला लावली असती काय, या प्रश्नाचा शोध घेणे ही एक नाजूक चौकशीची बाब ठरेल. परंतु कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेऊन मुसलमानांचे काही भले होणार नाही कारण त्यांच्या संरक्षणाची हमी ब्रिटिशांनी आधीच घेतली होती, हे त्यांनी ओळखले होते. १९०९ च्या सुधारणांनी तरतूद केल्या गेलेल्या, आणि १९१९ मध्ये जास्त बलवान बनलेल्या जातीय मतदार संघ पद्धतीमुळे, हिंद्री राष्ट्रवाद्र मुसलमानांना आपल्याकडे खेचून घेऊ शकेल किंवा काय याबद्दलच्या शंका अधिक प्रबळ झाल्या होत्या. कारण काँग्रेससारख्या निधर्मी आणि राष्ट्रवाद्री संस्थेच्या बाजूने उभे रहाणाऱ्या मुसलमानापेक्षा आपली विशिष्ट अशी जातीय अस्मिता दृढ करणाऱ्या आणि जातीयता वाढवणाऱ्या मुसलमानाला निवणुडकीत विजयी होण्याची शक्यता अधिक होती. त्याला काँग्रेस चळवळीत भाग घेऊन धोका पत्करण्यापेक्षा ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या कच्छपी लागून आपले जातीय फायदे पक्के करणे अधिक सुलभ होते.

तरीसुद्धा, ज्या मुसलमानांची दृष्टी मुख्यत्वेकरून देशाच्या ध्येयावर खिळली होती त्या मुसलमानांनी कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला. व्हाइसरॉयनी गांधींच्या मागण्या फेटाळल्यानंतर ही चळवळ सुरू झाली होती. तिच्यात सर्वात आधी उडी मारणारे हे मुस्लिम मौलवी होते. त्यांच्या जमियत-उल-उलेमांच्या संघटनेने काळाची

गरज ओळखून नेहरू रिपोर्टाला असलेल्या आपल्या विरोधाला मुरड घातली आणि काँग्रेसला सहकार्य देण्यांचा ठराव संमत केला. काँग्रेस आवाहनाला साथ देणारा दुसरा पक्ष म्हणजे नवीनच स्थापन झालेला पंजाबचा अहरर पक्ष हा होता. जुन्या खिलाफत परंपरेचा थोडाफार आदेश देणारा तो एक राष्ट्रीय मुसलमानांचा गट होता. जातीय उन्मादात ते काँग्रेस स्नेहाला पारखे झाले होते. १९३० ते १९३२ च्या काळात कायदेभंगाच्या चळवळीत काँग्रेस आणि अहरर यांनी जोडीने भाग घेतला. आपल्या निश्चयी आस्थापूर्ण आणि उत्स्फुर्त कार्याने अहररनी लढ्यातील आपला मानाचा वाटा उचलला. याहूनही अधिक लढाऊ आणि संख्येने मोठा असा तिसरा पक्ष हा वायव्य सरहद्द प्रांताच्या खुदाई खिदमतगारांचा (परमेश्वराचे सेवक) होता. हे स्वयंसेवक काँग्रेसचाच अणूरेणू बनले होते. तरीसुद्धा सर्व साधारण जनतेत ते खुदाई खिदमतगार किंवा लाल डगलेवाले म्हणूनच सर्वत्र ओळखले जात होते. यानंतर सरहद्द प्रांतात मुस्लिम लीगची छाप कधी फारशी पडलीच नाही, आणि तेथे काँग्रेसने संपूर्ण सत्ता उपभोगिली. असे का झाले हे कळण्यास सरहद्दीवरील चळवळींचा थोडक्यात आढावा घेतल्यास अधिक सुलभ होईल.

अखिल भारतीय काँग्रेसने सरहद्द कायद्यांच्या चौकशीची कामगिरी एका शिष्टमंडळाकडे सोपवली होती. हे शिष्टमंडळ या चळवळीची गंगोत्री ठरली. शिष्टमंडळाला व्हाइसरॉयने अटक येथे थांबवले. लाल डगलेवाले पठाण संतापले. त्यांनी त्यांच्या निषेधार्थ मिरवणूक व सभा घेण्याचा निश्चय केला. २२ एप्रिल १९३० ला शिष्टमंडळाचे आगमन होणार होते आणि दुसऱ्याच दिवशी पहाटे नऊ पठाण पुढाऱ्यांना अटक करण्यात आली. त्यानंतर थोड्या वेळाने आणखी दोघांची तुरुंगात रवानगी करण्याची तयारी झाली. परंतु ज्या लॉरीमधून त्यांना पोलीस ठाण्यावर नेण्यात येत होते, ती नादुरुस्त झाली आणि रस्त्यात बंद पडली. तेव्हा त्यांनी स्वतःच पोलीस स्टेशनवर हजर रहाण्याची हमी घेतली आणि ते तिकडे निघाले. त्यावेळी त्यांच्याभोवती लोकांचा फार मोठा जमाव जमला. आणि ते मिरवणुकीने पोलीस स्टेशनकडे जाऊ लागले. मिरवणूक पोलीस स्टेशनजवळ येऊ लागल्याबरोबर तीन हत्यारबंद मोटारी भरधाव मिरवणुकीत घुसल्या. 'सुमारे १२ किंवा १४ इसम जखमी झाले. त्यातील ६-७ तावडतोब ठार झाले आणि इतरांना गंभीर स्वरुपाच्या जखमा झाल्या.' त्यानंतर एक इंग्लिश मनुष्य मोटार सायकलीवरून तडकाफडकी आला आणि अचानक हत्यारबंद मोटारीवर आदळला. त्याला खाली ओढण्यात आले. पकडलेल्या एका मोटारीला लाग घालण्यात आली. या दोनही घातपाती कृत्यांना जमाव जबाबदार होता असे सरकारचे म्हणणे होते. खरोखर काय झाले होते हे पहाण्यास वेळही नव्हता. मृत आणि जखमी लोकांना हालवण्याची परवानगी मिळाल्याशिवाय आणि हत्यारबंद गाड्या व लष्कर मागे घेतल्याशिवाय जमाव हटण्यास तयार नव्हता. तोच दुसऱ्या दोन मोटारींनी जमावावर तत्काळ गोळीबार

सुरू केला. गोळीबारामुळे जमाव पांगू लागला, पण लोक परत परत जमून गाड्यांना आगी घालीत होते. अधून मधून हे असे तीन तास चालू होते. यात अधिकृत आंकड्याप्रमाणे ३० माणसे ठार व ३३ जखमी झाली होती तर याच्या ७ ते १० पटीने अधिक प्राणहानी झाली अशी अनधिकृत माहिती होती.

याहून गंभीर प्रकारांना हे आमंत्रणच होते. परिस्थिती आटोक्यात आणण्यास पोलीस असमर्थ ठरले तेव्हा रॉयल गढवाल रायफल्सच्या दोन पलटणींना पाचारण करून गोळीबार करण्यास फर्मावले गेले. परंतु त्यांनी निःशस्त्र जमावावर गोळीबार करण्याचे नाकारले. सैन्याने केलेली ही अवज्ञा सरहद्दीच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी अपेक्षिली नव्हती; ते डगमगले, त्यांनी पोलीस व सैन्य काढून घेतले आणि पेशावरला आपल्या नशिबावर सोडून दिले. २४ एप्रिलपासून ४ मेला ब्रिटिश सैन्याने पेशावर परत काबीज करीपर्यंत शहरात बेबंदशाही चालू होती. पेशावरच्या घटनेनंतर तात्रडतोब इतर ठिकाणी शांततेची लक्षणे दिसू लागली. आणि त्यापैकी बऱ्याच ठिकाणांनी दंग्यांना पुरेपूर हातभार लावला.

सरहद्दीवरील टोळ्या आता ब्रिटिशापासून सरहद्दीवरील प्रदेश काबीज करण्याच्या आशा बाळगीत होत्या मेच्या दुसऱ्या आठवड्यात सुमारे ४००० वझिरींनी एका ब्रिटिश ठाण्यावर हल्ला केला. ब्रिटिशांनी आपल्या बाजूने ही जमात वसलेल्या खेड्यावर फार जोरदार बॉम्ब वर्षाव केला. ३ जूनला ५००० बलशाली 'आफ्रिदी लष्कराने' बरा आणि बझर या खोऱ्याकडे कूच केले. आणि ते गुन्हामध्ये एकत्र जमले. जून ४ आणि ५ च्या रात्री त्यांच्यापैकी २००० वझिरींनी पेशावर जिल्ह्यावर हल्ला चढवला आणि त्यापैकी बरेच जण खरोखरीच शहाराच्या सीमा रेषेवर येऊन थडकले. सबंध जून आणि जुलै महिन्यात टोळ्यांच्या हजारो लोकांच्या हालचाली चालू होत्या आणि ते पेशावर जिल्ह्यातील खेड्यांवर हल्ले चढवीत होते. ऑगस्टच्या ७ आणि ८ तारखेला आफ्रिदींची पुन्हा एक अयशस्वी स्वारी झाली. मुस्लिम मुल्ला सर्वत्र फिरत होते आणि उठावाला प्रोत्साहन देत होते आणि ब्रिटिश लोक बॉम्ब वर्षाव करून उठाव दाबून टाकत होते. पर्यायाने ऑगस्टमध्ये लष्करी कायदा पुकारणे आणि तो जानेवारीपर्यंत चालू ठेवणे भाग पडले.

Indian in 1930–31 या सरकारी अहवालात म्हटले आहे की, 'दोन प्रसंग सोडल्यास, टोळीवाल्यांनी शांत असलेल्या जिल्ह्यावर केलेल्या अनेक स्वाऱ्यांच्यावेळी, ते ज्या ज्या खेड्यातून गेले त्या त्या खेड्यांची त्यांनी आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे लूटमार न करता ते त्यापासून अलिप्त राहिले. आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांशी तडजोडीची बोलणी करीत असताना आफ्रिदींनी केलेल्या गांधींच्या सुटकेच्या आणि हिंदुस्तानातील खास वटहुकूम रद्द करण्याच्या मागणीवरून हे स्पष्ट दिसून येते की, काँग्रेसचे हस्तक सरहद्दीच्या दुसऱ्या बाजूलाही जागरूक होते.'

सरकारी वृत्तांताप्रमाणे तारीख २५ मे रोजी मार्दानमध्ये लोकांचा जमाव आणि

पोलीस यांच्यात धुमश्चक्री सुरू झाली. पोलीस असिस्टंट सुपरिटेंडंट, मर्फी याला क्रूरतेने मारण्यात आले. बंडाची झळ लागलेल्या सरहद्द प्रांतातील चार जिल्ह्यांपैकी, बानू हा जिल्हा सर्वात अधिक प्रक्षुब्ध झाला होता. एका स्थानिक काँग्रेस कार्यकर्त्यांच्या अटकेविरुद्ध संतप्त झालेल्या जमावाने निषेध म्हणून ८ एप्रिल रोजी एका पोलीस स्टेशनाला गराडा घातला, बागेची नासधूस केली आणि जवळच गोल्फ खेळत असलेल्या युरोपियन लोकांवर दगड व चिखलफेक केली. खेडयातून शहरात येणाऱ्या आणि निदर्शने करणाऱ्या लोकांना रोखण्यासाठी १४ एप्रिलला शहराच्या प्रत्येक प्रवेशद्वारावर लष्कर ठेवले गेले. याच्या निषेधार्थ काँग्रेस कमिटीने बेमुदत सार्वत्रिक हरताळाची तयारी केली. पण तो सहाव्या दिवशीच मागे घेण्यात आला. जुलैमध्ये टोळयांच्या उठावामुळे शहराचे दरवाजे पुन्हा बंद करण्यात आले. आणि काँग्रेस कार्यक्रमाचाच एक भाग म्हणून परदेशी माल विकणाऱ्या दुकानावर निरोधन करीत असलेल्या ४४० लोकांना अटक करण्यात आली.

सरहद्द चळवळीचे नेते खान अब्दुल गफारखान यांना चळवळीच्या सुरुवातीलाच अटक करण्यात आली होती. त्यांनी स्वतः गांधीजींच्या अहिंसा तत्त्वाचे कंकण बांधले होते. परंतु त्यांच्या गैरहजेरीत ज्या हिंसेपासून ते पठाणांना परावृत्त करीत होते या आपल्या नेहमीच्या हिंसेचा आश्रय पठाणांनी घेतला होता.

१९३१–३२ मध्ये जेव्हा काँग्रेसने करबंदीची चळवळ सुरू केली तेव्हा त्यात ज्या थोडया प्रांतांनी भाग घेतला होता त्यात पुन्हा सरहद्द प्रांत होता. पहिली चळवळ थांबल्यानंतर गफारखानांची सुटका झाली होती. आपल्या सुटकेनंतर त्यांनी लवकरच सर्व प्रांतभर एक तुफानी दौरा काढला, अनेक तरुण पठाणांना आपल्या लाल डगले घाल्या संघटनेत सामील करून घेतले, आणि जमिनीचा सारा शेतकऱ्यांच्या आवाक्या बाहेरचा आहे तेव्हा त्यांनी आपल्या उत्पन्नातून पैलेल इतकाच कर द्यावा असे सांगत शेतकऱ्यांच्या सभा घेतल्या. नऊ महिन्यानंतर जेव्हा काँग्रेसची करबंदीची चळवळ सुरू झाली तेव्हा तारीख २४ डिसेंबर १९३१ ला त्यांना परत अटक करण्यात आली आणि परत दंगे, हल्ले, अटक, मोर्चे, जाहीर सभा आणि गोळीबार हे सुरू झाले आणि अनेक लोक जखमी झाले किंवा मृत्यूमुखी पडले.

काँग्रेस चळवळीत सरहद्द प्रांताने भाग घेतल्याबद्दल मुस्लिम जातीय पुढाऱ्यांना आश्चर्य वाटले होते. हे जातीय पुढारी सरहद्द प्रांताचा भावी राजकीय दर्जा काय असावा, म्हणजे तो पंजाबमध्ये रहावा की, त्याचा स्वतंत्र प्रांत बनवावा याबाबत हिंदुमहासभेशी अनेक वर्षे झगडा करीत होते. हिंदू आणि मुस्लिम जातीयवाद्यांच्या या झगडयाबद्दल सरहद्दचे पठाण पुढारी उदासीन होते. मुस्लिम जातीयवाद्यांनी काँग्रेसला राष्ट्रवादी संघटना म्हणून मानण्यास नकार दर्शवला होता त्याहीबाबतीत ते उदासीन होते. सरहद्द प्रांतात जातीयवादाने आपली पाळेमुळे रोवण्यापूर्वीच योगायोगाने तेथे राष्ट्रवादाचा भक्कम प्रसार झाला होता.

पंजाब, बंगाल आणि सिंध या प्रांतातील स्थानिक मुसलमान पुढाऱ्यांनी, नेहरू रिपोर्टाचा तीव्र निषेध करण्यात जरी मुस्लिम संघटनांना हातभार लावला नाही, तरी सर्वसाधारणपणे मुसलमानांना गांधींच्या चळवळीत रस नव्हता. संघटनेच्या दृष्टीने ते कुठेच नव्हते, कॉंग्रेसबरोबर नव्हते की, मुस्लिम लीगबरोबर नव्हते किंवा नवीन तयार झालेल्या संस्थांबरोबरही नव्हते. आस्तित्वात असलेल्या किंवा आस्तित्वात येणाऱ्या मुस्लिम बहुसंख्य प्रांतांपैकी, फक्त सरहद्द प्रांताने स्वतःचे नेतृत्व निर्माण केले होते आणि त्यांनी आपल्या सतत प्रयत्नांनी आणि त्यागानी जनतेचा पाठिंबा मिळवला होता.

इतर प्रांतात मुसलमान आपल्या जातीय भावनांना वाचा फोडण्याचे कार्य करीत होते. मुस्लिम परिषद, मुस्लिम लीग, खिलाफत परिषद, शिया परिषद आणि इतर अनेक संघटना, दरवर्षी आपली वार्षिक अधिवेशने भरवीत होत्या आणि हिंदुस्तानच्या इतर जमातींइतकीच स्वातंत्र्याची निकड आपल्याही आहे असे म्हणत म्हणत जातीय मतदार संघाबद्दल तेच तेच ठराव पुन्हा पुन्हा करीत होत्या. मुस्लिम परिषदेला शह देण्यासाठी निर्माण झालेल्या जमियत्-उल-उलेमा, अहरर पक्ष आणि राष्ट्रीय मुस्लिम परिषद या संघटना फारशा मुसलमानांना आपल्याकडे खेचू शकल्या नाहीत. राष्ट्रवादाला अधिक महत्व देणारा त्यांचा युक्तिवाद मुसलमानांना पटू शकला नाही. त्यातील विपरीत गोष्ट अशी होती की,ज्या मुसलमानांना पाश्चात्य शिक्षणाचा फायदा मिळाला होता आणि ज्यांना लोकसत्ताक राज्यपद्धतीची अधिक चांगली माहिती होती असे मुसलमान मौलांपेक्षाही जातीयवादाकडे अधिक झुकले होते. सर सय्यद अहमद यांच्या काळातील ब्रिटिश निष्ठा परत जागी झाली होती; आपल्या जातीय मागण्या पुरवल्या जातील असा विश्वास बऱ्याच मुसलमानांना वाटत होता. फक्त शिक्षण आणि ब्रिटिश निष्ठा यांचाच विचार कराअसा आदेश सर सय्यद यांनी दिला होता; आणि जातीय संस्थांनींही आता स्वातंत्र्याला बांधून घेतले असल्यामुळे आता राजनिष्ठेला काहीच अर्थ उरला नव्हता. तेव्हा दुसरा काहीही विचार न करता फक्त जातीय मतदार संघाचाच विचार करा असा आदेश त्यांना आजच्या नेतृत्वाने दिला.

प्रकरण सवीसावे

# गोलमेज परिषदेतील मुसलमानांचा प्रतिसाद

कायदेभंगाच्या चळवळीनंतर १९३० मधील महत्त्वाची घटना म्हणजे नोव्हेंबरमध्ये लंडन येथे भरलेली गोलमेज परिषद. हिंदी प्रतिनिधीत देशातील जातीय हितसंबंधांचे निरनिराळे गट ठळकपणे दिसून येत होते. हिंदू, मुसलमान, शीख आणि इतरांचे तथाकथित प्रतिनिधी व्हाइसरॉयनी निवडले होते. परंतु या निवडलेल्या प्रतिनिधींना त्यांच्या जातीतील किती लोकांचा पाठिंबा होता हे व्हाइसरॉयना कळण्याचा काहीच मार्ग नव्हता. हे लोक जातीय प्रश्नावर अधिक आक्रमक भाषेत बोलत असल्यामुळे कदाचित् व्हाइसरॉयनी त्यांना पसंत केले असावे. ते जितक्या प्रक्षुब्धतेने हिंदुस्तानात बोलत होते तितक्याच प्रक्षुब्धतेने ते लंडन येथे बोलले; आपापल्या जातींचा विश्वास संपादन करण्याचा तो एक सर्वमान्य मार्ग झाला होता. इंडियन सेंट्रल कमिटीच्या (सायमन कमिशनची हिंदी आवृत्ती) अहवालाला जोडलेल्या निवेदन पत्रकात, सर शंकरन् नायर, राजा नबाब अलिखान आणि सरदार बहादूर शिवदर सिंग उबेरॉया यांनी जातीय प्रवृत्तीच्या परिस्थितीचे थोडक्यात स्पष्टीकरण केले आहे. या कमिटीचे, अध्यक्ष सर शंकरन नायर हे होते. निवेदनपत्रक म्हणते :—

जातीयवादाचे काही दुष्परिणाम उल्लेखनीय ठरतील. जातीय तत्त्वावर निवडून दिलेल्या मंत्र्यांना आपल्या जातींच्या आज्ञा पाळाव्या लागतील आणि त्यामुळे सरकारी अधिकारी भयंकर पेचात सापडतील, या मुद्यावर कायदा व सुव्यवस्था हिंदी लोकांच्या हातात सोपवण्यास ब्रिटिश अधिकाऱ्यांनी विरोध केला. ज्या स्थानिक संस्थाचे सभासद जातीय मतदार संघातून निवडून आलेले असतील त्या संस्थांच्या नेमणुका जातीय धोरणाने केलेल्या असतात. त्याचप्रमाणे सर्व जमातीकडून घेतलेले कर, कौन्सिलमध्ये ज्या जमातींचे बहुमत असते आणि ज्यांचे प्रतिनिधी विभक्त मतदार संघातून अधिकारावर आलेले असतात त्या जमातींच्या फायद्यासाठी उपयोगात आणले जातात. स्वतःच्या जातीच्या कमी बुद्धीच्या मुलांना जागा देण्यासाठी जातीय हित संबंधांच्या प्रतिनिधींकडून अधिक बुद्धिवान मुलांना प्रवेश नाकारले जातात, किंवा त्यांना शाळामधून काढून टाकले जाते. लायकीच्या नव्हे तर जातकुळीच्या मुद्यावर न्यायाधिशांच्या नेमणुका केल्या जातात. एका सर न्यायाधिशाने निराशेच्या हावभावांनी आम्हाला असे सांगितले की, ते आगामी होणाऱ्या गोष्टींच्या परिणामाची दहशत बाळगूनच विचार करतात. कारण आजसुद्धा, त्यांना आणि त्यांच्या सहकार्यांन

नेमणुकाकरिता कराव्या लागणाऱ्या उमेदवारांच्या शिफारसी, जातीय मतदार संघामुळे ज्यांना सरकारी मंत्रीपदाचा मान मिळाला आहे अशा मंत्र्यांच्या सूचनेनुसारच कराव्या लागतात. सुधारणापूर्वीच्या काळात उच्च दर्जाच्या हिंदू किंवा मुसलमान न्यायधिशा-विरूद्ध साधी कुजबुजही ऐकू येत नव्हती. आता जातपातीच्या मुद्यावर हल्ला चढवला गेला नाही असा न्यायाधीश क्वचितच आढळेल. याचे कारण, जातीय मतदार संघाने आणलेले दडपण हे होय....... ज्यांना जातीयवादामुळे अधिकार प्राप्ती झाली आहे त्यांनी केलेल्या प्रत्येक गोष्टीमध्ये, 'मग तो न्यायालयाचा निकाल असो, कंत्राट देणे असो, हाताखालच्या आमदारांचा रिपोर्ट देणे असो, शिक्षेच्या अंमलबजावणीची शिफारस असो किंवा एकादी मेहेरनजर टाकण्याचा सवाल असो" विभक्त मतदार संघामुळे आलेला जातीयवादाचा प्रभाव उघड दिसतो.

मुस्लिम जातीयवादापासून स्फूर्ति घेऊन इतर अल्पसंख्यांक जमातींनीही आपला आवाज उठवला होता. पंजाबमध्ये राखीव जागा विरहीत संयुक्त मतदार संघाच्या बाजूने, कुठलीही तडजोड मान्य न करता ठाम उभे राहिलेले शीख आपल्या मागण्या फुगवीत होते. ३० हजार शीख हजर असलेल्या त्याच्या १९२९ मधील वार्षिक परिषदेने, प्रांतिक कायदेमंडळात शिखांना ३० टक्के जागा मिळाव्या इतकी आपली मागणी वाढवली. गोलमेज परिषदेला सरदार संपुरन् सिंग हे शीखांचे प्रतिनिधी म्हणून हजर होते. ते स्वतः सभासद असलेल्या अल्पसंख्यांक उपसमितीत त्यांनी असे सांगितले की, पंजाब कायदेमंडळात मुसलमानांना कायमचे सनदी बहुसंख्यत्व दिले तर तेथे मुस्लिम सरकार आस्तित्वात येईल, आणि 'प्रबळ ब्रिटिश साम्राज्य त्यांच्या पाठीशी असल्यामुळे तेथे यादवी होण्याची शक्यता निर्माण होईल आणि कदाचित् आमचा सर्वनाश होऊन आम्हाला पृथ्वीच्या पाठीवरून कायमचे धुवून काढले जाईल. ते पुढे म्हणाले, 'कुठल्याही एका जमातीला बहुसंख्य जागा असू नयेत असे माझे मुळीच म्हणणे नाही. परंतु दुसऱ्या दोन जमातींची काहीच काळजी न करता ह्या एका जमातीला कुठल्याही कायदेमंडळात सनदशीर बहुसंख्यत्व देणे, म्हणजे मला वाटते हे, कुठल्याही घटनात्मक पद्धतीच्या सर्व तत्त्वांच्या विरूद्ध आहे.'

आपली बाजू अतिशय शांतपणे आणि बुद्धिपुरस्सर मांडणारे मुसलमान प्रतिनिधी यामुळे विचलीत झाले नाहीत. संदरन् सिंगांना मुसलमानांच्यावतीने उत्तर देताना सर महम्मद शफी म्हणाले : 'आमच्या शीख जातीबांधवांच्या प्रतिनिधींनी वापरलेल्या भाषेबद्दल मला आश्चर्य वाटले आणि त्याबरोबर दुःखही झाले हे मी कबूल करतो. ज्या बाबा गुरु नानकवर ते स्वर्गवासी झाले तेव्हा मुसलमानांनी मुसलमान म्हणून आणि हिंदूंनी हिंदू म्हणून आपला हक्क सांगितला होता त्या महान संत पुरुषाचे हे शिष्य, गोलमेज परिषदेत हिंदू मुसलमानांना साधणारा दुवा ठरतील असे मला वाटत होते. ती माझी अपेक्षा भंग पावली या विचाराने मला दुःख होत आहे.' शफींनी मुसलमानांची मागणी उचलून धरली ती अशी : 'आज मुसलमान जादा तिनिधित्व

भोगत असूनसुद्धा सहा प्रांतात हिंदूंचे नुसते बहुमतच आहे असे नव्हे तर ते ७० ते ८५ टक्क्यांचे बहुमत आहे. पण बंगाल आणि पंजाबमध्ये मुसलमानांचे बहुमत अगदी नाममात्र, म्हणजे पंजाबमध्ये ५५.५ टक्के आणि बंगालमध्ये ५४.५ टक्के इतकेच आहे. म्हणून या दोन प्रांतात त्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे असा मुसलमानांचा आग्रह आहे.'

ब्रिटिश मुत्सद्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापलेल्या अल्पसंख्य उपसमितीच्या बैठकीत, हिंदू, मुसलमान आणि शीख प्रतिनिधींनी एकमेकांच्या भाषणात तापदायक व्यत्यय आणून, आपण जणूकाय वादी प्रतिवादी आणि अध्यक्ष दावा मिटवणारा असे दृश्य उभे केले. सर्वपक्ष परिषदेच्यावेळी आणि त्यानंतर घेतलेल्या आपल्या भूमिकांना तसेच चिकटून राहून त्यांनी प्रगतीला एक तसूभरही अवसर ठेवला नाही. सर्व पक्ष परिषद, इंडियन सेंट्रल कमिटी आणि सायमन कमिशन या प्रत्येकानी जातीय सूव्यवस्थेवर आपापला तोडगा काढला होता. पण त्यांच्या शिफारसी मुस्लिम जातीय संघटनांनी फेटाळल्यामुळे त्यांचे प्रयत्न वांझ ठरले होते. सायमन कमिशनने मुस्लिम जमातीला दोन पर्याय सुचवले व त्यातील एकाची निवड करावी अशी इच्छा प्रदर्शित केली. हे दोन पर्याय असे होते : हिंदू बहुसंख्य असलेल्या सहा प्रांतातील त्यांच्या जादा प्रतिनिधित्वावर त्यांनी पाणी सोडावे या अटींवर, पंजाब आणि बंगालमध्ये त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व, किंवा पंजाब व बंगालमध्ये एकमेकांच्या संमतीने संयुक्त मतदार संघ स्वीकारण्याच्या अटीवर, इतर ठिकाणी त्यांना सध्या मिळत असलेले जादा प्रतिनिधित्व कायम राखणे. हे पर्याय निरनिराळ्या प्रांतात एकामागून एक भरलेल्या मुस्लिम परिषदांनी नेहरू रिपोर्टची छाया म्हणून बाद ठरवले आणि फेटाळले.

१९३० च्या मुस्लिम लीगच्या वार्षिक अधिवेशनात सर महंमद इक्बाल या पंजाबी कवीने केलेल्या भाषणाचा वृत्तांत लंडनमध्ये आला, आणि तो ऐकून गोलमेज परिषदेला आलेले शीख आणि हिंदू प्रतिनिधी अस्वस्थ झाले. इक्बालचे भाषण हे पाकिस्तानच्या कल्पनेचे पूर्वचिन्ह होते. ते म्हणाले होते : धर्म ही व्यक्तीची खाजगी बाब आहे आणि त्याचा माणसाच्या ऐहिक जीवनाशी काही संबंध नाही या तत्वाकडे युरोप आकर्षित झाला आहे. परंतु इस्लाममध्ये परमेश्वर आणि विश्व, जड आणि चैतन्य धर्म आणि राज्य हे एकमेकांशी संलग्न आहेत.

हिंदुस्तान ही आशियाची लहान प्रतिकृती आहे. त्यातील काही लोकांचे पूर्व आशियाशी व काही लोकांचे मध्य आणि पश्चिम आशियाशी सांस्कृतिक नाते आहे सहकार्याच्या एकाद्या परिणामकारक तत्त्वाचा जर हिंदुस्तानात शोध लागला तर इतके दिवस दुःख भोगीत असलेल्या या प्राचीन देशात ते शांतता आणि परस्पर सदिच्छा निर्माण करील.

तरीसुद्धा, देशातील एकतेच्या तत्त्वाच्या शोधाचे आमचे आतापर्यंतचे प्रयत्न फसले

आहेत हे दृश्य खेदकारक आहे. ······ मुसलमानी मन मला जेवढे समजले आहे तेवढ्यावरून मला बिनदिक्कत असे म्हणावेसे वाटते की, कायमची जातीय तडजोड करण्याचा पाया म्हणून, हिंदी मुसलमानाला स्वतःच्या हिंदी मातृभूमीत आपल्या संस्कृतीच्या व परंपरेच्या आधारावर संपूर्णपणे आणि स्वतंत्रपणे आपली प्रगती करून घेण्याचा हक्क आहे हे तत्त्व जर मान्य केले तर तो हिंदुस्तानच्या स्वातंत्र्यासाठी प्राण पणाला लावण्यास तयार होईल.

हिंदुस्तान हा निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या आणि निरनिराळ्या धर्मांचा पुरस्कार करणाऱ्या निरनिराळ्या जमातींच्या मानवांचा देश आहे. या लोकांचे वर्तन एकाच प्रकारच्या वांशिक जाणिवेने अजिबात निश्चित केले गेलेलें नाही. हिंदूंचासुद्धा एक-संघ असा गट बनलेला नाही. म्हणून हिंदुस्तानात मुस्लिम हिंदुस्तान निर्माण करण्याची मुसलमानांची मागणी पूर्णपणे समर्थनीय आहे.

पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, सिंध आणि बलुचिस्तान यांचे विलिनीकरण एका राज्यात झाल्याचे दृश्य पहावयास मला आवडेल. असे एकात्म झालेले वायव्य हिंदी मुस्लिम राज्य, मग ते ब्रिटिश साम्राज्यांतर्गत असो किंवा त्याच्या बाहेरचे असो, निदान वायव्य हिंदुस्तानपुरते तरी मला मुसलमानांचे ते अंतिम भवितव्य वाटते.

या महमद इक्बाल यांच्या अध्यक्षीय भाषणातील सूचना लीगच्या अधिवेशनाने आपल्या कुठल्याच ठरावात समाविष्ट केल्या नव्हत्या. परंतु, गेल्या वीस वर्षांत काही मुसलमान पुढाऱ्यांनी केलेल्या वक्तव्यामुळे वायव्येकडील मुसलमान अफगाणिस्तानशी संगनमत करीत असल्याची भीति ज्या अनेक हिंदू व शीखांनी बोलून दाखविली होती ते या भाषणाने थक्क झाले, आणि आपली भीति निराधार नव्हती असे कुजबुजु लागले. लंडनमध्ये आलेल्या मुस्लिम प्रतिनिधीवर या सूचनांचा काहीच परिणाम उमटलेला दिसला नाही. परंतु, या प्रतिनिधींभोंवती जमलेल्या मुसलमानांच्या भावना मात्र त्यांनी ढवळून काढल्या. या मुसलमानांनी शिष्टमंडळाला अशी विनंती केली की, गोलमेज परिषदेला करावयाच्या मुस्लिम मागण्या इक्बालच्या भाषणावर आधारलेल्या असाव्यात. परिषदेच्या प्रतिनिधींचे लक्ष वेधण्यास ते असमर्थ ठरल्यामुळे त्यांनी स्वतःच आपली एक कमिटी बनवली आणि त्या कल्पनेचा प्रसार करण्यास सुरुवात केली.

या प्रचाराकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून हिंदूंच्या संयुक्त मतदार संघाच्या आग्रहाशी मिळते जुळते घेण्यासाठी मुस्लिम शिष्टमंडळ एक दोन पायऱ्या खाली उतरले आणि महमद शफींनी पुढील सूचना मांडल्या : (१) हिंदू आणि मुसलमान या दोनही जमातींसाठी कायदेमंडळात राखीव जागा असाव्यात; (२) कुठल्याही उमेदवाराला (अ) आपल्या जातीच्या मतदारांनी केलेल्या मतदानाच्या किमान ४० टक्के मते मिळाल्याशिवाय, आणि (ब) ज्या ठिकाणी तो दहा किंवा त्याहून कमी टक्क्यांच्या अल्पमतात असेल त्या ठिकाणी, इतर जमातींच्या मतदानापैकी ५ टक्के मते त्याला

मिळाल्याशिवाय आणि ज्या ठिकाणी तो याहून मोठ्या अल्पसंख्य किंवा बहुसंख्य जमातीत असेल त्या ठिकाणी १० टक्के मते मिळाल्याशिवाय तो निवडून आला असे जाहीर करू नये. अशा योजनांमुळे तीन गोष्टी साध्य होतील असे शफी म्हणाले : पहिली म्हणजे 'प्रत्येक जमातीला दोनही जमातींकडे मते मिळविण्याकरिता याचना करावी लागेल; दुसरे असे की, स्वतःच्या जमातीच्या रास्त टक्केवारीचे प्रतिनिधित्व मिळवल्याशिवाय कुणालाही आपल्या जमातीच्या प्रतिनिधित्वावर हक्क सांगता येणार नाही. आणि तिसरे म्हणजे कुठलाही उमेदवार इतर जमातींचा नावडता असेल तर त्याला जरी त्याच्या स्वतःच्या जातीने मान्यता दिली असली तरी तो निवडणूक जिंकू शकणार नाही.'

१४ जानेवारी १९३१ ला शफींनी दुसरी एक योजना काढली आणि ती अल्पसंख्य उपसमितीला पुढील शब्दात सुपूर्द केली : 'ही योजना मी आपल्यापुढे अधिकृतरित्या मांडत आहे. पंजाबमध्ये कायदेमंडळाच्या एकंदर जागांच्या ४९ टक्के जागा मुसलमानांना जातीय मतदार संघातून मिळाव्यात. आणि जे खास मतदार संघ निर्माण करण्याची योजना पुढे आली आहे त्या मतदार संघातून उभे रहाण्याची त्यांना मुभा असावी. बंगालच्याबाबतीत, कायदेमंडळाच्या एकंदर जागांच्या ४६ टक्के जागा मुसलमानांना जातीय मतदार संघातून मिळाव्यात. आणि त्या प्रांतात जे खास मतदार संघ निर्माण करण्याची योजना पुढे आली आहे त्या मतदार संघातून उभे राहण्याची त्यांना मुभा असावी. मुसलमान अल्पसंख्य प्रांतांच्या बाबतीत विभक्त मतदार संघामुळे मुसलमानांना मिळणारे जादा प्रतिनिधित्व त्यांना तसेच मिळावे. आणि तसेच जादा प्रतिनिधित्व आमच्या हिंदू बांधवांना सिंधमध्ये आणि हिंदू व शीख बंधूना वायव्य सरहद्द प्रांतात उपभोगावयास मिळावे. हे मान्य झाल्यानंतर केव्हाही आणि कुठल्याही प्रांतिक किंवा मध्यवर्ती कायदेमंडळातील कुठल्याही जमातीच्या प्रतिनिधींनी दोन तृतियांश मतांनी, जातीय मतदार संघ सोडून संयुक्त मतदार संघाची मागणी केल्यास ती पद्धती अमलात आणावी.'

शफी योजना ही केवळ हिंदूमहासभेच्या शिष्टमंडळाच्या भूमिकेहून भिन्न होती असे नव्हे तर ती काँग्रेसने केलेल्या सूचनाहूनही फार निराळी होती. हिंदूमहासभा शिष्टमंडळ नेहरू रिपोर्टात तरतूद केलेल्या निवडणुकपद्धतीपासून एक तसूभरही ढळण्यास तयार नव्हते. १९३० मध्ये काँग्रेस कार्यकारिणीने नव्या सूचना तयार केल्या होत्या. त्या सूचना काँग्रेसचे प्रमुख प्रतिनिधी गांधी यांनी दुसऱ्या गोलमेज परिषदेच्यावेळी सर्वांना वाटल्या होत्या. त्यात, वयात आलेल्या स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार, संयुक्त मतदार संघ, पुढीलप्रमाणे राखीव जागा, हिंदूंना सिंधमध्ये, मुसलमानांना आसाममध्ये शिखांना पंजाब व वायव्य सरहद्द प्रांतात आणि ज्या ज्या ठिकाणी हिंदू आणि मुसलमान जमाती एकदर लोकसंख्येच्या २५ टक्क्याहून कमी असतील त्या त्या ठिकाणी; आणि 'सिंधमधील लोक विभक्त प्रांताचा आर्थिक भार

स्वतः उचलण्यास तयार झाल्यास' सिंधचा वेगळा प्रांत; अशा तरतुदी होत्या.

काँग्रेस कार्यकारिणीने मुसलमानांच्या काही मागण्या तडकाफडकी कबूल केल्या होत्या : तिने, 'देशाच्या सार्वजनिक नोकऱ्यात सर्व जातींना योग्य तो हिस्सा, समान संधी'च्या तत्त्वावर मिळण्यासाठी आणि या नोकऱ्यांच्या नेमणुकांसाठी 'कार्यक्षमतेला योग्य ते महत्त्व देऊन किमान लायकीचे निकष सुचवण्याचे' मान्य केले. तिने असेही म्हटले होते की, मध्यवर्ती आणि प्रांतिक मंत्रीमंडळात, 'अल्पसंख्य जमातींचे हितसंबंध परंपरेला धरून मान्य केले पाहिजेत.'

परंतु, काँग्रेस योजनेमधून 'वयात आलेल्यांना मताधिकार' असलेली तरतूद जर काढून टाकली तर तिचा महत्त्वाचा भागच कोसळून पडतो. मर्यादित मताधिकाराखाली काँग्रेसनेही दुसरा पर्याय सुचवला नव्हता आणि हिंदुमहासभेनेही सुचवला नव्हता. येथेच या दोन संघटनांची चूक आणि मुसलमानांचा शहाणपणा होता. वयात आलेल्यांना मताधिकार मिळणार असे धरून चालल्याने किंवा तो नाकारला जाण्याची शक्यता असली तरी त्यामुळे हिंदू प्रतिनिधींच्या स्थानामध्ये त्यांना घातक असा फरक पडणार नव्हता, पण मुसलमानांना आपल्या प्रतिनिधित्त्वाबद्दल ती भीति वाटत होती; (१९१९ च्या कायद्यानुसार मिळालेल्या मर्यादित मताधिकारामुळे एकंदर लोकसंख्येच्या ज्या फक्त ४ टक्के लोकांना मतदानाचा अधिकार मिळाला. त्यात मुसलमान बहुसंख्य विभागातही मुसलमानी मतदार हिंदूंपेक्षा कमी होते.) खरे बोचणारे काटे पंजाब आणि बंगाल हे होते हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. परंतु काँग्रेसच्या नव्या योजनेने हे काटे काढून टाकण्याऐवजी त्यांना बगल देण्याचे प्रयत्न केले.

गोलमेज परिषदेच्यावेळी 'मुस्लिम प्रतिनिधींना याहून अधिक व्यवहार्य पर्याय मान्य होईल किंवा काय याबद्दल काँग्रेस आणि हिंदूमहासभा या दोघांनाही खात्री वाटत नव्हती आणि वाटणे शक्यही नव्हते. संयुक्त मतदार संघाच्या तत्त्वावर वाटाघाटी करण्यास तयार असलेले जीना, हे एकुलते एक प्रतिनिधी मुस्लिम शिष्टमंडळात होते; विभक्त मतदार संघ राखण्याबद्दल इतर सर्वांचे एकमत होते. ८ ऑगस्ट १९३१ रोजी अलाहाबाद येथे भरलेल्या संयुक्त प्रांत मुस्लिम अधिवेशनातील जीनांच्या भाषणातील उताऱ्यावरून त्यांचे विचार कोणत्या दिशेने वहात होते हे आपल्याला स्पष्टपणे दिसून येईल. ते म्हणाले :

मला सर्वात महत्त्वाचा वाटणारा प्रश्न म्हणजे हिंदू मुस्लिम तडजोड—त्याबद्दल मी एवढेच म्हणू शकतो की, पंजाब आणि बंगालमध्ये हिंदूंनी मुसलमानांचे बहुसंख्यत्व कबूल करावे. असे केल्याने हिंदू मुसलमान तडजोड होण्यास काहीच वेळ लागणार नाही असा मला विश्वास वाटतो.

दुसरा प्रश्न विभक्त विरूद्ध संयुक्त मतदार संघाचा. पंजाब आणि बंगालमध्ये आमचे बहुसंख्यत्व कबूल केल्यास मला संयुक्त मतदारसंघाचे तत्त्व मान्य आहे हे तुम्हा बहुतेक जणांना ठाऊक आहेच (टाळया). परंतु बऱ्याच मुसलमानांना—

मला वाटते बहुसंख्य मुसलमानांना—विभक्त मतदार संघ हवे आहेत. माझी भूमिका अशी आहे की, जेव्हा आपण आपली नवी घटना कार्यवाहीत आणू आणि जेव्हा हिंदू आणि मुसलमान या दोघांच्याही मनातून एकमेकांबद्दलचा अविश्वास, संशय आणि भीति नाहीशी होईल आणि आपल्याला आपले स्वातंत्र्य मिळेल तेव्हा, त्याप्रसंगी आपण कसोटीस उतरू आणि आपल्यापैकी पुष्कळांना वाटते त्यापेक्षाही थोड्या अवधीत विभक्त मतदार संघ बहुतेक रद्द होतील या आशेवर मी आता विभक्त मतदार संघ स्वीकारण्यास तयार आहे.

ब्रिटिश राजवट संपुष्टात आली म्हणजे हिंदू मुसलमानांचा संशय नाहीसा होईल असे गांधींनाही वाटत होते. ३० नोव्हेंबर १९३१ ला गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनातील आपल्या भाषणात ते म्हणाले होते :

जोपर्यंत परदेशी सत्तेची पाचर घट्ट बसली आहे तोपर्यंत जाती जातीत आणि वर्गावर्गात दुही माजणारच. जोपर्यंत या जाती बांधवात सजीव स्नेहसंबंध असणार नाहीत आणि तोपर्यंतचे त्यांच्या प्रश्नाचे उत्तर हे खरेखुरे प्रभावी उत्तर असणार नाही. खरे म्हणजे ते जास्तीत जास्त चांगले असे एक कागदोपत्री उत्तर ठरेल. पण तुम्ही ती पाचर काढून घेतल्याबरोबर कौटुंबिक लागेबांधे, घरगुती जिव्हाळा समान उगमाची जाणीव—याचा काहीच उपयोग होणार नाही अशी तुमची कल्पना आहे काय? जेव्हा येथे ब्रिटिश सत्ता नव्हती आणि इंग्लिश चेहरा येथे दिसत, नव्हता तेव्हा हिंदू मुसलमान आणि शीख एकमेकांशी लढतच होते काय? त्यावेळी-सुद्धा आम्ही थोड्याफार शांततेने रहात होतो असे दाखविणारी हिंदू आणि मुसलमान इतिहासकारांची प्रकरणेच्या प्रकरणे आमच्या जवळ आहेत. आणि आजसुद्धा खेड्यातील हिंदू मुसलमान भांडत नाहीत. हे भांडण ब्रिटिशांच्या आगमनाबरोबर सुरू झाले. ग्रेट ब्रिटन व हिंदुस्तान यांच्यामधील हे दुर्दैवी, कृत्रिम आणि अनैसर्गिक संबंध नैसर्गिक झाले. ब्रिटिश आणि भारतीय यांच्यामधील संबंधांना, ते कोणाच्याही इच्छेने हवे तेव्हा तोडून टाकता येतील अशा तऱ्हेचे स्वरुप आले, अशी परिस्थिती जर निर्माण झालीच आणि ती होईल तेव्हा, हिंदू, मुसलमान, शीख, युरोपियन अँग्लो इंडियन, ख्रिश्चन, अस्पृश्य हे एकात्म भावनेने एकत्र रहातील.

'जीनांना दूर ठेवण्याचा प्रयत्न करा अशा व्हाइसरॉयना लंडनमधून दिल्या गेलेल्या पूर्वोक्त सूचनांच्या संदर्भात आणि ज्यांच्यामुळे मुसलमानांतील सायमन पक्षपाती शक्तीचे रुपांतर विभक्त मतदार संघाला कोणत्याही परिस्थितीत चिकटून रहाणाऱ्या प्रभावी संघटनेत झाले. त्या घडामोडींच्या संदर्भात, ही निवेदने जर अभ्यासिली गेली तर असे आढळून येईल की, ती केवळ ब्रिटिशांच्या आत्यंतिक निषेधाचा आविष्कार म्हणून फेकून देता येणार नाहीत. सर्व गोलमेज परिषद्रांचे प्रतिनिधी व्हाइसरॉयने निवडलेले होते. पहिल्या परिषदेत एकुलत्या एक अजातीय राष्ट्रवादी राजकीय कॉंग्रेसला प्रतिनिधित्व नव्हते. त्यामुळे निरनिराळी शिष्टमंडळे

आणि तो निवडण्याच्या पद्धती, यावरून राष्ट्रवादाला जातीय वादाहून कमी लेखले गेले होते यात तिळमात्र संशय उरला नव्हता. दुसऱ्या परिषदेत काँग्रेसला प्रतिनिधित्व दिले गेले होते, परंतु व्हाइसरॉयने तिचे अवमूल्यन केले होते. कारण , मुसलमान प्रतिनिधी मुसलमान संस्थेतूनच निवडले जातील या भूमिकेवरून तिला आपल्या प्रतिनिधीत मुसलमानांचा सर्व पक्ष परिषदेचे अध्यक्ष डॉ. अन्सारी यांचा समावेश करण्यास परवानगी दिली नव्हती. काँग्रेसच्या नोंदलेल्या सभासदात अनेक मुसलमान असूनसुद्धा, आणि काही अतिशय सुशिक्षित मुसलमान तिचे पुढारी असूनसुद्धा असे केले गेले होते; तिला मुसलमान व्यतिरिक्तच (हिंदू) प्रतिनिधी पाठवण्याची परवानगी देऊन तिला जातीय संस्थांच्या जोडीला आणून बसवले होते; आणि तरीसुद्धा हिंदूंचे प्रतिनिधित्व तिने करावे अशी अपेक्षा नव्हतीच कारण ते कार्य हिंदूमहासभेकडे दिले गेले होते. म्हणून व्हाइसरॉयने नेमलेले हिंदू आणि शीख प्रतिनिधी तडजोडीच्या बाटाघाटी करण्याच्या मनःस्थितीत नव्हते; त्यांनी परिषदेत आग्रही वृत्ती दाखविली; एकटे जीना सोडले तर मुस्लिम जातीयवादी प्रतिनिधी तडजोडीकरिता धडपडत असल्याचे दृश्य वर वर दिसून येत असले तरी राष्ट्रवादाच्या विकासासाठी कुठल्यातरी प्रकारच्या संयुक्त मतदार संघाचा प्रयत्न करावा या काँग्रेसच्या दृष्टिकोनाचे महत्त्व जाणण्याचे त्यांनी नाकारले. आणि वादविवादाच्या फडात उतरलेले हे सर्व जातीय-वादी प्रतिनिधी, आपापल्या मतभेदांचे प्रदर्शन मांडत असल्याचे आणि या प्रतिस्पर्धी जमातीमध्ये मध्यस्थी करण्यास ब्रिटिश अधिकाऱ्यांची किती आवश्यकता आहे हे दाखवून देत असल्याचे दृश्य जगाला दिसून आले. आणि खरोखरच दहा वर्षे ज्या प्रश्नावर हिंदू, मुसलमान, शीख आणि इतर घसाफोडीने वक्तृत्व करीत होते तो प्रश्न शेवटी ब्रिटिश मध्यस्थीनेच सोडवला गेला. ही मध्यस्थी सुचवणारे पहिले गृहस्थ महमद शफी हे होते. २६ नोव्हेंबर १९३१ रोजी त्यांनी परिषदेच्या संघराज्य रचना समितीपुढे केलेल्या भाषणात म्हटले होते :

चॅन्सलर महाशय, आपण जी घटना योजली आहे त्या घटनेत मुसलमान आणि इतर अल्पसंख्यकांना संरक्षण असेल असे गृहीत धरले तर माझा हुजुर सरकारला असा सल्ला आहे की, 'आगे बढो' ...... आणि मी त्यांना असे सांगेन की, जो निर्णय, हुजुरांच्या ८ कोटी मुसलमान प्रजाजनांना भावी हिंदुस्तानात त्यांचे हक्काचे स्थान देईल, आणि जो निर्णय इतर अल्पसंख्याकांनाही त्यांचे हक्काचे, स्थान देईल असा न्यायपूर्ण निर्णय द्या.

प्रकरण सत्ताविसावे

# ब्रिटीश पंतप्रधानांचा जातीय निवाडा

गोलमेज परिषदेचे दुसरे अधिवेशन संपताना ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनॉल्ड यांनी आपल्या सरकारचा निर्णय जाहीर केला. ते म्हणाले की, 'जो जातीय प्रश्न सोडवण्यास परिषद असमर्थ ठरली तो जातीय प्रश्न सोडवण्यास सर्व पक्षांना मान्य होईल अशी तडजोड घडवून आणण्यास हिंदुस्तानातील जमाती जर असमर्थ ठरल्या तर खुद्द सरकारच एक तात्पुरती योजना शोधून काढील आणि ती हिंदुस्तानला लागू करील. ही घोषणा त्यांनी १ डिसेंबर १९३१ ला केली. आणि ४ ऑगस्ट १९३२ ला जातीय निवाडा म्हणून ओळखली जाणारी एक योजना प्रत्यक्षपणे जाहीर केली. या निवाड्याने फक्त मुसलमानांनाच जातीय मतदार संघ दिले होते असे नव्हे तर ते शीख, हिंदी ख्रिश्चन आणि युरोपियन यांनाही दिले होते. त्यामुळे प्रत्येक प्रांतात मुसलमानांना राखीव जागा मिळाल्या आणि ज्या प्रांतात ते अल्पसंख्य होते तेथे त्यांना जादा जागा मिळाल्या; हिंदूंना वायव्य सरहद्द प्रांतात व सिंधमध्ये जादा प्रतिनिधित्व मिळाले. परंतु निवाड्यामधील पंजाब व बंगालसंबंधीच्या भागाबद्दल मुसलमानही समाधानी नव्हते आणि हिंदूही संतुष्ट नव्हते. या दोन प्रांतांच्या कायदेमंडळात, निवाड्याने त्यांना दिलेले प्रतिनिधित्व, त्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात मिळणाऱ्या प्रतिनिधित्वापेक्षा कमी होते. पंजाबमध्ये मुसलमानांची लोकसंख्या ५५ टक्के होती तरी त्यांना ४९ टक्के जागा दिल्या गेल्या होत्या; तेथे हिंदूंचाही फारसा फायदा झाला नव्हता; कारण शिखांना जादा प्रतिनिधित्व देण्यासाठी आणि इतर हितसंबंधीयांची तरतूद करण्यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणातील त्यांची रास्त टक्केवारी कमी करण्यात आली होती. बंगालमधील परिस्थिती तर याहूनही वाईट होती. ५४.८ टक्के लोकसंख्या असलेल्या मुसलमानांना ४७.५ टक्के जागा दिल्या होत्या, आणि ४४.८ टक्के लोकसंख्या असलेल्या हिंदूंना ३२ टक्के जागा दिल्या होत्या. मग बंगालच्या हिंदू आणि मुसलमानांच्या या अधिक जागा कुणाच्या खिशात गेल्या होत्या? निवाड्याने युरोपियनांना जादा प्रतिनिधित्व बहाल केले होते. ते एकंदर लोकसंख्येच्या फक्त .०१ टक्के होते पण त्यांना जागा मात्र १० टक्के दिल्या गेल्या होत्या.

१९१९ च्या कायद्यापेक्षा जातीय निवाड्याने मुसलमानांच्या प्रतिनिधित्वात पुष्कळच सुधारणा केली होती, परंतु पंजाब व बंगाल या दोन वादग्रस्त प्रांतात त्यांना स्पष्ट

बहुमत मिळाले नाही. या गोष्टीबद्दल असमाधान व्यक्त करणारी पहिली संस्था मुस्लिम परिषद ही होती. तिने म्हटले होते की, पंजाब आणि बंगालमध्ये सनदशीर बहुमत मिळणे, याशिवाय दुसऱ्या कशानेच मुसलमानांचे समाधान होणार नाही निवाड्याने एकादी पर्यायी तडजोड मान्य करण्याचे स्वातंत्र्य सर्व जमातींना दिले होते आणि ही तडजोड जर एकमताने मंजूर झाली तर निवाड्यात तिचा समावेश केला जाणार होता. म्हणून पुन्हा एकदा हिंदू आणि मुसलमानांनी जागांची अधिक चांगली वाटणी करण्याचा विचार केला. संयुक्त परिषद भरवण्यात आली आणि त्यासाठी हिंदू महासभा, शीख लीग, मुस्लिम लीग, मुस्लिम परिषद, काही ख्रिश्चन संघटना यांचे प्रतिनिधी आणि इतर काही लोकांना निमंत्रणे पाठवली गेली. परिषदेला ६३ हिंदू, ३९ मुसलमान, ११ शीख आणि ८ हिंदी ख्रिश्चन हजर होते. त्यांच्या बऱ्याच बैठका होऊन त्यांनी एक प्रयोगात्मक निवाडा तयार केला. त्यात मुसलमानांना पंजाब व बंगाल कायदेमंडळात ५१ टक्के प्रतिनिधित्व आणि मध्यवर्ती कायदेमंडळात ३२ टक्के प्रतिनिधित्व मान्य केले होते. कुठल्याही उमेदवाराला आपल्या जातीच्या एकंदर मतदानाच्या ३० टक्के मते मिळाल्याशिवाय तो विजयी झाला असे जाहीर करू नये, आणि असे न झाल्यास ज्या उमेदवाराला आपल्या स्वतःच्या जातीतून सर्वात अधिक मते मिळाली असतील तो उमेदवार विजयी ठरावा या अटीवर संयुक्त मतदार संघ मान्य करण्यात आले होते. सिंध आणि वायव्य सरहद्द प्रांतातील हिंदुंना काही सवलती कबूल केल्या होत्या. बंगाल प्रांतावरील तडजोड मात्र युरोपियनांनी आपले जादा प्रतिनिधित्व कमी करण्यावर अवलंबून होती. म्हणून परिषदेने कलकत्ता येथील युरोपियन जमातीला भेटण्यासाठी एक समिती नेमली.

परंतु, संयुक्त परिषदेचे अधिवेशन चालू असतानाच, तारीख २४ डिसेंबर १९३२ या दिवशी हिंदुस्तानचे सेक्रेटरी ऑफ स्टेट सर सॅम्युअल होअर यांनी तिसऱ्या गोलमेज परिषदेत ब्रिटिश सरकारने घेतलेला निर्णय जाहीर केला. या निर्णयाने मध्यवर्ती कायदेमंडळातील ब्रिटिश हिंदी जागांच्या ३३$\frac{1}{3}$ टक्के जागा मुसलमानांना दिल्या होत्या आणि नव्या सिंध प्रांताला मध्यवर्ती जमीन महसुलातून पुरेशी आर्थिक मदत दिली होती. या निर्णयाने, संयुक्त परिषदेत एकमताने मिळालेल्या गोष्टीपेक्षा कितीतरी अधिक गोष्टी मुसलमानांना देऊ केल्या होत्या. परिषदेच्या सूचनावर, मुस्लिम परिषद आणि इतर काही मुस्लिम संघटना, ख्रिसमसमध्ये विचार करणार होत्या; परंतु सेक्रेटरी ऑफ स्टेटने जाहीर केलेल्या निर्णयाने, सर्व जातीमध्ये निर्माण झालेल्या समजूतदारपणाच्या वृत्तीला बाध येणे अपरिहार्य होते, आणि जेव्हा या संघटना एकत्र जमल्या, तेव्हा त्यांनी संयुक्त परिषदेच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून नव्या मागण्या पुढे ठेवल्या. संयुक्त परिषद बारगळली, आणि जातीय निवाडा हाच शेवटी कायदेमंडळातील हिंदू मुसलमानांच्या प्रतिनिधित्वाच्या तडजोडीचा तोडगा ठरला.

खरं म्हणजे, संयुक्त परिषदेने केलेल्या सूचनांना आपापसात अजूनही तीव्र मतभेद असलेल्या मुसलमानांच्या संघटना मान्यता देतील अशी शक्यता फारच कमी होती. मुस्लिम लीगमध्येसुद्धा दोन गट पडले होते. एक निवाडा बिनशर्त मान्य करणारा आणि दुसरा त्याबद्दल साशंक असणारा. दुसरा गट ३१ ऑक्टोबर १९३३ रोजी हावडा येथे एकत्र जमला आणि त्यांनी स्वतःच्या सभेला मुस्लिम लीगची सभा मानून जातीय निवाड्याला सशर्त समती देण्याचा ठराव संमत केला. यानंतर २५ दिवसांनी पहिल्या गटानेही स्वतःला तसेच समजून दिल्लीला सभा घेतली आणि जातीय निवाड्याला मान्यता देऊन मंत्रीमंडळात आणि सरकारी नोकऱ्यात मुसलमानांकरिता पुरेशा प्रतिनिधित्वाची मागणी केली. दरम्यान इंग्लंडमध्ये दोन वर्षे राहिलेले जीना हिंदुस्तानात परत आले. या दोनही गटांनी त्यांचे नेतृत्व मान्य केले आणि पुन्हा संयुक्त लीग स्थापन केली. ७ जुलै १९३४ रोजी, हिंदुस्तानच्या सेक्रेटरी ऑफ स्टेटने, सार्वजनिक नोकऱ्यातील मुसलमानांचा हिस्सा २५ टक्के ठरवल्याचे जाहीर केले. ही टक्केवारी प्रमाणात होती. परंतु, आपल्याला मध्यवर्ती कायदेमंडळातील आपल्या प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाप्रमाणे म्हणजे एकंदर नेमणुकांच्या एक तृतियांश जागा मिळाल्या पाहिजेत अशी मागणी अखिल भारतीय मुस्लिम परिषदेने केली आणि या निर्णयाविरूद्ध निषेध व्यक्त केला.

जातीय मतदार संघाचे कट्टे पुरस्कर्ते असलेल्यांचा कल संयुक्त मतदार संघाकडे वळत असताना आणि अशा संयुक्त मतदार संघाला संयुक्त परिषदेची मान्यता असूनसुद्धा, हिंदुस्तानात एक राष्ट्रीयत्वाचा विकास होणे अशक्य आहे तेव्हा निरनिराळ्या जमातींच्या परस्पर विरोधी हितसंबंधात मध्यस्थी करण्यासाठी ब्रिटिश सत्तेची आवश्यकता आहे या विचाराला ब्रिटिश राज्यकर्ते चिकटून राहिले. हा विचार जॉईंट पार्लमेंटरी कमिटीच्या वृत्तांतात, (सेशन १९३३–३४ Vol. I part I) स्पष्टपणे मांडला आहे. त्यात म्हटले आहे : 'हिंदुस्तानात ...... आपण समजतो तसे पक्ष नाहीत आणि जिचे प्रवाही असे वर्णन करता येईल अशी राजकीय विचारांची लक्षात घेण्याजोगी संघटना नाही. त्याऐवजी आपल्याला फक्त दोन धर्मांचेच नव्हे तर दोन संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या हिंदू आणि मुसलमानांच्या फार पुरातन शत्रुत्वाला तोंड द्यावयाचे आहे. त्याचप्रमाणे, ताठर जातीय भेदाबरोबर लोकसत्ताक तत्त्वांशी विसंगत असणाऱ्या स्वतःच्या भवितव्याच्या काळजीत चूर असणाऱ्या आणि एकमेकाबद्दल आणि बहुसंख्य जमातीबद्दल अतीव साशंकता बाळगणाऱ्या अनेक स्वयंपूर्ण व स्वतंत्र अल्पसंख्यकांनाही आपल्याला तोंड द्यावयाचे आहे. अशा परिस्थितीत जातीय प्रतिनिधित्व तूर्त अटळ आहे हे मान्य करावेच लागेल.'

ब्रिटिश सत्ता चालू ठेवण्याचे समर्थन करताना कमिटी पुढे म्हणते : 'या परस्परविरोधी हितसंबंधांचे समान मूल्यमापन करण्यास आणि ज्यांना स्वतःचे रक्षण करण्याची शक्ती किंवा पात्रता नाही अशांना संरक्षण देण्यास हिंदुस्तानात पुरेसे अधिकार धारण

करणारी सत्ता असणे आवश्यक आहे. ही सत्ता, गतकालात जितकी आवश्यक होती असे अनुभवाने सिद्ध झाले आहे, तितकी ती भविष्यकाळातही आवश्यक आहे. प्रांतिक स्वायत्ततेच्या नवीन पद्धतीखाली ही सत्ता राखीव असल्याप्रमाणे असावी लागेल. आणि ही सत्ता ज्यांच्याकडे सोपवली असेल त्यांना, जबाबदार मंत्री आणि कायदेमंडळे आपापली कर्तव्ये बजावताना कसूर करत असतील तर ताबडतोब आणि परिणामकारक पद्धतीने त्यात हस्तक्षेप करता आला पाहिजे. हा हस्तक्षेप करण्याचा अधिकार मुख्यतः प्रांतिक गव्हर्नरांना दिला गेला पाहिजे.' (सर्व गव्हर्नर इंग्लिश होते).

घटनात्मक सुधारणांच्या १८९२ ते १९३५ पर्यंतच्या दीर्घ काळात ब्रिटिश राज्यकर्ते मताधिकाराच्या विशिष्ट पद्धतीचा अवलंब करीत होते. कौन्सिलमध्ये मुसलमानांना बहुतेक मुळीच प्रतिनिधित्व न देणे आणि गव्हर्नर जनरल आणि गव्हर्नर यांना त्यांचे रक्षणकर्ते बनवणे ही त्यांची १८९२ ची मताधिकाराची पद्धत होती; १९०९ मध्ये अशाच प्रकारच्या विशिष्ट मताधिकाराच्या पद्धतीने हिंदू मुसलमानात निवडणूक पद्धतीविषयी मतभेद निर्माण झाले. पुन्हा १९१९ मध्ये मताधिकार मालमत्तेवर आधारल्यामुळे आणि दुसरे म्हणजे ब्रिटिशांशी एकनिष्ठ असणाऱ्यांना आणि त्यांच्या सत्तेत गुंतलेल्या हितसंबंधियांना जादा प्रतिनिधित्व दिले गेल्यामुळे मुसलमान प्रतिनिधित्वाला काट बसली. १९३५ मध्येसुद्धा, नवीन हिंदुस्तान सरकारच्या कायद्यामध्ये मताधिकार पद्धती हुकुमाच्या एक्क्यासारखी हिंदी सरकारकडे राखीव ठेवली गेली होती. विरोधी पक्षाच्यावतीने बिलावर बोलताना, मजूर पुढारी अॅटली यांनी बरोबर या उणिवेवर बोट ठेवले. ६ फेब्रुवारी १९३५ रोजी हाऊस ऑफ कॉमन्समध्ये बोलताना ते म्हणाले की, 'बिलामध्ये एक विलक्षण उणीव आहे आणि माननीय सद्‌गृहस्थ ती उणीव दुरुस्त करतील अशी मला आशा आहे. मतदार कोण होणार आहेत याबद्दल काहीही सांगण्याचे टाळले आहे. कौन्सिलमध्ये कायदा करून हे ठरवले जाईल असे सूचित केले आहे. एक वरिष्ठ गृहाची गोष्ट सोडली तर, हिंदुस्तानचे राज्यकर्ते कोण असतील हे न ठरवणारी राज्यपद्धती अंमलात आणणारे बील आणणे ही फारच विलक्षण गोष्ट आहे. महाशयांनी मताधिकाराचा उल्लेखच केलेला नाही. आणि आमच्यादृष्टीने तर तीच फार महत्त्वाची गोष्ट आहे.' अॅटली पुढे म्हणाले की, 'कायदेमंडळ हे स्थितिस्थापक, हितसंबंध प्रिय, जमीनदार, व्यापारी आणि अशाच इतर लोकांनी ठासून भरावयाचे आहे. बिलाकडे पाहिले म्हणजे शेवटी हिंदुस्तानवर श्रीमंत आणि विशेष हक्क असलेले लोक राज्य करणार असा ब्रिटिश सरकारचा निश्चित निर्णय आहे असेच कुणालाही म्हणावे लागेल.'

याच्यापूर्वी, तीनवर्षे बंगाल इलाख्याच्या मुस्लिम लीगने तारीख ३ एप्रिल १९३२ रोजी संयुक्त मतदार संघाच्या बाजूने आपले निवेदन तयार करताना अशाच प्रकारचे विचार प्रकट केले होते : 'बंगाल इलाख्याच्या मुस्लिम लीगचे असे मत आहे की, ज्या उद्देशाने जातीय मतदार संघ निर्माण केले गेले तो उद्देश साध्य करण्यात ब्रिटिश

अयशस्वी ठरले आहेत. आणि ते जातींच्या व देशाच्या हिताला अपायकारक आहेत असे सिद्ध झाले आहे. बंगाली मुसलमानांची गोष्ट त्यांच्या इतर प्रांतातील त्यांच्या धर्मबांधवांपेक्षा पूर्णपणे निराळी आहे. बंगालमध्ये मुस्लिम जातीची आणि तशीच एकंदर लोकसंख्येची कितीतरी मोठी म्हणजे सुमारे ८६ टक्के संख्या ही शेतकरी लोकांची आहे. या जमीन कसणाऱ्यांचे हित म्हणजेच जातीचे आणि देशाचे हित होय. लोकसंख्येच्या इतर वर्गापेक्षा या लोकांचे हितसंबंध निराळे असल्यामुळे, कायदेमंडळात त्यांना पुरेसे प्रतिनिधित्व देण्याची योग्य व्यवस्था झाल्याशिवाय त्यांचे हितसंबंध वाढवणे आणि त्यांचे संरक्षण करणे शक्य होणार नाही. खरं म्हणजे जातीय मतदार संघामुळे हिंदू आणि मुसलमान जनतेची आज जी फारकत झाली आहे तिने एक मतदार संघ आणि एक उद्दिष्ट पुढे ठेवल्याशिवाय तिची आर्थिक परिस्थिती सुधारणार नाही. कारस्थानी लोक स्वतःच्या स्वार्थासाठीच ज्यांचा उपयोग करून घेत आहेत अशा बंगाली जनतेला, विभक्त मतदार संघानी सामर्थ्यही दिले नाही की, संपन्नताही दिली नाही.'

याच आशयाचा ठराव २६ नोव्हेंबर १९३३ रोजी बंगाल लीगने केला.

परंतु, खुद्द 'कारस्थानी लोक' हे अपरिहार्यच बनले होते. लीटनच्या काळापासून जेव्हा हिंदुस्थानातील जमीनदार वर्गाला व्हाईसरॉयनी ब्रिटीश राज्यसत्तेचा भरभक्कम आधार बनवला होता, तेव्हापासून ब्रिटिश राज्यकर्त्यांनी देशातील सर्व कायदेमंडळात त्यांना खास प्रतिनिधित्व देण्याचे सुरू केले. अगदी पहिल्या काँग्रेसपासून आणि मुसलमानांची वहाबीवृत्ती मोडून काढावी म्हणून, मेयोच्या मुसलमान धार्जिण्या धोरणाचा पाठपुरावा करून, ब्रिटिश राज्यकर्ते मुसलमानांना काँग्रेसपासून दूर रहाण्यास उत्तेजन देत होते. सरकारी नोकऱ्यात मुसलमानांनी हिंदूंशी बरोबरी करण्यास सुरूवात केली त्यावेळेपासून या दोन जमातींच्या वरिष्ठ वर्गात हेवेदावे सुरू झाले. आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या संपन्न असलेल्या या दोन जमातींच्या लोकांनी आपापल्या जमातीचे पुढारीपण स्वतःच आपल्याकडे घेतले आणि आरडा ओरडा करून हिंदुस्तान दुभंगलेला आहे असे दृश्य जगापुढे उभे केले. ते स्वतःच पुढारी बनले होते. परंतु अधिकृत मिळालेल्या १० टक्के मताधिकाराच्या लोकांचे प्रतिनिधित्वसुद्धा ते करू शकले नव्हते हे १९३५ च्या कायद्यानुसार देशात झालेल्या पहिल्या मतदानाच्यावेळी दिसून आले. हिंदी जनता ही दोन जमातीत आणि संस्कृतीत विभागलेली नाही याची जाणीव या पुढाऱ्यांनी आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांनीसुद्धा बाहेरच्या जगाला होऊ दिली नाही. हे पुढारी आणि त्यांचा आवाज उठवणारे त्यांचे अनुयायी यांचे दर्शन कायदेमंडळाशी असलेल्या त्यांच्या संबंधामुळे त्यांना मिळालेली सामाजिक प्रतिष्ठा आणि नोकऱ्या यावर हक्क सांगणारे हिंदू आणि मुसलमान असे घडले. या पुढाऱ्यांच्या चिथावणीमुळेच काहीवेळा या दोन जमाती एकमेकावर उठल्या. यामुळेच काँग्रेसचा प्रौढ मतदानाचा आग्रह होता आणि म्हणूनच या मागणीत जातीयवादी पुढाऱ्यांना

फारसा रस नव्हता. अजून हिंदुस्तानात पाश्चिमात्य पद्धतीचे राजकीय पक्ष अस्तित्त्वात नाहीत या ब्रिटिशांच्या मुद्याला कॉंग्रेसने असे उत्तर दिले की, ज्या परिस्थितीत पक्षवाढ होईल अशी परिस्थिती निर्माण करण्यास ब्रिटिश मदत करीत नाहीत आणि म्हणून जोपर्यंत ते हिंदुस्तानात आहेत तोपर्यंत जातीय गट सोडल्यास इतर सर्व राजकीय पक्षांनी स्वातंत्र्याची चळवळ चालवण्याकरिता एका संघटनेखाली एकत्र आले पाहिजे.

प्रकरण अठ्ठाविसावे

# मुसलमानांचे प्रतिनिधी कोण ? काँग्रेस ?

सर्व पक्ष परिषदेने सुरू झालेल्या सात वर्षांच्या खडतर परिश्रमानंतर आणि कायदेमंडळाच्या जागांबद्दल झालेल्या कधीही न संपणाऱ्या भांडणानंतर आलेल्या हिंदुस्तान सरकारच्या कायद्याने काही काळ शांतता निर्माण केली. कायदेभंगाची चळवळ मागे घेण्यात आली होती; जातीय निवाडा रद्द करावा या महासभेच्या मागणीपुरतीच जातीय कटूता शिल्लक राहिली होती, आणि मुस्लिम लीग— जणू काय महासभेच्या मागणीला शह म्हणून—निवाडा चालू रहावा अशी मागणी करीत होती; दहशतवादी कृत्ये संपत चालली असल्याची चिन्हे दिसत होती. आणि तरीही या कायद्याचे कुठल्याही राजकीय पक्षाने चांगले स्वागत करून त्याच्यापुढे मान तुकवली नाही. काँग्रेसने त्याचे वर्णन स्वराज्याची छाया असे केले. कायद्याची किंमत काहीही असली तरी तो अंमलात आला होता आणि आगामी निवडणूका त्यानुसार होणार होत्या अर्थातच सर्व पक्ष त्या कामाला लागले होते. हिंदू व मुसलमान या दोन जमाती एकत्र येणे अशक्य आहे अशा गाजलेल्या युक्तिवादाला खोटे पाडणारे, दोनही जमातींचे सभासद असलेले नवे पक्ष उदयास आले. खुद्द मुस्लिम लीगही आता जातीयतेबद्दल फार क्वचित बोलत होती. आणि आपल्य निवडणूक जाहीरनाम्याचा आर्थिक विषयक विभाग तर तिने काँग्रेस पातळीवर आणला. काँग्रेस तर लीगकडे कधीच शत्रूत्वाने पहात नव्हती. परंतु जसजशी निवडणूक जवळ येत चालली तसतशी तिची लीगकडे पहाण्याची दृष्टी अधिकच सौम्य बनली. आणि या दोन संघटना एकमेकांशी संघर्ष करणार नाहीत अशी हवा तिने पसरू दिली. संयुक्त प्रांतात तर लीग आणि काँग्रेस यांनी निवडणूक मोहिमेत परस्पर मदतीचा उघड समझोता केला.

लीग निवडणूक लढवणार याची औपचारिक घोषणा तिने हिंदुस्तान सरकार कायद्याच्या नापसंतीचा प्रस्ताव जोडून केली. मुंबई येथे ११ एप्रिल १९३५ रोजी भरलेल्या आपल्या वार्षिक अधिवेशनात तिने संमत केलेल्या एका ठरावात असे म्हटले की : '१९३५ च्या हिंदुस्तान सरकार कायद्यात समाविष्ट असलेली घटना, हिंदी जनतेच्या इच्छेविरुद्ध आणि देशातील अनेक संघटनांनी तिच्याबद्दल पुन्हा पुन्हा नापसंती आणि विरोध दर्शवला असूनसुद्धा, तिच्यावर लादण्याला आमचा सक्त विरोध आहे हे अखिल भारतीय मुस्लिम लीग नमूद करीत आहे. तरीसुद्धा, देशातील चालू

परिस्थिती ध्यानात घेऊन लीग असा निर्णय घेत आहे की, घटनेच्या प्रांतिक योजनेमध्ये जरी सरकार आणि राज्यकारभार यावर लोकप्रातिनिधिक मंत्रिमंडळ आणि कायदेमंडळ यांचे खरेखुरे नियंत्रण अशक्य करणारे अनेक आक्षेपार्ह भाग असले तरीसुद्धा तिची जी काय योग्यता असेल तेवढ्यापुरती ती अंमलात आणावी.'

त्याच अधिवेशनात, लीगने एक कायदेमंडळ समिती स्थापन केली, जीनांना तिचे कायमचे अध्यक्ष केले आणि त्यांना समितीवर ३५ सभासद नेमण्याचा अधिकार दिला. या समितीने तयार केलेल्या निवडणूक जाहीरनाम्यातील काही महत्वाचे उतारे पुढीलप्रमाणे आहेत :

> निरनिराळ्या कायदेमंडळातील आमच्या प्रतिनिधींनी ज्या प्रमुख तत्वांवर कार्य करावे अशी आमची अपेक्षा आहे ती तत्वे अशी; (१) हल्लींची प्रांतिक घटना आणि सुचवलेली मध्यवर्ती घटना यांच्याऐवजी ताबडतोब लोकसत्ताक स्वराज्य आणावे; (२) आणि ते येईपर्यंतच्या काळात, निरनिराळ्या कायदेमंडळातील मुस्लिम लीगचे प्रतिनिधी कायदेमंडळांचा उपयोग, राष्ट्रीय जीवनाच्या विविध क्षेत्रातील लोकांच्या उन्नतिकरिता घटनेचा पुरेपूर फायदा उठवण्यासाठी करून घेतील. याचा उपसिद्धांत म्हणून जोपर्यंत विभक्त मतदार संघ अस्तित्वात आहेत तोपर्यंत मुस्लिम लीग पक्ष अस्तित्वात राहिलाच पाहिजे, परंतु तो ज्या गटाचे किंवा गटांचे ध्येय व धोरण बहुतेक लीग पक्षाच्या ध्येय धोरणासारखेच असेल अशा अशा कुठल्याही गटाशी किंवा गटांशी मोकळेपणाने सहकार्य करील.

आगामी निवडणूक कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील :—

> मुसलमानांच्या धार्मिक हक्कांचे संरक्षण करणे आणि तत्संबंधीच्या शुद्ध धार्मिक स्वरूपाच्या बाबतीत जमियत-उल-उलेमा आणि मुजाहिदांना ·योग्य महत्व देणे; सर्व दडपशाही कायदे रद्द करण्यासाठी प्रयत्न करणे; हिंदुस्तानच्या हितसंबंधांना अपायकारक, लोकांच्या मूलभूत स्वातंत्र्यावर गदा घालणाऱ्या आणि देशाच्या आर्थिक शोषणाला कारणीभूत होणाऱ्या सर्व योजना झिडकारणे; प्रांतिक व मध्यवर्ती कारभाराच्या यंत्रणेवरील खर्चाचा जडबोजा कमी करणे आणि राष्ट्र विकासाच्या योजनांना भरपूर द्रव्य सहाय्य मंजूर करणे; हिंदी सैन्याचे राष्ट्रीयकरण करणे आणि त्यावरील खर्च कमी करणे; ग्रामीण उद्योगांसकट सर्व उद्योगधंद्यांच्या प्रगतिला उत्तेजन देणे; मुसलमानांची सर्वसाधारण परिस्थिती सुधारण्याकरिता उपाय शोधणे आणि त्यांचे नियमन करणे.

मुसलमानांच्यावतीने बोलण्याचा आपला अधिकार गेल्या ३० वर्षे आहे असा दावा लीगने केला. आणि या काळात तिला मृतप्राय करणारे अनेक मोठमोठे अर्धांगवायूचे झटके आले असले तरी ती परत सावरली होती. मुंबई अधिवेशनच्या आदल्या दिवसापर्यंत ती आपल्या शेवटच्या झटक्यातून पार पडली नव्हती. तिने जातीयवादावर आपले लक्ष केंद्रित केले नसते तर तिचा हिंदी राजकारणातील प्रवेश व अस्तित्व

उपेक्षणीयच राहिले असते. आणि एवढा ३० वर्षांचा प्रवास नजरेखालून घातल्यानंतर मुसलमानांचे प्रतिनिधित्व करण्याचा दावा जर कुठला पक्ष करू शकत असेल तर तो मुस्लिम लीग पक्ष आहे, असे म्हणणे अपरिहार्य होते हे कुणाच्याही ध्यानात येईल. आपल्या साऱ्या निधर्मी धोरणानेसुद्धा काँग्रेसला हा अधिकार कधी प्राप्त झाला नाही. १९३६ मध्ये अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या एकंदर १४३ सभासदांपैकी फक्त ६ मुसलमान होते. त्यांपैकी ३ वायव्य सरहद्द प्रांताचे, १ संयुक्त प्रांताचा आणि १ बिहारचा होता. सहाव्वे सभासद हे काँग्रेसचे माजी अध्यक्ष म्हणून कमिटीत बसलेले अबुल कलम आझाद हे होते. मुसलमानातील आपल्या या स्थानाची काँग्रेसला जाणीव होती आणि तिने प्रांतिक कायदेमंडळाच्या एकंदर ४८२ मुस्लिम जागांपैकी फक्त ५८ जागाच लढवण्याचे ठरवले. लीग आणि काँग्रेसच्या अनेक पुढाऱ्यांना असे वाटत होते की, सरकारी सदिच्छा आणि आश्रय उपभोगणारे पक्ष म्हणून आपण ज्यांचे वर्णन करतो त्या पक्षाविरूद्ध आपले हे दोन पक्ष तटबंदी उभारू शकतील.

आपण केलेल्या आपल्या पक्षाबद्दलच्या कल्पना किती चुकीच्या होत्या हे निवडणुकीच्या निकालाने प्रत्येक पक्षाला आरशातील प्रतिबिंबाप्रमाणे स्वच्छ दिसले. बंगाल सोडून सर्व मुस्लिम बहुसंख्य प्रांतात मुस्लिम लीगचा धुव्वा उडाला; बंगालमध्येसुद्धा मुसलमानांच्या ११९ जागांपैकी तिला फक्त ४० मिळाल्या. पंजाबमध्ये नवीन कार्य करणाऱ्या हिंदू मुस्लिम जमीनदारांच्या पुनरुज्जिवीत झालेल्या युनियनिस्ट पक्षाने सर्वात अधिक जागा पटकावल्या. ८६ मुस्लिम जागांपैकी लीगला फक्त २ मिळाल्या आणि काँग्रेसलाही तितक्याच मिळाल्यामुळे तिने काँग्रेसपेक्षा काही अधिक प्रगती केली नाही. पंजाबमध्ये ज्यांनी पंजाबचा प्रश्न उभा केला होता, ज्यांनी बंगाल हे आपल्या जातीय मागण्यांचे केंद्र बनवले होते आणि जे गोलमेज परिषदेला मुस्लिम प्रतिनिधी म्हणून निवडले गेले होते, त्यांना मुस्लिम मतदारात मुळीच अनुयायित्व नव्हते हे निवडणुकीच्या निकालाने नि:संदिग्धपणे दाखवून दिले. खरं म्हणजे पंजाबचे मुसलमान संघटित नव्हते; काँग्रेस, मुस्लिम लीग किंवा दुसऱ्या कुठल्याच पक्षावर त्यांची निष्ठा नव्हती. त्यांनी प्रसिद्ध अपक्ष उमेदवारांना—मग ते स्वतंत्रपणे निवडणूक लढवत असोत की, युनियनिस्ट पक्षाच्या तिकिटावर उभे राहिलेले असोत––त्यांना आपले प्रतिनिधी म्हणून कायदेमंडळात निवडून दिले. सर्व पक्ष परिषदेच्या आणि गोलमेज परिषदेच्यावेळी ज्या हिंदूमहासभेने आपण हिंदुंचे प्रतिनिधी असल्याचा दावा केला होता तिने लीगपेक्षा जरा बरी प्रगती केली होती. सर्वसाधारण मतदार संघातून काँग्रेसने ४४ पैकी १८ जागा मिळवून तिने आपला गट सर्वात मोठा असल्याचे आणि हिंदुंच्यावतीने बोलण्याचा आपलाच हक्क असल्याचे शाबीत केले. कुठल्याही स्वरुपाच्या निवडणुका गोलमेज परिषदांच्या बैठकांच्यानंतर होण्याऐवजी आधी झाल्या असत्या तर निरनिराळ्या जातींच्या मागण्यांचे स्वरुप निराळे झाले असते आणि त्यांचा निकालही

निराळ्या स्वरुपाचा लागला असता. निवडणूक झाल्यानंतर युनियनिस्ट पक्षाने मंत्रिमंडळ बनवण्याकरिता कांग्रेसकडे कृपेचे कटाक्ष टाकले. गोलमेज परिषदांच्यावेळी अशा प्रकारची युती झाली असती तर तिने कायदेमंडळातील प्रतिनिधित्व पद्धतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बऱ्याच प्रमाणात बदलला असता.

बंगालमध्ये ४० जागा मिळवणारी बंगाल लीग ही मुळातील अखिल भारतीय मुस्लिम लीग नसून, संयुक्त मतदार संघासाठी आपला एकटीचाच आवाज उठवणारी ती एक प्रांतिक लीग होती. घटना बनवणाऱ्या विविध प्रकारच्या बैठकीत ज्यांनी मुसलमानांचे प्रतिनिधित्व केले त्यांनी बंगालच्या या आवाजांची दखल न घेता आपला स्वतःचा अगदी वेगळाच आवाज उठवला. पंजाबच्या युनियनिस्ट पक्षाप्रमाणे घाईगडबडीने संघटित केल्या गेलेल्या कृषिक प्रजापक्षाने, लीग पेक्षा अधिक जागा मिळवल्या. प्रजापक्षाने स्वतःला शेतकऱ्यांच्या जमीन हक्क लढ्याशी निगडीत करून घेतले आणि त्या पक्षाचे नेतृत्व जरी मुख्यत्वेकरून मुसलमानांचे होते तरी त्या पक्षाने मुसलमानी नाव धारण केले नाही की, मुसलमानी संघटना म्हणून मते मागण्यास तो मुसलमानाकडे गेला नाही. यावरून असे दिसून येते की, जातीय तडजोडीची बोलणी करताना स्वतःच पुढारी बनलेल्या मुसलमानांनी, मुसलमानांच्यावतीने ज्या पद्धतीचा प्रचार केला तो मतदारांच्या मनाला पटला नव्हता. शिवाय प्रजापक्षाचे पुढारी फजलूल हक हे आपले बहुमत होण्यासाठी जेव्हा इतर पक्षांकडे पहात होते तेव्हा त्यांनी लीगपेक्षा कांग्रेसलाच पसंत केले. कांग्रेसने मंत्रिमंडळाच्या जबाबदाऱ्या स्वीकारण्याचे नाकारले, म्हणून मग ते लीगकडे वळले आणि त्या पक्षाशी हातमिळवणी करण्याऐवजी आपल्या बहुतेक अनुयायांसह त्यांनी त्या पक्षातच प्रवेश केला. ही घटना फार महत्वाची होती. कांग्रेस-प्रजापक्ष युती झाली असती तर हिंदू मुसलमान समझोत्याच्या मार्गावर राहिले असते; प्रजापक्ष लीगमध्ये विलीन झाल्यामुळे मंत्रिमंडळ जवळ जवळ संपूर्णपणे जातीय बनले आणि जातीयवाद वाढण्याला भक्कम आधार मिळाला.

वायव्य सरहद्द प्रांतात मतदारांनी लीगचा धुव्वा उडवला. आणि सर्वात मोठा पक्ष म्हणून कांग्रेस निवडून आली. काही अपक्ष उमेदवारांच्या सहाय्याने नंतर कांग्रेसला मंत्रिमंडळ बनवणे शक्य झाले. सिंधमध्येसुद्धा लीगची मात्रा चालली नाही; कांग्रेसने मुसलमान मतदार संघात आपले लोक उभेच केले नव्हते, परंतु तिने काही राष्ट्रीय मुसलमानांना मदत केली होती. त्यांनी इतर स्वतंत्र उमेदवारांच्या मदतीने कांग्रेसकडे कल असलेले मंत्रिमंडळ प्रांतात बनवले.

संयुक्त प्रांतात निवडणुकीच्या अगदी ऐनसुमारास मुसलमानांचे प्रतिनिधित्व करण्याचा लीगचा हक्क कांग्रेसने जवळ जवळ मान्य केला आणि अवघ्या नऊ जागा लढवण्याचे ठरवून बाकी सर्व म्हणजे ५७ जागा लीगसाठी सोडून दिल्या. कांग्रेस सर्व नऊच्या नऊ जागा हरली आणि आपली कबुली किती बरोबर होती हे तिने

सिद्ध करून दाखवले. परंतु याबाबतीत तिने मुस्लिम लीगवर टाकलेला विश्वास पूर्णपणे नसला तरी फार मोठ्या प्रमाणावर असमर्थनीय ठरला. लीगला फक्त २७ जागा मिळाल्या आणि उरलेल्या सर्व अपक्ष मुसलमानांनी जिंकल्या. बहुतेक सर्व हिंदू जागा काँग्रेसने जिंकल्या आणि स्वतःच्या बळावर सरकार स्थापणे तिला शक्य झाले. प्रांतिक काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी लीगबरोबर सलोख्याचे संबंध ठेवण्याचे एक कारण असे होते की, जेव्हा काँग्रेस निवडणुकीच्या आखाड्यात उतरली तेव्हा, आपल्याला निर्णायक विजय मिळेल अशी तिची खात्री नव्हती आणि संयुक्त मंत्रिमंडळ बनवावे लागण्याचा दाट संभव होता. निवडणुकीचे निकाल आणि बहुमत मिळालेल्या प्रांतात काँग्रेसचे अधिकार ग्रहण यात काही महिन्यांचा कालावधी होता. गव्हर्नर 'आपला हस्तक्षेप करण्याचा खास अधिकार वापरणार नाही किंवा त्यांच्या घटनात्मक कार्याच्या क्षेत्रात मंत्र्यांनी दिलेला सल्ला धुडकावणार नाही', याबद्दल हिंदुस्तानातील ब्रिटिश राज्यकर्त्यांनी निश्चित आश्वासन द्यावे असा काँग्रेसचा आग्रह होता. हे आश्वासन मिळण्यापूर्वीच तात्पुरती मंत्रिमंडळे स्थापन केली गेली. दरम्यान एक मुस्लिम जागा रिकामी होण्याचा योग आला. प्रांतिक काँग्रेस पुढारी आणि लीग पुढारी यांच्यातील समझोता अजून कायम असल्यामुळे ही जागा काँग्रेसला सोडण्याबद्दल काँग्रेसने लीगचे मन वळवले. अशाप्रकारे सर्वसाधारण निवडणुकीत पराभूत झालेले काँग्रेसचे अतिशय महत्वाचे मुस्लिम पुढारी, रफी अहमद किडवाई यांच्या विजयाची निश्चिती झाली.

हा एकुलता एक काँग्रेस मुसलमान संयुक्त प्रांत कायदेमंडळात काँग्रेसच्या बाकावर होता. जेव्हा काँग्रेसने अधिकार स्वीकारण्याचा निर्णय घेतला आणि मंत्रिमंडळ बनवण्याचे आपले कार्य सुरू केले तेव्हा लीगने काँग्रेसशी झालेल्या आपल्या निवडणूक-पूर्व समझोत्याच्या जोरावर मंत्रिमंडळातील वाट्यावरचा आपला हक्क पुढे केला. दोनही पक्षांच्या पुढाऱ्यांच्या प्रदीर्घ वाटाघाटी झाल्या, परंतु कुठलीच कार्यप्रवण अशी योजना निघाली नाही. भारताच्या इतिहासातील ते एक दुर्दैवी आणि तापदायक असे अपयश होते. त्याने मुसलमानांना निराळी मातृभूमी असली पाहिजे असे वाटत असणाऱ्या काही साहसी मुसलमानांच्या मताला बळकटी आणली.

मंत्रिमंडळाबाबत वाटाघाटींची बोलणी सुरू असताना लीगपुढे ठेवण्याच्या सूचनाबाबत ...यमध्ये मतभेद झाले होते. सहा मंत्र्यांचे कॅबिनेट राहील आणि त्यापैकी दोन ...मान असतील असे गृहीत धरून वाटाघाटी सुरू झाल्या होत्या. काँग्रेसजवळ किडवाईंच्या रुपाने एक मुसलमान आधीच होता. आणि दुसरी जागा तिने लीगला देऊ केली. लीगच्यावतीने बोलणी करणारे प्रमुख खलिल-उझ्-झमान हे होते. ते अगदी निवडणुकीच्या आदल्या दिवसापर्यंत काँग्रेसचे सभासद होतें, आणि निवडणुकीचे डावपेच खेळण्यासाठी म्हणून त्यांना लीगकडे पाठवण्यात आले होते. त्यांनी लीगसाठी दोन जागांची मागणी केली. एक स्वतःसाठी दुसरी नबाब इस्माइल खान या दुसऱ्या

एका प्रांतिक पुढाऱ्यासाठी. अबुल कलम आझाद यांनी वाटाघाटीसंबंधी आपल्या आत्मचरित्रात म्हटल्याप्रमाणे, मुसलमानांची संख्या ३ करावी या मागणीमुळे मंत्रिमंडळाची संख्या जरी नऊ करावी लागली असती तरी ती मागणी मान्य करावयास हवी होती असे त्यांचे मत होते. जवाहरलाल नेहरू लीगला एकाहून अधिक जागा देण्यास तयार नव्हते असे सुचवून बहुदा पश्चात शहाणपण आठवलेले आझाद, सर्व दोष त्यांच्या माथी मारतात. परंतु, त्यांनी स्वतः लीगला जे देऊ केले होते त्यावरून त्यांचे समर्थन तर होत नाहीच पण ते स्वतःच त्यात अडकतात. त्यांच्या अटी अशा होत्या :

संयुक्त प्रांत कायदेमंडळातील मुस्लिम गटाला निराळा गट म्हणून काम करण्याचे बंद करावे लागेल.

संयुक्त प्रांत असेंब्लीतील मुस्लिम लीगच्या सध्याच्या सभासदांना कांग्रेसचाच भाग म्हणून रहावे लागेल. त्यांच्यावर कांग्रेस पक्षाचा ताबा राहील व त्यांना कांग्रेस पक्षाची शिस्त बंधनकारक राहील.

कायदेमंडळांच्या कार्यासंबंधी, लायक अशा कांग्रेस संस्थांनी दिलेल्या सल्ल्यासह कांग्रेसच्या कार्यकारी मंडळाने आपल्या सभासद्रांकरिता जे धोरण घालून दिले असेल त्याचे पालन यांच्यासकट सर्व कांग्रेस सभासदांना काटेकोरपणे करावे लागेल.

संयुक्त प्रांतातील मुस्लिम लीगची लोकसभा समिती (Parliamentary Board) बरखास्त करण्यात यावी आणि यानंतरच्या कुठच्याही पोटनिवडणुकीला वरील समितीतर्फे उमेदवार उभा केला जाऊ नये. यापुढे, रिकामी झालेली कुठलीही जागा भरण्यासाठी कांग्रेसने जो उमेदवार नेमला असेल त्याला पक्षाच्या सर्व सदस्यांनी क्रियाशील पाठिंबा दिला पाहिजे.

आश्चर्य म्हणजे, ह्यावर इतर लोकांऐवजी लीगच्याच लोकांना सह्या करण्यास सांगण्यात आले. तेव्हा ह्याचे वर्णन आपल्या मृत्यूची हमी असे लीगच्या पुढाऱ्यांनी केले हे समजण्यासारखे आहे. लीगने अखिल भारतीय पक्ष तयार केला, निवडणूक जाहीरनामा वाटला, स्वतःला मतदारापुढे उभे केले आणि निवडणुका लढवल्या म्हणून तिला असे सांगण्यात यावे काय? आणि मुस्लिम मतदार संघात तिला जोरदार अपयश आले म्हणून मागल्या दाराने कांग्रेसमध्ये प्रवेश करा असे कांग्रेसने सुचवणे हे नैतिक होते काय? या प्रश्नांचे उत्तर, आपली विचारसरणी आपल्या प्रत्यक्ष स्वरूपातून प्रकट व्हावी ही कांग्रेसची तळमळ, हे असले तरी ते सरळपणे कधीच दिले गेले नाही. आणि हे उत्तर लीगला अधिकच तिरस्करणीय वाटले असते. त्यातच आणखी एक नवाच अडसर निर्माण झाला.

लीगशी वाटाघाटी चालू असताना, पक्षीय राज्यपद्धती विकसित करण्याची कल्पना पुन्हा काही कांग्रेस पुढाऱ्यांच्या डोक्यात आली. कांग्रेसमधील काही मुसलमान या पद्धतीचे कडवे पुरस्कर्ते होते. शेवटी हा विचार कांग्रेस पुढाऱ्यांचे धोरण बनला

आणि लीगला त्यांनी जी अखेरची योजना सादर केली ती अशी. खलिल-उज्ज-झमान हे जर काँग्रेसचे संपूर्ण सभासद म्हणून काँग्रेसला मिळाले आणि जर त्यांनी पक्षाच्या प्रतिज्ञा पत्रकावर सही केली तर त्यांचा मंत्रिमंडळात समावेश होईल. लीग ही लीग प्रतिनिधी म्हणूनच कॅबिनेटमध्ये दिसली पाहिजे या मुद्यावर खलिक-उझ्-झमान यांनी या योजनेला नकार दिला. परंतु असे झालेच तर आपण एकटेच काँग्रेस कार्यक्रमाला बांधून घेऊ असे नव्हे तर कायदेमंडळातील सर्वच सभासदांचे मन काँग्रेस पक्षाबरोबर बसण्यासाठी वळवू हे त्यांनी मान्य केले. परंतु पक्षीय सरकारच्या शुद्धतेवर काँग्रेस पुढाऱ्यांनी भर दिला आणि वाटाघाटी मोडल्या. ही तीव्र प्रक्षोभाची सुरूवात होती.

यानंतर काँग्रेसने दुसरी मुसलमानांची जागा दुसरे लीग पुढारी हफीझ महमद इब्राहिम यांना देऊ केली. हफीझ महमद इब्राहिम हे कायदेमंडळाचे अनुभवी सभासद होते आणि त्यांनी खिलाफत चळवळीच्यावेळी काँग्रेस आंदोलनात भाग घेतला होता: त्यांनी आपले लीगचे तिकिट परत केले, जागेचा राजीनामा दिला, काँग्रेस तिकिटावर पुन्हा निवडणूक लढवली आणि ती जिंकली. त्यांनी प्रथम लीगच्या तिकिटावर व नंतर काँग्रेसच्या तिकिटावर जागा मिळवली ती त्यांच्या वैयक्तिक प्रभावामुळे. पुढे पांच अपक्ष मुस्लिम आणि लीग सभासद काँग्रेसला मिळाले आणि पक्षातील मुसलमानांचे संख्याबळ १ वरून ७ पर्यंत वाढले.

इतर हिंदू बहुसंख्य प्रांतापैकी मद्रास आणि मुंबई या दोन प्रांतात, लीगला मद्रासमध्ये २९ पैकी ११ आणि मुंबईमध्ये ३० पैकी २० जागा मिळाल्या. मद्रासमध्ये काँग्रेसलाही ४ मुस्लिम जागा मिळाल्या पण मुंबईमध्ये लढवलेल्या २ ही जागा तिने गमावल्या; बिहारमधील ४० मुसलमान जागांपैकी तिने ७ लढवल्या आणि त्यापैकी ५ जिंकल्या; बंगालमध्ये तिने एकही मुस्लिम जागा लढवली नाही; मध्य प्रदेशात दोन लढवल्या परंतु एकच जिंकली.

थोडक्यात, निवडणुकीचा निर्णय असा होता : ८३६ हिंदू जागांपैकी काँग्रेसने ७१५ मिळवल्या, आणि ४९२ मुस्लिम जागांपैकी तिने फक्त २६ मिळवल्या. मुस्लिम लीगचा मुस्लिम बहुसंख्य प्रांतात अगदी धुव्वा उडाला असला तरी एकंदर १०८ जागा मिळवणारा तो दुसऱ्या नंबरचा पक्ष होता; मुसलमानात थोड्याफार प्रमाणात अनुयायित्व असणारी लीग ही एकच संघटना आहे असे निवडणकीने दाखवून दिले. उरलेल्या जागांपैकी बऱ्याचशा जागा अपक्ष मुसलमान उमेदवारांना मिळाल्या. कालांतराने यापैकी बरेच मुसलमान लीगला मिळाले. परंतु मुस्लिम जागा कुणाच्याही खिशात गेल्या असल्या तरी काँग्रेस मुसलमानांची प्रतिनिधी नव्हती ही वस्तुस्थिती शिल्लक राहतेच. (लीगने पुन्हा पुन्हा प्रतिपादलेली वस्तुस्थिती) काँग्रेस पुढाऱ्यांची इच्छा नसतानाही, काँग्रेसचे हिंदू संघटना म्हणून हळूहळ होत जाणाऱ्या रुपांतराचे कारण, काहींनी जातीय मतदार संघात शोधले तर काहींनी काँग्रेसच्या मुस्लिम

संपर्काच्या आभावात शोधले. परंतु, निवडणुकीनंतर ही गोष्ट कुणालाही स्पष्टपणे दिसून आली की, एका बाजूला आपल्या हिंदू जागा घेऊन काँग्रेस उभी होती, आणि दुसऱ्या बाजला, मुसलमानांच्या १०८ जागा घेऊन, त्या वाढवण्याचा प्रयत्न करीत, आणि मुस्लिम प्रतिनिधित्वावर आपल्या खेरीज हक्क सांगणारी दुसरी कुठलीच मुस्लिम अगर निधर्मी संस्था नाही असा दावा करीत मुस्लिम लीग उभी होती.

काँग्रेसप्रमाणे राजकीय मुक्तीसाठी लढा देऊन किंवा आर्थिक क्षेत्रात काही विधायक कार्य करून लीगने स्वतःचे वैशिष्टच प्रस्थापित केले नव्हते. लीग सभासदापेक्षा काँग्रेसवाले निराळे होते हे दाखवणारे धर्म हेच एकमेव कारण नव्हते. ब्रिटिश सत्तेकडे पाहण्याची त्यांची दृष्टी, हा महत्वाचा फरक होता. ज्या सरकारी आश्रयाचा आणि पदव्यांचा काँग्रेसने प्रतिज्ञापूर्वक त्याग केला होता, त्याचा उपयोग अनेक लीग पुढारी घेत होते. १८९२ पासून ब्रिटिश पार्लमेंट हिंदुस्तानला ज्या सुधारणा हप्त्या-हप्त्याने देत होते, त्याचे कारण या सुधारणासाठी केल्या गेलेल्या चळवळी. आणि १९३५ च्या कायद्याने स्वायत्ततेकडे जी घोडदौड झाली त्याचे कारण, १९१९ पासून गांधींनी चालवलेल्या निरनिराळ्या लढ्यात काँग्रेस जनांनी केलेला त्याग. लीगवाल्यांनी आपल्या चळवळीत या राजकीय लढ्यांना पूर्णपणे बगल दिली आणि सत्तेत मात्र वाट्याची मागणी केली. परंतु लीगचे स्वरुप काहीही असले तरी आणि स्वातंत्र्य संग्रामाबद्दल तिची कुठलीही वृत्ती असली तरी, जेव्हा राजकीय हक्क ही सिद्ध झालेली गोष्ट ठरली तेव्हा आपल्या वाट्याचा हक्क मागण्यास मुसलमान हजर होते. मुसल-मानांचे प्रतिनिधी कोण हे ठरवण्याचा हक्क मतदारांचा होता. त्यांनी असे दाखवून दिले की, त्यांचे प्रतिनिधित्व त्यांचा विश्वास मिळवलेल्या स्वतंत्र उमेदवारांकडे प्रथम होते आणि नंतर मुस्लिम लीगकडे.

काँग्रेसचे अध्यक्ष जवाहरलाल नेहरू यांनी १९३७ च्या जानेवारीमध्ये लीगचे अध्यक्ष जीना यांना जे पत्र लिहिले त्यात काँग्रेसच्या लीगबद्दलच्या भूमिकेचा सारांश दिला होता. ते म्हणाले होते : 'अंतिम विश्लेषणाने पाहिले तर हिंदुस्तानात फक्त दोन शक्ती दिसतात—एक ब्रिटिश साम्राज्यशाही आणि दुसरी भारतीय राष्ट्रवादाचे प्रतिनिधित्व करणारी काँग्रेस. मुस्लिम लीग मुसलमानांच्या लहानशा गटाचे प्रति-निधित्व करते. ते लोक प्रशंसनीय आहेत याबद्दल शंका नाही. परंतु ते वरिष्ठ वर्गाच्या मुसलमानातील वरच्या थरात कार्य करीत आहेत. कनिष्ठ मुस्लिम वर्गाशी त्यांचा फारच थोडा संपर्क आहे आणि मुस्लिम जनतेशी तर मुळीच नाही.' लीगने हे विधान खोडून काढताना असे म्हटले की, काँग्रेस मुसलमानांच्या वरिष्ठ वर्गाचेही प्रतिनिधित्व करीत नाही की, कनिष्ठ वर्गाचेही करीत नाही आणि तिने परत असा दावा मांडला की, मुसलमानांच्यावतीने बोलण्याचा अधिकार फक्त आपल्या एकट्याचाच आहे.

या आधारावर तिने हिंदू बहुसंख्य प्रांतात आणि विशेषतः तिने ज्या प्रांतात इतर

प्रांतापेक्षा अधिक जागा मिळवल्या होत्या त्या संयुक्त प्रांतात, काँग्रेसशी सहकार्य केले होते. आता मात्र लीगची भूमिका बदलली. सहकार्याची गोष्ट बाजूला टाकून ती कायद्यातील एका सनदी तरतुदीचा आधार घेऊ लागली. तिच्या मते या तरतुदीप्रमाणे, असेंब्लीतील मुसलमान प्रतिनिधींमधून मुस्लिम मंत्री निवडण्याचा अधिकार गव्हर्नरला होता.

हिंदी राज्यकारभाराच्या १९३५ च्या कायद्याचे कलम ५२ (१) (ब), हे जरा संदिग्ध आहे. ते असे आहे : 'गव्हर्नराचे कर्तव्य म्हणून त्यांनी पुढील खास जबाबदाऱ्या पार पाडल्या पाहिजेत. या जबाबदाऱ्या म्हणजे, अल्पसंख्याकांच्या हितसंबंधांचे संरक्षण.' Instrument of Instructions च्या आठव्या कलमाप्रमाणे, मंत्र्यांच्या नियूक्ती विषयीची तरतूद अशा प्रकारे स्पष्ट केली आहे. मंत्र्यांच्या कौन्सिलची नेमणूक करताना आमचे गव्हर्नर मंत्री निवडण्याच्याबाबतीत पुढील पद्धतीनुसार दक्षता बाळगतील. ही दक्षता अशी की, गव्हर्नरच्या मते जी व्यक्ती कायदेमंडळात स्थिर बहुमत आपल्या मागे उभे करू शकेल अशा व्यक्तींशी विचार विनिमय करून तो अशाप्रकारे इतर मंत्री नेमेल की, जे कायदेमंडळाचा विश्वास संपादन करतील. (या मंत्र्यात शक्य तो महत्वाच्या अल्पसंख्यांक जमातीचे सभासद असतील.) पण असे करताना, मंत्र्यामध्ये संयुक्त जबाबदारीची भावना वाढवण्याची असलेली गरज तो सतत मनामध्ये बाळगील.'

गव्हर्नरला दिलेला हा आदेश पक्षीय पद्धतीचे सरकार गृहीत धरतो. आणि हिंदू बहुसंख्य प्रांतांच्या कायदेमंडळात ज्याअर्थी, काँग्रेस पक्ष बहुमतात होता त्याअर्थी, गव्हर्नरने मंत्रिमंडळे बनवण्यासाठी तिच्या पुढाऱ्यांना पाचारण केले. काँग्रेस पक्षाने पत्करलेला धोका स्वच्छ होता. त्यामुळे, काँग्रेसची पक्ष पद्धतीची व्याख्याच चमत्कारीक आहे, असे मोठ्या वैफल्यभावनेने आपल्या धर्मबांधवांना सांगण्याचा मोका, मुस्लिम लीग पुढाऱ्यांना मिळाला. सत्ताधारी पक्षाच्या बाकांवर हिंदू आणि विरोधी पक्षाच्या बाकांवर मुसलमान, यातील चमत्कारिकपणा असा की, सत्ताधारी पक्षाची जागा घेण्याची आशा विरोधी पक्षाला कधीच शक्य नाही.

जी मुस्लिम लीग मृतप्राय होत चालली होती आणि १९३५ मध्ये जीनांनी तिचे नेतृत्व पत्करल्यानंतरच फक्त जिला जीवनदान मिळाले ती लीग वंचीत आणि संतप्त झाली. काँग्रेसची वृत्ती हा मुसलमानांमधील तिच्या प्रचाराचा प्रमुख मुद्दा बनला. काँग्रेस मंत्रिमंडळे आस्तित्वात आल्यानंतर, ऑक्टोबर १९३७ मधील लखनौ येथे भरलेल्या आपल्या अधिवेशनात तिने पुढील ठराव संमत केला : 'हिंदी सरकारच्या १९३५ च्या कायद्याच्या आणि Instrument of Instructions च्या अर्थावर आणि भावार्थावर धडधडीत अतिक्रमण करून, काँग्रेसने काही प्रांतात मंत्रिमंडळे बनवली आहेत, त्याबद्दल अखिल भारतीय मुस्लिम लीगची ही सभा खेद व विरोध व्यक्त करीत आहे आणि मुसलमानांच्या व इतर प्रमुख अल्पसंख्यांकांच्या हित-

संबंधांचे संरक्षण करण्यासाठी असलेले खास अधिकार, गव्हर्नरांनी न वापरल्यामुळे त्यांचाही निषेध ही सभा करीत आहे'. दुसऱ्या एका ठरावात तिने म्हटले आहे: 'स्वतंत्र लोकसत्ताक संघराज्याच्या स्वरूपाचा स्वतंत्र हिंदुस्तान स्थापन करणे आणि त्या हिंदुस्तानच्या घटनेत मुसलमान व इतर अल्पसंख्य जमातींचे हक्क आणि, हितसंबंध यांना पुरेसे आणि परिणामकारक संरक्षण मिळवणे हे अखिल भारतीय मुस्लिम लीगचे ध्येय राहील'.

१९३५ च्या हिंदी राज्यकारभार कायद्याच्या अर्थाचे आणि भावार्थाचे खरोखरच उल्लंघन झाले होते काय? कायद्याचे कलम ५२ (१) (ब) आणि Instrument of Instructions चे ८ वे कलम, यात बहुसंख्य पक्षाच्या मंत्रिमंडळाची स्पष्ट तरतूद होती, आणि मंत्रिमंडळात अल्पसंख्य प्रतिनिधित्व कोणत्या पक्षाचे असावे याबद्दल काहीच उल्लेख नव्हता. मंत्रिमंडळात काँग्रेस मुसलमान घेऊन कायद्याचे शब्दश: पालन करण्यात आले आहे असा युक्तिवाद केला गेला. लीगने १९३५ चा कायदा आणि Instrument of Instructions च्या १० व्या कलमाचा आधार घेतला. ते कलम असे:

'अल्पसंख्यकांच्या योग्य हितसंबंधांचे संरक्षण करण्याकरिता असलेल्या खास जबाबदारीचा अर्थ आमचे गव्हर्नर असा लावतील: ज्या जमातींना खास प्रतिनिधित्व दिले गेले आहे अशा वांशिक अगर धार्मिक जमाती आणि, अतिशय अल्पसंख्य असल्यामुळे, किंवा शिक्षणाच्या किंवा आर्थिक सुस्थितीच्या आभावामुळे किंवा दुसऱ्या कुठल्याही कारणाने ज्या जमातींच्या लोकांची जबाबदारी गव्हर्नरांवर आहे अशा जमाती आपल्या कल्याणासाठी कायदेमंडळातील संयुक्त राजकीय कार्यावर अवलंबून राहू शकणार नाहीत, त्या जमाती दुखावल्या जाणार नाहीत किंवा त्यांची उपेक्षा किंवा जुलूम होईल अशी भीति वाटण्यास त्यांना कारण मिळणार नाही. परंतु एकाद्या गटाला एकाद्या विशिष्ट प्रश्नावर, त्यांचे विचार बहुमताच्या बाजूचे नाहीत असे आढळून आले येवढ्यानेच फक्त त्याची जबाबदारी गव्हर्नरांवर आहे असे ते मानणार नाहीत.'

Instrument of Instructions मधील ८ व १० कलमांपैकी ८ वे कलम निश्चित स्वरूपाचे आहे आणि कायदेमंडळातील काँग्रेस पक्षाच्या पुढाऱ्यांनी, गव्हर्नरना सादर केलेली मुसलमान मंत्र्यांचा समावेश असलेली यादी मान्य करताना गव्हर्नरना असे वाटले की, आपल्यावर टाकलेली 'खास जबाबदारी' आपण योग्य तऱ्हेने बजावली आहे. कायद्याचे कलम ५२ (३), यात स्पष्टपणे म्हटल्याप्रमाणे, 'खास जबाबदारी' पार पाडण्यात मंत्र्यांचा काहीही भाग असणार नाही आणि या जबाबदारीचे उल्लंघन झाल्यास त्याची जबाबदारीही त्यांच्यावर असणार नाही. हे कलम असे होते: 'जेथे गव्हर्नरची खास जबाबदारी असेल तेथे आपले कार्य करताना कसे पाऊल टाकावयाचे हे त्यांनी आपल्या स्वत:च्या न्यायबुद्धीस अनुसरून ठरवावयाचे आहे'.

परंतु, निवडणूक झाल्यानंतर आणि मंत्रिमंडळे बनवताना निर्माण झालेली परिस्थिती संयुक्त पार्लमेंटरी कमिटीने आधीच ताडली होती. तिने आपल्या अहवालात (ग्रंथ १, विभाग १, पान ११) म्हटले होते : 'हिंदुस्तानात...... आपण समजतो तसे पक्ष नाहीत आणि गतिमान अशी राजकीय मतप्रणालीची विचारात घेण्यासारखी संघटना नाही. त्याऐवजी फक्त दोन धर्मांचे प्रतिनिधित्व करणाऱ्याच नव्हे तर दोन संस्कृतींच्या—हिंदू आणि मुसलमानांच्या पुरातन द्वेषाला आपल्याला तोंड द्यावयाचे आहे.' अहवालात दुसऱ्या एका ठिकाणी असे म्हटले आहे. (पृ. ६२-६३) : 'परंतु हे लक्षात ठेवले पाहिजे की, दोन बाबतीत प्रांतिक मंत्रिमंडळाच्या अडचणी भूतकालापेक्षा भविष्यकाळात अधिक होतील. एक म्हणजे यापुढे ते सरकारी गटावर विसंबून राहू शकणार नाहीत. कायदा कमिशनच्या शब्दात सांगायचे झाले तर, या सरकारी गटाने 'कायदेमंडळात सध्या असलेल्या परस्पर संबंधांची अस्थिरता कमी करण्यास मदत केली आहे. आणि मंत्रिमंडळांची कारकिर्द कमी धोकेबाज केली आहे.' दुसरे म्हणजे आम्ही आधीच दाखवून दिल्याप्रमाणे प्रत्येक मंत्रिमंडळ हे संमिश्र बनण्याचा संभव आहे. जातीय प्रतिनिधित्वाच्या तत्वावर कायदेमंडळे उभारली जातील. आणि Instrument of Instructions मध्ये सांगितल्या-प्रमाणे गव्हर्नरला आपल्या मंत्रिमंडळात शक्यतो महत्वाच्या अल्पसंख्य जमातींचे सभासद घ्यावे लागतील. या पद्धतीने बनवलेले मंत्रिमंडळ हे इंग्लंडप्रमाणे, नुसते बहुसंख्य असलेल्या एकाच पक्षाचे किंवा संयुक्त पक्षाचेही प्रातिनिधिक न राहता, अल्प-संख्यांकांचेही प्रातिनिधिक होईल.'

ब्रिटिशांनी उत्तेजन दिल्यामुळे, किंवा ऐतिहासिक योगायोगाने अनेक घटनांचा परिणाम निरनिराळ्या जमातीत दुरावा वाढण्यात झाला असे म्हणणे निराळे आणि हिंदी राजकीय घडामोडींशी संबंध असलेल्या ब्रिटिश मुत्सद्यांनी आपले मत संयुक्त मतदार संघाच्या बाजूने दिले असते तर याहून निराळा परिणाम दृष्टीस पडला असता असे म्हणणे निराळे. नव्या कायद्याच्या अंमलबजावणीनंतर आणि जातीय मतदार संघ आल्यानंतर हे सर्व म्हणणे जर-तर ठरले होते. आणि आजची परिस्थिती संयुक्त कमिटीने अपेक्षिल्याप्रमाणे झाली होती.

या पार्श्वभूमीवर लीगच्या दाव्याचा विचार करणे जरूर होते. आपण लीगचे प्रतिनिधी आहोत ह्या लीगचा दावा मुसलमानी मतदारांनी उचलून धरला नाही असे म्हटले तरीसुद्धा या परिस्थितीचा विचार करणे जरूर होते. परंतु काँग्रेसच्या लेखी निधर्मीपणा ही एक मूलभूत तत्वाची बाब होती. आणि Instrument of Instructions च्या ८ व्या कलमात केलेल्या तरतुदीप्रमाणे हिंदुस्तानात निधर्मी पक्षपद्धतीच्या उत्क्रांतीची आशा होती. काँग्रेसला असे वाटत होते की, मुस्लिम जनता संपर्काचा कार्यक्रम हाती घेऊन आपण या आशेला पल्लवीत करू शकू. काँग्रेसच्या जन्मापासून, कमी न होता वाढत जाणाऱ्या जातीय वातावरणाने, आणि तिच्या प्रगतीवर ब्रिटिश

राज्यकर्त्यांच्या होत असलेल्या प्रतिक्रियेने ही आशा विफल ठरली. एक म्हणजे जनता संपर्काचा कार्यक्रम कधीच गंभीरपणे घेतला गेला नाही. आणि दुसरे म्हणजे ज्या ज्या ठिकाणी तो सुरू झाला त्या त्या ठिकाणी त्याला लीगच्या वेगाने वाढणाऱ्या सामर्थ्याच्या गतिमान चक्रांनी चिरडून टाकले.

---

प्रकरण एकूणतिसावे

# काँग्रेस राज्य हे हिंदू राज्य होते काय ?

कल्याणकारी योजनांसह जशी काँग्रेस कारकिर्द सुरू झाली तशी उपेक्षित प्रेक्षक बनलेली मुस्लिम लीग, मुस्लिम जनतेत अधिकाधिक खोल शिरू लागली. चंद्रकोर आणि कुराणाच्या नावाने, या लीगने, फॅसिस्ट हिंदू राज्य स्थापन झाले आहे आणि मुसलमानांना फेकून दिले आहे असे जाहीर केले. मुस्लिम लीगच्या २५ व्या वार्षिक अधिवेशनात (दिनांक १५ ते १८ ऑक्टोबर १९३७) अतिरिक्त भाषणे झाली त्यात स्वागताध्यक्ष महमदाबादचे राजे यांनी फार मोठ्या श्रोतुवृंदासमोर असे सांगितले की : 'आपल्या देशात फार नाजूक राजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे. मुसलमान जमात म्हणून आपले नुसते अस्तित्वही बहुसंख्य वर्गाच्या जमातीने अमान्य केले आहे आणि राष्ट्रीय प्रगतीसाठी आपल्या पुढाऱ्यांच्या सहकार्याने कार्य करण्याचे नाकारले आहे.' अलिकडे अनेक वर्षे लीगच्या अध्यक्षपदी निवडून येत असलेल्या जीनांनी आपल्या भाषणात अधिक स्पष्ट हल्ला चढवला. ते म्हणाले : 'काँग्रेसचे सध्याचे, विशेषत: गेल्या १० वर्षातील नेतृत्व, हे हिंदी मुसलमानांना अधिकाधिक प्रक्षुब्ध करण्याला जबाबदार आहे. कारण तिने अधिकाधिक शुद्ध हिंदू धोरण आखले आहे. आणि ती बहुसंख्य असलेल्या सहा प्रांतात तिने सरकार स्थापन केल्यापासून तिने आपल्या शब्दांनी कृत्यांनी आणि कार्यक्रमांनी असे दाखवून दिले आहे की, मुसलमानांनी तिच्यापासून न्यायाची किंवा समान संधीची अपेक्षा करणे शक्य नाही. जेथे जेथे तिचे बहुमत आहे आणि जेथे जेथे तिला फायद्याचे ठरले आहे, तेथे तेथे तिने मुस्लिम लीगच्या पक्षांशी सहकार्य करण्याचे नाकारले आहे, आणि बिनशर्त शरणागतीची व तिच्या प्रतिज्ञापत्रकावर सही करण्याची मागणी केली आहे.'

काँग्रेस फार थोड्या काळापुरतीच अधिकारावर होती. या काळातच लीगने आपले वार्षिक अधिवेशन भरवले. काँग्रेस सरकारने मुसलमानांच्याबाबतीत न्यायाचा किंवा समान संधी देण्याचा आभाव दर्शवल्याची उदाहरणे लीगकडे खरोखरीच नव्हती. त्यांनी अधिवेशनापुढे आणलेले फक्त एकच उदाहरण होते आणि ते भावनात्मक स्वरुपाचे होते. ते म्हणजे काँग्रेसचे राष्ट्रगीत वंदेमातरम्. हे गीत दररोज कायदे-मंडळाचे कामकाज सुरू होण्यापूर्वी म्हटले जात असे. ब्रिटिश सत्तेविरूद्ध केलेल्या काँग्रेस चळवळीच्यावेळी ते अनेकवेळा म्हटले जात होते; या गीताच्या सामुदायिक

गायनाने सर्व जाहीर सभा सुरू होत होत्या; पोलिसांच्या लाठीमाराला आणि गोळीबाराला तोंड देत आपला मार्ग आक्रमणाऱ्या मिरवणुकांना त्यांनी धैर्य आणि संयम पुरवला होता; काँग्रेसजनांमध्ये त्याला नमस्तेचे स्वरुप आले होते; खरं म्हणजे राष्ट्रवादाशी आणि त्याच्या प्रत्येक आविष्काराशी त्याचे अतूट नाते जडले होते. असे हे वंदेमातरम. या गीताला उच्च राष्ट्रीय भावना म्हणून काँग्रेस चिकटून राहिली होती आणि त्यालाच आता मुस्लिम लीग आक्षेप घेत होती.

बकीमचंद्र चतर्जी या प्रसिद्ध बंगाली कादंबरीकाराच्या आनंद मठ या गाजलेल्या कादंबरीत हे गीत आहे; त्याचा अनुवाद अनेक हिंदी भाषातून झाला आहे. सन्याशांचे बंड हा या कादंबरीचा विषय आहे. सन्याशी लोकांनी खरं म्हणजे सर्व हिंदू लोकांनी मुसलमान विजेत्यांविरुद्ध बंड करण्याचा झेंडा उभारला अशी ती कल्पना आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीच्यावेळी, हे गीत राष्ट्रीय गीत झाले पाहिजे असे म्हणणाऱ्यांनी त्याचे समर्थन असे केले होते की बंकीम यांनी त्या काळातील लोकांना क्रांतिकारक कल्पना दिल्या होत्या आणि मुसलमान राज्यकर्त्यांना सन्याशांच्या क्रोधाचे लक्ष्य बनवले होते. बंकीमनी जर खरोखर ब्रिटिश राज्यकर्त्यांना लक्ष्य बनवले असते तर कादंबरी जप्त करण्यात आली असती आणि लेखकाचा हेतू निष्फळ ठरला असता. ते काहीही असले तरी हे गीत अगदी निरुपद्रवी होते कारण त्यात फक्त मातृभूमीला वंदन होते. बंगालमध्ये जेव्हा देशभक्तीची भावना उफाळून येत होती तेव्हा सुशिक्षित लोकांमध्ये ही भावना जागृत करण्यासाठी सुरवातीच्या राष्ट्रीय-वाद्यांनी हे गीत निवडले होते. बंगालमधून ही राष्ट्रीय भावना जशी इतर भागात पसरत चालली तसे हे गीत सर्वत्र फैलावले आणि खुद्द मातृभूमीसारखेच प्रिय होऊ लागले. परंतु या भावनेशी मुसलमान एकरुप होऊ शकले नाहीत. आणि हिंदू राष्ट्रवाद्यांनी जरी या गीताला त्याच्या संदर्भापासून अलग केले होते, तरी मुसल-मानांनी ते संदर्भासहित घेण्याचा हट्ट धरला. राष्ट्रीय हिंदुस्तानने या गीताचा त्याग केला पाहिजे हे सांगण्यास मुसलमानांना पन्नास वर्षे उशीर झाला होता. सर सय्यद अहमदखान यासारख्या मुस्लिम पुढाऱ्यांना, स्वराज्य ही जेव्हा नुसती मूर्खपणाची मागणी वाटत होती येवढेच नव्हे तर व्यवहारी राजकारणाच्या कक्षेत ही न बसणारी ती एक कल्पना वाटत होती, तेव्हा या गीताचा स्वीकार झाला होता.

या इतिहासाकडे लीगने पूर्णपणे दुर्लक्ष केले आणि वंदेमातरम् जाहीरपणे म्हणण्याला आपला विरोध दर्शवला. तिने संमत केलेल्या ठरावात म्हटले होते : 'वंदेमातरमला राष्ट्रगीत म्हणून देशावर लादण्यात काँग्रेसने, जी हृदयशून्य निर्विवाद इस्लामविरोधी, आशय आणि स्फूर्ती या दोनही दृष्टीने मूर्तिपूजक आणि हिंदुस्तानातील राष्ट्रवादाला खात्रीने मारक अशी वृत्ती दाखवली आहे, तिचा भारतीय मुस्लिम लीगची ही सभा निषेध करीत आहे. निरनिराळ्या कायदेमंडळातील आणि भारतातील सार्वजनिक संस्थांच्या मुस्लिम सभासदांना ही सभा असा आदेश देत आहे की, या अतिशय

आक्षेपार्ह गीताशी त्यांनी स्वतः कुठल्याही प्रकारचा संबंध ठेवू नये'.

बंगालच्या अकरमखानांनी हा ठराव मांडला. हे गीत राष्ट्रीय नसून मुसलमानांवर हल्ला करणारे होते हे सिद्ध करण्याकरिता त्यांनी आनंद मठमधील उतारे श्रोत्यांना वाचून दाखवले आणि त्यावर बहिष्कार घालण्यासाठी आपल्या धर्मबांधवांना आवाहन केले. हे गीत म्हणण्याला आपला विरोध दर्शवण्यासाठी कायदेमंडळातील मुस्लिम सभासदांनी अनेकवेळा सभात्याग केला. मद्रासमध्ये तर, सभागृहात, दर शुक्रवारी कुराणातले उतारे वाचण्यास सभापतींनी परवानगी दिली. आणि सर्व धर्मांना मान्य होईल अशी प्रार्थना मिळवण्याचा आपण प्रयत्न करू असे सांगितले.

लीगमध्ये चैतन्य निर्माण होण्यासाठी, सरकारात आपल्याला भागिदारी मिळावी या लीगच्या मागणीला काँग्रेसने दिलेल्या नकाराचीच जणू गरज होती म्हणून की काय, लीगच्या शाखा प्रांताप्रांतातून आणि जिल्ह्याजिल्ह्यातून अकल्पित वेगाने स्थापन होऊ लागल्या. मध्यमवर्गीय मुसलमानांनी क्रियाशील राजकारणात इतका उत्साह, इतका निश्चय आणि इतकी निष्ठा पूर्वी कधीच दाखवली नव्हती. काँग्रेस राज्य म्हणजे मुसलमानांवर घातक परिणाम करणारे हिंदू राज्य, हा त्यांच्या प्रचाराचा मुख्य मुद्दा होता. आणि अशा प्रकारच्या प्रचारांनी जेहादची धार्मिक तीव्रता निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. गोलमेज परिषदेपर्यंत जे जातीय विष फक्त राजकीय मेळाव्यापुरतेच मर्यादित होते ते आता मुस्लिम वसाहतीच्या थेट कानाकोपऱ्यात पसरले. यामुळे हिंदुंमध्ये प्रतिजातीय भावना निर्माण होणे अपरिहार्य होते; आणि झालेही तसेच. १९३५ च्या कायद्यानंतर प्रस्थापित झालेल्या आणि निवडणुकीच्या काळात टिकून राहिलेल्या शांततेला आता गंभीर धोका निर्माण झाला. मोठमोठ्या गावामधून जातीय द्वेष वेगाने पसरला. (जातीय द्वेष हाच या प्रचाराचा प्रमुख भाग होता.) अनेक गावातून त्याचा उद्रेक तीव्र दंग्यात झाला. हिंदू मुसलमान एकमेकां-बद्दल साशंक झाले. आणि क्षुल्लक म्हणून सर्वसाधारणपणे दुर्लक्षिलेल्या लहानसहान बाबीसुद्धा गंभीर तक्रारीत पराचा कावळा करण्यात आल्या. अशा या जातीय वातावरणात खरोखरच्या गंभीर तक्रारी निर्माण होणे कठीण नव्हते, आणि प्रत्यक्षात त्या तशा निर्माण झाल्या असतीलही. अर्थात, लीगच्या १९३८ च्या अधिवेशनात जीनांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केलेल्या आरोपांची कारणमीमांसा कुणाच्याही लक्षात येण्यासारखी आहे. ते म्हणाले : 'काँग्रेस राज्यात, मुसलमानांना, विशेषतः अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या सभासदांना आणि कार्यकर्त्यांना टिपून काढून केलेल्या त्यांच्या जाचाच्या, वाईट वागणूकीच्या आणि अन्यायाच्या अनेक तक्रारी घेऊन अनेक शिष्टमंडळे मध्यवर्ती कचेरीकडे आली आहेत'.

परिस्थितीने लीगमध्ये ढकलले गेलेले बंगालचे मुख्य प्रधान फजलूल हक्, कलकत्ता येथील प्रमुख सरकारी भरलेल्या लीगच्या वार्षिक अधिवेशनातील आपल्या स्वागताध्य-क्षीय भाषणात जीनापेक्षाही अधिक कडक बोलले. काँग्रेस प्रांतातील परिस्थितीचे

त्यांनी केलेले वर्णन असे होते : 'काँग्रेस प्रांतातील दंग्यांनी खेड्यापाड्यात नासधूस केली आहे. मुसलमानांच्या जीविताची, शरिराची आणि संपत्तीची हानी झाली आहे, आणि तेथे मोठा रक्तपात झाला आहे. परंतु येथे बंगालमध्ये, एकही डोके फुटले नाही की एकही रक्ताचा थेंब सांडला नाही. तेथे मुसलमान हिंदुंच्या जुलूम व दहशतीमुळे आपले जीवन सतत धास्तीने कंठीत आहेत, परंतु येथे बंगालमध्ये आम्हाला आनंद आणि समाधान देणारी अशी परिस्थिती आहे की, हिंदू पूर्णपणे सुखासमाधानाचे आणि शांततेचे जीवन कंठीत आहेत. तेथे मशिदी भ्रष्ट केल्या जात आहेत, प्रार्थना करावयास जाणाऱ्या मुसलमानाला उपद्रव दिला जात आहे आणि गुन्हेगार मात्र कधीच सापडत नाही, पण येथे हिंदू देवळातील पूजा अर्चा निर्विघ्नपणे चालू हेतआ आणि त्या भ्रष्ट करण्याची कोणाचीही हिंमत नाही. याचे कारण असे की, आम्ही कुठल्याही जमातीची पूजास्थाने भ्रष्ट किंवा अपवित्र करणाऱ्या विरूद्ध खंबीरपणे कायद्याचा बडगा उगारतो. मुसलमान अधिकाऱ्यांना अन्यायाने वागवल्याची किंवा त्यांचे न्याय्य हक्क हिरावून घेतल्याची अनेक उदाहरणे तुम्हाला तेथे दिसून येतील; येथे आम्ही हिंदू अधिकाऱ्यांना अन्याय वागणूक दिल्याचे एक तरी उदाहरण कुणी दाखवून द्यावे असे मी आव्हान देतो'.

एका बाजूला हे चित्र आणि दुसऱ्या बाजूला हिंदूमहासभेने उभे केलेले चित्र. काँग्रेस सरकारने मुसलमान धार्जिणे धोरण अनुसरल्याबद्दल तिने आपल्या सभेत काँग्रेसला दोष दिला, आणि काँग्रेसचा त्याग करण्यास हिंदूंना चेतविले. जातीय दंगे, काँग्रेस सरकारविरूद्ध मुस्लिम लीगचे कधीही न संपणारे दोषारोप; आणि सरकारी चौकशीनंतर सरकारने प्रसिद्ध केलेले इन्कार यांनी समतोल बुद्धीच्या माणसाला आपण जणू धुक्यातून चालत आहोत किंवा काय असे वाटावयास लावले. दंगे सुरू करण्या-बद्दल कुणाला दोष द्यावा हे सांगणे कठीण आहे; हे एक न सुटणारे कोडेच राहील असे वाटते. शेवटी, लीगने आपल्या नव्या कार्यक्रमानुसार, काँग्रेस राज्य व हिंदू यांच्याविरूद्ध मुसलमानांच्या ज्या तक्रारी होत्या त्यांची चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी पिरपूरच्या राजा महमद मेहदी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने सरकारी प्रवक्ते आणि हिंदू यांना आपल्या चौकशीच्या कुठल्याही टप्प्यावर सहकार्य करण्यास बोलावले नव्हते. आणि जरी त्यांना तसे निमंत्रण दिले गेले असते तरीसुद्धा त्यांनी कदाचित् या गोष्टीला नकारच दिला असता; परंतु तरीही पिरपूर समितीचा अहवाल हा हिंदू आणि काँग्रेस यांच्या सरकारविरूद्ध केलेला एकतर्फी अहवाल आहे असे मत प्रमृत झाले.

१९३८ च्या शेवटी शेवटी हा अहवाल प्रसिद्ध झाला. आणि समितीच्या अध्यक्षांच्या नावानुसार पिरपूर अहवाल म्हणून ओळखला जाऊ लागला. या अहवालाने काँग्रेसच्या 'बंद दरवाज्या' च्या धोरणावर हल्ला चढवला. आणि ब्रिटिश लोकशाही पद्धतीचे सरकार हिंदुस्तानात शक्य नाही याचा पुरावा म्हणून ह्या काँग्रेसच्या धोरणाचा

दाखला दिला. 'मुसलमानांना असे वाटते की, बहुसंख्यंकांच्या जुलुमाइतका दुसरा कुठलाही मोठा जुलूम असू शकणार नाही'. समितीने आणखी एक असा मुद्दा मांडला आहे की, हा फक्त मुसलमानांचा धार्मिक आणि सांस्कृतिक स्वातंत्र्याचा प्रश्न नाही : देशाच्या राज्य कारभारात त्यांना योग्य हिस्सा मिळालाच पाहिजे. काँग्रेस त्यांना हे देत नव्हती येवढेच नव्हे तर 'फोडा आणि राज्य करा' या ब्रिटिश करामतीने मुसलमानांची राजकीय सत्ता मोडण्याचा प्रयत्न करीत होती. याशिवाय अहवालात, सार्वजनिक नोकऱ्यातील अपुरे मुसलमानी प्रतिनिधित्व, मुसलमानांना न्याय्य वागणूक नाकारणाऱ्या अशा जिल्ह्याजिल्ह्यातील वस्तुतः 'सरकार सदृश्य' काँग्रेस समित्या, काँग्रेस झेंडा, गांधीची पूजा, त्यांनी गोरक्षणावर दिलेला भर आणि मुसलमान जमातीच्या नागरिक आणि सांस्कृतिक स्वातंत्र्यावर जाणून बुजून केलेले दुरगामी हल्ले वगैरे अनेक गोष्टींबद्दल समितीने तक्रारी केल्या आहेत. उर्दूऐवजी हिंदीचा वापर वाढवण्याचा काँग्रेस राज्याचा प्रयत्न ही समितीच्यादृष्टीने फार धूर्त चाल होती. 'जर स्वित्झर्लंडसारखा छोटा देश तीन भाषांमध्ये शिक्षण देऊ शकतो तर हिंदी प्रांतात एकापेक्षा अधिक भाषा शिकवणे खात्रीनेच शक्य आहे'.

पिरपूर अहवालापाठोपाठ काँग्रेस राज्यावर अशाच प्रकारचे आरोप करणारे आणखी दोन अहवाल आले. त्यांनी पिरपूर अहवालासारखा संयम पाळला नाही. त्यातील एक हा, बिहार मुस्लिम लीगच्या कार्यकारी समितीने, प्रांतातील मुसलमानांच्या काही तक्रारींची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल होता. तो मार्च १९३९ मध्ये प्रसिद्ध झाला. हा अहवाल एस्. एम्. शरीफ यांनी तयार केला असल्यामुळे त्याला शरीफ अहवाल असे नाव दिले गेले. तो प्रांतातील निरनिराळ्या भागात हिंदूंनी केलेल्या 'अत्याचारांनी' पुरेपूर भरला होता. 'हिंदू राज्यात' राहणे आपल्याला कसे अशक्य आहे हे मुसलमान वाचकावर ठसवण्याकरिता तपशील मांडला होता आणि तिरप्या टाईपमध्ये त्याची पुनरावृत्ती केली होती 'आपण या प्रांतातून स्थलांतर करावे की, सत्यानाशाला तोंड द्यावे याचा निर्णय मुसलमानांना लवकरच घ्यावा लागेल'. मुसलमानांच्या छळाचे धोरण स्वीकारल्याचा आरोप फक्त मंत्री आणि स्थानिक काँग्रेसवाले यांच्यावरच केला होता असे नव्हे तर राज्यकारभार आणि न्याय खाते यामधील नोकरांवरहि केला होता. अहवालाला लिहिलेल्या प्रस्तावनेत बिहार लीगच्या अध्यक्षांनी स्थलांतर सुचवण्याइतकी मजल जरी मारली नव्हती. आणि दोनही जमातींच्या अज्ञानी जनतेने परस्पर सहिष्णूतेचे तत्व पाळले पाहिजे हे पटवून देण्यासाठी, काँग्रेस व लीग यांच्या पुढाऱ्यांनी एकत्र प्रचार मोहिम काढली तर परिस्थिती अजूनहि आटोक्यात येईल यावर विश्वास व्यक्त केला होता.

बंगालचे फझलूल हक् यांनी १९३९ च्या डिसेंबरमध्ये काँग्रेसवर तिसरे आरोपपत्र प्रसिद्ध केले. ते वर्तमानपत्राकडे पाठवले आणि नंतर ते 'काँग्रेस राज्यातील

मुसलमानांचा छळ' या नावाने पुस्तकरुपाने पुनर्मुद्रित झाले. हक् लिहितात निःपक्षपाती सरकारांनी आतापर्यंत लगाम घातलेल्या हिंदूंच्या उघडया नागडया उद्दामपणाला, काँग्रेस धोरणाने दशदिशा मोकळया झाल्या ······ त्यांनी आपली इच्छा मुसलमान अल्पसंख्यंकांवर लादण्याची तयारी केली. आणि त्यांची इच्छा काय होती ? ······ गोमातेचे संरक्षण झालेच पाहिजे ····· मुसलमानांना गाईचे मांस खाण्याची परवानगी देता कामा नये ······ मुसलमान धर्म नमला पाहिजे कारण हा देश हिंदूंचा नाही काय ? म्हणून अझनला (प्रार्थनेला निमंत्रण)-मनाई, मशिदीत नमाझ पडणाऱ्यावर हल्ले, नमाझच्यावेळी मशिदीसमोर गलका करणाऱ्या विजयी मिरवणूकांवर भर, ······ अशा परिस्थितीत एका शोककारक घटनेपाठोपाठ दुसरी आली तर नवल काय ?

आरोपपत्रात बिहारमधल्या ७२ व संयुक्त प्रांतातल्या ३३ प्रसंगांचे वर्णन आणि मध्यप्रदेशातील अशाच घटनांचे वर्णन दिले आहे. 'फार काळापासून चालत आलेल्या गोवधावर बंदी घालण्यात आली आहे. मुसलमान खाटकांवर हल्ले होत आहेत, अझन तुच्छ मानून ते थांबवले जात आहेत, मुस्लिम दुकानावर बहिष्कार टाकला जात आहे, खेडयातील सार्वजनिक विहिरींचा वापर करण्यास मुसलमानांना बंदी केली जात आहे. वय किंवा स्त्री पुरुष भेद काही न पाहता त्यांच्यावर हल्ले चढवले जात आहेत'.

मध्यप्रदेश सरकारवर असा आरोप करण्यात आला होता की, हिंदू धर्माने प्रेरित झालेल्या शिक्षणाने मुसलमानांचे हिंदूकरण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. ही पद्धती गांधींच्या बुनियादी शिक्षण पद्धतीच्या (Basic Education) कल्पनेतून उदयास आली. ही पद्धती वर्धा येथे डॉ. झकिर हुसेन या राष्ट्रीय मुसलमानाच्या नेतृत्वाखालील शिक्षण शास्त्रज्ञांच्या समितीने पूर्णपणे परिश्रम करून आणि पारखून घेतली होती. कल्पना अशी होती की, शाळा चालण्याकरिता, प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी सूत कातण्यासारख्या छोटयाशा विधायक कार्यातून पैसा मिळवावा म्हणजे या* शाळांचा आर्थिक भार सार्वजनिक तिजोरी होण्याचा संभव नाही. काँग्रेस मंत्रिमंडळे येण्याच्या फार पूर्वी जेव्हा सरकारी प्रवक्ते शिक्षणाचा संबंध जकातीच्या कराशी जोडत होते त्यावेळेपासून हा विचार गांधींच्या मनात होता. लोकांच्या नैतिक उन्नत्तिकरिता त्यांनी दारूबंदी सुचवली होती. त्यावेळी त्यांना असे सांगण्यात आले होते की, दारूवरील कराचे उत्पन्न बंद झाले तर शिक्षणावर त्याचा परिणाम होईल. याला 'बुनियादी' शिक्षणपद्धती हे उत्तर होते. चरखा आणि माग ही राष्ट्रवादाची प्रतिके बनली. पण राष्ट्रवादापासून आणि त्याच्या सर्व आविष्कारांपासून पूर्णपणे दूर रहा असा आदेश मुसलमानांना त्यांच्या पुढाऱ्यांनी दिला असल्यामुळे, त्यांना यात काहीतरी काँग्रेसचे हिंदुत्व दिसले. शहरातील बरेच मुसलमान स्वतः विणकर असूनही त्यांनी माग चालवण्याचे टाळले. लीगवाल्या मुसलमानांनी बुनियादी

शिक्षणपद्धतीच्या कार्यक्रमाला विरोध केला आणि त्यांच्या विरोधाला जणू पुष्टी देण्यासाठीच की काय मध्य प्रांतात सुरू झालेल्या बुनियादी शाळांना, सुशिक्षित मुसलमानांना तिटकारा वाटेल असे नाव देण्यात आले. ते नाव विद्या मंदिर. मंदिर म्हणजे गृह-घर, फार तर पवित्र गृह; त्यातून कुठल्याही धर्माचा अधिक्षेप होण्याचे कारण नाही. परंतु नेहमीच्या भाषेत, मंदिर याचा अर्थ बहुतेक हिंदू देवालय असा आहे. उच्च विद्याव्यासंग असलेल्या हिंदूंशिवाय कुठलाही हिंदू सर्वसामान्य घरासाठी मंदिर हा शब्द वापरणार नाही. शिक्षणाच्या बाबतीतल्या मुसलमानांच्या नाजूक भावनांची ज्यांना जाणीव आहे त्या कुणीही हा शब्द गाळला असता आणि एकादे व्यावहारिक नाव वापरले असते. गांधी स्वतःच म्हणाले होते 'शिक्षणाच्या वर्धा योजनेतून आम्ही धर्मशिक्षण वगळले आहे, कारण आज धर्म ज्या पद्धतीने शिकवले जात आहेत ती पद्धत एकतेपेक्षा भांडणांनाच चालना देईल.' मध्यप्रदेश सरकारने आपल्या नवीन शाळांना दिलेल्या नावामध्ये गांधींच्या या मताचे प्रतिबिंब पडावयास हवे होते परंतु तसे झाले नाही.

काँग्रेस सरकारविरुद्ध लीगच्या तक्रारी आणि हिंदूमहासभेची कुरकूर बरीच वर्षे चालू होती. हिंदु मुसलमानांचा दंगा, हिंदूत्व आणि इस्लाम धर्म यांच्या परस्परांच्या विधीमुळे झालेला प्रक्षोभ, हिंदी उर्दू वाद, निरनिराळ्या धार्मिक जमातींमध्ये, सरकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नोकऱ्यांची वाटणी वगैरे अनेक प्रश्न काँग्रेस राज्यात काही नवीन उदभवले होते असे नव्हते. १९२० च्या आधीपासूनच हिंदू मुसलमानांचे दंगे होत होते; दोनहि जमातींच्या कनिष्ठ वर्गांनी एकमेकांची डोकी फोडली होती आणि शांतता प्रस्थापित झाल्याबरोबर दोनही जमातींचे पुढारी एकमेकांना दोष देत होते, आणि पुढच्या दंग्यात सूड घेण्यासाठी म्हणून हिंदू संघटन आणि तांझीम सारख्या संघटना बांधीत होते. खिलाफत चळवळीत एकत्र आलेल्या प्रमुख हिंदू मुसलमान पुढाऱ्यांनी या दोन जमातीत शेकडो वर्षे राहतील असे नमुनेदार संबंध प्रस्थापित करण्यासाठी फार कष्ट घेतले, परंतु जातीय भावना कमी झाली नाही. ही जातीय भावना, काँग्रेसच्या 'हिंदू राज्यात' ज्यांना कधीच शिक्षा होणार नाही असे, हिंदूंनी मुसलमानांवर केलेले योजनाबद्ध हल्ले, असे दंग्यांचे वर्णन करणाऱ्या मुस्लिम लीगच्या प्रचारात चपखल बसली. सरकारच्या हिंदू अधिकाऱ्यांप्रमाणे मुसलमान अधिकारीहि जातीय वातावरणात वाढलेले होते. त्यापैकी स्वजातीच्या अभिमानाने भरलेल्या अनेक जणांनी आपली अधिकृत कामे बजावताना जातीय कल दर्शवला होता. या दोषारोपात, थोडेफार सत्य नेहमीच होते. ही उणीव काँग्रेस सरकारांना वारसा म्हणून मिळाली होती. म्हणून तिला उत्तेजन देण्याला काँग्रेस राज्ये जबाबदार आहेत असे म्हणणे बरोबर नव्हते. जातीय सुसंवादाकरिता काँग्रेस पुढारी नेहमी-प्रमाणेच विनंती करीत होते आणि ही विनंती नेहमीप्रमाणेच या कानात शिरून त्या कानातून बाहेर पडत होती. प्रतिवर्षी जातीय द्वेष वाढत जाणाऱ्या गेल्या वीस

वर्षात काँग्रेस ही एक असहाय्य आणि करूण अशी प्रेक्षक बनली होती. हिंदू मुसलमान तेढीला बराच हातभार लावणाऱ्या हिंदूमहासभा, मुस्लिम लीग आणि इतर मुस्लिम संघटनांच्याबाबतीत मात्र असे म्हणता येणार नाही.

हिंदी उर्दू वाद, हाही असाच जुना होता. हिंदीला दूर ठेवण्यासाठी कोर्टाची भाषा पर्शियन लिपीत लिहिलेली उर्दू ही होती. आणि याबद्दल हिंदूंनी उर्दुला कधीच क्षमा केली नव्हती. हिंदीला उर्दूचा दर्जा प्राप्त व्हावा म्हणून हिंदीच्या पुरस्कर्त्यांनी पुष्कळच निष्फळ प्रयत्न केले होते; या निष्फळतेमुळे ते उर्दूचे शत्रू बनले आणि जेव्हा काँग्रेस सरकारने त्यांना समानता दिली तेव्हा त्यांनी त्याचा पुरेपूर सूड उगवून घेतला. मानसशास्त्रीयदृष्टया बघितले तर हे स्वाभाविकच होते. शुद्ध हिंदी ही एक दुबळी भाषा होती; तिची समृद्धी संस्कृतच्या उधारीवर अवलंबून होती. शेकडो वर्षे पर्शियन आणि अरेबिकमधून घेतलेले आणि हिंदी व उर्दू या दोन्हि भाषात वापरात असलेले अनेक शब्द, हिंदीच्या पुरस्कर्त्यांनी मोठ्या उत्साहाने आणि सूड-बुद्धीने टाकून देण्यास आणि हिंदी भाषा संस्कृतनिष्ठ करण्यास सुरुवात केली. याचे उत्साही पुरस्कर्ते शिक्षण खात्यातील अधिकाऱ्यातही होते. आणि क्रमिक पुस्तके लिहिताना वापरण्यात येणाऱ्या शब्दांवर नियंत्रण ठेवणे कुठल्याही सरकारला अशक्यच असते. या पुरस्कर्त्यात जे जातीय होते त्यांनी क्रमिक पुस्तकात हिंदू वीरांच्या चरित्र कथा भरून आणि मुस्लिम वीरांच्या कथा बहुतेक वगळून आपल्या वीरांच्या कथा बहुतेक वगळून आपल्या जातीय वादाचे शमन करून घेतले. राज्यकारभारांच्या खालच्या पातळीवर केले गेलेले अविचार एकंदर कार्याचा वार्षिक आढावा घेताना सुधारणे शक्य होते; परंतु काँग्रेस सरकार केवळ दोन वर्षे सत्तेवर होते आणि हे करण्यास त्याला वेळ नव्हता. जुनाट दुखणी बरी करण्यास दोन वर्षांचा कालावधी फारच अपुरा होता. सर्वसामान्यपणे जीनांनी हे ओळखले असते परंतु; त्यांच्यापुढे फार कठीण पर्याय उभा होता. एका बाजूला जीनांना असलेली ही जाणीव आणि दुसऱ्या बाजूला या जाणीवेमुळे चंद्रकोरीच्या हिरव्या निशाणाखाली मुस्लिम एकजूट करण्याच्या मुस्लिम लीगच्या वाढत्या मोहिमेला होणारा अपाय, ह्या दोन गोष्टींतून त्यांना पर्याय शोधावयाचा होता.

सरकारी नोकऱ्यांचा बराचसा भाग हिंदूंना मिळतो आणि वाटप विषम प्रमाणात होते ही मुसलमानांची तक्रारही काही नवी नव्हती. मुसलमानांनी राजकारणापेक्षा शिक्षण पसंत करावे असे जेव्हा सर सय्यद अहमद खान यांनी सांगितले होते, तेव्हापासून, आणि काँग्रेस चळवळीपेक्षा ब्रिटिश सत्तेला मुसलमानांनी अधिक एकनिष्ठ रहावे असे सांगितले होते तेव्हापासून ती अस्तित्वात होती. अर्धशतक उलटले होते परंतु आपला नोकऱ्यांचा हिस्सा चांचणी परिक्षेमधून मिळवण्यासाठी मुसलमान अजूनही लायक बनले नव्हते. आणि गव्हर्नमेंट ऑफ इंडियाच्या ४ जुलै १९३४ च्या ठरावाने, केंद्रिय सरकारच्या मुलकी नोकऱ्यांपैकी (अखिल भारतीय नोकऱ्या)

२५ टक्के नोकऱ्या मुसलमानांच्या नावे ठेवल्या गेल्या. या ठरावाने अशी तरतूद केली होती की, 'खुल्या स्पर्धेच्या भरतीत जर मुसलमानांना ····· या टक्केवारीपेक्षा कमी जागा मिळत असतील तर त्यांना ही टक्केवारी नेमणुका करून दिली जाईल'. उच्च दर्जाच्या नोकऱ्यात मुसलमानांची तक्रार असण्याचे कारण नव्हते. परंतु कनिष्ठ दर्जाच्या नोकऱ्यातील भरती सर्वसामान्यपणे खातेप्रमुख करीत असल्यामुळे त्यांना तक्रारी करण्यास कारण होते. या कनिष्ठ दर्जाच्या नोकऱ्यांच्या नेमणुका करणारे अधिकारी हिंदू मुस्लिम अशा जातीय दृष्टीपेक्षाही गर्हणीय अशा प्रवृत्तीकडे कल दाखवीत; या प्रवृत्ती म्हणजे स्वतःच्या जातीचा विचार किंवा वशिलेबाजी. गुणांच्या कसोटीवर क्वचितच निवड होत असे, आणि लायक हिंदूंनाही तक्रार करीत रहावे लागत असे. परंतु लीगभोवती आता गोळा होत असलेल्या कनिष्ठ जातीच्या मुसलमानांनी या नेमणुका करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या वर्तनाचा संबंध, हिंदू प्रवृत्तीकडे असलेला त्यांचा कल, असा लावला आणि 'हिंदू राज्यात' समानता मिळणे अशक्य आहे अशी भावना जोपासली. पूर्वी मुसलमान पुढाऱ्यांनी नोकऱ्यातील आपल्या कमी प्रतिनिधित्वाबद्दल आपल्या अशिक्षितपणाला दोष दिला होता; आता ते काँग्रेस सरकारला दोष देत होते. शिवाय, केवळ दोन वर्षांच्या कारकिर्दीत, मंत्रिमंडळांनी सरकारी नोकऱ्यांच्या समान विभागणीसाठी चौकशी समिती नेमून नोकऱ्यांच्या प्रश्नाचा सांगोपांग विचार करावा अशी अपेक्षा करणे बरोबर नव्हते. प्रचलित वातावरणात परिस्थितीची योग्य अजमावणी होणे अशक्य होते.

एकंदर गोष्टींचा सारासार विचार लीगला करावयास लावायाची फक्त एकच संधी होती आणि ती म्हणजे लीग ही मुसलमानांची एकमेव प्रतिनिधी आहे म्हणून तिला काँग्रेसने मान्यता देणे, आणि मंत्रिमंडळात तिचा भागिदारीचा हक्क कबूल करणे. ही मागणी लीगने काँग्रेसकडे वारंवार केली होती. आणि दरवेळी ती काँग्रेसने झिडकारली होती. लीगने मुसलमानांना दिलेल्या आपल्या झेंड्याखाली या, या निमंत्रणाने हिंदूमहासभेला तशीच मोहिम हिंदूंमध्ये सुरू करण्यास चालना मिळाली आक्रमक राजकारणात महासभेचे परत आगमन झाल्यामुळे मुसलमानांना एकत्र आणण्याचे लीगचे काम सोपे झाले. तसेच हिंदू आणि मुसलमान मिळून एक राष्ट्र बनू शकत नाही ही मुसलमानी कल्पनाही त्यामुळे पक्की झाली. १९३७ च्या हिंदूमहासभेच्या अधिवेशनात आपल्या अध्यक्षीय खुर्चीवरून बोलताना, काँग्रेस सरकारने सुटका केलेले सुप्रसिद्ध क्रांतिकारक पुढारी, विनायक दामोदर सावरकर म्हणाले 'हिंदुस्तान हा संवादित्वाने सांधलेला किंवा अशी नुसती इच्छा केल्याबरोबर सांधणारा एक देश आहे, अशी कल्पना करण्याची गंभीर चूक अनेक पोरकट राजकारणी लोक करीत आहेत. हे आमचे सदिच्छा बाळगणारे पण अविचारी मित्र आपल्या स्वप्नांनाच वस्तुस्थिती समजत आहेत. म्हणून ते जातीय समस्येबद्दल उतावीळ झाले आहेत आणि त्याबद्दल जातीय संघटनांना जबाबदार धरीत आहेत. पण खरी गोष्ट अशी आहे की

जातीय प्रश्न म्हणजे, हिंदू आणि मुसलमानांमध्ये असलेल्या सांस्कृतिक, धार्मिक आणि राष्ट्रीय शत्रुत्वाचा तो आम्हाला दिलेला अनेक शतकांचा वारसा आहे. योग्यवेळी तो सोडवता येईल; पण हे मान्य करण्याचे नाकारून तुम्हाला तो दडपता येणार नाही. खोलवर रुजलेल्या रोगाकडे दुर्लक्ष करण्यापेक्षा त्याचे निदान करून औषध योजना करणे अधिक सुरक्षिततेचे आहे. आहेत त्या गोष्टी कितीही अप्रिय असल्या तरी त्यांना धैर्याने तोंड देऊ या. आज हिंदुस्तान एकात्म आणि एक जिनसी राष्ट्र आहे असे धरून चालता येणार नाही. उलट, त्याच्या प्रवाहात दोन राष्ट्रे आहेत. एक हिंदूचे आणि दुसरे मुसलमानांचे.

१९३९ मध्ये कलकत्ता येथे भरलेल्या त्यांच्या अधिवेशनात त्यांनी यावर पुन्हा भर दिला : 'आम्हा हिंदूंचे आमच्या धर्मात हजार बाराशे मतभेद असले तरी, आम्ही धार्मिक, सांस्कृतिक, वांशिक, ऐतिहासिक, भाषिक आणि इतर अशाच नात्यांनी असे बांधलो गेलो आहोत की, आम्हाला कुठच्याही अहिंदू लोकांच्या गुणवैधर्म्यांच्या संदर्भात उभे केले तर आम्ही निःसंशय एक जिनसी आहोत हे ठळकपणे दिसून येईल. मग हे लोक इंग्रज असोत, जपानी असोत, की अगदी हिंदी मुसलमान असोत. आणि म्हणून आज, काश्मिरपासून मद्रासपर्यंत आणि सिंधपासून आसामपर्यंत आम्हा हिंदूंना आमचे स्वतःचे एक राष्ट्र का पाहिजे आहे हे लक्षात येईल'.

परंतु याला सावरकरांचे उत्तर हिंदू हिंदुस्तान आणि मुस्लिम हिंदुस्तान, अशी देशाची फाळणी, हे नव्हते. त्यांना बहुसंख्यत्व प्रस्थापित करणाऱ्या हिंदूंसाठी वर्चस्वाचे स्थान पाहिजे होते. मुसलमानांचे हक्क सुरक्षित करण्याबद्दल त्यांची सूचना अशी होती : 'एकदा "एका माणसाला एक मत", गुणवत्तेवर आधारलेल्या सार्वजनिक नोकऱ्या आणि त्याच्याच जोडीला वंश किंवा धर्म निरपेक्ष पद्धतीने ठरवलेले मूलभूत हक्क आणि जबाबदाऱ्या, ही तत्वे हिंदूमहासभेने स्वीकारली आणि प्रस्थापित केली..... म्हणजे तात्विकदृष्ट्या अल्पसंख्यंकांचे खास हक्क हे नुसतेच अनावश्यक बनतात असे नव्हे तर ते आत्मविसंगत ठरतात. कारण ते जातीय तत्वावर परत बहुसंख्य आणि अल्पसंख्य अशी जाणीव सुरू करतात'.

दोन राष्ट्रांच्या सिद्धांताने सिंधच्या काही लीगवाल्यांची कल्पनाशक्ती खेचून घेतली. त्यांनी, ऑक्टोबर १९३८ मध्ये भरलेल्या लीगच्या वार्षिक अधिवेशनात हिंदुस्तानची फाळणी सुचवणारा ठराव संमत केला. आणि अशा रीतीने अखिल भारतीय मुस्लिम लीगवर सतरा महिन्यांनी आघाडी मारली. ठरावात म्हटले होते : 'या सिंध मुस्लिम लीगच्या अधिवेशनाला अशी आवश्यकता वाटत आहे की, या अवाढव्य हिंदुस्तान देशाच्या चिरकालीन शांततेच्या हिताच्यादृष्टीने, आणि हिंदू व मुसलमान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दोन राष्ट्रांच्या अखंड सांस्कृतिक प्रगतीच्या, आर्थिक आणि सामाजिक सुस्थितीच्या आणि राजकीय स्वयंनिर्णयाच्या हिताच्यादृष्टीने तो विभागला जावा. तो असा : 'एक मुसलमान राज्याचे संघराज्य आणि दुसरे मुसलमान

विरहीत राज्यांचे संघराज्य'

सिंध अधिवेशनाचे अध्यक्ष जीना होते. परंतु अजून त्यांचे मत दोन राष्ट्रांच्या सिद्धांताला अनुकूल नव्हते असे दिसते. ते स्वत: काँग्रेस सरकारवर हल्ले चढवण्यातच निमग्न होते. त्यांनी जाहीर व्यासपीठावरून केलेल्या काही विधानांमुळे गांधी, नेहरू, सुभाषचंद्र बोस, राजेंद्रप्रसाद आणि कृपलानी यासारख्या प्रमुख काँग्रेस पुढाऱ्यांना, जीनांनी पुढे मांडलेल्या तक्रारीत काही तथ्य आहे किंवा काय हे पाहण्यासाठी, त्यांच्याशी पत्रव्यवहार करणे भाग पडले. या सर्व लोकांनी लीगच्या प्रचाराचा इमला ज्यावर उभारला होता त्या मूलभूत पायाकडेच दुर्लक्ष केले; आणि ज्या तक्रारी या मूलभूत पायापासून अलग केल्या तर ढासळून जातील अशा तक्रारींच्या तपशिलात ते गुरफटून गेले. तेव्हा या पत्रव्यवहारातून काही निष्पन्न तर झाले नाहीच पण फक्त मनेमात्र थोडी अधिक दुखावली गेली, हे समजण्यासारखे आहे. काँग्रेसचे अध्यक्ष असलेल्या राजेंद्रप्रसादांनी ऑक्टोबर १९३९ मध्ये केलेली एक सूचना सुद्धा जीनांनी फेटाळली. ती सूचना अशी, हिंदुस्तानचे मुख्य न्यायाधीश मॉरिस ग्वॉयर यांच्यासारख्या एकाद्या नि:पक्षपाती व्यक्तीकडून लीगच्या तक्रारींची चौकशी करावी. जीना म्हणाले : 'ही गोष्ट आता व्हाइसरॉयच्या विचाराधीन आहे. आणि ज्या ज्या प्रांतात काँग्रेसचा राज्यकारभार आहे त्या त्या प्रांतात आमच्या गरजा भागवतील असे आणि पूर्ण सुरक्षिततेची भावना पुन्हा निर्माण करतील असे उपाय व कृती करण्याचा योग्य अधिकार त्यांनाच आहे.' परंतु व्हाइसरॉयनी कुठल्याही चौकशीचा हुकूम काढला नाही की, लीगच्या तक्रारी उचलून धरणारे एकादे निवेदनही काढले नाही. यानंतर जीनांनी आपल्या आरोपांची चौकशी करण्यासाठी रॉयल कमिशनची मागणी केली, परंतु ब्रिटिश सरकारनी ती मान्य केली नाही. तरीसुद्धा, संयुक्त प्रांताच्या काँग्रेस सरकारने, आपण मुसलमानांना दिलेली वागणूक योग्य होती ह्या आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ एक अधिकारी व्यक्ती उभी केली. संयुक्त प्रांताचे गव्हर्नर सर हॅरी हेग हे सेवानिवृत्त झाल्यानंतर, १९३९ सालाच्या शेवटी म्हणाले : 'जातीय प्रश्न सोडवताना मंत्री सर्वसाधारणपणे नि:पक्षपातीपणाने वागले, आणि जे न्याय्य होते ते करण्याची त्यांची इच्छा होती. मंत्र्यांची मुदत संपण्याच्या-वेळी ते हिंदूंना अन्यायाने वागवीत आहेत अशी गंभीर टीका हिंदूमहासभेने केली जरी वस्तुत: अशा टीकेला काही आधार नव्हता'.

लीगचा ब्रिटिश अधिकाऱ्यांवरचा विश्वास ऑगस्ट १९३९ पर्यंत ढासळलाच होता त्या महिन्याच्या २८ तारखेला तिच्या कार्यकारिणीने केलेल्या ठरावात म्हटले होते की, आपले स्थान संरक्षणांनी मिळवता येईल ही मुसलमानांनी बाळगलेली आशा 'चिरंतर दुजाभाव बाळगत असलेल्या बहुसंख्य जमातीच्या विरोधापुढे' पूर्णपणे भ्रामक ठरली आहे. 'काँग्रेस सरकारे असलेल्या प्रांतात अल्पसंख्यकांचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी व्हाइसरॉय आणि गव्हर्नर्स यांना दिलेल्या

खास अधिकारांचा वापर करण्यात त्यांनी दाखवलेली निखालस उपेक्षा आणि दुर्लक्ष यांच्याबद्दल' ह्या ठरावाने दुःख व्यक्त केले.

सप्टेंबर १९३९ मध्ये युरोपमध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले आणि हिंदुस्तानच्या राजकारणाचे स्वरुप काहीसे बदलले. ३ सप्टेंबरला युद्ध सुरू झाल्यानंतर काही तासातच, हिंदुस्तानच्या व्हाइसरॉयने प्रांतिक मंत्रिमंडळाशी काहीच विचार विनियम न करता हिंदुस्तान हा युद्धात पडलेला देश आहे असे जाहीर केले. घटनेने दिलेल्या प्रांतिक स्वायत्ततेसकट सर्व कलमे रद्द करण्याचा अधिकार व्हाइसरॉयला देणारी गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अॅक्टवरील उपसूचना पार्लमेंटने झपाट्याने, म्हणजे केवळ ११ मिनिटात संमत केली. त्याचदिवशी लोकांच्या नागरीक स्वातंत्र्यावर अनेक बंधने घालणारा हिंदुस्तान संरक्षक वटहुकूम व्हाइसरॉयने जारी केला. ह्या नवीन परिस्थितीचा विचार करण्यासाठी काँग्रेस कार्यकारिणीची बैठक भरली. आणि तिने असे म्हटले की, 'हे युद्ध जर, विद्यमान परिस्थिती साम्राज्यवादी मालकी, वसाहती, गुंतलेले हितसंबंध व हक्क यांचे संरक्षण करण्यासाठी असेल तर हिंदी लोकांना त्याच्याशी काही कर्तव्य नाही. पण प्रश्न जर लोकसत्ता आणि लोकसत्तेवर अधिष्ठित अशी जागतीक व्यवस्था असा असेल तर त्यात हिंदुस्तानला अतिशय रस आहे'. ब्रिटिश सरकारचे युद्ध हेतू काय आहेत आणि त्यांना हिंदुस्तानात मूर्तस्वरूप कसे दिले जाणार आहे, 'सद्यस्थितीत' कसे दिले जाणार आहे हे त्यांनी निःसंदिग्ध शब्दात स्पष्ट करावे, असे आवाहन कार्यकारिणीने ब्रिटिश सरकारला केले. जबाबदार सरकारची ताबडतोब स्थापना या काँग्रेसच्या मागणीपुढे ब्रिटिश सरकार नमले नाही आणि कार्यकारिणीने काँग्रेस मंत्रिमंडळांना अधिकार सोडण्याचा आदेश दिला. त्यांनी ती डिसेंबर १९३९ च्या सुमारास सोडली. जीनांनी राजीनाम्याचे स्वागत केले आणि काँग्रेस मंत्रिमंडळे परत येता कामा नयेत असे जाहीर केले. 'मुक्तता दिन आणि प्रार्थना दिन' साजरा करण्यासाठी त्यांनी २२ डिसेंबर हा दिवस मुक्रर केला 'काँग्रेस सरकारने निदान आपले काम करण्याचे सोडले ही सुटकेची निशाणी म्हणून' लीग संघटनांनी तो दिवस सर्व देशभर आणि इतर ठिकाणापेक्षा काँग्रेस राज्यात अधिक उत्साहाने साजरा केला.

काँग्रेस आणि लीग आता आपल्या कारकिर्दीच्या निर्णायक स्वरुपापर्यंत येऊन पोहोचले होते. काँग्रेस स्वातंत्र्याच्या आणि लीग पाकिस्तानच्या.

प्रकरण तिसावे

# फाळणी–हिंदू वर्चस्वापासून सुटका

१९३९ मध्ये कॉंग्रेस सत्तेवर असतानाच अखिल भारतीय मुस्लिम लीगने असे जाहीर केले की, मुस्लिम हिंदुस्तानचा 'लोकशाही आणि लोकसत्ताक पद्धतीच्या नावाखाली निःसंशय बहुसंख्य जमातीचे राज्य येईल अशा कुठल्याही "संघराज्यीय पद्धतींना" सक्त विरोध आहे. अशा पद्धती ज्या देशात अनेक जमाती आहेत आणि ज्यांचे एक राष्ट्रीय राज्य बनू शकत नाही त्या देशातील लोकांच्या प्रकृतीला मानवणार नाही' १९४० च्या फेब्रुवारीमध्ये जीनांनी वर्तमानपत्रात एक निवेदन देऊन हा कार्यकारी समितीचा ठराव अधिक स्पष्ट केला. त्यात त्यांनी म्हटले होते की, हिंदुस्तान हा एक राष्ट्रीयत्वाचा देश नसून दोन राष्ट्रीयत्वाचा देश आहे, हे गृहीत धरून घटनात्मक तडजोडीची सुरूवात झाली पाहिजे. मुसलमान कुठल्याही लवादापुढे न नमता आपले स्वतःचे राजकीय भवितव्य स्वतःच ठरवतील. एका केंद्रिय सरकाराखाली मुसलमान सुखी राहू शकणार नाहीत या आपल्या सिद्धांताकरिता ते मुसलमानांची मने हळूहळू तयार करीत होते. मार्च महिन्यात भरलेल्या लीगच्या वार्षिक अधिवेशनाला देशाच्या निरनिराळ्या भागातून हजर असलेल्या हजारो लोकांसमोर आपले अध्यक्षीय भाषण करताना जीना म्हणाले : 'इस्लाम आणि हिंदू धर्म यांचे खरे स्वरुप आमचे हिंदू मित्र का समजू शकत नाहीत हे समजणे फार कठीण झाले आहे. अगदी शब्दार्थाने बोलायचे झाले तर इस्लाम आणि हिंदुत्व हे धर्म नव्हेत तर त्या निश्चित स्वरुपाच्या सामाजिक संहिता आहेत. आणि हिंदू व मुसलमान कधीकाळी एक राष्ट्रीयत्व निर्माण करू शकतील हे एक स्वप्न आहे. हिंदी एक राष्ट्राची ही चुकीची कल्पना मर्यादेपलिकडे गेली आहे आणि तीच सर्व त्रासाचे मूळ आहे. आपल्या कल्पना आपण वेळीच तपासून घेतल्या नाहीत तर त्या हिंदुस्तानच्या नाशाला कारणीभूत होतील. हिंदू आणि मुसलमान ही स्वतंत्र धार्मिक तत्वज्ञाने आहेत, दोन सामाजिक पद्धती आहेत आणि दोन साहित्ये आहेत. या दोन जमातीत रोटी बेटी व्यवहार होत नाहीत. खरोखर त्या परस्परविरोधी विचारांवर आणि कल्पनांवर अधिष्ठित असलेल्या दोन संस्कृती आहेत. त्यांचे जीवनविषयक दृष्टिकोन भिन्न आहेत. हिंदू आणि मुसलमानांची स्फुर्तिस्थाने भिन्न आहेत हे स्पष्ट आहे. त्यांचे राष्ट्रीय ग्रंथ निराळे आहेत, ध्येय पुरुष निराळे आहेत आणि वीरकथा निराळ्या आहेत. अनेकदा एकाचा वीर पुरुष हा दुसऱ्याचा शत्रू

आहे तसेच त्यांचे विजय पराभवही एकमेकाला मारक आहेत. एक अल्पसंख्य व दुसरे बहुसंख्य अशा दोन राष्ट्रांना एका राज्यात जखडल्यास वाढता असंतोष निर्माण होणार आणि अखेरीस त्या राज्याच्या अगर शासनाच्या पायाचा विध्वंस होणार'.

जीनांच्या या विश्लेषणावर लीगने एका ठरावाने शिक्कामोर्तब केले. या ठरावाला पाकिस्तान ठराव म्हणून ओळखले जाते. त्यात असे म्हटले आहे की : 'अखिल भारतीय मुस्लिम लीगचे हे अधिवेशन असा ठराव संमत करीत आहे की, या अधिवेशनाचे विचारपूर्वक असे मत झाले आहे की, खालील मूलभूत तत्वावर आधारित असल्याशिवाय या देशात कुठलीही घटनात्मक योजना शक्य किंवा मुसलमानांना मान्य होणार नाही. हे तत्व असे : भौगोलिकदृष्टचा सलग घटकांची जरुरीप्रमाणे प्रादेशिक पुनर्रचना अशी बनवली जावी की, हिंदुस्तानच्या वायव्य आणि पूर्वेकडील विभागात मुस्लिम "स्वतंत्र राज्ये" निर्माण व्हावीत आणि त्यांचे प्रत्येक घटक हे स्वायत्त व सार्वभौम असतील'.

या ठरावाने आणि जीनांनी मांडलेली कल्पना नवीन नव्हती. प्रकरण २६ मध्ये सांगितल्याप्रमाणे १९३० च्या लीगच्या वार्षिक अधिवेशनात सर महमद इक्बाल यांनी ती प्रथम सुचवली. ते हिंदू वर्चस्व असलेल्या मध्यवर्ती सरकारच्या कल्पनेने भयभीत झाले होते. आणि त्यावर त्यांचा उपाय पुढीलप्रमाणे होता. 'अवशिष्ट अधिकार हे स्वतंत्र घटक राज्यांवरच संपूर्णपणे सोपवले पाहिजेत. सर्व स्वायत्त राज्यांनी खुषीने दिलेले जे अधिकार असतील तेच फक्त केंद्रिय संघराज्याकडे राहतील. खऱ्या स्वायत्ततेच्या तत्वांचा स्पष्टपणे आभाव असणारी किंवा मुसलमानांना निराळे राजकीय अस्तित्व अमान्य करणारी कुटलीही पद्धती, मग ती मुळात ब्रिटिश असो की हिंदी असो, ती मान्य करा असा मी हिंदुस्तानातील मुसलमानांना कधीच सल्ला देणार नाही'.

यानंतर थोडयाच दिवसात लंडनमधील काही मुस्लिम विद्यार्थ्यांनी, गोलमेज परिषदेला आलेल्या मुस्लिम प्रतिनिधीत मुस्लिम हिंदुस्तान आणि हिंदू हिंदुस्तान अशा हिंदुस्तानच्या फाळणीचा प्रचार केला. ही सूचना म्हणजे एक 'विद्यार्थी योजना', म्हणून प्रमुख मुस्लिम प्रतिनिधींनी ती झिडकारली आणि निवडणूक पद्धती वरील चर्चेच्यावेळी तिची दखलही घेतली नाही. परंतु विद्यार्थ्यांनी ही कल्पना निग्रहाने पुढे रेटली आणि दोन वर्षानंतर, जानेवारी १९३३ मध्ये तिसऱ्या गोलमेज परिषदेच्यावेळी, त्यांच्यापैकी सी रहमत अली, महमद अस्लमखान, महमद सादीक आणि इनायतुल्ला खान, या चार विद्यार्थ्यांनी केंब्रिजहून एक चार पानी छापील पत्र काढले. त्यात म्हटले होते की, जरी सर इक्बाल यांनी, 'मुस्लिम प्रांत हे अखिल भारतीय संघराज्याचे घटक बनतील अशा एक राज्यात सामील करावेत अशी सूचना केली असली तरी आम्ही असे सुचवतो की, या प्रांतांचे स्वतःचे असे निराळे संघराज्य असावे. जेथे आपण आपल्या नशिबाचे आणि आपल्या अंतःकरणाचे धनी राहणार

नाही, अशा हिंदू वर्चस्वाच्या संघराज्यात जर आपण फसलो तर या हिंदुस्तानात आपल्याला समाधान व शांती मिळणार नाही. पाकस्तान, म्हणजे ज्याचा अर्थ आम्ही, पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, काश्मिर, सिंध आणि बलुचिस्तान हे हिंदुस्तानचे पाच उत्तरेकडचे घटक असा करतो त्यात राहणाऱ्या आमच्या ३ कोटी मुस्लिम बांधवांच्यावतीने या भावना व्यक्त केल्या गेल्या आहेत. (पाकस्तान पवित्रांचा देश नवीन मुस्लिम राज्याला नंतर दिले गेलेले नाव, पाकिस्तान) विद्यार्थ्यांच्या 'आता किंवा कधीच नाही' या छापील पत्रकात वापरलेल्या शब्दात आणि वाक्या-वाक्यात आणि जीनांनी लाहोर अधिवेशनात केलेल्या भाषणात लक्षात येण्याइतके साधर्म्य होते. त्या पत्रकात म्हटले होते : 'हिंदुस्तान हे नाव केवळ एका देशाचे नाही, की एकाच राष्ट्राचे माहेरघर नाही. वास्तविक हा एक राज्याचा निर्देश इतिहासात ब्रिटिशांनी प्रथम केला.······ आम्ही रोटी बेटी व्यवहार करीत नाही. आमचे राष्ट्रीय रीतीरिवाज आणि पंचांगे आणि आमचे अन्न आणि पोषाखसुद्धा निराळे आहेत'.

जुलै १९३५ मध्ये रहमत अली यांनी स्वतःच आपण 'पाकिस्तान राष्ट्रीय चळवळीचा प्रणेता' असल्याचे जाहीर केले आणि दुसरे एक चार पानी छापील पत्रक केंब्रिजच्या दुसऱ्या एका पत्त्यावरून प्रसिद्ध केले. नवीन पत्रकात फक्त एकच नवा मुद्दा मांडला होता. तो म्हणजे 'जर ब्रम्हदेश हिंदुस्तानापासून वेगळा केला जातो तर पाकिस्तानवर······ हिंदी संघराज्यात राहण्याची सक्ती का? हे आम्हाला गूढ वाटते'. रहमत अलींची कल्पना मूळ धरू शकली नाही. काही वर्षे उलटल्या नंतर वारा अनुकूल वाहू लागल्याचे दिसू लागले. आणि १९४० मध्ये त्यांनी कराची येथे आपल्या चळवळीच्या उच्चस्तर मंडळा' च्या बैठकीत एक निवेदन केले. (हे निवेदन हिंदी वर्तमानपत्रात पुनर्मुद्रित केले गेले आणि इंग्लंडमध्ये 'इस्लामची मिल्लत आणि हिंदीवादाचा धोका', कर्ते सी रहमत अली, पाकिस्तान राष्ट्रीय चळवळीचे संस्थापक–अध्यक्ष, १६ मॉन्टेग्यु रोड, केंब्रिज या नावाच्या पुस्तिकेच्या रुपाने प्रसिद्ध झाले.) या निवेदनात त्यांनी पाकिस्तानचा पुरस्कार परत असा केला होता :

(१) या तथाकथित हिंदुस्तानातील मुसलमान हे 'मुस्लिम आहेत हिंदू नव्हेत; पाकिस्तानी आहेत हिंदुस्तानी नव्हेत; आणि आशियाई आहेत भारतीय नव्हेत···· भूतकालीन दृष्टीने पाहिले तर आजचा हिंदुस्तान हा कालचा दक्षिण आशिया. पण भावीदृष्टिने पाहिले तर संघटीत अशा स्वतंत्र राष्ट्रांचे ते एक क्षेत्र आहे';

(२) मिल्लतसमोर आज एकच निवड आहे; ती म्हणजे 'आशियाची पुर्नरचना आणि हिंदुस्तानची विघटना.' पूर्वी 'भारतीयकरणाने' आमच्या इस्लामच्या मूल्यांचा दर्जा अध्यात्मिक आणि नैतिक दृष्टीने भ्रष्ट केला आणि राजकीयदृष्ट्या त्याने आमचे वर्चस्व हिरावून घेतले, आम्हाला राष्ट्रीय सार्वभौमत्वाला मुकवले आणि "अल्पसंख्यांक जमात" बनवले. भावी काळात हे 'भारतीयकरण'

हिंदुस्तानच्या प्रादेशिक एकतेचे प्रमाण धरून केंद्रिय सरकार निर्माण करण्याची, तिचा मुलकी कारभार ताब्यात ठेवण्याची आणि सैन्यावर हुकूमत चालविण्याची ······ योजना आखीत आहे. आपल्या सत्तेबद्दल त्याची खात्री झाल्यावर ते लोकसत्तेच्या नावाखाली आणि ब्रिटिश संगिनींच्या मदतीने त्याचा उपयोग बळजबरी करण्याकडे करतील आणि आम्हाला, त्याच्या भक्ष्याला, चिरडून टाकून पूर्णपणे दास्यात अडकवतील ';

(३) 'मुसलमानांची जन्मभूमी कधीच नसलेल्या आणि कधी होऊही न शकणाऱ्या' हिंदुस्तानची सर्व बंधन तोडूनच फक्त 'मिल्लतचे' संरक्षण होऊ शकेल. वायव्य हिंदुस्तानने पाकिस्तानचे सार्वभौम राष्ट्र स्थापन केलेच पाहिजे.,

रहमत अलींच्या पाकिस्तानच्या नकाशात निरनिराळ्या नावांचे तीन स्वतंत्र मुस्लिम घटक दाखवले होते. सरहद्द प्रांत, पंजाब, सिंध, काश्मीर आणि बलुचिस्तान यांचा पाकिस्तान नावाचा पहिला विभाग, दुसरा बंगाल आणि आसामच्या पाठीमागील प्रदेशाचा बंग-इ इस्लाम नावाचा आणि तिसरा निझामाच्या उस्मान या नावाच्या वंशावरून आलेला हैद्राबाद संस्थानचा, उस्मानिस्तान या नावाचा.

मुस्लिम बुद्धिजीवी वर्गाच्या प्रवक्त्यांनी 'हिंदू वर्चस्वाच्या' मध्यवर्ती सरकाराखालील मुसलमानांच्या भवितव्याबद्दल काळजी व्यक्त केली आणि राजकीय दृष्टी असलेल्या अनेक लोकांनी आपापल्या योजना तयार केल्या. त्यात, कमीत कमी सत्ता असलेले संघराज्य मान्य करणारे डॉ. सय्यद अब्दुल लतीफ; प्रत्येक निराळे संघराज्य असलेल्या पाच 'देशात' हिंदुस्तानची विभागणी करणारे सर महम्मद शहा नवाझखान; 'दोन प्रमुख जमातींपैकी प्रत्येक जमातीचे सामर्थ्य प्रतिबिंबीत करणारी दोन निरनिराळी संघराज्ये मान्य करणारे सर अब्दुल हरून; आणि अधिकाधिक स्वायत्तता देणाऱ्या सात विभागात देशाची परत विभागणी करून शक्य तितके विस्कळीत संघराज्य मान्य करणारे सर शिकंदर हियातखान हे लोकप्रमुख होते.

सर्व पक्ष परिषदेच्यावेळी आणि त्यानंतरच्या झगड्याच्या तंगीच्या काळात काँग्रेस विचाराच्या मुस्लिम पुढाऱ्यांनी प्रतिपादिलेल्या आणि पाठिंबा दिलेल्या हिंदी एक राष्ट्रीयत्वाचे आणि एक हिंदी जमातीचे त्यांचे स्वप्न अजूनही कायम होते. आणि त्यांनी त्यावेळेप्रमाणेच एक अखिल भारतीय स्वतंत्र मुस्लिम परिषद दिल्लीला भरवली. काँग्रेस गटाच्या मदतीने सिंधच्या पंतप्रधान पदावर चढलेले खान बहादूर अल्लाबक्ष हे तिचे अध्यक्ष होते. लीगने सुचवलेल्या फाळणीचा या परिषदेने निषेध केला, आणि हिंदी मुसलमानांचे प्रतिनिधी आपण असल्याचा लीगचा दावा त्यांनी नाकबूल केला. ही परिषद सर्व पक्ष मुस्लिम परिषदेला आव्हान देण्यासाठी भरलेल्या पूर्वीच्या परिषदेप्रमाणेच निष्प्रभ ठरली. परंतु सिंध, वायव्य सरहद्द प्रांत, पंजाब आणि बंगाल या प्रांतांच्या कायदेमंडळातील बहुतेक मुसलमान सभासदांना कुठलीही फाळणी अजिबात नको होती, ही गोष्ट लीगचा ठराव व इतर योजना यांनी ध्यानात

घेतली नाही. वायव्य सरहद्द प्रांतात काँग्रेस मंत्रिमंडळ होते आणि सिंधमध्ये काँग्रेस अनुकूल मंत्रिमंडळ होते. फाळणीचा ठराव मांडणाऱ्या आणि आपल्या क्षणिक उत्साहात आपल्यापैकी प्रत्येकजण वाघ आणि सिंह आहेत' असे म्हणणाऱ्या बंगालच्या पंतप्रधान फझलूल हकनी, १९४१ च्या शेवटी लीगचा निषेध केला, लीगला वगळून काँग्रेस पक्षाचाच एक भाग असलेल्या फॉरवर्ड ब्लॉकच्या मदतीने सरकार बनवले आणि फाळणी बंगालला लागू होत नाही असा फाळणीच्या ठरावाचा अर्थ लावला. पंजाबमध्ये सर शिकंदरानंतर आलेल्या मलिक खिजर हियातखान यांनी जीनांची हुकूमशाही फेटाळली. हे उदास वातावरण आशादायी बनवण्याचे कठीण कार्य जीना आणि त्यांच्या सहकार्यांना करावयाचे होते. त्यांच्या सतत प्रयत्नामुळे आणि परिस्थितीमुळे त्यांना अनकूल वातावरण कसे निर्माण झाले हे आपण पुढील प्रकरणी पाहू.

---

प्रकरण एकतिसावे

# पराभूत लीगचा विधीमंडळातील 'विजय'

परपूर अहवाल, शेरिफ अहवाल आणि अशाच प्रकारच्या इतर अहवालातील श्रीमंत हिंदूंच्या विरोधाची आणि काँग्रेसच्या विरोधाची सामुग्री हेच इंधन असलेली, आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी काढल्या जाणाऱ्या काँग्रेसच्या मोठमोठ्या मोहिमांना मागे टाकणारी लीगची प्रचार यंत्रणा, ज्या काँग्रेस प्रांतात ती निर्माण झाली त्या काँग्रेस प्रांतांकडून मुसलमान बहुसंख्य प्रांतांकडे जलदीने वाढत होती. पंजाबचे पंतप्रधान सर शिकंदर हियातखान आणि बंगालचे पंतप्रधान फझलुल हक् हे आपल्या अनुयायांसह आधीच लीगचे सभासद झाले होते. परंतु लीगच्या ध्येयवादाने त्यांचे मतांतर झाले आणि ते नवे लेबल धारण करण्यास प्रवृत्त झाले असे नव्हते हे लवकरच स्पष्ट होईल. नंतर बाहेर आलेल्या काँग्रेस विरुद्ध आरोपपत्रकांचा लीगने मुसलमान बहुसंख्य प्रांतात पुरेपूर उपयोग करून घेतला. मुसलमानांना एकत्र आणण्यासाठी धर्माच्या नावावर आवाहन करण्याइतका दुसरा कुठलाच उपाय अधिक यशस्वी होऊ शकला नसता आणि इस्लामचा अपमान झाल्याच्या वृत्तांताव्यतिरिक्त दुसऱ्या कशानेच त्यांचा संताप जागृत होऊ शकला नसता; मग हा अपमान एकाद्या शेजारच्या खेड्याने केलेला असो अगर शेजारच्या प्रांतानी केलेला असो, त्याला महत्व नव्हते. परंतु ज्यांनी 'वीस आणि तीस' या दशकात फार तीव्र स्वरुपाचे जातीय दंगे पाहिले होते ते तावून सुलाखून निघालेले मुसलमान राजकारणी, या प्रचाराने फारसे विचलित झाले नाहीत आणि ते आपल्या हिंदू सहकाऱ्यांसह अजूनही मंत्रिमंडळांचा डाव मांडत होते आणि मोडत होते. या डावात, ज्या ज्या ठिकाणी लीग अस्तित्वात होती, किंवा संधिसाधू मतपरिवर्तनातून नव्याने अस्तित्वात आली होती, तेथे तेथे तिचे स्थान, इतर घटकां-प्रमाणेच मंत्रिमंडळाचा एक घटक म्हणून होते. संयुक्त मंत्रिमंडळाला सहायक म्हणून तिचे सहकार्य मिळवले गेले होते, जातीय गट म्हणून ते क्वचितच होते.

बंगालमध्ये फझलूल हक् यांनी मंत्रिमंडळ बनवण्याला जसे उपयोगी पडेल तसे लीगला जवळ अगर दूर केले. २५० सभासदांच्या सभागृहात नवीन विधिमंडळाच्या पहिल्याच दिवशी (१९३७) त्यांना असे आढळून आले की, त्यांचा प्रजापक्ष अगदी अल्पसंख्य, फक्त ३५ सभासदांचा आहे. इतर जागा पुढीलप्रमाणे विभागल्या होत्या काँग्रेसच्या ६०; पैकी १७ दलितवर्गाच्या सभासदांनी अनुसूचित जमाती, मजूर आणि टिप्पेरा कृषिक समिती यांचीही तिकिटे धारण केली होती. मुस्लिम लीग ४०;

युरोपियन २५; स्वतंत्र अनुसूचित जमातीच्या गटाचे २३ आणि स्वतंत्र सवर्णीय हिंदू १४; उरलेले कुठल्याच गटात नव्हते.

खरं म्हणजे सर्वांत अधिक जागा मिळवलेल्या कॉंग्रेसपक्षाने एकजुटीसाठी पक्ष धुंडाळण्याचे काम सुरू करावयास हवे होते. परंतु मंत्रिमंडळाच्या दैनंदिन व्यवहारात गव्हर्नर ढवळाढवळ करणार नाहीत, असे आश्वासन मिळाल्याशिवाय मंत्रिमंडळाच्या जबाबदाऱ्या स्वीकारण्यापासून इतर प्रांतिक विधिमंडळात ती जशी अलिप्त राहिली, तशीच येथेही राहिली. प्रजापक्षाचे पुढारी फझलूल हक् यांनी लीगच्या पुढाऱ्यांना घेरले आणि आपल्याला संयुक्त मंत्रिमंडळाचे अध्यक्ष केल्यास लीगला मिळण्याची आपली इच्छा प्रदर्शित केली. ही त्यांची अट मान्य झाली. यांशिवाय इतर सभासदांचा पाठिंबा शोधण्यातून त्यांनी स्वतंत्र अनुसूचित जमातीच्या २३ सभासदांचे व स्वतंत्र सवर्ण हिंदूंच्या १४ सभासदांचे सहकार्य मिळवले. या सर्व जागांसकट, २५०च्या सभागृहात त्यांना फक्त ११२ च सभासद एकत्र करता आले; आणि जर, हिंदू आणि मुसलमानांच्या जागांचा हिस्सा कमी करून जादा प्रतिनिधित्व उपभोगित असलेल्या (आधीच दाखवून दिल्याप्रमाणे) २५ युरोपियन सभासदांनी त्यांना पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले नसते तर त्यांची महत्वाकांक्षा तशीच अमूर्त राहिली असती.

११२ सभासदांच्या संयुक्त पाठिंब्यापैकी ७५ सभासद लीगवादी असल्यामुळे हक् मंत्रिमंडळ हे लीग मंत्रिमंडळ म्हणून समजले गेले. आणि लीग व्यासपीठावरून कॉंग्रेस मंत्रिमंडळावर हल्ले चढवताना हक् हे कट्टर लीगवाद्याइतकेच तीव्र प्रहार करू लागले. मंत्रिपदे स्वीकारण्याचा मार्ग कॉंग्रेसला खुला झाला तेव्हा आणि हिंदूंनी बनलेला बंगालचा कॉंग्रेस पक्ष आपल्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ बनवण्यासाठी ताकद जमवण्याचा प्रयत्न करू लागला तेव्हा त्यांनी मुसलमानांवर अवलंबून राहण्याची गरज अधिकच वाढली. कॉंग्रेसच्या प्रयत्नाचे पहिले फलित, अनुसूचित जमातीचे आता २४ बनलेले सभासद फुटून निघण्यात झाले. ही घटना तात्कालिक परिणाम म्हणून कॉंग्रेस पक्षाला उपकारक असली तरी तिने भरीव असा हिंदू गट बनवण्यास मदत केली आणि त्यामुळे सर्व मुसलमान सभासदांना एकत्र संघटित होण्याची प्रेरणा मिळाली. १९३८ च्या उन्हाळ्यात ही घटना घडली आणि तिने हक् मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणण्यास कॉंग्रेस पक्षाला उत्तेजन दिले. या ठरावापाठोपाठ निरनिराळ्या शाब्दिक स्वरूपाचे असेच नऊ ठराव आले. विधिमंडळातील तंग वातावरण कलकत्त्याच्या रस्त्यात आणि मुस्लिम वस्तीत पसरले. कॉंग्रेस प्रयत्नाचा अर्थ, मुस्लिम मंत्रिमंडळ कोसळण्यासाठी केले गेलेले कारस्थान असा केला गेला आणि अविश्वासाच्या ठरावासाठी मुक्रर केल्या गेलेल्या दिवशी सरकारला पाठिंबा दर्शवण्यासाठी मुसलमानांचा एक मोर्चा विधिमंडळावर आला. 'विरोधी नेत्यांवर रस्त्यात हल्ला करण्यात आला आणि आपण बाहेर दिसू या भीतीने काही विरोधी सभासद चर्चेच्या आदल्या रात्री सभागृहातच झोपले' तरीसुद्धा, हक् मंत्रिमंडळ, युरोपियन

सभासदांच्या व काही स्वतंत्र मुसलमानांच्या मतावर तगून राहिले, परंतु त्याचे स्थान डळमळीतच राहिले. कारण, जेव्हा भावनांचा उद्रेक थंडावला तेव्हा त्याला मिळालेला पूरक पाठिंबा काढून घेण्यात आला होता. आता त्यांच्या कॉंग्रेसबरोबर हात मिळवणी करण्यासाठी वाटाघाटी सुरू झाल्या, परंतु त्या मोडल्या. आणि मुसलमान गोटातील वाढती कुजबूज निमवण्यासाठीच त्यांनी, आपण कॉंग्रेसच्या लालुचीला बळी पडलो असतो तर इस्लामच्या फांशी-हुकूमावर सही केली असती असे एक निवेदन वृत्तपत्रात प्रसिद्ध केले.

परंतु पस्तीस वर्षाच्या लीगच्या नागमोडी आयुष्यातील सर्वात महत्वाचा, हिंदुस्तानच्या फाळणीचा ठराव मांडणाऱ्या या गृहस्थामध्ये आणि लीगमध्ये दुफळी पडणार होती. देशाच्या सार्वजनिक जीवनात कार्य करीत असलेल्या हिंदी पुढाऱ्यांपैकी काहींचा समावेश आपल्या कार्यकारी मंडळात करून व्हाइसरॉयने, १९४१ च्या उन्हाळ्यात ते वाढवले आणि युद्ध प्रयत्न अधिक चांगले होण्यासाठी संरक्षण मंडळ (Defence council) निर्माण करण्यात आले. संरक्षण मंडळासाठी व्हाइसरॉयचे निमंत्रण स्वीकारलेल्या ८ मुसलमानात, पंजाब, बंगाल, आसाम व सिंध या प्रांतांच्या पंत-प्रधानांचा समावेश होता. यापैकी पहिले तीन पंतप्रधान धरून लीगचे एकंदर पाच सभासद होते. परंतु हिंदुस्तान सरकारच्या युद्ध प्रयत्नांशी असहकार करण्याची वृत्ती निर्माण झालेल्या जीनांनी या पंतप्रधानांनी संरक्षण मंडळातून राजीनामा द्यावा असा आदेश त्यांना देण्याचा अधिकार मिळवला. सरकारच्या व्यवहारातील जीनांच्या या ढवळाढवळीबद्दल फजलुल हक् यांनी निषेध व्यक्त केला—बंगालचे पंतप्रधान म्हणून त्यांना संरक्षण मंडळाचे सभासद केले होते—परंतु विधिमंडळातील लीग गट आपल्याला सोडून जाईल या भीतीने त्यांनी आपला विरोध नोंदवून जीनांच्या निर्णयापुढे मान तुकवली पण आपला विरोध व्यक्त करण्यासाठी लीगच्या कार्यकारी मंडळाचा राजीनामा दिला. या राजीनाम्याचा अर्थ, लीगच्या ख्वाजा सर नझिमुद्दिन या विधिमंडळातील लीग पुढाऱ्याने अधंवट मान्यता असा केला. बंगालचा लीगवादी पंतप्रधान बनण्याची त्यांची महत्वाकांक्षा होती. त्यांनी लावलेल्या या अर्थामुळे बहुसंख्य लीगवादी हक्च्याविरूद्ध झाले. 'कलकत्त्यात निदर्शनांची तयारी केली गेली आणि मुसलमानांच्या दोन गटातील तुंबळ मारामारी अगदी थोडक्यात बचावली'. काही काळ शांतता प्रस्थापित झाली, पण काही काळच. आणि आपले मंत्रिमंडळ कुठल्याही क्षणी कोसळेल याबद्दल हक्च्या मनात संशय उरला नाही.

दरम्यान, वरिष्ठ नेत्याविरुद्धच्या सुभाषचंद्र बोस यांच्या बंडानंतर आणि त्यांनी नाव दिलेला फॉरवर्ड ब्लॉक हा डावा गट स्थापन झाल्यानंतर, कॉंग्रेस पक्ष दुभंगला होता. कॉंग्रेस व लीगमधील या नव्या घडामोडीमुळे विधिमंडळात, 'प्रागतिक संयुक्त' पक्ष म्हणून एक नवा पक्ष उदयास आला. त्यात हक्चे उरलेले लीगवादी, प्रजागट, फॉरवर्ड ब्लॉक आणि इतर छोटे घटक यांचा समावेश होता. फाळणीच्या

ठरावानंतर कित्येक महिन्यांनी अगदी १९४० सालाइतके उशिरापर्यंत, हक्नी आपल्या मंत्रिमंडळाचा पाया विस्तृत करण्याच्यादृष्टिने एका किंवा दोनही कांग्रेस गटांचे सहकार्य मिळवण्याचा जर प्रयत्न केला असेल तर तो फक्त जातीय ताण सैल करण्यासाठीच होता. या ताणाचा उद्रेक गंभीर स्वरुपाच्या जातीय दंग्यात झाला होता. विधिमंडळातील पक्षांची जातीय विभागणी आणि खुद्द जातीयतेवरच आधारलेले मंत्रिमंडळ याचा तो एक स्वाभाविक परिणाम होता. इतर प्रांतातून मुसलमानांना आणून सुशिक्षित हिंदूंची नोकऱ्यांची संधी सरकार जेव्हा हिरावून घेऊ लागले तेव्हा त्यांच्यात असंतोष वाढू लागला. याबद्दल १९४० मध्ये, विधिमंडळात तहकुबीची सूचना आणली गेली, व चीड व्यक्त केली गेली. याला सरकारच्यावतीने दिल्या गेलेल्या उत्तराने आणि त्याचीच री ओढणाऱ्या काही मुसलमान सभासदांच्या भाषणाने त्यात अधिकच भर पडली. तहकुबीची सूचना मांडणाऱ्या ललीतचंद्र दास यांनी बंगालमधील इतर जमातींच्या लायक उमेदवारांचे हक्क तुडवण्याच्या सरकारच्या निश्चित धोरणावर ठपका ठेवण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले : 'ही जातीयवादाची परिसीमा आहे, जातीयवादाचे डोके फिरल्याचे ते लक्षण आहे.' यापूर्वी, विधिमंडळातही हा प्रश्न उपस्थित केला गेला होता आणि इस्लाम हा सर्व जगातील मुसलमानांचे बंधुत्व मान्य करणारा लोकशाही धर्म आहे असे विक्षिप्त उत्तर देऊन, हक् पंतप्रधानांनी त्याची त्वरित वासलात लावली होती. कौन्सिलमध्येही असेच उत्तर दिले गेले आणि त्याला मुस्लिम लीगच्या खान बहाद्दर सय्यद मुअझमुद्दिन हुसेन यांनी अशी पुस्ती जोडली की, बाहेरून आणलेल्या मुसलमानांमुळे बंगाली मुसलमानांचे हितसंबंध अधिक चांगले राखले जातील.

इतर जमातींच्या मानाने प्रांतातील नोकऱ्यात मुसलमानांचा हिस्सा फारच लहान होता. रूढ परंपरेप्रमाणे प्रांतातील बहुतेक नोकऱ्या स्थानिक लोकांकडे जात असत. परंतु बंगाल करार (पृ. पहा) आणि हिंदुस्तानातील सर्व मुसलमान हे एकाच मुस्लिम राष्ट्राचे देशबांधव समजले जावेत या नव्या पार्श्वभूमीवर, दुसऱ्या प्रांतातून अधिक लायक मुसलमानांना आमंत्रण देण्यात आपण योग्य तेच करीत आहोत असे बंगालच्या मुस्लिम मंत्रिमंडळाला वाटले. हक् यांचे स्थान हेवा करण्यासारखे नव्हते. जातीय दंगे, हिंदूंचा विरोध, लीगवाद्यांचा प्रक्षोभक प्रचार, जीनांची हुकूमशाही आणि याबरोबरच त्यांच्या मंत्रिमंडळाचे डळमळीत स्थान यांनी त्यांना विचलीत केले. त्यांनी नवीन संयुक्त मंत्रिमंडळ बनवले. लीग त्यातून अधिकृतरित्या बाहेर राहिली. तरीही ते स्वतःला लीगवादी म्हणवत राहिले आणि प्रांतिक शाखेचे अध्यक्षपदही त्यांच्याकडेच राहिले. नवीन सरकारचे नेतृत्व धारण करताना पत्रकारांना दिलेल्या निवेदनात ते म्हणतात : 'बंगाल प्रांतिक मुस्लिम लीगचा अध्यक्ष म्हणून मला मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन मी असे सांगतो की, ज्या मुस्लिम सभासदांनी माझ्या नेतृत्वाखालील नव्या प्रागतिक एकजूट पक्षात सामील होऊन मला त्यांच्या

सल्याचा आणि पाठिंब्याचा लाभ करून दिला त्या सभासदांचा मी ऋणी आहे. मी मुस्लिम लीगचा निष्ठावंत आणि कट्टर सभासद आहे ······ आजचा प्रागतिक एकजूट पक्ष हा विधिमंडळातील मुस्लिम लीग, कृषक प्रजापक्ष, काँग्रेस, हिंदूमहासभा, राष्ट्रवादी, हिंदी खिश्चन, अँग्लो इंडियन, मजूर, अनुसूचित जमाती आणि इतर मिळून बनलेला आहे'.

ह्या नवीन एकजुटीत मुस्लिम लीगचा समावेश आहे हे हक् यांचे विधान धडधडीत विपरीतपणाचे होते. त्यांच्याप्रमाणेच दहाबारा लोकांनी लीगपक्ष सोडला होता यात वाद नव्हता, परंतु लीग पक्षाने त्यांना मिळण्याचे नाकारले होते आणि विरोधी पक्षात, वेगळा पक्ष म्हणून काम करण्याचे चालू ठेवले होते. हक्नी नवीन तडजोडी केल्यानंतर ताबडतोब जीनांनी काढलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले होते की, फजलूल हक् हे 'मुस्लिम लीगच्या पाठीत सुरा खुपसण्याचा प्रयत्न फार काळ करीत होते'. हक्ना पाठवलेल्या तारेत जीनांनी याहून अधिक खरमरीत टीका केली होती : 'लीगच्या अपरोक्ष, विरोधी पक्षांशी कारस्थान करून तुम्ही पूर्वीच्या संयुक्त पक्षाचा विश्वासघात केला आहे ·······' हक् यांच्या लीगच्या सभासदत्वाच्या ढोंगाला शेवटची मूठमाती देण्याकरिता, त्यांचे लीगचे संबंध तुटले आहेत असे गृहीत धरून अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या कौन्सिलने त्यांचा निषेध केला आणि बंगाल लीगच्या परिषदेत त्यांच्यावर आणि त्यांच्या मंत्रिमंडळावर अविश्वास दर्शविला.

प्रबळ पक्ष म्हणून मुस्लिम लीगशी एकजूट बांधण्यात खर्च झालेले चार वर्षांचे कष्ट फुकट गेले. या बरोबरच, या काळात मोकाट सुटलेल्या जातीयवादाच्या खोडसाळपणालाही बऱ्याच प्रमाणात पायबंद बसला. मंत्रिमंडळात आता हक् यांच्याबरोबर चार मुसलमानांखेरीज दोन फॉरवर्ड ब्लॉकचे, एक हिंदूमहासभेचा (डॉ. शामाप्रसाद मुकर्जी) आणि एक अनुसूचित जमातीचा असे सभासद होते. राजकारणाचा रंग बदलत होता. आता विरोधी पक्षाच्या बाकावर बसलेल्या मुस्लिम लीगने नवीन सरकारचे वर्णन, हिंदू सरकार असे केले. तिच्या प्रचार यंत्रणेने हिंदू बहुसंख्य प्रांतातील काँग्रेस सरकारच्याविरूद्ध जे चित्र रंगवले होते तेच या सरकार-विरूद्धही रंगवले.

परंतु हक् मंत्रिमंडळाचे काही नवे सभासद मुरब्बी राजकारणी होते. ते नुकत्याच घडलेल्या 'अंधार कोठडीच्या' प्रकरणात सरकारविरुद्ध लढाई पुकारणाऱ्या फॉरवर्ड ब्लॉकचे होते. त्यांनी सरकारला दिलेल्या सहकार्यामुळे आणि विशेषतः त्यांचे पुढारी सुभाषचंद्र बोस यांची शरीर स्वास्थ्यासाठी तुरुंगातून तात्पुरती सुटका केली असताना ते नाहीसे झाले व काही महिन्यांनी बर्लिन रेडीयोवरून आपल्या देशबांधवांना क्रांती करण्यास उत्तेजन देऊ लागले यामुळे गव्हर्नरला सतत दक्षता बाळगणे जरूर होते. त्यांचे बंधू शरत्चंद्र बोस यांनाही 'त्यांच्या जपान्यांशी असलेल्या संबंधावरून' अटक करण्यात आली होती. त्यांच्या अटकेनंतर थोड्याच दिवसात फॉरवर्ड ब्लॉकच्या

दुसऱ्या दोन सभासदांचा मन्त्री म्हणून शपथविधी झाला. वैकल्पिक सरकार स्थापणे अशक्य असल्यामुळे गव्हर्नर असहाय्य झाला. आपल्याभोवती जमवलेली संयुक्त शक्ती, मंत्रिमंडळाचा पराभव करण्याइतकी प्रबळ आहे किंवा काय हे अजमावण्यासाठी लीगने २४ मार्च १९४३ रोजी तिची कसोटी पाहिली. तिने अंदाजपत्रकावर प्रतिकूल ठराव मांडला. पण तो ८६ विरुद्ध ११६ मतांनी फेटाळला गेला. २७ मार्चला एक अविश्वासाचा पद्धतशीर ठराव तयार केला गेला परंतु तोही नापास झाला. मात्र त्यादिवशी सरकार पक्षाचे बळ १०९ पर्यंत खाली घसरले आणि विरोधी बळ ९९ झाले. तरीसुद्धा, गव्हर्नर सर जॉन हर्बर्ट यांनी वरकरणी नाखुशीने हक् मंत्रिमंडळाला राजिनामा देण्यास भाग पाडले. हिंदुस्तान राज्यकारभार कायद्याच्या कलम ९३ तील घटनात्मक तरतुदीप्रमाणे त्यांनी मंत्रिमंडळ बनवण्याचे स्थगित करून सर्व जबाबदारी संपूर्णपणे आपल्याकडे घेतली आणि एक महिन्यानंतर लीग मंत्रिमंडळ स्थापन केले. हक्चे बहिर्गमन अपमानास्पद होते. गव्हर्नरने त्यांना बोलावले व आधीच टाईप् करून ठेवलेल्या राजिनाम्याच्या पत्रावर सही करण्यास सांगितले. हक्नी हुकुमाप्रमाणे केले ते बाहेर आले आणि त्यांनी ही गोष्ट विधिमंडळात जाहीर केली. गव्हर्नरने त्यांना सांगितलेला त्यांचा गुन्हा असा होता की, १९४२ च्या ऑगस्टमध्ये एका गोळीबाराची चौकशी करण्यास गव्हर्नरनी त्यांना सांगितले होते आणि ती चौकशी त्यांनी करवली नव्हती. सर निझामउद्दिन यांनी आपले मंत्रिमंडळ तारीख २४ एप्रिल रोजी बनवले आणि लवकरच विस्कळीत झालेले घटक सभासद बहुमतासाठी एकत्र जमवले. युद्ध प्रयत्नांना मदत करण्यासाठी ते आपल्या पूर्वीच्या मंत्रिमंडळाइतकेच बांधलेले होते आणि त्यांचे मंत्रिमंडळ फॉरवर्ड ब्लॉकसारख्या संशयित पक्षाच्या आभावामुळे ते युद्ध पुरस्काराचे काम चांगले करू शकले. या मंत्रिमंडळाने अन्न परिस्थिती भयंकर वाईट हाताळल्यामुळे प्रांतात तीस लाख लोक मृत्यूमुखी पडले या मुद्यावर हक्च्याविरोधी सभासदांनी जुलैमध्ये मतदानाचे आव्हान दिले. परंतु १३४ विरूद्ध ८८ मतांनी मंत्रिमंडळाने तो दिवस जिंकला; युरोपियन गटाने आता लीगबरोबर मतदान केले. नंतरच्या तीन वर्षांत मंत्रिमंडळाच्या पक्षाचे संख्याबळ पुष्कळच कमी झाले. आणि २८ मार्च १९४५ रोजी १०६ विरूद्ध ९७ मतांनी त्याचा पराभव झाला. मंत्रिमंडळाने राजिनामा दिला आणि हिंदुस्तान सरकार कायद्याच्या ९३ कलमानुसार गव्हर्नरनी कारभार आपल्या ताब्यात घेतला.

बंगालपेक्षा पंजाबची गोष्ट ठळकपणे निराळी होती. अमीर अल्ली आणि त्यांच्या सेंट्रल महॉमेडन असोसिएशनच्या वेळेपासून आणि काही मुस्लिम पुढारी मुसलमान मुलांना संस्कृतनिष्ठ बंगालीऐवजी पर्शियननिष्ठ उर्दू शिकवण्यासाठी निराळ्या शाळा असाव्यात यावर भर देत होते तेव्हापासून बंगाल हळूहळू विभक्त जातीय कुटुंब तयार करीत होता. पंजाबने जातीय राजकारणाला पोसले नव्हते; उलट रौलट बिलाविरूद्धच्या चळवळीत हिंदू आणि मुसलमान या दोनही जमातींनी आपले रक्त शिंपडताना असे

दाखवून दिले होते की, आपले राजकीय उद्दिष्ट एकच आहे. परंतु नंतर गांधींच्या चळवळीला त्यांनी फारसा प्रतिसाद दिला नाही, की मुस्लिम जातीयवादाच्या आवाहनालाही दिला नाही. हिंदूंना हिंदीसाठी आर्य समाजाचे प्रोत्साहन असूनसुद्धा शिक्षणाचे माध्यम दोनही जमातींसाठी उर्दूच चालू राहिले. सामाजिक जीवनात बंगालपेक्षा येथे दोनही जमाती परस्परांना अधिक जवळ होत्या. पंजाबचा शेतकरी इतर प्रांतातील आपल्या धर्मबांधवांपेक्षा आर्थिकदृष्टया अधिक सुस्थितीत होता; संरजामविरोधी नव्या नव्या कल्पना ऐकण्याची संधी ही त्याला फार कमी होती. अनेक पंजाबी कॉंग्रेसमध्ये होते आणि त्यांनी क्रांतिकारक चळवळीत भाग घेतला होता. त्यांचा मुसलमान संघटनांशीही संबंध होता, परंतु पंजाबी जनता कोरडीच राहिली होती. पंजाबी शेतकऱ्याची आपल्या जमीनदारावरची आणि सामान्य माणसाची ब्रिटिशांवरची निष्ठा तशीच होती. पंजाबचे राजकीय वातावरण कॉंग्रेस व लीगपेक्षा ब्रिटिशांना अनुकूल असलेल्या जमीनदारांच्या बाजूचे होते; कॉंग्रेसला थोडे तरी अनुयायी होते पण लीगला काहीच स्थान नव्हते. तेव्हा १९३६ च्या निवडणुकीत जमीनदारांचा युनियनिस्ट पक्ष विजयी झाला यात काहीच आश्चर्य नव्हते. १७५ पैकी ९६ जागा जिंकून त्यांनी प्रांताला स्थिर मंत्रिमंडळ मिळवून दिले. बंगाल कायदेमंडळातील गटांच्या मानाने युनियनिस्ट पक्ष हा सर्व जमातींचा पक्ष होता. आणि पंतप्रधान सर शिकंदर ह्यातखान यांचा राजकीय कल कुठेही असला तरी त्यांनी तत्वनिष्ठेमुळे म्हणा किंवा मुत्सद्देगिरीमुळे म्हणा, नंतर असे दाखवून दिले की, आपले मंत्रिमंडळातील सहकारी एकमेकांशी एकनिष्ठ होते. हा परिणाम फक्त मंत्रिमंडळातील एकजुटीचा होता असे नव्हे तर सर्वसामान्यपणे त्यांचे समाजातील व सरकारातील संबंधही याला कारणीभूत होते. प्रांतिक स्वायत्तता येण्यापूर्वी पंतप्रधानांनी आणि त्यांच्या तीन सहकाऱ्यांनी केव्हांना केव्हा तरी गव्हर्नरच्या कार्यकारी मंडळावर काम केलेले होते. इतर प्रांतातील बद्धमूल हितसंबंधांशी निगडीत होते. मंत्री राजकीय पटावर जुगार खेळत नव्हते; ते स्वातंत्र्याचेही कॅवारी नव्हते की, जातीयवादाचेही नव्हते.

पण त्यांनी कारभार हाती घेतल्यानंतर लवकरच त्यांना एका गंभीर जातीय समस्येला तोंड द्यावे लागले. शहिदगंज मशीद म्हणून ओळखली जाणारी इमारत व तिथली जमीन सुमारे १०० वर्षे शिखांच्या ताब्यात होती आणि त्यावर न्यायालयीन शिक्का मोर्तब झाले होते. तरीही, धार्मिक कडवेपणा निर्माण करण्यासाठी कारस्थानी लोकांना तिचे खुसपट कधीही निर्माण करता येत होते. १९३५ च्या उन्हाळयात अशी अफवा पसरली की, ही इमारत शीख लोक पाडून टाकणार आहेत; नंतर या इमारतीचा काही भाग खरोखरच पाडण्यात आला आहे अशी बोलवा पसरली. लाहोरमध्ये जोरदार दंगे उसळले आणि पोलीस व लष्कराला पाचारण केले गेले. अनेक प्रसंगी गोळीबार केला गेला आणि शांतता प्रस्थापित केली गेली. यानंतर

मशिदीचा ताबा मिळवण्यासाठी मुसलमान परत कोर्टात गेले. परंतु १९३७ च्या शेवटी, जेव्हा हा खटला शेवटच्या अवस्थेत होता तेव्हा अहरर पक्षाने, (हा पक्ष राजकारणात काँग्रेस विचारांचा होता आणि त्याने स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला होता.) काहीही झाले तरी मशिदीचा ताबा मुसलमानांकडेच राहिला पाहिजे या मुद्यावर चळवळ सुरू केली. अहरर मुसलमान हे राजकारणापेक्षा अधिक धार्मिक होते. त्यांनी कायदेभंगाचा मार्ग स्वीकारला आणि गव्हर्नरचा हुकूम तोडून मशिदीकडे मोर्चा नेला. जानेवारी १९३८ च्या शेवटी २०० अहरर स्वयंसेवकांना अटक करण्यात आली आणि १५८ तुरुंगात टाकले गेले. याच सुमारास कोर्टाचा निर्णय झाला आणि तो परत शिखांच्या बाजूचा झाला; त्यामुळे अहरर चळवळीची तीव्रता वाढली. अटक करून घेण्यासाठी आता दिल्ली आणि वायव्य सरहद्द प्रांतातून स्वयंसेवक येऊ लागले आणि त्यांचा आकडा हजारापर्यंत गेला. आणि जेव्हा कायदेमंडळातील एका मुस्लिम सभासदाने कधीकाळी मशिदी असलेल्या सर्व इमारतींना मुस्लिम कायदा पूर्वीपासून लावावा असे बील मांडण्याची सूचना दिली तेव्हा पहिल्या प्रतीचा राजकीय पेंच प्रसंग निर्माण होण्याचा धोका उदभवला. या सूचनेला युनियनिस्ट पक्षाच्या २४ सभासदांनी पाठिंबा दिला. हे बील संमत होऊन त्याचे कायद्यात रूपांतर झाले असते तर त्याचा परिणाम प्रथम शहिदगंज मशिदीचा ताबा शिखांकडून मुसलमानांकडे जाण्यात झाला असता. हा पेंच प्रसंग गव्हर्नरनी मध्ये पडून मंत्र्यांशी विचार विनिमय करून आणि आपले खास अधिकार वापरून हे बील आणण्यास परवानगी नाकारून सोडवला.

पंजाबच्या पंतप्रधानांना जीनांनी दिलेले लीगला मिळण्याचे आमंत्रण जर त्यांनी स्वीकारले नसते तर लीगच्या त्यावेळच्या मनःस्थितीत तिने, मंत्रिमंडळाने शहिदगंज प्रकरणी केलेल्या वर्तनाला हरकत घेतली असती. कुठल्याही काँग्रेस प्रांतात एखादे शहिदगंज प्रकरण झाले असते तर त्याने लीगला प्रचाराचे भरपूर पक्वान्न पुरवले असते. पंजाबमध्ये लीग आणि युनियनिस्ट पक्ष या दोघांनाही त्याचा फायदा मिळाला. लीगला असे भासवता आले की, पंजाबचा मुस्लिम बहुसंख्येचा प्रांत हा लीग सत्तेचा प्रांत आहे; आणि युनियनिस्ट पक्षाला लीगच्या आक्रमकतेने होणाऱ्या परिणामापासून आपली सुटका करून घेता आली. शहिदगंज प्रकरणी केलेल्या आपल्या वागणुकीला प्रथम लीग कौन्सिलची आणि नंतर लीगच्या 'शहिदगंज अधिवेशना'ची मान्यता मिळवणे यापेक्षा पंतप्रधानांचा दुसरा विजय तो कोणता?

काही म्हटले तरी सर सिकंदर हे लीगचे एक परकीय दोस्त होते, आणि पंजाब कायदा व सुव्यवस्था यांच्या कठीण अवस्थेमुळे ते १९३७–३८ च्या हिवाळ्यात जीनांशी करार करण्यास प्रवृत्त झाले. या कराराप्रमाणे युनियनिस्ट पक्षाचे मुस्लिम सभासद यापुढे स्वतःला लीग गट असे म्हणवणार होते आणि कायदेमंडळाच्या निवडणकीत लीग व युनियनिस्ट पक्ष एकमेकांच्या उमेदवारांना पाठिंबा देणार होते.

पंजाबमधील युनियनिस्ट पक्षाच्या मुस्लिम पुढाऱ्यांनी लीगपुढे कधीही मशाली पाजळल्या नाहीत. आणि सभागृहाबाहेर लीगने जर काही थोडाबहुत प्रभाव मिळवला असेल तर तो इतर प्रयत्नांचा परिणाम होता. फाळणी, फाळणीचा ठराव आणि त्यानंतर, ठरावाने निर्माण केलेले वातावरण यामुळे झालेल्या जातीय तेढीचाही तो परिणाम होता.

१९४३ च्या सुमारास युनियनिस्ट पक्षाचे संख्याबळ ९६ चे १२० झाले. पक्षाभोवती जमा झालेल्या बहुतेक सर्व मुसलमान, हिंदू आणि शीख सभासदांचा पाठिंबा मिळाल्यामुळे ते १२० वर गेले आणि असे निःसंशय सिद्ध झाले की, ही एकजूट जिवंत राहण्यास लीगचा प्रभाव कारणीभूत नव्हता. खरं म्हणजे युनियनिस्ट पक्षाचा धोरणीपणा आणि एकजुटीची भावना यामुळेच लीगला कायदेमंडळात पाय रोवण्यास संधी मिळाली. म्हणूनच युनियनिस्ट पक्षापेक्षा लीगला अधिक महत्त्व देण्याची सूचना फुकट जाणे अटळ होते. किंबहुना, जीनांनी खरोखरच तशी सूचना केली तेव्हा ती फुकटच गेली.

सर शिकंदर यांच्या आकस्मिक निधनामुळे त्यांच्या मंत्रिमंडळातील दुसरे एक मंत्री, मलिक खिझर हियातखान तिवाना, यांनी पंतप्रधानकीची सूत्रे हातात घेतली. एप्रिल १९४४ मध्ये जीनांनी अशी मागणी केली की, तिवानांनी युनियनिस्ट पक्षाचे नाव बदलून तिला ' मुस्लिम लीग कोइलिशन पक्ष ' असे नाव द्यावे. दोघांनी या प्रश्नाची चर्चा ' प्रत्येक वेळी २ किंवा ३ तास अशा सुमारे सहा मुलाखती घेऊन ' केली. (जीनांनी वर्तमानपत्रात दिलेल्या आपल्या निवेदनात म्हटल्याप्रमाणे) २७ एप्रिलला झालेल्या शेवटच्या मुलाखतीत ही कल्पना आपल्याला मान्य नसल्याचे तिवानांनी निश्चितपणे सुचवले. आपण बऱ्याच गोष्टी ' तोंडी ' बोललो आहोत आणि आपल्यामध्ये काहीतरी निश्चित स्वरुपाचा लेखी विनिमय असावा असे जीना म्हणाले. त्याप्रमाणे त्यांनी तिवानांकडून रात्री ९ पर्यंत उत्तर यावे या हिशोबाने आपल्या चिटणीसाला पत्र सांगितले आणि ते तिवानांकडे रवाना केले. ठरलेल्या वेळेला उत्तर न आल्यामुळे जीनांनी तिवानांना टेलिफोन केला आणि त्यांचे उत्तर विचारले. जीनांच्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे हे उत्तर असे होते : ' टेलिफोनवर त्यांनी (तिवानांनी) मला आश्चर्यचकित केले. ते असे म्हणाले की, मला त्यांनी जे तोंडी सांगितले होते त्या व्यतिरिक्त उत्तर देण्यासारखे दुसरे त्यांच्याजवळ काहीही नव्हते, मग जीनाही हट्टाला पेटले आणि त्यांनी तिवानांकडून लेखी जबाब मिळावा म्हणून एका जबाबदार व्यक्तीमार्फत, पावतीच्या नोंदीसकट दुसरे एक पत्र, रात्री ९–३० वाजता तिवानांकडे पाठवले. पावतीच्या नोंदीवर सही करण्याचे तिवानांनी नाकारले. पंजाब मुस्लिम लीगचे अध्यक्ष मोमदतचे नबाब, आणि विधिमंडळाचे एक सभासद, मुमताझ दौलताना यांच्या हस्ते जीनांनी पुन्हा तिवानांना पत्र पाठवले. तिवानांनी परत सहीला नकार दिला. ते दोघेही परत तिवानांकडे गेले आणि सहीचा हट्ट न

धरता त्यांना पत्र देऊन आले. या पुन्हा पुन्हा पाठवलेल्या आणि पुन्हा पुन्हा परत केल्या गेलेल्या पत्रात जीनांनी लिहिले होते : 'आपण फार प्रदीर्घ चर्चा केल्या. खालील तीन मुद्यावर आपला निर्णय काय आहे हे कळवण्याची कृपा केल्यास मी आपला फार ऋणी होईन. १) पंजाब विधिमंडळातील मुस्लिम लीग पक्षाच्या प्रत्येक सभासदाने असे जाहीर करावे की, त्याची निष्ठा युनियनिस्ट पक्ष किंवा दुसऱ्या कुठल्याही राजकीय पक्षाला न रहाता ती मुस्लिम लीगला राहील; (२) सध्याच्या संयुक्त पक्षावर मारलेला "युनियनिस्ट पक्ष" हा शिक्का काढून टाकावा; आणि (३) नवीन सुचवलेल्या संयुक्त पक्षाला मुस्लिम लीग कोइलिशन पक्ष असे नाव द्यावे. सर छोटूराम आणि सरदार बलदेव सिंग * यांना या तीन सूचना, किंवा यापैकी कोणत्या सूचना कितपत मान्य आहेत ते आणि या सूचनांशी किंवा त्यापैकी कुठल्याही सूचनेशी आपण कितपत सहमत आहात हे कृपा करून मला कळवावे. आपण आज संध्याकाळपर्यंत याचे उत्तर द्याल अशी मी आशा करतो कारण आता यापेक्षा अधिक काळ थांबणे शक्य नाही'

तिवाना फार तापदायक मनःस्थितीत सापडले. लीगपासून फुटून निघण्याचे ठरवल्यास पत्कराव्या लागणाऱ्या धोक्याची त्यांना अतिशय जाणीव होती आणि दुसऱ्या बाजूला जीनांच्या इच्छेला जर आपण मान तुकवली तर मंत्रिमंडळात पेचप्रसंग निर्माण होईल की काय अशी भीति त्यांना वाटत होती; आणि खरोखरच त्यांच्या मंत्रिमंडळामधील दोन हिंदू आणि एक शीख अशा तीन मंत्र्यांनी चार दिवसांनी तिवाना जीनांना पूर्णपणे शरण गेले तर आपण त्यांचा त्याग करू असे निवेदन वर्तमानपत्राकडे पाठवले. त्यांनी आपल्या निवेदनात असे म्हटले होते : 'अखिल भारतीय समझोत्याचा एक भाग म्हणून पंजाबमध्ये मुस्लिम लीग मंत्रिमंडळ किंवा मुस्लिम लीग कोइलिशन मंत्रिमंडळ बनणार असेल आणि युद्ध काळापुरती पाकिस्तानची कल्पना सोडून दिली जाणार असेल, आणि या पाकिस्तान योजनेच्या गुण विशेषांची पारख सर्व संबंधितांना करणे शक्य व्हावे म्हणून तिचा राजकीय व घटनात्मक स्पष्ट अर्थ पूर्णपणे समजावून दिला जाणार असेल आणि पाकिस्तान योजनेत पंजाबच्या भौगोलिक सीमा आणि त्या ठरवताना स्वीकारण्यात येणारी तत्त्वे, व्यावहारिकपणे स्पष्ट केली जाणार असतील आणि युद्धाचा शेवटी विजय होईपर्यंत लीग सर्वप्रकारच्या युद्ध प्रयत्नांना बिनशर्त पाठिंबा देईल असा एक औपचारिक ठराव करून लीग निःसंदिग्ध अशी खात्री पटवणार असेल तर त्या मंत्रिमंडळात सामील होण्याचा आम्ही विचार करू'. जी लीग दुसऱ्यावर आपला दृष्टिकोन लादत होती तिच्यावर आपले म्हणणे लादण्याचा हा प्रकार ठरला असता.

तिवानांनी एक निवेदन काढून लीगच्या विचारसरणीचे ऐतिहासिकदृष्टया मूल्य-

* त्यांच्या मंत्रीमंडळाचे हिन्दू आणि शिख मंत्री.

मापन करून लीग पुढाऱ्यांच्या मागण्या कशा बुद्धिविपर्यस्त आहेत हे स्पष्टपणे दाखवून दिले आणि या भोवऱ्यातून बाहेर पडून ते किनाऱ्याला लागले. ते निवेदन असे :—

"युनियनिस्ट पक्षाची स्थापना पैगंबरवासी मियाँ सर फज्ल-इ-हुसेन यांनी डिसेंबर १९२३ मध्ये केली. या पक्षाचा उद्देश, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात पंजाबची झालेली विषमवाढ सुधारणारा एक अजातीय असा विधिमंडळ पक्ष असावा, हा होता. सामान्यपणे या विषमवाढीची प्रमुख लक्षणे, शेतकरी आणि व्यापारी वर्ग यांच्या प्रगतीची आणि खेडे व शहर यांच्या प्रगतीची डोळ्यात भरण्याजोगी विषमता, ही होती. स्थूल भेद ध्यानात धरून मरहूम मियाँसाहेबांनी सरकारच्या विधिमंडळाच्या आणि कारभाराच्या धोरणाला ग्रामीण आणि शेतकरी स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांची नजर याही पलिकडे गेली होती. भुकेकंगाल प्राणी फक्त शेतकरी वर्गात आणि ग्रामीण विभागातच असतो असे नाही हे त्यांनी हेरले होते. म्हणून त्यांनी मुख्य भेदाचे वर्णन 'आहेरे' आणि 'नाहीरे' असे केले होते. त्यांनी आपल्या योजनेचे उद्दिष्ट, मागासलेल्या वर्गांची जातीधर्म निरपेक्ष आणि मागासलेल्या विभागांची स्थलनिरपेक्ष खास जपणूक असे सांगितले होते. योगायोगाने मागासलेल्या जमातीत मुस्लिम जमात प्रामुख्याने होती. त्यामुळे, युनियनिस्ट पक्ष हा जातीय असून मुस्लिम जमातीच्या हितासाठी खास तयार केला आहे असे सुचवण्यास मियाँ सर फज्ल-इ-हुसेन यांच्या राजकीय विरोधकांना पळवाट सापडली. हिंदू आणि शीख जमातीमध्ये तितकेच मागासलेले बरेच वर्ग होते. आणि मियाँ सर फज्ल-इ-हुसेन यांचे धोरण निकोप तत्वावर आधारलेले असल्यामुळे ते मुसलमान, त्याचप्रमाणे इतर जमातीतील मागासलेले वर्ग यांच्या फायद्याचे ठरले.

हिंदुस्थान सरकारमधील आपली मुदत पूर्ण केल्यानंतर मियाँ सर फज्ल-इ-हुसेन हे एप्रिल १९३५ मध्ये पंजाबला परत आले. सर शहाबुद्दिन, सर फिरोजखान नून, मरहूम सर शिकंदर हियातखान, मामदोतचे मरहूम नबाब आणि मरहूम मियाँ अहमद यारखान यांच्यासकट त्यांच्या सर्व जिगरदोस्तांनी आणि सहकाऱ्यांनी त्यांना परत राजकारणात येण्याचा, युनियनिस्ट पक्ष संघटीत करण्याचा आणि जवळच आलेल्या निवडणुकांसाठी आवश्यक ती तरतूद करण्याचा आग्रह केला. कुठलाही सभासद आपल्या वैयक्तिक हेव्यादाव्यांनी आपल्या पक्षाच्या आणि प्रांताच्या निष्ठेला बाध येऊ देणार नाही या अगदी काटेकोर अटीवर त्यांनी ही गोष्ट मान्य केली. पूर्णपणे जातीय संघटना सुरू करा असा जरी काही लोकांनी त्यांना आग्रह केला होता तरी ती सूचना मान्य करण्यास ते नाखूष होते.

सार्वत्रिक निवडणुकीत मुस्लिम लीगच्या तिकिटावर उमेदवार उभे करावे व निकाल बाहेर आल्यानंतर मुस्लिमेतर गटांशी एकजूट करावी याबद्दल मरहूम सर फज्ल-इ-हुसेन यांचे मन वळवण्यासाठी १९३५ च्या वसंत ऋतूत जीनांनी लाहोरमध्ये बराच काळ खर्च केला. पंजाबच्या विशिष्ट आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत

चपखळ बसेल आणि मुसलमानांना हितावह होईल अशी नैसर्गिक एकजूट युनियनिस्ट पक्षात आधीच आहे या मुद्यावर सर फज्ल-इ-हुसेन यांनी पंजाबमध्ये निव्वळ जातीय पक्ष स्थापन करण्याचे नाकारले. परंतु अखिल भारतीय क्षेत्रात मुस्लिम लीगला शक्य असेल ती सर्व मदत करण्याची हमी घेतली. युनियनिस्ट पक्षाच्या सर्व सभासदांनी त्यांचे नेतृत्व मान्य केले आणि ते पक्षाच्या मागे उभे राहिले. जीनांनी मुस्लिम लीगच्या तिकिटावर काही उमेदवार उभे केले. परंतु फक्त दोनच निवडून आले आणि नंतर त्यापैकी एक युनियनिस्ट पक्षाला मिळाला.

अगदी हाच प्रश्न काही स्वार्थी मुसलमानांच्या पुढाकाराने आणि जीनांनी मागणी-रुपाने आज सात वर्षांनी परत निर्माण केला आहे आणि फज्ल-इ-हुसेन यांच्या-प्रमाणेच आणि त्याच कारणासाठी, ही मागणी मान्य करण्यास मी असमर्थ आहे. कारण ती या प्रांताच्या आणि मुस्लिम हितसंबंधांच्या विरूद्ध आहे. मुसलमानांनी आपसात फूट पाडण्याचे नाकारले पाहिजे आणि आपल्या हिताविरूद्ध बाहेरील ढवळाढवळीस नकार दिला पाहिजे".

यानंतर, सर शिकंदर आणि युनियनिस्ट मुसलमान, यांना विधिमंडळात लीग पक्ष बनवण्यास ज्या परिस्थितीमुळे भाग पडले, आणि जिच्यामुळे सर शिकंदर आणि जीना यांच्यामध्ये शिकंदर जीना करार म्हणून ओळखला जाणारा करार झाला त्या परिस्थितीचे स्पष्टीकरण करताना तिवाना म्हणाले :

"हिंदुस्तान सरकार कायद्याखाली झालेल्या १९३५ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीचा परिणाम असा झाला की, मुस्लिम लीग मंत्रिमंडळ कुठेच स्थापन होऊ शकले नाही. त्यामुळे मुस्लिम लीग आणि तिचे पुढारी जीना यांना अखिल भारतीय स्वरुपाच्या कुठल्याही चर्चेत किंवा वाटाघाटीत भाग घेण्यात अडचण निर्माण झाली. तेव्हा, जीनांना सर्व मुस्लिम जमातीचे प्रतिनिधित्व करणे आणि अखिल भारतीय स्वरुपाच्या प्रश्नावर इतर पक्षांशी तडजोड करणे शक्य व्हावे म्हणून आणि मुसल-मानांचा मुख्त्यार पुढारी म्हणून जीनांच्या स्थानाबद्दल शंका व्यक्त करणाऱ्या टीकेला उत्तर म्हणून, सर शिकंदर हियातखान यांनी ऑक्टोबर १९३७ मध्ये शिकंदर जीना करार केला. हा करार अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या कौन्सिलला कळवला गेला. १९३७ पासून लीगच्या जबाबदार गोटातून त्याचा अनेकवेळा उल्लेख झाला आणि जीनांनी किंवा खुद्द लीगने त्याचा कधी इन्कार केला नाही. करारात असे म्हटले होते की, पंजाबला परत गेल्यानंतर सर शिकंदर हियातखान आपल्या पक्षाची एक खास सभा बोलावतील आणि आधीच मुस्लिम लीगचे सभासद न झालेल्या आपल्या पक्षाच्या सर्व सभासदांना लीगच्या उद्देश पत्रिकेवर सह्या करून तिला मिळण्याचा सल्ला देतील. शिकंदर-जीना कराराच्या अटीप्रमाणे मंत्रिमंडळाने आपले कार्य सुरू ठेवले ······"

शिकंदर-जीना करार हा आपल्या नियम आणि नियमनांचा भाग बनवावा काय

या प्रश्नावर मुस्लिम लीग पक्षात मतदान घेण्यात आले आणि ७ विरूद्ध ५२ च्या बहुमताने ते मंजूर झाले. आता श्री. जीना हे हा करार मोडून टाकावा असे सुचवतात आणि लीग कौन्सिलकडून दिले गेलेले कायदे आझमांनी (जीनांच्या चाहत्यांनी त्यांना बहाल केलेली महान् नेता ही पदवी) मान्य केलेले आणि माझ्या कडून निवेदिलेले, सर्व मुस्लिम जमातीचे अभिवचन यापुढे मानण्याचे कारण नाही असे मी माझ्या मुस्लिमेतर सहकार्यांना सांगावे अशी इच्छा करतात. सच्चा मुसलमान म्हणून आणि इस्लामच्या प्रेषिताचा अनुयायी म्हणून हा विश्वासघात करण्याचा गुन्हा मी करणार नाही. श्री. जीनांची आता प्रांतिक घडामोडीत हस्तक्षेप करण्याची आणि मंत्रिमंडळ पक्षाच्या अंतर्गत कामकाजात ढवळाढवळ करण्याची इच्छा आहे. जीनांच्या या भूमिकेला काही आधार नाही, आणि तिला हुकूमशाहीचा आणि सर्वाधिकार पद्धतीचा वास येतो.

तरीसुद्धा, तिवानांनी पाकिस्तान निर्मितीवर आपला विश्वास व्यक्त केला आणि 'मुस्लिम जमातीच्या कल्याणाशी संबंधित असलेल्या सर्व प्रश्नात व पंजाबमधील मुस्लिम लीग संघटना मजबूत करण्यात आणि तिच्यात चेतना निर्माण करण्यात' कायदेआझमांना मदत करण्याचे आश्वासन दिले. परंतु बंगालचे पंतप्रधान फझलूल हक यांच्याप्रमाणेच अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या कृती समितीने त्यांना लीगमधून काढून टाकले. या निर्णयाची पंजाब मुस्लिम लीग कौन्सिलनी फार वाखाणणी केली. कृती समिती २७ मे रोजी, आणि पंजाब कौन्सिल २८ मे रोजी भरले होते. कृती समितीच्या निर्णयावर लीगने जुलैमधील आपल्या खुल्या अधिवेशनात शिक्कामोर्तब केले. तिच्या ठरावात तिवानांविरूद्ध फार तीव्र स्वरुपाची निषेधात्मक भाषा वापरली होती, आणि असे म्हटले होते की, मुस्लिम लीगचा सभासद 'आपली निष्ठा दोन राजकीय पक्षांना देऊ शकणार नाही.' हे तर्कशास्त्र त-हेवाईक होते. युनियनिस्ट पक्षाच्या मेहेरबानीमुळे विधिमंडळात लीगचे अस्तित्व होते. परंतु तीच आता विरोधी दृश्य उभे करीत होती.

लीगने शून्यातून सत्ता निर्माण केलेला सिंध, हा दुसरा एक प्रांत होता. विधिमंडळाच्या एकूण ६० जागांपैकी निवडणुकीत, १८ सिंध युनायटेड पक्षाला (प्रमुख मुसलमानी गट), ११ सिंध हिंदू सभेला, ९ स्वतंत्र मुसलमानांना, ८ काँग्रेस पक्षाला, ४ सिंध मुस्लिम पक्षाला, ३ सिंध आझाद पक्षाला (काँग्रेसला सहकार्य देणारा दुसरा मुस्लिम गट) आणि ४ पक्षाचे बिल्ले धारण न केलेल्यांना मिळाल्या.

कुठल्याच पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्यामुळे विधिमंडळाचे मुरब्बी सभासद आणि जमीनदार, सर गुलाम हुसेन हिदायतुल्ला यांनी मंत्रिमंडळ बनवण्याचे प्रयत्न सुरू केले. प्रथम त्यांनी निरनिराळे मुस्लिम गट एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. आणि जेव्हा तो प्रयत्न फसला तेव्हा त्यांनी आंतर जातीय संयुक्त पक्ष बनवला. ते स्वतः मुस्लिम लीगला मिळाले आणि त्यांनी विधिमंडळात लीगगट स्थापन केला.

परंतु सर्व मुसलमान सभासदांनी एकत्र येऊन एक गट करावा हे त्यांचे स्वप्न साकार झाले नाही. गुलाम हुसेन मंत्रिमंडळाला एक वर्ष पुरे होते न होते तोच त्याला पाठिंबा देणारे काही हिंदू सभासद मुसलमानांना मिळाले. मंत्रिमंडळ अल्पमतात गेले आणि १९३८ च्या मार्चमध्ये गडगडले.

यांच्या खालोखाल अनुयायित्व लाभलेले खान बहादूर अल्लाबक्ष हे होते. ते मुंबई विधिमंडळाचे माजी सभासद होते आणि जमीनदार होते. परंतु ते फक्त २२ जणांचाच विश्वास धरू शकत होते. त्यांनी सभोवार दृष्टी फिरवली आणि त्यांना असे आढळून आले की, आपल्याला चिरस्थायी पाठिंबा फक्त कांग्रेस गटाकडून मिळेल. परंतु आपल्या पाठिंब्यात कॉंग्रेसच्या निवडणूक जाहिरनाम्याला मान्यता गृहीत धरलेली आहे असे कॉंग्रेस पक्षाने आधीच स्पष्टपणे सांगितले होते. कॉंग्रेस कार्यक्रमाची काही कलमे मान्य केली गेली आणि तडजोड झाली. मंत्रिमंडळाचे पगार कॉंग्रेस मंत्रि-मंडळाइतके कमी केले गेले, ऑनररी मॅजिस्ट्रेटचे हुद्दे रद्द केले गेले, सामाजिक समारंभांवर मंत्र्यांना बहिष्कार टाकण्यास सांगण्यात आले आणि प्रांतामध्ये अटकेत ठेवलेल्या एकमेव राजकीय दहशतवादी पंजाबी कैद्याची सुटका केली गेली.

परंतु मंत्रिमंडळाने काही महिने शांततेने कारभार केला न केला तोच, लॉइड धरणावरील कर्ज फेडण्यासाठी शेतसारा वाढवण्याच्या प्रश्नावर त्याने कांग्रेस पक्षाचा पाठिंबा गमावला. ऑक्टोबर १९३८ मध्ये जेव्हा लीगच्या वार्षिक अधिवेशनासाठी म्हणून जीना कराचीमध्ये होते तेव्हा त्यांनी मंत्रिमंडळाचे रुपांतर लीग मंत्रिमंडळात करण्याचा प्रयत्न केला. परंतु अल्लाबक्षांच्या बरोबरची बोलणी फिसकटली आणि त्यांनी 'विश्वासघाता' बद्दल सिंधी पंतप्रधानांचा जाहीर निषेध केला. कॉंग्रेस आणि लीग अशा दोन शत्रूंच्या अडकित्त्यात सापडल्यानंतर अल्लाबक्ष प्रांताभिमानाकडे झुकले आणि त्यांनी प्रांताभिमानाच्या नावाखाली, विधिमंडळातील कां कूं करणाऱ्या सभा-सदांना असे मोठया खेदाने सांगितले की, सिंधच्या कारभारात प्रांताबाहेरील राजकीय शक्तींचा दबाव येत आहे आणि आता एका आवाजात 'सिंध सिंध्यांकरिता आहे' असे म्हणण्याची वेळ आली आहे. ही घोषणा प्रभावी ठरली आणि १९३९ च्या जानेवारीमध्ये आणलेल्या एका अविश्वासाच्या ठरावाचा मंत्रिमंडळाने ३२ विरूद्ध ७ मतांनी पराभव केला. पुढील महिन्यात सर गुलाम हुसेन हिदायतुल्ला यांनी लीगच्या प्रांतिक शाखेचे पुढारीपण सोडले आणि ते मंत्रिमंडळात आले तेव्हा ते अधिक सामर्थ्यवान झाले. युद्ध सुरू झाल्याबरोबर मंत्रिमंडळाने एकमुखाने गव्हर्नरला अशी विनंती केली की, 'प्रांताचे सर्व उत्पादन सामर्थ्य बिनशर्त व्हाइसरॉयच्या स्वाधीन करावे'.

सर गुलाम यांनी लीग सोडल्यामुळे, विधिमंडळात आणि बाहेर त्या पक्षाच्या वाढीला बसलेला हादरा काही लहान सहान नव्हता. परंतु सिंधमध्येही मुसलमानांनी ऐक 'शहीदगंज' शोधून काढले. आणि येथे पंजाबसारखे न करता ह्या प्रकरणातून

आपला फायदा करून घेतला. सक्कर येथे, मंझिलगह म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, नदी किनाऱ्यावरील दोन घुमटदार इमारती गेल्या शंभर वर्षे सरकारच्या ताब्यात होत्या. त्यापैकी एक कधीकाळी मशीद होती तेव्हा ती मुसलमानांच्या ताब्यात दिली जावी असा दावा मुसलमानांनी सुरू केला. ह्या दाव्याच्या पुष्टीसाठी कुठले कागदपत्रही नव्हते की, ती इमारत मशीद होती म्हणून दाखवलेला कुठला नकाशाही नव्हता. जसजसे दिवस जाऊ लागले तसतशी ही चळवळ तीव्र होऊ लागली. मंत्रिमंडळातील हिंदू आणि मुस्लिम सभासदात पडलेली फूट हे तिच्या यशाचे उत्तम द्योतक होते; मुसलमान मंत्री ही इमारत मशीद होती असे जोराजोराने प्रतिपादत होते आणि हिंदू मंत्री त्याला विरोध करीत होते. कायदेभंग करून आपला हक्क बजावण्याचे काही मुसलमान पुढाऱ्यांनी ठरवले आणि त्यांनी १ ऑक्टोबरला 'कायदेभंगाची चळवळ' सुरू केली. थोड्याच दिवसात शेकडो स्वयंसेवकांनी अटक ओढवून घेतली. ३ ऑक्टोबरला एका जमावाने मंझिलगहाच्या पोलीस संरक्षकाला दूर सारले आणि ती इमारत काबीज केली. चळवळ दडपली गेली, परंतु तिने हिंदू-मुसलमान तेढ निर्माण केली. १ नोव्हेंबरला एका हिंदू कवीचा खून झाला आणि ही तेढ हळूहळू वाढत चालली. यावेळी नेहमीप्रमाणेच हिंदूमहासभा, हिंदूंची कैवारी म्हणून पुढे झाली आणि तिने हिंदूंना आपले बळ एकवटण्यास उत्तेजन दिले. मुस्लिम लीगचे हे कार्य आधीच सुरू होते आणि महासभेने ते अधिकच सुकर करून दिले. हिंदू मुसलमान दंगे फक्त शहरातच नव्हे तर अगदी खेड्याखेड्यातून सुरू झाले. मृत आणि जखमी झालेल्या शेकडो लोकांमध्ये मुसलमानांपेक्षा हिंदूंची संख्या अधिक होती. 'मुसलमानांनी हिंदू कत्तलखाना' केला तरी आपल्या जागेला चिकटून राहणाऱ्या दोन हिंदू मंत्र्यांवर हिंदूंनी टीकेचा भडीमार केला आणि शेवटी त्यांना राजिनामे देण्यास भाग पाडले. संयुक्त मंत्रिमंडळात एका मंत्र्यांचा राजिनामा म्हणजे एका संघटित गटाचा पाठिंबा गमावणे होते. परिणामी अल्लाबक्ष मंत्रिमंडळ दुर्बळ झाले, लीगपक्षाच्या सतत कारवायांनी त्यांचे बहुमत ढासळले आणि त्यांनी अधिकारसूत्रे खाली ठेवली. आता पूर्वीच्या सरकारात महसूल मंत्री असलेले मीर बुंदे अलीखान हे नव्या 'राष्ट्रीय पक्षांचे' पुढारी बनले आणि त्यांनी नवीन सरकार बनवले. नव्या 'राष्ट्रीय पक्षा'त मुस्लिम लीग आणि स्वतंत्र हिंदू यांची चमत्कारिक एकजूट होती. नोव्हेंबरमध्ये अल्लाबक्षांचाही मंत्रिमंडळात समावेश केला गेला. मार्च १९४१ मध्ये फक्त एक वर्षाच्या कारभारानंतर बुंदेअली मंत्रिमंडळही पडले. मुसलमान मंत्र्यांची संख्या वाढवण्याच्या जीनांच्या हट्टामुळे मंत्र्यांमध्ये झालेली फाटाफूट हे याचे कारण होते.

अखेरीच्या मोगलांप्रमाणे सिंधमधली मंत्रिमंडळे धडाधड कोसळत होती. पुन्हा एकदा अल्लाबक्षांना पंतप्रधानपदासाठी पाचारण केले गेले आणि त्यांनी कॉंग्रेस पक्षाच्या मदतीने बहुमत गोळा केले. जातीय सलोख्यासाठी मंत्रिमंडळाने मनापासून

तयारी केली आणि या कार्यासाठी कायदेमंडळाकडून १ लक्ष रुपये मंजूर करून घेतले यामुळे, नुकत्याच सुरू केलेल्या पाकिस्तान चळवळीचा मुसलमानांचा पाठिंबा कमी होईल या मुद्यावर आणि त्या पैशाचा उपयोग मंत्रिमंडळ स्वतःचे स्थान मजबूत करण्यासाठी करील या मुद्यावर, लीग सभासदांनी त्याला फार कडाडून विरोध केला.

अल्लाबक्ष फार काळ अधिकारावर टिकणार नव्हते. परंतु यावेळच्या त्यांच्या अधिकार च्युतीला निराळी कारणे होती. सर ह्यडी या गव्हर्नरांनी अनेकवेळा पंतप्रधानांना संताप आणणारे निर्णय त्यांच्यावर लादले होते. लॉइड धरणाचा महसूल अधिकारी ब्रिटिश होता. तो निवृत्त झाल्यानंतर त्याच्या जागी हिंदी अधिकारी नेमण्याचे गव्हर्नरनी मान्य करण्याचे नाकारले तेव्हा हा संताप अधिकच वाढला. या घटनांमुळे म्हणा किंवा या घटना घडल्या तेव्हा म्हणा, पंतप्रधान आणि कॉंग्रेस यांचे संबंध अधिक घनिष्ट झाले होते. ऑगस्ट १९४२ मध्ये गांधी, कॉंग्रेस कार्यकारिणी आणि इतर शेकडो कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या अटकेनंतर, ऑगस्ट क्रांती म्हणून ओळखली जाणारी क्रांती सुरू झाली. २६ सप्टेंबरला अल्लाबक्षांनी व्हाइसरॉयना लिहिलेले एक पत्र वर्तमानपत्राकडे प्रसिद्धीसाठी पाठवले. त्यात त्यांनी आपण 'ब्रिटिश साम्राज्याचे चिन्ह' असलेल्या 'खान बहाद्दूर' आणि O. B. E. या पदव्यांचा त्याग करीत आहोत असे म्हटले होते; आणि 'हिंदुस्तानवरची आपली साम्राज्यवादी पकड चालू ठेवणे, तो सतत आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करणे, जातीय आणि राजकीय मतभेदांचा प्रचारासाठी उपयोग करणे आणि आपल्या स्वतःच्या साम्राज्यवादी उद्देशांची आणि हेतूंची जोपासना करण्यासाठी राष्ट्रीय शक्ती चिरडून टाकणे हे ब्रिटिश सरकारचे धोरण आहे' असे लिहिले होते. ८ ऑक्टोबर रोजी काढलेल्या दुसऱ्या एका वर्तमानपत्रीय निवेदनात ते म्हणतात : 'देशात गोंधळ माजला आहे याची जबाबदारी ब्रिटिश सरकारचीच आहे ...... हिंदुस्तानची मैत्री आणि सहकार्य मिळवण्याऐवजी सरकारने दडपशाही आणि दहशतवादाची मोहीम सुरू केली आहे.' १० ऑक्टोबरला गव्हर्नरने अल्लाबक्षांना पंतप्रधान पदावरून काढून टाकले.

आता त्यांच्याशी सहमत असलेले कॉंग्रेस व्यतिरिक्त इतर गट फार थोडे असल्यामुळे कुठल्याही गटांच्या फेररचनेने अल्लाबक्ष पुन्हा अधिकारावर येणे असंभवनीय होते. लीगला मोकळे रान मिळण्याचा मार्ग सुकर झाला. २२ ऑक्टोबरला सर गुलाम हुसेन यांनी संयुक्त मंत्रिमंडळ बनवले आणि आपण परत लीगला मिळण्याचा निर्णय घेतला आहे असे २३ ऑक्टोबरला जाहीर केले. गुलाम मंत्रिमंडळाचे चारही मंत्री लीगचे सभासद होते, किंवा झाले होते. आणि ३ मार्च १९४३ रोजी, जेव्हा विधिमंडळाने १९४०च्या लीगच्या अधिवेशनात लीगने संमत केलेल्या पाकिस्तानच्या ठरावाच्या बाजूने मतदान केले तेव्हा लीगचे मुस्लिम सभासदावरचे वर्चस्व कळसास पोचले. १४ मे रोजी शिकारपूरजवळ ४ मारेकऱ्यांनी अल्लाबक्षांवर हल्ला केला आणि त्यांना गोळी घालून ठार केले.

परंतु, लीगच्या अनिश्चल अनुयायित्वामुळे मुख्यमंत्र्यामध्ये सुरक्षिततेची भावना कधीच निर्माण झाली नाही. आणि मनधरणीच्या धोरणात अनुस्युत असलेली लाचलुचपत बेसुमार वाढली. या दोन गोष्टींमुळे लीग कार्यकारिणीला असाधारण वृत्ती धारण करावी लागली. ७ जून १९४४ रोजी कराची येथे तिची बैठक झाली आणि तिने मुख्यमंत्र्यांना राज्यकारभाराची सूत्रे खाली ठेवण्याचा आदेश दिला. ठरावात असे म्हटले होते की, जनतेच्या हितसंबंधांची वाढ व संरक्षण लीग किती आणि कुठपर्यंत करू शकते हे पाहण्यासाठी प्रायोगिक साधन म्हणून लीगने अधिकार सूत्रे हाती घेतली होती. ठरावात पुढे म्हटले होते की, हा प्रयोग फसला. 'काही मंत्र्यांच्या दुष्कृत्यांची लांबलचक यादी कार्यकारिणीपुढे आहे. सविस्तर आरोपपत्र बनवण्याची गरज कमिटीला नाही. परंतु या मंत्रिमंडळाच्या धान्य धोरणाचे स्वरूप समाधानकारक नाही या गोष्टीची नोंद करणे भाग आहे''''''गव्हाची ठरवलेली किंमत दर मणाला साडेनऊ रुपये असताना गरीब मुस्लिम शेतकऱ्यांना त्यांचा गहू दर मणास ७ रुपये भावाने विकणे भाग पडत आहे. आपल्या प्रांताचा आधारस्तंभ असलेल्या हारीच्या (सिंधी शेतकरी) हितसंबंधांची मुस्लिम लीग कार्य तत्परतेने वाढ करणारे नसेल तर आपल्या आस्तित्वाचे समर्थन ती कसे करणार?'

ह्या ठरावाकडे दुर्लक्ष केले गेले आणि गुलाम मंत्रिमंडळ तसेच अधिकारावर राहिले परंतु त्यासाठी त्याला कोलांट्या उड्या माराव्या लागल्या. २४ फेब्रुवारी १९४५ ला लीग पक्षाचे १४ सभासद विरोधी पक्षाला मिळाले आणि पक्षात फक्त ११ च सभासद राहिले. कॉंग्रेस पक्ष आणि काही हिंदू-मुसलमान अलिप्त सभासद यांनी मिळून गुलाम मंत्रिमंडळाचा २५ विरुद्ध १९ मतांनी पराभव केला. (५ हिंदू, २ युरोपियन, १ स्वतंत्र मुसलमान यांनी सरकारच्या बाजूने मतदान केले). परंतु खान बहादूर मौलाबक्ष यांचा मंत्रिमंडळात समावेश करून (२६ फेब्रुवारी) मंत्रिमंडळाने जीवदान मिळवले. मौलाबक्षांनी आपल्याबरोबर काही लीगेतर प्रमुख विरोधी सभासद आणले आणि सर गुलाम यांनी आपल्या अटी कबूल केल्यास मंत्रिमंडळात सामील होण्याचे मान्य केले. त्यापैकी एक अट अशी होती की, कॉंग्रेस कैद्यांची लवकर मुक्तता ; दुसरी अशी होती की, राज्यकारभाराच्या शुद्धतेचे कार्य करण्याकरिता मंत्रिमंडळाने लाचलुचपत विरोधी अधिकारी नेमावे. पुढल्या दहा दिवसात निष्ठा पुन्हा बदलल्या. लीग पक्ष थोडा अधिक बलवान झाला आणि त्याच्या पार्लमेंटरी बोर्डाने, मंत्रिमंडळातील मुस्लिम हिश्शाच्या सर्वच्या सर्व जागा मुस्लिम लीगला द्याव्या व मंत्रि-मंडळाची पुनर्रचना करावी असा आदेश मुख्य मंत्र्यांना दिला. लीग प्रतिज्ञा पत्रकावर सही करा किंवा बाहेर पडा असे मौलाबक्षांना सांगण्यात आले. त्यांनी बाहेर पडण्याचा मार्ग पत्करला आणि मंत्री म्हणून असलेली आपली दोन आठवड्यांची कारकीर्द संपवली.

सिंध आणि बंगालपेक्षा वेगळी, परंतु परिणामाच्या दृष्टीने सारखीच परिस्थिती असलेल्या आसाममध्ये आपले मंत्रिमंडळ येईल अशी खूणगाठ लीग बांधू शकत होती

एकंदर १०८ लोकांच्या सभागृहात ३४ मुस्लिम जागा होत्या. त्यापैकी फक्त ९ लीगला मिळाल्या होत्या; इतर जागांपैकी १४ स्वतंत्र मुसलमानांना, ५ आसाम खोऱ्यातील मुसलमानांना, ५ सुरमा खोऱ्यातील मुसलमानांना आणि १ प्रजापक्ष सभासदाला अशा मिळाल्या होत्या. सर्वात मोठा पक्ष हा काँग्रेसचा होता आणि त्याला अधिक पाठिंबा मिळण्यासारखी त्याची परिस्थिती होती. परंतु जुलैपर्यंत अधिकार हाती घेण्याचे काँग्रेसने ठरवले नव्हते. दरम्यान, सर सय्यद सादुल्ला यांनी बहुमतासाठी काही मुस्लिम व काही हिंदू सभासद एकत्र केले. ही एकजूट फार काळ टिकली नाही. आणि त्यांना बाहेर फेकण्यात आले. सप्टेंबर १९३८ मध्ये काँग्रेसने मंत्रिमंडळ बनवले. गोपीनाथ बारडोली यांच्या पुढारीपणाखाली बनवलेल्या ह्या काँग्रेस मंत्रिमंडळाने युद्धाच्या घोषणेनंतर, काँग्रेस नेतृत्वाच्या निर्णयानुसार राजिनामा दिला. सादुल्ला पुन्हा घोडयावर बसले. जीनांच्या विनंतीला मान देऊन ते १९३७ मध्ये लीगला मिळाले होते आणि आतापर्यंत विधिमंडळातील लीगचे सभासद त्यांनी खूपच वाढवले होते. काँग्रेस पक्षाने राजिनामा दिल्यामुळे रिकाम्या झालेल्या जागेवर बसण्याची आणि आपल्याकडे आणखी एक प्रांत आहे हे सांगण्याची संधी लीगला मिळाली हे उघडच होते.

यानंतर कालांतराने. वायव्य सरहद्द प्रांतही अशाच पद्धतीने लीगकडे गेला. ६० जागांच्या सभागृहात १९ जागांची सुरुवात करून कामचलाऊ बहुमत मिळवलेल्या खान साहेबांच्या काँग्रेस मंत्रिमंडळाने युद्ध प्रश्नावर राज्यसूत्रे खाली ठेवली. तोपर्यंत सरदार औरंगजेब खान यांनी लीग पक्ष स्थापन केला होता आणि काही स्वतंत्र हिंदू व शीख सभासदांच्या मदतीने ४ मुसलमान व १ शीख असलेले मंत्रिमंडळ स्थापन केले. सरहद्द प्रांतात १९३७ पर्यंत लीगचे नावसुद्धा ठाऊक नव्हते. परंतु आता चार पोटनिवडणुकीत तिला मिळालेल्या विजयावरून तिने चांगलेच मूळ धरले होते हे उघड दिसत होते.

१९४४ च्या शरदऋतूत सरहद्दीवरील काँग्रेस चळवळ थंडावली आणि विधी-मंडळातील काँग्रेस सभासदांनी परत विधिमंडळात बसण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाने औरंगजेब मंत्रिमंडळाला धोका निर्माण झाला. पण मुख्यमंत्र्यांनी तो दुर्दिन वसंतऋतूपर्यंत पुढे ढकलला. फक्त आपली पदच्युती पुढे ढकलण्यासाठी औरंगजेब खान यांनी हिवाळी अधिवेशन रद्द केले असा त्यांच्यावर आरोप करणारा अविश्वासाचा ठराव डॉ. खानसाहेब यांनी १२ मार्च १९४५ रोजी मांडला. तो २४ विरूद्ध १८ मतांनी संमत झाला. आणि सरहद्दीमधील लीगची मध्यवधी कारकिर्द संपुष्टात आली.

मुस्लिम बहुसंख्य प्रांतातील विधिमंडळात आणि लीगने पाकिस्तानच्या नकाशात समाविष्ट केलेल्या आसाम प्रांतात लीगची ही अशी परिस्थिती होती. हे चित्र फारसे आशादायक नव्हते. लीगच्या प्रचंड लोकप्रियतेचे ते निदर्शक नव्हते. हिंदू ज्याप्रमाणे काँग्रेसभोंवती गोळा होत होते त्याप्रमाणे मुसलमान लीगभोंवती गर्दी करीत होते.

प्रकरण बत्तीसावे

## काँग्रेसची स्वातंत्र्य चळवळ–मुस्लिम विरोधी !

हिंदी मुसलमानांचे गोखले बनावे ही कांक्षा जीनांनी ३० वर्षाहून अधिक काळ उराशी बाळगली होती. त्यांनी आपल्या राजकीय जीवनाला जेव्हा नुकतीच सुरुवात केली होती तेव्हा, गोपाळ कृष्ण गोखले हे काँग्रेसचे सर्वात अधिक आदरणीय नेते होते. त्यांचा युक्तिवाद, व्यावहारिक शहाणपणा, बुद्धिवंतावरील त्यांची पकड आणि सरकारी लोकांकडून त्यांना नेहमीच उपभोगावयास मिळालेले आदरयुक्त प्रतिसाद यांनी जीनांना आकर्षित केले होते. १९३६–३७ च्या निवडणुकी होईपर्यंत त्यांची ही कांक्षा सफळ झाली नव्हती. परंतु १९३७ ते १९३९ या दोन वर्षांच्या काळात जीना हे हिंदुस्तानातील सर्वात मोठे मुस्लिम पुढारी म्हणून नावारुपाला आले; गोलमेज परिषदेपर्यंत जे मुस्लिम प्रवक्ते त्यांच्याबरोबर होते ते अंतर्धान पावले होते. काँग्रेसमध्ये आणि जनतेमध्ये विशेषतः हिंदू जनतेमध्ये गांधींना जे स्थान होते तेच स्थान जीनांना आता लीग पक्षामध्ये आणि मुस्लिम जनतेमध्ये होते. विरोधाभासात्मक गोष्ट अशी की, जे पुढारी परंपरेने ब्रिटिशांशी एकनिष्ठ होते आणि अर्थातच युद्ध प्रयत्नांना मदत करीत होते त्या पुढाऱ्यांच्या गटाचे नेतृत्व त्यांनी स्वीकारले होते आणि तरीसुद्धा. जीनांनी त्यांना युद्धकमिटयापासून दूर रहाण्याचा आदेश दिला आणि तो धुडकावून लावण्यास हे पुढारी दुर्बल ठरले. लीग कौन्सिलच्या आणि लीग कार्यकारिणीच्या बैठकीत त्यांचा शब्द हाच कायदा होता. लीगच्या खुल्या अधिवेशनात त्यांचे भाषण दुसऱ्या कुठल्याही पुढाऱ्याला मिळाले नसेल इतक्या भक्तिभावाने आणि प्रेमाने आणि टाचणी पडली तरी ऐकू येईल इतक्या शांततेने ऐकून घेतले जात असे. सप्टेंबर १९३९ मध्ये युद्धाच्या घोषणेनंतर झालेल्या वाटाघाटीत फक्त लीगपक्षच हिंदी मुसलमानांचा प्रातिनिधिक पक्ष असल्याचे आणि आपण स्वतः तिचे प्रवक्ते असल्याचे त्यांनी दाखवून दिले. ऑक्टोबरमध्ये, अखिल भारतीय काँग्रेस समितीने, युद्ध प्रयत्नांत सशर्त सहकार्य करण्याचा ठराव मंजूर केला :' हिंदुस्तान स्वतंत्र देश आहे असे जाहीर केले पाहिजे आणि त्याला हा दर्जा जास्तीत जास्त प्रमाणात आताच्या आता लागू केला पाहिजे.' लीगचे सहकार्यही सशर्त होते परंतु तिची शर्त निराळी होती. ती अशी : 'अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या अनुमतीशिवाय हिंदुस्तानच्या घटनात्मक प्रगतीच्या प्रश्नाबाबत कसलेच निवेदन करत कामा नये. आणि अशा अनुमतीशिवाय आणि तिने मान्यता दिल्या शिवाय ब्रिटीश पार्लमेंटने

आणि हुजुरांच्या सरकारने कुठलीही राज्य घटना बनवता कामा नये व तिचा स्वीकार करता कामा नये.'

भारत देश आता दोन प्रकारच्या खोड्यात सापडला होता. एका बाजूला हिंदुस्तानातील राजकीय मत, संपूर्ण जबाबदार सरकार ताबडतोब स्थापन करावे अशी मागणी करीत होते, आणि ब्रिटिश सरकार, युद्ध समाप्तीनंतर जबाबदार सरकारचे आश्वासन देऊन तत्काळ युद्ध सहकार्याची मागणी करीत होते. तर दुसरा खोडा काँग्रेस आणि लीग मधला होता; हिंदी मुसलमानांची अतिशय प्रभावी संघटना म्हणून काँग्रेस लीगकडे पहात होती. आणि लीग अशी मागणी करीत होती की, ब्रिटिश सरकार, काँग्रेस आणि इतर प्रमुख हिंदू संघटनांनी, लीगला हिंदी मुसलमानांची एकमेव प्रातिनिधिक संस्था म्हणून मान्यता द्यावी. १४ डिसेंबर १९३९ रोजी नेहरूंनी जीनांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी काँग्रेसची भूमिका थोडक्यात अशी मांडली होती : 'लीग ही मुसलमानांची महत्वाची आणि प्रभावी संघटना आहे असे काँग्रेस नेहमीच मानत आलेली आहे आणि त्यामुळेच आपल्यामधील कुठलेही मतभेद सोडवण्यास आम्ही उत्सुक आहोत. परंतु ······ आपण हे जाणताच की, काँग्रेसमध्ये अनेक मुसलमान असे आहेत कीं, ते आमचे निकटचे सहकारी आहेत. मुस्लिम सभासद असलेल्या कामकरी आणि शेतकरी संघटनाव्यतिरिक्त, जमियत-उल्-उलेमा, अखिल भारतीय शिया परिषद मजलीस-इ-अहरर, अखिल भारतीय मोमिन परिषद इत्यादिसारख्या अनेक इतर मुस्लिम संस्था आहेत. यापैकी बऱ्याच संस्थांनी आणि व्यक्तींनी सर्वसाधारणपणे आम्ही स्वीकारलेली राजकीय भूमिका स्वीकारलेली आहे. त्यांना आम्ही तोडू शकत नाही किंवा कोणत्याही प्रकारांनी दूर लोटू शकत नाही.

या सर्व संघटनांची वार्षिक अधिवेशने भरवली जात होती, वर्तमानपत्रे त्याची दखल घेत होती, मुसलमानांच्या धार्मिक अगर व्यावसायिक क्षेत्रातील अनुयायित्वाचा लाभ त्यांना मिळत होता आणि त्या काँग्रेस चळवळीला स्वयंसेवकही पुरवीत होत्या. परंतु त्यांचे प्रातिनिधिक स्वरुप मतदानाच्यावेळी किंवा गटबदलातही कधी सिद्ध झाले नाही. आपल्या स्वातंत्र्य चळवळीत काँग्रेसला त्यांचा उल्लेखनीय असा उपयोग झाला असूनसुद्धा व्यवहारी राजकारणात ते काँग्रेसला एक लोढणेच झाले होते. कारण एका बाजूला, मुसलमानांतील लक्षणीय संख्येला काँग्रेसच्या धर्मनिरपेक्षतेकडे खेचण्यात ते अयशस्वी झाले आणि दुसऱ्या बाजूला, काँग्रेसच्या जातीय तडजोडीसंबंधीच्या निर्णयावर यांचा फार मोठा असर पडला.

ह्या मुस्लिम संघटना आणि राष्ट्रीय मुस्लिम हे जीनांच्या डोळ्याच्या खुपऱ्या होते. आणि जेव्हा जीनांना काँग्रेसच्या अबुल कलम आझादांशी वाटाघाटी करण्याचे सांगण्यात आले तेव्हा अनेकवेळा त्यांचा तोल सुटलेला होता. ८ ऑगस्ट १९४० रोजी व्हाइसरॉयने आपल्या कार्यकारी मंडळात वाढ केली आणि त्यात सामील होण्यासाठी हिंदी पुढाऱ्यांना आमंत्रण दिले. त्यावेळी काँग्रेसने आपल्या स्वतःच्या अटी

पुढे मांडल्या आणि त्या अटींशी सहमत होण्यासाठी आझादांनी आपल्या अध्यक्षीय अधिकारात जीनांना तार केली. त्या तारेला उत्तर देताना जीनांनी आझादांना असे सांगितले की, 'मुस्लिम हिंदुस्तानचा विश्वास तुम्ही पूर्णपणे गमावला असल्यामुळे आपल्याशी प्रत्यक्ष किंवा पत्रव्यवहाराने चर्चा करण्याचे मी नाकारत आहे. काँग्रेसला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त व्हावे आणि परकीय देशांना फसवता यावे म्हणून तुम्हाला काँग्रेसचा अध्यक्ष करून मुस्लिम नाच्या पोऱ्या बनवले आहे हे तुमच्या लक्षात येत नाही काय? तुम्हाला-स्वाभिमान असेल तर ताबडतोब राजिनामा द्या. आतापर्यंत, तुम्हाला लीगचे जितके वाईट करता येईल तितके तुम्ही केले आहे. त्यात तुम्ही फारच अयशस्वी झाला आहात हे तुम्ही जाणताच. द्या ते आता सोडून.'

काँग्रेस पुढाऱ्यात जे काही थोडे मुस्लिम पुढारी होते ते आपल्या नेकीचे आणि त्यागी वृत्तीचे बळी ठरले. काँग्रेस अल्पसंख्यकांना न्याय देईल याबद्दलचा त्यांचा विश्वास कधी ढळला नाही; त्यांची ही निष्ठा, त्यांनी संयुक्त मतदार संघावर विश्वास ठेवल्यापासून टिकली होती. विधिमंडळातील मुस्लिम प्रतिनिधित्वाकरिता मुस्लिम जातीयवाद्यांची वाढती मागणी आणि हिंदू जातीयवाद्यांचा त्याला विरोध यामुळे ते मुसलमानांना आपल्याकडे वळवू शकले नाहीत. याच मुद्यावर जीना अजूनही डाव टाकत होते. आणि व्हाइसरॉयला १ जून १९४० रोजी लिहिलेल्या आपल्या पत्रात त्यांनी आपल्या मागण्या अधिकच फुगवल्या. हिंदुस्तानच्या अंतिम फाळणीच्या आपल्या मागणीला चिकटून रहात असताना ते म्हणाले : '(अ) सध्याच्या राज्य घटनात्मक कायद्याच्या चौकटीत बसेल त्याप्रमाणे व्हाइसरॉयचे कार्यकारी मंडळ वाढवले पाहिजे, ही संख्या किती वाढवावी हे चर्चा करून ठरवावे लागेल. जर काँग्रेस आत येणार असेल तर मुसलमानांचे प्रतिनिधित्व हिंदूइतकेच असले पाहिजे, आणि जर ती येणार नसेल तर जादा घेतल्या जाणाऱ्या सभासदात मुसलमानांना बहुसंख्यत्व मिळाले पाहिजे. आणि असे झाले तर मुसलमान मुख्य भार आणि जबाबदारी अंगावर घेतील; (ब) ज्या प्रांताला घटना कायद्याचे ९३ कलम लागू करावयाचे असेल तेथे बिनसरकारी सल्लागार नेमले जावेत त्यांची संख्या किती असावी हे चर्चा करून ठरवावयाचे आहे, बिनसरकारी बहुसंख्य सल्लागार हे मुस्लिम प्रतिनिधी असावेत; आणि ज्या प्रांतात पक्षांच्या हात मिळवणीवर किंवा "संयुक्त" सरकार येणे शक्य असेल त्या प्रांतातील राज्यकारभाराची व्यवस्था सहाजिकच संबंधित पक्षांनी आपापसात तडजोड करून ठरवावी; (क) एक युद्ध समिती असावी ······ या समितीतही जर काँग्रेस येणार असेल तर मुस्लिम प्रतिनिधित्व हिंदू इतकेच असावे, आणि येणार नसल्यास मुस्लिम संख्या अधिक असावी. आणि शेवटी, या संकल्पित युद्ध समितीवरील मुस्लिम प्रतिनिधी आणि गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळावरील जादा बिनसरकारी सल्लागार मुस्लिम हे मुस्लिम लीगने निवडलेले असावेत.'

या मागणीच्या पाठोपाठ लीगच्या कार्यकारी मंडळाने १६ जूनला एक ठराव केला. त्या ठरावात कार्यकारिणीने सर्वसामान्यपणे मुसलमानांना आणि मुख्यत्वे करून मुस्लिम लीगच्या सभासदांना असा आदेश दिला होता की, आपल्या दोन मागण्या मान्य झाल्याशिवाय युद्ध समितीवर कोणी काम करू नये. त्या मागण्या अशा : (१) मुस्लिम हिंदुस्तानला मंजुरी किंवा संमती दिल्याशिवाय हुजुर सरकारने कुठलीही तात्पुरती किंवा निर्णायक राज्य घटना स्वीकारू नये. (२) मध्यवर्ती किंवा प्रांतिक सरकारात मुस्लिम नेते हे अंशभाक म्हणून तावडतोब सामील केले जावेत.

एका अर्थी, गोलमेज परिषदेच्यावेळी हिंदुस्तानात आणि इंग्लंडमध्ये असलेले वातावरण परत निर्माण झाले होते. काँग्रेस आपले लक्ष स्वातंत्र्याच्या मागणीवर केंद्रित करीत होती आणि जातीय तडजोडीला दुय्यम स्थान देत होती; तर लीग या तडजोडीला सर्व तात्पुरत्या आणि दूरगामी व्यवस्थेची अट मानीत होती. या पार्श्वभूमीवर व्हाइसरॉयची ८ ऑगस्ट १९४० ची सूचना आली. या निवेदनात व्हाइसरॉय म्हणाले होते : 'मुख्य मुद्दे दोन आहेत. या दोन मुद्यावर मी त्यांची भूमिका स्पष्ट करावी अशी हुजुर सरकारची इच्छा आहे. पहिला मुद्दा असा की, राज्य घटनेच्या भावी योजनेतील अल्पसंख्याकांचे स्थान. माझा गेल्या ऑक्टोबरचा जाहीरनामा, १९३५ च्या कायद्याच्या कुठल्याही भागाच्या किंवा त्याला आधारभूत असलेल्या कुठल्याही धोरणाच्या अगर योजनांच्या फेरतपासणीला प्रतिबंध करीत नाही हे स्पष्ट केले गेले आहे. त्या कायद्याच्या कुठल्याही दुरुस्तीत अल्पसंख्यकांच्या विचारांना पूर्ण महत्व दिले जावे याबद्दल हुजुर सरकारची कळकळही व्यक्त केली गेली आहे. ही हुजुर सरकारची भूमिका कायम आहे. तेव्हा आपल्या स्वतःच्या जबाबदारीचे संक्रमण करताना ते, हिंदुस्तानच्या स्थिरतेच्या आणि कल्याणाच्या दृष्टीने त्याच्या राष्ट्रीय जीवनातील फार मोठ्या आणि प्रभावी भागाचा अधिकार प्रत्यक्षपणे नाकारला जाईल अशा कुठल्याही राज्यकारभाराच्या पद्धतीचा विचार करणार नाहीत हे सांगावयास नकोच. अशा प्रकारच्या राज्यकारभाराच्या पद्धतीला मान तुकवण्याची सक्तीही ते करणार नाहीत.'

युद्धकाळातच सत्तेचा आशय स्वाधीन करावा या काँग्रेसच्या मागणीला 'ऑगस्ट घोषणे'त मान्यता नसल्यामुळे काँग्रेसने ती झिडकारली. घोषणेच्या या भागाकडे लीगने दुर्लक्ष केले आणि तिच्या कार्यकारिणीने, व्हाइसरॉयनी 'ब्रिटिश सरकार त्यांच्या मंजुरी आणि संमतीशिवाय कुठलीच भावी राज्य घटना तात्पुरती किंवा निर्णायक म्हणून स्वीकारणार नाही या स्पष्टपणे दिलेल्या आश्वासना'पुरते, तेवढ्या भागाचे स्वागत केले. तरीसुद्धा, आपली "५० टक्केची" मागणी मान्य झाल्याशिवाय ती युद्ध प्रयत्नांना सहकार्य देण्याचे मान्य करणार नव्हती.

काँग्रेस आणि लीगमधला आणि सरकारमधला हा खोडा तसाच राहिला. काँग्रेस व लीगमधला पेचप्रसंग सोडवण्याची घाई नव्हती. त्या दोघांनाही हे माहीत होते

की, जोपर्यंत युद्ध चालू आहे तोपर्यंत खरी सत्ता कधीच सुपुर्द केली जाणार नाही. आणि ती दिल्याशिवाय सरकारच्या जबाबदारीचा वाटा उचलण्यास काँग्रेस तयारच नव्हती. म्हणून तो प्रश्न तसाच अनिर्णित राहिला होता. युद्ध प्रयत्नांना सहकार्य न देण्याचा आदेश हिंदी लोकांना देण्याचे काँग्रेसने ठरवले. लढा सुरू करण्याचा संपूर्ण अधिकार गांधींना देण्यात आला. गांधींनी असा युक्तिवाद केला. 'युद्ध विरुद्ध प्रचार करण्याची आणि सरकारच्या युद्ध प्रयत्नात असहकार करण्याची शिकवण देण्याची काँग्रेसला मुभा आहे असे वचन जर ब्रिटिश सरकारकडून आम्हाला मिळाले तर आम्ही कायदेभंग सुरू करणार नाही.' ते पुढे म्हणाले की, आपण व्हाइसरॉयची भेट घेण्याचा प्रयत्न करू, आणि त्याला असे सांगू की, 'ही भूमिका आम्हाला घ्यावी लागत आहे; तुम्हाला गोंधळात टाकण्याची आणि युद्ध प्रयत्नासंबंधीच्या तुमच्या हेतूपासून तुम्हाला परावृत्त करण्याची आमची इच्छा नाही. अहिंसेच्या समान भूमिकेवर आम्ही आमच्या मार्गाने जातो आणि तुम्ही खुशाल तुमच्या मार्गाने जा. लोकांना जर आम्ही बरोबर नेऊ शकलो तर युद्ध प्रयत्नात ते तुम्हाला सहकार्य देणार नाहीत. उलटपक्षी, नैतिक प्रभावाखेरीज दुसरे कुठलेही दडपण न वापरता तुम्ही त्यांना युद्ध प्रयत्नांना मदत करण्यास प्रवृत्त केलेत तर आम्ही तक्रार करणार नाही.'

काँग्रेसच्या सर्व लढ्यांचा एकच हेतू होता तो म्हणजे राष्ट्राचे स्वातंत्र्य. परंतु काँग्रेसचा हा लढा म्हणजे युद्धाचा फायदा घेऊन आपल्या मागण्या ब्रिटिश सरकारवर लादण्याचा प्रयत्न आहे असा जीनांनी त्याचा निषेध केला आणि मिळेल त्या काठीने ते काँग्रेसला आणि 'हिंदू नेतृत्वा'ला झोडपू लागले. चमत्कारिक गोष्ट अशी की, जीनांनी केलेल्या अशा प्रत्येक निषेधाचा परिणाम मुसलमानांच्या वाढत्या ऐक्य भावनेत झाला. मुरब्बी राजकारणी जीनांनी हा तापलेला तवा कधीच थंड होऊ दिला नाही. हिंदूमहासभेचा पाकिस्तान विरोधी प्रचार जसा चालू राहिला आणि 'अखंड हिंदुस्तान'च्या नव्या चळवळीबद्दल बोलणे वाढू लागले तसे त्यांचे अनुयायीही वाढू लागले.

मार्च १९४२ मध्ये जेव्हा पूर्वेकडे युद्धाने गंभीर वळण घेतले, तेव्हा ब्रिटिश मंत्रीमंडळाचे एक सभासद सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना हिंदी पेचप्रसंगावर तोडगा शोधण्याच्या उद्देशाने हिंदुस्तानात पाठवण्यात आले. त्यांच्या योजनेत जबाबदार सरकारची मागणी मान्य केली नव्हती त्यामुळे काँग्रेसने ती योजना ताबडतोब झिडकारली. योजनेत लीग मागण्यांच्या आशयाला मान्यता दिली होती परंतु त्यात निःसंदिग्धपणे पाकिस्तानचा स्वीकार केलेला नसल्यामुळे लीगनेही ती झिडकारली.

काँग्रेसचा युद्धविरोधी लढा सुरू होण्यापूर्वी या दोन पक्षांनी ज्या भूमिका घेतल्या होत्या त्याच भूमिकेकडे हे पक्ष परतले. ८ ऑगस्ट १९४२ रोजी काँग्रेसने पुन्हा मोठा लढा करण्याचा निर्णय घेतला; तो ताबडतोब सुरू होऊन त्याचे रुपांतर उघड

क्रांतीत झाले. लीगने पुन्हा त्याचा निषेध केला आणि २० ऑगस्टला मुंबई येथे भरलेल्या तिच्या कार्यकारी मंडळाने पुढील ठराव केला : 'या कार्यकारी मंडळाचे विचारपूर्वक असे मत आहे की, या लढ्याचे उद्दिष्ट मुठभर हिंदूंकडे सत्ता सुपूर्द करणे आणि हिंदुस्तानातील मुसलमानांना आणि इतर अल्पसंख्यकांना ब्रिटिश सरकारने वेळोवेळी दिलेल्या आश्वासनांचे आणि नैतिक कर्तव्यांचे पालन करणे त्यांना अशक्य करणे हे तर आहेच पण कॉंग्रेस शर्ती आणि हुकूमापुढे मुसलमानांनीही सक्तीने मान तुकवावी म्हणून आहे.'

लढ्यापासून पूर्णपणे अलिप्त रहाण्याचा आदेश जीनांनी मुसलमानांना दिला आणि हाच इशारा हिंदुमहासभेने हिंदूंना दिला. या दोन संघटनांच्या अनुयायांनी देशासाठी काही त्याग करण्याचा कधी विचारच केला नव्हता. जीनांनी आणि हिंदुमहासभेने असे इशारे दिले नसते तर मुसलमान आणि हिंदू जातीय वाद्यांनी कॉंग्रेस आवाहनाला पाठिंबा दिला असता असे म्हणणे म्हणजे अडाणीपणे स्वतःची फसवणूक करून घेणे होते. कॉंग्रेस लढ्याचे आवाहन म्हणजे कमाल शरीर कष्ट आणि मालमत्तेवर पाणी सोडणे हे होते. जीनांच्याभोवती गोळा झालेले मुसलमान म्हणजे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात एका मागोमाग एक अशा झालेल्या घडामोडींची परिपूर्ती होती. या उत्थानात राष्ट्रवादी उमाळ्याचा आविष्कार पहाणे चुकीचे होईल. कॉंग्रेस जनांना ऑगस्ट क्रांती म्हणजे १८८५ मध्ये कॉंग्रेसचा जन्म होण्यापूर्वीपासून रुजत आलेल्या राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रवादी शक्तींचा कळस वाटत होता. मुसलमानांची पाकिस्तानची मागणी म्हणजे त्यांना सतत वाटत असलेल्या हिंदू वर्चस्वाच्या भीतीवर पोसलेल्या जातीयवादाचा कळस होता. या मागील प्रेरणा शक्ती ही हळूहळू रुजत जाणाऱ्या राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रवादाची नसून धार्मिक कर्मठपणाची होती. जिला जीना 'हिंदू कॉंग्रेस' म्हणत होते त्या कॉंग्रेसने लोकशाहीची पूर्व तयारी करण्यासाठी पाऊणशे वर्षे घेतली होती. क्रियाशील संस्था म्हणून कामाला लागून लीगला फक्त काही वर्षेच झाली होती. तिचे नेतृत्व हुद्देधारी लोकांकडे होते. तिचे कॉंग्रेसबरोबरचे नाते सर्व पक्षीय परिषदेच्या कामकाजापासून तुटले होते आणि तेव्हापासून तिला अजातीयवादी राजकारणात रस नव्हता. तिच्या सभासदांच्या सरकार निष्ठेबद्दल सत्ताधिकाऱ्यांना कधी संशय नव्हता. युद्ध समितीतून राजिनामा देण्याच्या जीनांच्या हुकुमापुढे मुस्लिम लीगचे मुख्यमंत्री नमले याचे कारण अगदी वैयक्तिक होते. तरीसुद्धा, त्यांनी युद्ध प्रयत्नांना सर्व प्रकारचे सहकार्य दिले होते. प्रमुख मुसलमानांना लीगचे सभासद बनण्यास जिल्हाधिकाऱ्यांनी उत्तेजन दिले होते. पदव्यांचा त्याग करण्याच्या जीनांच्या आग्रहाला विरोध झाला नव्हता, परंतु पदव्या धारण करणाऱ्या लीग पुढाऱ्यांनी प्रत्यक्षपणे त्याची अंमलबजावणी केली नव्हती.

सरकारशी लीगचा कधी उघड संघर्ष झाला नव्हता आणि जीनांचे समाधान होईल अशी तडजोड जरी लीग आणि कॉंग्रेसमध्ये झाली असती तरी स्वातंत्र्याच्या चळवळी·

साठी काँग्रेसबरोबर. हातमिळवणी करण्यास लीगचे मत वळवण्यात जीना यशस्वी होतील असा सुतराम संभव नव्हता. आणि जर खरोखरीच असे घडले असते तर जीनांचे नेतृत्व खतम् झाले असते. जीनांना ज्यांनी विधिमंडळात प्रातिनिधिक स्वरुप प्राप्त करून दिले होते त्यापैकी बहुतेक जणांनी त्यांचा त्याग केला असता.

ऑगस्ट क्रांतीच्यावेळी जीनांनी मुसलमानांना अपायकारक म्हणून जेव्हा तिचा निषेध केला तेव्हा मुस्लिम राजकारणाची परिस्थिती ही अशी होती. ऑगस्ट क्रांती हा शंभर वर्षात प्रगत झालेल्या राष्ट्रवादाचा उद्रेक होता. ह्या राष्ट्रवादापासून कोणत्याही कारणाने का होईना मुसलमान दूर राहिले. आणि जीनांच्या हुकूमाचा अर्थ 'हिंदू' राष्ट्रवादाऽतक्याच जुन्या असलेल्या इतिहासाची वाटचाल असा झाला तो एकप्रकारे हिंदू जातीयवादाला साधक ठरला : मुस्लिम समाज चळवळीच्या हालअपेष्टापासून अलिप्त राहिला परंतु या भोगातून मिळालेल्या फळांचा वाटा उचलण्यास मात्र पुढे झाला अशी हिंदूंची कुरबूर होती. ही फळे हालअपेष्टातून आली की, त्याशिवायही आली असती हा प्रश्न निराळा.

---

प्रकरण तेहतीसावे

# लीग भूमिकेचा विजय

लीगने पाकिस्तानचा ठराव संमत केल्यापासून त्या मागणीच्या प्रत्येक पुनरुच्चाराचा वर्तमानपत्रीय अग्रलेखात सतत निषेध करण्यात आला आणि प्रत्येक निषेधाने मुसलमानात लीगला अधिकाधिक लोकप्रियता मात्र मिळाली. काँग्रेसच्या सर्व संघटना, हिंदु-महासभा, अखंड हिंदुस्तान परिषद आणि वर्तमानपत्रे, ज्याला जीना 'हिंदू वर्तमानपत्रे' म्हणत असत, हे सर्व एकदिलाने पाकिस्तानच्या विरोधी उभे राहिले. यापैकी कोणाही पाकिस्तानच्या कल्पनेला स्पर्श करण्यास तयार नव्हते. अशा विरोधी वातावरणात काँग्रेसजनांना धक्का देणारा आणि जीनांना आश्चर्यचकित करणारा एकुलता एक अनुकूल आवाज, मद्रासमधून उमटला. काँग्रेस मंत्रिमंडळाने राजिनामा देईपर्यंत मद्रासचे मुख्यमंत्री असलेले, काँग्रेसचे फार मोठे नेते सी. राजगोपालाचारी यांचा हा आवाज होता. ते म्हणाले की, हिंदू मुस्लिम मतभेद हे पाकिस्तानच्या तत्वावर सोडवले पाहिजेत. मद्रास कायदेमंडळाच्या काँग्रेस पक्षातील आपल्या अनेक सहकार्यांना आपल्या या विचाराशी सहमत करून घेण्यास आणि २३ एप्रिल १९४२ रोजी त्याला पक्षाची औपचारिक मान्यता मिळवण्यात ते यशस्वी झाले. हा ठराव अखिल भारतीय काँग्रेस कमिटीत आणणे ही याच्या पुढची पायरी होती. तेथे तो १५ विरुद्ध १२० मतांनी फेटाळण्यात आला. कमिटीचे म्हणणे असे होते की. 'कुठल्याही घटक राज्याला किंवा प्रादेशिक विभागाला हिंदी संघराज्यातून किंवा हिंदी संघातून विभक्त होण्याचे स्वातंत्र्य देऊन हिंदुस्तानची शकले करणारी कुठचीही सूचना ही निरनिराळ्या राज्यातील आणि सबंध देशातील लोकांच्या हितसंबंधांना फार हानीकारक आहे. आणि म्हणून अशा कुठल्याही सूचनेला काँग्रेस मान्यता देऊ शकणार नाही.'

हा ठराव राजगोपालाचारीना थोपवून धरू शकला नाही. त्यांची सूचना फेटाळली गेल्यानंतर त्यांनी पत्रकारांना ४ मे रोजी असे सांगितले की, आपण आपली मोहीम चालूच ठेवणार आहोत कारण ब्रिटनपासून सत्ताबद्दल मिळवण्यासाठी लीगशी तडजोड आवश्यक आहे. ते म्हणाले की, 'मी वैयक्तिकरित्या लीगशी वाटाघाटी करून काही साधू शकत नाही. मला काँग्रेसचे आणि हिंदुस्तानच्या लोकांचे मतपरिवर्तन घडवून आणले पाहिजे.' त्यांनी काँग्रेसचा राजिनामा दिला आणि आपल्याला काँग्रेस नियमातून मुक्त करून घेतले. काँग्रेसच्या उपकाराच्या ऋणातून मुक्त

होण्यासाठी काँग्रेस तिकिटावर जिंकलेल्या आपल्या विधिमंडळाच्या सभासदत्वाचाही त्यांनी राजिनामा दिला. परंतु अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या भूमिकेपुढे त्यांचे नव्या विचारांचे अनुयायी गडबडले; त्यांच्याबरोबर वनवास पत्करण्यासाठी जेमतेम सात लोक शिल्लक राहिले.

राजगोपालाचारींनी मतपरिवर्तन केलेले पहिले काँग्रेस पुढारी खुद्द गांधी होते.

जेव्हा ऑगस्ट क्रांती चालू होती आणि जेव्हा बहुतेक सर्व काँग्रेस पुढाऱ्यांना आणि काँग्रेसजनांना अटकेत डांबून ठेवण्यात आले होते तेव्हा 'राष्ट्रीय मागणीच्या बाजूने सार्वजनिक मत गोळा करण्याकरिता प्रमुख राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांशी वाटाघाटी करण्यासाठी', हिंदुमहासभेने ऑगस्ट १९४२ मध्ये एक समिती नेमली. हिंदुमहासभेचे एक सरचिटणीस राजा महेश्वर दयाळ शेठ यांनी एका समान मित्राच्यामार्फत जीनांशी संपर्क साधला आणि त्यांच्याकडून पुढील सूचना मिळवली. '३० ऑगस्ट १९४२ च्या आपल्या ठरावात अखील भारतीय हिंदुमहासभेच्या कार्यकारिणीने मांडलेल्या स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय मागणीवर मुस्लिम लीगचा हा पुढारी शिक्का मोर्तब करीत आहे; आणि जर काही व्यापक तत्वावर मुस्लिम लीगशी तडजोड होऊ शकली तर ताबडतोब स्वातंत्र्य मिळवण्याकरिता लढा देण्यासाठी इतर राजकीय पक्षांशी एकजूट करण्याची लीगची तयारी आहे. जर अशी तडजोड झाली तर संमिश्र तात्पुरती सरकारे बनवण्यास मुस्लिम लीग सहकार्य करील. पुढील व्यापक तत्त्वे सर्वांना संमत व्हावी, युद्ध संपल्यानंतर (अ) हिंदुस्तानच्या वायव्य आणि ईशान्य भागातील मुस्लिम बहुसंख्य सलग प्रदेशांच्या आखणीसाठी एक मंडळ नेमावे; (ब) या दोन भागात सार्वमत घ्यावे आणि बहुसंख्य लोकांनी जर विभक्त सार्वभौम राज्याच्या बाजूने मतदान केले तर तसे राज्य बनवले जावे; (क) विभक्त राज्य बनवले गेल्यास हिंदुस्तानातील अल्पसंख्य मुसलमानांच्या संरक्षणाची मागणी मुसलमान करणार नाहीत. परस्पर संमतीच्या तत्वावर परस्पर राज्यातील धार्मिक अल्पसंख्यकांच्या संरक्षणाची व्यवस्था करण्याचा मार्ग दोनही हिंदुस्तानला मोकळा राहील; (ड) वायव्य आणि ईशान्य या दोन मुस्लिम प्रदेशांना जोडणारा पट्टा असणार नाही. परंतु या दोन प्रदेशांचे मिळून एक सार्वभौम राज्य स्थापन होईल; (इ) खर्चाच्या तत्वावर लोकसंख्येची अदलाबदल करण्यासाठी योग्य संधी मिळण्याकरिता सरकारी यंत्रणा पुरवण्यात येईल.'

१९४२ च्या डिसेंबरमध्ये, निरनिराळ्या मतांच्या छटा असलेल्या राजकीय पुढाऱ्यांची परिषद अलाहाबाद येथे भरली होती. त्यात हिंदुमहासभेच्या चिटणीसांनी हा मसुदा वाचून दाखवला. तेथे हजर असलेल्या राजगोपालाचारींनाही त्याची प्रत देण्यात आली होती. ९ ऑगस्ट १९४२ पासून आगाखान पॅलेसमध्ये स्थानबद्ध करून ठेवलेल्या गांधींचा २१ दिवसांचा उपास जेव्हा फेब्रुवारी १९४३ मध्ये चालू होता तेव्हा राजगोपालाचारी गांधींना भेटले आणि त्यांनी या मसुद्याला त्यांची संमती

मिळवली. हा मसुदा त्यांनी थोडा फेरफार करून ८ एप्रिल १९४३ मध्ये जीनासमोर ठेवला. फेरफार केलेल्या या मसुद्याला, त्यांच्या कर्त्याच्या नावावरून (सी. राजगोपालाचारी), सी. आर. मसुदा म्हणून ओळखले जाते. तो खालीलप्रमाणे आहे :

(१) स्वतंत्र हिंदुस्तानच्या घटनेसंबंधी पुढील अटीवर मुस्लिम लीग हिंदी लोकांच्या स्वातंत्र्याच्या मागणीवर शिक्कामोर्तब करेल आणि संक्रमणाच्या काळात तात्पुरते हंगामी सरकार बनवण्यासाठी ती काँग्रेसशी सहकार्य करील; (२) युद्ध संपल्यानंतर हिंदुस्तानच्या पूर्व आणि वायव्य भागातील पूर्णपणे मुस्लिम बहुसंख्य असलेल्या अशा सलग जिल्ह्यांच्या आखणीसाठी एक मंडळ नेमले जावे. अशा आखणी केलेल्या प्रदेशातील रहिवासी हिंदुस्तानपासून विभक्त होण्याच्या प्रश्नाचा मतदानाने निर्णय करतील. हे मतदान प्रौढ मतदानाच्या तत्वानुसार किंवा दुसऱ्या एखाद्या व्यावहारिक मताधिकाराच्या तत्वानुसार घेतले जाईल. लोकमताचा कौल जर हिंदुस्तानपासून विभक्त अशा सार्वभौम राज्याच्या बाजूने झाला तर तो निर्णय सीमेवरील जिल्ह्यांच्या कुठल्याही राज्यात सामील होण्याच्या हक्काला बाध येणार नाही अशा पद्धतीने अंमलात आणला जावा; (३) लोकमत घेण्यापूर्वी सर्व पक्षांना मतप्रचाराचे स्वातंत्र्य असावे; (४) विभक्त होण्याचे ठरल्यास संरक्षण, व्यापार आणि दळणवळण व इतर आवश्यक बाबींच्या सुरक्षिततेसाठी एक परस्पर करार केला जावा; (५) लोकसंख्येची कोणत्याही प्रकारची अदलाबदल फक्त खुषीच्या तत्वावरच संपूर्णपणे केली जावी; (६) हिंदुस्तान राज्यकारभाराची संपूर्ण जबाबदारी आणि सत्ता जर, ब्रिटिशांनी स्वाधीन केली तरच ह्या शर्ती बंधनकारक रहाव्यात.'

या मसुद्याने पंजाब आणि बंगालला भेदून जाणारी रेषा काढली आणि पाकिस्तानची मागणी प्रत्यक्षात उतरवली. या रेषेच्या एका बाजूला मुस्लिम बहुसंख्य जिल्हे व दुसऱ्या बाजूला हिंदू बहुसंख्य जिल्हे होते. या रेषेच्या पश्चिमेचे पंजाबमधील जिल्हे आणि पूर्वेचे बंगालमधील जिल्हे मिळून पाकिस्तान बनेल आणि या रेषेच्या दुसऱ्या बाजूचे जिल्हे हिंदुस्तानात राहतील, असे या मसुद्यात सूचित केले होते. आता पाकिस्तानची कल्पना तेरा वर्षांची जुनी झाली होती आणि या योजनेच्या कर्त्यांनी, ब्रिटिश सत्ताधिकाऱ्यांनी आपल्या कारभाराच्या सोयीसाठी पाडलेल्या संपूर्ण प्रांताचा समावेश या नव्या मुस्लिम राज्यात केला होता. हिंदी प्रदेशांच्या राज्यकारभार विभागातील सलग हिंदू जिल्हे मुस्लिम राज्याचा विभाग बनू शकणार नाहीत याचा त्यांनी कधी विचारच केला नव्हता. खुद्द जीनांनीही आपल्या पाकिस्तान योजनेत सबंध पंजाब आणि सबंध बंगालचा समावेश केला होता आणि जेव्हा सी. आर. मसुदा त्यांच्यासमोर ठेवला गेला तेव्हा डोके छाटलेले पाकिस्तानचे स्वरुप म्हणून त्यांनी या मसुद्याला बाजूला सारले आणि तो प्रश्नच टाळला. पण ही योजनाच अखेरीस पाकिस्तानचा पाया बनली.

झाडावरचे पिकलेले फळ जसे सहज पडावे इतक्या सहजतेने आता जीनांना

सवलती दिल्या जाऊ लागल्या. १९४४ मध्ये जेव्हा युद्ध संपुष्टात येऊ लागले आणि काँग्रेस स्थानबद्धांची सुटका करण्यात येऊ लागली तेव्हा हंगामी संमिश्र सरकारची भाषा परत सुरू झाली. मध्यवर्ती विधिमंडळातील काँग्रेसचे नेते, भुलाभाई देसाई यांनी लीग पक्षाचे एक दुय्यम नेते नबाबजादा लियाकत अलीखान यांच्याबरोबर वाटाघाटी सुरू केल्या, आणि गांधी व जीनांच्या संमतीच्या अटीवर दोघांनी मिळून एक मसुदा तयार केला. त्यात अशी तरतूद केली होती की, केंद्रिय हंगामी सरकार बनवण्यात काँग्रेस आणि लीग हातमिळवणी करतील; हे सरकार असे असावे : (अ) केंद्रिय मंडळात काँग्रेस व लीगने नेमलेल्या लोकांचे समान संख्या बळ (काँग्रेस, लीग व इतर यांचे प्रमाण ४० : ४० : २० असे राहील व नेमलेले लोक मध्यवर्ती कायदेमंडळाचे सभासद असलेच पाहिजेत असे नाही.); (ब) अल्पसंख्यकांचे (विशेषतः अनुसूचित जमाती आणि शीख) प्रतिनिधी; (क) कमांडर-इन-चीफ हे सरकार १९३५ च्या कायद्याच्या चौकटीत कार्य करील परंतु विधिमंडळाच्या कुटल्याही निर्णयाविरूद्ध व्हाइसरॉयचा खास अधिकारांचा उपयोग करणार नाही.

या देसाई-लियाकत मसुद्यावर गांधींनी आपल्या संमतीची निशाणी ठोकली. युरोपमधील युद्ध संपल्यानंतर १४ जून १९४५ रोजी हंगामी सरकारची शक्यता अजमावण्यासाठी व्हाइसरॉयनी पुन्हा एकदा निरनिराळ्या पक्ष पुढाऱ्यांची एक बैठक बोलवली. काँग्रेस आणि लीग प्रतिनिधींनी व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळावर नेमण्याकरिता आपापल्या लोकांची नावे व्हाइसरॉयला सादर करावीत असे त्यांना सांगण्यात आले. बिगर लीगवाल्या मुसलमानांची नावे काँग्रेस यादीत होती. शिवाय लीगनेही आपल्या पाच नावांची यादी सादर केली. या सर्व नावामधून व्हाइसरॉयनी आपली यादी तयार केली आणि जीनांनी जेव्हा त्यांची भेट घेतली तेव्हा त्यांनी त्यातील मुस्लिम नावे त्यांना वाचून दाखविली. त्यात एका राष्ट्रीय मुसलमानाचा समावेश होता. त्या नावाला जीनांनी विरोध दर्शवला. त्यांचे म्हणणे असे होते की, लीग ही केवळ एकच मुसलमानांची प्रातिनिधिक संस्था आहे आणि म्हणून व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे सर्व मुस्लिम सभासद हे लीगचेच असले पाहिजेत. जीनांचा हा दावा फक्त काँग्रेसनेच खोडून काढला असे नव्हे तर पंजाबच्या युनियनिटस्ट पक्षानेही काढला. युनियनिस्ट पक्षाचे पंजाबचे पुढारी खिर्जे हियातखान, यांनाही परिषदेचे निमंत्रण होते. आणि एका युनियनिस्ट सभासदाचा समावेश हंगामी सरकारात करण्याबाबत त्यांना विचारण्यात आले होते. पूर्वी लीगवादी असलेल्या पंजाबच्या मुख्यमंत्र्यांनीही एक निवेदन काढून असे म्हटले होते की, 'सर्व मुस्लिम जगाची मक्तेदारी जीनांना देऊन बिगर लीगच्या मुसलमानांचे प्रतिनिधित्वच नाहीसे करण्याच्या त्यांच्या हुकुमशाही दाव्याला बिनशर्त मान्यता देता येणार नाही. मी असे ठामपणे म्हणू शकतो की, हिंदी मुसलमानांच्या हक्काची आणि अधिकाराची राखण करण्यात पंजाबी मुसलमान इतर कुठल्याही मुसलमानापेक्षा तसूभरही मागे राहणार नाही.

'माझ्या नव्या कार्यकारी मंडळाचे सर्व मुस्लिम सभासद हे लीगचेच सभासद असावेत अशी जी तुमची इच्छा आहे त्याबद्दल मी खात्री देऊ शकत नाही.' असे व्हाइसरॉयनी जीनांना सांगितल्याबरोबर हंगामी सरकारच्या वाटाघाटी मोडल्या.

मुसलमानांचे प्रतिनिधित्व कोण करत होते या प्रश्नाचे उत्तर देणे खरोखरीच कठीण होते. १९३६–३७ च्या निवडणुकांनी देशातील कुठल्याच एका राष्ट्रीय पक्षाला संपूर्ण प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार दिला नव्हता. आता नवी सार्वत्रिक निवडणूकच निरनिराळ्या पक्षांचे प्रातिनिधिक स्वरुप निश्चित करू शकली असती, आणि म्हणून व्हाइसरॉयने ब्रिटिश सरकारच्या अधिकारात असे जाहीर केले की, आपण 'सर्व प्रमुख हिंदी पक्षांचा पाठिंबा राहील असे कार्यकारी मंडळ अस्तित्वात आणण्यासाठी पाऊले टाकू.' आणि हे प्रमुख पक्ष कोणते हे नव्या प्रांतिक निवडणुकांनी सिद्ध केले जाईल. या निवडणुका १९४६ च्या प्रारंभीच्या काळात घेतल्या गेल्या.

देशातील एकंदर मुस्लिम मतदानाच्या ७५ टक्के मते मिळवून लीगने मुस्लिम मतदार विभागातील मतदान जिंकले आणि कॉंग्रेस राष्ट्रीय मुस्लिम पक्ष आणि युनियनिस्ट पक्ष यांना आश्चर्याचा धक्का दिला. तिने बंगालमध्ये ११९ मुस्लिम जागांपैकी ११३, पंजाबमध्ये ८६ पैकी ७३ आणि सिंधमध्ये ३४ पैकी २७ जागा मिळवल्या. हिंदू बहुसंख्य प्रांतातही तिचा विजय असाच प्रचंड होता. संयुक्त प्रांतात तिला ६६ पैकी ५४ जागा मिळाल्या, बिहारमध्ये ४० पैकी ३४, ओरिसामध्ये सर्वच्या सर्व ४, मद्रासमध्ये सर्वच्या सर्व २९, मध्य प्रदेशात १४ पैकी १३, मुंबईतील सर्व ३० आणि आसाममधील ३४ पैकी ३१ जागा मिळाल्या. वायव्य सरहद्द प्रांतात दोन जमियत-उल-उलेमांचे सभासद धरून कॉंग्रेसला मिळालेल्या २१ जागा विरुद्ध तिला १७ मिळाल्या. तेथे कॉंग्रेसने जरी निःसंशय अशा १९ जागा मिळवल्या होत्या तरी उरलेल्या सबंध हिंदुस्तानात तिने फक्त पाचच जागा मिळवल्या होत्या, आणि या जागांनी कॉंग्रेस ११ प्रांतापैकी १० मध्ये मुसलमानांचे प्रतिनिधित्व करत नव्हती असे पुन्हा एकदा सिद्ध केले.

सर्व देशातील एकंदर ४९२ मुस्लिम जागांपैकी ४२५ जागा मुस्लिम लीगला मिळाल्या आणि सर्व विधिमंडळे जसजशा कामे करू लागल्या तसतसा हा आकडा वाढू लागला. उदाहरणार्थ सिंध विधिमंडळात लीगची संख्या जानेवारी १९४७ पर्यंत ३५ झाली आणि ६० च्या सभागृहात तिला स्पष्ट बहुमत मिळाले. या प्रांतात आणि बंगालमध्ये लीगने काहीशा आकसाने मंत्रिमंडळ बनवले; जवळ जवळ सर्वच मंत्री मुसलमान असलेली मंत्रिमंडळे स्थापन केली; सिंधमध्ये सहाही मंत्री मुसलमान होते; बंगालमध्ये अकरा मुसलमान व तीन हिंदू होते. परंतु पंजाबमध्ये कॉंग्रेस, युनियनिस्ट पक्ष (नवीन निवडणुकीत याची संख्या २० पर्यंत घटली होती आणि नंतरच्या फुटीमुळे फक्त सोळाच राहिली होती.) आणि इतर काही गटांच्या एकजुटीत लीगपक्ष सापडला. युनियनिस्ट पक्षांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ स्थापले

गेले आणि त्याने लीगच्या विजयाला काट दिला.

निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर लवकरच सर्व विधिमंडळातील लीग सभासदांची एक सभा झाली. त्यातील काही जणांनी युद्धखोर भाषणे केली. मुंबईचे इस्माईल चुन्नीगर म्हणाले की, मुसलमानांनी ५०० वर्षे ज्या लोकावर राज्य केले त्या अंकित लोकांच्या हातात मुसलमानांना सोपवण्याचा ब्रिटिशांना अधिकार पोचत नाही. मद्रासच्या महमद इस्माईल यांनी जाहीर केले की, हिंदुस्तानचे मुस्लिम पाकच्या जिहादच्या लढ्यात सापडले आहेत. हिर्ज हियातखानाच्या युद्धकाळातील मंत्रि-मंडळातील एक मंत्री असलेले आणि नंतर काढून टाकले गेलेले शौकत हियातखान म्हणाले, जर मुसलमानांना 'संधी दिली गेली' तर ते 'ब्रिटिश सैन्य येथे असताना आताच रंगीत तालीम करून दाखवतील.' सर फिरोजखान नून गर्जले की, केंद्रिय किंवा हिंदू राज्याची चढाई करण्याची पाळी आलीच तर 'चंगिझखान किंवा हलाकूनी जे केले त्यालाही लाजवील अशी उध्वस्तता केल्याशिवाय मुसलमान राहणार नाहीत'.

सभेने पुढील ठराव संमत केला : 'एकसंघ हिंदुस्तानसाठी संमत केल्या गेलेल्या कुठल्याच घटनेपुढे मुस्लिम राष्ट्र मान तुकवणार नाही. आणि या राज्य घटनेप्रमाणे अस्तित्वात आलेल्या कुठल्याही यंत्रणेमध्ये भाग घेणार नाही'. ठरावाने अशी मागणी केली होती की, 'हिंदुस्तानच्या ईशान्येकडील आसाम व बंगाल यांनी बनवला गेलेला विभाग आणि वायव्येकडील पंजाब व वायव्य सरहद्द प्रांत आणि सिंध व बलुचिस्तान ...... जेथे मुसलमान प्रचंडपणे बहुसंख्य आहेत त्या सर्व विभागांचे एक सार्वभौम राज्य स्थापले जावे; आणि आपापल्या राज्य घटना बनवण्यासाठी पाकिस्तानच्या लोकांची एक व हिंदुस्तानच्या लोकांची एक अशा दोन वेगवेगळ्या घटना समित्या स्थापन केल्या जाव्यात. ही मागणी आणि तिच्या ताबडतोब अंमल-बजावणीला मान्यता ही मध्यवर्ती हंगामी सरकार बनवण्यासाठी लीगचे सहकार्य मिळवण्याकरिता एक अनिवार्य अट आहे'.

यानंतरच्या काही महिन्यातील घडामोडींनी लीगला पाकिस्तानच्या वाटेवर अचूक ठेवले. आणि परिस्थितीला असे वळण लागले की, मागे परतण्याचा मार्गच खुंटला.

---

प्रकरण चौतीसावे

# कॅबिनेट मिशन : लीगचा स्वीकार व धिक्कार

पाकिस्तानची स्थापना, हिंदी 'उपराष्ट्रा'च्या राजकीय स्वातंत्र्यानेच फक्त होऊ शकते म्हणून ब्रिटिश अधिकाऱ्यांनी हिंदुस्तानच्या संबंधात केलेल्या सर्व घोषणात पाकिस्तानपेक्षा स्वातंत्र्याच्या प्रश्नालाच अग्रहक्क दिला होता. जुलै १९४५ मध्ये जेव्हा जपानबरोबर लढाई सुरू होती तेव्हा ते आता लवकरच थांबेल अशी खात्रीची चिन्हे दिसत असूनसुद्धा ब्रिटिशांच्या सार्वत्रिक निवडणुकांचा निकाल मजूर पक्षाच्या विजयात झाला. १० जुलैला चर्चिलने राज्यकारभाराची सूत्रे खाली ठेवली आणि क्लेमंट अॅटलींनी नव्या पंतप्रधानाची जागा घेतली. त्यांनी, त्यांच्या सरकारनी आणि लॉर्ड पेथिक लॉरेन्स या हिंदुस्तानच्या सेक्रेटरी ऑफ स्टेटनी केलेल्या अनेक घोषणात हिंदुस्तानला संपूर्ण स्वातंत्र्य देण्याचे निःसंदिग्ध आश्वासन होते. एम्पायर पार्लमेंटरी असोसिएशनतर्फे एक पार्लमेंट शिष्टमंडळ हिंदुस्तानला पाठवण्यात आले. हे शिष्टमंडळ सर्व देशभर गेले, आणि विविध मतांच्या छटा असलेल्या अनेक लोकांना भेटले. त्याने राजकीय पुढाऱ्यांशी संबंध प्रस्थापित केले. आणि 'हिंदुस्तानला आता राजकीय प्रौढत्वाचा दर्जा पूर्णपणे प्राप्त झाला आहे' असे ब्रिटिश सरकारला सांगण्यासाठी ते फेब्रुवारी १९४६ च्या दुसऱ्या आठवड्यात घरी परतले. रिचर्डस् (पुढारी), लॉर्ड मन्स्टर, लॉर्ड चोर्ले, ब्रिगेडियर लो, हॉपकिन मॉरीस, निकल्सन, मेजर वॅट, सोरेन्सेन, मिसेस निकोल आणि बॉटम्ले हे या शिष्टमंडळाचे सभासद होते.

परंतु पाकिस्तान मान्य केल्याची निःसंदिग्ध घोषणा ब्रिटिश सरकारकडून अजून व्हावयाची होती. १५ मार्च १९४६ रोजी अॅटलींनी पार्लमेंटमध्ये आणखी एक निवेदन केले. त्यात कॅबिनेट मिशनच्या नेमणुकीची घोषणा करताना (या मिशनमध्ये हिंदुस्तानचे सेक्रेटरी ऑफ स्टेट, लॉर्ड पेथिक लॉरेन्स, सर स्टॅफोर्ड क्रिप्स आणि सर ए. व्ही. अलेक्झांडर यांचा समावेश होता.) ते म्हणाले, 'हिंदुस्तानला शक्य तितक्या लवकर आणि संपूर्ण स्वातंत्र्य मिळण्यास मदत व्हावी म्हणून आटोकाट प्रयत्न करण्याच्या उद्देशाने माझे सहकारी हिंदुस्तानला जात आहेत'. त्यावेळी अल्पसंख्यकांबद्दल त्यांनी फक्त असा उल्लेख केला : 'अल्पसंख्यांकांच्या हक्काबद्दल आणि त्यांना निर्भयपणे जगता आले पाहिजे याबद्दल आम्ही जागरूक आहोत. पण म्हणून आम्ही त्यांना बहुसंख्यकांच्या प्रगतीला खीळ घालणारा नकाराधिकार देऊ शकत नाही'.

जीनांची निराशा झाली. त्यांना या घोषणेत पाकिस्तानचा धागादोरा दिसला

नाही आणि त्यांनी तिचे वर्णन 'अतिशय खेदकारक' घोषणा असे केले. त्यावेळी ते लाहोरमध्ये होते. विधिमंडळातील लीगपक्षाला त्यांनी आपल्या प्रतिक्रिया सांगितल्या त्या अशा : 'पाकिस्तान मिळवण्यात तुमच्या शस्त्रसिद्ध हाताला पराक्रम करू दे'.

१९ मार्चला कॅबिनेट मिशनने लंडन विमानतळ सोडला आणि ते २३ मार्च रोजी सायंकाळी कराची विमानतळावर येऊन पोचले. व्हाइसरॉय, त्याचे कार्यकारी मंडळ आणि प्रांतिक गव्हर्नर यांच्याशी आठवडाभर संशोधक बोलणी केल्यानंतर, निरनिराळ्या राजकीय पक्षांचे नेतृत्व करणाऱ्या अनेक हिंदी पुढाऱ्यांच्या आणि संस्थानाधिपतींच्या मुलाखती मिशनने घेतल्या. ही बोलणी थोड्या थोड्या अंतराने २६ एप्रिलपर्यंत चालू होती. पण त्यातून काँग्रेस लीग गुंतागुंतीला काही औषध सापडले नाही. काँग्रेस प्रतिनिधींनी मिशनला असे दाखवून दिले की, काँग्रेस आणि लीग यामध्ये कुठलीही तडजोड घडवून आणून प्रश्न सुटणार नाही तर, तो ब्रिटिश सरकारने हिंदी राज्यकारभाराचा संपूर्ण ताबा काँग्रेस, मुस्लिम लीग किंवा दुसऱ्या एकाद्या संघटनेकडे सोपवल्यास सुटेल. सरकार ज्याच्या ताब्यात येईल तो पक्ष देशातील इतर पक्षांचे आणि गटांचे सहकार्य मिळवण्याचा प्रयत्न करील. ही सूचना मिशनला आणि व्हाइसरॉयला मान्य नव्हती.

यानंतर मिशनने काँग्रेस आणि लीगबरोबर त्रिपक्ष परिषदेचा पवित्रा टाकला. काँग्रेस कार्यकारिणीने अबुल कलम आझाद (अध्यक्ष), जवाहरलाल नेहरू, अब्दुल गफारखान आणि वल्लभभाई पटेल यांची आणि लीगने महमद अली जीना (अध्यक्ष), लियाकत अलीखान, महमद इस्माईलखान आणि अब्दुल रब निश्तार यांची नेमणूक परिषदेसाठी केली. सेक्रेटरी ऑफ स्टेटने निमंत्रणाबरोबरच पाठवलेल्या पुढील पत्राच्या आधारावर परिषदेत चर्चा होणार होती. पत्राचा आशय असा होता : 'ब्रिटिश हिंदुस्तानचा भावी घटनात्मक आराखडा पुढीलप्रमाणे राहील : परराष्ट्र धोरण, संरक्षण आणि दळणवळण ही खाती सांभाळणारे राज्य संघ (Union Government) असेल. प्रांतांचे दोन प्रकारचे गट राहतील, एक प्रामुख्याने हिंदू असलेल्या प्रांतांचा व दुसरा प्रामुख्याने मुस्लिम असलेल्या प्रांताचा. ह्या दोन गटाकडे कोणकोणते समान विषय राहतील हे त्या त्या गटातील प्रांत ठरवतील. प्रांतिक सरकार इतर सर्व उरलेल्या खात्याकडे पाहतील आणि त्यांना शेषाधिकार रहातील.'

चर्चेसाठी सुचवण्यात आलेली ही मूळ तत्वेच काँग्रेसचे अध्यक्ष आझाद आणि लीगचे-अध्यक्ष जीना यांनी आपापल्या निरनिराळ्या कारणासाठी नाकारली. धार्मिक पायावर प्रांतांचे गट बनवणे काँग्रेसला चूक वाटत होते आणि मुसलमानांना त्यात स्वतंत्र मुस्लिम मातृभूमीचा आभाव दिसत होता.

तरीसुद्धा, परिषद सुरू झाली आणि दोनही पक्षांच्या प्रतिनिधींनी आपपले विचार पुढे मांडता मांडता ती बरेच दिवस चालली. लीगने सादर केलेल्या उद्देशपत्रकात पुढील सूचना होत्या :—

(१) पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, बलुचिस्तान, सिंध, बंगाल आणि आसाम ह्या सहा मुस्लिम प्रांतांचा एक गट बनवावा. परराष्ट्रीय धोरण, संरक्षण आणि संरक्षणासाठी आवश्यक असलेले दळणवळण हे दोघांच्याही अधिकारात असावेत. या व्यतिरिक्त इतर सर्व विषयांची व्यवस्था पाकिस्तान गट व हिंदू प्रांतांचा गट यांच्या घटना समित्यांनी करावी.

(२) या सहा मुस्लिम प्रांतांकरिता एक स्वतंत्र घटना समिती स्थापन करावी.

(३) जर अखंड भारताच्या राज्य संघाचे कार्यकारी मंडळ व कायदे मंडळ असेल तर त्यात या दोन प्रांतांच्या गटातील प्रतिनिधित्वामध्ये समानता असावी.

(४) कुठल्याही गटातील प्रांताला त्या गटातून बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य राहील: परंतु त्या प्रांतातील जनतेच्या इच्छा सार्वत्रिक मतदानाने निश्चित केल्या पाहिजेत.

(५) कायदेमंडळ असावे की, नसावे हे दोनही घटना समित्या ठरवतील; राज्य संघाला उत्पन्न पुरवण्याचे मार्गही ते ठरवतील, परंतु कुठल्याही परिस्थितीत ते कररुपाने घेऊ नयेत.

(६) जातीय प्रश्नाशी निगडीत अशा महत्वाच्या प्रश्नांचे निर्णय दोनही जमातींच्या बहुमताशिवाय घेऊ नयेत.

(७) राज्यसंघाने कायदे मंडळाचे, कार्यकारी मंडळाचे किंवा राज्यकारभाराचे वादग्रस्त स्वरुपाचे कुठचेही निर्णय तीन चतुर्थांश बहुमताशिवाय घेऊ नयेत.

(८) निरनिराळ्या जमातीचे धर्म, संस्कृती आणि इतर विषयांना हे गट व प्रांतिक घटना संरक्षण देतील.

(९) १० वर्षाच्या काळानंतर कुठल्याही प्रांताला राज्यसंघापासून विभक्त होण्याचे स्वातंत्र्य राहील.

काँग्रेसच्या सूचना अशा होत्या :—

(१) प्रत्येक प्रांतिक असेंब्लीने प्रमाणात्मक प्रतिनिधित्वाच्या तत्वावर निवडलेल्या प्रतिनिधींची घटना समिती बनवली जावी.

(२) संघराज्याची (Federal Union) घटना, घटना समितीने तयार करावी. या घटनेत परराष्ट्रीय संबंध, संरक्षण, दळणवळण, मूलभूत हक्क, चलन, जकात आणि योजना, त्याचप्रमाणे अधिक सखोलदृष्टीने पाहिल्यास वरील गोष्टींशी निगडित असल्याचे आढळून आलेले सर्व विषय ताब्यात असलेल्या अखिल भारतीय संघराज्याचा व कायदे मंडळाचा समावेश असावा. या सर्व विषयासाठी लागणारी अर्थ योजना करण्याचा अधिकार संघराज्याला असावा.

(३) उरलेले सर्व अधिकार प्रांताकडे असावेत.

(४) प्रांतांना वाटले तर त्यांनी प्रांतांचे गट बनवावेत.

(५) जातीय प्रश्नांशी निगडीत अशा महत्वाच्या प्रश्नांचे निर्णय ज्या जमातींच्या प्रश्नाशी ते निगडीत असतील त्या जमातींच्या बहुमताच्या संमतीशिवाय घेऊ नयेत.

(६) घटना दुरुस्तीसाठी तरतूद असावी.
(७) अनिर्णित प्रश्न लवादाकडे सोपवावेत.

आश्चर्याची गोष्ट अशी की, लाहोर ठरावात कल्पिलेल्या पाकिस्तानपेक्षा लीगने केलेल्या सूचनातून निर्माण होणारे पाकिस्तानचे स्वरुप निराळे होते. लाहोर ठरावात संपूर्ण स्वतंत्र मुस्लिम राज्य अभिप्रेत होते; तर सध्याच्या सूचनात राज्य संघ सरकार आणि राज्य संघ कायदे मंडळ अभिप्रेत होते. लीग व कांग्रेस यांच्या सूचनात संख्यात्मक स्वरुपाचा फरक होता: लीग राज्यसंघाकडे फक्त तीन खाती सोपवण्यास तयार होती तर कांग्रेस, सर्वसाधारणपणे संघराज्याच्या चौकटीत जे विषय असतात ते सर्व संघराज्याकडे सोपवण्यास तयार होती. या दोन्ही योजनेतला हा महत्वाचा फरक आणि इतर बारीक सारीक फरक ह्यांचा अर्थ लीगने सहा वर्षाची आपली हट्टी भूमिका सोडली असा करता येणे शक्य होते. पण परस्परविरोधी भूमिकांमुळे भविष्यकाळाबद्दलचे एक निश्चित चित्र निर्माण झाले होते. ते चित्र म्हणजे लीग नेतृत्वाला हवे असो अगर नसो, तिला मिळणाऱ्या पाकिस्तानचे स्वरुप संपूर्ण पंजाब आणि संपूर्ण बंगालचा अंतर्भाव असलेले पाकिस्तान असे नव्हते तर फक्त मुस्लिम विभागांचा समावेश असलेले पाकिस्तान असे होते. म्हणून लीग गोटातून जरी सूचना आल्या होत्या तरी तडजोडीची बोलणी यापुढे होणार नव्हती. लीगला आता दोन पर्यायातूनच निवड करावयाची होती. 'छाटलेला' पाकिस्तान मान्य करणे किंवा कांग्रेसची हिंदुस्तानच्या भावी घटनेची कल्पना मान्य करणे. घटना इतक्या जलद घडत होत्या की, पाकिस्तानची कल्पना सोडून देणे हे खरोखरी अशक्यच बनले होते.

कॅबिनेट मिशनने कांग्रेसच्या व लीगच्या सूचनांचा अभ्यास केला आणि १६ मे ला आपल्या स्वतःच्या सूचना पुढे मांडल्या. मिशनच्या अंदाजानुसार पाकिस्तानच्या वायव्य सरहद्द भागात ६२.०७ टक्के मुसलमान होते आणि ईशान्य भागात ५१.६९ टक्के होते; उरलेल्या ब्रिटिश हिंदुस्तानामध्ये एकंदर १८ कोटी ८० लक्ष लोकसंख्या होती. त्यापैकी सुमारे २ कोटी मुसलमान सर्व भागातून विखुरलेले होते. कॅबिनेट मिशनने असा युक्तिवाद मांडला की, 'हे आकडे लक्षात घेतले तर असे आढळून येते की, मुस्लिम लीगच्या दाव्याप्रमाणे जरी पाकिस्तानचे सार्वभौम राज्य निर्माण केले तरी, त्यामुळे जातीय प्रश्न सुटणार नाही; एवढेच नव्हे तर, प्रामुख्याने मुस्लिमेतर लोकसंख्या असलेले पंजाब, बंगाल व आसामचे जे जिल्हे आहेत ते जिल्हे सार्वभौम पाकिस्तानात समाविष्ट करण्याला आम्हाला काहीच आधार दिसत नाही. पाकिस्तानच्या बाजूने जे जे मुद्दे मांडणे शक्य आहे त्याच मुद्यानुसार मुस्लिमेतर विभाग पाकिस्तानमधून वगळणे शक्य आहे असे आमचे मत आहे. विशेषत: शिखांना हा मुद्दा लागू आहे.······ पंजाबची फाळणी कशीही केली तरी दोनही बाजूच्या सीमेवर भरपूर प्रमाणात शीख राहतील अशी शिखांची दुभंगणी करावी लागेल'.

आ।थक, भौगोलिक आणि लष्करी बाबींबद्दल आपले विचार मांडल्यानंतर कमिशनने

पुढे म्हटले आहे की, 'म्हणून तुम्ही आपल्या हातात असलेली सत्ता संपूर्ण स्वतंत्र अशा दोन सार्वभौम राज्याकडे सोपवा असा सल्ला ब्रिटिश सरकारला देण्यास आज आम्ही असमर्थ आहोत'.

कॅबिनेट मिशनने मुसलमानांच्या दृष्टीने या प्रश्नाचा विचार असा केला होता: 'आपल्या फार मोठ्या बहुसंख्यत्वामुळे ज्यात हिंदू प्रमुख घटक बनले आहेत अशा पूर्णपणे शुद्ध एकात्म भारतात मुसलमानांची संस्कृती आणि त्यांचे सामाजिक आणि राजकीय जीवन बुडून जाईल अशा मुसलमानांना वाटत असलेल्या रास्त भीतीकडे आमचे दुर्लक्ष झालेले नाही. याला उपाय म्हणून कॉंग्रेसने एक योजना पुढे ठेवलेली आहे. या योजनेनसार परराष्ट्रीय संबंध, संरक्षण आणि दळणवळण या किमान केंद्रिय खात्याखेरीज सर्व प्रांतांना संपूर्ण स्वायत्तता असेल'. यावरून कॉंग्रेस योजनेशी मिशन सहमत होते असे सूचित झाले होते. घटनेची मुख्य तत्वे पुढीलप्रमाणे असावीत अशी शिफारस मिशनने केली होती :

(१) ब्रिटिश हिंदुस्तान आणि संस्थाने यांचा मिळून हिंदुस्तानचा एक राज्यसंघ असावा. त्याच्याकडे खालील विषयांची खाती सोपवावी : परराष्ट्रीय संबंध, संरक्षण आणि दळणवळण या विषयासाठी लागणारे आवश्यक उत्पन्न निर्माण करण्याचा अधिकार त्याला असावा.

(२) या राज्यसंघाला ब्रिटिश हिंदुस्तानचे आणि संस्थानांचे प्रतिनिधी असलेले कार्यकारी मंडळ व कायदे मंडळ असावे. कायदेमंडळात महत्वाचा जातीय प्रश्न निर्माण होईल अशा कुठल्याही प्रश्नाचा निर्णय करताना, दोन महत्वाच्या जातीपैकी प्रत्येक जातीचे बहुसंख्य प्रतिनिधी हजर असले पाहिजेत. आणि त्यांनी मतदान केले पाहिजे. त्याचप्रमाणे एकंदर हजर असलेल्या सभासदापैकी बहुसंख्य सभासदांचा त्याला पाठिंबा असला पाहिजे.

(३) राज्यसंघाच्या विषयाव्यतिरिक्त इतर विषय आणि अवशिष्ट अधिकार प्रांतांकडे असावेत.

(४) राज्यसंघाकडे दिलेल्या विषयाव्यतिरिक्त इतर विषय आणि अधिकार संस्थानाकडे तसेच राहावेत.

(५) कार्यकारी मंडळे व विधि मंडळासह प्रांतांचे गट बनवण्याचे स्वातंत्र्य प्रांतांना असावे आणि प्रत्येक गटाला कुठले प्रांतिक विषय सामायिक ठेवावयाचे ते ठरवण्याचा अधिकार असावा.

(६) कुठलाही प्रांत पहिल्या दहा वर्षानंतर आणि त्यापुढच्या प्रत्येक दहा वर्षानंतर आपल्या कायदेमंडळाच्या बहुमताने घटनेच्या कलमांचा फेरविचार करण्याची सूचना आणू शकेल अशी तरतूद राज्यसंघ घटनेत व प्रांतिक गट घटनेत असावी.

घटना समिती बनवण्याकरिता मिशनने सुचवलेली योजना अशी :—

(अ) प्रौढ मतदानाला अगदी जवळचा पर्याय म्हणून सर्वसाधारणपणे दहा लाखाला

एक प्रतिनिधी या प्रमाणात प्रत्येक प्रांताला त्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा दिल्या जाव्यात.

(ब) प्रांताला मिळालेल्या अशा जागा प्रत्येक प्रांतातील प्रमुख जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्या त्या जमातीमध्ये विभागल्या जाव्यात.

(क) प्रांतामध्ये प्रत्येक जमातीच्या वाट्याला प्रतिनिधींची जी संख्या आली असेल तेवढे प्रतिनिधी प्रांताच्या विधिमंडळातील त्या त्या जमातीच्या प्रतिनिधींनी निवडून द्यावे.

मिशनने, ज्यात घटना समिती विभागली जाईल असे सर्व हिंदी प्रांतांचे तीन विभाग केले. हे विभाग प्रांताकरिता प्रांतिक घटना तयार करण्याचे काम सुरू करतील आणि त्या प्रांताकरिता प्रांतांचे गट करून एकादी गटांची घटना बनवता येते. किंवा काय याचा आणि ते शक्य असेल तर प्रांतांच्या कुठच्या विषयांशी त्यांचा संबंध राहू शकेल याचा निर्णय करतील. नवीन घटनेप्रमाणे निवडून येणाऱ्या पहिल्या कायदे मंडळातील मतदानाने खुषीने गटातून बाहेर पडण्याचा अधिकार प्रांतांना दिला होता. प्रांतांचे वर्गीकरण केलेले तीन विभाग पुढीलप्रमाणे होते. घटना समितीत प्रांताला दिलेले प्रतिनिधित्व प्रत्येक प्रांताच्या पुढे दिलेले आहे :—

विभाग 'अ'

| | सर्वसाधारण | मुस्लिम | एकंदर |
|---|---|---|---|
| मद्रास .. | ४५ | ४ | ४९ |
| मुंबई . | १९ | २ | २१ |
| संयुक्त प्रांत .. | ४७ | ८ | ५५ |
| बिहार .. | ३१ | ५ | ३६ |
| मध्य प्रदेश .. | १६ | १ | १७ |
| ओरिसा .. | ९ | — | ९ |
| एकंदर .. | १६७ | २० | १८७ |

विभाग 'ब'

| | सर्वसाधारण | मुस्लिम | शीख | एकंदर |
|---|---|---|---|---|
| वायव्य सरहद्द प्रांत .. | — | ३ | — | ३ |
| पंजाब .. | ८ | १६ | ४ | २८ |
| सिंध .. | १ | ३ | — | ४ |
| एकंदर .. | ९ | २२ | ४ | ३५ |

विभाग 'क'

| | सर्वसाधारण | मुस्लिम | एकंदर |
|---|---|---|---|
| बंगाल .. | २७ | ३३ | ६० |
| आसाम .. | ७ | ३ | १० |
| एकंदर .. | ३४ | ३६ | ७० |

अ विभागात दिल्ली, अजमीर-मेरवाडा आणि कूर्ग यांचे प्रत्येकी एक एक प्रतिनिधी अधिक घ्यावयाचे होते. संस्थानांना एकंदर ९३ पेक्षा 'अधिक' जागा देण्यात येऊ नयेत अशी तरतूद होती.

प्रांतिक आणि गटवार घटना तयार झाल्यानंतर राज्यसंघ घटना बनवण्यासाठी तीनही विभाग व संस्थाने यांनी एकत्र जमावे अशी मिशनची शिफारस होती.

मिशनने असेही जाहीर केले की, महत्वाच्या राजकीय पक्षांचा पाठिंबा असलेले हंगामी सरकार ताबडतोब बनवण्यात येईल.

या शिफारशी जाहीर झाल्याबरोबर काँग्रेस, मुस्लिम लीग, राजेरजवाडे आणि शीख यांच्या पुढाऱ्यात आणि मिशनमध्ये पत्रव्यवहाराचा पाऊस पडला. प्रत्येक जण कुठल्याना कुठल्यातरी मुद्याचे स्पष्टीकरण मागत होता किंवा काही तरतुदींबद्दल नापसंती दर्शवत होता.

हा पत्रव्यवहार सुरू असतानाच, व्हाइसरॉयने १६ जून रोजी मिशनच्या शिफारशीतील हंगामी सरकार स्थापन करण्याचा भाग अंमलात आणणे सुरू केले आणि निरनिराळ्या राजकीय पक्षांशी त्यांच्या सभासदांच्या नियुक्तीबाबत विचार विनिमय करून आपल्या कार्यकारी मंडळाची यादी जाहीर केली. काँग्रेसने नियुक्त केलेले डॉ. झाकीर हुसेन, एक मुस्लिम व सुभाषचंद्र बोस यांचे बंधू शरत्चंद्र बोस, एक हिंदू यांची नावे या यादीतून वगळली होती आणि त्या ऐवजी सर एच. पी. इंजिनियर व हरेकृष्ण मेहेताब यांची नावे घातली होती. काँग्रेस शरत्चंद्र बोस यांना वगळण्यास तयार होती. परंतु आपल्या मुस्लिम नियुक्त सभासदाचे नाव गाळण्यास तिने संमती दिली नाही. मुसलमानांचे प्रतिनिधित्व आपण करू शकतो या काँग्रेसच्या दाव्याला, लीगने या पातळीवर ही हरकत घेतली. १९४६ च्या सार्वत्रिक निवडणुकांनी एकंदर मुस्लिम जागांच्या पाच टक्के जागा काँग्रेसला मिळवून दिल्या होत्या. आणि राष्ट्रीय मुसलमानांच्या १६ जागा त्यात मिळवल्यावर ही टक्केवारी आठ टक्क्यापर्यंत गेली होती. यामुळे काँग्रेस नियुक्त सभासदाबद्दल काँग्रेसचा आग्रह होता असे नव्हे तर तो तिच्या धर्मनिरपेक्ष स्वरुपाच्या समर्थनार्थ होता. आणि काँग्रेसला ही सवलत दिली, तर आपणच केवळ मुसलमानांचे प्रतिनिधी आहोत ही आपली भूमिका सुटते असा लीगचा दावा होता. अर्थात हंगामी सरकारच्या वाटाघाटी पुन्हा मोडल्या.

कॅबिनेट मिशन आणि निरनिराळ्या राजकीय पक्षांमधील पत्रव्यवहार मिशनने केलेल्या शिफारसीबद्दल राजकीय पक्ष करीत असलेले विचार आणि व्हाइसरॉयच्या हंगामी सरकारबद्दलच्या वाटाघाटी हे सर्व एकदमच चालू होते. आणि अशा वाटाघाटी चालू असतानाच लीग व काँग्रेस प्रतिनिधींनी आपल्याला शिफारसी मान्य असल्याचे बोलून दाखवले होते.

परंतु हंगामी सरकारबाबत दोघात एकवाक्यता होऊ न शकल्यामुळे हिंदुस्तान देश एका केंद्रिय सरकाराखाली एकजुटीने राहण्याची संधी कायमची हुकली. हे घडण्यास कारणीभूत झालेल्या घटना पुढीलप्रमाणे होत्या :

व्हाइसरॉचे प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर दहा दिवसांनी २६ जूनला काँग्रेस कार्यकारिणीने पुढील ठराव केला : 'सर्व जगातील राष्ट्रात आदर निर्माण करील असे, प्रांताला कमाल स्वायत्तता देणारे आणि देशातील सर्व स्त्रीपुरुषांना समान हक्क देणारे, केंद्रिय अधिकार असलेले लोकसत्ताक संघराज्य स्थापन करील अशा प्रकारचे स्वातंत्र्याचे ध्येय काँग्रेसने पुढे ठेवले आहे. कॅबिनेट मिशनने केलेल्या सूचनांमध्ये समाविष्ट असलेल्या केंद्रिय सत्तेच्या मर्यादा, त्याचप्रमाणे प्रांतांची गटपद्धती एकंदर राज्यव्यवस्थेची रचना " कमजोर करते आणि वायव्य सरहद्द प्रांत, आसाम आणि काही अल्पसंख्यांक, विशेषत: शीख जमात यांच्यावर अन्याय करते. काँग्रेस कार्यकारिणीला हे सारे नापसंत आहे. तरीसुद्धा तिला असे वाटते की, सर्व सूचनांचा साकल्याने विचार केला तर केंद्रिय सत्ता वाढण्याला आणि सामर्थ्यवान होण्याला, प्रांतांना आपल्या इच्छेप्रमाणे गटवारी करण्याच्या हक्काचे संपूर्ण आश्वासन मिळण्याला आणि संरक्षण न दिल्यास अन्याय होईल अशा अल्पसंख्यांकांना संरक्षण मिळण्यास त्यात भरपूर वाव आहे '.

म्हणून कार्यकारिणीने असा निर्णय घेतला की, हिंदुस्तानची घटना 'स्वतंत्र, सांघिक आणि लोकसत्ताक बनवण्याच्या दृष्टीने' योजलेल्या घटना समितीमध्ये काँग्रेसने सामील व्हावे. आणि शक्य तितक्या लवकर प्रातिनिधिक व जबाबदार प्रांतिक राष्ट्रीय सरकारे बनवली जावित अशी मागणी केली. ह्या ठरावाला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने ७ जुलै रोजी मान्यता दिली.

दरम्यान, लीग वर्तुळातील विचारसरणी स्वतंत्र, सार्वभौम पाकिस्तान राज्याच्या जुन्या मागणीभोवती मोठ्या जोमाने आवळली जात होती. एकसंघ हिंदुस्तानच्या कल्पनेशी नुसते साधर्म्य असेल अशा कुठल्याही प्रकारच्या मतपरिवर्तनाकडे मुसलमानांना खेचण्यास आता फार उशीर झाला होता आणि नेतृत्व हतबल झाले होते. मुस्लिम लीग कौन्सिलचे सर्व मुस्लिम सभासद जेहादच्या नावाने (पवित्र लढाई) एकत्र झाले होते आणि विस्कळीत मुस्लिम समाजाला यासाठीच एकत्रित केले होते. पाकिस्तानच्या मागणीच्या नकाराला जिहाद हाच पर्याय होता. लाहोर ठरावापासून च्युत होऊन मध्यवर्ती संघराज्याकडे झुकलेल्या नेतृत्वाला आता ह्याच कौन्सिलला

तोंड द्यावयाचे होते. कॅबिनेट मिशनच्या आगमनापासून झालेल्या घडामोडींचा विचार करण्यासाठी जेव्हा २७ जुलैला या कौन्सिलची बैठक भरली तेव्हा जीनांनी संयुक्त संघराज्याचा उल्लेख मोठ्या मुत्सद्दीपणाने टाळून या प्रसंगाला तोंड दिले. कौन्सिलने आपल्या निर्णयात असे म्हटले की, लीगने दीर्घकालीन आणि तात्पुरत्या शिफारसी (हंगामी सरकार बनवणे) मान्य केल्या होत्या पण कॉंग्रेसने फक्त दीर्घकालीन शिफारसीच मान्य केल्या आणि तात्पुरत्या शिफारसी फेटाळून घटना समितीच्या स्थापनेबद्दलच्या शिफारसींचा गैरवाजवी अर्थ लावला असा ठपका लीगने तिच्यावर ठेवला.

लीग कौन्सिलचा ठराव असा होता : 'महत्वाच्या राजकीय पक्षांना घटना समितीत जाणे शक्य व्हावे म्हणून मूलभूत तत्वे घातली आहेत आणि सहकार्याच्या भावनेने कार्य केल्याशिवाय ही योजना यशस्वी होणार नाही, असे कॅबिनेट मिशनने व व्हाइसरॉयने वैयक्तिकरित्या आणि सामुदायिकरित्या अनेकवेळा सांगितले आहे कॉंग्रेसच्या वृत्तीवरून असे स्पष्टपणे दिसून येते की, घटना समितीचे कार्य यशस्वी होण्याला जी पूर्वपरिस्थिती आवश्यक आहे तीच अस्तित्वात नाही. या वस्तुस्थितीत कॉंग्रेसला खूष करण्यासाठी मुस्लिम राष्ट्राच्या हितसंबंधांचा आणि दुसऱ्या काही दुर्बल जमातींच्या विशेषत: अनुसूचित जमातींच्या हितसंबंधांचा बळी देण्याचे ब्रिटिश सरकारचे धोरण याची भर पडली आहे. वेळोवेळी मुसलमानांना तोंडी आणि लेखी दिलेली आश्वासने आणि अभिवचने, ते ज्या पद्धतीने डावलत आहेत त्यावरून योजलेल्या घटना बनवणाऱ्या यंत्रणेत, अशा परिस्थितीत मुसलमानांनी भाग घेणे धोक्याचे आहे. म्हणून ६ जून १९४५ रोजी मुस्लिम लीगच्या अध्यक्षांनी सेक्रेटरी ऑफ स्टेटला कळवलेली या योजनेबद्दलची आमची मान्यता, आम्ही या ठरावाने रद्द करीत आहोत'.

या ठरावात, कॅबिनेट मिशनच्या शिफारसीबद्दलची आपली मान्यता काढून घेण्यासाठी काही पटतील अशी विधाने शोधण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे.

आणि आधी दिलेल्या मान्यतेचा परिणाम जणू काय धुवून काढण्यासाठी, लीग कौन्सिलने 'पाकिस्तान मिळवण्याकरिता आपला न्याय हक्क प्रस्थापित करण्याकरिता आणि ब्रिटिश व हिंदूंच्या वर्चस्वाखालील गुलामगिरीच्या मानहानीतून आपली सुटका करून घेण्याकरिता "प्रत्यक्ष कृती" करण्याचा' निर्णय घेतला. लीग कौन्सिलच्या या बैठकीत 'परकीय सरकारने दिलेले किताब व पदव्या यापुढे धारण करू नयेत' असा आदेश देणारा असाधारण निर्णय घेण्यात आला.

पदव्या व किताब मिळालेले बहुतेक सर्व बिनसरकारी मुसलमान हे लीगचे सभासद होते; आणि असे सरकारी मुसलमान हे तिचे कट्टर पुरस्कर्ते होते. पदव्या धारण करणाऱ्यांना कॉंग्रेसमध्ये स्थान नव्हते परंतु लीगमधील पदव्या धारण करणारे लोकच खरोखरी जिल्ह्यांचे व प्रांतांचे नेतृत्व करीत होते. ब्रिटिश जिल्हाधिकाऱ्यांशी आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी त्यांचे जसे संबंध होते तसे कॉंग्रेसच्या लोकांचे नव्हते,

ब्रिटिश सरकारशी अनन्य निष्ठा ही या संबंधांच्या मुळाशी होती. आपल्याला भेटावयास आलेल्या सन्माननीय मुसलमानांना आपण लीगचे सभासद आहात काय? असे अनेक जिल्हाधिकारी विचारीत असत. आणि ते नसले तर त्यांना असे सभासदत्व ब्रिटिश अधिकाऱ्यांचे ऋणी असलेल्या पदव्या व किताबधारी लोकांच्या निष्ठेच्या आड येत नाही अशा स्थूल सूचना देत असत. लीगचा प्रचार हा हिंदूवरील व काँग्रेसवरील टीकेच्या हल्ल्यांनी भरलेला असे आणि ब्रिटिशांना दुखवण्याचे टाळत असे. पदव्यांचा त्याग करावयाचा लीगने दिलेला नवा हुकूम म्हणजे या जुन्या धोरणापासून वेगळे टाकलेले धडाक्याचे पाऊल होते. ही आज्ञा पालन करणारे लोक फारसे निघाले नाहीत. या हुकुमाची तामिली जर मोठ्या प्रमाणावर झाली असती तर ते 'प्रत्यक्ष कृती'चे एक मोठे निदर्शन ठरले असते. परंतु ते अगदी कमकुवत ठरल्यामुळे यापेक्षा अधिक मोठ्या देखाव्याची गरज भासली. मुस्लिम जनतेवर लीगचा प्रभाव आणि सत्ता अधिक असलेल्या बंगालची या बड्या निदर्शनाकरिता निवड झाली. लीग कार्यकारिणीने १६ ऑगस्ट ही तारीख 'प्रत्यक्ष कृती'साठी निश्चित केली. बंगालच्या लीग सरकारने त्यादिवशी सुटी जाहीर केली. सर्वसाधारणपणे जिहादसाठी जशी तयारी केली जाते तशी तयारी सुरू झाली. लीग पुढारी 'हिंदूंना धडा शिकवण्यासाठी' मुसलमानांना चिथावत व हिंसेची शिकवण देत मुस्लिम मोहल्ल्यातून फिरू लागले. 'प्रत्यक्ष कृती'चा असा अर्थ बंगाल लीग लावील अशी जीनांची अपेक्षा नव्हती, आणि ही तयारी जेव्हा त्यांच्या कानावर गेली तेव्हा लीग कौन्सिलच्या ठरावाचे स्पष्टीकरण करणारे एक निवेदन त्यांनी काढले. त्यात त्यांनी, 'प्रत्यक्ष कृती'चा अर्थ पाकिस्तानसाठी जनमत संघटीत करण्याकरिता ठरलेल्या दिवशी सभा घेणे हा असून दुसरी कुठलीही प्रत्यक्ष कृती अभिप्रेत नाही असे सांगितले.

परंतु कलकत्त्यातील तयारी आधीच पूर्ण झाली होती. आणि ठरलेल्या दिवशी तेथे हिंसेचे थैमान उडाले. कलकत्त्यातील अनेक रस्त्यांवर प्रचंड प्रमाणावर झालेल्या सामुदायिक कत्तलींचे दृश्य दिसत होते. सूड आणि प्रतिसूड घेतले जात होते. अशाच प्रकारच्या घटना आसाममधील सिल्हटमध्ये घडत होत्या. नौखाली आणि टिप्पेरा या प्रामुख्याने मुस्लिम वसलेल्या जिल्ह्यात अशाच प्रकारचे अत्याचार मुसलमानांनी मांडले. कलकत्त्यापेक्षा या दोन जिल्ह्यातील हिंसेचा हिशोब फार भयानक आहे. प्रथम तेथे लुटालूट, जाळपोळ आणि कत्तलीचा खच पडला. त्यानंतर हिंदू स्त्रियांना पळवणे आणि मुसलमानांशी त्यांची सक्तीने लग्ने लावणे हे प्रकार आले, आणि धर्मांतर आणि बलात्काराचे राज्य माजले.

ह्या आततायी हिंसेने गांधी बेचैन झाले. आणि शांतता प्रस्तापित व्हावी म्हणून आपली शक्ती पणाला लावण्यासाठी त्यांनी काही काळ नौखालीत मुक्काम केला. त्यांचे कार्य यशस्वी झाले. उध्वस्त नौखालीच्या सज्जन मुसलमानांनी त्यांचे मनापासून स्वागत केले. आपला पाहुणचार घेण्याची त्यांनी गांधींना काकुळतीची विनंती केली

आणि त्यांना सर्व प्रकारच्या सहाय्याची हमी दिली. आपल्याला पोलीस संरक्षण नको असे गांधींनी सांगितले असताही, बंगाल सरकारने त्यांच्या संरक्षणाची व्यवस्था केली. 'एकला चलो रे' या टागोर गीताच्या तालासुरावर आणि आपल्याला काही अपाय होणार न असे ाही म्हणत ते दाट मुस्लिम वस्तीतून एकटेच फिरले. काहीतरी जादू व्हावी त्याप्रमाणे त्यांनी मुसलमानांचे हृदय परिवर्तन घडवून आणले. अनेक पळवलेल्या स्त्रिया खुशीने हिंदूंकडे परत पाठवल्या गेल्या. प्रतिहिंसेने प्रस्थापित होण्यास कठीण असलेली शांतता प्रेमाने खेचून आणली.

परंतु गांधींचे अस्तित्व नौखालीचे पाणी स्थिर करीत होते तोच बिहारमध्ये दंगल उसळली; येथे आक्रमक पवित्रा हिंदूंनी उचलला होता. शेवटी हे हल्ले इतके भीषण झाले की, आकाशातून बॉम्ब टाकून त्यांचा बंदोबस्त करावा लागला.

लीगच्या 'प्रत्यक्ष कृती' इतका वेडाचार इतिहासाने फार वेळा पाहिला नव्हता. हजारो निरपराधी लोकांचे, स्त्रियांचे आणि मुलांचे क्रूरपणे बळी घेतल्यानंतर किंवा त्यांचा मानभंग केल्यानंतर लीग केंद्र सरकारात गेली. व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळावर काँग्रेस नियुक्त मुसलमानाबरोबर लीग नियुक्त मुसलमानानेही जागा घेतली. हे सारे आपण पुढील प्रकरणात पाहूच.

प्रकरण पस्तीसावे

# अखेर

२५ ऑगस्ट १९४६ रोजी व्हाइसरॉयने आपल्या कार्यकारी मंडळाचे भारतीयकरण करण्याची आपली मनिषा पुन्हा एकदा व्यक्त केली. यावेळी जे जे पक्ष संमती देतील त्या त्या राजकीय पक्षांना घेऊन आपल्या मंडळाची पुनर्रचना करण्याचा त्यांचा निश्चय होता. एका अनुसूचित प्रतिनिधिचा समावेश असलेले सहा काँग्रेस नियुक्त सभासद, पाच लीग नियुक्त सभासेद आणि एका शिखाचा समावेश असलेले अल्पसंख्यांकांचे तीन प्रतिनिधी हे आपल्या मंडळाचे सभासद राहतील असे त्यांनी सांगितले होते. वसाहतीच्या सरकारला ज्याप्रमाणे विश्वासात घेऊन त्याच्याशी विचार विनिमय केला जातो त्याप्रमाणे या कार्यकारी मंडळाशी केला जाईल असे त्यांनी जाहीर केले. काँग्रेसच्या यादीत पुन्हा एकवार मुस्लिम प्रतिनिधींचा समावेश होता आणि लीगने पूर्वीप्रमाणेच आपला संपूर्ण मुस्लिम प्रतिनिधित्वाचा दावा मांडला होता. म्हणून लीगला वगळण्यात आले आणि नवीन मंडळात काँग्रेस नियुक्त सभासदांचा समावेश करण्यात आला. काँग्रेस गटाचे नेते जवाहरलाल नेहरू हे होते.

२ सप्टेंबर रोजी मंडळात प्रवेश झाल्यानंतर लीगला सरकारात येण्यास परवानगी मळावी म्हणून जीनांचे मन वळवण्यासाठी नेहरूंनी त्यांच्याशी पत्रव्यवहार सुरू केला. आपल्या ६ ऑक्टोबरच्या पत्रात त्यांनी अशी इच्छा व्यक्त केली की, 'निवडणुकीच्या निकालानुसार हिंदुस्तानातील प्रचंड बहुसंख्य मुसलमानांची अधिकारी प्रातिनिधिक संस्था म्हणून लीगला मान्यता लाभलेली आहे आणि म्हणून लोकशाही तत्त्वानुसार तिला जसा हिंदी मुस्लिमांचे प्रतिनिधित्व करण्याचा निर्विवाद हक्क आहे, तसाच आणि त्याच कारणाकरिता काँग्रेस ही मुस्लिमेतर आणि ज्या मुसलमानांनी आपल्याला काँग्रेसमध्ये सामावून घेतले आहे अशा मुसलमानांचे प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार असलेली प्रातिनिधिक संस्था आहे असे लीगने मान्य करावे'. लीगचा प्रातिनिधि-कत्वाचा दावा मान्य केल्याबद्दल जीनांनी समाधान व्यक्त केले परंतु सरकारात सबंध मुस्लिम लीगचे प्रतिनिधित्व केवळ एकट्या लीगनेच करावे अशी मागणी केली. हिंदूंच्या अनुसूचित जमातींचे प्रतिनिधित्व करण्याच्या काँग्रेसच्या हक्काबद्दलही त्यांनी यावेळी हरकत घेतली. पुन्हा काही काळ 'जैसे थे' राहिले. पण १५ ऑक्टोबरला जीना खाली आले आणि राजकारणातील आपल्या हेकेखोरपणाचा जणुकाय मान ठेवण्यासाठीच की काय आपल्या लीगच्या पाच सभासदात एका हिंदू अनुसूचित

सभासदाचा समावेश केला. १९४६ च्या निवडणुकीत बहुतेक सर्व अनुसूचित जमातींच्या जागा काँग्रेसने जिंकल्या होत्या. आणि काँग्रेस या जमातींचे प्रतिनिधित्व करत असो अगर नसो, पूर्णपणे मुस्लिम संघटना असलेल्या लीगला त्यांचे प्रतिनिधित्व करण्याचा मुळीच हक्क पोहोचत नव्हता. म्हणून लीग यादीतील अनुसूचित सभासद अर्थातच केवळ प्यादे म्हणून उपयोगात आणला जात होता. काँग्रेसला आपल्या सभासदात फक्त हिंदूंचा समावेश करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य होते आणि तिने जर मुस्लिम सभासदाचा आग्रह धरला असेल तर तो तिच्या तत्वनिष्ठेचा भाग होता; त्यामुळे पर्यायाने व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळातील मुस्लिम सभासदांची संख्या वाढली. पाकिस्तानची स्थापना झाल्यानंतर, तथाकथित हिंदू प्रांतात बरेच मुसलमान राहतील आणि परकीय सत्ता संपुष्टात आल्यानंतर कांहीही अडथळा न येता आपली निधर्मी संघटना वाढण्यास आपल्याला खरोखर संधी मिळेल असा योग्य विश्वास काँग्रेसला वाटत होता. लीगने आपल्या यादीत केलेल्या अनुसूचित जमातीच्या सभासदाच्या समावेशाला हाच निकष लावणे कठीण होईल. कारण लीगने आपली सबंध कारकिर्द धार्मिक उत्साहाद्वारे केवळ मुसलमानांच्याच राजकीय गरजा पुरवण्यात व्यतित केली होती. नंतरसुद्धा तिने आपले निधर्मी संघटनेत परावर्तन झाले आहे असे कधी जाहीर केले नव्हते; आणि ती तशी असलीच तर ती फक्त अनुसूचित जमातींना खुली होती, 'सवर्ण' हिंदूंना नव्हती. आणि जर काँग्रेसच्या मुस्लिम नियुक्तीच्या आग्रहाला अनुसूचित जमातीची नियुक्ती हे लीगचे उत्तर होते तर मग ते १९४५ साली जेव्हा व्हाइसरॉयने आपले प्रथम आमंत्रण दिले होते तेव्हाच देता आले असते.

वसाहतीच्या स्वराज्याच्या धर्तीचे व्हाइसरॉयच्या हाताखालील हंगामी सरकार, हे भारतीय जनतेकडे सत्तांतर करण्याच्या दिशेने उचलले पहिले पाऊल—अतिशय महत्वाचे पहिले पाऊल होते. दुसरे पाऊल म्हणजे कॅबिनेट मिशनच्या योजनेप्रमाणे घटना समिती स्थापन करणे आणि त्यासाठी घटना समितीच्या पहिल्या बैठकीची तारीख ९ डिसेंबर ही निश्चित करण्यात आली होती. परंतु लीगने योजना झिडकारली असल्यामुळे तिने समान घटना समितीत बसण्यास नकार दिला आणि मुस्लिम प्रांतासाठी स्वतंत्र घटना समितीची मागणी केली. लीगचे मन वळवण्याचा आणखी एक प्रयत्न करण्यात आला. नेहरू आणि जीनांसह चार हिंदी पुढाऱ्यांना ब्रिटिश पंतप्रधान आणि सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया यांच्याशी वाटाघाटी करण्यासाठी लंडनला बोलावण्यात आले. त्यातून काही निष्पन्न झाले नाही. परंतु मध्येच मोडलेल्या वाटाघाटीनंतर काढलेल्या आपल्या निवेदनात ब्रिटिश सरकारने एकाच घटना समितीत भाग घेण्याच्या लीगच्या हरकतीत तथ्य आहे असे मान्य केले. निवेदनात म्हटले होते : 'कार्यपद्धतीबद्दल मतैक्य असल्याशिवाय घटना समिती यशस्वी होईल असा संभव कधीच नव्हता. भारतीय लोकसंख्येचे मोठमोठे विभाग ज्या घटना

:समितीत सामील नाहीत अशा घटना समितीने एकादी घटना बनवली तर आपण अशी घटना देशाच्या नाखूष विभागावर लादणार नाही असे ज्याप्रमाणे कॉंग्रेस म्हणाली होती त्याचप्रमाणे ब्रिटिश सरकार अर्थातच ती लादू शकणार नाही'.

यावर, कॅबिनेट मिशनने तयार केलेली घटनात्मक योजना फसली आहे असे सरकारने जाहीर करावे आणि अर्थातच घटना समितीचे अधिवेशन बोलावणे आणि तिच्या निवडणुका घेणे हे अविहित बिनबुडाचे आणि बेकायदेशीर ठरते म्हणून ती ताबडतोब रद्द करावी' अशी मागणी लीग कार्यकारिणीने केली. सरकारने घटना समिती रद्द केली नाही. परंतु मुसलमानांच्या बहिष्कारामुळे तिला 'हिंदू हिंदुस्तान' च्या घटना समितीचे स्वरुप आले आणि 'मुस्लिम हिंदुस्तान' साठी वेगळया घटना समितीकडून घटना बनवली जाईल हे स्पष्ट झाले.

२० फेब्रुवारी १९४७ ला ब्रिटिश पंतप्रधानांनी पार्लमेंटमध्ये पुढील घोषणा केली;

कॅबिनेट मिशनच्या योजनेनुसार हिंदुस्तानातील सर्व राजकीय पक्षांनी संमत केलेल्या घटनेने प्रस्थापित झालेल्या अधिकाऱ्यांकडे जबाबदारी सुपूर्द करण्याची ब्रिटिश सरकारची इच्छा आहे. परंतु दुर्दैवाने सध्या अशी घटना आणि असे अधिकारी निर्माण होण्याचा संभव दिसत नाही. सध्याची अनिश्चित परिस्थिती ही पूर्णपणे धोकेबाज आहे आणि ती बेमुदत चालू ठेवता येणार नाही. ब्रिटिश सरकार हे स्पष्ट करू इच्छिते की, जून १९४८ च्या पूर्वी जबाबदार हिंदी लोकांच्या हाती सत्तांतर करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्याची त्यांची निश्चित इच्छा आहे ····· ब्रिटिश हिंदुस्तानची केंद्रिय सरकारची सत्ता ठरलेल्या तारखेला कुणाच्या हाती सुपूर्द करावयाची ती सर्वच्या सर्व एकाद्या मध्यवर्ती सरकारकडे द्यावयाची की, काही विभागात ती आस्तित्वात असलेल्या प्रांतिक सरकाराकडे सुपूर्द करावयाची किंवा अतिशय योग्य आणि हिंदी लोकांच्या हिताच्या दृष्टीने उत्तम अशा एकाद्या निराळ्या मार्गाने द्यावयाची याबद्दल ब्रिटिश सरकारला विचार करावा लागेल. जून १९४८ पर्यंत जरी संपूर्ण सत्तांतर होऊ शकले नाही तरी त्याच्या पूर्व तयारीच्या योजना ताबडतोब हाती घेतल्या पाहिजेत.

सत्तांतराचे कार्य करण्यासाठी लॉर्ड वेव्हेल यांच्या जागी ॲडमिरल व्हायकाऊंट माऊंन्टबॅटन या नव्या व्हाइसरॉयची नेमणूक केल्याची घोषणाही पंतप्रधानांनी केली.

आता, पाकिस्तान साकार होणार होते. एका बाजुला बंगाल हत्याकांडांनी व दुसऱ्या बाजूला बिहारच्या कत्तलींनी, पंजाब, सिंध व वायव्य सरहद्द प्रांतातील असंख्य हिंदू आणि मुसलमान या दोनही जमातीत दहशत निर्माण केली होती. त्याचप्रमाणे बंगालला विशेषतः नवीन राज्यात जाणाऱ्या त्याच्या विभागांनाही अशीच दहशत वाटत होती. हिंदू जातीची कुटुंबेच्या कुटुंबे जे हाताला लागेल ते घेऊन आणि जी नेता येईल ती चिजवस्तू घेऊन फाळणीनंतर हिंदुस्तानात राहणाऱ्या विभागाकडे धाव घेत होती. त्याच प्रमाणे पूर्व पंजाब आणि पश्चिम बंगालमधील

अनेक मुस्लिम कुटुंबेही आपली घरेदारे सोडून 'दारुल इस्लाम' म्हणून जाहिरात केल्या गेलेल्या विभागात राहण्यासाठी जात होती. याहून दूर असलेले संयुक्त प्रांत बिहार आणि मध्य प्रांतातील श्रीमंत मुसलमान आपला धंदा गुंडाळून पाकिस्तान प्रदेशात जात होते; त्यांच्यापकी अनेकजण पाकिस्तान चळवळीत आघाडीवर होते आणि नवीन देशाकडे ते सुबत्तेच्या आणि संरक्षणाच्या दृष्टीने पहात होते.

परंतु या ऐतिहासिकवेळी, जेव्हा कुठल्यातरी सार्वत्रिक मतमोजणीच्या पद्धतीने पाकिस्तान बनवण्यात येणार होते तेव्हा, पंजाब आणि वायव्य सरहद्द प्रांतात लीगेतर सरकार अधिकारारूढ होते. वायव्य सरहद्द प्रांताचा प्रश्न तर अधिकच बिकट होता, कारण नुकत्याच वर्षापूर्वी झालेल्या निवडणुकीत त्याने लीग आणि तिचा पाकिस्तानचा दावा मताधिक्याने धुडकावून लावला होता. त्या प्रांतात लीगवाल्या मुसलमानांनी काँग्रेस, काँग्रेस सरकार आणि काँग्रेसवादी पठाण लाल स्वयंसेवक खुदाई खिदमतगार यांच्या बदनामीची आणि शिव्यांची मोहिम सुरू केली. ते निःशंकपणे लुटालूट, जाळपोळ आणि खून करण्यात गुंतले होते. सरकार हतबल झाले होते कारण सरकारी नोकर व पोलीस यातही काँग्रेस आणि लीग अशी दुफळी माजली होती. सुव्यवस्थेची जागा अराजकाने घेतली होती.

पंजाबमध्ये, ज्या मुस्लिम मतदार संघात लीगला प्रचंड विजय मिळाला होता त्या मतदार संघाच्या विभागातील मुस्लिम सरकारी नोकर आणि मुस्लिम पोलीस हे सरकारपेक्षा लीगशी अधिक एकनिष्ठ होते. सुव्यवस्था आणि कायदा प्रस्थापित करण्यासाठी योजलेल्या सरकारी उपायांकडे ते दुर्लक्ष तरी करीत होते किंवा त्यांचे मनापासून पालन तरी करीत नव्हते. अनेक सरकारी नोकरांनी बेकायदा परिस्थितीकडे डोळे झाक केली येवढेच नव्हे तर ती निर्माण करण्यास हातभार लावला. राज्य-कारभार कोसळत होता आणि परिस्थितीवर आपण परिणामकारक ताबा ठेऊ शकत नाही असे सरकारला दिसून आल्यामुळे युनियनिस्ट काँग्रेस संयुक्त मंत्रिमंडळाने राजिनामा दिला. लीगने काही हिंदू व शीख लोकांशी हातमिळवणी करून मंत्रिमंडळ बनवण्याचा प्रयत्न केला. परंतु या दोन जमातींचा लीगवरील विश्वास संपूर्णपणे उडाला होता. लीगने देऊ केलेले मंत्रिपद कायदेमंडळाच्या प्रत्येक शीख आणि हिंदू सभासदाने झिडकारले, अंदाधुंदी काही काळ थांबली. परंतु मंत्रिमंडळ बनवण्याचे प्रयत्न सोडून दिल्याबरोबर पुन्हा लुटालूट, जाळपोळ, दंगे आणि खून सुरू झाले. पंजाबमधील या घडामोडींनी काँग्रेस इतकी हवालदिल झाली की, मार्च १९४७ च्या सुरुवातीस तिच्या कार्यकारिणीने मुस्लिम पंजाब आणि अमुस्लिम पंजाब अशी प्रांताच्या शक्य तो लवकर विभाजनाची मागणी केली. आपल्याला सबंध पंजाब पाहिजे असे म्हणून लीगने हा ठराव धुडकावला, अधिक दंग्यांना जणू काय हे आवाहनच होते म्हणून की काय पंजाब प्रांताचे जे भाग अजूनपर्यंत अबाधित होते तेथेही ही आग पसरली.

या परिस्थितीपुढे आपणही हतबल आहोत हे ब्रिटिश सरकारला दिसून आले. जून १९४८ पर्यंतसुद्धा आपल्याला हिंदुस्तान ताब्यात ठेवता येणार नाही असे त्यानेही सांगितले आणि त्या अगोदर, हिंदुस्तानच्या फाळणीच्या तत्वावर सत्तांतर करण्याची आपली इच्छा व्यक्त केली. ३ जून १९४७ रोजी नवे व्हाइसरॉय माऊन्टबॅटन यांनी ब्रिटिश सरकारचे अखेरचे निवेदन प्रसिद्ध केले. त्यात हिंदुस्तानच्या फाळणीची आणि हिंदुस्तान व पाकिस्तान या राज्यांकडे सत्तांतर करण्याची योजना होती.

निवेदनात म्हटले होते : 'घटना समितीने तयार केलेली कुठलीही घटना ती मान्य नसलेल्या देशाच्या कुठल्याही भागाला लागू करता येणार नाही हे स्पष्ट आहे. अशा भागांची घटना, (अ) सध्याच्या घटना समितीने तयार करावयाची की, (ब) सध्या अस्तित्वात असलेल्या घटना समितीत भाग न घेऊ इच्छिणारे जे विभाग आहेत त्या प्रदेशांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेल्या नव्या निराळ्या घटना समितीने तयार करावयाची, या प्रश्नावर त्या विभागातील लोकांच्या इच्छेचा निर्णय समजून घेण्याची सर्वश्रेष्ठ पद्धती, म्हणून' त्याने पुढील कार्यपद्धती घालून दिली :

युरोपियन सभासद सोडून बंगाल आणि पंजाबची प्रांतिक कायदेमंडळे, प्रत्येकी दोन वेगवेगळ्या भागात विभागली जातील. एक मुस्लिम बहुसंख्य प्रांतांचे प्रतिनिधित्व करील व दुसरा इतर प्रांतांचे करील. प्रांतांची लोकसंख्या निश्चित करताना १९४१ च्या खानेसुमारीचे आकडे अधिकृत धरले जातील.

प्रत्येक कायदेमंडळाच्या दोन भागाच्या सभासदाना प्रांताची फाळणी व्हावी की, न व्हावी याबद्दल मतदान करण्याचा हक्क दिला जाईल. केवळ साध्या बहुमताने प्रांताच्या कुठल्याही भागाने फाळणीच्या बाजूने निर्णय दिला तर फाळणी केली जाईल. आणि त्याप्रमाणे व्यवस्था केली जाईल.

जर दोनही भागांनी एकत्र राहण्याचे ठरवले तर हा सबंध प्रांत कुठल्या घटना समितीत जाईल हे प्रत्येक भागाच्या प्रतिनिधींना निर्णय घेण्यापूर्वी माहित असणे इष्ट आहे. म्हणून दोनही कायदेमंडळाच्या कुठल्याही सभासदाने अशी मागणी केल्यास युरोपियन सभासदांव्यतिरिक्त इतर सर्व कायदेमंडळाच्या सभासदांची एक बैठक घेण्यात येईल. त्या बैठकीत जर दोनही भागांनी एकत्र राहण्याचे ठरवले तर त्या प्रांताने कुठल्या घटना समितीत जावे या प्रश्नाचा निर्णय घेतला जाईल.

फाळणीचा निर्णय घेतला गेल्यास कायदेमंडळाचा प्रत्येक भाग ज्या भागाचे प्रतिनिधित्व करीत असेल तो भाग आपण कुठल्या घटना समितीत जावयाचे ते ठरवील.

सिंधबद्दलचा निर्णय युरोपियन सभासदांव्यतिरिक्त सिंधचे कायदेमंडळ घेईल. परंतु सिंधमध्ये हिंदू बहुसंख्य प्रांत नसल्यामुळे त्याचे दोन भाग होणार नाहीत.

वायव्य सरहद्द प्रांताबद्दल निवेदनात अशी तरतूद केली होती की, अस्तित्वात असलेली घटना समिती असावी की नवी निराळी घटना समिती असावी हे ठरवण्यासाठी

कायदेमंडळाच्या मतदारांना सार्वत्रिक मतदानाचा हक्क दिला जाईल. अशीच तरतूद सिल्हट जिल्ह्याबाबत केली होती. आसामच्या सर्व हिंदू बहुसंख्य प्रांतात सिल्हट हा एकच मुस्लिम बहुसंख्य जिल्हा होता आणि त्याची व पूर्व पाकिस्तानची सीमा रेषा एकच होती.

१९४१ च्या खानेसुमारीप्रमाणे पंजाबमधील मुस्लिम बहुसंख्य जिल्हे असे होते लाहोर विभागात, गुजराणवाला, गुरदासपूर, लाहोर, शेखुपुरा सियालकोट, रावळपिंडी विभागात अटक, गुजरात, झेलम, मियावाली, रावळपिंडी, शहापूर; मुलतान विभागात डेरागाझीखान, झंग, ल्यालपूर, मॉन्टगोमेरी, मुलतान, मुझफरगढ. बंगालमधील मुस्लिम बहुसंख्य जिल्हे असे होते : चितगाँग विभागात, चितागाँग, नौखाली, टिप्पेरा; डाक्का विभागात, बाकरगंज, डाक्का, फरिदपूर, मैमनसिंग; प्रेसिडेन्सी विभागात, जेसोर, मुर्शिदाबाद, नादिया; राजशाही विभागात, बोग्रा, दिनाजपूर, माल्डा, पाबना, राजशाही आणि रंगपूर.

ब्रिटिश सरकारचे निवेदन म्हणजे ज्याला माऊन्टबॅटन योजना असे म्हटले जात होते ती खरोखरी सी. आर. मसुद्याची व्यावहारिक मांडणी होती. माऊन्टबॅटनने तिच्या प्रती, तिची घोषणा करण्यापूर्वीच हिंदी पुढाऱ्यांना दिल्या आणि तिचा अभ्यास करून २ जूनच्या मध्यरात्रीपूर्वी त्यांच्या त्यावरील प्रतिक्रिया मागवल्या. जीना म्हणाले की, याबाबतीत ते स्वतः किंवा त्यांची कार्यकारिणी कुठलाही निर्णय घेऊ शकत नाही; शेवटचा निर्णय घेण्यापूर्वी त्यांना स्वतःला आणि त्यांच्या कार्यकारिणीला त्यांच्या मालक.पुढे म्हणजे जनतेकडे जावे लागेल. 'आपण घटनात्मक पद्धतीने जनतेचे मन वळवण्याचा शक्य तितका प्रयत्न करू आणि आपली कार्यकारिणी आपल्याला पाठिंबा देईल, इतकेच काम त्यांनी अंगावर घेतले'.

यानंतर माऊन्टबॅटनने जीनांना ही जाणीव करून दिली की, 'त्यांनी सदोदित उपयोगात आणलेल्या त्यांच्या या विशिष्ट डावपेचाबद्दल काँग्रेस पक्षाला भयंकर संशय वाटतो. असे डावपेच खेळून ते कुठल्याही योजनेबद्दल काँग्रेसचा पक्का निर्णय होईपर्यंत थांबतात आणि नंतर काही दिवसांनी मुस्लिम लीगला योग्य असा निर्णय घेण्याचा हक्क ते स्वतः उपभोगतात'. माऊन्टबॅटनने त्यांना असेही बजावले की, जर काँग्रेसबरोबर मुस्लिम लीगने ही योजना एकदमच मान्य केली नाही तर आपण ती झिडकारू असे नेहरू, कृपलानी आणि पटेल यांनी त्यांना निक्षून सांगितले आहे; येवढेच नव्हे तर मुस्लिम लीगने ती अखेरची योजना म्हणून मान्य केली पाहिजे यावेळी काँग्रेस पुढारी अतिशय जागरूक होते कारण थोड्या आठवड्यापूर्वीच पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानला जोडण्यासाठी म्हणून आठशे मैलाच्या 'पट्ट्या'ची जीनांनी मागणी केली होती आणि डॉन या लीगच्या मुखपत्रांनी ती उचलून धरून त्याकरिता मोहीम सुरू केली होती. लीग कौन्सिलची सभा लवकर न बोलवण्याच्या जीनांच्या धोरणामुळे काँग्रेस पुढाऱ्यांच्या संशयाला बळकटी आली. तेव्हा माऊन्टबॅटनने

जीनांना असे स्पष्ट सांगितले की : 'तुम्ही ही वृत्ती धारण करणार असाल तर उद्या सकाळच्या सभेत काँग्रेस व शीख या योजनेला निर्णायक मान्यता झिडकारतील; मग गोंधळ माजेल आणि तुम्ही तुमचं पाकिस्तान गमावाल—कदाचित् कायमचच गमावाल'. यावर जीनांनी खांदे उडवून एवढीच प्रतिक्रिया व्यक्त केली की, 'जे झाले पाहिजे ते होणारच'. त्यावर माऊन्टबॅटनने बजावले की, 'जीनासाहेब ! तडजोड करण्यासाठी आजवर जे प्रयत्न झाले आहेत ते तुम्हाला नष्ट करू देण्याचा माझा इरादा नाही. मुस्लिम लीगच्या वतीने ज्याअर्थी तुम्ही ही तडजोड मान्य करीत नाही त्याअर्थी त्यांच्याशी मी स्वतःच बोलेन. तुम्ही मला जे आश्वासन दिले आहे त्यांनी माझे समाधान झाले आहे असे म्हणण्याचा धोका मी स्वतः पत्करीन. आणि जर तुमच्या कौन्सिलनी ही तडजोड मंजूर केली नाही तर तुम्ही सर्व दोष माझ्यावर घाला. माझी फक्त एकच अट आहे आणि ती म्हणजे उद्या सकाळी सभेमध्ये जेव्हा मी असे म्हणेन की, "जीनांनी मला आश्वासन दिले आहे आणि त्यांनी माझे समाधान झाले आहे". तेव्हा कुठल्याही परिस्थितीत तुम्ही त्याचा इन्कार करता कामा नये आणि मी जेव्हा तुमच्याकडे पाहीन तेव्हा तुम्ही संमतीदर्शक मान हलवली पाहिजे'.

दुसऱ्या दिवशी सकाळी जीनांनी सांगितल्याप्रमाणे केले. आणि गांधींनी स्वतः योजनेशी सहकार्य करण्याचे नाकारले तरी काँग्रेस पक्षाने या योजनेला संमती दर्शवली. आणि योजनेच्या घोषणेनंतर थोड्याच दिवसात काँग्रेस व लीगच्या कार्यकारी मंडळानी ती औपचारिकपणे संमत केली.

त्यानंतर योजनेतील तरतुदी शक्य तितक्या तांतडीने अंमलात आणण्याचे काम व्हाइसरॉयने सुरू केले. पंजाब आणि बंगालच्या कायदेमंडळाची बैठक बोलावण्यात आली आणि वायव्य सरहद्द प्रांतात आणि आसाममधील सिल्हट जिल्ह्यात सार्वत्रिक मतदानाचा हुकूम दिला. प्रत्येक कायदेमंडळ दोन भागात विभागले : एका भागात पश्चिम पंजाब व पूर्व बंगालमधील मुस्लिम बहुसंख्य जिल्ह्यांचे, हिंदू मुस्लिम आणि इतर भारतीय प्रतिनिधी जमले आणि त्यांनी बहुमताने फाळणीच्या बाजूने निर्णय दिला. यातील सर्व मुस्लिम प्रतिनिधींनी फाळणीच्या बाजूने मतदान केले होते. दुसऱ्या भागातील प्रतिनिधींनी एकसंघ हिंदुस्तानच्या आणि एक घटना समिती असावी या बाजूने मतदान केले. सिंध विधिमंडळानेही प्रचंड बहुमताने पाकिस्तानच्या बाजूने मतदान केले.

१९४६ मध्ये वायव्य सरहद्द प्रांतातील मुस्लिम मतदारांनी पाकिस्तान नाकारले होते. आता अराजक व हिंसेच्या परिस्थितीत तेथे सार्वत्रिक मतदान घेण्यात आले. या परिस्थितीवर मुस्लिम लीगवाल्यांचा ताबा होता; हा हिंसेचा अहिंसेवर विजय होता. गांधीच्या नेतृत्वाखाली अहिंसेचे व्रत घेतलेले कॉंग्रेसवाले आणि खुदाई खिदमतगार यावेळी असहाय्य बनले होते. त्यांचे पुढारी अब्दुल गफारखान यांना

अशा परिस्थितीत रास्त सार्वत्रिक मतदान होणे अशक्य वाटल्यामुळे त्यांनी त्यावर बहिष्कार घालण्याचे ठरवले. २५ जून रोजी वर्तमानपत्राला दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले होते :

गेल्या काही महिन्यात मुस्लिम लीगवाल्यांनी संघटीत अशी दहशतवादी मोहीम सुरू केली आहे. आणि परिणामी शेकडो निरपराधी स्त्रिया, पुरुष व मुले त्यांचे बळी झाले आहेत. कोटयवधी रुपयांची मालमत्ता नष्ट केली गेली आहे. सर्व वातावरण जातीय माथेफिरूपणाने आणि जातीय विषाने विलक्षण भारलेले आहे. आजसुद्धा मुस्लिम लीगचे प्रमुख सभासद सार्वत्रिक मतदानात लोकांनी त्यांच्याविरुद्ध मतदान करू नये म्हणून त्यांना दहशत बसवण्यासाठी हिंसक आणि विध्वंसक चळवळ करीत आहेत. प्रांतातून बाहेर गेलेल्या लाखो लोकांना सार्वत्रिक मतदानात भाग घेण्यास प्रतिबंध व्हावा यासाठी ते हे करीत आहेत हे उघड आहे. आजच्या प्रश्नाच्या स्वरुपाचे वर्णन 'काफीर' आणि इस्लाममधील संघर्ष असे करून निष्कपटी साध्या सरळ पठाणांच्या धार्मिक भावना चेतवल्या जात आहेत.

या प्रांतातील सार्वत्रिक मतदानात आपला प्रांत पाकिस्तानमध्ये जावा असा कौल ५० टक्क्याहून अधिक लोकांनी दिला. अशाच प्रकारच्या परिस्थितीत सिल्हटनेही तसाच कौल दिला.

जुलैमध्ये हिंदी स्वातंत्र्याचा कायदा ब्रिटिश पार्लमेंटने मंजूर केला. त्यात १५ ऑगस्ट १९४७ रोजी हिंदुस्तान आणि पाकिस्तान अशी दोन स्वतंत्र राज्ये आस्तित्वात येतील असे घोषित केले होते. या कायद्याने दोनही राज्यांच्या कायदेमंडळांना आपापल्या अंतर्गत व बाहेरील कारभारासाठी कायदे बनवण्याचे संपूर्ण अधिकार दिले होते आणि या दोन कायदेमंडळांनी केलेला कुठलाही कायदा ब्रिटिश कायद्याला खटकणारा आहे या मुद्यावर तो रद्द किंवा त्याची अंमलबजावणी झाल्याशिवाय राहणार नाही असा नियम केला होता. या कायद्याने ब्रिटिश पार्लमेंटचा हिंदुस्तानवरचा ताबा हिरावून घेतला आणि हिंदुस्तान व पाकिस्तानला स्वतःच्या नशिबाचे धनी बनवले.

१९३०–४० च्या. दरम्यान जेव्हा प्रथम विभक्त मुस्लिम मातृभूमीच्या कल्पनेचा उदय झाला होता तेव्हा हिंदुस्तान व पाकिस्तान मधील लोकांच्या अदलाबदलीची कल्पना हास्यास्पद मानली गेली होती. लोकांच्या अदलाबदलीची गरज भासेल यावर जीनांचा विश्वास नव्हता. कॉंग्रेस पुढाऱ्यांनी पाकिस्तानमध्ये असलेल्या हिंदूंना तेथेच राहण्याचा सल्ला दिला आणि त्यांना कुठलीही इजा पोहोचणार नाही असे सांगितले. परंतु दोघांनीही मानसशास्त्रीय दृष्टिकोन विचारात घेतला नाही. हिंदूबद्दल सतत द्वेष भावना चेतवून लीगने मुसलमानांना आपल्या भोंवती जमा केले आणि तिने पाकिस्तानच्या 'पवित्र' भूमीतून हिंदूंना धुवून काढण्याचा विडाच उचललेला दिसला. हिंदी प्रदेशात राहिलेल्या मुसलमानांविषयी तितकीच उग्र प्रतिक्रिया हिंदुस्तानातील हिंदूंची होती. त्यामुळे लोकांची अदलाबदल अटळ होती;

आणि जसजशी १५ ऑगस्ट जवळ येत चालली तसतसे हजारो स्त्रीपुरुष आणि मुले नव्या राज्यात स्थलांतर करत होते. ते मार्ग कापीत असतानाच, किंवा निघण्याची तयारी करीत असतानाच अनेकांनी आपले जीव गमावले; गुंडगिरीमुळे अनेकांच्या बायका-मुली त्यांच्याकडून हिसकावून घेतल्या गेल्या. जवळजवळ सर्वच हिंदू आणि शीख लोकांनी पश्चिम पाकिस्तान सोडले. आणि ते राज्य पूर्णपणे मुस्लिम राज्य बनले. पूर्वेकडच्या भागात दंगे बहुतेक कलकत्त्यापुरतेच मर्यादित राहिले आणि मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झालेले दृश्य बंगालमध्ये फार कमी दिसले. पूर्व बंगालमधील जवळजवळ एक कोटी हिंदूंना असुरक्षिततेची भीती वाटली नाही. ते आपल्या पूर्वजांच्या घरादारांनाच चिकटून राहिले. पश्चिम बंगालमधल्या बऱ्याच मुसलमानांनीही तेच केले. सीमेवरील प्रांतात घडलेल्या या घटनांचा प्रतिध्वनी हिंदुस्तानातील इतर भागात होणारच आणि तसे हिंदू मुसलमानांचे दंगे पुन्हा पुन्हा झालेही. विशेषत: जेथे जातीयता सतत वाढली होती त्या संयुक्त प्रांतात विशेषच झाले.

नवीन राज्य जन्माला येण्याच्या प्रसूती वेदना अशा भयंकर होत्या. नव्या राज्याचे गव्हर्नर जनरल जीना झाले आणि नबाबजादा लियाकत अलीखान हे पंतप्रधान झाले. त्याचे उद्‌घाटन १४ ऑगस्ट १९४७ रोजी झाले. पंचाहत्तर वर्षे हिंदुस्तानच्या रंगभूमीवर चाललेल्या नाटकाचा पडदा हा अशा रितीने पडला. 'दोन हिंदुस्तान मित्र म्हणून वेगळे होत आहेत आणि ते चिरंतन मित्रच राहतील' अशी आशा व्यक्त करून जीनांनी हिंदुस्तानला कायमचा रामराम ठोकला. ही आशा व्यर्थ होती.

---

वि (वाय) १०४१—२१

# परिशिष्ट

## परिशिष्ट अ

१८८८ मध्ये सेंट्रल नॅशनल महॉमेडन असोसिएशनच्या शाखा निरनिराळ्या प्रांतात पुढील ठिकाणी होत्या : कराची, शहाझादपूर, शिकारपूर, लारकाना, सक्कर, लाहोर, अमृतसर, दिल्ली, हरडोई, हिसार, गुजेरात, अंबाला, लुधियाना, बरेली, बुदौन, मोहन, अलाहाबाद, अजमेर, लखनौ, गाझीपूर, सुरत, दिंडिगल, बंगलोर, तुमकुर, विझगापट्टम, विझीअनग्राम, सस्सेराम, आराह, दिनापूर, गया, पाटणा, चप्रा, सेवान, मुझफ्फरपूर, मोतीहारी, भागलपूर, हुगळी, जहानाबाद, पंडूह, रंगपूर, मिदनापूर, बोग्रा, राजशाही, नोआखली, मैमनसिंग, कोमिला, शिलाँग, चितगाव, डुमका, ब्राम्हणबारी आणि कटक.

## परिशिष्ट ब

सर सुलतान महमद शहा आगाखान, जी. सी. आय. ई. यांच्या नेतृत्वाखाली ३५ जणांच्या मुस्लिम शिष्टमंडळाने सिमला येथे तारीख १ ऑक्टोबर १९०६ रोजी हिंदुस्तानचे व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांना सुपूर्द केलेले मानपत्र.

हुजुरांना हे सुखाचे होवो. आम्ही खाली सह्या करणार अमीर, जहागिरदार, तालुकदार, वकील, जमीनदार, व्यापारी आणि इतर, सार्वभौम महाराजांचे फार मोठ्या अशा मुसलमान विभागाच्या प्रजाजनांचे प्रतिनिधी, आम्हाला मिळालेल्या परवानगीचा फायदा घेऊन आपल्याला मानपत्र सुपूर्द करण्याकरता आणि त्याचा अनुकूल विचार व्हावा म्हणून विनंती करण्याकरता आपल्याला अतिशय आदरपूर्व भेटत आहोत.

ब्रिटिश राजसत्तेने, हिंदुस्तानातील लोकसंख्येत भरपूर असलेल्या हजारो भिन्न धर्मीय आणि भिन्न जातीय लोकांना दिलेल्या असंख्य फायद्यांची आम्हाला जाणीव आहे आणि त्याची योग्यता आम्ही ओळखून आहोत. आज आम्ही जी शांतता, संरक्षण, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि पूजा स्वातंत्र्य उपभोगित आहोत त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. सरकारच्या शहाणपणाच्या आणि समजदारपणाच्या स्वरुपामुळे हे फायदे प्रगतिकारक होतील आणि उत्तरोत्तर राष्ट्राराष्ट्रातील शिष्टाचाराच्या संबंधात अधिक मानाचे स्थान पटकावेल याबद्दल रास्त अपेक्षा बाळगण्यास जागा आहे.

ब्रिटिश धोरणाचे एक सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य असे आहे की, त्यांनी स्वत:च्या हितावर परिणाम करणाऱ्या विषयात, सर्व हिंदी प्रगतीचे प्रमुख लक्षण बनलेल्या जाती आणि धर्मातील भिन्नतेबद्दल योग्य आदर बाळगून प्रथम या देशातील लोकांच्या विचारांची आणि इच्छांची शक्य तेवढी कदर केली आहे.

### जमातीचें हक्क .

प्रथम देशातील निरनिराळ्या भागातील प्रमुख जातींच्या वजनदार व्यक्तींबरोबर विश्वासाने आणि अगदी सहजपणे सल्ला मसलत करण्याच्या पद्धतीपासून याला,

सुरुवात करत आणि हेच तत्व हळूहळू पुढे नेऊन मान्यता पावलेल्या राजकीय किंवा व्यावसायिक संघटनांना लावून त्यांची सार्वजनिक महत्वाच्या गोष्टींवरील मते व टीका त्या संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या त्यांच्या हक्काला मान्यता दिली गेली आणि शेवटी, देशाच्या म्युनिसिपालटचा, डिस्ट्रिक्ट बोर्ड आणि सर्वात अधिक म्हणजे विधिमंडळात लोकांचे प्रत्यक्ष प्रतिनिधी म्हणून त्यांची नेमणूक अगर निवडणूक करण्यापर्यंत त्यांनी मजल गाठली. आम्हाला असे समजते की या शेवटच्या घटकातील प्रतिनिधित्व वाढवण्यासंबंधी विचार करण्यासाठी हुजुरांनी एक समिती नेमली आहे. या वाढवल्या जाणाऱ्या प्रतिनिधित्वात आम्हाला आमचा योग्य वाटा मिळण्याच्या संदर्भात आणि आमच्या जमातीच्या हिताला बाध आणणाऱ्या काही इतर महत्वाच्या बाबतीतील हक्कासंबंधी बोलण्यासाठी या प्रसंगी आम्ही हुजुरांना भेटण्याचे धाडस केले आहे.

## भूतकालीन परंपरा

१९०१ च्या खानेसुमारीनुसार हुजुरांच्या हिंदी वसाहतीतील मुसलमानांची संख्या सहा कोटी वीस लक्ष म्हणजे एकंदर लोकसंख्येच्या एक पंचमांश आणि एक चतुर्थांश यांच्या दरम्यान आहे. आणि जर रानटी व इतर गौण धर्माखाली जातीतील अशिक्षित लोकसंख्या वगळली आणि त्याचप्रमाणे सर्वसाधारणपणे हिंदू समजल्या गेलेल्या पण प्रत्यक्षात हिंदू नसलेल्या जाती वगळल्या तर हिंदूंच्या मोठ्या संख्येच्या प्रमाणात मुसलमानांचे हे प्रमाण पुष्कळच अधिक होते. म्हणून आम्ही नम्रतापूर्वक असे मांडू इच्छितो की, प्रतिनिधित्वाच्या वाढवलेल्या किंवा मर्यादित केलेल्या अशा कोणत्याही पद्धतीत, रशिया सोडून कुठच्याही पहिल्या दर्जाच्या युरोपच्या राज्याच्या एकंदर लोकसंख्येपेक्षा जी जमात संख्येने अधिक मोठी आहे तिला देशातला एक महत्वाचा घटक म्हणून पुरेशी मान्यता मिळण्याचा तिचा न्याय हक्क आहे.

हुजुरांच्या परवानगीने खरोखर आम्ही आणखी एक पाऊल पुढे जाण्याचे धाडस करीत आहोत. कुठल्याही प्रकारच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रतिनिधित्वात किंवा मुस्लिम जमातीचा दर्जा व प्रभाव यावर परिणाम करणाऱ्या सर्व इतर बाबतीत त्यांना दिले जाणारे स्थान केवळ त्यांच्या संख्याबळाच्याच नव्हे तर त्यांच्या राजकीय महत्वाच्या आणि साम्राज्याच्या संरक्षणासाठी त्यांनी दिलेल्या किंमतीच्या तुलनेबरोबर असले पाहिजे असे आम्ही आग्रहपूर्वक प्रतिपादतो. या संदर्भात आम्ही अशी आशा करतो की, शंभर वर्षापूर्वी हिंदुस्तानात आम्हाला जे स्थान प्राप्त झाले होते आणि ज्याच्या परंपरा अजून आमच्या मनातून साहजिकच नाहिशा झालेल्या नाहीत त्यांचा रास्त विचार करण्याचे हुजूर कबूल करतील.

हिंदुस्तानच्या मुसलमानांनी त्यांच्या राज्यकर्त्यांचे वैशिष्ठ्य असलेल्या न्याय बुद्धीवर आणि रास्त व्यवहाराच्या प्रेमावर नेहमीच निखालस विश्वास ठेवला आहे आणि त्याचा परिणाम म्हणून कदाचित गोंधळवून टाकतील अशा दबाव आणणाऱ्या पद्धतीने

आपले हक्क मिळवण्यापासून ते दूर राहिले आहेत. परंतु हिंदुस्तानच्या मुसलमानांनी आपल्या पूर्वापार प्रतिष्ठेच्या आणि उत्तम परंपरेपासून यापुढे ढळता कामा नये अशी आमची कळकळीची इच्छा आहे. अलिकडील घटनांमुळे मुसलमानांच्या, विशेषत: तरूण पिढीच्या मुसलमानांच्या भावना ढवळून निघाल्या आहेत आणि विशिष्ठ परिस्थितीत आणि काही अनपेक्षित गोष्टींनी त्या केवळ सौम्य मार्गदर्शन आणि माफक विचारांच्या आवाक्याबाहेर सहज जाऊ शकतील.

म्हणून, हिंदुस्तानच्या सर्व विभागातील आमच्या फार मोठ्या समान धर्मियांचा दृष्टिकोन आणि इच्छा यांचा काळजीपूर्वक विचार केल्यानंतर आम्ही जे निवेदन हुजुरांना सादर करण्याचे धाडस केले आहे त्याच्याकडे हुजुरांनी मनापासून लक्ष देण्याची कृपा करावी अशी आमची प्रार्थना आहे.

## युरोपाच्या प्रातिनिधिक संस्था

आम्ही हे प्रथमच सांगू इच्छितो की, युरोपच्या पद्धतीच्या प्रातिनिधिक संस्थांचा प्रकार हिंदी लोकांना नवा आहे. असे सांगितल्याबद्दल हुजूर आम्हाला क्षमा करतील अशी आमची आशा आहे. आमच्या जातीतील अनेक विचारवंतांना खरोखर असे वाटते की, हिंदुस्तानच्या राजकीय, सामाजिक आणि धार्मिक परिस्थितीशी मुसलमान जमातीने एकरूप व्हावयास हवे असेल तर फार मोठ्या काळजीची, दूरदृष्टीची आणि सावधगिरीची आवश्यकता आहे आणि अशा काळजीच्या आणि सावधगिरीच्या आभावाने झालेली एकरूपता इतर अनेक अनिष्ट गोष्टींसारखी आमचे राष्ट्रीय हित सहानु-भूतीशून्य अशा बहुसंख्यकांच्या मेहेरबानीवर अवलंबून ठेवील असा संभव आहे तरीसुद्धा जर आपल्या पुरातन प्रेरणा आणि परंपरेप्रमाणे आमच्या राज्यकर्त्यांना हिंदी सरकारात अधिक महत्व देणे उपयुक्त वाटत असेल तर त्यांच्या या धोरणामुळे जी परिस्थिती निर्माण होईल त्या परिस्थितीत मुसलमानांना अन्याय होऊ नये म्हणून आता आम्ही त्यापासून अलिप्त राहू शकणार नाही. तेव्हा, जरी हुजुरांच्या त्यांच्या नावाजलेल्या पूर्वजांच्या आणि स्थानिक सरकारांच्या प्रमुख पदी असलेल्यांच्या न्यायबुद्धीमुळे आणि नेकीमुळे मुसलमानांना आजपर्यंत प्रतिनिधित्व उपभोगता आले असले आणि ज्यांनी कुठलाही अपवाद न करता मुसलमान सभासदांची विधिमंडळ सभेकरता नेमणूक केली त्यांच्याबद्दल आम्हाला कृतज्ञतेची जाणीव असूनसुद्धा, असे दिसून येत आहे की, आम्हाला दिलेले हे प्रतिनिधित्व आमच्या गरजेनुसार अपुरे आहे आणि प्रतिनिधित्वाच्या नेमणुका करण्यासाठी ज्यांची निवड केली जाते त्यांची त्यासाठी संमती नेहमीच घेतली गेली आहे असे नाही. ही परिस्थिती अटळ अशा वस्तुस्थितीमुळे निर्माण झाली असावी. कारण जरी एका बाजूला व्हाइसरॉय आणि स्थानिक सरकार यांच्या शिफारसीच्या नेमणुकांची संख्या काटेकोरपणे मर्यादित असली तरी दुसऱ्या बाजूला लोकप्रतिनिधींची निवड निश्चित करण्याच्या कुठल्याही विश्वसनीय पद्धतीच्या आभावामुळे लोकांना मान्य असलेले प्रतिनिधी निवडणे फार कठीण आहे.

## निवडणूक निकाल

निवडणूक निकालाबाबत बोलायचे तर, आज बनवलेला मतदार संघ कुठल्याही मुसलमानाचे नाव, तो सर्व महत्वाच्या गोष्टीत बहुसंख्यकांशी सहमत असल्याशिवाय सरकारच्या संमतीसाठी सादर करील ही अशक्यप्राय गोष्ट आहे आपल्या शक्तीचा पूर्ण फायदा घेऊन आपले मत आपल्याच जमातीच्या सभासदांना देण्याची आमच्या बिगर मुस्लिम सह-प्रजाजनांची इच्छा असणे हे चुकीचे नाही असे आम्हाला रास्तपणे वाटते. किंवा जे हिंदू नाहीत ते लोकसुद्धा मतदानात त्यांना त्यांच्या भावी पुनर्निवडणकीसाठी ज्यांच्या सदिच्छेवर अवलंबून रहावे लागणार आहे अशा बहुसंख्य असलेल्या हिंदूंबरोबरच राहतील हेही अपेक्षितच आहे. हे खरे आहे की, आमचे आणि आमच्या हिंदू देशबांधवांचे अनेक आणि महत्वाचे हितसंबंध सारखेच आहेत. आमच्या ह्या हितसंबंधांचे समर्थ पाठीराखे, मग ते कोणत्याही राष्ट्रीयत्वाचे असोत, त्यांनी आपल्या विधिमंडळातील आस्तित्वाने आमचे हितसंबंध सुरक्षित राखले आहेत हे पाहणे ही गोष्ट आम्हाला नेहमीच समाधान देईल.

## वैशिष्ठ्यपूर्ण जमात

तरीसुद्धा, दुसऱ्या कुठल्याही जमातीला ज्यात भागिदार होता येणार नाही अशी आमचे स्वतःचेच आणखी हितसंबंध असलेली आम्हा मुसलमानांची ही वैशिष्ठ्यपूर्ण जमात आहे हे नाकबूल करता येणार नाही आणि आम्हाला पुरेसे प्रतिनिधित्व न मिळाल्याने हे हितसंबंध आतापर्यंत दुखावले गेले आहेत. ज्या प्रांताच्या लोकसंख्येत मुसलमान निखालस बहुसंख्य आहेत त्या प्रांतातसुद्धा आम्हाला अनेकवेळा उपेक्षा केली तरी अन्याय होणार नाही असा नगण्य राजकीय घटक म्हणून वागवले जाते. पंजाबात हे थोड्या फार प्रमाणात घडत आहे पण सिंध आणि पूर्व बंगालमध्ये हे लक्षात येण्याजोग्या मोठ्या प्रमाणावर घडत आहे.

प्रतिनिधीच्या निवडणुकांसंबंधी आमचे विचार सुसूत्रपणे मांडण्यापूर्वी आम्ही हे नम्रपणे सांगू इच्छितो की, एकाद्या जमातीचे राजकीय महत्व हे बरेचसे त्या जमातीच्या लोकांचे सरकारी खात्यात जे स्थान असते त्या प्रमाणात फायद्याचे किंवा तोटयाचे होते. वरीलप्रमाणे मुसलमानांना जर पुरेसे प्रतिनिधित्व दिले गेले नसेल आणि दुर्दैवाने ते खरे आहे, तर जी प्रतिष्ठा आणि प्रभुत्व त्यांना मिळणे रास्त आणि न्यायाचे आहे ती त्यांना गमवावी लागणार आहे.

## सरकारी खात्यातील नोकऱ्या

म्हणून आमची अशी विनंती आहे की, सर्व हिंदी प्रांतातील दुय्यम, वरच्या अधिकाराच्या आणि मंत्रालयातील सरकारी नोकऱ्या देताना मुसलमानांना त्यांचे योग्य प्रतिनिधित्व नेहमीच मिळावे म्हणून सरकारने दयावंत व्हावे; काही प्रांतातील स्थानिक सरकारांनी अशा अर्थाचे हुकूम वेळोवेळी दिले आहेत, परंतु दुर्दैवाने, लायक मुसलमान पुढे येत नाहीत या सबबीवर अनेक बाबतीत त्यांचे काटेकोरपणे पालन

केले जात नाही. ही सबब एकेकाळी कितीही योग्य असली तरी ती आज टिकणारी नाही हे आम्ही नम्रतापूर्वक आपल्या नजरेस आणून देतो. आणि जेथे त्यांना जागा देण्याची इच्छा असेल तेथे लायक मुसलमानांची जितकी मागणी असेल तेवढे पुरवण्याची हमी आम्ही आनंदाने हुजुरांना देतो.

### स्पर्धेचे मूलतत्व

लायक मुसलमानांची संख्या जरी वाढली असली तरी त्यांच्यापेक्षा वरच्या दर्जाची पात्रता असलेल्यांना प्राधान्य देण्याच्या मुद्यावर त्यांना नकार देण्याकडे कल असल्याचे दुर्दैवाने दिसून येते. यामुळे स्पर्धेच्या तत्वाचा अतिशय वाईट स्वरुपात शिरकाव होतो. आणि एकाच वर्गाच्या अधिकाराच्या प्रभावामुळे निर्माण होणाऱ्या त्यांच्या मक्तेदारीचा राजकीय अर्थ काय होतो इकडे आम्ही हुजुरांचे लक्ष वेधू इच्छितो. या संदर्भात आम्ही असेही दाखवून देऊ इच्छितो की, मुसलमानांच्या शैक्षणिक चळवळीच्या सुरुवातीपासूनच मुसलमान शिक्षणतज्ज्ञांनी त्यांच्यातील विशेषत्वाच्या विकासासाठी फार कष्टाचे प्रयत्न केले आहेत. आणि जनतेचे सेवक तयार करताना केवळ मानसिक जागरुकतेपेक्षा ह्याला अधिक महत्व आहे असे आम्हाला वाटते असे सांगण्याचे धाडस आम्ही करतो.

### न्यायासनावरील मुसलमान

हायकोर्ट आणि न्यायदानाच्या प्रमुख कोर्टात मुसलमान न्यायाधीश वारंवार नेमले जात नाहीत यामुळे हिंदुस्तानच्या सर्व भागातील मुसलमान दुःखी आहेत हे नमूद करण्याचे आम्ही धाडस करतो. न्यायालयांची निर्मिती झाली तेव्हापासून केवळ तीन मुसलमान वकिलांना ह्या सन्माननीय जागा मिळाल्या आहेत आणि या सर्वांनी न्यायासनावरील त्यांची पात्रता खात्रीपूर्वक पटवून दिली आहे. आज या क्षणाला कुठल्याही न्यायालयातील न्यायासनावरील एकही जज्ज मुसलमान नाही. कलकत्त्यातील लोकसंख्येत मुसलमानांचे प्रमाण फार मोठे असूनही कलकत्ता हायकोर्टात तीन हिंदू जज्ज आहेत आणि पंजाबच्या लोकसंख्येत ते बहुसंख्य असूनही तेथील मुख्य कोर्टात दोन हिंदू जज्ज आहेत. म्हणून, प्रत्येक हायकोर्टात आणि मुख्य कोर्टात न्यायासनाची एक जागा मुसलमानांना मिळाली पाहिजे ही आमची विनंती भरमसाट नाही. या जागांसाठी लायक मुसलमान एका प्रांतात मिळाले नाहीत तर दुसऱ्या प्रांतात मिळणे शक्य आहे. आपल्या परवानगीने आम्ही आणखी असेही नमूद करतो की, ह्या न्यायालयातील न्यायासनावर मुस्लिम कायद्यात पंडित असलेले न्यायाधिश असणे हे न्यायी राज्यव्यवस्थेला भरपूर बळकटी आणणारे आहे.

### म्युनिसिपालट्यातील प्रतिनिधित्व

आरोग्य, सुखसोयी, शैक्षणिक गरजा आणि अगदी धार्मिक गोष्टींच्या संबंधातसुद्धा, यांना बाधा येणार नाही अशा महत्वाच्या स्थानिक हिताच्या गोष्टींशी म्युनिसिपालट्या व जिल्हा मंडळे यांना संपर्क ठेवावा लागतो. याहून इतर वरच्या दर्जाच्या गोष्टींकडे

वळण्यापूर्वी, यासंबंधातल्या मुसलमानांच्या आजच्या स्थानाकडे हुजुरांचे लक्ष वेधले तर आम्हाला क्षमा केली जाईल अशी आम्ही आशा करतो. या संस्था म्हणजे स्वराज्याच्या शिडीच्या मूळ पायऱ्या. या संस्थातूनच प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाबद्दल लोकांच्या मनात अधिक आत्मियता निर्माण करता येते. तरीसुद्धा, आज या संस्थामधले मुसलमानांचे स्थान सर्वसाधारणपणे लागू करता येईल अशा कुठल्याच योग्य अशा मार्गदर्शक तत्त्वांनी नियमित केले गेलेले नाही आणि प्रत्यक्षात तर ते निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे असते. उदाहरणार्थ, अलिगड म्युनिसिपालटीचे एकंदर सहा विभाग आहेत. प्रत्येक विभागातून एक हिंदू आणि एक मुसलमान कमिशनर निवडला जातो. हेच तत्त्व पंजाब आणि इतर काही ठिकाणी अंमलात आणले जाते असे आम्हाला समजते. परंतु पुष्कळशा ठिकाणी मुसलमान करदात्यांना पुरेसे प्रतिनिधित्व दिले गेलेले नाही. म्हणून, म्युनिसिपालटचा आणि जिल्हा मंडळे यावर हिंदू आणि मुसलमान यांच्या हक्काच्या जागा किती असणार हे प्रत्येक स्थानिक अधिकाऱ्यांनी जाहीर केले पाहिजे असे आम्ही अत्यंत आदरपूर्वक सुचवू इच्छितो. हे प्रमाण प्रत्येक जमातीची संख्या, सामाजिक दर्जा, स्थानिक प्रभाव आणि विशिष्ट गरजा यावर निश्चित केले जावे. त्यांचे असे प्रमाण एकदा निश्चित केले गेले म्हणजे पंजाबच्या अनेक गावात जी पद्धत आहे त्याप्रमाणे, कुठल्याही जमातीला आपले स्वतःचे प्रतिनिधी अनेकवेळा परत पाठवण्याची परवानगी असावी अशी आम्ही सूचना करतो.

### विद्यापिठाचे सन्मान्य सदस्य

आम्ही असेही सुचवतो की, हिंदी विद्यापीठांचे सेनेट आणि सिंडिकेट सदस्य हेही अशाच प्रकारे नियुक्त करणे शक्य आहे. म्हणजे आम्हाला असे म्हणावयाचे आहे की, शक्यतो या दोनही गटातील मुसलमानांच्या योग्य प्रतिनिधित्वाचे प्रमाण किती असावे हे अधिकृतरित्या प्रसिद्ध व्हावे.

### प्रांतिक मंडळातील नेमणूका

आता, आम्ही देशाच्या कायदेमंडळातील आमच्या प्रतिनिधित्वाच्या प्रश्नाकडे वळतो. प्रथम प्रांतिक मंडळाच्या प्रतिनिधित्वाबाबत आम्ही अतिशय आदरपूर्वक असे सुचवू इच्छितो की, या मानपत्राच्या पाचव्या परिच्छेदात आम्ही ज्या महत्वाच्या गोष्टी नमूद केल्या आहेत त्यांचा संदर्भ घेऊन म्युनिसिपालटचा आणि जिल्हा मंडळाप्रमाणेच आमच्या जागा निश्चित कराव्या आणि जाहीर कराव्या आणि प्रमुख जमीनदार, वकील, व्यापारी आणि इतर हितसंबंधीय मुसलमान म्युनिसिपालटचा आणि जिल्हा मंडळाचे सदस्य असलेले मुसलमान आणि विद्यापीठांचे विशिष्ट मानाचे, समजा ५ वर्षे झालेले पदवीधर मुसलमान या सर्वांच्या मिळून निवडणूक संस्था बनवाव्या आणि हुजुरांचे सरकार कार्याचे जे नियम बनवेल त्या नियमानुसार लायक सदस्य निवडण्याचा अधिकार त्यांना द्यावा.

### व्हाईसरॉयचे मंडळ

वरिष्ठ विधिमंडळात मुसलमान हितसंबंधांचे योग्य प्रतिनिधित्व असणे ही फार महत्वाची बाब आहे. आम्ही अशा सूचना करतो की, (१) या मंडळाच्या रचनेत मुसलमानांचे प्रतिनिधी त्या जमातीच्या संख्याबळानुसार ठरवू नयेत आणि कुठल्याही परिस्थितीत त्यांचे प्रतिनिधी परिणामशून्य अशा अल्पमतात कधीच असता कामा नयेत. (२) शक्यतो नेमणुका पद्धतीपेक्षा निवडणुका पद्धतीला अग्रमान द्यावा. (३) मुसलमान सदस्य निवडण्याकरिता, मुसलमान जमीनदार, वकील, व्यापारी आणि ज्यांचा दर्जा हुजुरांच्या सरकारने नंतर निश्चित करावयाचा आहे असे इतर महत्वाच्या हितसंबंधाचे मुसलमान प्रतिनिधी, प्रांतिक मंडळाचे मुसलमान सदस्य आणि विद्यापीठाचे मुस्लिम सन्माननीय सदस्य यांच्याकडे निवडणूक अधिकार द्यावेत आणि त्यांनी हुजुरांच्या सरकारने बनवलेल्या नियमाप्रमाणे त्यांची अंमलबजावणी करावी.

### कार्यकारी मंडळ

व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळावर एक किंवा त्याहून अधिक हिंदी सदस्यांची नेमणूक होणार असल्याच्या समजूतीला अलिकडे पुष्टी येत आहे जर अशा नेमणुका होणार असल्या तर मुसलमानांच्या हक्काकडे दुर्लक्ष होऊ नये अशी आम्ही प्रार्थना करतो. त्या आदरणीय सभागृहात वैशिष्टयपूर्ण कार्य करण्यासाठी लायक असे एकाहून अधिक मुसलमान देशात आढळून येतील असे म्हणण्याचे धाडस आम्ही करतो.

### मुस्लिम विद्यापीठ

आमच्या राष्ट्रीय कल्याणावर निकटचा परिणाम करणार आहे अशा विषयावर आम्ही हुजुरांशी प्रथम बोलत आहोत. जमात म्हणून असलेल्या आमच्या महत्वाकांक्षा आणि आमचा भावी विकास हा मुख्यत्वेकरून आमच्या धार्मिक आणि बौद्धिक जीवनाचे केंद्र बनेल अशा मुस्लिम विद्यापीठाच्या स्थापनेवर अवलंबून आहे याबद्दल आमची खात्री पटलेली आहे. म्हणून, मुसलमान जमातीला ज्या जोखमीच्या कार्यात मनापासून रस आहे त्यात त्यांना मदत करण्यात हुजुरांनी पावले उचलावीत अशी आम्ही त्यांना आदरपूर्वक प्रार्थना करतो.

शेवटी हुजुरांना आम्ही खात्रीपूर्वक असे सांगतो की, आजच्या परिस्थितीत या मानपत्रात सूचित केलेल्या मार्गाने महाराजांच्या मुसलमान प्रजाजनांना मदत करण्यात हुजूर त्यांची सिंहासनावरची अढळ निष्ठा बळकट करतील आणि त्यांच्या विकासाचा आणि राष्ट्रीय भरभराटीचा पाया घालतील आणि पुढे होणाऱ्या त्यांच्या पिढ्या हुजूरांच्या नावाचे कृतज्ञतेने स्मरण करतील. आमच्या या प्रार्थनेचा योग्य तो विचार हुजूर कृपाळूपणाने करतील याबद्दल आम्हाला विश्वास वाटतो.

## परिशिष्ट क

### मुसलमान शिष्टमंडळाला लॉर्ड मिंटो यांचे उत्तर

महाराज आणि सद्गृहस्थहो, तुमच्या मानपत्रात अंतर्भुत असलेल्या अनेक विचारांना

उत्तर देण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी मी सिमल्याला तुमचे हार्दिक स्वागत करतो. तुमचे येथील आगमन अर्थपूर्ण आहे. तुम्ही मला सुपूर्द केलेल्या तुमच्या या महत्वाच्या दस्तऐवजावर अमीर उमराव, निरनिराळ्या राज्यांचे मंत्री, मोठे जमीनदार, वकील, व्यापारी व सार्वभौम राजाच्या इतर प्रजाजनांच्या सह्या आहेत. हिंदुस्तानातील जाणकार मुसलमान जमातीच्या दृष्टिकोनाचे आणि महत्वाकांक्षांचे स्पष्टिकरण करणाऱ्या तुमच्या या प्रातिनिधिक स्वरुपाच्या शिष्टमंडळाचे मी स्वागत करतो. मला वाटते, तुम्ही जे सर्व म्हटले आहे ते, विखुरलेल्या लोकांच्या वस्त्यांच्या क्षुल्लक वैयक्तिक अगर राजकीय सहानुभूती किंवा दुराव्यापेक्षा संपूर्णपणे वेगळ्या अशा हिंदुस्तानातील आजच्या परिस्थितीचा विचार करून मते बनवलेल्या प्रातिनिधिक लोकांमुळे उद्भवलेले आहे. इस्लामच्या अनुयायांच्या योग्य उद्देशांबद्दल आणि आमच्या साम्राज्याच्या राजकीय इतिहासात भाग घेण्याच्या त्यांच्या निश्चयाबद्दल आमची अनुकुलता व्यक्त करण्याची संधी आपण मला देत आहात त्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

भिन्न जाती आणि भिन्न पंथ असलेल्या या प्रचंड खंडातील लोकांचे ब्रिटिश राज्यकर्त्यांनी जे हित केले आहे आणि ज्याची जाणीव तुम्ही व्यक्त केली आहे त्याबद्दल तुमचा व्हाइसरॉय म्हणून मला फार अभिमान वाटतो. एका विजेत्या आणि राज्यकर्त्या वर्गाचे वंशज म्हणून तुम्ही स्वतःच. ब्रिटिश व्यवस्थापनाने दिलेल्या वैयक्तिक स्वातंत्र्याबद्दल पूजा स्वातंत्र्याबद्दल, सर्वसाधारण शांततेबद्दल आणि आशादायक भविष्याबद्दल, तुमची कृतज्ञता आज मला सांगितली आहे.

**भूतकाळातील सहाय्ये**

मुसलमानांनी सार्वजनिक नोकऱ्यांसाठी लायक बनावे म्हणून ब्रिटिशांनी जे फार पूर्वीपासून प्रयत्न केले आहेत त्यांच्याकडे वळून पाहणे फार मनोरंजक होईल. सरकारी नोकऱ्यात मुसलमानांना हिंदूंशी बरोबरी करता यावी या हेतूने १७८२ साली वॉरन हेस्टिंग्ज यांनी कलकत्ता मदरसा स्थापन केली. माझे पूर्वज लॉर्ड मिंटो यांनी १८११ साली मदरसामध्ये सुधारणा व्हाव्या म्हणून आणि इतरत्र सर्व हिंदुस्तानभर मुस्लिम महाविद्यालये स्थापन व्हावी म्हणून प्रचार केला. नंतरच्या काळात, महॉमेडन असोसिएशनच्या प्रयत्नामुळे मुसलमानांचे शिक्षणातील स्थान आणि त्यांच्या सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्या यांच्याबद्दल निर्णय घेण्यासाठी सरकारला १८८५ चा कायदा करावा लागला. आणि तोपर्यंत मुसलमानांच्या शिक्षणविषयक प्रयत्नांनी जी फार मोठी संस्था सर सय्यद अहमदखान यांच्या दानशूर आणि उदार निष्ठेने आपल्या धर्मबांधवांना अर्पण केली तिने त्यावर कळस चढवला.

**अलिगड महाविद्यालय**

१८७७ च्या जुलैमध्ये लॉर्ड लिटन यांनी अलिगड महाविद्यालयाची पायाभरणी केली त्यावेळी सर सय्यद अहमदखान यांनी व्हाइसरॉय यांना उद्देशून पुढील संस्मरणीय

भाषण केले : 'तुम्ही माझा जो वैयक्तिक सन्मान केला आहे त्यानी मला एक आश्वासन मिळाले आहे आणि केवळ वैयक्तिक कृतज्ञतेच्या भावनेपेक्षा अधिक उच्च स्वरूपाच्या भावनांनी माझे मन भरून गेले आहे. याप्रसंगी तुम्ही ब्रिटिश राज्याचे प्रतिनिधित्व करत आहात. तुम्हाला आमच्या प्रयत्नाबद्दल सहानुभूती आहे याबद्दल आमची खात्री आहे आणि हा विश्वास मोलाचा आणि मोठा सुखदायक आहे. अनेक वर्षे जे जोखमीचे कार्य हे माझे ध्येय होते आणि आज तर ते माझ्या आयुष्याचे एकमेव ध्येय आहे त्याने एकाबाजूला माझ्या देशबांधवात उत्साह निर्माण केला आहे आणि दुसऱ्या बाजूला माझ्या ब्रिटिश सहकारी प्रजाजनांची सहानुभूती आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांचा पाठिंबा मिळवला आहे ह्या भावनेने मला जीवनात फार समाधान लाभले आहे आणि म्हणून माझ्या जीवनाची जी काय थोडी वर्षे अजून शिल्लक आहेत ती संपतील आणि मी तुमच्यात नसेन तेव्हासुद्धा, या महाविद्यालयाची भरभराट होईल आणि हे महाविद्यालय आज माझ्या मनात जी भावना भरून राहिली आहे त्याप्रमाणे, या देशाबद्दल असेच प्रेम, ब्रिटिश राज्याबद्दल अशीच निष्ठेची भावना, त्यांच्या आशिर्वादाची अशीच किंमत आणि येथील सहकारी ब्रिटिश प्रजाजनांबद्दल अशीच कळकळीची मैत्री निर्माण करणारे शिक्षण माझ्या देशबांधवांना देण्यात यशस्वी होईल.'

## सर सय्यद यांचा प्रभाव

अलिगडने आपली कीर्ति मिळवली आहे. स्वतःच्या धर्मतत्त्वात परिणत आणि राजनिष्ठा आणि देशभक्तीच्या आचरणात समर्थ बनलेले त्याचे विद्यार्थी जीवनाच्या लढाईला तोंड देण्यासाठी बाहेर आलेले आहेत. आणि आज जेव्हा हिंदुस्तानच्या राजकीय भविष्याबद्दल बरीच काही गंभीरता असताना, तुम्ही तुमच्या मानपत्रात अतिशय वक्तृत्व पूर्णतेने स्पष्ट केलेल्या निष्ठा, अक्कल हुषारी आणि संयुक्तिक तर्क यामुळे सर सय्यद अहमदखान यांची प्रेरणा आणि अलिगडची शिकवण मुस्लिम इतिहासाच्या अभिमानाच्या गोष्टीत तेजस्वीपणे चमकेल. परंतु सद्गृहस्थहो, तुमच्या राज्यकर्त्यांच्या न्यायी आणि योग्य निर्णयावर तुमचा विश्वास आहे असे जर तुम्ही म्हणत असाल तर 'अलिगडच्या घटनांनी' मुसलमानांमधील तरुण पिढीच्या भावना ढवळून निघाल्या आहेत आणि त्या 'सौम्य मार्गदर्शन आणि माफक उपदेशाच्या पलिकडे गेल्या आहेत' हे तुम्ही जाणणे अपरिहार्य आहे.

## पूर्व बंगाल मधील धोरण

पूर्व बंगाल आणि आसाम या प्रकरणांबाबत आज कुठल्याही चर्चेत शिरण्याचा माझा हेतू नाही. तरीसुद्धा, कुणालाही न दुखवता मी जसे असे म्हणतो की, नवीन प्रांताच्या मुसलमान जमातीने त्यांना नवीन असलेल्या परिस्थितीत नेमस्तपणा आणि आत्मसंयमन दाखवले आणि त्याबद्दल गैरसमज झाल्यास ते अपरिहार्य होते तसेच मी असेही म्हणतो की, बंगाली लोकांच्या भावनेत असलेल्या प्रामाणिकपणाबद्दल मला

सहानुभूती वाटते. परंतु शेवटी मला असे सांगावयाचे आहे की, नव्या प्रांताच्या प्रकरणात व्हाइसरॉय आणि हिंदुस्तान सरकार यांनी जो मार्ग चालू ठेवला आहे, आणि ज्याचे भवितव्य आता ठरून गेले आहे अशी आशा वाटते, ते प्रकरण जात आणि धर्म याकडे लक्ष न देता केवळ सर्व आजच्या आणि भावी लोकांच्या दृष्टीने जे उत्तम होईल त्यावर दृष्टी ठेऊन केले आहे यावर तुम्ही विश्वास ठेवावा. मुसलमानांची निष्ठा आणि स्वहिताचे संरक्षण या त्यांच्या गुणांची कदर करणाऱ्या ब्रिटिश न्यायीपणावर आणि समान संधी देण्यावर बंगालच्या आणि आसामच्या मुस्लिम जमातीने पूर्वीइतक्याच विश्वासाने विसंबून रहावे.

## हिंदुस्थानातील अशांतता

सद्गृहस्थहो, ज्यावेळी हिंदुस्तानचे राजकीय वातावरण बदलत आहे त्यावेळी तुम्ही मला हे मानपत्र सादर करत आहात. आम्हाला सर्वांनाच असे वाटते आहे की, या नवीन वातावरणाचे अस्तित्व आशा आणि महत्वाकांक्षा जाणवत असताना ते तसे नाही हे म्हणणे मूर्खपणाचे आहे. आम्ही त्याच्याकडे दुर्लक्ष करू शकणार नाही—तसे करण्याची इच्छा करणेही चुकीचे होईल—पण ही सर्व अशांतता कशामुळे आहे ? अव्यवस्थितपणे राज्य चालवल्यामुळे लाखो लोकात निर्माण झालेल्या असंतुष्टतेमुळे असे म्हणता येणार नाही—असे निक्षून सांगणाऱ्या कुणालाही मी प्रामाणिकपणे आव्हान देतो—आणि राजद्रोही लोकांच्या बंडामुळे असेही म्हणता येणार नाही.

## पाश्चिमात्य शिक्षणाची फळे

ज्या शैक्षणिक प्रगतीत आजपर्यंत फार थोड्या लोकांनी भाग घेतला आहे आणि ज्याची बीजे प्रथम ब्रिटिश सत्तेनेच पेरली आणि त्याची फळे जोपासण्याची आणि त्याला योग्य दिशा दाखवण्यात ते आपली शिकस्त करत आहेत, त्या शिक्षणामुळे ही अशांतता निर्माण झाली आहे. आम्ही कापलेल्या पिकात पुष्कळ हरळ असण्याचा संभव आहे. आम्ही पेरलेले धान्य कदाचित् हिंदुस्तानातील लोकांना आवश्यक आहे तसे योग्य नसेल; परंतु जसजसा काळ पुढे जाईल तसतसे हे शिक्षणाचे पीक वाढेल आणि त्यातून निर्माण होणाऱ्या उत्पादनाच्या काळजीपूर्वक व्यवस्थापनावर व वाटपावर त्याचे आरोग्य व पौष्टिकपणा अवलंबून राहील. सभ्यगृहस्थहो. 'युरोपच्या पद्धतीच्या प्रातिनिधिक संस्था हिंदुस्तानातील लोकांना संपूर्ण नव्या आहेत' हे मला सांगताना किंवा 'त्यांची इकडे सुरुवात करावयाची असेल तर अतिशय खोलवर विचार करण्याची आणि काळजी घेण्याची गरज आहे' असे म्हणताना दिलगिरी व्यक्त करण्याचे काही कारण नाही. पौर्वात्य जगातील लोकांच्या पिढीजात प्रेरणा आणि परंपरा यात पाश्चिमात्य जगातील सर्व राजकीय साचा तसाच्या तसा बसवण्यात आनंद मानण्यापासून मी फार लांब रहायला पाहिजे. पाश्चिमात्य विचारांचा विकास, पाश्चिमात्य सुधारणांची शिकवण ब्रिटिशांनी मानलेले व्यक्तित्वाचे स्वातंत्र्य या गोष्टी हिंदुस्तानातील

लोकांकरिता पुष्कळ काही करू शकतील. परंतु तुमच्याप्रमाणेच मी हे जाणतो की, त्यांच्या राजकीय पद्धतींच्या स्वीकारावर त्यांनी अव्यवहार्य आग्रह धरता कामा नये.

## मुसलमानांचे राजकीय भवितव्य

आणि आता, सभ्यगृहस्थहो, मी तुमच्या स्वत:च्या राजकीय भवितव्याच्या स्थानाकडे ज्या मुसलमान जमातीच्या स्थानाबद्दल तुम्ही बोलत आहे त्याकडे वळतो. परिस्थिती आणि सार्वजनिक कार्याच्या व्यवस्थापनातील आपला हिस्सा मागण्याचा जमातीचा अधिकार, याचा कितीही सूक्ष्मपणे विचार केला तरी त्यातून तुमचा अर्थ मान्य करणे मला अशक्य आहे हे तुम्ही जाणाल, याबद्दल मला खात्री वाटते. आज मी केवळ संदिग्धपणे बोलू शकतो. तुम्हाला माहित आहेच की, मी नुकतीच एक कमिटी या देण्याच्या (presentation की representation प्रतिनिधित्वाच्या ?) प्रश्नाचा विचार करण्याकरिता नेमलेली आहे. त्या कमिटीपुढे तुम्ही उपस्थित केलेले मुद्दे आहेत शिवाय तुम्ही दिलेले निवेदनही त्यांना सुपूर्द करण्याची काळजी मी घेईन. परंतु त्याचबरोबर कमिटीच्या अहवालाचा कुठल्याही प्रकारचा अधिक्षेप न करता तुमच्या टीकेचा सर्वसाधारण रोख जाणून तुम्हाला उत्तर देणे मला शक्य होईल असे वाटते.

## प्रतिनिधीत्वाचा प्रश्न

तुमच्या निवेदनाचे मला समजलेले सार असे आहे की, प्रतिनिधित्वाची कोणचीही पद्धत मग ती म्युनिसिपालटीची असो, जिल्हा मंडळाची असो की, विधिमंडळाची असो, त्यात मतदार संघ निर्माण करण्याची किंवा त्यात वाढ करण्याची जी सूचना आली आहे त्यात मुसलमान जमातीला एक जमात म्हणून प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे असा तुमचा दावा आहे. तुमचे असे म्हणणे आहे की, आज बनवलेल्या मतदार संघांपैकी बऱ्याच मतदार संघात मुसलमान उमेदवार निवडून येण्याची अपेक्षा करताच येणार नाही आणि नशिबाने त्याला निवडून दिले गेले तर तो आपल्या स्वत:च्या जमातीचे प्रतिनिधित्व कुठल्याचप्रकारे कधीच करू शकणार नाही, कारण अशा उमेदवाराला त्याच्या स्वत:च्या जमातीला विरोधी असणाऱ्या बहुमताच्या दृष्टिकोनासाठी स्वत:च्या मताचा बळी द्यावा लागेल. तुम्ही यथायोग्यपणे आपला असा हक्क सांगता की, तुमच्या जमातीचे महत्त्व आणि तुम्ही केलेली साम्राज्याची सेवा या दोन्ही गोष्टीं लक्षात घेऊन तुमच्या प्रतिनिधित्वाच्या संख्येचा विचार व्हावा असा तुमचा अधिकार आहे. मी तुमच्याशी पूर्णपणे सहमत आहे. मेहेरबानी करून माझ्याबद्दल गैरसमज करून घेऊ नका. जमातींचे प्रतिनिधित्व कसे मिळवता येईल हे सुचवण्याचा प्रयत्न मी करत नाही. परंतु या देशातील जमातींच्या श्रद्धा आणि परंपरा यांच्याकडे दुर्लक्ष करून वैयक्तिक मतदानाचा स्वातंत्र्याचा उद्देश मान्य केला गेला तर हिंदुस्तानात कुठल्याही मतदारांचे प्रतिनिधित्व अतिशय विदारक रीतीने अयशस्वी होईल असे तुम्हाला वाटते तितक्याच ठामपणे मलाही पटलेले आहे.

हिंदुस्तानातील फार मोठ्या जनतेला प्रातिनिधिक संस्थांची माहिती नाही. सभ्य गृहस्थहो, म्युनिसिपालटी आणि जिल्हामंडळे या स्वराज्याच्या प्राथमिक पायऱ्या आहेत आणि त्याच दिशेने लोकांचे हळूहळू राजकीय शिक्षण होईल याकडे आम्ही लक्ष दिले पाहिजे या तुमच्या म्हणण्याशी मी सहमत आहे.

**आश्वासन**

तोपर्यंत, मी माझ्यावतीने एवढेच म्हणू शकतो की, माझ्याशी संबंधित असलेल्या कुठल्याही कारभाराच्या व्यवस्थापन बदलात जमात म्हणून त्यांच्या हक्कांचे आणि राजकीय हितसंबंधांचे संरक्षण केले जाईल याबद्दल त्यांनी विश्वास बाळगावा आणि राजाच्या हिंदी साम्राज्यातील लाखो लोकांच्या धार्मिक श्रद्धा आणि राष्ट्रीय परंपरा यांचा आदर करण्यात ज्यांनी अभिमान बाळगला आहे अशा ब्रिटिश राज्यावर तुम्ही आणि हिंदुस्तानातील लोकांनी भरवसा ठेवावा.

राजे महाराज आणि सज्जनहो, तुमच्या शिष्टमंडळाने मला नामांकित आणि प्रातिनिधिक मुसलमानांना भेटण्याची अनन्य संधी दिली याबद्दल मी तुमचा मनापासून आभारी आहे. तुम्हाला एवढ्या लांबून येथे आणणारा तुमचा राष्ट्रीय घडामोडीचा उत्साह आणि रस यांचे मी अतिशय मनःपूर्वक कौतुक करतो. ही भेट अनिवार्यपणे फार थोड्या वेळाची झाली याबद्दल मात्र मला खंत वाटते.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे ६.